
अन्वयार्थ - १
शरद जोशी

अन्वयार्थ- १

शरद जोशी

जनशक्ती वाचक चळवळ

* या पुस्तकातील सर्व लेख दै. लोकमतमधून प्रकाशित झालेले आहेत. संपादकांचे आभार.

जनशक्ती
वाचक
चळवळ

अन्वयार्थ १ । शरद जोशी
Anvayaarth One by Sharad Joshi

प्रकाशक
जनशक्ती वाचक चळवळ
पिनाक, २४४-समर्थनगर,
औरंगाबाद-४३१००१.
दूरभाष : (०२४०) २३४१००४.
Email : janshakti.wachak@gmail.com

© शरद जोशी
अंगारमळा, आंबेठाण-४१०५०१
ता. खेड, जि. पुणे.

मुद्रक
लक्ष्मी आर्ट प्रिंटर्स, औरंगाबाद.

मुखपृष्ठ
सरदार

प्रथमावृत्ती
१६ मार्च २०१०, गुढीपाडवा

मूल्य रु. ३००/-

प्रकाशकाचे मनोगत

शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने त्यांचे सर्व लिखाण ग्रंथरूपात येत आहे. या उपक्रमातील 'अन्वयार्थ' हे एक पुढचे पाऊल. हे लेख 'दै. लोकमत'मध्ये इ.स. १९९२ - १९९४ व इ.स. २००० - २००१ या कालावधीत 'अन्वयार्थ' सदराखाली प्रसिद्ध झालेले आहेत. लेखांखाली तारखा आवर्जून टाकल्या आहेत, जेणेकरून काळाचा संदर्भ आवश्यक तेथे स्पष्ट व्हावा. शेतकरी संघटनेचा विचार हा फक्त शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून तो सर्वांचाच आहे. हे वेगळं सांगायची गरज नाही. इतके हे लिखाण स्पष्ट आहे.

कै. हेमंत देशमुख, सौ. शैला देशपांडे, सुरेशचंद्र म्हात्रे, दै. लोकमत औरंगाबादचे वृत्तसंपादक चक्रधर दळवी या सर्वांमुळे हे लेख उपलब्ध झाले. त्यांचे मन:पूर्वक आभार.

'शेतकरी संघटक' या पाक्षिकातील शरद जोशी यांचे लेख 'माझ्या शेतकरी भावांनो- मायबहिणींनो', 'बळिचे राज्य येणार आहे', 'भारता'साठी', 'पोशिंद्यांची लोकशाही', 'चांदवडची शिदोरी' या शीर्षकांखाली प्रकाशित करीत आहोत. ही सर्व पुस्तके अमृत महोत्सवी वर्षात प्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे.

'अंगारमळा' या पुस्तकाला नुकतेच महाराष्ट्र शासनाने पुरस्कार देऊन गौरविले आहे. शरद जोशी यांच्या लिखाणाची अभ्यासक, विचारवंत योग्य ती दखल घेतील ही आशा आम्ही बाळगतो.

१६ मार्च २०१०
गुढीपाडवा

श्रीकांत उमरीकर

प्रस्तावना

माझे आजपर्यंत पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले जवळजवळ सर्वच लिखाण हे शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने तयार झालेले आहे. शेतकऱ्यांमध्ये शेतकरी संघटनेचा विचार व शेतीचे अर्थशास्त्र आणि स्वातंत्र्याचे महत्त्व मांडण्याकरिता प्रामुख्याने ते लिखाण झालेले आहे. या मधल्या काळात एक काळ असा येऊन गेला की ज्या वेळी एका प्रसिद्ध दैनिकाने माझ्या लेखांची मागणी केली आणि 'ते लेख शेतीविषयी नसावेत,' अशीही त्यांनी एक सूचना केली होती. दैनिक राज्यकर्त्या पक्षाचे असल्यामुळे माझी शेतीविषयीची मते छापण्याची त्यांची फारशी इच्छा नसावी हे उघड आहे.

मीही, पाहावेतरी एकदा प्रयोग करून असे मनात म्हणून, लेख लिहिण्याचे मान्य केले. या लेखसंग्रहात छापले गेलेले लेख हे प्रामुख्याने या काळात लिहिलेले आणि त्यामुळे, साहजिकच, शेती हा विषय सोडून इतर विषयांवर लिहिलेले आहेत.

'सर्व शासनव्यवस्थेची सुरुवातच मुळी शेतीमध्ये तयार होणाऱ्या उत्पादनाची लूट करण्याची आहे' हा शेतकरी संघटनेचा सिद्धांत आहे. इंग्रजी अंमलाच्या काळात इंग्रजांनी प्रथम हिंदुस्थानात कायदा आणि सुव्यवस्था स्थापन केली. याउलट, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशी राज्यकर्त्यांनी समाजवादाच्या नावाखाली लायसन्स्-परमिट-कोटा राज्य तयार केल्यामुळे काळाबाजारवाले, तस्कर आणि गुंड यांचे राज्य सगळीकडे माजले. आणि, आज जी पुंडगिरी दिसत आहे ती त्या समाजवादी कालखंडाचाच परिणाम होय. एका अर्थी राजनीती माहेराला म्हणजे तिच्या मूळ स्थानाकडे गेली आणि पुन्हा एकदा, आज जे आपण पहातो ते, भ्रष्टाचार, भूखंड लाटणे आणि लाचलुचपत हे मूळ स्वरूप राजनीतीने धारण केले आहे.

तंत्रज्ञानाचा विषय हा तसा शेतीशी जोडलेलाच आहे. चारशे वर्षांपूर्वी, 'जमीन आकाराने वाढत नाही, याउलट खाणारी तोंडेमात्र वाढतात; त्यामुळे भूकमारी, रोगराई आणि युद्धे ही मानवजातीची अपरिहार्य नियती आहे', असे भाकित डॉ. माल्थस यांनी केले होते. ते खोटे ठरले. याचे कारण, शेतीची जमीन तेवढीच राहिली तरी शेतीमध्ये, मनुष्याच्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने तयार झालेल्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे उत्पादन कित्येक पटींनी वाढले आणि आज लोकसंख्या अनेक पटींनी वाढूनसुद्धा सर्व प्रजा कधी नव्हे इतक्या चांगल्या तऱ्हेने खातपीत आहे. या तंत्रज्ञानाच्या प्रत्येक पायरीवर पर्यावरणवाद्यांनी विरोध केला. जेव्हा आगगाड्या सुरू झाल्या तेव्हाही त्यांनी विरोध केला, हरित क्रांतीच्या वेळी रासायनिक खतेऔषधे आली त्यालाही त्यांनी विरोध केला, गणकयंत्रे आली तेव्हाही त्यांनी विरोध केला. प्रत्येक वेळी पर्यावरणवाद्यांच्या बीमोड झाला आहे तरी त्यांची तंत्रज्ञानाला विरोध करण्याची खोड जात नाही. आजही जैविक वांग्यांच्या निमित्ताने ते आपली तंत्रज्ञानाच्या विरोधाची भूमिका पुन्हा एकदा मांडीत आहेत. यामध्ये त्यांचा हेतू प्रामुख्याने, येणाऱ्या गाड्याला अपशकून करून नाव मिळविणे हा असावा ही भूमिका या संग्रहातील काही लेखांत मी मांडली आहे.

मनुष्यजातीची प्रगती होते ती प्रामुख्याने धडाडी दाखविणाऱ्या संशोधक प्रतिभाशाली नेतृत्वामुळे होते. सर्वसाधारण जनतेला या प्रतिभाशाली धडाडीच्या नेतृत्वाबद्दल मनामध्ये एक प्रचंड मत्सर असतो. इतरांनी प्रतिभा दाखवावी, धोका पत्करून संशोधन करावे आणि त्याचे फळ आपल्याला बिनबोभाट मिळावे अशी त्यांची अपेक्षा असते. अश्या तऱ्हेने, प्रतिभावान थोडे आणि प्रतिभेचा लाभ घेऊ इच्छिणारे अधिक अशी परिस्थिती असल्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये म्हणजे 'एक डोके, एक मत' निवडणुकीच्या आधाराने चालणाऱ्या व्यवस्थेमध्ये प्रतिभाशाली प्रज्ञावंतांचा विजय होण्याची शक्यता नाहीच. आजच्याही राजकारणात हे आपण प्रत्यक्षात पहातोच आहोत.

पोशिंद्यांना प्रोत्साहन देण्याच्या कार्यक्रमाऐवजी 'आम आदमी'चे भले करण्याच्या नावाने त्यांना भीक आणि अनुदाने वाटण्याचे कार्यक्रम निवडणुकीत अधिक यशस्वी होतात आणि देशाने तेजस्विता दाखविण्याऐवजी जो येईल त्याच्या पुढे मान खाली घालावी व शरणागती पत्करावी अश्या तऱ्हेच्या 'भाईभाईवादा'लाही निवडणुकीमध्ये भरपूर जनमताचा पाठिंबा मिळतो.कधीकाळी जगातील प्रतिभावंत, धडाडी दाखविणारे, उद्योजक या छळाला कंटाळून गेले तर काय होईल या विषयी एक सुंदर कल्पना प्रख्यात लेखिका आयन रँड यांनी मांडली आहे. त्या

आधाराने, हिंदुस्थानात अश्या तऱ्हेच्या उद्योजकांच्या एका आघाडीची गरज असल्याचे प्रतिपादन मी केले आहे.

अलीकडे लेखन उदंड झाले आहे आणि छापील पुस्तकेही उदंड झाली आहेत. हल्ली ज्याने काही पुस्तक लिहिले नाही, प्रबंध लिहिला नाही, काही संशोधनात्मक काम केल्याची मान्यता मिळविली नाही असा मनुष्य सापडणेच कठीण आहे. एका काळी हाताने लेख लिहून, त्याचे खिळे जुळवून, छपाईच्या जुन्या यंत्रावर ते घालून पुस्तकाचा मजकूर छापावा लागत होता. त्या वेळी पुस्तक लिहिणे आणि ते प्रकाशित करणे हे काही येऱ्यागबाळाचे काम नव्हते. त्यासाठी टिळकआगरकरांसारखी ध्येयनिष्ठा, उत्साह आणि चिकाटी लागत असे. अलीकडे शब्दांचा भरमार झाल्यामुळे परिणाम असा झाला आहे की, इतके शब्द आपल्या मनाच्या पटलावर उमटवून घेऊन त्याप्रमाणे प्रत्यक्षात काही कार्यवाही करण्याची काही शक्यता तयार होणे जवळजवळ संपुष्टात आले आहे. छापणे उदंड झाले आहे, पण त्यामुळे लिखित शब्दच मेला आहे अशी एक कल्पना मी मांडली आहे.

आतंकवाद सर्वत्र माजलेला आहे अशा काळामध्ये ज्या काळामध्ये अश्या तऱ्हेच्या गुंडगिरीला नावे ठेवली जात होती त्या वेळची पद्धत कशी होती यासंबंधी मी एक लेख लिहिला आहे. दक्षिण आशियातील छोट्या छोट्या हजारो बेटांमध्ये इंग्रजांनी राज्य चालविले. सबंध बेटावर असला तर एखादा इंग्लिश पुरुष किंवा एखादी बाई मिशनरी असे. त्याचे/तिचे संरक्षण करण्याकरिता तेथे शासकीय यंत्रणा किंवा पोलिस यंत्रणा नव्हती. आणि, तरीसुद्धा त्या इंग्लिश पुरुषाला किंवा बाईला हात लावण्याची स्थानिक लोकांची हिम्मत होत नसे. त्यांना हे माहीत होते की, आज आपण जर असे काही दुष्कृत्य केले तर लगेच नाही पण काही वेळाने का होई ना, सबंध इंग्रजी फौज जहाजांनी येऊन त्यांच्यावर तुटून पडेल आणि सबंध बेटाचा आणि समाजाचा नि:पात होईल. कायदा आणि सुव्यवस्था म्हणजे काही पोलिस आणि चोर यांचा खेळ नाही. पोलिसांची संख्या वाढवून माणशी एक पोलिस केल्याने कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित होत नाही. त्यासाठी कायद्याचा धाक बसण्याची आवश्यकता आहे. सरकारची पकड कमी व्हायला पाहिजे, सरकारचे विकेंद्रीकरण व्हायला पाहिजे हे खरे आहे, पण त्याबरोबर सरकार आणि प्रशासन यांच्या विषयी लोकांच्या मनात धाक असणे हेही आवश्यक आहे.

आतंकवादाचा आणखी एक परिणाम म्हणजे ज्या त्या अतिविशिष्ट व्यक्तीस

संरक्षण असणे ही मोठी प्रतिष्ठेची गोष्ट वाटू लागली आहे. या संरक्षणव्यवस्थेवर कोट्यवधी रुपये खर्च होतात. एवढेच नव्हे तर हा खर्च भरून देण्याची या पुढाऱ्यांची तयारी नसते. एवढे संरक्षण देऊनसुद्धा इंदिरा गांधींचे संरक्षण होऊ शकले नाही, राजीव गांधींचे संरक्षण होऊ शकले नाही आणि खुद्द महात्मा गांधींचेही संरक्षण होऊ शकले नाही. याकरिता आतंकवादापासून संरक्षणाची व्यवस्था अशी असली पाहिजे की, ज्यामध्ये समाजातील कोणत्याही सर्वोच्च अधिकाऱ्याच्या किंवा अतिविशिष्ट व्यक्तीच्या जागी दुसरी तितकीच सक्षम व्यक्ती उभी करता येईल. अशी व्यवस्था झाली तर आतंकवाद्यांना काही कामच उरणार नाही आणि त्यांची शस्त्रे बोथट होऊन जातील.

खुल्या व्यवस्थेसंबंधी आणि खुल्या बाजारपेठेसंबंधी पुष्कळ चर्चा चालू आहे. त्यातील एक भीती अशी दाखविली जाते की, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे दरवाजे उघडले की परदेशातून प्रचंड प्रमाणावर माल देशात येऊन पडेल आणि देशात प्रचंड प्रमाणावर बेकारी माजेल. खिडकी उघडल्याने हवा फक्त बाहेरून आत येते असे नव्हे तर आतील कोंदटलेली हवासुद्धा बाहेर पडते या आधाराने, गेल्या काही शतकांमध्ये बाहेरून येणारे तंत्रज्ञान, बाहेरून येणारी संपत्ती यांनी सबंध हिंदुस्थानचा किती फायदा झाला आहे याचाही आलेख मी शब्दांकित केला आहे. बुखारेस्टपासून ते कैरोपर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाने लोकसंख्याविषयक अनेक परिषदा भरविल्या आणि त्यांच्या आधाराने देशोदेशी कुटुंबनियोजन कसे करावे याच्या योजना आखल्या गेल्या आणि त्यावर अब्जावधी रुपये खर्च केले. प्रत्यक्ष अनुभव पाहिला तर गरीब समाजामध्ये लोकसंख्यावाढीची गती खूपच जास्त असते. त्या मानाने संपन्न, सुबत्ता असलेल्या समाजामध्ये मुलांना जन्म देण्याची प्रवृत्ती आपोआपच कमी होऊन जाते. याचे एक कारण असे की मुले म्हणजे आपल्या वृद्धापकाळातील संरक्षणाची तरतूद होतील या कल्पनेने मुलांना जन्म दिला जातो. आणि, जर आरोग्यव्यवस्था चांगली नसेल तर पाचसहा मुले जन्मली तर त्यांतील एखादातरी जगून आपल्याला म्हातारपणी काठीचा आधार होईल या कल्पनेने लोकसंख्या वाढत जाते. संपन्नता हे कुटुंबनियोजनाचे सर्वात मोठे साधन आहे ही कल्पना अजूनही स्वीकारली जात नाही. याउलट, आजही एच्आय्व्हीग्रस्त लोकांवर अब्जावधी रुपये खर्च करून त्यांना जगविण्याचा आणि त्यांची प्रजाही जगविण्याचा प्रयत्न चालू आहे. खरे म्हणजे एका बाजूला एच्आय्व्हीग्रस्तांना जिवंत ठेवण्यासाठी धडपड करणे आणि बरोबरच म्हाताऱ्यांनाही जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणे व न जन्मलेल्या

अर्भकांना, कुटुंबनियोजनाच्या निमित्ताने, काटून टाकणे यात कोणताच शहाणपणा नाही.

मधल्या काळी बिहारमध्ये नोकरीवरून काढून टाकलेले किंवा संपावर असलेले नोकरदारसुद्धा कचेरीतील आपल्या नियोजित जागांवर येऊन बसत. त्यांना पगार कोणी देत नव्हते तरीसुद्धा त्यांनी कचेरीत येणे सोडले नव्हते. याचे मोठे कारण म्हणजे त्यांना कचेरीत मिळणारे वरकड उत्पन्न इतके मोठे होते की त्या मानाने त्यांना पगाराची फारशी पत्रास नव्हती. भ्रष्टाचार, निदान किरकोळ भ्रष्टाचार कमी करण्याचा एक मार्ग मी सुचविला आहे. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येकाने आपले सर्व सामान बाहेरच्या प्रवेशद्वारापाशी सोडावे, अंगझडती करवून आत जावे आणि मगच त्यांनी आपली उपस्थिती मांडावी. आणि, परत जाताना अशीच झडती करवून घेऊन आपले येताना जमा केलेले सामान परत घेऊन बाहेर पडावे. असे केले म्हणजे मालकाची लूट करणारे नोकरदार आटोक्यात येतील.

समाजवादी रशियाचा पाडाव झाला त्यामुळे आपल्या देशातील तथाकथित शोषितांच्या चळवळीच्या नेत्यांची मोठी गोची झाली. जागतिक व्यापार संघटनेच्या करारमदारांमध्ये वेठबिगारीवर बंदी असावी, पर्यावरणाला धोका पोहोचविणारे तंत्रज्ञान वापरले जाऊ नये अश्या तऱ्हेचे कार्यक्रम हे तथाकथित 'आहे रे' राष्ट्रांनीच हाती घेतल्यामुळेतर परंपरागत डाव्या विचारांच्या लोकांची मोठी गोची झाली.

धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? आपण धर्मनिरपेक्ष व्यवस्थेत आहोत काय? अल्पसंख्याक कोण आणि हिंदू कोण? या प्रश्नांसंबंधीचा वादविवाद आजही चालू आहे. त्या वेळी, 'साम्ययोग'मध्ये पुन्हा एकदा छापल्या गेलेल्या विनोबाजींच्या, 'हिंदुत्वा'ची व्याख्या देण्याऱ्या लेखाच्या संबंधाने आजच्या या वादविवादाची मर्यादा एका लेखामध्ये मी स्पष्ट केली आहे.

नोकरशहांविषयीचा माझा राग हा स्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानातून निघणारा आहे. एका काळी इंग्रजी राज्यात खुद्द गव्हर्नर जनरलसुद्धा जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिताना 'आपला विश्वासू आणि आज्ञाधारक' म्हणून सही करीत असे. याउलट, स्वतंत्र हिंदुस्थानामध्ये 'आपण जनतेचे नोकर आहोत' ही वस्तुस्थिती विसरून नोकरशहांची दंडेली माजली आहे.

शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता म्हणून शेतकऱ्यांच्या आणि शेतीच्या अर्थशास्त्राचे एक वेगळे दर्शन घडविण्याचा मी प्रयत्न केला. 'शेतकरी एक बी पेरून हजारो

दाणे तयार करणारा पण तो सगळ्यात दरिद्री रहातो, सगळ्यात कर्जबाजारी रहातो आणि, प्रसंगी आत्महत्या करायलाही उद्युक्त होतो याचे कारण त्याला बाजारपेठेचे स्वातंत्र्य नाही, तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य नाही' हा विचार मी सातत्याने वेगवेगळ्या प्रसंगी मांडला आहे. शेतीसंबंधी लिहायचे नाही असे जरी म्हटले तरी माझ्या बुद्धीतील या पार्श्वभूमीच्या आधारानेच जगात इतरत्र घडणाऱ्या घटनांचा अन्वयार्थ लावणे हे उघड आहे. अश्या तऱ्हेने देशातील तत्कालीन घटनांचा अन्वयार्थ स्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून लावण्याचा हा एक प्रयत्न आहे. शेतकरी संघटनेच्या अभ्यासकांना अलीकडे माझे प्रसिद्ध झालेले पुस्तक 'जग बदलणारी पुस्तके' याच्या बरोबर प्रचलित घटनांचा अन्वयार्थ लावणारा हा लेखसंग्रह पसंत पडावा.

याखेरीज, 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' हे माझे पुस्तकही या आधीच प्रकाशित झाले आहे. शेतकरी संघटनेच्या अभ्यासकांना 'अन्वयार्थ', 'जग बदलणारी पुस्तके' आणि 'प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश' ही पुस्तके 'शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती' आणि इतर पुस्तकांच्या बरोबरीने अभ्यासाकरिता उपयुक्त ठरतील अशी आशा आहे.

शरद जोशी
८ फेब्रुवारी २०१०

लेखानुक्रम

१. नव्या शतकातील माणूस- माणूस असेल १५
१. 'सियावरत्यक्ता सीता' एक अनादी पीडित २०
२. विद्वानांची 'स्वायत्तता लिमिटेड' २५
३. नवे कलुषा कब्जी ३०
४. पाहिजे 'एक सरकार' ३५
५. निरंकुश: पक्ष: ४०
६. लोकशाहीची सवत अर्थसत्ता ४५
७. आणखी एक स्वायत्तता लिमिटेड ४९
८. सामान्य जनता आणि विविध ठगांची टोळी ५३
९. हिंदू नसल्याचा अभिमान ५८
१०. निर्यात विरुद्ध सरकार ६३
११. राजनीती आली माहेराला ६८
१२. समाजवादाला डच्चू ७४
१३. विश्वासू आणि आज्ञाधारक ७९
१४. हुंडा नको, संपत्तीहक्क हवा ८३
१५. लोकप्रियतेचे रहस्य आणि नोकरशाही! ८८
१६. डंकेल आणि लेखी शब्दाचा मृत्युलेख ९३
१७. माणसाचे श्रेष्ठत्व ठरविण्यासाठी वेगवेगळ्या मोजपट्ट्या ९८
१८. अणुबॉम्ब निर्मितीबाबत साकल्याने विचार करण्याची गरज १०२
१९. महालनोबिस ते हर्षद मेहता १०६

२०. गुलामांच्या बेड्या तर काढा! १११
२१. भारताची खरी संसद ११५
२२. ठगांचे पुनर्वसन आणि कांगावा ११८
२३. कचराकुंडीत आणखी एक कायदा १२२
२४. आता रशियन 'हिटलर?' १२७
२५. भारतीय अर्थव्यवस्थेचे भरकटलेले गाडे १३२
२६. पङ्गुम् लंघयते गिरिम् १३७
२७. आधुनिक पृथ्वीचा तोल सांभाळणारेच संपावर १४१
२८. श्वानासाठी साडेपाच हजार : माणसासाठी किती? १४६
२९. श्रीकृष्णाविना वस्त्रहरण १५१
३०. उनाड पोर, चाबरा मास्तर, आंधळी नानी १५६
३१. रोगापेक्षा औषध भयानक १६१
३२. वेदान्ताचे अर्थशास्त्र १६६
३३. देवळांच्या विढ्याचा तिढा १७०
३४. फळबाग बोफोर्स! १७५
३५. हिरव्याची हकालपट्टी १८०
३६. आधुनिक तंत्रज्ञान नाकारून कुणाचे भले होणार? १८५
३७. खुलेपणाच्या विरोधात 'बॉम्बे क्लब'ची क्लृप्ती १८९
३८. रशियात आता फॅसिझम लोकप्रिय १९४
३९. विलायती औषधी महाग होणे गरिबांसाठी चांगले १९९
४०. नोकरदार आख्यान-'आणिला, मागुती नेला...!' २०४
४१. अमेरिकन प्रशासनाची अनेक राष्ट्रांकडे वक्रदृष्टी २०९
४२. मतिमंद मुलीवरील शस्त्रक्रियासंबंधी वाद नको होता २१४
४३. अर्थमंत्र्यांनी शेतकरीवर्गाला देशाच्या वेशीबाहेर ठेवले २१९
४४. शिवसेनेचे समांतर सरकार! २२४
४५. उद्योगी टोळ आणि आळशी मुंगी २२९
४६. 'बॉम्बे क्लब'चे सपाट मैदान आणि वाकडे अंगण २३४
४७. बडा हिंदूराव आणि बादशहा २३८
४८. स्वामी, जॉर्ज, मेधा, क्लिंटन आणि डंकेल २४२

४९. इलेक्ट्रॉनिक्स पत्रकारितेमुळे मोकळे जाहले श्वास २४७
५०. भारताचा रशिया करू पाहणाऱ्यांना रोखा २५२
५१. खुल्या व्यवस्थेची टिंगल करणारे भोंगळ राष्ट्रवादी २५७
५२. 'हरिजन'वरील वाद अनाठायी २६२
५३. फटक्यांच्या शिक्षेतील माणुसकी २६७
५४. तोट्यात चालणारे कारखाने आणि कारखानदार २७२
५५. भ्रष्टाचाराचा समुद्र प्राशन करण्या पद्मभूषण अगस्ती आला २७७
५६. पंतप्रधान नरसिंह राव अमेरिकेचे 'स्टेट गेस्ट' २८२
५७. स्त्रीमुक्ती चळवळींची पीछेहाट २८७
५८. मरणात खरोखर जग जगते २९२
५९. टोळीवादाला प्रतिष्ठा मिळायला नको २९७
६०. नैतिकता जपण्याची जबाबदारी समाजाची ३०२
६१. कर्तबगारांना अपंग बनविणारा समाजवाद ३०७
६२. छुपे युद्ध अधिक त्रासदायक ३११
६३. जन्मदात्याच्या मुळावर आलेली घटनेतील नववी अनुसूची ३१६
६४. महाराष्ट्रातील शाहीर भाट-विदूषक झाले ३२१
६५. लोकसंख्या वाढविषयक परिषदेत नोकरशाहीचा विजय ३२६
६६. हुंडा बाजारातील खुल्या अर्थव्यवस्थेचे विदारक स्वरूप ३३१
६७. साम्यवाद्यांच्या इतिहासातील खलनायक माओ ३३६
६९. सुखशांतीचा राजीनाम ३४१
७०. अन्नमंत्रालयात अतिरेकी ३४७
७१. भ्रष्टाचारी आम्हा सोयरे ३५२
७२. मालकाला विकणारे नोकरदार ३५६
७३. नोकरदारांची मगरमिठी ३६०
७४. चोर, हर्षद, कवी, शास्त्रज्ञ आणि डंकेल ३६४
७५. बिल क्लिंटन यांची कुऱ्हाड ३६८
७६. दैवयत्तं कुले जन्मं ३७३
७७. सध्याची (नाम)धाऱ्यांची परिषद ३७८

***

नव्या शतकातील माणूस – माणूस असेल

उत्क्रांतीच्या प्रवाहात माणसाची निर्मिती झाली. माकडासारखा दिसणारा माणूस हळूहळू सरळ ताठ चालू लागला. त्याचा चेहरामोहरा बदलला. आजूबाजूच्या परिस्थितीवर मात करण्याची त्याची क्षमता वाढत गेली. साधने, अवजारे, यंत्रे संपादून तो साऱ्या पृथ्वीचा मालक बनला. धर्म, जाती, राष्ट्रे, व्यावसायिक संस्था अशा विविध प्रकारच्या संघटना बनवून आपले प्रभुत्व त्याने आणखी मजबूत केले.

पण माणसांच्या समाजात हरघडी मोठ्या जटील समस्या उभ्या राहतात. सुखासमाधानाने गुण्यागोविंदाने नांदण्याऐवजी एकमेकांवर कुरघोडी करणे, लांडीलबाडी, चोरी दरवडे, खून, भ्रष्टाचार असले प्रकार माणसे करतात, एवढेच नव्हे तर संघटितरित्या आक्रमण, जाळपोळ, लुटालूट, शोषण करीत राहतात. असल्या प्रकारांना आळा घालण्याकरिता कोणा धर्ममार्तंडाला मानावे, कोणा राजा सम्राटाचे सार्वभौमत्व मानावे, कोणा पंतप्रधानाकडे, संसदेकडे सत्ता सोपवावी तर भ्रष्टाचार सत्तेला खाऊन जातो. 'सत्ता तेथे भ्रष्टाचार' या नियमाला अपवाद मोठा दुर्मिळ.

माणूस सुधारला नाही

या सगळ्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी थोर थोर विचारवंतांनी वेगवेगळे मार्ग सुचविले.

इहलोकातील खोट्या सुखांकडे लक्ष देण्याऐवजी इथे त्यांच्याविषयी उदासीन राहावे, 'दुःख तप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम्' हे जीवित्व मानावे म्हणजे मोक्ष मिळेल, स्वर्ग मिळेल अशी लालूच हरेक धर्माने दाखवली. कुलासाठी व्यक्तीचा त्याग करावा, गावासाठी घराचा, राष्ट्रासाठी गावाचा, असा आदर्श घालून स्वतःच्या स्वार्थावर पाणी सोडण्यास माणसे तयार करावी, असा प्रयत्न

राष्ट्रवाद्यांनी केला.

आपापल्या सामर्थ्यानुसार समाजाला द्यावे आणि गरजेपुरतेच समाजाकडून घ्यावे, असा समाजवादी आदर्श देऊन मार्क्सवाद्यांनी एक वेगळी संस्कृती तयार करण्याचा प्रयत्न केला.

आपल्याजवळची मालमत्ता 'विश्वस्त' भावनेने जोपासावी, अशा नैतिकतेवर सर्व समाजरचना उभारण्याचे स्वप्न गांधीवाद्यांनी पाहिले.

पण माणूस जसाच्या तसा राहिला. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे सारे षड्रिपु त्याला जन्मत:च घेरतात आणि जन्मभर त्याचा पाठपुरावा करतात आणि माणसांचे सगळे आयुष्य दु:खमय करून टाकतात. सगळ्या उत्क्रांतीत माणसाचा मूळ स्वभाव काही बदलला नाही. त्याचे सामर्थ्य वाढत गेले आणि प्रकृती रानटीच राहिली. परिणाम असा झाला, की जंगलात फिरणारा रानवट पूर्वज एखाद दुसऱ्या माणसाचे डोके फोडी, तेथे सुधारलेला वंशज गावेच्या गावे, शहरेच्या शहरे, प्रदेशच्या प्रदेश उद्ध्वस्त करू शकत आहे. माणूस माणूस कसा बनायचा हा मोठा यक्षप्रश्न आहे.

विज्ञानाला आव्हान

माणसाला जे प्रश्न सुटत नाहीत ते सोडवण्याच्या कामी माणसानेच शोधलेले आणि निर्माण केलेले विज्ञान, तंत्रज्ञान येते. वाढती लोकसंख्या भुकेपोटी मेली असती; पण बियाण्यांच्या नव्या वाणांनी आणि सुधारित शेतीने वाढत्या तोंडांना पुरून उरेल इतकी धनधान्याची मुबलकता तयार केली. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती तर इतकी झपाट्याने झाली, की माणसाचे आयुष्यमान गेल्या चाळीस वर्षांत जवळजवळ दुप्पट झाले. गणकयंत्रे, दूरदर्शन, संचारव्यवस्था यांच्या अक्षरश: गगनभेदी उड्डाणामुळे माणसाच्या दैनंदिन आयुष्यात मोठा गुणात्मक फरक घडत आहे. आजपर्यंत माणसाला थोडाफार माणूस बनवले ते तंत्रज्ञानाने, माणसाने नाही! अवतारांना, प्रेषितांना, संत महात्म्यांना जे जमले नाही, राष्ट्रधुरंधर, समाजवादी यांना जे पेलले नाही, ते खुद्द माणसात गुणात्मक बदल घडवून आणण्याचे काम शास्त्रविज्ञान करील असे दिसत आहे.

'जडा'पलीकडील विज्ञान

नवे विज्ञान 'जड', 'चेतना' असल्या कल्पनांबद्दल प्रश्नचिन्ह उभे करीत आहे, एवढेच नव्हे, तर स्थलकालाच्या पारंपरिक कल्पना नाकारत आहे. 'क्वान्टम सिद्धांतां'नंतर पदार्थविज्ञान शास्त्रात एक मोठी क्रांती घडून आली. जडांवर प्रयोग करणारे हे शास्त्र जागोजागी जडापलीकडील अनुभव नोंदवण्याच्या

अवस्थेत आले आहे. नोंदवू लागले आहे. मानसोपचार शास्त्र याच्या नेमक्या उलट्या दिशेने पुढे जात आहे. मनोरुग्णांच्या आयुष्यात पूर्वी घडलेल्या घटना, दु:ख, धक्के यापेक्षा रुग्णांच्या शरीरातील, रसायनांच्या क्रियाप्रक्रियांवर आता अधिकाधिक भर दिला जात आहे. मनोवैद्यक जडाकडे वळत आहे तर वैद्यक नेमक्या उलट्या दिशेकडे. विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांतील वाटचालींचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे.

सुप्त भूतकाळ

मिल्टन एरिक्सन यांच्या एका स्त्री रुग्णास संत्र्याचा रस अतोनात आवडे. मध्यंतरी काही कारणाने तिला त्याच रसाचा उबग आला. इतका, की बाजारात दुकानात संत्री पाहिली तरी तिला ओकारी येई. संमोहनविद्येने एरिक्सनने तिला जुन्या काळात नेले. वीस मिनिटांनंतर तिचा संत्र्याविषयीचा तिटकारा नाहीसा झाला, तिला रस पुन्हा आवडू लागला. रोगाचा उपचार कोणा औषधाने झाला नाही, भूतकाळ पुन्हा एकदा जिवंत करण्याच्या काही तंत्रामुळे झाला.

गर्भकाळाच्या आठवणी

डॉ. केनेथ पार्कर एक अफलातून प्रयोग करतात. त्यांच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर पडद्यावर केवळ चार सहस्त्रांश सेकंद एवढा वेळ एक तेजस्वी प्रकाशबिंदू दाखवतात. या बिंदूवर काही संदेश कोरलेला असतो; पण नेहमीच्या पद्धतीने तो वाचणे एवढ्या थोड्या वेळात शक्य नसते. तरीही या सुप्त संदेशाचा 'आई' या कल्पनेचा काहीही उल्लेख असला तरी त्याचा परिणाम मोठा शुभंकर होतो. 'वंदे मातरम्' आणि 'मातृभक्ती' यांचा शरीरातील सुप्त शक्तींवर काही विशेष चांगला परिणाम आहे, असा डॉ. पार्कर यांचा निष्कर्ष आहे.

सुप्तावस्थेतही मनुष्याची काही इंद्रिये जागृत असतात, असा शास्त्रज्ञांचा अनुभव आहे. शस्त्रक्रियेच्या वेळी गुंगीत असलेली एक बाई शस्त्रक्रियेनंतर ठार वेडी झाली. ती गुंगीत असताना डॉक्टरांनी तिच्या लठ्ठपणाबद्दल काही बीभत्स विनोद केला होता, त्याचा आणि तिच्या वेडाचा संबंध होता असे सिद्ध झाले.

सुप्त स्मृतींचा वापर

या सुप्त संदेशांचा प्रभाव आता सर्वमान्य झाला आहे. एवढेच नव्हे, तर आपल्या मालाचा खप वाढविण्यासाठी कारखानदार सुप्त संदेशांचा उपयोग व्यापारी हेतूने करून घेत आहेत. १९९० मध्ये 'पेप्सी' कंपनीने त्यांच्या मालाच्या वेष्टनांवर सुप्त संदेश दिल्याचे 'टाईम' या जगविख्यात साप्ताहिकाने उघडकीस

आणले, असे संदेश केवळ दृकश्राव्य माध्यमातूनच नव्हे, तर गंध, रस, स्पर्श यांच्याद्वारेही देता येतात.

मनुष्यप्राण्याची ज्ञानसंस्था केवळ पाच इंद्रिये आणि मेंदू नावाचे एक गणकयंत्र अशी ढोबळ नाही. त्यात अनेक, आजपर्यंत अज्ञात राहिलेले बारकावे आहेत, असे शास्त्रज्ञ मानतात आणि त्या दृष्टीने संशोधन करीत आहेत.

फ्रेंच शास्त्रज्ञ अल्फ्रेड टोमॅटिस् यांनी एका मूकबधीर मुलावर मोठा अनोखा प्रयोग केला. मुलाच्या आईचा आवाज पातळ द्रव्याच्या माध्यमातून मुलाला ऐकवला. मुलाला हा सुप्त आवाज ऐकू आला. त्याने जाऊन खोलीभर अंधार केला आणि आईच्या मांडीवर जाऊन गर्भावस्थेतल्याप्रमाणे पायाशी डोके घेऊन तोंडात बोट घालून तो शांत पडून राहिला आणि थोड्या वेळात दहा महिन्यांच्या बालकाप्रमाणे चित्रविचित्र आवाज काढू लागला. बाळ गर्भात असताना आईचे बोलणे आणि आजुबाजूचे इतर आवाज गर्भजलाच्या माध्यमातून त्याला ऐकू येतात. त्यांच्या आठवणी जन्मानंतरही सुप्तावस्थेत राहतात.

ही कल्पना तशी नवी नाही, परंपरागत पद्धती आहे. आईचे खाणे, पिणे, वागणूक तसेच आसपासचे वातावरण यांचा गर्भावर परिणाम होतो, असे मानले जातेच. त्यामुळे, गरोदर स्त्रीची कोडकौतुके करावी, तिच्या मनाला धक्का बसू देऊ नये, अन्यथा बाळावर दुष्परिणाम होतात. याला मान्यता आहे. आजपर्यंत विज्ञानवादी तिला फारसे महत्त्व देत नसत; पण परिस्थिती बदलली आहे आणि अनेक ठिकाणी गर्भकाळातही मुलांना प्रशिक्षण देऊन 'सुपरमेन' तयार करण्याकरिता विद्यापीठे उघडली जात आहेत.

जन्म म्हणजे दु:ख

गर्भकाळात मिळालेल्या साऱ्या संवेदना काही व्यक्तींच्या बाबतीत थोड्याफार तरी शिल्लक राहतात. सगळ्यांच्या बाबतीत असे का घडत नाही? गर्भवासाच्या सर्व स्मृती नष्ट का होतात? अनेक शास्त्रज्ञांचा आडाखा असा आहे, की उत्क्रांतीच्या काळात माणसाला मिळालेली प्रसूतीची पद्धत मोठी रानटी आहे. आईच्या पोटात सुखाने, कोणतीही चिंता न करता वाढणारे बाळ एकदम जगात फेकले जाते. जन्मत:च त्याला धक्का, भीती, भूक, राग इत्यादी भावनांचा परिचय होतो. गर्भकाळात मिळविलेल्या अनुभवांच्या आठवणी जन्माच्या त्या एका धक्क्यात पुष्कळशा पुसून जातात किंवा विस्कळीत होतात. गर्भवासातील अनुभव नष्ट होणार नाही. जन्मानंतरही ते ज्ञान कायम राहील अशी काही अवस्था झाली तर मानवांची एक अधिक उन्नत श्रेणी तयार होऊ शकेल.

नव्या माणसाचा जन्म?

प्रश्न समजला त्याला उत्तर काय? प्रसूतीच्या वेळी आईचे शरीर पाण्यात ठेवण्याचा एक प्रयोग गेली काही वर्षे मोठी प्रमाणावर चालू आहे. मूल पाण्यात जन्मते, नाळ तोडण्याआधी वीस वीस मिनिटे ते पाण्यात तरंगू शकते. पाण्यातून काढताना अनेकदा बाळे रडण्याऐवजी हसत असलेली दिसतात. पाण्याखाली जन्मलेली बाळे इतर मुलांच्या तुलनेने खूप झपाट्याने प्रगती करतात. तिसऱ्या चौथ्या महिन्यात बोलू लागतात, चालू लागतात. त्यांची स्मरणशक्ती तीव्र असते. राग, द्वेष इत्यादी तामसी भावनांपासून ती पुष्कळ दूर राहतात. एवढेच नव्हे तर, गर्भकाळात मिळालेल्या अनुभवांचे त्यांना चांगले स्मरण असते. पाण्याखालील प्रसूती हा मानवजातीच्या उत्क्रांतीतील सर्वांत नवीन आणि सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे असा संबंधित शास्त्रज्ञांचा आग्रह आहे.

नवे शतक - नवा माणूस

मनुष्यप्राण्याच्या उत्पत्तीपासून जीवनसंघर्षात त्याने साधने आणि संघटना वापरली. मनुष्यप्राण्यात फारसा काही फरक पडला नाही. आता मनुष्यप्राण्याची प्रकृती, स्वभाव आणि सामर्थ्य बदलेल असे काही नवे घडत आहे. मार्क्स्, गांधी यांनी समाजवादी 'विश्वस्त' अशा वेगळ्या बुद्धीच्या माणसांचा उदय समाजव्यवस्थेमुळे होईल अशी आशा धरली. सामाजिक परिस्थितीमुळे अधिक शुभंकर माणसाचा उदय झाला नाही. पाण्याखालील प्रसूतीसारख्या छोट्याशा गोष्टीने साऱ्या मनुष्यजातीचे परिवर्तन होण्याची शुभवार्ता शास्त्राने आणली आहे. विसाव्या शतकातून नव्या शतकात आणि नव्या सहस्रात जाणारा माणूस माणूस असेल, माकड नाही, ना राक्षस.

(६ जानेवारी १९९४)

■■

'सियावरत्यक्ता सीता' एक अनादी पीडित

अयोध्येत खास तालीम केलेले बाबरी मस्जिदीच्या घुमटावर चढले. कुऱ्हाडी, पहारी, फावडी, दोरखंड, गळ इत्यादी साधनांनी सुसज्ज करसेवक पुढे सरसावले. दोन तीन तासांच्या आल्पावधीत सारी मस्जिद जमीनदोस्त करून टाकली. हा सगळा कार्यक्रम चालू असताना घोषणा दिल्या जात होत्या. साध्वी ऋतंभरा कर्ण्यातून घोषणा देत होती, "सियावर रामचंद्र की" आणि करसेवक उल्हासाने प्रतिसाद देत होते, "जय, सियावर रामचंद्र की जय."

सीतेचा पती म्हणून प्रभू रामचंद्र ओळखला जातो. एकवचनी, एकबाणी, पुरुषोत्तम इत्यादी अनेक विशेषणे रामासाठी वापरली जातात; पण सर्वांत जनमानसात रुजलेले अभिधान म्हणजे 'सियावर' राम, सीताकांत राम, सीताराम.

भूमिकन्या सीता :

सीतेचे जीवनचरित्र सगळे इतके उज्ज्वल आहे, की तिच्या नावाच्या संदर्भात रामाचा परिचय करून द्यावा हे योग्यच आहे. जनक राजाला जमीन नांगरताना एक लहान मुलगी सापडली, म्हणून ती भूमिकन्या. जनक राजाने सीतेचे स्वयंवर मांडले. प्रचंड शिवधनुष्य एकट्या रामाने पेलले आणि राम सीतापती झाला. वयात आल्यानंतर रामाचा राज्याभिषेक ठरला; पण ऐनवेळी कैकेयी मातेच्या आग्रहामुळे त्याला चौदा वर्षे वनवासात पाठवायचे ठरले. सीतेने वनवासात जावे असे कुणी सांगितले नव्हते; पण रामापाठोपाठ वनवासात जाते असा आग्रह तिने स्वत: धरला. 'जिथे राम तिथे सीता' हा त्या कोवळ्या वयातल्या नववधूचा हट्ट. वनवास सुरू झाला. कांचनमृगाच्या कातड्याचा हट्ट सीतेने केला, हा एकच प्रसंग सीतेला माणसाप्रमाणे रागलोभ होते असे दाखवणारा. नाहीतर एरवी आयुष्यभर ती एखाद्या देवतेप्रमाणे जगली. रावणाने सीतेचे हरण केले. रामरावण युद्ध झाले. रावणाचा वध झाला, सीतेची मुक्तता झाली.

सीता सामोरी आली आणि रामाने एखाद्या प्राकृत पुरुषालासुद्धा न शोभणारे भाषण तिला ऐकवले,

"भद्रे, समरांगणात शत्रूला पराभूत करून मी तुला त्याच्या तावडीतून सोडवले. पुरुषार्थ दाखवून जे काही करण्यासारखे होते ते सारे मी केले, आता माझ्या अमर्षाचा अंत झाला आहे. माझ्यावर जो कलंक लागला होता त्याचे मी परिमार्जन केलं."

"तुला हे समजले आहे, की मी हा जो युद्धाचा प्रपंच केला तसेच या मित्रांच्या पराक्रमाचे साहाय्य घेऊन युद्धात जो विजय मिळविला, ते सारे तुझ्या प्राप्तीसाठी केलेले नाही. सदाचाराचे रक्षण, सगळीकडे फैलावलेल्या अपवादाचे निवारण, तसेच आमच्या सुविख्यात वंशावर लागलेल्या कलंकाचे परिमार्जन करण्यासाठी मी हे सारे केले."

"तुझ्या चरित्रावर संदेहाचा डाग पडला आहे, तरीही तू माझ्यासमोर आली आहेस. ज्याप्रमाणे डोळ्यांचा आजार असलेल्या रोग्याला दिव्याची ज्योत सुखवीत नाही त्याप्रमाणे आज तू मला अत्यंत अप्रिय वाटते आहेस. तेव्हा जनककुमारी, तू तुझ्या इच्छेला येईल तिकडे निघून जा; मी माझ्याकडून तुला अनुमती देतो आहे. भद्रे, या दाही दिशा तुला मोकळ्या आहेत. आता तुझ्याशी मला काहीही कर्तव्य नाही."

"रावण तुला आपल्या खांद्यावर बसवून घेऊन गेला, त्याने तुझ्यावर दुष्टदृष्टी टाकलेली आहे. अशा अवस्थेत, महाकुलीन असा माझ्यासारखा पुरुष तुझे पुनर्ग्रहण कसे करू शकेल?"

फाळणीच्या वेळी हजारो अपहृत स्त्रियांचा शोध लावून, त्यांना पाकिस्तानातून परत आणण्याचे मोठे कठीण काम अनेक संस्थांनी केले. दुर्दैवाची गोष्ट अशी, की त्या स्त्रियांचे आईबाप, पती, सासूसासरे त्यांना स्वीकारण्यास तयार झाले नाहीत. या अपहृत स्त्रिया कलंकित झालेल्या आहेत, त्यांना आम्ही स्वीकारू शकत नाही, असा त्यांचा युक्तिवाद होता. स्वस्त्रियांचे रक्षण करण्यास जे पुरुष असमर्थ ठरले होते त्यांनीच अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांना धुत्कारले. या सगळ्या नरवीरांचा सनातन आदर्श 'प्रभू रामचंद्र'च.

बिभीषणापाशी रहा :

एखाद्या अभद्र पुरुषाप्रमाणे राम सीतेला पुढे म्हणाला, "आता तू पाहिजे तिकडे जाऊ शकतेस. तू इच्छिलेस तर भरत किंवा लक्ष्मणाच्या संरक्षणाखाली सुखपूर्वक राहण्याचा विचार करू शकशील. तुझी इच्छा असेल तर शत्रुघ्न,

वानरराज सुग्रीव किंवा राक्षसराज बिभीषणाजवळही राहू शकतेस. जिथे तुला सुख वाटेल तेथे तू आपले मन वळीव. तुझ्यासारखी दिव्यरूपसौंदर्याने सुशोभित नारी आपल्या घरात असता रावण इतका काळ तुझ्यापासून दूर राहिला असणे शक्य नाही."

रामाचे कठोर बोल ऐकून सीता दु:खित झाली. डोळ्यातील पाण्याने भिजलेले आपले मुख पदराने पुशीत ती हळूहळू गदगदलेल्या वाणीने म्हणाली,

अग्निदेवाची साक्ष :

"वीरा, तुम्ही असं कठोर अनुचित, कर्णकटू आणि रूक्ष बोल मला का ऐकवता आहात? माझ्यावर विश्वास ठेवा, मी माझ्या सदाचाराचीच शपथ घेऊन सांगते, की मी शंका घेण्यायोग्य नाही. रावणाच्या शरीराला माझ्या शरीराचा स्पर्श घडला आहे. माझं दुर्भाग्य त्याला कारणीभूत आहे. माझं अंग पराधीन होते; पण माझे हृदय सदैव तुमच्याच ठायी गुंतलेले आहे."

"माझ्या शोधासाठी तुम्ही महावीर हनुमानाला पाठविले होते त्याच वेळी माझ्या त्याग का केला नाही? त्या वेळी हनुमानाच्या मुखातून तुम्ही मला त्यागल्याचे वृत्त ऐकले असते तर त्याच्यासमोरच मी माझ्या प्राणाचा त्याग केला असता, मग अशाप्रकारे तुमचा जीव धोक्यात घालून तुम्हाला हा युद्धाचा व्यर्थ खटाटोप करावा लागला नसता."

रडत आणि अश्रू ढाळीत बसलेल्या लक्ष्मणाला सीता म्हणाली,

"सुमित्रानंदन, माझ्यासाठी चिता तयार कर. माझ्या दु:खाला हेच औषध आहे."

अग्निपरीक्षा: अग्निदेवाने स्वत:च सीतेच्या शुद्धतेची साक्ष दिली तेव्हा एकवचनी रामाने उलटे बोलायला सुरुवात केली आणि 'अग्निपरीक्षा' करणे योग्यच होते अशी मखलाशी केली.

राम सीतेसह अयोध्येला पोचले. राज्याभिषेक झाला. सीता गर्भवती झाली, तिने तपोवनात एक रात्र निवास करण्याची इच्छा असल्याचे डोहाळे सांगितले. एवढ्यात काही गुप्तहेरांनी प्रजाजनांत सीतेच्या स्वीकाराबद्दल नाखुषी आहे अशी माहिती रामराजाला सांगितली.

परित्यक्तासीता

रामाने प्रत्यक्ष अग्निदेवतेच्या साक्षीपेक्षा संकुचित दृष्टीच्या काही प्रजाजनांचा अपवाद अधिक महत्त्वाचा मानला. याचा अर्थ स्पष्ट आहे, की सीतेला घरी आणल्याबद्दल त्याच्या मनातही कोठेतरी रुखरुख राहिली होती. अन्यथा जनापवाद

कानावर आला. त्यानंतर तो सीतेकडे जाऊन म्हणाला असता, "लोक तुझा अनादर करत आहेत. गेल्या वेळी तू माझ्यामागोमाग वनवासात आलीस, या वेळी मी तुझ्याबरोबर वनवासात येतो. आपण दोघेही अयोध्या सोडून जाऊ."

पण, राम असे म्हणाला नाही, त्याच्याने एवढेसुद्धा बोलवले नाही, की "मी राजा आहे, माझ्या कर्तव्यामुळे तुला जवळ ठेवणे मला शक्य नाही; पण तुझी आबाळ होणार नाही. एवढ्या वैभवशाली अयोध्येतल्या कोणत्याही महालात दासदासी, धनधान्य, आभूषणे घेऊन तू सुखाने राहा आणि आपल्या मुलांनाही योग्य तऱ्हेने वाढीव."

गर्भवती सीतेचे डोहाळे पुरवणे दूरच राहिले; पण बाळंतपण होईपर्यंत तिला अयोध्येत दोन खोल्या घेऊन राहण्याचीसुद्धा मुभा राहिली नाही, तिला जंगलात नेऊन सोडण्यात आले.

रावेरीचे सीतामंदिर

यवतमाळ जिल्हा, राळेगाव तालुका, गाव वस्ती रावेरी. एका बाजूला रामतीर्थ आणि दुसऱ्या बाजूला चिंतामणी गणपती देवस्थान कळंब, या दोघांच्या मधोमध दरीकंदरातून, रानावनातून फिरता फिरता परित्यक्ता सीता या कुग्राम वस्तीला आली. गावात तिला कोण आसरा देणार? गावाबाहेर नदीच्या काठी एका खोपटात ती थांबली. पोटात दुखू लागले. जवळ ना सुईण ना दाईण. पाठीवर हात फिरवायलाही कुणी नाही. अशा अवस्थेत अयोध्येची महाराणी दोन बाळांना जन्म देती झाली.

त्या जागी सीतेचे मंदिर आजही मोडक्या तोडक्या अवस्थेत उभे आहे. गावचे लोक सांगतात, "या इथे लवकुशांचा जन्म झाला. सीता एकटी एकटी या इथे न्हायली."बाळंतपणाच्या श्रमाने व्याकूळ झालेल्या सीतेने गावकऱ्यांना गहू देण्याची विनंती केली. ओळखदेख नसलेल्या फिरत फिरत आलेल्या बाईला मदत कोण करतो? सीतेने तळतळून गावाला शाप दिला, "या गावात गहू म्हणून उगवायचे नाहीत."

रावेरीकर गावकऱ्यांना या सगळ्या हकिकतीचे दु:ख वाटते. सर्वसाधारणपणे लोककथा गावाच्या गौरवाच्या असतात, गावाला काळिमा लावणारी कथा क्वचितच. रावेरीकर गावाला कमीपणा आणणारी कथा मानतात एवढी गोष्टच लोककथा आणि वास्तव यांचा काहीतरी संबंध असावा हे दाखवण्यास पुरेशी आहे.

सीता अजून वनवासी

हनुमानाच्या मंदिराची काही डागडुजी चालू आहे. सीतेचा वनवास मात्र आजही संपलेला नाही. सीतेच्या मंदिराच्या आसपास घाण माजली आहे. गावची हागंदारी तिथे आहे.

रामाच्या नावाने हजारो मंदिरे आहेत. सीता मात्र अभागिनी, वनवासी, आजही निराधार आहे. पुरुषोत्तम रामाच्या आणखी एका मंदिराचे नवे 'कांड' घडते आहे; घोषणांच्या निनादात मस्जिद त्यासाठी पाडण्यात आली. रामाचे भक्त घोषणा देत आहेत, "सियावर रामचंद्र की जय!"

(७ जानेवारी १९९३)

■■

विद्वानांची 'स्वायत्तता लिमिटेड'

प्राध्यापक आणि साहित्यिक ही सज्जन आणि विनम्र माणसे. त्यांचे आयुष्य तसे साधे, सोपे आणि सुखासीन. थोडे फार वाचावे, जमले तर लिहावे किंवा नकलावे. मधूनमधून सहव्यावसायिकांच्या परिषदा भरवाव्या, परिषदांचा खर्च भागवण्यासाठी एखाद्या राजकीय पुढाऱ्यांशी सलगी करावी. एरवीही सत्ताधारी पुढाऱ्यांशी जपूनच वागावे. सरकारकडून पारितोषिके मिळतात, सामित्यांवर नेमणुका होतात, मानमान्यता मिळते, परदेशी जायला मिळते, त्यामुळे शासनाविरुद्ध कधी बोलू नये. वर्षा-दोन वर्षांनी पगारवाढीकरिता संप करतानाच काय ते हे विद्वान लढाऊ बनतात. एरवी या विद्वान मंडळींची साधी सरळसोट प्रवृत्ती असते.

या आठवड्यात एकदम मोठे आश्चर्य घडले आणि ही गोगलगायीसारखी शांत मंडळी एकदम शासनाच्या विरुद्ध गर्जना करू लागली.

विद्वानांच्या निवडणुका

पुणे विद्यापीठातील विधिसभेने नवीन विद्यापीठ कायदा विधेयकाचा कडाडून निषेध केला. विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांवरील निर्वाचित सदस्यांची संख्या कमी करून, नियुक्त सदस्यांची संख्या वाढवण्याची तरतूद विधेयकात आहे. त्याबरोबर विद्यार्थी प्रतिनिधीची निवड मतदानाने न होता शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारावर व्हावी अशी विधेयकात तरतूद आहे.

"हा काळा कायदा फेटाळून लावला पाहिजे," इति एक विधिसभा सदस्य.

"हे विधेयक म्हणजे विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर आघात आहे." दुसऱ्याची टिप्पणी.

"हे विधेयक म्हणजे विद्यापीठांनी अंकुश ठेवावा अशी अपेक्षा असते. प्रचीन काळी आपल्या देशातील ऋषिसंस्थेचा राजसत्तेवर वचक होता. आता

सर्वच पातळ्यांवर सरकारीकरण चालू आहे." एक विद्वान उवाच.

एवढे धारिष्ट्य?

या सगळ्या सिंहगर्जना ऐकून बरे वाटले. राजा आणि विद्वान यांच्यामधील संवादाचे भर्तृहरीचे काही श्लोक प्रसिद्ध आहेत, "त्वं राजा, वयमपि उपासितगुरुप्रज्ञाभिमानोन्नत:"

"तू भला राजा असशील, आम्हालाही उपासना केलेल्या गुरूच्या प्रज्ञेचा अभिमान आहे. तू वैभवाने प्रसिद्ध आहेस; माझेही काव्य दशदिशांत प्रख्यात आहे. तुझ्यात आणि माझ्यात अंतर ते काय?"

असे या श्लोकातील नि:स्पृह विद्वान राजाला परखडपणे ऐकवतो. भर्तृहरीच्या काळात राजाने काय उत्तर दिले ते कोणी लिहून ठेवले नाही, सध्या असा उद्दामपणा कोणा प्राध्यापकाने दाखवला तर त्याची नोकरी टिकणेसुद्धा मुश्कील होऊन जाईल. तरीही विधिसभेतील विद्वानांनी एवढी हिंमत, एवढे धारिष्ट्य दाखवले कसे?

कोणती स्वायत्तता?

विद्यापीठे आणि महाविद्यालये आणि शिक्षण संस्था यांच्या स्वायत्ततेचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न म्हणजे नेमके काय? सगळी शिक्षणसंस्था सरकारी खात्याप्रमाणे चालते. एक शिक्षणसंस्था काढायची म्हणजे पहिल्यांदा शासनाची परवानगी लागते. एखादा साखर कारखाना काढायला जितकी यातायात करायला लागते तितकी शिक्षणसंस्था काढायला करावी लागते. निर्णय सर्वोच्च म्हणजे मुख्यमंत्र्यांच्या पातळीवरच होतो. साखर कारखाने बहुतेक तोट्यात आहेत; पण शिक्षणमहर्षींचे वैभव स्तिमित करणारे आहे. शिक्षणसंस्था उघडण्याची परवानगी शासन फक्त राज्यकर्त्या पक्षाच्या मेहरनजरेतील लोकांनाच देते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील बहुतेक शिक्षणसंस्था या राज्यकर्त्यांच्या मेहरबानीने चाललेल्या आहेत. साखर कारखाने, सहकारी संस्था आणि दारूचे गुत्ते यांच्या बरोबरीने महाविद्यालये राजकीय सत्तेची केंद्रे बनली आहेत.

तीच गोष्ट विद्यापीठांची. काही विद्वान मंडळी एकत्र आली आणि त्यांनी विद्यापीठ स्थापले असे होत नाही. विद्यापीठ प्रस्थापित करण्याकरिता सरकारी कायदा व्हावा लागतो. विद्यापीठाचे क्षेत्र, उद्दिष्टे, कामे सगळी सरकार ठरवते. विद्यापीठांचे कुलगुरू सरकारच नेमते. विद्यापीठाच्या अंदाजपत्रकातील तूटही सरकारच सोसते. विद्यापीठातील संशोधन, अभ्यास यासाठीही पैसा मिळतो तो सरकारी तिजोरीतूनच.

थोडक्यात विद्यापीठाची स्वायत्तता म्हणजे मौनी वक्ता, वंध्या आई आणि ब्रह्मचारी बाप या श्रेणीतल्या 'वदतो व्याघाता'त जमा आहे; तरीही इतके दिवस शैक्षणिक संस्थांच्या वा विद्यापीठाच्या स्वायत्ततेची चिंता कुणाला वाटली नव्हती. प्राध्यापक आणि व्यासंग यांची फारकत झाली, तरी कोणाला चिंता वाटली नाही. शिक्षणाचा दर्जा इतका घसरला की महाराष्ट्रातील एकूण एक विद्यापीठांच्या पदव्या कवडी किमतीच्या मानल्या जाऊ लागल्या, याचीही कुणा विधिसभा सदस्याला खंत वाटली नाही.

हौसे, नवसे, गवसे विद्वान

शिक्षण व्यवस्थेत अभ्यास, व्यासंग, संशोधन यांची जोपासना व्हावी म्हणून कोणी व्यथा सांगितली नाही. विद्यापीठाच्या राजकारणात घुसून हात धुऊन घेण्यातच विद्वानांची हुशारी कामी आली. शिक्षण संस्थेमार्फत, राजकीय पक्षामार्फत किंवा विद्यार्थी मतदारसंघातून विद्यापीठाच्या कोणत्या ना कोणत्या समितीत हात घुसवण्याची पराकाष्ठा जो तो करीत होता. म्हणजे विद्यापीठाच्या आसपास वाहणाऱ्या सरकारी पैशाच्या गंगेत हात धुऊन घेण्याची ज्याची त्याची घाई.

नवीन विधेयकात विद्यापीठांच्या कार्यवाहीची पद्धती बदलण्याची तरतूद आहे. राजकारणात योग्य असलेली निवडणूक विद्येच्या क्षेत्रात आली म्हणजे विद्यापीठांचा बाजार व्हायला वेळ लागत नाही; विद्यादानावर देखरेख करणाऱ्या विद्यापीठातील पदाधिकाऱ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारानेच झाली पाहिजे. ती निवडणुकांनीच करून कशी चालेल? अशा युक्तिवादाने नवीन विधेयकात नियुक्त सदस्यांची संख्या वाढवण्यात आली आहे.

विद्यार्थी प्रतिनिधी - पुंड का 'स्कॉलर?'

विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुकांची पद्धतही बदलण्यात येणार आहे. दरवर्षी विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुका मोठ्या धुमधडाक्यात पार पडतात. पैसेवाली गुंड पोरे या निवडणुकांसाठी थैल्या मोकळ्या करतात. राजकीय पक्षांकडूनही हस्तक्षेप केला जातो. साध्या विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुका; पण त्यात गरमागरमी इतकी, की खुनाखुनीचे प्रकार दुर्मीळ नाहीत.

नव्या विधेयकात या निवडणुका संपवण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी कोण? जो विद्येत सर्वांत पुढे असेल तो. या नवीन तरतुदीमुळे विद्यार्थी प्रतिनिधींच्या अंगाचा तर तिळपापड झाला आहे!

विद्यार्थी प्रतिनिधी संख्येने फार थोडे असतात. निर्णयाच्या प्रक्रियेत तसे त्यांचे महत्त्व नाही. 'स्कॉलर' मुलांना कह्यात ठेवणे तसे कठीण नाही. त्यामुळे

गुणवत्तेची कसोटी शासनाने विद्यार्थ्यांच्या बाबतीत मान्य केली आहे. या मान्यतेचे आणखी एक कारण म्हणजे गेली काही वर्षे विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुकीत काँग्रेसपुरस्कृत उमेदवारांची झालेली पिछेहाट आहे, हेही काही रहस्य नाही.

सत्तेच्या खेळ्या

विद्यापीठाच्या वेगवेगळ्या समित्यांवरील नियुक्त सदस्यांची संख्या वाढवण्यामागेही असाच राजकीय डाव आहे. सध्याच्या पद्धतीत विरोधी पक्षाची मंडळी अधिक निवडून येतात. नियुक्तांची संख्या वाढवली म्हणजे राज्यकर्त्या पक्षाच्या मंडळींची सोय लावणे अधिक सोपे होईल, असा शासनाचा छुपा हेतू आहे.

सारांश काय? विद्यापीठाची कार्यक्षमता वाढावी, शिक्षणाची पातळी सुधारावी हा हेतू शासनाच्या मनातही नाही आणि विधेयकाच्या विरोधकांच्या मनातही नाही.

पण, कोणत्या का निमित्ताने होईना विद्वान मंडळी सरकारच्या आमनेसामने जाऊन हिमतीने बोलू लागली, हे काही कमी नाही.

साहित्यिकांची उलटी तऱ्हा

दिल्लीतील साहित्य अकादमीतील साहित्यिक असेच शासनाविरुद्ध दंड थोपटून उभे आहेत. साहित्य अकादमीतील पदाधिकाऱ्यांची नेमणूक सध्या एका विशेष पद्धतीने होते. कार्यकारी मंडळ सर्वसाधारण सभेतील सदस्यांची नेमणूक करते आणि सर्वसाधारण सभा कार्यकारिणीच्या सभासदांची. ही पद्धत विचित्र दिसली तरी साहित्याच्या क्षेत्रात ती सर्वस्वी अयोग्यच असेल असे म्हणता येत नाही. निदान एवढे तर खरे, की अकादमीच्या स्थापनेपासून आजपर्यंत या व्यवस्थेत सुधारणा व्हावी अशी गरज केंद्र शासनाला वाटली नव्हती. आता तीत बदल घडवून आणण्यासाठी केंद्र शासनाने फतवा काढला आहे आणि निवडणुका लोकशाही मार्गाने झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला आहे. साहित्य अकादमीने हा फतवा धुत्कारून लावला आहे. साहित्य आकदमी काही सरकारी कायद्यान्वये तयार झालेली नाही. तिचे पंजीकरण एक संघटना म्हणून झाले आहे. त्यामुळे तिची घटना बदलण्याचा अधिकार शासनाला नाही तर अकादमीच्या सर्वसाधारण सभेला आहे; पण थैलीच्या नाड्या शासनाच्या हातीच आहेत. आकादमीच्या खर्चाचा बहुतेक बोजा सरकारच उचलते. चार राज्यांतील निर्वाचित सरकारांना सहीच्या एका फटकाऱ्यानिशी घरी पाठवणारे शासन अकादमीवाल्यांची टुरटुर ऐकून घेईल अशी काही शक्यता नाही.

तत्वापेक्षा महत्त्वाचे

म्हणजे एकाच वेळी विद्यापीठातील लोकशाही संकुचित करण्याचा महाराष्ट्र शासन प्रयत्न करत आहे; तर अकादमीत लोकशाही वाढवण्याचा प्रयत्न केंद्रीय शासन करीत आहे. प्रश्न फक्त तत्त्वाचा नाही, त्याहून जास्त महत्त्वाचा आहे.

एका जाणत्या प्राध्यापकाची गाठ पडली. ते तावातावाने विद्यापीठ विधेयकाविरुद्ध बोलत होते. विद्यापीठाच्या सार्वभौमत्वाचे महत्त्व सांगत होते. मी त्यांना विचारले, की शिक्षण क्षेत्राला लागलेली ही कीड तुम्ही एकदाची काढूनच का नाही टाकत? शासनाकडून दमडी घेऊ नका आणि आपला कारभार स्वतंत्रपणे चालवा. शिक्षण क्षेत्रावर शासन हुकूमत गाजवते ते प्राध्यापकांच्या पगाराच्या श्रेणी लादून आणि त्यासाठी शिक्षण संस्थांना परावलंबी करूनच ना? शिक्षण संस्था त्यांना परवडतील ते पगार देतील; पण सरकारकरडून एक छदाम घेणार नाही, असे जाहीर करा. विद्यापीठांनीही अशीच घोषणा करावी.

स्वायत्तता मर्यादित

यावर मात्र प्राध्यापक महाशय बावरून गेले. ते म्हणाले, "नाही, नाही, आम्हाला स्वायत्तता पाहिजे; पण इतकी नको आहे."

म्हणजे विद्वानांनी भर्तृहरीच्या श्लोकातील नि:स्पृहतेचा आव तर आणला, पण 'वैराग्य शतका'तील पंडिताप्रमाणे 'न गणिशी मज, जातो तुच्छ मानूनी तूंते' असे टोकावर जाण्याची त्यांची तयारी नाही.

(१४ जानेवारी १९९३)

■■

नवे कलुषा कब्जी

प्रत्येक संभाजीचा एक कलुषा असतो; प्रत्येक बाजीरावाचा घाशीराम कोतवाल. खोलात पाय जाणाऱ्या प्रत्येक 'झार' बादशहाचा एक रासपुतीन असतो. स्वातंत्र्यानंतरच्या ऱ्हासाच्या काळाचे कलुषा कब्जी म्हणजे भारतीय अर्थशास्त्री.

पिंडीवरील विंचू

अर्थशास्त्र हे भौतिकशास्त्राच्या तुलनेत काही फारसे प्रगत शास्त्र नाही. नोबेल पुरस्काराचा मान या शास्त्राला अगदी अलीकडे देण्यात आला. या सन्मानास पात्र ठरलेले संशोधन सगळेच्या सगळे पाश्चिमात्य देशांत आणि खरे सांगायचे म्हणजे अमेरिकेतील दोन तीन विद्यापीठांतच झाले आहे. भारतासारख्या गरीब देशात अर्थकारण आणि विकास यांच्याविषयी काम जवळजवळ शून्यच आहे आणि तरीदेखील, कोण कुठचा कब्जी कलुषा एकदम संभाजीच्या बेबंदशाहीत सर्वाधिकारी झाला, तसेच अर्थशास्त्री मंडळी देशात एकदम महत्त्वाच्या पदी चढली.

या आधुनिक कलुषांनी देशातील गरिबी दूर करण्याविषयी गेल्या चाळीस वर्षांत जे काही सल्ले दिले ते आठवले तरी आज पोटात गोळा उठतो. विद्यापीठातील अभ्यासक्रमातील पुस्तकांशी चुटपूट ओळख, इंग्रजी भाषा आणि थोडेफार गणित एवढीच काय ती त्यांची पुंजी. शेतीतल्या काबाडकष्टांची त्यांना जाणीवही नाही. एखादी पानपट्टीची गादी चालवण्याइतकाही व्यापाराचा अनुभव नाही, मग छोटी मोठी कारखानदारी चालवणे दूरच. नेहरू नियोजनव्यवस्थेत शंकराच्या पिंडीवर हे विंचू चढले आणि आपला प्रताप दाखवू लागले.

चेष्टा वंदू मग किती?

समाजवादी पक्षाचे संस्थापक नेते, नियोजन मंडळाचे माजी उपाध्यक्ष अशोक मेहता अमेरिकेत गेले. तेथे गहू मुबलक उपलब्ध आहे आणि अमेरिकन सरकार

तो गहू अगदी स्वस्त भावात म्हणजे फक्त वाहतूक खर्चावर पुरवायला तयार आहे, हे पाहिल्यावर अशोक मेहता उद्‌गारले, "अन्नधान्याचा पुरवठा इतका सुलभ असेल तर भारतीय शेतीकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही."

हिर्शमन नावाचे एक नामवंत अर्थशास्त्रज्ञ भारतातील नियोजनाविषयी सल्ला द्यायला आले होते. साहेबांचा सिद्धांत असा, की सगळ्या देशाचा सर्वांगीण विकास एकसाथ होत नाही. उंट जसा अंगाअंगाने उठतो त्याप्रमाणे देशाच्या विकासाचे आहे. काही अंगांना प्राधान्य देऊन उठवले पाहिजे. बाकीच्या शरीराकडे दुर्लक्ष झाले तरी चालेल. तात्पर्य, कारखानदारी उठवा आणि शेतीकडे दुर्लक्ष करा. या असल्या मसलतींनी भारतीय अर्थव्यवस्थेची भयानक शोकांतिका झाली नसती तर त्यांना पाचकळ विनोद म्हणून बाजूस टाकता आले असते.

उंटावरचे शहाणे

या साहेबांचा आणि त्यांच्या भारतीय शिष्यांचा आणखी एक जावईशोध, शेतकरी किती पिकवतो? त्याच्याकडील साधनाने जास्ती जास्त जितके पिकवता येणे शक्य आहे तितके पिकवतो. पीक काढण्यातील कष्टातून दोन पैसे सुटतील किंवा नाही हा मुद्दा शेतकऱ्यांच्या बाबतीत गौण आहे. प्रोत्साहन द्यायचे असेल तर ते कारखानदारांना द्या, शेतकऱ्यांना नको. शेतकरी विचार करणारा, सुख दुःखे जाणणारा माणूस आहे. हे अर्थशास्त्रांच्या गावीही नाही.

डॉ. दांतवाला हे असेच एक मान्यवर अर्थशास्त्रज्ञ. कृषी मूल्य आयोग, नियोजन मंडळ अशा महत्त्वाच्या जागी काम केलेले. यांचे म्हणणे असे, की शेतीमालाचा उत्पादनखर्च काढताना शेतकऱ्याच्या घरची माणसे शेतात राबतात, त्यांची मजुरी धरण्याचे काही कारण नाही. कारण, काय? स्वतःच्या शेतावरती काम केले नसते तर या कुटुंबीयांना काही दुसरीकडे कोठे रोजगार मिळणार होता असे नाही, त्यांचा वेळ फुकटच जाणार होता. स्वतःच्या शेतावर त्यांनी काम केले, त्याचा वेगळा खर्च मोजण्याचे काय कारण? दांतवाला साहेब एवढ्यावरच थांबले नाहीत, पुढे जाऊन मल्लिनाथी करते झाले, "शेतकऱ्यांची सीमांत उत्पादकता नकारात्मक आहे, त्यामुळे घरच्या मंडळींचे कष्ट मोजायचे झाले तर त्यांचा रोज शून्यापेक्षा कमीच धरावा लागेल." आणि सर्व अर्थशास्त्रज्ञांनी 'वाहवा, वाहवा' केली. या जडजंबाल विद्वद्‌वचनांचा अर्थ असा, की शेतकरी शेतात काम करतो आणि शेतीत नुकसान होते. शेतकऱ्याला जगण्याकरिता जो खर्च येतो तोसुद्धा शेतीत निघत नाही; मग त्याच्या कष्टाची किमत ती काय धरायची?

डावे पंडित

अशोक मित्राही असेच जागतिक मान्यताप्राप्त अर्थशास्त्रज्ञ. बंगालमधील कम्युनिस्ट शासनाचे मंत्री, कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष आणि इतर अनेक मोठमोठ्या पदावर राहिलेले. मोठ्या शहरातील वैभव वाढते आहे, शहरे आणि खेडी यांच्यातील दरी पसरते आहे, हे इतके उघड आहे, की ज्याला डोळे आहेत त्याला हे पटवून देण्याची काही गरज नसावी. दहा वर्षांपूर्वी एक पोते शेतीमाल विकला तर त्यातून काय खरेदी करता येत होती आणि त्या तुलनेने आज करता येणारी खरेदी किती तुटपुंजी आहे हे कुणीही अडाणी निरक्षर शेतकरी बाईसुद्धा जाणते; पण अर्थशास्त्रचूडामणी डॉक्टर अशोक मित्रा यांचा निष्कर्ष असा, की व्यापाराच्या अटी सतत शेतकऱ्यांच्या फायद्याच्या होत आहेत, त्यांची भरभराट होते आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे देशातील समाजावरच नव्हे तर राजकारणातही वर्चस्व तयार झाले आहे!

शेती व्यवसाय म्हणजे मागास काम, अजागळ कारभार, शेती आधुनिक झाली तरच शेतीत सुधारणा होईल. त्याकरिता पहिल्यांदा म्हणजे मोठे शेतकरी संपवले पाहिजेत, जमिनीचे फेरवाटप झाले पाहिजे, सहकारी शेती उभी राहिली पाहिजे, रासायनिक खते आणि यंत्रसामग्री वापरली पाहिजे, या पद्धतीने शेतमालाचे डोंगर रचता येतील. हा सिद्धांत तर सर्व डाव्या मंडळींचा अत्यंत आवडता. या सिद्धांताला कोणा एका शास्त्राचे नाव देणे कठीण आहे. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या असल्या प्रयोगांनी रशियासारख्या देशात दुष्काळ पडला; पण आमचे अर्थशास्त्रज्ञ आजही शेतजमिनीचे फेरवाटप हाच महत्त्वाचा मुद्दा आहे असा धोशा लावतात.

आज देशावर आर्थिक अरिष्ट आले आहे; पण भारतीयांना पावाचा तुकडा मिळवण्यासाठी मॉस्कोतील नागरिकांप्रमाणे रात्रभर थंडीवाऱ्यात रांग करून उभे राहावे लागत नाही, याचे श्रेय चौधरी चरणसिंगांना आहे. शेतीच्या सहकारीकरणाचा नेहरूंचा प्रस्ताव चौधरीजींनी हाणून पाडला नसता, तर आपल्या सर्वांवर उपासमारच ओढवली असती.

कोरडे पाषाण

आर्थिक प्रगतीकरिता उद्योगधंद्यांची वाढ व्हायला पाहिजे हाही असाच एक सिद्धांत. रशियातील क्रांतीनंतर पंडितजी तेथे गेले आणि त्यांना जे दाखवण्यात आले त्यामुळे त्यांचे कविमन भारून गेले. नवा भारत म्हणजे आधुनिक उद्योगधंद्यांचा देश असा त्यांचा पक्का ग्रह झाला. महात्माजींच्या सहवासाचे भाग्य सातत्याने लाभूनसुद्धा याबाबतीत पंडितजी कोरडे पाषाण राहिले.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून पंडितजींच्या उद्योगंडाची खुशामत केली ती डॉ. महालनोबिस यांनी. मोठमोठे टोलेजंग कारखाने उभे राहिले पाहिजेत, गुंतवणुकीचा मोठा भाग या कारखान्यांसाठी गेला पाहिजे; पण लोखंड, पोलाद काही खायच्या उपयागाचे नाहीत. म्हणून लोकांच्या गरजा भागवण्याचे काम कुटीरोद्योगांनी केले पाहिजे. पोलाद कारखाने आणि अंबरचरखा यांना एकत्र बांधणारे असे अजब तंत्र त्यांनी शोधून काढले.

चाकरमाने कारखानदार

...पण ही अवजड कारखानदारी करणार कोण? स्वप्ने रंगवणे हे काव्यहृदयी राजकारण्यांना सुचते, कोणाही व्यावसायिकाला ही असली चैन परवडत नाही. खरेखुरे अनुभवी कारखानदार असल्या पागलपणात सहभागी होणे शक्यच नव्हते. मग पंडितजींचे लाडके औद्योगिकीकरण व्हायचे कसे? मग दुसरे काही 'रासपुतीन' पुढे आले आणि सांगू लागले, "खासगी उद्योजक पुढे आले नाहीत तरी पर्वा नाही, सरकारी आश्रयाने सार्वजनिक क्षेत्र हे धाडस करायला तयार आहे." सार्वजनिक क्षेत्राचे 'निर्णायक प्रभुत्व' हा सिद्धांत त्यांनी मांडला आणि आसपासच्या सगळ्यांनी 'वाहवा, वाहवा' क्या कही अशी दाद दिली. काल-परवापर्यंत कागदांच्या फायली पुढे मागे सरकवणारे नोकरमाने एका रात्रीत प्रचंड कारखान्यांचे प्रशासक बनले.

स्वावलंबनाचे स्वप्नरंजन

या शेतकरीद्वेष्ट्या आणि सार्वजनिक क्षेत्राच्या कारखानदारी व्यवस्थेचे आणखी एक मोठे विचित्र रूप होते. जगातील पुढारलेल्या देशांतील व्यवस्थांबद्दल एकाच वेळी मोठा तिरस्कार आणि उमाळ्याचे प्रेम होते. भारतासारखा खंडप्राय देश 'स्वयंभू' झाला पाहिजे. आज आम्हाला परदेशांतून आर्थिक आणि तांत्रिक मदतीची गरज आहे, ती त्यांनी द्यावी आणि बाजूस चूप बसावे. त्यांनी दिलेल्या मदतीचा उपयोग आम्ही कसाही करू, तो आमचा सार्वभौम हक्क आहे. आमच्या दात्यांनी त्याबद्दल चकार अवाक्षर काढू नये. निष्कामपणे आम्हाला मदत करावी. आम्ही त्यांचा माल खरीदणार नाही. निर्यात करण्याची आमची पात्रता नसल्यामुळे देशात कोटा परमीट राज्य आले, भ्रष्टाचार आला, राष्ट्रीय नादारी आली.

संभाजीमहाराज गेले

आता देशाचे दरवाजे परकीय गुंतवणुकीकरिता सताड उघडे करण्यात आले आहेत. पंतप्रधान, वित्तमंत्री, देशोदेशी जाऊन 'भारतात गुंतवणूक करा' अशी

विनवणी करीत आहेत, असा जोगवा मागत फिरत आहेत.

गेल्या चाळीस वर्षांत अर्थशास्त्रज्ञांची मोठी चलती झाली. त्यांचा हा 'सुवर्णकाळ'च होता. अर्थशास्त्रज्ञांना मोठी मान्यता होती. मोठमोठी पदे. मनसोक्त साधनसंपत्ती त्यांच्यापुढे हात जोडून उभी होती. त्यांनी मांडलेल्या प्रत्येक सिद्धांताने देशाचे वाटोळे झाले.

हे सगळे जुने नाशकारी सिद्धांत बाजूला सारून, खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाण्याची घोषणा झाली आहे आणि मंगलकार्य असो, मार्तिक असो पुरोहित आम्हीच अशा थाटात जुन्या व्यवस्थेतील सगळे 'घाशीराम', 'रासपुतीन' आणि 'कलुषा कब्जी' नव्या व्यवस्थेतही पुन्हा डौलाने मिरवू लागले आहेत.

संभाजीबरोबर कलुषा संपला, बाजीरावाच्या आधी घाशीराम कोतवाल, तीच कथा रासपुतीनची; पण या सर्व काळपुरुषांचे आधुनिक अवतार अर्थशास्त्री त्यांच्या स्वामीबरोबर संपले तर नाहीतच, उलट नव्या व्यवस्थेत नव्या स्वामींच्या आश्रयाखाली पुन्हा पहिल्या दिमाखानेच मिरवीत आहेत.

(२१ जानेवारी १९९३)

■■

पाहिजे 'एक सरकार'

६ डिसेंबरला अयोध्येत आक्रीत घडले, त्यातून दंगली उद्‌भवल्या. दंगलीचे शेपूट अजूनही ठिकठिकाणी वळवळत आहे. मुंबईत आणि अहमदाबादेत दंग्याचा फडा अजून फुत्कारत आहे. या महिन्यातील मुंबईच्या १० दिवसांच्या दंगलीत ठार झालेल्यांचा आकडा ६०० वर गेला, आणखी कित्येक हजारो जखमी झाले, त्यातील पुष्कळसे अपंग झाले. औद्योगिक उत्पादनांचे नुकसान ६५० कोटींवर झाले असेल असा अंदाज आहे.

सूर्य तळपतील चंद्र झळकतील

चालतीबोलती माणसे निघून गेली, त्यांच्या विधवांचे आणि अनाथ मुलांचे दुःख काय सांगावे? जवळच्या परिवारातील सगेसायरे काही काळाने डोळे पुसतील आणि कामी लागतील. बाकीचा समाज सगळे काही पटकन विसरून जाईल. अपंगही मोडक्या हातापायांनी कामाला लागतील. झोपडपट्ट्या जळल्या, तेथे नवीन गगनचुंबी इमारतींचे बांधकाम चालू होईल. औद्योगिक उत्पादनात झालेले नुकसानही भरून निघू शकेल. सगळा राक्षसीपणा ओसरून जाऊन माणसे पुन्हा माणसे बनतील; पण या दंगलीत यापलीकडे एक नुकसान झाले आहे. त्याची भरपाई व्हायला किती वर्षे लागतील कुणास ठाऊक! केवळ तीस दिवसांत सारा देश जगाच्या नजरेत रानटी झाला आहे.

बंदिशाळा भारत

स्वातंत्र्यानंतरच्या काळात हिंदुस्थान आंतरराष्ट्रीय बंदिस्त देश राहिला. म्हणजे परदेशीयांना येथे येऊन व्यापार करण्याची शक्यता नव्हती किंवा कारखानदारीत गुंतवणूक करण्याची मुभा नव्हती. परदेशांशी व्यापार करून काय माल आयात करायचा हे ठरवणे संपूर्णपणे सरकारच्या हाती होते. त्यांची परवानगी मिळाली तरच परदेशातील माल येथे येऊ शके. याला अपवाद अर्थातच लपूनछपून

गुपचूप येणारा तस्करी माल. परदेशातील भांडवल येथे येण्यावरही मोठे दुरापास्त निर्बंध होते. असे भांडवल सरकारी अनुमतीनेच येऊ शके. सरकारी परवानगी काही ठरावीक क्षेत्रावरील गुंतवणुकीसाठीच मिळे. बहुधा परवाने पुढाऱ्यांच्या मेहरनजरेतील कारखानदारांनाच मिळू शकत. परवानगी देताना मालकीहक्क भारतीय उद्योजकांच्याच हाती राहतील अशी बंधने लादली जात. थोडक्यात परदेशातील अर्थव्यवस्थेचे खुले वारे हिंदुस्थानच्या सरहद्दीवरच थोपवले जात. या बंदिस्त व्यवस्थेमुळे सगळा देश कोंदट झाला होता.

या व्यवस्थेचे दुष्परिणाम वर्षानुवर्षे स्पष्ट दिसत होते, जाणवत होते. परकीय माल आणि भांडवल सरहद्दीपाशी रोखल्यामुळे देशी उद्योगधंद्यांना संरक्षण मिळेल आणि स्थानिक कारखानदारी वाढेल, भरभराटीला येईल असे सांगितले जात असे; पण प्रत्यक्षात घडले ते विपरीतच. परदेशी स्पर्धेपासून संरक्षण मिळालेले उद्योगधंदे फोफावले नाहीत, तर सुखावले. निष्काळजी बनले. स्पर्धा नसल्याने मालाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढवण्याची त्यांना काही आवश्यकताच राहिली नाही. हिंदुस्थानी कारखानदारीचा माल म्हणजे महागडा आणि गचाळ असे समीकरण बनून गेले. असल्या मालाला परदेशात कोण विचारतो? 'मेड इन इंडिया' म्हटले म्हणजे परदेशी ग्राहक पुढचा विचार न करता चांगल्या वस्तूंनासुद्धा नाक मुरडू लागले. भारतात तयार झालेला माल परदेशात खपवण्यासाठी तो ऑस्ट्रेलियासारख्या तिसऱ्या देशात पाठवून तो माल तेथेच तयार झाल्याचे खोटे शिक्के मारून निर्यात करावा लागे.

दरवाजे उघडले

ही बंदिस्त कोंदट व्यवस्था संपवायचे नवीन सरकारने ठरवले. काही गत्यंतरच नव्हते.

असल्या 'सुरक्षित' कारखानदारीने देशाचे दिवाळेच निघाले. तेव्हा कोठे हळूहळू देशाचे दरवाजे परकीय माल आणि गुंतवणूक यांकरिता खुले करायचे ठरवले. परकीय मालाची आयात थोडी खुली केली म्हटल्यावर आयातीचा लोंढा सुरू झाला. कारण, व्यापारपेठ काबीज करायला सगळ्या देशांतील उद्योजक टपून बसलेले असतात. गेल्या तीन महिन्यांत मागील वर्षाच्या तुलनेने १० हजार कोटी रुपयांनी आयात वाढली.

याउलट गुंतवणुकीसाठी दरवाजे खुले करण्यासाठी सरकार फारसे उत्सुक दिसले नाही. गेली ४५ वर्षे फक्त सरकारी परवान्याच्या आधारानेच भांडवल येऊ शके. त्यामुळे सर्वसाधारण गुंतवणूक करणाऱ्यांच्या नकाशात भारताचे

चित्र नव्हतेच. यापलीकडे, हिंदुस्थान म्हणजे गरीब देश. तेथे भिकारी, साधू आणि फकीर फिरत असतात. गायी रस्त्यावर बसलेल्या असतात. सगळे राज्य लाल फितीचे आहे. लाच दिल्याखेरीज कोणतेच काम होत नाही. हिंदुस्थानात भांडवल गुंतवले आणि उद्योगधंदे उभे केले तरी सरकारची मर्जी केव्हा फिरेल आणि केव्हा चंबूगबाळे आवरावे लागेल ते सांगता येत नाही अशी धास्ती परदेशी गुंतवणूकदारांच्या मनात वर्षानुवर्षे होती. तेव्हा डॉ. मनमोहनसिंग यांनी गुंतवणुकीवरील निर्बंध सैल केले, म्हणजे भांडवलाचे प्रवाह धो धो वाहत देशात प्रवेश करतील अशी काही शक्यता नव्हती.

भांडवलदारांची मनधरणी

नुसते दरवाजे उघडून भागले नसते. इतकी वर्षे दरवाजाबाहेर उभ्या केलेल्या भांडवलदारांची मिनतवारी आणि मनधरणी करणे आवश्यक होते. त्यामुळे अर्थमंत्री, पंतप्रधान, देशोदेशी जात होते. तेथील उद्योजकांना भारतात गुंतवणुकीस मोठा वाव आहे असे पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. खुल्या अर्थव्यवस्थेचे धोरण हे कायम टिकणारे धोरण आहे, आता पुन्हा नेहरू व्यवस्था आणली जाणार नाही असे आश्वासन देत होते. अशा भगीरथ प्रयत्नांनी भांडवलाची गंगा लहान ओहळाच्या स्वरूपात का होईना भारतात अवतीर्ण होईल अशी चिन्हे दिसू लागली होती.

हर्षद आणि राम

नव्याने बुजऱ्या आणि लाजऱ्या पावलांनी भारतात प्रवेश करणाऱ्या या भांडवलाला पहिला अपशकुन झाला तो शेअर मार्केटातील घोटाळ्याचा. हिंदुस्थानातील बाजारपेठेच्या व्यवस्थेबद्दल एवढेच नव्हे तर बँका आणि सरकारी संस्था यांच्या विश्वसनीयतेलाच मोठा धक्का पोचला. शेअर बाजार कोसळला आणि नवे भांडवल देशात यायचे तर सोडाच, परदेशीय आणि अनिवासी भारतीय यांनी त्यांच्या हिंदुस्थानातील ठेवी परत न्यायला सुरुवात केली.

या संकटातून देश बाहेर पडतो, ना पडतो तोच अयोध्या प्रकरण उपटले आणि या वेळी परदेशी भांडवल बुजून गेले. एवढेच नाही तर पार लांब निघून गेले आहे. अनेक मोठ्या कंपन्यांनी संकल्पित प्रकल्प भारताऐवजी दुसऱ्या देशात वळवायला सुरुवात केली आहे.

चीन आणि भारत

विदेशी भांडवल दंगलीमुळे होणाऱ्या अस्थैर्याला आणि अनिश्चिततेला घाबरले असे म्हणता येणार नाही. कारण चीनसारख्या देशात अगदी अमेरिकी भांडवलसुद्धा

प्रवेश करायला का कूं करीत नाही. अधिकृतरीत्या चीन अजूनही कम्युनिस्ट देश आहे; पण लालबावटा फडकत ठेवूनही चिनी सरकारने खुली अर्थव्यवस्था देशात आणण्याचा कार्यक्रम मोठ्या नेटाने चालवला आहे. काही वर्षांपूर्वी 'तिएनमेन' चौक विद्यार्थ्यांनी अडवला आणि मोठी निदर्शने केली. त्यांच्यावर लष्करी कारवाई झाली. हजारो विद्यार्थी मेले. अत्यंत क्रूर आणि कठोर अशा या कार्यवाहीमुळे चिनी राज्यकर्त्यांविरुद्ध काही काळ बराच आरडाओरडा झाला होता; पण निषेधाचा सूर ओसरत गेला. चीन ज्या ध्यैर्याने आणि सातत्याने खुल्या अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा करीत आहे त्याबद्दल जगभर मोठी कौतुकाची भावना आहे. परिणामतः 'तिएनमेन' चौकात कत्तली करणाऱ्या कर्दनकाळांच्या देशात अमेरिकी, जपानी आणि युरोपियन भांडवल आज आनंदाने प्रवेश करीत आहे. याउलट अयोध्येच्या दंगलीनंतर परकीय भांडवल धास्तावले आणि भारतात प्रवेश करण्यास तयार नाही, हे काय रहस्य आहे?

दंगलींचे विषय

पहिली गोष्ट म्हणजे, चीनमध्ये स्वातंत्र्याकरिता विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आणि तेथील शासनाने महाक्रूरतेने भले चिरडून टाकले हे खरे! पण या सगळ्या प्रकरणामुळे चिनी समाज आधुनिक युगातील आहे. मागासलेला नाही हे स्पष्ट झाले. चिनी आंदोलनाचा हेतू आर्थिक, सामाजिक आहे. आधुनिक युगाशी संबंधित आहे. या उलट अयोध्या वादाचा स्पष्ट अर्थ असा, की भारतीय समाज अजून चालू मनूत आलेलाच नाही. तो मध्ययुगातच आहे. भारतातील दंग्यांचे विषयसुद्धा आधुनिक नाहीत, त्रेता युगातील आहेत. अशा प्रवृत्ती जेथे मूळ धरून आहेत तेथे उद्या काय होईल हे काय सांगावे? देवळाकरिता एवढा कल्लोळ माजवणाऱ्या देशातील जनता आधुनिक कारखानदारीच्या युगात बसू शकेल किंवा नाही याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निदान गुंतवणूकदारांच्या मनात तरी नक्कीच.

गुंतवणूक करणाऱ्यांच्या हिशेबात दंगल होणे महत्त्वाचे नाही. दंगली होतच असतात. दंगली काय कारणाने होतात, कोणत्या विषयावर होतात हे जास्त महत्त्वाचे. याच विषयावर भारत नापास झाला आहे.

नादान सरकार

भारतात प्रवेश करण्यास भांडवल नाउमेद होण्याचे याहूनही एक मोठे कारण आहे. दंगली झाल्या, समजण्यासारखे आहे; पण या सर्व प्रकरणात भारतातील कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेबद्दल मोठा अविश्वास निर्माण झाला

आहे. मशिदीला धक्का लागू देणार नाही असे वारंवार गर्जून सांगणाऱ्या शासनाला मशिदीचे संरक्षण करता आले नाही. सगळे शासन पक्षाघात झाल्यासारखे निष्क्रिय झाले. उभ्या देशभर दंगली उसळल्या. त्या तातडीने आटोक्यात आणण्यातही सरकारला अपयश आले. असल्या अकार्यक्षम सरकारच्या शब्दांच्या विश्वासाने अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करावी कशी? अशी धास्ती परदेशी गुंतवणूकदारांना पडली आहे. चिनी सरकार अनैतिक असेल, क्रूर असेल; पण एकदा निर्णय झाला, की त्याची अंमलबजावणी करण्यात ढिलेढालेपणा होत नाही. याउलट भारतीय नेतृत्व सज्जन असेल, त्यांच्या घोषणा आकर्षक असतील; पण अंमलबजावणीत भारतीय शासन कमी पडते. जुनी मराठी म्हण आहे, 'मारकुटा नवरा परवडला; पण नामर्द नको.' देशात नांदायला भारताचा उंबरठा ओलांडत आत येऊ पाहणाऱ्या लक्ष्मीची अशीच भूमिका आहे.

खुल्या अर्थव्यवस्थेकडे जायचे असेल तर सरकारला प्रथम आपला 'मर्दपणा' सिद्ध करावा लागेल. अर्थशास्त्रातील सिद्धांत आणि समजकल्याणाच्या वावदूक गप्पा यांच्यावर कुणी भाळणार नाही. भारत सरकार राज्य करू शकते किंवा नाही, कायदा आणि सुव्यवस्था टिकवू शकते किंवा नाही, यावर देशाचे अर्थकारण नजीकच्या भविष्यकाळात ठरणार आहे.

(२८ जानेवारी १९९३)

■■

निरंकुशः पक्षः

कोणत्याही राजकीय पक्षावर बंदी आणण्यास आपला विरोध असल्याचे संरक्षणमंत्री शरद पवार यांनी म्हटल्याचे कळते. पंतप्रधान नरसिंह राव यांचीही अशीच भूमिका आहे. त्यामुळे बाबरी मस्जिद पाडल्यानंतर पाच संघटनांवर बंदी घालण्यात आली; पण कोणत्याही पक्षावर बंदी घालण्यात आली नाही.

निवडक दिलदारी

पक्षांचा पराभव कायद्याने बंदी घालून करण्यापेक्षा मताच्या पेटीद्वारे झाला पाहिजे असे म्हणण्यात लोकमताचा आदर करण्याची एक उदरमनस्क प्रवृत्ती असावी. मग हा दिलदारपणा राजकीय पक्ष नसलेल्या संघटनांच्या बाबतीत का दाखवला जाऊ नये? जोपर्यंत अशा संघटना बेकायदेशीर किंवा समाजघातकी कृत्ये करीत नाहीत तोपर्यंत त्यांना विचार, प्रचार आणि आचारस्वातंत्र्य का नसावे? कायद्याविरोधी काही कार्यक्रम त्यांनी आखला तर संबंधित कायद्यान्वये कार्यवाही करता येईलच. मग संघटनांवर बंदी घालण्याचे प्रयोजन काय? पण संघटनांवर बंदी घालण्यात आली. राजकीय पक्षावर मात्र, त्यांनी काहीही केले तरी केव्हाही बंदी आणूच नये असे मानले तर मोठ्या अडचणी निर्माण होतील. राजकीय पक्ष म्हणून एकदा येनकेणप्रकारेण मान्यता घेतली म्हणजे आपणास काहीच बंधने नाहीत, ना कायद्याची ना घटनेची, काहीही करावयास मोकळे झालो अशी भावना तयार झाली तर मोठा अनर्थ होईल.

पक्षांचे तारणहार दादा

उदाहरणार्थ कल्पना करूया : राजकारणात दादा आणि गुंडांचे प्राबल्य असतेच; पण यातील हुतेकांना पक्षांची मदत घेतल्याखेरीज आमदार खासदार म्हणून निवडून येणे सहसा शक्य नसते. या पक्षातून त्या पक्षात अशी कितीही सत्राणे उड्डाणे केली तरी आपल्या मतदारसंघातून हमखास निवडून येणारे दादा

प्रत्येक जिल्ह्यात थोडेच असणार!

पण, दादा लोकांची आता एक वरची श्रेणी तयार होते आहे. या दादांना आमदार, खासदारकीची निवडणूक लढवण्याकरिता पक्षांच्या मदतीची गरज लागत नाही. उलट मातब्बर पक्षांनासुद्धा या दादांच्या मदतीने निवडणुका लढवाव्या लागतात. इंदिरा काँग्रेस म्हणजे देशातील मातब्बर पक्ष. शरद पवार निवडणुकांचे सामने खेळणाऱ्या पैलवानातील 'महाराष्ट्र केसरी'च; हितेंद्र ठाकूर आणि पप्पू कलाणी यांना तिकिटे दिली तर या दोन जागा तर काँग्रेसला मिळतीलच; पण पार पिंपरी चिंचवडपासून अनेक मतदारसंघांत काँग्रेसचा फायदा होईल, अशा हिशेबाने या गुंडांना तिकिटे देण्याचा आग्रह शरद पवारांनी धरला होता म्हणे.

गुंडांचा पक्ष

पक्षांना तगवून नेण्याची ताकद असलेले गुंड देशात काही एवढे दोनच आहेत असे काही नाही. एकट्या मुंबई शहरातच स्वत:च्या ताकदीवर आपापल्या मतदारसंघातून कोणत्याही आमदारकीच्या निवडणुकीत निवडून येतील असे डझनभर तरी नरपुंगव असतील. नगरपित्यांच्या निवडणुकासुद्धा असे हमखास जिंकू शकणारे शंभरावर निघतील.

समजा, अशा सगळ्या गुंडपुंडांनी एक संमेलन भरवले आणि सरकारचा आणि पोलिसांचा आपल्याला होणारा जाच थांबवण्याकरिता एक राजकीय पक्ष काढायचे ठरवले. पक्षाचे नाव, घटना, नियम, पदाधिकारी, सगळे काही कागदावर ठाकठीक बसवले. नाव निवडण्यात अडचण काहीच नाही गुंडांनी आपल्या पक्षाचे नाव गुंडागिरीशी संबंधितच घेतले पाहिजे असा काही नियम नाही, किंवा पक्षाचे नाव आणि त्याचा विचार आणि कार्यक्रम यांचा काही संबंध असला पाहिजे असेही नाही. तसा नियम असता तर 'समाजवादी' हा शब्द ज्यांच्या बिरुदावलीत विराजमान झाला आहे अशा डझनभर पक्षांची मोठी पंचाईत होईल.

निवडणूक आयोगासमोर स्टँप पेपरवर घटनेतल्या सगळ्या तरतुदी आपण मानतो असे लिहून दिले, की निवडणूक आयोग पक्ष म्हणून त्यांना आपोआप मान्यता देईल.

निवडणूक आयोगाचा टपाल शिक्का

निवडणूक आयोगाने मान्यतेकरिता आलेल्या अर्जाबाबत विचार म्हणून करायचा नाही असा नियम असावा. एरवी पक्षांच्या मान्यतेसंबंधी अनेक गमतीगमतीचे घोटाळे झालेच नसते. केंद्रामध्ये पाच महिने का होईना शासन केलेल्या एका राष्ट्रीय पक्षाची मान्यता एका महाराष्ट्रातील टोळक्याने कशी सफाईने लुंगावली

हा अलीकडचा किस्सा प्रसिद्धच आहे. समोर आलेल्या पाकिटावर शिक्का मारताना टपाल्या तरी काही तपासणी करतो तेवढासुद्धा विचार न करता, निवडणूक आयुक्त पक्षांना मान्यतेचा शिक्का देतो.

अशा तऱ्हेने आपल्या 'अमुक सेवक' पक्षाला एकदा मान्यता मिळाली, की त्यांना चारी दिशा मोकळ्या होतील. 'अमुक सेवकांचे दिलपनाह' म्हणून एखादा पप्पूसाहेब मुंबईभर दौरे काढू लागेल, प्रत्येक सभेसाठी ही लक्षावधींची गर्दी हजर ठेवणे 'अमुक सेवक' पक्षाला काय कठीण? निवडणूक आयोगाच्या कार्यालयातून पक्ष म्हणून मान्यता मिळवून बाहेरे पडल्या पडल्या पप्पू साहेबांनी,

"काय मूर्ख आहे हो हा निवडणूक आयोग! यांनी आम्हाला प्रतिज्ञापत्र मागितले, आम्ही दिले. आम्हाला निवडणूक चिन्ह पाहिजे होते म्हणून आम्ही खोटे प्रतिज्ञापत्र दिले. राजकारणात हे असे करायलाच लागते. आम्ही ते केले." जाहीररीत्या असे म्हटले तरीसुद्धा, पक्षपणाचे चिलखत अंगावर असल्यामुळे, पप्पूसाहेबांना आणि सेवकांना आता कोणी हात लावू शकणार नाही.

भस्मासुराला वरदान

एखाद्या निवडणुकीत दोन पाच खासदार आणि पाच पन्नास आमदार निवडून आणले म्हणजे तर वरदान मिळालेल्या भस्मासुरासारखे पप्पूसाहेब माजतील. गावोगाव जाऊन पत्रकारांवर, मायबहिणींवर आणि साईभक्त नसलेल्यांवर अभद्र आणि गलीच्छ शिवराळपणा करतील. आपले गुंडागिरीचे साम्राज्य पक्के करतील. पोलिस व्यवस्था ताब्यात घेतील आणि गुंडांचे साम्राज्य तयार करतील.

गुंडांशी दोस्ती, कायद्याशी वैर

कल्पना करा, असे झाले तर त्यावर उपाय काय? शरद पवार म्हणतात, "अशा पक्षांचा पराभव निवडणुकीतच झाला पाहिजे; पण गुंड पक्षाचा पराभव निवडणुकीनेच झाला पाहिजे, मतपेटीनेच झाला पाहिजे या लोकशाही बाण्यात निवडणुका स्वच्छ आणि मोकळ्या असल्या पाहिजेत असे गृहीत धरलेले आहे. पप्पूसाहेबांना निवडणुकीत पाडण्याकरिता पाकिस्तानी हस्तकांची मदत घ्यावी लागली तर मग लोकशाही बाणा काहीच शिल्लक राहत नाही आणि भा.ज.पा.चा पराभव करण्यासाठी गुंडांचा सहारा घेणे यातही मतपेटीवरील विश्वासी दिसत नाही. पाचदहा मतदारसंघांत फायदा मिळावा यासाठी गुंडांना तिकिटे मिळावी असा आग्रह धरणारे शरद पवार पक्षांवर बंदी आणू नये असे म्हणतात! हे काय तर्कशास्त्र आहे? गुंडांना उराशी घेणे योग्य; पण कायदा आणि घटनेच्या आधाराने घटनेशी विसंगत असणाऱ्या पक्षांना शिस्तीत आणणे

चूक, असल्या तर्कशास्त्रात काय असेल ते रहस्य असो; पण लोकशाहीप्रेम मात्र नावालासुद्धा नाही."

मैदान तिरपागडे नको

लोकशाहीत शेवटचा निर्णय निवडणुकीने मतपेटीद्वारे झाला पाहिजे ही गोष्ट खरी; पण निवडणुका स्वच्छ आणि मोकळ्या वातावरणात पार पडल्या पाहिजेत हीही बाब तितकीच महत्त्वाची. मैदानी खेळात आम्ही सामना जिंकून दाखवू आणि प्रतिपक्षाला मैदानात नामोहरम करू ही जिद्द योग्य; पण त्यासाठी मैदान तिरपागडे असता कामा नये. हातात सुरे घेऊन मैदानात उतरलेल्या संघाबरोबर हुतूतूचा सामना कसा काय खेळला जाणार?

धर्माच्या, जातीच्या नावाने राजकारण करू पाहणारी मंडळी निवडणुकीचे मैदानच तिरपागडे करू पाहतात. म्हणूनच त्यांच्यावर बंधने घालण्याचा प्रश्न निर्माण होतो. शरद पवार तेवढे निवडणूक धीट आहेत आणि बाकीचे निवडणुकांना घाबरतात हे काही खरे नाही.

धर्मजातीच्या नावाचा उपयोग करणारे लवकरच संपणार आहेत यात शंका नाही. त्यांचा अगदी लवकरच निवडणुकीतही धुव्वा उडणार आहे आणि हे पाचदहा वर्षांत घडणार आहे नक्की; पण खेळाचे मैदानच उद्ध्वस्त करणाऱ्या गुंडांना स्पर्धांत उतरू दिले तर ते पाचदहा वर्षे खेळाचे भवितव्य बरबाद करू शकतात. म्हणून निवडणुकीच्या मैदानात ज्यांना उतरायचे आहे त्यांनी निवडणुकीचे नियम कसोशीने पाळले पाहिजेत असे म्हणण्यात लोकशाही मार्गापासून दूर गेले असे मुळीच होत नाही. हे मैदान पवित्र आहे, त्याचे काही नियम आहेत, ते पाळा आणि अवश्य मैदानात उतरा.

खेळांच्या स्पर्धांप्रमाणे निवडणुकातही कोण हरले कोण जिंकले याला महत्त्व नाही, खेळाचे नियम टिकले पाहिजेत हे महत्त्वाचे.

संघटनांना जाच, पक्ष बिनधास्त

निवडणुका न लढवणाऱ्या अनेक संघटना असतात. त्यांनी गुन्हेगारी आणि असामाजिक कृत्ये करू नयेत एवढीच अपेक्षा असते. जातीच्या नावाने, धर्माच्या नावाने, भाषेच्या नावाने, प्रदेशाच्या नावाने वा इतर कोणत्याही मिषाने संघटना काढायची खुलेआम परवानगी असलीच पाहिजे. हिंदुस्थानात शेकडो सुना दरवर्षी जळून मरतात; पण तरीही पाचपन्नास पत्नीपीडित पुरुषांना संघटना बांधायची असेल तर त्याला आडकाठी असता कामा नये; पण अशा संघटनांनी पक्ष बनायचे ठरवले आणि निवडणूक लढवायची ठरवली; की लोकशाही

आणि निधार्मिकता इत्यादी तत्त्वे मान्य करूनच त्यांना पक्ष बनता येईल. ज्या दिवशी ही तत्त्वे त्यांना मान्य नसतील त्या दिवशी निवडणुकीच्या मैदानाचा विध्वंस करणाऱ्यांना मैदानातून काढून लावावे लागेल. ही लोकशाहीची शिस्त आहे.

पण, शरद पवारांचा विचार उलटा आहे; संघटनांना शिस्त पाहिजे; पण पक्षांना मात्र काही शिस्त लागू नाही, असे त्यांचे तर्कट आहे.

गुंड नेत्यावरही बंदी

निवडणुकीत काय तो निर्णय लागावा अशी लोकशाहीवादी वाटणारी भाषा बोलणारे आणि त्यांचे साथीदार लोकशाही व्यवस्थेला धर्मवाद्यांइतकेच घातक ठरणार आहेत. पाच संघटनांवर बंदी घालण्याने काहीच साधलेले नाही. बंदी घातली पाहिजे जातीय पक्षांवर आणि गुंडांना हाताशी धरणाऱ्या पक्षांवर.

(२ फेब्रुवारी १९९३)

■■

लोकशाहीची सवत अर्थसत्ता

साम्यवादी आजकाल मीमांसा करतात, "साम्यवादाचा पराभव झाला याचे कारण समाजवादी देशात दुर्दैवाने हुकूमशाही आली. समाजवादी देशातील लोक रस्त्यावर आले ते समाजवादाविरुद्ध नाही, हुकूमशाहीविरुद्ध. समाजवादी व्यवस्थेमध्ये हुकूमशाही असली पाहिजे अशी काही आवश्यकता नाही. सोवियत युनियनमध्ये हुकूमशाही आली. याचे कारण, फार पुरातन काळापासून रशियाची राजकीय संस्कृतीच क्रूर हुकूमशाहीची आहे. पहिली समाजवादी क्रांती इंग्लंड किंवा जर्मनीसारख्या देशात झाली असती तर साम्यवादाचा लोकशाही अवतार पाहायला मिळाला असता."

कामगारांची हुकूमशाही म्हणजे स्वातंत्र्य

हुकूमशाही ही भयानक गोष्ट आहे एवढे त्यांना मान्य झाले, हेही काही कमी नाही. समाजवादी साम्राज्य कोसळायच्या आधी हीच मंडळी तेथे सुल्तानशाही चालू आहे हेच मुळी मान्य करीत नसत. तेथील लोकांना स्वातंत्र्य नाही, काही हक्क नाहीत, कोणाचीही धरपकड केव्हाही होऊ शकते, कोणाचाही जीव केव्हाही घेतला जाऊ शकतो; एवढेच नव्हे तर हजारो लोकांचे शिरकाण तेथे सतत होतच असते, असे स्पष्ट पुरावे मिळाले तरी कॉम्रेड लोक ते मानायला तयारच होत नसत. त्यांची पहिली प्रतिक्रिया अशी, की हे सगळे खोटे आहे, हा सगळा भांडवलदारांचा आणि त्यांच्या बगलबच्च्यांचा भाडोत्री प्रचार आहे हो! थोडीफार हुकूमशाही असेल; पण ती आवश्यकच आहे, कारण समाजवादी देशांना भांडवलदारी देशांनी घेरून टाकले आहे. समाजवादी क्रांती स्थिर होईपर्यंतच ही हुकूमशाही चालेल; पण भांडवलदारी देशांमध्ये मक्तेदार आणि त्यांची पिलावळ लोकांना बेकारी, दारिद्र्य यांच्या खाईत लोटतात, तेथील आचार, विचार, प्रचाराचे स्वातंत्र्य निव्वळ दिखाऊ आहे, याउलट समाजवादी देशात काही माथेफिरू,

पागल आणि समाजद्रोही प्रतिगामी सोडल्यास बाकी सर्वसामान्य माणसांना इतके स्वातंत्र्य आहे, की विचारू नका. तेथे हुकूमशाही आहे असे म्हणणे फक्त भांडवलशाहीच्या भाडोत्री कुत्र्यांनाच शोभते, इ.इ.

यापुढे जाऊन भाई लोकांचा असा आग्रह असे, की जसजसा काळ लोटेल तसतसे भांडवलदारी देशात हुकूमशाही वाढत जाईल. याउलट समाजवादी देशात एकदा काय वर्ग ही संस्था संपली, की हुकूमशाहीच काय, शासनही विसर्जित होईल आणि एक शासनविरहित समाजाचा साक्षात स्वर्ग उभा राहील, असे मोठे मोहक स्वप्नदेखील चांगले जाणते चिंतनशील समाजवादी विचारवंत मांडीत असत.

अर्थसत्ता आणि लोकशाही सवती-सवती

समाजवाद आणि लोकशाही एकत्र नांदू शकतात का? या प्रश्नाचे उत्तर शोधताना समाजवादी देश कोणते याची व्याख्या स्पष्ट असली पाहिजे. पश्चिम युरोपीय देशांतील व्यवस्था ही काही समाजवादी नव्हे. राष्ट्रातील बहुतांश संपत्ती शासनाच्या ताब्यात असेल आणि उत्पादन आणि व्यापार यांच्यावर शासनाचा मोठा ताबा असेल, तरच त्या देशांना समाजवादी म्हणता येईल. कल्याणकारी समाज हे काही खऱ्या अर्थाने समाजवादी नाहीत. ज्या शासनाकडे आर्थिक सत्ता एकवटलेली असते तेथे लोकशाही व्यवस्था टिकूच शकत नाही, अशी माझी खात्री झाली आहे. समाजवादी क्रांती इंग्लंडसारख्या देशात होणे कठीणच होते; पण इंग्लंडमध्ये समाजवादी क्रांती झाली असती, तर तेथेही हुकूमशाही तयार झाली असती.

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाला आणि त्या देशावर आर्थिक अरिष्ट कोसळले. त्या अरिष्टावर मात करण्यासाठी राष्ट्रभक्ती, वंशविद्वेष आणि आर्थिक सत्ता या आधाराने हिटलरी नाझीवादाचा भस्मासुर उभा राहिला. तेथे तर काही समाजवाद नव्हता, तरीही हुकूमशाही अवतरली. आर्थिक सत्ता शासनाकडे एकवटली, की लोकशाही अस्त पावणार हे नक्की.

भारतातील सध्याची परिस्थिती पाहता, या सिद्धांताबद्दल अधिक खात्री वाटते. ज्या शासनाच्या हाती आर्थिक सत्ता आहे आणि तेथील शासक लोकांच्या संमतीने निवडणुकांनी ठरतात त्या निवडणुका या खऱ्याखुऱ्या लोकशाही स्वरूपाच्या राहतच नाहीत.

सत्तेचा जादूचा दिवा

अरबी भाषेतील सुरस कथेत वारंवार जादूच्या दिव्याचा उल्लेख होतो.

एखाद्या शिंप्याचा किंवा न्हाव्याचा उनाड मुलगा. त्याला घरातून हाकून लावले आणि नंतर जादूच्या दिव्याचा राक्षस त्याच्या नशिबाने हाती आला म्हणजे त्याला संपत्ती मिळते, स्वरूपवान राजकन्याही मिळते, एवढेच नव्हे तर शूर आणि विद्वान म्हणूनही त्याची ख्याती होते.

आर्थिक सत्ता आणि लोकशाही एकत्र राहिली तर सत्तेची खुर्ची म्हणजे जादूचा दिवा बनतो. परीक्षेत नापास झालेला टवाळ पोरगा कोणत्यातरी पक्षात गेला आणि पाचपन्नास लोकांना जमा करून, हळूहळू सत्तेच्या खुर्च्या काबीज करू लागला म्हणजे त्याच्या हाती पैसाही येतो. त्या पैशाच्या आधाराने आणखी सत्ता मिळवू शकतो. सत्ता असली तर सगळे काही आहे, वैभव आहे, मानमान्यता आहे. वाटेल ती अपकृत्ये केली तरी संरक्षण आहे. असा हा जादूचा दिवा, तो हाती यावा यासाठी कोण धडपडणार नाही? रसाळ, सुगंधी फळ असले, की त्याला कीड पहिल्यांदा लागते, तसाच हा प्रकार आहे.

सत्तेसाठी कोण काय करील हे सांगता येत नाही. स्वातंत्र्य आंदोलनाची सर्व पुण्याई पाठीशी असताना काँग्रेसला सत्ता संपादन करण्याची भावना का व्हावी? भारताची ऐतिहासिक परंपरा पाहता लोकशाही टिकण्याची संभावना काही वाईट नव्हती. भारतीय लोकशाहीवर पहिला हल्ला केला तो इंदिरा गांधींनी, १९५२ मध्ये. केरळातील लोकांनी निवडून दिलेले साम्यवादी सरकार पुरे पाच वर्षे टिकले असते तर काही मोठी जगबुडी येणार नव्हती. बंगालमध्ये साम्यवादी सरकार सतत निवडून येत आहे. त्यांनी काही साम्यवादी गोंधळ घातलेला नाही. उलट ज्योती बसू हे सर्वांत भांडवलदारी मुख्यमंत्री आहेत असे म्हटले जाते; तरीही केरळातील कम्युनिस्ट सरकार दंग्याधोप्याने पाडण्याचा मोह इंदिरा गांधींना झाला. विरोधी पक्षाचे सरकार म्हणून टिकू द्यायचे नाही असा काँग्रेसने सतत प्रयत्न केला आहे. डॉ. फारुख अब्दुल्ला यांचे सरकार बेकायदेशीररीत्या पाडण्यात आले नसते, तर काश्मीरमधील परिस्थिती आजच्याइतकी चिघळण्याचे काही कारण नव्हते. सत्ता टिकवण्याकरिता काँग्रेसने घराणेशाही तयार केली, भिंद्रानवाल्यांचे भूत उभे केले, अयोध्येत शिलान्यासाला परवानगी दिली, शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय धुडकावून लावला, आणीबाणी लादली, लाखो लोकांना तुरुंगात टाकले, भारतीय लोकशाही परंपरा तोडण्याची सुरुवात काँग्रेसने केली आणि आजही त्यांची पराकाष्ठा चालूच आहे.

साम्यवाद्यांनी तेलंगणापासून नक्सलबारीपर्यंत प्रत्यक्ष सशस्त्र उठाव करून बघितले. काँग्रेसच्या हातातील नेहरू घराण्याच्या हुकमी पत्त्याला तोड म्हणून

जनसंघाने गोवधबंदीचा मुद्दा वर केला. जनता दलाने मंडल आयोगाचा प्रश्न असाच वापरला आणि भारतीय जनता पार्टीने अयोध्येतील मस्जिद-मंदिराचा प्रश्न उभा करून कळस चढवला. आता मंदिर बांधले, नाही बांधले, तरी जातीयतेचे भूत चिघळत राहणार आहे. सत्तेचा जादूचा दिवा हस्तगत करण्यासाठी भारतीय जनता पार्टीने केलेली चाल देशात रक्ताचे पाट वाहवत आहे.

आता धरबंध काहीच नाही

अयोध्येचा प्रश्न मिटेल. कदाचित काशी, मथुरा, द्वारका हेही विषय यथावकाश निघतील. महत्त्वाची गोष्ट अशी, की अयोध्येचा वाद ना रामाच्या मंदिराचा आहे ना बाबराच्या मस्जिदीचा. सत्तेचा जादूचा दिवा हस्तगत करण्याकरिता सगळ्यांनीच काही धरबंध न ठेवता प्रयत्न केले. हिंदुत्वाची सध्या सरशी होते आहे, एवढेच. शासन सर्व अर्थव्यवस्थेचे संचालन करते. खरे म्हणजे निवडणुका या आर्थिक विचार आणि कार्यक्रम यांच्या आधारावरच झाल्या पाहिजेत; पण सत्तातुरांना भय नसते, लाज नसते आणि संयमही नसतो. जातीचे, धर्माचे नाव घेऊन शंख फुंकला म्हणजे मागासलेला, आर्थिकदृष्ट्या गांजलेला, सर्वसामान्य माणूस त्याला प्रतिसाद देतो. ही युक्ती एकदा जगजाहीर झाल्यानंतर आता सत्तास्पर्धेला काही मर्यादाच राहणार नाही.

सत्तेत वैराग्य पाहिजे

ही स्पर्धा संपवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सत्ताच अनाकर्षक करून टाकणे. सरकारचा आर्थिक जगाशी काही संबंध नसला, कुठलेच लायसेन्स परमिट देणे त्यांच्या हाती नसले म्हणजे सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करील कोण? सत्ता ही जबाबदारी असली म्हणजे चारित्र्यवान लोकांना सत्ता दिली जाते. सत्ता फायद्याचे कलम असले, की तेथे भामटेच येणार! आणि तेथे येण्यासाठी ते काहीही करणार. भारतातील शासनाकडून सर्व आर्थिक सूत्रे काढून घेऊन अर्थव्यवस्था खुली केली नाही तर इथली लोकशाही थोड्या दिवसांतच संपणार आहे. जर्मनीत संपली तशी आणि समाजवादी देशांत संपली तशी.

(११ फेब्रुवारी १९९३)

■■

आणखी एक स्वायत्तता लिमिटेड

पुण्याजवळच्या एका उद्योग वसाहतीत गेली कित्येक वर्षे कारखाना चालवणाऱ्या एका उद्योजकाची गाठ पडली. कारखाना छोटासाच, फार अवजड यंत्रसामग्री आहे असे नाही. अत्यंत आधुनिक तंत्रज्ञान वापरून नागरिकांनाच नव्हे तर देशाच्या संरक्षणाकरितासुद्धा आवश्यक असा माल हे तरुण कारखानदार बनवतात. कारखान्याची इमारतही सुबक लहानसर. कारखान्यातील मुख्य भांडवलाची गुंतवणूक म्हणजे, या कारखानदार मित्रांचे इलेक्ट्रॉनिकमधील विशेष ज्ञान.

मुंबईचे बेरुत होणार

मुंबईतील दंगलीच्या बातम्यांनी वर्तमानपत्रे भरलेली होती. कारखानदार मित्रांनी मला विचारले, "या दंगली अशाच चालू राहिल्या तर देशाचे काय होईल?" मी म्हटले, "गेल्या १० दिवसांत पश्चिम महाराष्ट्रातील फळबाग शेती जवळजवळ उद्ध्वस्त झाली आहे. द्राक्षे १० रुपयांच्या खाली आली, बोरं १.५० ते २ रु. किलो झाली. वाहतूक बंद, मुंबई बाजार बंद, या फटक्यातून शेतकऱ्याला सावरायला किती वर्षे लागतील कुणास ठाऊक? कारखानदारांवर काय परिणाम होईल. माझ्यापेक्षा तुम्हीच चांगले जाणता."

कारखानदार महाशयांनी मला एक हकिकत सांगितली, "एक अनिवासी भारतीय परदेशात इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रातच नाव कमावलेला. भारतामध्ये काही दिवसांपूर्वीच त्याने १०० कोटी रुपयाची गुंतवणूक केली आणि मुंबईचे दंगे चालू झाले. आता तो घायकुतीला आला आहे. त्याची गडबड अशी चालू आहे, की हे भांडवल हिंदुस्थानातून परत काढून न्यावे. अशा अशांततेच्या आणि अनिश्चिततेच्या परिस्थितीत कारखानदारी चालायची कशी, ही कारखानदार मित्राची चिंता."

मी म्हटले, "मुंबईची आजची परिस्थिती पाहून मला १९७२ सालच्या बेरुत शहराची आठवण येते. ख्रिस्ती, मुसलमान, फ्रेंच, अमेरिकन, इंग्लिश अनेक जातीजमातींचे लोक तेथे गोडगुलाबीने राहत. सर्व मध्य-पूर्वेत आर्थिक भरभराट आणि जातीय सलोख्याचा आदर्श. १९७२ मध्ये तेथे जातीय दंगली चालू झाल्या आणि तीन वर्षांत बेरुतचे सारे जीवन ठप्प झाले. आज तर सारे बेरुत जवळजवळ बेचिराख झाले आहे. बंद आणि दंगली अशाच चालू राहिल्या तर मुंबई वर्षात बेरुत होऊन जाईल."

खंडणी वसुली

आमच्या गप्पा चालू असताना कारखान्याच्या कार्यालयातील एका कर्मचाऱ्याने येऊन काही निरोप दिला. चिठ्ठी पाहिल्यावर आमच्या मित्राच्या चेहऱ्यावर जे भाव उठले, त्याचे वर्णन करणे कठीण आहे. राग, चीड, तुच्छता इत्यादींचे मिश्रण पाहून मी चकित झालो. मनात म्हटले, हा माणूस कारखानदार व्हायच्या ऐवजी नाटकात, सिनेमात गेला असता तर उत्कृष्ट अभिव्यक्तीबद्दल नाव कमावून गेला असता.

केवळ कुतूहलापोटी मी विचारलो, "काय झाले काय?"

"काही विशेष नाही. नेहमीचेच."

"कोणी देणेदार आलाय का?"

"देणेदारापेक्षा वाईट, इन्स्पेक्टर आलाय."

माझ्याशी बोलणे थांबवून त्याने खिशातून १०० रु. च्या पाच नोटा काढल्या आणि इन्स्पेक्टरला देण्यासाठी कर्मचाऱ्याच्या हाती दिल्या.

माझ्याकडे पाहुणे आल्यामुळे त्यांना भेटता येत नाही म्हणून सांग. न राहवल्याने मी विचारले, "ही काय लाच वगैरे आहे की काय?"

कारखानदार मित्र म्हणाले, "काय म्हणायचे ते म्हणा; वेगवेगळ्या डझनभर खात्यांचे इन्स्पेक्टर आठवडाभर येत असतात आणि प्रत्येकाची अपेक्षा प्रत्येक भेटीच्या वेळी प्रत्येक कारखान्यात त्यांना ५०० रु. मिळावे अशी असते. नोकरदार वर्गाने कारखानदार वर्गावर बसवलेली ही 'खंडणी' आहे असे आम्ही मानतो."

इन्स्पेक्टरसाहेबांचा इंगा

"बाकीच्या कारखानदारांची लफडी असतात. भानगडी असतात. ते अधिकाऱ्यांना खुश ठेवू पाहतात हे समजण्यासारखे आहे; पण तुमच्यासारख्या केवळ बुद्धीचे भांडवल करणाऱ्यांवर अशी वेळ का येते?" मी विचारले.

मग त्यांनी मला एक अनुभव सांगितला, "काही महिन्यांपूर्वी या कारखानदारांचा भागीदार दरवाजाशी आलेल्या एका इन्स्पेक्टरवर उखडला. उखडायचे तसे काही कारण नव्हते; पण इन्स्पेक्टर साहेबांनी तोंडातला तंबाखूचा बार खिडकीतून बाहेरच्या हिरवळीवर पिंक टाकून मोकळा केला. त्यामुळे हे अनेक वर्षे परदेशात राहिलेले उच्च विद्याविभूषित भागीदार भडकले. त्यानंतर इन्स्पेक्टर साहेबांनी रंगलेले दात दाखवत ५०० रु. ची मागणी केली, तेव्हा वातावरण आणखीणच तापले. एक पैसाही न देता इन्स्पेक्टरला काढून लावण्यात आले."

परिणाम असा झाला, "की तीनच दिवसांत इन्स्पेक्टर साहेब दोन चार कामगारांना घेऊन कारखान्यावर आले आणि कारखान्याच्या सगळ्या इमारतीची मोजमापे घ्यायला सुरुवात केली. जाण्यापूर्वी कारखान्याला ते एक नोटीस देऊन गेले. कारखान्याच्या एका भागाच्या दिखाऊ छपराची उंची नियमाप्रमाणे किमान ८ फूट ६ इंच पाहिजे. ती ८ फूट ३ इंच भरली, त्यामुळे तो सगळा भाग पंधरा दिवसांत पाडून टाकण्याची नोटीस कारखान्याला मिळाली. प्रकरण कोर्टात गेले आणि त्याचा निकाल लागून भानगड संपेपर्यंत सहा महिने लागले आणि ३५,००० रुपये खर्च आला."

"सरकारी नियंत्रण कसे असते बघा, यात कामगारांच्या कल्याणाची इच्छा नाही. तशी इच्छा असती तर खात्याने छप्पर कमी उंचीचे असल्याची भरपाई दुसऱ्या कोणत्याही प्रकारे करून देण्याचा आग्रह धरला असता. इमारत पाडायची नोटीस दिली नसती आणि ५०० रुपयांत सगळे मिटवायचा प्रश्न उद्भवला नसता. या नियंत्रणांनी भले फक्त सरकारी अंमलदारांचेच होते."

"आता आम्ही अनुभवाने शहाणे झालो आहोत आणि इतर कारखानदारांप्रमाणेच जो कोणी इन्स्पेक्टर दरवाजाशी येईल त्याला नाराज करण्याची आमची हिंमत होत नाही."

"आजच थोड्या वेळापूर्वी एका खात्याचे वरिष्ठ साहेब येऊन गेले. त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या इन्स्पेक्टरने या महिन्याचा हप्ता वसूल करून नेला आहे, असे साहेबांना सांगितले."

साहेब म्हणाले, "तुमच्या कारखान्याला भेट दिल्याचा रिपोर्ट त्याने सादर केलेला नाही. पुन्हा दुसऱ्यांदा ५०० रु. मागितले नाहीत हेच नशीब."

मुक्ती जवळ आली?

असल्या परिस्थितीचा दररोज सामना करणाऱ्या कारखानदारांना मुंबईच्या दंगलीचा सामना करणे काही फारसे कठीण जाऊ नये; पण आता खुली अर्थव्यवस्था

आली म्हणजे तुमच्यामागचा हा जाच कमी होईल. लायसेन्स-परमिटची भानगड संपली म्हणजे सरकारी कार्मचाऱ्यांचा सासुरवास आपोआपच कमी पडेल. तुम्ही सगळ्या कारखानदारांनी खुली अर्थव्यवस्था लवकर यावी म्हणून खरे तर प्रयत्न करायला हवेत.

कुत्रे सोडा; पण भीक घाला

तेवढे नाव काढू नका, कारखानदार म्हणाले, "खुली व्यवस्था आली तर कारखाना बंद करावा लागेल. आम्ही इलेक्ट्रॉनिक्समधले तज्ज्ञ म्हणजे हिंदुस्थानातील तज्ञ. आमच्या मालाशी स्पर्धा करणारा माल परदेशातून आयात होऊ लागला किंवा याच मालाचे कारखाने परदेशी कारखानदार येथे काढू लागले तर आमचा माल खपेल कसा? आमची कारखानदारी सरकारी संरक्षणामुळेच चालते आणि सरकारने भांडवलाची सोय केली नसती आणि इतर अनेक सवलती दिल्या नसत्या तर हा एवढा कारखानासुद्धा उभा करता आला नसता! आम्हाला आपली जुनी अर्थव्यवस्थाच पाहिजे; पण या सरकारी इन्स्पेक्टरांचा जाच नको."

कावळा भिकाऱ्यापेक्षा श्रेष्ठ

मनात म्हटले, प्राध्यापकांना जशी मर्यादित स्वायत्तता पाहिजे तशीच छोट्या कारखानदारांनादेखील मर्यादित स्वायत्तता पाहिजे. कोठूनही काही फुकट किंवा सवलतीने मिळते असे म्हटले, की त्याच्यावर कुणाची तरी काकदृष्टी पडणारच. कोठे दानधर्म होतो असे म्हटले, की भिकारी इतर भिकाऱ्यांना बोलवून घेतात.

"सरकारी योजनांचा फायदा तुम्हा एकट्या एकट्याला घेता यावा अशी तुमची इच्छा. ते कसे शक्य आहे? कावळ्यांप्रमाणे इतर कावळ्यांना बोलावून सामुदायिकरीत्या मेजवानी घेण्याची तयारी असली पाहिजे."

"नुसती तयारी नाही. आता हळूहळू त्याची सवयही व्हायला लागली आहे. पूर्वी सुटण्याचा मार्ग सापडत नव्हता. आता सुटायचा मार्ग दिसतो; पण सुटायची इच्छाच राहिली नाही," आपल्या बुद्धीच्या भांडवलाने पुणे परिसरात नाव कमावलेले कारखानदार मित्र म्हणाले.

(१८ फेब्रुवारी १९९३)

■■

सामान्य जनता आणि विविध ठगांची टोळी

लॉर्ड बेंटिकने हिंदुस्थानातील ठगीचा बंदोबस्त केला असे आमच्या इतिहासाच्या पुस्तकात लिहिलेले होते.

शाळेतील पुस्तकात अशी अनेक वाक्ये असतात, की ज्यांचा, खरे म्हटले तर, अर्थ मुलाना समजत नाही. अर्थ न समजताच अशी वाक्ये पाठ केली जातात, अशा वाक्यांपैकीच हे एक वाक्य.

बंदोबस्त करण्यापूर्वीची ठगी म्हणजे काय होती यासंबंधी काही माहिती इतिहासाच्या पुस्तकात मिळत नाही, तिचा बंदोबस्त लॉर्ड बेंटिकने केला एवढेच म्हटलेले असते.

कठीण जागी हल्ला

त्या काळात शेरशहा, मलिकंबर आदी लोकांनी रस्ते बांधून बाजूला सावलीसाठी झाडे लावली व प्रवाशांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली असे लिहिलेले असते. किंबहुना, कोणत्याही चांगल्या राजाने किंवा बादशहाने जनकल्याणाची कोणती कामे केली, असा प्रश्न परीक्षेत विचारला तर रस्ते बांधण्याच्या कामगिरीचा उल्लेख बिनधोकपणे सगळे चलाख विद्यार्थी करतात. हे असे राजमार्ग सोडल्यास बाकी जवळजवळ नाहीत. जे रस्ते असत त्यावर नदीनाले ओलांडण्यासाठी पूल तर सांडवे असत. पूल इंग्रजांनी इथे आणले. दऱ्याखोरी, डोंगरजंगले त्यादीनींच प्रवासाचा सगळा मार्ग व्यापलेला. शहरे, बाजारपेठा यांच्यामधला सगळा प्रदेश त्यांनीच व्यापलेला. या सगळ्या निर्मनुष्य प्रदेशात राज्य ठगांचेच असे. ठग म्हणजे लूटमार करणारे, जे कोणी यात्रेकरू व्यापारी प्रवासाला निघतील त्यांना कोणत्याही मार्गाने लुबाडणे, त्यांचे धन, आवश्यक तर प्राण, काही हरण करणे हा ठगांचा धंदा. काही वेळा ते प्रवाशांच्या जथ्थ्यांत, सहप्रवासी म्हणून सामील होत आणि वाटचाल करताना अडचणीचा प्रदेश आला म्हणजे

मौल्यवान चीजवस्तू तेवढ्या नेमक्या लुटून नेत. या ठगांचे देशभर जाळे होते. प्रवासी एका टोळीच्या हद्दीतून पलीकडे गेला, की त्याला लुटण्याचा अधिकारही एका टोळीकडून दुसऱ्या टोळीकडे जाई. या सगळ्या ठगांच्या तावडीतून सुटून सुखरूप यात्रा पुरी होणे मोठी दुरापास्त गोष्ट होती.

काशीयात्रा सुखरूप झाली

काशी यात्रेला निघायचे म्हणजे सगळी काही निरवानिरव करायची आणि 'या जाण्याशी परतणे न लगे,' अशी भावना ठेवूनच घरातून निघायचे. वाटेत अपघातांची, जंगली जनावरांची इत्यादी भीती तर खरीच; पण खरी भीती ठगांचीच. कोणत्या ना कोणत्या ठगांच्या टोळीच्या हल्ल्यात चीजवस्तू लुटून जाणार आणि त्याबरोबर जीवही जाणार याची जवळजवळ निश्चिती असे.

बेंटिकने ठगीचा बंदोबस्त केला आणि काठीला सोन्याचे गाठोडे बांधावे आणि बिनधास्त काशीयात्रेला निघावे अशी परिस्थिती इंग्रजांनी तयार केली.

ठगास भेटला महाठग

इंग्रजांनी हिंदुस्थानातील सत्ता हातात घेतली, ती कोणाकडून? दिल्लीच्या बादशहाकडून, रणजितसिंह आदी शिखांकडून, पेशावाईकडून की निजामाकडून की राजपुतांकडून? हा इतिहासातील चर्चेत मोठा वादाचा विषय असतो. खरी परिस्थिती अशी आहे, की इंग्रज येण्याआधी बहुतांश देशावर सत्ता होती ती ठगांची आणि त्यांचा बंदोबस्त केल्यानंतरच इंग्रजांच्या हाती खरीखुरी सत्ता आली.

शिवाजी महाराजांना मोगलांपेक्षा पुंड-पाळेगार, देशमुख इत्यादींशीच लढाया जास्त कराव्या लागल्या, तसेच इंग्रजांनाही राजेरजवाडे, सुलतान, बादशहा यांच्यापेक्षा ठगांना आटोक्यात आणण्यासाठी अधिक परिश्रम घ्यावे लागले.

राणीचे राज्य आले, देशात सगळीकडे शांतता नांदू लागली. रस्ते झाले, राजमार्ग झाले. लोखंडी रुळावरून आगगाड्या धावू लागल्या. व्यापारउदीम वाढला. म्हणजे, इंग्रजांनी भारतीय ठगी संपवली आणि इंग्रजी छापाची व्यापारी लुटमारीची पद्धत चालू केली; पण अगदी रानटी पद्धतीची ठगी सोडून थोडी सुसंस्कृत लुटीची पद्धत इंग्रजांनी सुरू केली, 'हेही नसे थोडके.'

ठगांची नवी आश्रयस्थाने

पण ठगीचा बंदोबस्त झाला तो लष्करांच्या, पोलिसांच्या किंवा हत्याराच्या मदतीने झाला हे काही खरे नाही. १८५७ च्या बंडापर्यंत ठगांना कह्यात आणण्याचे काम इंग्रज सरकारने मोठ्या जोमाने केले. ५७ च्या बंडाचा तडाखा इतका

जबरदस्त होता, की त्यानंतर इंग्रजांनी देशातील परंपरागत धर्मजातिव्यवस्था, सत्तास्थाने यात ढवळाढवळ करण्याचे बंद करून टाकले. साहजिकच ठगांचा पाठलागही बंद पडला. ठगीचा बंदोबस्त झाला. ठगांचा नाश झाला नाही.

हे ठग लोक गेले कुठे? ज्यांना लुटायचे त्यांच्यातच मिसळून जायचे कसब त्यांनी पिढीजात अनुभवाने मिळविले होते. इंग्रजांची सगळी नवी व्यवस्था त्यांनी पाहिली आणि आपला धंदा आता शहरे, बाजारपेठा यांच्यामधील निर्मनुष्य प्रदेशात चालू शकणार नाही; पण तो धंदा शहरात, बाजारपेठात चांगला चालेल अशी त्यांनी खूणगाठ बांधली आणि हळूहळू व्यापारउदिमाच्या मिषाने सारी ठग मंडळी शहरात जाऊन वसली. इंग्रज रयतेची लूट करतच होते. इंग्रजांच्या हातात हात मिळवून लुटीचे कसब या शहरातील ठगांनी पक्के आत्मसात केले आणि अगदी थोड्या काळात त्यांनी आपले बस्तान चांगले बसवले. डोंगराळ रानात, दऱ्याखोऱ्यात भ्रमंती करण्याचा त्रास नाही आणि कमाई मात्र भरगच्च अशी ही आधुनिक ठगी मोठी यशस्वी झाली. याला महात्मा गांधींचेच प्रमाणपत्र आहे. "देशातील जनतेला लुटण्याचे काम इंग्रज आणि शहरातील मंडळी इतक्या निर्दयपणे करीत आहेत, की त्यांना आपल्या या पापाचा झाडा परपेश्वराच्या दरबारी कधीतरी द्यावा लागेल," असे तो महात्मा तळतळून बोलला होता.

ठगीचे पुनरुत्थान

ठगांचे नवीन व्यवस्थेतील स्थान इतके मोठे होते, की इंग्रज गेल्यावर सगळी सत्ता, सगळे सामर्थ्य पुन्हा त्यांच्याच हाती आले. इंग्रज गेल्यावर सनातन ठगीची पुन्हा सुरुवात झाली आणि थोड्याच काळात देशभर ठगांचे साम्राज्य पुन्हा पसरले. लॉर्ड बेंटिकने ठगीचा बंदोबस्त केला. भारतरत्न जवाहरलाल नेहरूंच्या अमलात ठगीचे पुनरुत्थान झाले.

हे ठग आता दऱ्याखोऱ्यातून फिरत नाहीत. त्यांना प्रवाशांचा पाठलाग करावा लागत नाही. लढाया तर सोडाच; पण किरकोळ हिंसाचारसुद्धा करावा लागत नाही. कोणत्याही कामाला निघालेली माणसे आपणहून ठगांच्या मुक्कामी येतात, आपणहून ठगांच्या तिजोऱ्या भरतात.

अवघे ठग माजले

प्रवासाकरिता निघाले तर त्यांना ठग तिकिटाच्या खिडकीपासूनच भेटतो. ठगाला खुश केले तर तिकीट मिळणार. तिकीट काढल्यानंतर वाटेमध्ये तपासणीस ठग भेटले तर त्यांनासुद्धा खुश करावे लागणार, तेव्हा प्रवास पार पडणार.

घरी बसून राहिले तरी ठगांची गाठ टाळता येत नाही. साधा ७-१२ चा

उतारा पाहिजे असेल तर तिथे एक ठग असतोच. आपल्याच शेतातील एखादे झाड तोडायचे झाले तर संबंधित ठगाचे समाधान करावे लागते. व्यापाऱ्याच्या दुकानात सकाळपासून संध्याकाळपर्यंत ठग येतात. व्यापारी काही न बोलता जी काही चीजवस्तू असेल ती त्यांना देऊन टाकतात. कारखानदारीची हीच स्थिती.

बँकेत कर्ज पाहिजे, ठग आहेच बसलेला. आपलेच पैसे आपणच बँकेत ठेवलेले, ते नुसते काढून घ्यायचे म्हटले तरी पुन्हा ठगांना खुश करायला लागते. दुकान काढायचे तर संबंधित ठगांच्या टोळीला खुश केल्याशिवाय ते शक्य नाही. विजेचे कनेक्शन पाहिजे? वीजठग उभा ठाकलेला. टेलिफोन ठगांच्या तर वेगवेगळ्या टोळ्या आहेत. त्या प्रत्येकाचे समाधान वेगवेगळे केले तर टेलिफोन मिळणार. टेलिफोन मिळाल्यानंतर तो व्यवस्थित चालू राहावा अशी इच्छा असेल तर आणखी एक ठगाच्या टोळीला खुश ठेवले पाहिजे.

गॅस सिलिंडर हवे असेल तर त्यासाठी ठगांची एक वेगळी टोळी, पासपोर्ट, तिकीट, कोणतीही गोष्ट करायचे म्हटले तर कोणातरी ठगाच्या दारात जाऊन त्याला खुश करण्यापलीकडे सामान्य माणसाला गत्यंतरच नाही. इंग्रज यायच्या आधी देशावर ठगांचे राज्य होते, आता तो पुन्हा एकदा 'ठगीस्तान' बनला आहे.

रडण्यापरीस हसणे बरे

या ठगीचा बंदोबस्त करणारा नवा लॉर्ड बेंटिक केव्हा अवतरेल ते सांगणे कठीण आहे; पण कोलकत्त्यातील एका पत्रकाराने एक नवाच मार्ग दाखवून दिला आहे. ठगांशी वादविवाद करायचा नाही. झटापट करायची नाही; तरीही त्यांना गोत्यात आणायचे असा मोठा सुंदर डावपेच आखला, एवढेच नाहीतर अमलात आणून दाखवला.

हे पत्रकार महाशय एका हॉस्पिटलमध्ये गेले आणि त्यांनी मृत्यूचा दाखला मागितला. कोणाच्या मृत्यूचा? तर स्वत:च्याच! पहिल्या ठिकाणी मृत्यू दाखला ठगांनी ५०० रुपयात जिवंत अर्जदाराच्या मृत्यूचा दाखला देण्याचे कबूल केले; पण ५०० रुपये म्हणजे फार झाले अशी सबब सांगून पत्रकार तिथून निघाले आणि दुसऱ्या एका इस्पितळात गेले आणि तेथून स्वत:च्या मृत्यूचा दाखला फक्त २०० रुपयांत पदरात पाडून घेतला. बंगालमध्ये या प्रकरणाची आता मोठी चर्चा चालू आहे.

ठगांना सगळा सरकारी पाठिंबा आहे. ठगीचे जाळे आता इतके व्यापक झाले आहे, की त्याच्याशी लढणे आता कोणालाच शक्य नाही. ठगीशी असा

गनिमी कावा खेळायला काय हरकत आहे? सरकारी नोकरदारांच्या ठगीचा असा फजितवाडा करणाऱ्या बहाद्दरांना मोठे जबरदस्त पारितोषिक दिले पाहिजे. यात स्वतंत्र प्रतिभेला कितीतरी वाव आहे. न घडलेल्या घटनांच्या बातम्या आणि माहितीपट टेलिव्हिजनवरून दाखवण्याची व्यवस्था करणे, मुळात अस्तित्वातच नसलेल्या गावांना साक्षर, दारूमुक्त गाव म्हणून सन्मानपत्रके मिळवणे, न जन्मलेल्या माणसांच्या, पाळण्यातील पोराटोरांचा किंवा जखखड म्हाताऱ्यांचे कुटुंब कल्याण ऑपरेशन केल्याचा दाखला घेणे, एक ना अनेक, प्रतिभेच्या आविष्काराला भरपूर वाव आहे. ठगीला आळा घालता आला नाही तर निदान एखाद्या ठगाला हास्यास्पद करण्याचे मानसिक समाधान तर मिळेल?

आमची ऐतिहासिक परंपरा ठगीची आहे. या ठगीस्तानात ठगांच्या कारवायांचा खरोखर बंदोबस्त होईल असे काही लक्षण नाही. या कामात लॉर्ड बेंटिकही चुकला. ठगाकडूनच लुटून घेणे हे आमच्या कपाळावरच लिहिलं आहे; पण लुटून घेता घेता थोडा विनोद करणे यापलीकडे सर्वसामान्य माणसाला वेगळे काही समाधान मिळण्याची आजतरी शक्यता नाही.

(४ मार्च १९९३)

■■

हिंदू नसल्याचा अभिमान

१९५१ मध्ये विनोबाजींनी लिहिलेला एक लेख अलीकडच्या 'साम्ययोग'च्या अंकात पुन्हा छापण्यात आला आहे. 'हिंदू धर्माचा आशय' हे त्या लेखाचे नाव आहे. १९४९ मध्ये तुरुंगात असताना विनोबाजींनी स्वत:च्या चिंतनासाठी हिंदू धर्माची व्याख्या तयार केली होती. या व्याख्येत त्यांचे स्वत:चे असे काही वैशिष्ट्य नाही, असे विनोबाजी स्वत:च सांगतात. अन्य लोकांनी केलेल्या व्याख्यांमधून काही घेऊन पूर्णता आणण्याच्या दृष्टीने आपण त्यांना जोडले आहे असे विनोबाजींनी म्हटले आहे. हिंदू धर्माची ही व्याख्या स्वत:ला समाधानकारक वाटते असेही विनोबाजी म्हणतात.

हिंदु कोण? तर -

ज्याची वर्णधर्म व आश्रमधर्म यावर निष्ठा आहे, ज्याचा गोसेवेवर विश्वास आहे, जो श्रुतीला आईप्रमाणे आदरणीय मानतो, जो मूर्तीचा सारखाच आदर करतो, जो पुनर्जन्म मानतो आणि त्यापासून मुक्त होण्याची इच्छा बाळगतो आणि जो सर्व प्राणीमात्रांना सुखकर असा व्यवहार करतो.

विनोबांनी दिलेली हिंदू शब्दाची व्याख्या ही अशी आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या आधाराने हिंदू धर्माचा सांगितलेला हा आशय मोठा मनोहारी आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा विनोबाजींचा गाढा अभ्यास या एकाच व्याख्येवरून इतका स्पष्ट होतो, की वाचणाऱ्याचे मन थक्क व्हावे.

राष्ट्रवादी धर्म

आजपर्यंत हिंदू शब्दाच्या व्याख्या अनेकांनी दिल्या आहेत. स्वातंत्र्यवीर सावरकर, श्री. गोळवलकर गुरुजी यांच्या व्याख्या हिंदू राष्ट्रवाद जोपासण्याच्या बुद्धीने तयार केलेल्या आहेत. समुद्रापासून सिंधुतटापर्यंत सर्व भूभागाला जो आपली मातृभूमी मानतो आणि धर्मभूमी मानतो तो हिंदू अशा प्रकारची व्याख्या

मुळातच खोडसाळ आहे. यहुदी, ख्रिश्चन व मुसलमान हे 'जुन्या कराराला' मानणारे तीन धर्म प्रकृतीनेच बहुराष्ट्रीय आहेत. विश्वाची निर्मिती, धारणा आणि अंत यासंबंधी एक विशिष्ट संकल्पना बाळगणारे जगातील यच्चयावत लोक या धर्माचे अनुयायी असू शकतात. यहुदी, ख्रिश्चन, मुलसमान कोणत्याही देशाचे नागरिक असोत, आपापला धर्म मानतात. भौतिक व्यवस्थेबद्दल त्या त्या देशातील नियम, शिस्त इत्यादी पाळली तर इतर बाबतीत आपापल्या धार्मिक संकल्पना ते सर्वोच्च मानतात.

ज्याला आज 'हिंदू' धर्म म्हटले जाते तो फक्त एकाच देशात आहे. नेपाळचा किरकोळ अपवाद लक्षात घेण्याचे कारण नाही. त्यामुळे यच्चयावत बाबतीत राष्ट्रीय सत्ताच सार्वभौम मानावी हे हिंदू धर्मीयांना साहजिकच आणि सोयीचे वाटते. इतर धर्मीय साहजिकच एक अर्धा डोळा तरी राष्ट्रीय सरहद्दीच्या पलीकडे ठेवून असतात आणि याचे हिंदूंना मोठे वैषम्य वाटते.

हिंदू धर्माची सावरकरी किंवा गोळवलकरी व्याख्या हिंदू धर्माचा आशय किंवा मर्म मांडण्याकरिता केली नसून, इतर धार्मिकांना प्रामुख्याने मुसलमानांना डिवचण्यासाठी उभारलेली आहे. हिंदुत्वाचा अभिमान मिरवणाऱ्या व त्याचे राजकारण करणाऱ्या कोणीही भारतीय तत्त्वज्ञानाचे मंथन आणि अवगाहन करून त्यातून नेमका मथितार्थ काढण्याची खटपट केली नाही. कारण धर्म हे त्यांचे क्षेत्र नव्हतेच. राष्ट्रवाद हे त्यांचे मैदान, धर्माचा त्यांनी केलेला वापर एक सोय होती, एवढेच.

फ्रेंच हिंदू आणि कंबोडियन ब्राह्मण

विनोबांची ही व्याख्या जगापुढे पुन्हा एकदा ठेवण्याचे काम 'साम्ययोग'च्या संपादकांनी केले, याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे.

मी स्वत:ला कधी हिंदू म्हणवून घेतलेले नाही. १९६८ मध्ये मी एक वर्षभराकरिता फ्रान्स देशात राहिलो होतो. विमानतळावर तपासणीच्या वेळी माझा पासपोर्ट पाहून तिथला अधिकारी म्हणाला, "तुम्ही 'ऐद'हून ('इंडिया'चे फ्रेंच रूपांतर) आलात म्हणजे तुम्ही हिंदू आहात." सरळ हो म्हणून मी मोकळा होऊ शकलो असतो; पण 'हिंदू' आणि 'भारतीय' यांतील फरक त्यांना मी समजावत बसलो. फ्रेंच भाषेत भारतात राहणारे ते सगळे हिंदू, मग त्यांचा धर्म कोणताही असो. 'हिंदू' हा शब्द धार्मिक नसून राजकीय आहे.

याच्या नेमका उलटा अनुभव कंबोडियातील 'अंकोरवट' देवालये पाहताना आला. प्रचंड देवालये. म्हणजे एका एका देवळाचे प्रांगणच कित्येक चौरस

मैलाचे. देवालयातील प्रत्येक मूर्तींच्या कपाळावर डोळ्याच्या आकाराचा एक व्रण स्पष्ट दिसतो. वाटाड्याने माहिती पुरवली, या प्रदेशात बौद्ध आणि ब्राह्मण यांच्या लढाया शतकानुशतके चालल्या होत्या. ब्राह्मण जिंकले, की ते बुद्धाच्या मूर्तीच्या कपाळावर तिसरा डोळा कोरून मूर्तीला शंकराची बनवण्याचा प्रयत्न करीत आणि बौद्ध जिंकले म्हणजे ते तिसरा डोळा लिंपून टाकीत.

मी वाटाड्याला प्रश्न केला, "या लढाया हिंदू आणि बौद्ध यांच्यामध्ये होत होत्या ना?"

"नाही, नाही," वाटड्याने उत्तर दिले. हिंदू नावाचा धर्म आहे हे त्याने कधी ऐकलेच नव्हते. ब्राह्मण धर्म आहे आणि या धर्माचे लोक भारतातील इतर लोकांवर जरब बसवून अंमल चढवतात असा त्याचा आग्रह होता. ज्योतिबा फुल्यांना त्याचे विवेचन ऐकून आनंद वाटला असता.

तुम्ही हिंदू आहात?

डायजेस्ट पद्धतीच्या मासिकात अनेकदा काही प्रश्नावल्या देतात. तुम्ही चांगले विद्यार्थी आहात का? तपासून पाहा. नवरा म्हणून तुम्ही कितपत योग्य आहात? पाहा! अशा प्रकारच्या मथळ्याखाली एक प्रश्नावली देण्यात येते. या प्रश्नांची उत्तरे वाचकांनी शक्य तितक्या प्रामाणिकपणे द्यायची असतात आणि मग दिलेल्या उत्तरावरून गुण मोजता येतात आणि वाचक कसोटीला कितपत उतरला याचा निष्कर्ष काढला जातो.

विनोबाजींनी दिलेल्या व्याख्येच्या कसोटीला आपण कितपत उतरतो हे तपासून पाहण्याचा मला मोह झाला.

गोभक्त नाही

गायीचा भक्त? मी भक्त नक्कीच नाही. मी गायी पाळतो आणि गाय हा एक 'उपयुक्त पशू' आहे असे स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रमाणे मानतो. त्याबरोबर गोपालनाचा धंदा किफायतशीरपणे करायचा असेल तर छोटे गोऱ्हे, आजारी गायी इत्यादींचा बोजा संपवणे आवश्यक आहे असे मी इतरत्र लिहिलेले आहे. गोवधबंदीला माझा विरोध नाही; पण त्यासाठी अनुत्पादक गायींच्या पोषणाची जबाबदारी सर्वच समाजाने घेतली पाहिजे, एकट्या दूध उत्पादकांना ती पेलणारी नाही. म्हणजे मी गोभक्त नाही; पण गायींचा मला काही रागही नाही.

वेदान्ती वेद कसा मानेल?

श्रुती म्हणजे वेद आणि उपनिषद यांचा गाभा. त्यांना मी मातृवत आदरणीय समजत नाही किंबहुना, कोणतेही एक पुस्तक किंवा एक व्यक्ती संपूर्ण निर्दोष

शकतच नाही. हा माझ्या विचार करण्याच्या पद्धतीचा पाया आहे. उपनिषदांचे जगभरच्या वाङ्मयात विशेष स्थान आहे. याउलट वेद उपनिषदांपेक्षा वेगळ्या पातळीतील आहेत. उपनिषदांचे 'वेदांती' तत्त्वज्ञान वेदांत सांगितलेल्या संकल्पनांचा उच्छेद करणारे आहे. म्हणूनच त्यांचे 'वेदांत' हे नाव सार्थक आहे असा माझा आग्रह आहे.

मूर्तिभंजक नाही

मूर्तींविषयी माझ्या मनात अनादर अजिबात नाही. अलीकडे मी देवळात जातो, पूर्वी जात नसे. नमस्कार वगैरे सहसा करीत नाही वेगवेगळ्या स्थानांतील देवीच्या मूर्ती आणि त्यांच्या डोळ्यांतील बुबुळांची जागा हा माझ्या जिज्ञासेचा एक विषय आहे.

सर्व धर्माबद्दल माझ्या मनात सारखाच आदर किंवा अनादर आहे. मूळ संस्थापकाच्या काळी प्रत्येक धर्माने एक क्रांतिकारक, ऐतिहासिक कामगिरी बजावली, त्या कामगिरीचा कालखंड संपल्यानंतर बहुतेक धर्मांनी इतिहासाच्या गतीला अडथळे आणण्याचे काम केले. स्वार्थापोटी कोणी केले नसतील इतके अत्याचार, हिंसाचार, बलात्कार, रक्तपात, लूटमार धर्मांच्या नावाखाली घडलेली आहे.

पुनर्जन्मातून मुक्ती कशी?

मी पुनर्जन्म मानतो, पदार्थ विज्ञानशास्त्राच्या नियमाने. जडमात्र अविनाशी आहे, तेव्हा पुनर्जन्म या संकल्पनेला कोणी विरोध करू शकेल असे वाटत नाही; पण पुनर्जन्माची ही शास्त्रीय संकल्पना ग्राह्य धरली तर पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका होण्याची काहीही शक्यता राहत नाही. वस्तूचे अविनाशित्व कदाचित अवकाशातील 'ब्लू होल'मध्ये संपत असेल; पण कोणत्याही कर्मकांडाने ते होण्याची काहीही शक्यता नाही.

विनोबाजींच्या प्रश्नावलीतील आठ प्रश्नांपैकी फक्त प्राणिमात्रांना सुखकारक असे वर्तन ठेवण्याच्या एकाच लक्षणाच्या कसाटीला मी उतरेन असे वाटते. म्हणजे मी लोकांना दुःख देत नाही असे नाही; पण ते दुःख देण्याच्या हेतूने देत नाही. बाकी उरलेल्या सात प्रश्नांपैकी सहा प्रश्नांबाबत माझी परिस्थिती कसेबसे काठावर पास होणाऱ्या विद्यार्थ्यांसारखी आहे; पण पहिल्या अटीबद्दल मात्र परिस्थिती मोठी कठीण आहे आणि ही अट साधीसुधी नाही. ज्याला आज हिंदू धर्म म्हटले जाते त्याचे एके काळचे नावच मुळी वर्णाश्रमधर्म असे होते. हिंदू धर्मातील इतर कसोट्यांना उतरला नाहीत तरी चालेल; पण वर्णाश्रम धर्मावरील

विश्वास सक्तीचा विषय आहे. या क्षेत्रात नापास झाले, की बाकींच्या कसोट्यांना उत्कृष्टपणे उतरूनही काही फायदा नाही. इथे नापास तो नापास.

मी वर्णधर्म मानत नाही आणि आश्रम धर्मही नाही. चारचौघांप्रमाणे शिकायच्या काळात शिकलो म्हणजे ब्रह्मचर्याश्रमी होतो असे नाही. आज संसारातील आणि सार्वजनिक जबाबदारीतील कामे टाकून वानप्रस्थी झालो आहे असेही नाही आणि हातात दंड घेऊन, भगवी वस्त्रे परिधान करून संन्यासी होण्याचा माझा आजतरी विचार नाही. आयुष्याची इतकी रोखठोक आणि सुबक कालविभागणी करता येते हे मला मान्य नाही. अशी विभागणी करायची झालीच तर ती ज्याने त्याने स्वत:साठी केली पाहिजे, कुणा दुढ्ढाचार्याने सांगितले म्हणून ठरावीक काळानंतर आश्रम बदलायचा ही कल्पना मला हास्यास्पद वाटते.

वर्णधर्म अशीच अडचण उपस्थित करतो. रूढीनुसार जन्माच्या अपघाताने वर्ण, जात ठरवण्याची अमानुष पद्धत बाजूस राहू द्या; पण अगदी गुण आणि कर्म किंवा जन्म, शिक्षण आणि परिस्थिती यामुळे कोणाही एका माणसाकडे जन्मभर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र यांपैकी एकाच तऱ्हेची जीवनशैली मृत्यूपर्यंत राहावी ही कल्पनाच मला निव्वळ अडाणीपणाची वाटते.

विविधता म्हणजे जीवन

मी आश्रम बदलले नाहीत; पण वर्ण बदलले आहेत. मी शिकलो आहे, शिकवले आहे म्हणजे ब्राह्मणवर्णी राहिलो आहे. मी नोकरी केली आहे, त्यातील काही क्षत्रियधर्माची म्हणता येईल, काही वैश्य धर्माची. गेल्या तपावर मी कुणबी बनून शूद्र वर्णाचा स्वीकार केला आहे आणि औपचारिक ब्राह्मणवर्गात जेवढी विद्या मिळाली नाही तेवढी विद्या या शूद्र वर्णाच्या कालखंडात मला मिळाली.

आयुष्य विविधतेने नटलेले आहे. त्याचा सर्वांगाने आणि सर्वपरीने अनुभव घ्यावा यात आयुष्याचे सार्थक आहे. यापेक्षा मनुष्यप्राणी अधिक काही दुनिया समजण्यासाठी करू शकत नाही याची मला खात्री पटली आहे. आयुष्य लाभले तर याहीपलीकडच्या काही वर्णाचा अनुभव घेण्याची माझी इच्छा आहे. एका जन्मात एकच वर्ण हे मी कधीच मानणार नाही, मग त्या कारणाने हिंदुत्वाच्या कसोटीला मी नापास झालो तरी चालेल. या कारणाने कोणी म्हटले की मी हिंदू नाही तर मी म्हणेन, "मी हिंदू नाही आणि त्याचा मला अभिमान आहे!"

(११ मार्च १९९३)

■■

निर्यात विरुद्ध सरकार

आपल्या देशात मनुष्यबळ स्वस्त आहे आणि यंत्रसामग्री महाग आहे. त्यामुळे हातमाग, हस्तोद्योग किंवा इतर कुटीरोद्योगातील माल आपल्याकडे खूप स्वस्त मिळतो. न्हावी, शिंपी, चांभार अशा कारागिरांच्या सेवाही हिंदुस्थानात अगदी कमी किमतीत मिळतात. याउलट परदेशांत यंत्रसामुग्रीने तयार झालेल्या वस्तू स्वस्त मिळतात आणि ज्या वस्तूंच्या उत्पादनात माणसाचा हात म्हणून लागला असेल त्या मौल्यवान बनतात. नायलॉनचे शर्ट म्हणजे हिंदुस्थानात केवढी किमती चीज समजली जाते, परदेशांत तीच वस्तू दुकानादुकानात ढिगांनी टाकलेली असते. उलट, सुती कपडे मात्र सुंदर आवेष्टनात शोभिवंत पद्धतीने ठेवल जातात आणि मोठ्या चढ्या किमतीस विकले जातात.

माणसावर खर्च सर्वांत जास्त

मनुष्यबळ स्वस्त असल्यामुळे आपण परदेशी व्यापारपेठेत उभे राहू शकू, कसोशीने स्पर्धा करू शकू अशी अनेकाची समजूत आहे; पण ही कितपत खरी आहे? कोणत्याही वस्तूच्या उत्पादनात मजुरीवर खर्च किती झाला याचा तपास काढला तर स्वस्त मजुरीच्या हिंदुस्थानातील श्रमशक्तीवरचा खर्च सगळ्या जगात जास्त असेल.

स्वस्त; पण महागडी मजुरी

येथील मजुरीचे दर कमी आहेत; पण माणसे गबाळ, आळशी, कामचुकार त्यामुळे परदेशांतील कारखान्यांत एकटादुकटा मनुष्य जे काम सहज आटोपून टाकतो ते काम करायला आपल्याकडे अर्धा डझन माणसे, त्यांच्यावर एक पर्यवेक्षक, अर्धा हिशेबनीस, १/४ व्यवस्थापक, १/८ निदेशक इतकी पलटण लावावी लागते. ही गोष्टही काही नवी नाही, सर्वांना माहीत आहे; पण भारतात श्रमशक्तीचा खर्च इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे, ते मजुरांची उत्पादकता

कमी आहे या कारणाने नाही. हजेरी पुस्तकावर नाव असलेल्या आणि प्रत्यक्ष कामावर असलेल्या मजुरांचा खर्च जास्त असला तरी तो सोसवेल; पण प्रत्येक उत्पादकाच्या डोक्यावर सरकारी हजेरीपटावरचे अनेक लोक ठेवले गेले आहेत, त्यांचे काय?

द्राक्ष शेतकऱ्यांची बहादुरी

आठवड्यापूर्वीची गोष्ट. महाराष्ट्रातील द्राक्ष शेतकऱ्यांनी उत्पादनात क्रांती केली, एवढेच नाही तर द्राक्षांच्या निर्यातीतही मोठी झेप घेतली याचे मला मोठे कौतुक आहे. नाशिक जिल्ह्यातील द्राक्षाकरिता प्रसिद्ध असलेल्या एका गावी तेथील शेतकऱ्यांनी त्यांच्या गावी येऊन प्रत्यक्ष पाहण्याचे निमंत्रण दिले तेव्हा मोठ्या आनंदाने होकार दिला.

गावी गेलो, मळे फिरून पाहिले. वेलींना आधार देण्याकरिता लोखंडी मांडव घालण्याची पूर्वी पद्धत होती. त्याऐवजी आता तारेच्या खांबाप्रमाणे लोखंडी कोन लावून त्यावरील तारांच्या आधाराने वेली सोडल्या जातात. द्राक्षाचे उत्पादन जास्तीत जास्त यावे, त्याला माफक सूर्यप्रकाश मिळावा; पण सूर्याच्या दाहाने द्राक्षे फार पिवळी पडू नये म्हणून शेतकऱ्यांनी लोखंडी कोनाचे कित्येक वेगवेगळे आकार प्रयोगादाखल केले होते. अगदी लहानसहान तपशिलात जाऊन उत्पादन वाढवण्याचा, त्याची गुणवत्ता सुधारण्याचा आणि उत्पादनखर्च कमी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता.

निर्यातीची कर्मकथा

मळे पाहून झाल्यावर गावच्या सहकारी संस्थेत गेलो. तेथे तोडणीनंतर चारसहा तासांत द्राक्षे आणली जातात आणि त्यांचे तापमान शून्यावर आणले जाते. त्यानंतर ती शीतगृहात ठेवली जातात. पाठवण्यापूर्वी द्राक्षे पुठ्ठ्याच्या खोक्यांत भरून ते अवाढव्य कंटेनरमध्ये घालून मुंबई बंदरातून बोटीने दुबई, पॅरिस, लंडन अशा बाजारपेठांकडे रवाना होतात.

द्राक्षाच्या निर्यातीला कोणताही परवाना वगैरे लागत नाही, त्यामुळे दिल्लीला खेपा घालाव्या लागत नसणार आणि सगळे काम सोपे असणार अशी माझी कल्पना होती. परदेशांतील गिऱ्हाइके गाठणे, त्यांच्याकडून आवश्यक ते कागदपत्र पुरे करून घेणे हे तसे बिकटच काम आहे; पण कोणाही निर्यातदाराला त्याच्यापासून फारशी सुटका नाही; पण परवाना न लागणाऱ्या निर्यातीतसुद्धा किती गुंतागुंत असते ते डोळ्यांनी पाहायला मिळाले.

कंटेनर ट्रक आदल्या दिवशी यायचा होता, तो काल आला नाही म्हणून

सगळी मंडळी चिंतित होती. कंटेनरचा ट्रक मोठा महाग पडतो. त्याचा खोळंबा होऊ नये म्हणून माल भरण्यासाठी मजुरांची एक तुकडी आदल्या दिवसापासून कामावर घेतली होती. कंटेनरची वाट पाहत ही मंडळी विड्या, तंबाखू किंवा सावलीला झोपणे अशा कार्यक्रमात दंग होती.

अजब जकातदारी

कंटेनर वेळेवर येण्याची शाश्वती नाही, तो आल्यावर वेळ न दवडता माल भरला पाहिजे आणि माल भरण्याच्या वेळी जकात खात्याच्या इन्स्पेक्टरला हजर ठेवले पाहिजे. त्याच्या देखरेखीखालीच माल भरता येतो, एरवी नाही.

कंटेनर नाशिकला येऊन पोचल्याचा निरोप फोनवर मिळाला. लगेच एक जबाबदार माणूस गाडी घेऊन तालुक्याच्या शहराकडे रवाना झाला. जकात अधिकाऱ्याला तातडीने घेऊन येण्यासाठी. काही अडथळा येऊ नये म्हणून अधिकाऱ्याला देण्यासाठी द्राक्षाच्या काही पेट्या, बेदाण्याच्या दोन पिशव्या इत्यादी सामान गाडीत भरलेले माझ्या डोळ्यांनी बरोबर टिपले.

कंटेनर आल्यानंतर तासाभराने जकात अधिकारी आले. त्यांच्याबरोबर त्यांचे एक वरिष्ठ अधिकारीही आले. दोघा अधिकाऱ्यांच्या हातातील सत्ता फार मोठी आहे. द्राक्षाच्या तयार झालेल्या खोक्यांपैकी कोणतेही खोके पुन्हा उघडायला सांगायचा अधिकार त्यांना आहे. अशी कितीही खोकी ते उघडायला सांगू शकतात. खोकी उघडल्यानंतर तपासणीस पाहिजे तितका वेळकाढूपणा करू शकतात. द्राक्षाच्या नावाखाली दुसरेच काही पदार्थ पाठवले जात नाहीत ना याच्याविषयी सरकारच्या वतीने खात्री करून घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांनी मनात आणले तर सगळ्या मालाचे वाटोळे होईपर्यंत ते तपासणी चालू ठेवू शकतात आणि मनात आणले तर नुसती सही करूनही हिरवा कंदील दाखवू शकतात.

एक दोन एकर बागायत असलेल्या शेतकऱ्यांचे प्राण कंठाशी आलेले असतात. म्हणून ते मोठ्या अदबीने त्यांना घेऊन येतात. तपासणीसाठी जितका वेळ लागेल त्यासाठी जकात खात्यास ६० रुपये ताशी आणि आणखी कोणी वरिष्ठ अधिकारी असेल तर त्याची वेगळी फी द्यावी लागते. खात्याला जेवढी रक्कम देणे असेल त्याच्या निम्म्याच रकमेची पावती करून उरलेली रक्कम बिगर पावतीची रोख घेण्यास अधिकारी तयार असतात. सगळे पैसे अधिकृतपणे पावती घेऊन द्यायचा आग्रह धरला तरी अधिकारी 'नाही' म्हणत नाहीत; पण त्यानंतर सगळी तपासणी मोठी कसोशीची आणि दिरंगाईने होऊ लागते. त्यामुळे

शेतकरी अधिकाऱ्यांना नाखुष करण्यास अजिबात तयार दिसले नाहीत.

कोकेन शोधाचे रामायण

द्राक्षांच्या खोक्याची आणि कंटेनरची तपासणी करण्याचे एवढे काय महत्त्व आहे, हे माझ्या लक्षात येईना. परदेशांतून येणाऱ्या कंटेनरमध्ये कोणी लपवून, चोरून माल आणण्याचा प्रयत्न करील हे समजण्यासारखे आहे; पण हिंदुस्थानातून लपवून बाहेर कोणता माल नेण्यात कोणाला स्वारस्य असेल, हे काही माझ्या लक्षात येईना. जकात अधिकाऱ्यांना मी कुतूहलाने विचारले, सगळ्या जगाची चिंता आपल्याच खांद्यावर पडल्याच्या अविर्भावात. त्याने उत्तर दिले, "हिंदुस्थानातून कोकेनची मोठी वाहतूक होते ना?" त्यानंतर कोकेनची चोरटी वाहतूक, कोकेनचा जागतिक त्रिकोण इत्यादी गोष्टींबद्दल शेतकऱ्यांच्या खर्चाच्या वेळाने मला प्रशिक्षित करण्याचा त्याचा विचार दिसला; पण शेतकऱ्यांनी मला काढून बाजूला नेले.

नाशिक जिल्ह्यातील द्राक्षांच्या पेट्यांतून कोकेन परदेशी पाठवायचे असेल तर ते नाशिक जिल्ह्याबाहेरून यायला हवे. नाशिक जिल्ह्यात मादक द्रव्ये येत येत असतील तर त्यावर देखरेख ठेवणे जकात खात्यास सहज शक्य आहे. अशी तस्करी करणारे कोण? त्यांचे संबंध कोठे आहेत? त्यांच्या हालचाली कशा चालू आहेत? यावर डोळ्यात तेल घालून देखरेख ठेवायला पाहिजे; पण असली कामे करणे भारतातील सरकारी अधिकारी कमीपणाचे समजतात. अधिकाऱ्यांचे काम म्हणजे समोर लीनपणे, लाचारपणे येऊन उभ्या राहणाऱ्या रयतेवर खेकसणे, त्यांच्याकडून भरभक्कम खंडणी उकळणे आणि मोठ्या मेहरबानीच्या अभिनिवेशाने सही देणे हे सरकारी नोकरांचे काम आहे. आजपर्यंत एकाही ठिकाणी द्राक्षाच्या एकाही पेटीतून कोकेनचा एक कणही कोठे जाताना सापडला नाही; पण तरीही तपासणी नियमितपणे पार पाडली जाते, तपासणीची गरज आहे म्हणून नव्हे, तर अधिकाऱ्यांच्या उत्पन्नाचे साधन आहे म्हणून.

अशाच तऱ्हेची तपासणी बंदरावर पुन्हा एकदा होऊ शकते. बोटीचा कप्तान आपल्या बोटीवर माल चढवण्याआधी, काही काळेबेरे नाही ना याची यात्री करून घेण्यासाठी पुन्हा एकदा तपासणी करू शकतो. मालाचा विमा करणारे म्हणजे सरकारी अधिकारीच. मोकळे डबे पाठवून खोटा विमा उतरवला जात नाही ना? हे पाहणे त्यांचे परम कर्तव्यच आहे. कागदावर दाखवलेल्या मालापेक्षा जास्त पाठवून परकीय चलनाची कमाई लपवली तर जात नाही ना? हे पाहण्यात इतर अनेक खात्यांच्या अधिकाऱ्यांना खूपच रस आहे. कंटेनर पोटात घेऊन

बोट बंदरापासून हलली म्हणजे निर्यातदार हुश्श करतात. व्याही आणि जावयांच्या सगळ्या मागण्यांना तोंड देता देता मुलगी एकदा सासरी रवाना झाल्यावर बापाला हलके वाटावे तशी निर्यातदार शेतकऱ्यांची स्थिती होते. सासरी पाठवणी झाली म्हणजे सगळ्या चिंता मिटल्या असे नाही; पण ती चिंता उद्या माल ठीक पोचेल की नाही? तपासणीच्या दिरंगाईत उष्णतापमान वाढल्याने सगळा माल नासून तर जाणार नाही ना? तसे झाले तर काय होईल? याची धास्ती प्रत्येकाच्या मनात असतेच; पण निदान आजची चिंता मिटली याचे समाधान.

निर्यात थोपवणाऱ्या फौजा

द्राक्षाच्या निर्यातीला परवाना लागत नाही तरीही इतकी परवड! ज्या वस्तूंच्या निर्यातीकरिता परवाना लागतो तेथे याशिवाय १९ वेगवेगळ्या खात्यांकडून कागदपत्र मिळवावे लागतात आणि प्रत्येक ठिकाणी प्रत्येक वेळी अधिकाऱ्याचे हात ओले करावे लागतात. द्राक्षाच्या मळ्यावर खत वापरताना, माणसे नेमताना, पैशापैशाचा हिशेब करणारे शेतकरी निर्यात करायची म्हटली, की मजबूर होऊन त्या सगळ्या ठगांच्या हाती सापडतात. या नोकरदारांवर जो खर्च करावा लागतो तो लक्षात घेतला तर मजुरीचा खर्च इतर कोणत्याही देशातल्यापेक्षा जास्तच होतो.

देशाच्या अंदाजपत्रकाच्या दोनतृतीयांश भाग सरकारी नोकरदारांच्या पगारावर जातो. त्याकरिता उत्पादकांना कर भरावे लागतात. पगारदार नोकरांकडून काम व्हावे म्हणून त्यांना खुश करण्यासाठी बक्षिसीही द्यावी लागते. यातील बहुतेक अधिकाऱ्यांची वरकमाई पगाराच्या कित्येकपट. एवढे ओझे शिरावर घेतलेला भारतातील उत्पादक आणि निर्यातदार डॉ. मनमोहनसिंगांनी रुपया परिवर्तनीय केला म्हणून धडाक्यात निर्यात करून, परकीय चलन कमावण्याच्या कामाला लागेल आणि देश वाचवेल ही शक्यताच नाही. महाप्रचंड खर्च करून अधिकाऱ्यांची मोठी फौज केवळ उत्पादकांना हैराण करण्यासाठी पोसली जाते. सगळी संबंधित सरकारी खाती बंद केल्याखेरीज यशस्वीपणे निर्यात करणे अशक्यप्राय आहे.

(१९ मार्च १९९३)

■■

राजनीती आली माहेराला

राजकारणाची प्रेरणा कोणती? कोणत्याही देशातील सरकारी धोरणांचे स्वरूप कसे काय ठरते? या विषयावर सिद्धांत अनेक आहेत. राजांची कारकीर्द इतिहास ठरवतो की राजे इतिहास बनवतात? याबद्दल संशय बाळगण्याचे कारण नाही, राजेच इतिहासाची दिशा ठरवतात. या अर्थाचे जुने संस्कृत वचन आहे. राजांचे कर्तृत्व ही एक नजरभूल आहे. कोणताही राजा इतिहासातील एक भूमिकाच बजावत असतो असे आता सर्वमान्य आहे.

राजसत्ता तोफेच्या नळीतून उद्‌भवते असा माओ त्से तुंगचा एक विचार आहे. तोफेची नळी असो, तलवारीचे पाते असो, धनुष्यबाण असो, बंदुका असोत, की प्रचंड पल्ल्याची महाविनाशी क्षेपणास्त्रे असोत सरकार म्हणून जे काही आहे त्याची ताकद शेवटी लष्करी सामर्थ्यात आहे यात काहीच शंका नाही. केवळ उदार दृष्टिकोन, जनकल्याणाची इच्छा आणि न्यायबुद्धी या आधाराने सरकार टिकत नाही. हाती शस्त्रसामर्थ्य असले तर अगदी रानटी टोळ्या आणि खलपुरुषसुद्धा सज्जन सरकारे क्षणार्धात उलथवून टाकू शकतात. हे इतिहासात घडले आहे, आजही दर दिवशी घडते आहे.

राजसत्तेची उत्क्रांती मुळातच दरोडेखोरीतून झालेली असल्यामुळे ती आजही शस्त्रसामर्थ्यावर आधारलेली असावी हे साहजिक आहे. रानावनात फिरून फळे, कंदमुळे गोळा करणाऱ्या आणि शिकार करणाऱ्या मनुष्याच्या पूर्वजांच्या काळात टोळ्या होत्या आणि टोळ्यांचे आधिपत्य टोळीतील स्त्रियांकडे होते. मुलांना जन्म देऊन टोळीचे सातत्य राखणे ही जबाबदारी आणि मिळालेल्या अन्नाचे वाटप ही दैनंदिन जबाबदारी दोन्ही स्त्रियांकडेच होत्या. निसर्गक्रमाला अडथळा न आणता, त्यातील दोष दूर करून जनांचे सुखसमाधान वाढवण्याची व्यवस्था असलेले पहिले 'सरकार' टोळीच्या कालखंडाबरोबरच संपले.

लुटारू राजे

बैलाला वेसण घालून शेतीची सुरुवात झाली आणि शेतावर राबणाऱ्यांच्या पोटाच्या गरजा भागून उरेल असे धान्य खळ्यावर पडू लागले. तेव्हापासून धान्याच्या राशींच्या लुटालुटीला सुरुवात झाली. जमीन, पाणी, हवा आणि सूर्यप्रकाश यांनी औदार्याने शेतकऱ्याच्या हाती दाण्याचा गुणाकार करण्याचा चमत्कार ठेवला; पण हा गुणाकार हाती पडायला वर्षभराचे कष्ट लागत. दरोडेखोरीचा व्यवसाय त्याहीपेक्षा घबाड हाती देणारा आणि तेही एका दिवसात. साहजिकच दरोडेखोरांची संख्या वाढली. दरोडेखोर टोळ्यांच्यात एकमेकांत सतत लढाया होऊ लागल्या विजेत्या टोळ्यांनी एका एका प्रदेशावरती आपला अंमल बसवला; तेव्हापासून मुलूख, सुभा, देश आणि राष्ट्र इतिहासात अवतरले. आता दरोडेखोर राजांना स्वत:च्या प्रदेशात दरोडे घालण्याचे फारसे काम राहिले नाही. मुलूखगिरी करायची ती दुसऱ्या दरोडेखोरांच्या प्रदेशात. आपल्या मुलुखात दुसऱ्या दरोडेखोरांना घुसू द्यायचे नाही, आपल्या प्रदेशातील रयतेचे थोडेफार सभ्यपणे आणि इतर राज्यातील जनतेचे धन आणि प्राण अनिर्बंधपणे हरण करणे ही राजसत्तेची कामगिरी होती. जुन्या दरोडेखोरीच्या व्यवसायाला अंतर्गत व्यवहारात सभ्य स्वरूप आले. खळ्यावरील लूट बंद पडली, त्या जागी महसुलाची व्यवस्था आली. जाणाऱ्यायेणाऱ्यांना धाडी घालून लुटण्याऐवजी त्यांच्यावर जागोजागी जकात बसवण्याची व्यवस्था आली. थोडक्यात टोळीच्या कालखंडातील जनकल्याणी स्त्रीशासनाऐवजी निसर्गक्रमाशी विपरीत असे संपत्तीचे वाटप शस्त्रास्त्रांच्या बळावर लादणारी पुरुषसत्ताक शासन व्यवस्था आली.

राजकारणाचा अर्थकारणाशी अतूट संबंध आहे. अर्थशास्त्राच्या सुरुवातीच्या काळात त्याचे नावच मुळी राजकीय अर्थकारण असे होते.

शेतकरी, बलुतेदार, व्यापारी यांनी संपत्तीचे उत्पादन करावे आणि त्यातील एक मोठा हिस्सा सिंहासनावर बसणाऱ्या आणि छत्रचामराचे ढाळवून घेणाऱ्या दरोडेखोरांनी काढून घ्यावा अशी व्यवस्था उभी राहिली. राजाला कर दिल्याने निदान आपले इतर दरोडेखोरांपासून तर संरक्षण होते ना अशा विचाराने रयतेनेही त्या व्यवस्थेशी जुळवून घेतले. तसे त्यांना काही गत्यंतरही नव्हते. आम लोकांकडून विटंबना होण्यापेक्षा एकाच नवऱ्याकडून काय हाल होतील ते सोसावे अशी स्त्रियांची भावना असते, तशीच रयतेची.

शेतकरी आणि शहरी सत्ता

पहिल्या काळात राजांचे साथीदार शेतकऱ्यांकडून महसूल वसुली करणारे

देशमुख, सरदेशमुख, ग्रामीण वतनदार असत. ते स्वत: फौजफाटा बाळगीत. वरच्या राजाचे सार्वभौमत्व मान्य केले, त्याला वर्षातून त्याचा वाटा पाठवला आणि लढाईच्या काळात मदतीसाठी फौज पाठवली म्हणजे राहिलेल्या वेळात त्यांच्या वतनात वाटेल तो धुमाकूळ घालण्याची त्यांना मुभा असे.

कारखानदारीचा उगम झाला, शहरात उद्योगधंद्यांची वाढ होऊ लागली. यंत्र आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने पंचमहाभूतापेक्षासुद्धा मोठा गुणाकार घडवता येतो हे दिसून आल्यावर ग्रामीण वतनदारांचे महत्त्व संपुष्टात येऊ लागले. त्यांची जागा शहरी घेऊ लागले. इंग्लंडमधील उमरावांच्या सभागृहापेक्षा जनसामान्यांच्या सभागृहास प्राधान्य मिळाले ते याच काळात.

यानंतर राजकारणाच्या नाड्या कोणाच्या हाती गेल्या हे समजणे कठीण होत जाते. डोंगरावर चढून आसमंताचे निरीक्षण केल्यावर प्रदेशाची ठेवण अधिक चांगली लक्षात येते. तसे दूर भूतकाळातल्या घटनांचा अर्थ समजणे सोपे असते. प्रचलित राजकारणाचा अर्थ स्पष्टपणे कळणे त्यामानाने दुष्कर. जंगलात हरवलेल्या माणसाला झाडे दिसतात. जंगल नाही, तसा हा प्रकार.

शेतकरी-कष्टकऱ्यांचा पराभव

शहरी उमरावांच्या वाढत्या प्रभुत्वाविरुद्ध आणि चैनबाजीबद्दल प्रत्येक देशात कमीअधिक उठाव झाले आहेत. फ्रान्समधील राज्यक्रांती हे त्यातले सर्वांत जगप्रसिद्ध उदाहरण; पण शेतकऱ्यांची ही क्रांती दोन दशकेसुद्धा टिकली नाही.

जग नुसते समजून घेणे पुरेसे नाही, ते बदलण्याची आवश्यकता आहे या निर्धाराने मार्क्सने एक भलताच धाडसी कार्यक्रम हाती घेतला. सरकार म्हणजे नाहीतरी दरोडेखोरीच आहे. सरकार आपल्या परिवारातील लोकांच्या फायद्याकरिता सभ्यासभ्य दरोडे घालते. हेच तंत्र जाणीवपूर्वक वापरून बहुसंख्य जनसामान्यांच्या फायद्याकरिता का वापरू नये? मार्क्सच्या अनुयायांनी कामगार ही राजकारणाची प्रेरणा ठरवली. त्याचे अपयश आता जगसिद्ध झाले आहे.

कोणत्याही देशात शेतकरी आणि कामगार हा संख्येने सर्वांत मोठा विभाग असतो. ज्या देशात निवडणुका होतात त्या देशात तरी शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे प्रभुत्व राजकारणावर दिसायला पाहिजे; पण शेतकरी आणि कामगार हे दोन्ही वर्ग धोरणांची दिशा ठरवण्यात अजिबात प्रभावी झालेले दिसत नाहीत.

भूखंडांचे राजकारण

सरकारी धोरणावर सर्वांत जास्त प्रभाव कुणाचा दिसतो? निदान भारतात तरी काय परिस्थिती आहे?

राज्य पातळीवर आज मोठा प्रभाव भूखंडाचे व्यवहार करणारे आणि बांधकाम णारे यांचा दिसतो. खेडी ओस पडत चालली आहेत. लोक जगण्याकरिता राकडे धाव घेत आहेत. काही नाही तरी डोक्यावर छप्पर असण्याची गरज हे. त्यामुळे शहरात बांधकाम हा मोठा फायद्याचा व्यवसाय झाला आहे. खुद्द कामात काही फारसा फायदा होत नाही. या धंद्यातील फायदा जमिनीच्या हारात असतो. कायद्याच्या कचाट्यात सापडलेल्या जमिनी स्वस्तात संपादन णे, सरकारातील वशिल्याने त्या मोकळ्या करून घेणे हा धंद्याचा गाभा . अशा मोकळ्या झालेल्या जमिनी, परीस लावल्याने लोखंडाचे सोने व्हावे माणे, सरकारी शिक्का लागताच मातीमोलाऐवजी अक्षरश: सोन्याच्या त. सरकारी शिक्का उमटवण्याचे काम सत्तारूढ पुढारीच करू शकतात, मुळे बिल्डर आणि पुढारी यांचे मोठे साटेलोटे जमले आहे. भूखंडाचे संपादन सरकारातील नेत्यांची आणि म्हणून सरकारी धोरणाची महत्त्वाची प्रेरणा ही आहे.

तस्करांचा प्रभाव

नेहरू नियोजनव्यवस्थेत आयातीवरील निर्बंधामुळे दोन मोठे ताकदवान र्थिक गट पुढे आले आहेत. पहिला गट, खुलेआम तस्करी करणाऱ्यांचा. गळ्या मार्गांनी तस्कर मंडळी परदेशांतील माल इथे आणतात. या मालाला ड मागणी आणि किंमत आहे म्हणून फायदा भरपूर आहे; पण हा धंदासुद्धा कारी सहकार्याखेरीज चालू शकत नाही. झालेल्या तस्करीवर अनुमतीचा धिकृत शिक्का उठवण्याची गरज नसते. तस्करीच्या व्यवहाराकडे सरकारी णेने थोडी डोळेझाक केली म्हणजे तस्करी बिनबोभाट चालू शकते. या डेझाकीचा योग्य तो मेहनताना राजकीय पुढाऱ्यांना पोचवला म्हणजे सगळे ही सुव्यवस्थित चालते. तस्करी तसा मोठ्या जोखमीचा धंदा आहे. भांडवली णूकही मोठ्या प्रमाणावर करावी लागते. आंतरराष्ट्रीय वाहतुकीची साधने, ची ने-आण करण्यासाठी जिवावर उदार झालेल्या प्रशिक्षित तस्करांच्या या हत्यारापात्यारासहित पदरी बाळगाव्या लागतात. पूर्वीच्या काळातील दारांच्या फौजा वतनाच्या प्रदेशात जसा धुमाकूळ घालत त्याचप्रमाणे करांच्या या पलटणी फावल्या वेळात हातभट्टी, मादक पदार्थांची वाहतूक, मारीच्या सुपाऱ्या इत्यादी कामांत गर्क असतात. त्यांच्या या व्यवहाराकडे, ळा असो नसो पुढाऱ्यांनाही दुर्लक्ष करावे लागते आणि साहजिकच सरकारी ला तस्करांच्या इच्छेविरुद्ध जाण्याची ताकद नसते आणि इच्छाही नसते.

तस्कर गुंडांच्या टोळया अनेक असतात, त्यांच्यातही लढाया चालू असतात. इटली, अमेरिकेसारख्या देशांतील माफियांप्रमाणे प्रत्येक टोळीला सत्तेच्या आसपास असलेल्या कोणाचा तरी आधार लागतो. एक टोळी सत्तारूढ पक्षाजवळ गेली तर दुसरी टोळी विरोधी पक्षाकडे जाते. विरोधी पक्ष अस्तित्वात नसेल तर नव्याने एखादा सज्जड विरोधी पक्ष उभाही केला जाऊ शकतो.

आयातीवरील निर्बंधामुळे तस्कराखेरीज आणखी एक मोठा प्रबळ गट उभा राहिला आहे. सरकारकडून संमतीचा अधिकृत ठसा उमटवून घेऊन राजरोस उजळ माथ्याने माल आयात करून, मक्तेदारीने मुनाफा कमावणे हा आणखी एक मोठा धंदा. सरकारात घनिष्ठ लागेबांधे असल्याखेरीज ही उजळमाथ्याची तस्करी संभवत नाही. उजळ माथ्याच्या तस्करांकडून पुढारी खुलेआम देणग्या मागून घेऊ शकतात.

सत्तेचा मद आणि मादकांची सत्ता

राजकीय सत्तेवर प्रभाव पाडणाऱ्या आणखी एका मादक पदार्थाच्या वाहतुकीच्या आंतरराष्ट्रीय, राजमार्गावर भारत आहे. हिमालयाच्या पायथ्याशी मातीमोल भावाने विकली जाणारी वनस्पती युरोपीय किंवा अमेरिकी शहरात पोचली म्हणजे झटक्यात सोन्याच्या नाही रेडियमच्यादेखील शतपटीने मोलाची बनते. भूखंड तस्करीसारखा हा धंदाही चोरीचा; पण या धंद्यात सरकारी मान्यतेचा शिक्का उठवणे शक्य नाही. एवढेच नाहीतर, मादक पदार्थांच्या व्यापाराकडे डोळेझाक करणेही शक्य नाही. मान्यताप्राप्त सरकारी सहकार्य दुर्लक्ष असल्यामुळे गांजा, चरसाच्या तस्करांना प्रति सरकारे उभारावी लागतात.

मठ आणि एके-४७

संरक्षण मिळण्यासाठी जागोजाग अध्यात्माचा, धर्माचा किंवा एखाद्या बाबामहाराजांचा आश्रय घेऊन मठ स्थापावे लागतात. हजारो एकरांची जागा आल्यागेल्याच्या दृष्टीपलीकडे संपादन करावी लागते. आलिशान मोटारी, विमाने, अगदी जंबोजेटचे ताफेसुद्धा बाळगावे लागतात. पाचदहा वर्षांच्या अल्पकाळात एखादा बाबा आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून गेला, त्याच्या अवतीभोवती साधनांची रेलचेल दिसली, की येथे बाबांच्या भारून टाकणाऱ्या व्यक्तिमत्त्वापलीकडे आणखी काही 'मादक' आहे असे गृहीत धरावे.

सरहद्दीच्या प्रदेशात मादक तस्करीसाठी केवळ मठस्थापना करून भागत नाही, तेथे समांतर सरकारच स्थापावे लागते. आधुनिक शस्त्रास्त्रे आणि साधनसामग्री आणून बेछूट दहशतवादाचे वातावरण तयार करावे लागते. सरकार

आव्हान देणारी फुटीर चळवळ आणि त्याबरोबर एके-४७ सारख्या स्वयंचलित बंदुका दिसल्या, की या चळवळीची खरी आर्थिक प्रेरणा मादक पदार्थांच्या तस्करीची आहे अशी खूणगाठ बांधायला हरकत नाही.

रहाटगाडगे चालूच

शेतकऱ्यांचे प्रमाण लोकसंख्येत ७०% आहे. आजही शेतीत गुणाकार होतो; पण शेतीक्षेत्राचा प्रभाव नगण्य आहे. संघटित कामगारांचा प्रभाव, त्यांची संख्या कमी असली तरी त्यामानाने अधिक आहे. राजकारणावर खरा प्रभाव गुंड मुदांचा झाला आहे. भूखंड, तस्करी, मक्तेदारी आणि मादक पदार्थांचा व्यापार याचे अर्थकारण राजकारणाची दिशा ठरवते आहे.

अर्थकारणात गुणाकार शेतीने आणला, त्या काळात शेतीने राजकारण ठरवले, कारखानदारीतील फायदा वरचढ असल्यामुळे तिने राजकारणाचे सूत्रचालन काही काळ केले. आज फायद्याची टक्केवारी गुन्हेगारी क्षेत्रात सर्वाधिक आहे, त्यामुळे राजकारणाची दिशा आणि प्रेरणा बहुजनांत नाही, गुन्हेगारीत आहे. स्वत्वाचा शेतकरी नाही, व्यापारी नाही, कारखानदार नाही, या कोणापेक्षा मस्त खंडणी देऊ शकणारे सरकार ताब्यात घेऊन बसले आहेत, दरोडेखोरीतून जमी राहिलेली शासनव्यवस्था पुन्हा आपल्या माहेरी आली आहे.

(२५ मार्च १९९३)

■■

तस्कर गुंडांच्या टोळ्या अनेक असतात, त्यांच्यातही लढाया चालू असतात इटली, अमेरिकेसारख्या देशांतील माफियांप्रमाणे प्रत्येक टोळीला सत्तेच्या आसपास असलेल्या कोणाचा तरी आधार लागतो. एक टोळी सत्तारूढ पक्षाजवळ गेली तर दुसरी टोळी विरोधी पक्षाकडे जाते. विरोधी पक्ष अस्तित्वात नसेल तर नव्याने एखादा सज्जड विरोधी पक्ष उभाही केला जाऊ शकतो.

आयातीवरील निर्बंधामुळे तस्कराखेरीज आणखी एक मोठा प्रबळ गट उदय राहिला आहे. सरकारकडून संमतीचा अधिकृत ठसा उमटवून घेऊन राजरोस उजळ माथ्याने माल आयात करून, मक्तेदारीने मुनाफा कमावणे हा आणखी एक मोठा धंदा. सरकारात घनिष्ठ लागेबांधे असल्याखेरीज ही उजळमाथ्याची तस्करी संभवत नाही. उजळ माथ्याच्या तस्करांकडून पुढारी खुलेआम देणग्या मागून घेऊ शकतात.

सत्तेचा मद आणि मादकांची सत्ता

राजकीय सत्तेवर प्रभाव पाडणाऱ्या आणखी एका मादक पदार्थाच्या वाहतुकीचा आंतरराष्ट्रीय, राजमार्गावर भारत आहे. हिमालयाच्या पायथ्याशी मातीमोल भावाने विकली जाणारी वनस्पती युरोपीय किंवा अमेरिकी शहरात पोचली म्हणजे झटक्यात सोन्याच्या नाही रेडियमच्यादेखील शतपटीने मोलाची बनते. भूखंड तस्करीसारखा हा धंदाही चोरीचा; पण या धंद्यात सरकारी मान्यतेचा शिक्का उठवणे शक्य नाही. एवढेच नाहीतर, मादक पदार्थांच्या व्यापाराकडे डोळेझाक करणेही शक्य नाही. मान्यताप्राप्त सरकारी सहकार्य दुर्लक्ष असल्यामुळे गांजा, चरसाच्या तस्करांना प्रति सरकारे उभारावी लागतात.

मठ आणि एके-४७

संरक्षण मिळण्यासाठी जागोजाग अध्यात्माचा, धर्माचा किंवा एखाद्या बाबामहाराजांचा आश्रय घेऊन मठ स्थापावे लागतात. हजारो एकरांची जागा आल्यागेल्याच्या दृष्टीपलीकडे संपादन करावी लागते. आलिशान मोटारी, विमाने अगदी जंबोजेटचे ताफेसुद्धा बाळगावे लागतात. पाचदहा वर्षांच्या अल्पकाळात एखादा बाबा आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवून गेला, त्याच्या अवतीभोवती साधनांची रेलचेल दिसली, की येथे बाबांच्या भारून टाकणाऱ्या व्यक्तिमत्त्वापलीकडे आणखी काही 'मादक' आहे असे गृहीत धरावे.

सरहद्दीच्या प्रदेशात मादक तस्करीसाठी केवळ मठस्थापना करून भागत नाही, तेथे समांतर सरकारच स्थापावे लागते. आधुनिक शस्त्रास्त्रे आणि इतर साधनसामग्री आणून बेछूट दहशतवादाचे वातावरण तयार करावे लागते. सरकारला

आव्हान देणारी फुटीर चळवळ आणि त्याबरोबर एके-४७ सारख्या स्वयंचलित बंदुका दिसल्या, की या चळवळीची खरी आर्थिक प्रेरणा मादक पदार्थांच्या तस्करीची आहे अशी खूणगाठ बांधायला हरकत नाही.

रहाटगाडगे चालूच

शेतकऱ्यांचे प्रमाण लोकसंख्येत ७०% आहे. आजही शेतीत गुणाकार होतो; पण शेतीक्षेत्राचा प्रभाव नगण्य आहे. संघटित कामगारांचा प्रभाव, त्यांची संख्या कमी असली तरी त्यामानाने अधिक आहे. राजकारणावर खरा प्रभाव गुंड मवालदांचा झाला आहे. भूखंड, तस्करी, मक्तेदारी आणि मादक पदार्थांचा व्यापार यांचे अर्थकारण राजकारणाची दिशा ठरवते आहे.

अर्थकारणात गुणाकार शेतीने आणला, त्या काळात शेतीने राजकारण ठरवले, कारखानदारीतील फायदा वरचढ असल्यामुळे तिने राजकारणाचे सूत्रचालन काही काळ केले. आज फायद्याची टक्केवारी गुन्हेगारी क्षेत्रात सर्वाधिक आहे, यामुळे राजकारणाची दिशा आणि प्रेरणा बहुजनांत नाही, गुन्हेगारीत आहे. स्वत्वाचा शेतकरी नाही, व्यापारी नाही, कारखानदार नाही, या कोणापेक्षा जास्त खंडणी देऊ शकणारे सरकार ताब्यात घेऊन बसले आहेत, दरोडेखोरीतून आली राहिलेली शासनव्यवस्था पुन्हा आपल्या माहेरी आली आहे.

(२५ मार्च १९९३)

■■

समाजवादाला डच्चू

या दिवसात कुणाची काय खटली बाहेर येतील ते सांगणे कठीण आहे. एकमेकांची लफडी बाहेर काढण्यात जवळपासच्या गोटातील लोकांनाच स्वारस्य असले म्हणजे काय वाटेल ते होऊ शकते. पप्पू कलानीने बारामतीच्या एका ट्रस्टला ३० लाख रुपयांची देणगी दिल्याचे बाहेर आले आहे, अर्जुनसिंग यांची तर अनेक प्रकरणे वर्तमानपत्रांत छापून येत आहेत. राज्यकर्त्यांतील कोणाचेही पूर्ण चारित्र्य जगजाहीर झाल्यास सत्तेवर राहणे त्याला शक्य होणार नाही. ते सगळेच 'तेरी भी चूप मेरी भी चूप' धोरण चालवतात, तोपर्यंत सरकार टिकेल. त्यातील कोणीही फार कोपऱ्यात ढकलला गेला तर अनेक प्रकरणांचा स्फोट करून सगळे राजकीय चित्रच उलटवून टाकू शकतो. सुरुंग पेरलेल्या भूमीवरून चालावे तसेच सत्तेतील पुढारी सावधपणे चालतात. कधी पायाखाली सुरुंग उडेल आणि जवळपासच्या सर्वांना उद्ध्वस्त करील सांगणे कठीण!

निवडणूक आज होवो की उद्या होवो की ठरल्याप्रमाणे पुऱ्या मुदतीनंतर होवो, एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहणार आहे, या निवडणुकांत भाग घेण्याचा अधिकार कायद्याप्रमाणे आणि घटनेतील तरतुदीप्रमाणे कोणत्याच राष्ट्रीय म्हणवणाऱ्या पक्षाला नाही.

'ध' चा 'मा'

१९७७ मध्ये आणीबाणीच्या काळात घटनेत ४२ वी दुरुस्ती करण्यात आली. या दुरुस्तीची विशेषता अशी, की बदल घटनेच्या मुसुद्यात नव्हता तर घटनेच्या प्रास्ताविकातच होता. खरे म्हटले तर १९५० मध्ये भरतीय लोकांनी भारतात एक 'सार्वभौम प्रजासत्ताक गणतंत्र' स्थापन करण्याचा निश्चय या प्रास्ताविकाद्वारे घोषित केला आणि नागरिकांना काही मूलभूत हक्काची शाश्वती दिली. प्रास्ताविक हा ऐतिहासिक दस्तावेज आहे. त्यात बदल करणे म्हणजे आनंदीबाई पेशव्यांनी

'नारायणरावाला धरावे' हा मजकूर बदलून त्याऐवजी 'नारायणरावाला मारावे' असा बदल करण्यासारखे आहे; पण इंदिराबाईंनी ते केले. इतिहासात नाव अजरामर व्हावे असे बरेच गुण आणि पुष्कळसे भाग्य इंदिराबाईंच्या वाट्याला आले होते; पण त्यापलीकडे इतिहासावर आपला ठसा उमटवावा आणि तो पूर्वलक्षी परिणाम देऊन उठवावा अशी बाईंची मोठी तळमळ असे.

इंदिराबाईंनी प्रास्ताविकात बदल केला आणि १९५० सालच्या लोकांच्या तोंडी १९७७ मध्ये नवे शब्द कोंबले आणि भारत केवळ सार्वभौम प्रजासत्ताकच नव्हे तर समाजवादी आणि निधार्मिक गणतंत्र बनवण्याचा निश्चय त्यांच्यावर लादला.

निवडणुकांचा वध

या घटना दुरुस्तीचा परिणाम मोठा गमतीशीर झाला. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१, कलम २९-अ, अन्वये निवडणूक आयुक्त पक्ष म्हणून मान्यता देतो. या कलमाच्या परिच्छेद ५ मध्ये तरतूद अशी आहे, की इच्छुक पक्षांची भारतीय घटनेशी आणि समाजवाद, निधार्मिकता व लोकशाही या तत्त्वांशी निष्ठा असली पाहिजे. त्या अर्थाचे प्रतिज्ञापत्र इच्छुक पक्ष निवडणूक आयोगासमोर सादर करतात. पुष्कळ वर्षे या तरतुदीकडे कुणी गंभीरपणे पाहिले नव्हते.

शिवसेनेची मग्रुरी

१९८८-८९ मध्ये शिवसेनेने राजकीय पक्ष म्हणून मान्यतेसाठी अर्ज केला. शिवसेनेचे नेते देशभर आपल्या हिंदुत्वाचा गर्व मिरवत असतात. एवढेच नाही तर आपला विश्वास लोकशाहीवर नसून 'ठोकशाही'वर आहे अशी फुशारकी मारत असतात; पण निवडणूक आयोगासमोर शिवसेनेची निधार्मिकता आणि लोकशाही या तत्त्वावर निष्ठा असल्याचे त्यात शपथपूर्वक म्हटले. त्या आधारे शिवसेनेला राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली आणि निवडणूक चिन्हही मिळाले. दुसऱ्याच दिवसापासून शिवसेनेच्या नेत्यांनी जाहीररीत्या बढाई मारण्यास सुरुवात केली. "निवडणूक आयोगासमोर आपण खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले. आपला हिंदुत्वावरच विश्वास आहे, निवडणूक चिन्ह मिळवण्याकरिता अशी चलाखी करावी लागते."

कायदा जागा होऊ लागला

निवडणूक आयोग मूग गिळून गप्प बसला, शिवसेनेविरुद्ध त्यांनी काहीही कारवाई करण्याची हिंमत दाखवली नाही. अडवाणींच्या रामरथ यात्रेच्या वेळी भारतीय जनता पार्टीचे निवडणूक चिन्ह रथावर लावलेले होते, हा निधार्मिकतेचा

भंग आहे अशी तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली; पण हा प्रश्न आयोगाच्या कक्षेबाहेरचा आहे असे ठरवून निवडणूक आयोग मोकळा झाला.

लोकप्रतिनिधित्व कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली ती पंजाबमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकीत. ज्यांचा भारताच्या एकात्मतेवर विश्वास नाही अशांना निवडणुका लढवता येऊ नयेत अशी व्यवस्था करण्यात आली. कलम २९-अ, परिच्छेद ५, इतके दिवस झोपलेला आता अमलात येऊ लागला.

केले तुकां, झाले माकां

६ डिसेंबरनंतर काही जातीय संघटनांवर बंदी आली. निवडणूक कायद्याचा वापर करून भारतीय जनता पार्टी आणि इतर जातीयवादी पक्षांना निवडणुकीकरिता दिलेली मान्यता काढून घेता येईल का, याचा अभ्यास गृहमंत्रालयात चालू आहे. धर्मवादी आणि जातीय पक्षांना या कलमाद्वारे निवडणुकीतून बाहेर ठेवण्यात आले तर आणखी दुसरे काय परिणाम होतील हे सांगणे कठीण आहे. 'केले तुकां, झाले माकां' या कोकणी म्हणीप्रमाणे हा डाव राज्यकर्त्या इंदिरा काँग्रेसवर शेकणार आहे. वर सांगितलेल्या परिच्छेद ५ मध्ये ज्या तत्त्वांशी निष्ठा राखण्याचा आग्रह आहे, त्यात निधार्मिकतेबरोबर समाजवादाचीही गणना आहे. काँग्रेस पक्ष, आपण समाजवादी आहोत असे आता म्हणेल तर ते शपथपत्र धादांत खोटे होईल हे उघड आहे.

समाजवादी कोण?

समाजवादी शब्दाची व्याख्या तशी मोठी कठीण आहे. दीनदलितांवर भूतदया दाखवण्याची करुणा बाळगणारे संत सायमनचे भक्तही स्वत:ला समाजवादी म्हणवतात. युरोपातील बाजारपेठेवर आधारलेल्या कल्याणकारी राज्यांनाही समाजवादी म्हटले जाते आणि रशियासारख्या बंदिस्त, पक्षाची हुकूमशाही आणि नियोजनाच्या नावाखाली क्रूर झोटिंगशाही चालवणाऱ्या व्यवस्थांनाही समाजवादी असा शब्द आहे. इंदिरा गांधींनी १९७७ मध्ये घटनादुरुस्ती केली तेव्हा त्यांच्या मनात कोणत्या समाजवादाचे उद्दिष्ट अभिप्रेत होते याचा अंदाज कसा बांधायचा? इंदिराबाईंच्या समाजवादात कदाचित वंशपरंपरागत अध्यक्ष किंवा सम्राट यांचीही तरतूद होत असेल!

भारतात समाजवादी व्यवस्था आणण्याचा गंभीर प्रयत्न कधी झालाच नाही. 'आवडी'च्या अधिवेशनात 'समाजवादी धाटणीचा समाज' अशा खास नेहरू पद्धतीचा वाक्प्रचार निघाला. सरकारात सत्ता केंद्रित झाली, नोकरशाही वारेमाप वाढली, समाजवादाचे सगळे दोष आले, गुण मात्र एकही आला नाही.

समाजवाद : एक बकवास

अंमलबजावणी होवो ना होवो, दोन तीन वर्षांआधीपर्यंत समाजवाद ज्याच्या त्याच्या तोंडी होता, निवडणूक जिंकायला समाजवादाची आरोळी मोठी उपयोगी पडायची. शिवाय दोन जागतिक महासत्तांमध्ये धावपळ करून लभ्यांश साधण्याच्या प्रयत्नात समाजवादाची भाषा मोठी उपयोगी पडे. अमेरिकी सरकारला खिजवण्याचा खेळ त्यामुळे चांगला चाले. या असल्या बोलण्याने कुणी खरेखुरे फसले होते असे नाही. १९७२ मध्ये एक अमेरिकन छोटा व्यापारी मला म्हणाला होता, "या समाजवादाच्या नाटकाने कोणी फसत नाही. तुमच्या देशातील सगळ्या मोठ्या पुढाऱ्यांची मुले इंग्लंड - अमेरिकेत शिकायला येतात, रशियात जात नाहीत, तोपर्यंत तुमच्या समाजवादाच्या घोषणा निव्वळ बकवास आहेत, हे आम्ही चांगले ओळखतो."

आजपर्यंत निदान समाजवाद हे उद्दिष्ट होते, प्रत्यक्षात परिस्थिती काहीही असो. सोवियत रशिया कोसळला, नेहरूनियोजन कोसळले, काँग्रेस सरकारचे उद्दिष्टसुद्धा राहिलेले नाही. खुल्या बाजारव्यवस्थेकडे आम्ही वाटचाल करणार आहोत, पुन्हा जुन्या व्यवस्थेकडे जाणे नाही असे पंतप्रधान आणि अर्थमंत्री नि:संदिग्धपणे बोलत आहेत. खासगीकरणाला सुरुवात झाली आहे, रुपया परिवर्तनीय झाला आहे. परिवर्तनीय रुपया म्हणजे सर्व समाजवादी स्वप्नांचा अंत्यविधी आहे.

काही आठवड्यांपूर्वी मध्यवर्ती सरकारातील सर्वोच्च नोकरशहांपुढे पंतप्रधानांनी भाषण केले. भाषणात त्यांनी आता समाजवादाचे भूत उतरवण्याची गरज असल्याचे सांगितले. पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष यांच्या या घोषणेनंतर काँग्रेस पक्ष स्वत:ला समाजवादाच्या तत्त्वावर श्रद्धा ठेवणारा पक्ष म्हणवूच शकत नाही.

ना भाजपा, ना काँग्रेस

धर्मवादी म्हणून भाजपावर बंदी येणार असेल तर असमाजवादी म्हणून काँग्रेस पक्षावरही बंदी येणे अपरिहार्य आहे. पुढच्या निवडणुका जेव्हा केव्हा येतील तेव्हा हा प्रश्न उद्भवणार आहे. लोकप्रतिनिधित्व कायदा कलम २९ अ, परिच्छेद ५, काटेकोरपणे अंमलात आणला गेला तर मुलायमसिंगांचा समाजवादी पक्ष, चंद्रशेखरांचा समाजवादी जनता पक्ष निवडणुकात भाग घेऊ शकतात. कदाचित, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षालाही भाग घेता येईल. इतर बहुतेक सर्व पक्षांना निवडणुकांबाहेर राहावे लागेल. हे टाळायचे असेल तर आणखी एक घटनादुरुस्ती करून प्रास्ताविकातील इंदिराबाईंनी घुसडलेला समाजवादी हा

शब्द खोडून टाकावा लागेल. अर्थमंत्र्यांच्या नव्या अंदाजपत्रानंतर त्यांनी स्वत:च ही दुरुस्ती सुचवायला पाहिजे होती. आज ना उद्या 'समाजवादी' शब्दाला घटनेच्या प्रास्ताविकातून डच्चू देणे तत्त्व म्हणूनच नव्हे, व्यावहारिक आवश्यकता म्हणून भाग पडणार आहे, नाही तर पुढील निवडणुकीत ना काँग्रेस भाग घेऊ शकेल ना भाजपा.

(१ एप्रिल १९९३)

■■

विश्वासू आणि आज्ञाधारक

दूरदर्शनवर एक सरकारी जाहिरात पाहून आश्चर्याचा सुखद धक्का बसला. सुखद धक्का ही गोष्ट आजकाल अतिदुर्मीळ झाल्यामुळे त्याचा आणखी एक धक्का बसला.

जाहिरातपटात एका सुसज्ज आणि सुशोभित फ्लॅटमध्ये नवरा घरी येण्याची वाट पाहत पत्नी उभी दाखवली आहे. नवरा एक सरकारातील उच्च पदाधिकारी, घामाघूम होऊन येतो आणि पत्नीला आपल्याला उशीर झाल्याचे कारण सांगतो, "आता सरकारी गाड्या बंद झाल्या ना, त्यामुळे बसने यावे लागले." पत्नी समजूत काढते, "सगळी माणसे ट्रॉम बसने प्रवास करतात, आपल्यालाच कशाला पाहिजे गाडी?" मग त्यांची एकुलती एक छोटी मुलगी बाबांना कोठे दूरचा फोन करायची आठवण करून देते आणि बाबा म्हणतात, "आता असे फोन नाही करता येणार." मुलगी विचारते, "सरकार असे पैसे वाचवून करणार तरी काय?" आणि तिघेजण मिळून एका सुरात उत्तर देतात, "हा पैसा पैसा देशाच्या विकासासाठी कामाला येणार इ.इ.!"

महाराष्ट्र शासनाने खरोखरीच असा काटकसरीचा कार्यक्रम हाती घेतला आहे किंवा नाही कुणास ठाऊक? पण गाड्या आणि टेलिफोन याबाबत थोडीजरी काटकसर प्रत्यक्षात सुरू झाली असेल तर सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. प्रत्यक्षात काटकसरीला सुरुवात झाली नसेल तरी या जाहिरातपटाचे स्वागत करायला पाहिजे. कारण त्यामुळे सरकारद्वारेच नोकरदारांची जीवनशैली लोकांपुढे अधिकृतपणे आली.

नोकरदारीची भरभराट

या महितीपटात दाखवलेला सुसज्ज फ्लॅट, दिवाणखाना ही गोष्ट सरकारी नोकरांच्या काळात नोकरदारांची संख्या वाढली; पण त्यांचे पगार, भत्ते इतर

सोयीसवलती, प्रवास दौरे इत्यादींचा वर्षाव सुरू झाला तो इंदिराजींच्या काळात. त्यात वरकमाईची भर पडल्यामुळे आता, जन्माला यावे ते सरकारी नोकर म्हणूनच, अशी परिस्थिती झाली आहे. त्यामुळे खासगी क्षेत्रात नोकरी करण्याऐवजी चांगले शिकलेले डॉक्टर, वकीलसुद्धा आग्रहाने सरकारी नोकरीत येऊ लागले आहेत.

नोकदारांच्या घरची परिस्थिती कल्पनेबाहेर बदलली. २५ वर्षांपूर्वी सर्वोच्च सरकारी नोकरीत असताना निवृत्त होताना आपल्याला एखादा फ्लॅट बांधता येईल आणि जमले तर स्वत:चा रेफ्रिजरेटर आणि टेलिफोन घेऊ शकलो तर अगदी गंगेत घोडे न्हाले असे वाटायचे. आज पाचदहा वर्षे नोकरी झालेल्या कनिष्ठ श्रेणीच्या लिपिकाचेसुद्धा जीवनमान या स्वप्नाच्या वरचे असते. त्यात बँका, सार्वजनिक क्षेत्रातील महामंडळे, विमा इत्यादी क्षेत्रातील नोकरांची तर चंगळ विचारायलाच नको.

कचेऱ्या कार्यालये बनल्या

सरकारी कार्यलयांचेसुद्धा रंगरूपच बदलून गेले आहे. पूर्वी सरकारी कार्यालय म्हणजे भलीभक्कम, बहुधा दगडी इमारत, त्यात दाटीवाटीने लाकडी घडवंच्या, ओबडधोबड मेज आणि बहुधा एखादा तरी हात गेलेल्या खुर्च्या असायच्या. या सगळ्या लाकूड सामानाला पॉलिशचा हात क्वचितच लागे. कारकुनांची जागा अंधारात. काही थोडा थाटमाट असला तर तो साहेबांच्या खोलीत. म्हणजे काथ्याची ऐसपैस रंगीत चटई, टेबलाच्या सभोवती पसरलेले टेबलावर गडद, बहुधा निळ्या रंगाच्या, कापडाचे आवरण आणि अगदी पराकाष्ठा झाली तर एखादी फुलदाणी.

टपाल कचेरीत जा, पोलिस कचेरीत जा, तलाठी कचेरीत जा किंवा कलेक्टर कचेरीत जा. सगळी सरकारी कार्यालये म्हणून जितकी, तेथील परिस्थिती हीच. त्याबद्दल नोकरदारांना कधी फारसे वैषम्य वाटत नसे. सरकारी कचेरी म्हणजे अशीच असणार त्यात छानछौकी कशी काय असणार, अशीच भावना असे.

आधुनिक इमारती, त्यात काचा आणि संगमरवरचा भरपूर उपयोग, खेळती हवा, भरपूर उजेड, स्टीलची टेबले, कपाटे ही असली शोभा फक्त 'बर्मा शेल' किंवा 'स्टॅनव्हॅक' अशा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यालयात असायची, आता सरकारी कार्यालये खासगी क्षेत्रातील कार्यालयांच्या वळणावर गेली आहेत. टपाल आणि पोलिसखातेच काय ते आपल्या इमानाला जागून आहे.

''मी भीक मागतो''

सरकारी पत्रव्यवहाराचा कागद आता मोठा रुबाबदार असतो. खासगी कंपनीच्या

पत्रशीर्षाप्रमाणेच. पूर्वी सरकारी पत्र यायचे म्हणजे मिचकूट किंवा खाकीसर रंगाच्या डॉकेटवर वर एका बाजूला ज्याला पत्र लिहायचे त्याने नाव कार्बन कागद घालून लिहिलेले असायचे. खाली सही करणारा अधिकारी कितीही मोठा असला तरी सहीवर ''मी भीक मागतो, राहण्याची, आपला सर्वांत विश्वासू आणि आज्ञाधारक सेवक'' असे लिहून त्याखाली सही करायचा. दिल्लीचा एवढा मोठा व्हाईसरॉय; पण पुण्याच्या एका कार्यालयाला लिहिलेल्या पत्रात याच मायन्याखाली त्याने सही केलेली मी प्रत्यक्ष पाहिली आहे.

स्वातंत्र्य आले आणि सरकारी नोकर सेवक राहिले नाहीत. पत्रांचा मायना बदलला. पहिल्यांदा 'आपला विश्वासू' म्हणून सह्या होऊ लागल्या. आता सरकारकडून सर्वसामान्यांना पत्रे म्हणून येत नाहीत, मेमो येतात. त्यांना बूड ना शेंडा. तृतीय पुरुषी, कर्मणी प्रयोगातील, व्याकरणातील आणि टंकलिखितातील चुकांनी खचाखच भरलेले मेमो हे आजही सरकारी पत्रव्यवहाराचे वैशिष्ट्य. 'प्रिय महाशय, आपला विश्वासू, प्रिय, आपला कळकळीचा' हा पत्रव्यवहारातील शिष्टाचार सरकारी अधिकाऱ्यांनी फक्त सरकारातील देवघेवीसाठी राखून ठेवला आहे.

सेवक मालक बनला

इंग्रजी अमलाखाली सरकारी अधिकाऱ्यांना सत्ता असे. आजच्याइतकी सर्वंकष नाही; पण ठराविक क्षेत्रात त्यांचा अधिकार चांगला चाले. त्यांचे पगार तुटपुंजेच असत. कोणत्याही खात्याच्या जिल्हाधिकारी पदाच्या खालील नोकरवर्गाची ओढगस्तच असायची; पण त्या आर्थिक दुरवस्थेतही त्यांना एक प्रतिष्ठा होती. साधनांची कमतरता आणि मोजके पगार असूनही खात्याकडे सोपवलेली कामे बऱ्यापैकी पार पाडायची. आता परिस्थिती वेगळी आहे. नोकरदारांची सत्ता वाढली आहे. त्यांची सत्ता सगळीकडे चालते. आगगाडीच्या तिकिटापासून ते वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशापर्यंत त्यांच्या ओळखीचा फायदा होतो. शहरातील श्रीमंतांच्या घरी होणाऱ्या पार्ट्यांना आता अमलदार लोक सर्रास हजर असतात. विलायती वस्तू, सिगरेट, दारू यांची रेलचेल, कोणत्याही कारखानदारांच्यापेक्षा सरकारी नोकरदारांच्या घरीच जास्त असते. कोणत्याही झगमगाटाच्या बाजारात सरकारी नंबरप्लेट असलेल्या गाड्या मेमसाहेबांना घेऊन उभ्या असतात. विमानप्रवास आणि दूरभाष यांचा उपयोग फक्त नोकदार भाग्यवंतांनाच परवडतो. त्यांची मुले देशातील सर्वांत महागड्या शाळांत शिकतात. परदेशांतील किंवा देशी कारखानदारीकडील नोकरी त्यांची वाटच पाहत असते. निवृत्तीनंतरही

वेतन, मृत्यूनंतरही कुटुंबवेतन, त्यावरही महागाई भत्ते असे सगळे आलबेल आहे; पण झालेल्या या बदलामुळे सरकारी कार्यक्षमता वाढली असेल म्हणावे तर तसे काही झाले नाही. साधने वाढली, खर्च वाढला, त्याबरोबर भ्रष्टाचार वाढला, बेशिस्त वाढली, संप वाढले, हरताळ वाढले.

भयानक मिश्रण

सत्ता आणि आर्थिक सुबत्ता हे फार भयानक मिश्रण आहे. दिल्लीत शासनाच्या हाती हे मिश्रण झाले आहे. तिथली सत्ता बळकावण्यासाठी पुढारी देश मोडायला तयार झाले. सत्ता आणि आर्थिक सुस्थिती हे मिश्रण सरकारी नोकरदारातही फार भयानक होते. सरकारी नोकरदार जनतेपुढे जाताना त्यांच्यातील सर्वांत सुखवस्तूंपेक्षा अधिक थाटाने जाऊ लागला, की समजावे, जनतेचा सेवक नाही, मालक आला आहे आणि त्याच्या हातून लोकांचे भले होणे शक्य नाही.

सत्ता का मत्ता?

सरकारी नोकरांचा पगार, भत्ते मोजकेच असले पाहिजेत. सरकारी कार्यालयावरचा खर्च किमान असला पाहिजे. सरकारी पैसा म्हणजे लोकांचा पैसा आहे, त्यातील पै पैचा वापर काटकसरीने झाला पाहिजे आणि त्याचा हिशेबही चोख राहिला पाहिजे. या सेवेत शाश्वती असेल, सत्ता आहे; पण वैभव असू शकत नाही. संपन्न सेवक मालकाला भावणारा नाही.

जुनाट कार्यालय, शाईने डागाळलेले टेबल, कागदपत्रांच्या थप्प्यांमध्ये खुर्चीला चिकटून राहिलेला नोकरदार असे चित्र असले म्हणजे त्या सरकारविषयी थोडातरी विश्वास वाटतो. नवी इमारत, काचा आणि पोलाद यांचा झगमगाट, अत्याधुनिक सामान, कोपऱ्यात धूळ खाणारी गणकयंत्रे, मेजावर दोन-तीन-चार-पाच टेलिफोन आणि टेबलाचा मालक त्रासन्तास फरारी. कधी अधिकृत बैठकीसाठी, कधी अधिकृत चकाट्या पिटण्यासाठी... अशा चेहऱ्याच्या सरकारवर विश्वास कसा ठेवावा?

मोटारी आणि टेलिफोनच्या वापरावर थोडासा चिमटा लावून भागण्यासारखे नाही. सरकारी नोकर पुन्हा एकदा सर्वसामान्यांच्या पातळीवर उतरून आला आणि "भीक मागतो राहण्याची, तुमचा सर्वांत आज्ञाधारक सेवक" या भूमिकेत बसला म्हणजे सरकारविषयी जनमानसात थोडी आपुलकी तयार होईल.

(८ एप्रिल १९९३)

■■

हुंडा नको, संपत्तीहक्क हवा

राष्ट्रीय महिला आयोगाने हुंडाबंदी कायदा १९६१ मध्ये फेरबदल करून हुंडा घेणे दखलपात्र एवढेच नव्हे तर बिगरजमानती गुन्हा करण्याची शिफारस केली आहे. सध्याच्या हुंडाबंदी कायदा मऊ आहे, तो अधिक कठोर केल्यामुळे हुंड्याचा प्रश्न सोडवला जाईल अशी महिला आयोगाची अपेक्षा असावी.

ग्रामीण भागातील बहुधा सर्वांत मोठ्या महिला संघटनेशी माझा संबंध आहे. महिला चळवळीबद्दल मी फार मोठ्या आशा बाळगून आहे. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना नुकतीच झाली आहे. त्या आयोगाबद्दल कठोर भूमिका घेण्याची माझी इच्छा नाही आणि तरीही मला विनम्रपणे वाटते, की महिला आयोगाची दिशा चुकते आहे.

पुस्तकी कायदे

जी जी म्हणून सुधारणा व्हावीशी वाटते ती करण्याकरिता एक बिल कायदेमंडळात मांडायचे आणि पास करून घ्यायचे हा भारतातील समाजसुधारकांचा जुना छंद आहे.

संपत्तीहक्काचा संबंध नसेल तर स्त्रियांच्या प्रश्नावरील बहुतेक कायदे झटपट पास होऊन जातात; पण कायदा झाला म्हणजे तो अमलात येतो असे नाही. कायदा बहुधा पुस्तकातच राहतो.

संमती वयाच्या कायद्यासंबंधी लोकमान्य टिळक आणि आगरकर यांच्यात मोठे वादविवाद झाले. लहान वयात मुलींची लग्ने लावू नयेत याबद्दल काही मतभेद नव्हते. लोकमान्य टिळकांनी बिलाला विरोध केला, तो "म्हातारी मेल्याचे दुःख नाही; पण काळ सोकावेल." या भूमिकेतून या बिलाच्या निमित्ताने ब्रिटिश शासनास हिंदू धर्मव्यवस्थेत हात घालण्याची मुभा दिली गेली तर त्याचा गैरफायदा घेऊन इंग्रज सरकार सगळी हिंदू समाजव्यवस्थाच मोडकळीस

आणेल अशी त्यांची भीती. शरीयतमधील तरतुदींना जरादेखील धक्का लावण्यास आकांडतांडवाने विरोध करणाऱ्या आजच्या मुल्लासारखीच लोकमान्यांची भूमिका होती; तरीही शारदा कायदा झाला. गेली ८० वर्षे तो पुस्तकावर आहे; तरीही वस्तुस्थिती अशी, की माझ्या गावात होणाऱ्या लग्नांपैकी ९०% लग्नात मुलींचे वय १८ पेक्षा कमीच असते. कायदा करून समाजसुधारणा घडत नाही.

रेशनिंगमुळे स्त्रीशिक्षण

समाजातील बदल परिस्थितिनुरुप घडत जातात. ज्योतिबा फुले, महर्षी कर्वे, भाऊराव पाटील असे अनेक कर्मवीर स्त्रीशिक्षणासाठी झटले; पण मुलींच्या शिक्षणाची खरी प्रगती झाली ती दुसऱ्या महायुद्धापासून. मॅट्रिक झालेल्या मुलींना रेशनिंग आणि इतर खात्यांत पटापट नोकऱ्या मिळू लागल्या तेव्हापासून. मुलींच्या शिक्षणाची सोय नाही, मुली शिकल्या तर शेतकरी घरात जाण्यास नाखुश असतात आणि नोकरदार मुलांची संख्या कमी अशा परिस्थितीत मुलींना शिकवून, स्वावलंबी करून परिपक्व वयातच त्यांचे लग्न लावून द्यावे ही कल्पना व्यवहार्य राहत नाही. कायदा केल्याने कोणाला कृतकृत्यता वाटत असेल तर ती त्यांना लखलाभ असो. समाजात काही कायद्याने परिवर्तन घडून येत नाही.

विधिः भक्षति अरक्षितः

समाजसुधारणेचे कायदे केवळ कायद्याच्या बाडात पडून राहतात. असे असते तरी काही फारशी चिंता नव्हती; पण हे कायदे अमलात न आल्यामुळे कायद्याविषयी एक अवहेलनेची भावना लोकांच्या मनात तयार होते आणि त्या पलीकडे अंमलबजावणी यंत्रणेवर ताण पडल्यामुळे तीसुद्धा निकामी होऊन जाते, मुंबई पोलिस एकेकाळी अत्यंत कार्यक्षम म्हणून जगभर प्रसिद्ध होते. आज त्यांची जी दैना झाली आहे तिची सुरुवात अव्यहार्य दारूबंदी कायद्यामुळे झाली.

कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही तरी कायद्यामुळे एक नैतिक मापदंड तयार होतो. चांगले काय आणि वाईट काय याची व्याख्या स्पष्ट होऊन जाते, हा युक्तिवादही मोठा शंकास्पद आहे. लॉर्ड बेंटिकने सतीबंदीचा कायदा केला; पण आजही सतीची पूजा आणि उत्सव होतातच. समाजात चांगले काय आणि वाईट काय याची स्थलकालनिरपेक्ष अशी व्याख्या नाही. जी व्यवस्था एका समाजात चांगली ती दुसऱ्या एखाद्या समाजात जाचक, एवढेच नव्हे तर घातक ठरू शकते. सुधारणा म्हणजे काय ते पाश्चिमात्य देशांच्या नमुन्यावरून ठरवायचे आणि ते आपल्या देशात लादायचे, ही समाजसुधारकांची परंपरा

आहे. हिंदुस्थानातील कवी, साहित्यिक, शास्त्रज्ञ, कारखानदार इ.इ. परभृत तसेच आमचे समाजधुरीणही नक्कल मारणारे.

कायद्यांचा फायदा पुरुषांनाच

कायद्यामुळे हिंदू समाजातील स्त्रियांची अवस्था सुधारण्याऐवजी आणखी बिकट झाल्याचे दिसून येते. हिंदू समाजात अनेक बायका करण्याची चाल फार जुनी आहे. मुसलमान व्यवस्थेप्रमाणे कोणत्याही पुरुषास चार बायका करण्याची परवानगी आहे; पण प्रत्यक्षात बहुपत्नीकत्वाची प्रथा हिंदूंतच जास्त प्रचलित आहे. सतत आक्रमणे, बढाया, अशांतता यांनी गांजलेल्या समाजात लोकसंख्येतील पुरुषांचे प्रमाण कमी झाले, की बहुपत्नीकत्व, विधवा विवाह बंदी यांना साहजिक मान्यता आवश्यक होते. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात फ्रान्समधील तरुण पुरुषांचे मोठ्या प्रमाणावर शिरकाण झाले; पण कॅथालिक वर्चस्वाखालील फ्रान्समध्ये बहुपत्नीकत्वाला मान्यता मिळणे अशक्यच आणि त्यांना धर्मसंस्थेची नसली; तरी सामाजिक मान्यता मिळून गेली.

अशांततेच्या काळात घरात कोंडल्या गेलेल्या आणि गुलामगिरीचे जिणे जगणाऱ्या स्त्रियांना एकदम घटस्फोटाची परवानगी दिली तर त्या स्वातंत्र्याचा फायदा स्त्रियांना कसा काय मिळणार? पूर्वीच्या काळी नवऱ्याने दुसरी बायको करून आणली तर पहिलीला असह्य यातना होत असणारच; पण निदान तिच्या डोक्यावरचे छप्पर तरी शाबूत असे. घरात निदान धार्मिक विधीत तरी पहिल्या बायकोचा मान कायम राही. पोटाचा प्रश्न तरी भेडसावत नसे. घटस्फोटाचा आणि द्विभार्या प्रतिबंधक कायदा झाल्याने सोय फक्त उनाड पुरुषांची झाली. दुसरे लग्न करायला बंदी झालीच नाही, पहिल्या लग्नाच्या बायकोला काडी मोडून दिली म्हणजे झाले. या दोन्ही कायद्यांचा फायदा पुरुषांना झाला, स्त्रियांना नाही.

घटस्फोटाच्या कायद्याचा फायदा स्त्रियांना मिळालाच नाही असे नाही. सासर सोडूनही स्वतःच्या पायावर उभी राहण्याची ज्यांची ताकद होती आणि माहेरच्या माणसांचा ज्यांचा आधार तुटलेला नव्हता अशा मोजक्या स्त्रियांनाच या कायद्यामुळे 'लग्नाची बेडी' तोडता आली.

हुंडाबंदीतही लाभ पुरुषांचाच

वर्तमानपत्रात दररोज हुंडाबळीच्या बातम्या असतात. कोणी उपवर मुली हुंड्याचा बोज बापावर नको म्हणून जीव देतात. मुलींच्या लग्नाची जबाबदारी पेलवत नाही म्हणून आया आपल्या मुलींसकट विहिरीत उड्या मारतात. लग्न

झाल्यानंतरही लग्नात मिळालेल्या हुंड्याबद्दल असंतोष राहतो. लोभी सासरची माणसे नवोढा सुनेचा जीव घेण्यापर्यंत जातात आणि तितक्याच संख्येने नववधू आत्महत्याही करतात. या सगळ्या प्रकारांना हुंडाबळी म्हटले जाते.

या अपमृत्यूचे खरे कारण हुंडाच असते हे काही खरे नाही. अशा प्रकरणांचा अनेक वर्षे अनुभव असलेल्या महिला धुरीणांनी या विषयावर अभ्यास केलेला आहेत, त्यांचा निष्कर्ष असा, की लग्नानंतर लवकरच अपमृत्यू झाला म्हणजे तो हुंड्यासाठी झाला असे सांगणे माहेरच्याच नव्हे तर सासरच्या माणसांनाही सोयीचे होते. खरी कारणे कबूल करायला दोन्हीकडची कुटुंबाची बदनामी होईल या भीतीने हुंड्यामुळे हे घडले असे कबूल करायला दोन्हीकडची कुटुंबे तयार होतात. नवरा मुलगा आणि मुली यांची मने आणि शरीरे जुळली तर हुंड्यासारख्या बाबींसाठी नवरा बायकोच्या विरुद्ध सहसा जात नाही. अशी मिळवणी झाली किंवा मुलाच्या किंवा मुलीच्या पूर्वायुष्यासंबंधी काही वाद निर्माण झाले तर अशा गोष्टीच्या भरपाईपोटी हुंड्याचा हव्यास वाढतो आणि त्यातून शोकांतिका उद्‌भवतात असा अनुभव आहे. गोष्टी अगदी पराकोटीला गेल्यानंतरसुद्धा माहेरच्या माणसांनी मुलीला सहानुभूती दाखवली, आधार दिला तर तिचा बळी पडत नाही. थोडक्यात, तथाकथित हुंडाबळीच्या प्रकरणी सगळेच पक्ष जवळजवळ सारखेच दोषी असतात.

संस्कार, दान आणि दक्षिणा

हिंदुस्थानात हुंड्याची चाल जुनी आहे. आदिवासी टोळ्यांत लग्न हा व्यवहार असतो. मुलगी कमावती असते, त्यामुळे लग्नानंतर सासरचा फायदा होतो आणि माहेरचा तोटा होतो. साहजिकच अशा समाजात मुलीच्या आईबापांना हुंडा द्यावा लागतो.

हिंदू समाजव्यवस्थेत लग्न हा करार नाही, संस्कार आहे. मुलगी विकली जात नाही, तिचे दान केले जाते आणि दानाच्या वर दक्षिणा धर्मकृत्यात आवश्यक मानली जाते. त्यामुळे मुलगी देताना त्याबरोबर वराला दक्षिणाही द्यावी ही परंपरा आहे, लग्न हा संस्कार आहे, ही कल्पना मान्य केली तर वरदक्षिणेला सिद्धांततः विरोध करणे कठीण होईल. खरे म्हटले तर हुंडाविरोधी कायद्यास हिंदुत्वावाद्यांनी विरोध करायला पाहिजे, कारण वरदक्षिणा हा लग्न संस्काराचा अविभाज्य भाग आहे.

संपत्तीहीन स्त्रिया

व्यवहारात मुली जास्त असलेले बाप हुंड्याविरुद्ध बोलतात आणि उपवधू

मुलांचे बाप हुंड्याचा आग्रह धरतात, हा विनोद 'बाळकरामाच्या' काळापासून प्रसिद्ध आहे. मुलींना संपत्तीसंबंधी हक्क देण्याबाबत हिंदू कुटुंबे फारशी उत्साही असत नाहीत. पिढीजात मालमत्तेचा अगदी तोटका हिस्सा हिंदू मुलींना कायद्याप्रमाणे मिळू शकतो. बहुतेकवेळा संमतीपत्रावर सही घेऊन तोही हिस्सा त्यांना नाकारण्यात येतो. स्वकष्टार्जित मालमत्तेत मुलींना समान हिस्सा मिळण्याची तरतूद आहे; पण बहुतेक हिंदू बाप असे दिलदार, की मृत्युपत्रे करून स्वतःच्या मुलींना ते वाटणीतून वगळतात. मालमत्तेत हक्क देण्याऐवजी लग्नाच्या वेळी एक रक्कम तोडून देऊन मोकळे व्हावे अशी मुलींच्या माहेरच्या लोकांची इच्छा असते. हुंडा म्हणून तोडून देऊन जी रक्कम दिली जाते, त्याचे एक सूत्र आहे. मालमत्तेचा थोडासा वाटा, मुलीतील गुणदोष, वराची गुणवत्ता इत्यादी घटकांचा त्यात समावेश आहे. त्या तपशिलात येथे जाण्याची गरज नाही. मुलीला काही मिळण्याचा सध्या विवाह हाच प्रसंग आहे. हुंडाबंदीचा अर्थ मुलीला पैतृक मालमत्तेवरील हक्क नाकरणे असा होता कामा नये. संपत्तीहक्क बजावता यावेत यासाठी काही निश्चित पर्यायी व्यवस्था ठरवली पाहिजे. जे काही कायद्याचे ते मुलीला द्यायचे आहे, मुलाला किंवा सासरच्यांना नाही, ही गोष्ट स्पष्ट झाली म्हणजे मुलीला मिळणारी रक्कम हक्काच्या वाटणीशी जुळणारी पाहिजे.

संपत्तीहक्काची गुरूकिल्ली

हुंड्यासंबंधी एक कायदा १९६१ मध्ये झाला. त्यात मधून मधून सुधारणा झाल्या. तरी तो कायदा निष्फळ राहिला. तो कायदा अधिक कठोर केल्याने परिस्थिती सुधारणार आहे असे नव्हे. राष्ट्रीय महिला आयोगाने त्यासाठी स्त्रियांच्या संपत्तीवरील हक्काचा प्रश्न हाती घेतला पाहिजे. हा हक्क प्रस्थापित झाला म्हणजे स्त्रियांच्या दुर्दशेचे मूळच उखडून टाकल्यासारखे होणार आहे. स्त्रियांवर संपत्तीच्या हक्कासंबंधी अन्याय चालू राहील, तर बाकीचे अन्याय दूर होणार नाहीत, केवळ कायदे करून तर नाहीच नाही.

(२२ एप्रिल १९९३)

■■

लोकप्रियतेचे रहस्य आणि नोकरशाही !

बिजू पटनाईक मोठे हिंमतबहाद्दर म्हटले पाहिजेत, किंवा त्यांना अवदसा आठवली असली पाहिजे. स्वातंत्र्यानंतर इतिहासात सरकारी नोकरदारांना खुलेआम आव्हान देणारे, एक वसंतदादा पाटील सोडले तर, तर ते पहिलेच मुख्यमंत्री असावेत !

सरकारी नोकरांचा सुटीच्या दिवसात प्रवास करण्याचा भत्ता त्यांनी बंद केला. एवढेच नाही तर रजा घेण्याऐवजी त्या रजेच्या दिवसांचा जादा पगार देण्याची पद्धत त्यांनी बंद करून टाकली. ओरिसा राज्यात भयानक दुष्काळ पडला आहे. दुष्काळाला तोंड देण्यासाठी ६०० कोटींच्यावर रुपयांची गरज आहे. राज्यशासनाची पैसे उभारण्याची ताकद नाही आणि केंद्रशासनाने मोठ्या मिनतवारीने ४५ कोटी रुपयांची मदत देऊ केली आहे. या परिस्थितीत बिजू पटनाईक काटकसरीचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत.

मौजमजा चाललीच पाहिजे

अधिकाऱ्यांचे मत याउलट. सगळे राज्य दुष्काळाच्या जबड्यात असले म्हणून काय झाले; सुटीच्या दिवसात प्रवासाचा आनंद लुटण्याचा सरकारी नोकरांचा हक्क काढून घेण्याची हिंमत मुख्यमंत्र्यांना झालीच कशी? सरकारी नोकरांना घरी जाण्याच्या प्रवासासाठी भत्ता आणि प्रवासखर्च मिळतो तेव्हाच त्यांना सुटी हवी असते. एरवी सुटी त्यांच्या काय कामाची? त्यांची नोकरी म्हणजे सुटीच आहे. रजेवर आहे म्हटल्यावर घरची तरी काही कामे करावी लागतात ! ऑफिसात असले म्हणजे पंख्याखाली किंवा वातानुकूलित दालनात शांतपणे बसून राहणे आणि समोर जे लीनदीन याचक येतील त्यांच्याकडून कमाई करणे हे सुख सोडून, रजा घेण्याचा मूर्खपणा कोण करेल? आणि त्या रजेच्या ऐवजी सरकारकडून पगाराची रक्कम मिळत असेल तर दुधात साखरच

पडली म्हणायची !

महाराष्ट्रासारख्या सुधारलेल्या राज्यात पोलिस खात्याच्या एकूण बजेटच्या तिप्पट रक्कम पोलिसांना हप्ते देण्याकरिता दादांची एकच टोळी काढून ठेवते असे नुकतेच पोलिससूत्रांनीच सांगितले. जे पोलिसांत तेच नागरी खात्यात. एक दिवस रजा घेणे, म्हणजे त्या दिवसाच्या वरकड कमाईस मुकणे, सरकारी नोकरांना परवडतच नाही. त्या रजेच्या ऐवजी रोख पैसे घेण्याची पद्धत बंद करण्याइतका हा मुख्यमंत्री माजला?

मुख्यमंत्र्यांना मारपीट

भुवनेश्वर मंत्रालयातील सरकारी नोकरांनी निदर्शने केली. मंत्रालयात धिंगाणा घातला, कोट्यवधी रुपयांची सामग्री नासधूस करून टाकली, एवढेच नव्हे तर मुख्यसचिव आणि मुख्यमंत्री यांना चांगलीच मारपीट केली. ७५ सरकारी सेवक निलंबित झाले आणि ६ जणांना नोकरीवरून काढून टाकले. पगाराचा विषय आता मागे पडला आहे. सरकारी नोकर आता दंड थोपटून मुख्यमंत्र्याविरुद्ध संघर्ष करण्याकरिता उभे झाले आहेत.

बिजू पटनाईकांचे चुकलेच ! खरे म्हणजे ते आता चांगले पिकलेल्या वयाचे झाले आहेत. निदान पंतप्रधानांच्या वयाचे तर खरेच. त्यांना अशी दुर्बुद्धी का सुचावी? तेच पंतप्रधानांचे पहा, "देश संकटात आहे, सगळ्यांनी त्याग केला पाहिजे." अशी भाषणे पंतप्रधान झोडतात; पण सरकारी नोकरांच्या महागाई भत्त्याच्या रतिबाला खंड पडू देत नाहीत. "कार्यक्षमता वाढली पाहिजे, निर्यात बाजारपेठ वाढली पाहिजे." असे आवर्जून म्हणतात; पण सरकारी नोकरांना किंवा कामगारांना नोकरीवरून घरी पाठवायची भाषा त्यांना अजिबात मंजूर नाही.

नोकरदार पवित्र गायी

हिंदुस्थानात सगळ्यात मोठी ताकद नोकरशहा आणि संघटित कामगार यांची आहे. त्यांना दुखावता कामा नये हे त्या मुनीने बरोबर ओळखले आहे. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी इंग्लंडचे सरकार आणि हिंदुस्थानी पुढारी यांच्यात ज्या वाटाघाटी झाल्या, त्यांतला एक महत्त्वाचा मुद्दा स्वातंत्र्यानंतर जुन्या नोकरदारांना तोशीस लागता कामा नये हा होता. बिचारे लॉर्ड वेव्हेल आणि माउंटबॅटन ! विनाकारणच या प्रश्नावर चिंता करीत होते. ही नोकरशाही तोशीस लावून तर घेणारी नाही; पण सगळी सत्ताच हातात घेण्यास समर्थ आहे, हे त्यांच्या लक्षात आले नाही.

देश जळो, नोकरदार मजेत

इंग्रजीत 'जी, प्रधानमंत्रीजी' (YES' PRIME MINISR) हे मोठे गाजलेले पुस्तक आहे. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांचे ते मोठे आवडते पुस्तक होते. निदान टेलिव्हिजनवर याचे झालेले रूपांतर राजीवजींना बेहद पसंत होते. या पुस्तकातील एक कहाणी उद्‌बोधक आहे, इंग्लंडवर मोठे आर्थिक संकट येते, सरकारी अंदाजपत्रकात कठोर काटछाट करण्याची धडपड चालू होते. शिक्षण खात्यात अगदी वैद्यकीय सेवेतसुद्धा कपात करण्याचे ठरते, खासदारांची बऱ्याच काळ टांगत पडलेली पगारभत्तावाढीची मागणीदेखील फेटाळली जाते; पण अशा परिस्थितीतसुद्धा सगळ्या नोकरदारांचे पगार भरमसाट वाढवणारा प्रस्ताव लादला जातो. असे हे मोठे विनोदी आणि वास्तविक प्रहसन आहे. हे असे का होते?

नवे संस्थानिक

१९६७/६९ मध्ये गोवधबंधीच्या मागणीसाठी जनसंघाने राजधानीत धुमाकूळ घातला. त्यात शेकडो नोकरदारांच्या मोटारगाड्या जळून खाक झाल्या. दंगलीत झालेले नुकसान विमा कंपन्याही भरून देत नाहीत; मग या बिचाऱ्या मोटारमालक वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कसे होणार? अशी चिंता वाटू लागते न लागते तोच एक सरकारी फतवा निघाला आणि या नोकरदारांना केवळ नुकसानभरपाईच नाही तर नवीन गाड्या मिळण्याकरिता खास कोटा देण्यात आला.

देशात कोट्यवधी बेकार आहेत. कोट्यवधी भूकेकंगाल आहेत; पण मुठभर भाग्यवंत सरकारी नोकरदारांना गडगंज पगार आहे. महागाई भत्ता आहे. घरभत्ता आहे. मोठ्या शहरात राहण्याबद्दल विशेष भत्ता आहे. दुर्गम भागात नेमणूक झाल्यास वेगळा भत्ता आहे, हक्काची रजा आहे, नैमित्तिक रजा आहे. सुट्याच इतक्या, की यंदा १ एप्रिल ते १५ एप्रिलच्या पंधरवड्यात सरकारी कचेऱ्या फक्त ३ दिवस नावापुरत्या का होईना उघड्या होत्या. सुट्यांमध्ये प्रवास करण्यासाठी प्रवासभत्ता आहे, येण्या-जाण्यासाठी गाड्या आहेत. टेलिफोन अमर्याद उपलब्ध आहे. मुलांच्या शिक्षणासाठी भत्ते आहेत, प्रवासभत्ते आहेत, परदेशयात्रा आहेत आणि एवढे करून काडीची जबाबदारी नाही. जनतेला नाडणे आणि पिडणे एवढीच त्यांची कर्तबगारी! पण या नव्या संस्थानिकांच्या थैल्यांना बोट लावण्याची कोणती हिंमत होऊ शकत नाही.

जनता हरली

बिजू पटनाईकांच्या आधी महाराष्ट्रात वसंतदादा पाटलांनी ते मुख्यमंत्री असताना

नोकरदारांशी टक्कर घेण्याची हिंमत दाखवली होती. नोकरदार सगळे संपावर गेले. ५२ दिवस संप चालला, जनतेच्या लक्षात येऊ लागले, की सरकारी नोकरांचा संप चालू असला, की देश अधिक चांगला चालतो. सरकारी नोकर संप मागे घेण्याचा विचार करीत होते, तेवढ्यात शरद पवारांनी मुख्यमंत्रिपद बळकावले. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेली पहिली गोष्ट म्हणजे, नोकरदारांच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या. संप मिटवून टाकला, नोकरदार जिंकले, शरद पवार जिंकले, जनता हरली, देश हरला.

देशबुडव्यांना पाहिजे काय?

हिंदुस्थानसारख्या गरीब देशाला ही नोकरशाही परवडणारी नाही. उद्योग धंद्यांतील अकार्यक्षम आणि महागडी कामगारशाहीसुद्धा परवडणारी नाही. देशाच्या आजच्या बिकट आर्थिक अवस्थेत नोकरशाही आणि कामगारशाही दोघांचीही छाटणी आवश्यक आहे; पण देशद्रोहाच्या कटात प्रधानमंत्रीही आहेत, जॉर्ज फर्नांडिसही आहेत आणि शरद पवारही आहेत.

नोकरदारांना गोंजारून घेण्याची ही प्रवृत्ती का उद्‌भवली? कारण उघड आहे, नोकरशाही कायम आहे आणि मंत्री आपापल्या खुर्चीवर सरासरीने २-१/२ वर्षांपेक्षा जास्त काळ राहत नाहीत. मंत्री हा पुढारी असतो, तज्ज्ञ नसतो. खुर्चीवर बसल्यानंतर नोकरशाहीला आपला गावरान हिसका दाखवायची हिंमत फार थोड्यांत असते. आपण मोठे अभ्यासू प्रशासक आहोत असे दाखवण्याची त्यांना मोठी इच्छा होते, मग थोड्याच दिवसांत सचिव महाशयांच्या तालावर ते नाचू लागतात. एवढ्या काळात आपण कशाकशावर सह्या केल्या आहेत आणि त्यातून काय लफडी उद्‌भवतील याची त्यांच्या मनात मोठी धास्ती तयार होते. अगदी निष्पाप, निष्कलंक मंत्र्यालासुद्धा सेक्रेटरीसाहेब लेखणीचा कचका कधी दाखवतील हे सांगता येत नाही. एखाद्या प्रकरणात थोडा हात होता असा संशय निर्माण झाला तर आपली सगळी राजकीय कारकीर्द खलास होऊन जाईल आणि घरची वाट धरावी लागेल, याची बिचाऱ्याला रात्रंदिवस चिंता पडते आणि थोड्याच दिवसांत तो हाताखालच्या नोकरदारांना आंजारून गोंजारून घेऊ लागतो. ही झाली अगदी पापभीरू (परमेश्वर या जमातीचे रक्षण करो) मंत्र्यांची कथा. मग ज्या मंत्र्यांना कारखानदारी काढायची आहे, कारखानदाराकडून निधी घ्यायचा आहे, भरती होणाऱ्या प्रत्येक नोकरदाराकडून ठोक रक्कम घ्यायची आहे, सरकारी बांधकामातील प्रत्येक चौरस फुटाबद्दल आपला वाटा घ्यायचा आहे, शैक्षणिक साम्राज्य स्थापायचे आहे, जागोजाग शेकडो एकर जमिनी

मिळवायच्या आहेत आणि हे सगळे स्वत: अगदी कमलपत्राप्रमाणे नामानिराळे राहून करायचे आहे. अशा नेत्यांचे काय सांगावे? प्रसंगी पक्ष कार्यकर्त्यांना दुखावले तरी चालेल; पण नोकरदारांना दुखावणे त्यांना परवडणारे नसते. ही अशी मंडळी नोकरदारांचे महागाईभत्ते रोखण्याच्या प्रस्तावाला विरोध करणारच! नोकरदार नाराज झाले तर त्यांचे सगळेच भांडे फुटणार! दाऊद इब्राहिमला पोलिसांना, जकात अधिकाऱ्यांना खुश ठेवावे लागते तीच स्थिती या गवशा पुढाऱ्यांची.

(३ जून १९९३)

■■

डंकेल आणि लेखी शब्दाचा मृत्यूलेख

लेखी शब्द मेला आहे; संयुक्त राष्ट्रसंघाचे एके काळचे अवर महासचिव फिलिप द सेन यांचे हे प्रसिद्ध वाक्य आहे. "परमेश्वर कधीकाळी असेल; पण आता तो जिवंत नाही." या उक्तीइतकेच सेन साहेबांचे हे निदान तीन दशकांपूर्वी गाजले.

चोपडी उदंड जाहली

लेखी शब्द मरण पावला, म्हणजे काही लिखाण थांबले आहे असे नाही. उलट लेखी आणि छापील शब्दांचा महापूर जगभर थैमान घालतो आहे. छपाईचा जुना काळ संपला. जुळाऱ्याने एक एक खिळा करत मजकूर बांधत मग सगळी चौकट छपाईयंत्रावर चढवावी आणि सगळे काही सुरळीत पार पडले तर, एक एक प्रत हळूहळू छापून निघावी, अशा छपाईचे दिवस संपले. छपाईची अत्याधुनिक साधने लेखकाच्या मनांतील मजकुराच्या लक्षावधी प्रती अगदी क्षणार्धात नाही; पण तास-दोन तासात अगदी सुबक पद्धतीने तयार करू शकतात. दररोज कितीतरी पुस्तके छापून बाहेर पडतात. काही मोजकी थोडाफार काळ गाजतात आणि यथवकाश विस्मृतीच्या उदरात गडप होतात. साहित्य, शास्त्र, कला, एक ना अनेक, हजारो विषयांवरच्या लक्षावधी पुस्तकांचा महाओघ दररोज बाजारात येऊन पडतो आणि तरीही लेखी शब्द मेला हे काही खोटे नाही.

लोकमान्यांचा प्रभाव

कदाचित लेखी शब्द मेला तो छपाईच्या सुलभतेने आणि मुबलकतेनेच. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'च्या काळात वर्तमानपत्रे फारशी नव्हतीच. लोकमान्य स्वत:च अनेकदा जुळाऱ्यापासून टपाल्यापर्यंत सगळी कामे करीत. छापील शब्द मोठा दुर्मीळ आणि म्हणूनच कौतुकाचा विषय होता. लोकमान्यांनी अग्रलेखात वापरलेल्या प्रत्येक वाक्याला नाही शब्दालादेखील मोल होते. प्रत्येक शब्दाची

उलटसुलट चर्चा कोकणातल्या अगदी बारक्याशा खेड्यातसुद्धा होत असे. याउलट आता जिल्ह्याजिल्ह्यात, तालुक्यातालुक्या नव्हे, अगदी गावगल्लीतसुद्धा लेखणीचे हत्यार परजणारे शूरवीर उदंड झाले. पुरवठा इतका अफाट वाढला, की किमत घसरणारच. वर्तमानपत्रातील कोणा अग्रलेखाने किंवा एखाद्या पुस्तकाने समाज वरपासून खालपर्यंत घुसळून टाकला आहे असे आता होत नाही. अगदी शेवटी म्हणजे आचार्य अत्र्यांना ते थोडेफार जमले; त्यानंतर कोणालाच नाही.

पण लक्षात कोण घेतो?

वृतपत्रातील लिखाण काही असले तरी ताजे असते, पुस्तकाचा विषय ते छापून होईपर्यंत शिळा होतोच. त्यामुळे एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशनाने समाजाला उभे हलवले आणि बदलले असे फारसे होत नाही. बुके उदंड जाहली; पण 'लक्षात कोण घेतो' आता होत नाही. इंग्रजी कादंबरीकार चार्ल्स डिकन्सच्या कादंबऱ्या क्रमशः प्रसिद्ध होत असताना, नवीन अंक घेऊन येणारे जहाज अमेरिकेत पोचण्याच्या वेळी बंदरावर हजारो उत्सुक वाचकांचा जमाव एकत्र येई आणि बोट लागता लागताच डेकवरील प्रवाशांना कादंबरीच्या नायक-नायकांची ताजी खबर विचारीत. असे आता कुठे झाल्याचे ऐकिवात नाही. विक्रम सेठ यांची नवी कादंबरी सध्या खूप गाजत आहे. लेखकाची टॉलस्टायशी तुलना होत आहे; पण त्या पुस्तकाचे कौतुक मूठभरांना. सर्वसाधारण समाज त्याबद्दल उदासीन आहे.

'सर्वदूर सिद्धांत' संपले

अर्थशास्त्राच्या जगात समाजव्यवस्थाच नव्हे अगदी राज्यव्यवस्थासुद्धा उलथवून टाकणारे ग्रंथ एकेकाळी झाले. सगळ्या आर्थिक चलनवलनाचा संदर्भच बदलून टाकणारे ग्रंथराज १९३० सालापर्यंत प्रकाशित होत. ॲडम स्मिथचा ग्रंथ या नमुन्याचा पहिला आणि लॉर्ड केन्सचा 'सर्वदूर सिद्धांत' हे बहुधा शेवटचे उदाहरण. त्यानंतर कितीएक महान अर्थशास्त्री झाले; महाकष्टाने जमा केलेली प्रचंड आकडेवारी आणि माहिती गणकयंत्राच्या साहाय्याने विश्लेषण करून पुढे मांडणारी कित्येक पुस्तके झाली; अर्थशास्त्रज्ञांना दरवर्षी 'नोबेल प्राईस'चा रतीब चालू झाला; पण लोकांची डोकी साफ धुऊन काढून त्यांना एक नवी स्वच्छ समज देणारा 'सर्वदूर सिद्धांत' पुन्हा झाला नाही.

आता न्यूटन होत नाहीत. डार्विन होत नाहीत, लुई पाश्चर होत नाहीत. मादाम क्यूरी होत नाहीत. याचा अर्थ संशोधन होत नाही असा नाही; त्यापेक्षा प्रचंड संशाधन होत आहेत; पण 'क्वांटम थिअरी'चा जनक कोण? आणि

गुणसूत्राच्या क्षेत्रातील कोलंबस कोण? याचे उत्तर फार थोड्यांना माहीत असेल.

खळबळ माजवणारे एक पुस्तक

त्यामुळे फार दिवसांनी डंकेल साहेबांच्या अहवालावर एवढी खळबळ माजली; लोक त्याविषयी बोलू लागले; भांडूतंटू लागले. हे मोठे अजब कौतुकच म्हटले पाहिजे. डंकेल साहेबांचे प्रस्ताव म्हणजे काही कादंबरी नाही. लघुकथांचा संग्रह नाही. कोणा एक शास्त्रज्ञाला पडलेल्या दीर्घकालीन गूढ प्रमेयांचे हळुवार हाताने अलगद आणि सुरेख समाधान करणारा असा हा ग्रंथ नाही. सात वर्षे १०८ देशांचे प्रतिनिधी एकमेकांशी भांडले तंडले; भांडणाचा विषय काय तर आंतरराष्ट्रीय व्यापार. कोण्या देशाने जकातकर किंवा सबसिडी किती कमी करायची, व्यापारी देवघेवीच्या अटी काय? हा असला नीरस आणि रूक्ष विषय. त्यावर सगळे देश झुंजले. त्यांच्या म्हणण्याचा महत्तम साधारण विभाजक काढण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका कचेरीने एक दुर्बोध मसुदा तयार केला. त्या कचेरीतला डंकेल हा मोठा साहेब! म्हणून त्याचे नाव जोडले गेले. त्याच्या या असल्या पुस्तकाने सगळ्या जगभर मोठा धुमाकूळ माजला. कोणा ग्रंथकारास मिळाली नाही इतकी प्रसिद्धि अहवालाच्या 'नाममात्र' जनकास मिळाली. डंकेल विरोधी आणि डंकेल समर्थक यांच्यात कचाकच लढाया झाल्या. लिखित शब्द मेल्यानंतरही एवढी खळबळ एका पुस्तकाने उडवावी हे मोठे अद्‌भुत!

सारी खळबळ न वाचताच

त्याहून अद्‌भुत गोष्ट ही, की डंकेलवरील खळबळ डंकेलच्या वाचनाने झाली नाही; त्याचा अहवाल न वाचताच झाली! दोन वर्षांपूर्वी हा अहवाल दिल्ली दरबारात रुजू झाला. त्यातील काही प्रस्ताव अत्यंत त्रोटक रूपाने कोणा सत्तावीस तज्ज्ञांकडे पाठवण्यात आले. हे सगळे प्रस्ताव अत्यंत गुपित असल्याचा निर्वाणीचा इशारा सगळ्यांना देण्यात आला होता. त्यानंतर काही नशीबवान सोडल्यास हा अहवाल वाचायला मिळालेले तर सोडाच, हातात धरायला किंवा डोळ्यांनी पाहायला मिळालेलेसुद्धा मोठे दुर्मीळ. जवळजवळ ५०० पानांच्या टंकलिखित अहवालाच्या फोटोकॉपी निघून निघून निघणार किती? आता एका चतुर प्रकाशकाने तो पुस्तकरूपाने प्रकाशितसुद्धा केला. माझ्या औरंगाबादच्या एक मित्राने हौस म्हणून एक फोटोकॉपी घरी ठेवली, या गोष्टीची वार्ता हां हां म्हणता औरंगाबादेत पसरली आणि ग्रंथराजाच्या दर्शनाकरिता लोक झुंडीने जाऊ लागले.

अगा, जे मुळीच नाही

गावोगाव डंकेलविरोधी प्रचारक शेतकऱ्यांना काय वाटेल ते सांगत फिरत

होते. डंकेल हा एक अमेरिकन व्यापारी आहे, त्याने हिंदुस्थानवर कब्जा बसवायचे ठरवले आहे; डंकेल हा स्वीस सावकार आहे, तो हिंदुस्थान विकत घेऊ इच्छितो; डंकेलचे म्हणणे मानले गेले तर शेतकऱ्यांना शेतीच करता येणार नाही. त्यांची पिके, जनावरे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हस्तक घेऊन जातील... एक ना अनेक, काय वाटेल त्या अफवा गावात पसरत होत्या. साहजिकच 'ये डंकेल बला क्या है?' असे पंजाबच्या अगदी कोपऱ्यातील शेतकरीसुद्धा विचारू लागला. शासन दुप्पट भावाने गव्हाची आयात करून पंजाबी शेतकऱ्याला बुडवीत होते; पण शेतकऱ्यांना खरी दहशत वाटत होती ती डंकेल साहेबांची.

वाचणे आमचा धर्म नोहे

शहरात डंकेलविषयी आपल्याला माहिती नाही असे दाखवणे बुद्धिवादी विशेषत: प्राध्यापक मंडळी अप्रतिष्ठेचे समजू लागली. परवा परळी वैजनाथ येथे एक कार्यक्रम संपल्यानंतर बाजूला हिरवळीत मी कार्यकर्त्यांशी गप्पागोष्टी करत बसलो होतो. एक सज्जन तिथे येऊन बसले, चेहऱ्यावरून वकील असावेत. आपला परिचय देण्याची बात नाही. मध्ये घुसल्याबद्दल दिलगिरी नाही! 'हे डंकेल काय आहे ते मला सांगा,' एवढीच त्यांची फर्माईश. मागणीपेक्षा मागणीच्या पद्धतीने मला मोठे विचित्र वाटले.

मी म्हटले, "आपण डंकेलचा अहवाल वाचून या; मगच त्याविषयी आपण चर्चा करू."

"मी डंकेल अहवाल वाचला आहे," सद्‌गृहस्थ दाटून म्हणाले.

"पण अशा बतावणीने बनण्याइतके दूधखुळे कोणीच राहीले नाही. तुम्ही डंकेल अहवाल वाचलेला नाही." मी निक्षून म्हटले.

"मी वाचला आहे." त्यांची ग्वाही.

मी तितक्याच जबरीने, "तुम्ही डंकेल वाचलेला नाही," असे म्हटल्यावर मग त्याने कबूल केले, की त्याने कोण्या वर्तमानपत्रात डंकेलविषयी वाचले होते. आंतरराष्ट्रीय कायद्याची नाही, आंतरराष्ट्रीय व्यापाराची नाही, शेतीची नाही, कोणत्याच संबंधित क्षेत्रातील काडीमात्र जाणकारी नसतानासुद्धा काही सुटत नाही.

निरक्षर प्रध्यापक आणि मंत्रीही

तसे यात नवीन काही नाही. भारतीय बुद्धिवंतांची ही परंपरा आहे. मार्क्सचे एखादे पुस्तक मुळात वाचलेला मार्क्सवादी ही हिंदुस्थानात, डाव्यांच्या सुवर्णकाळातही उंबराच्या फुलाइतकीच दुर्मीळ गोष्ट होती. हिंदुधर्माचा व्यापक गोषवारा देणारे एखादे पुस्तक तरी वाचलेला संघाचा स्वयंसेवक तितकाच

दुर्मीळ नवजीवन साहित्याची पुस्तके गांधीवादी बाळगतात पुष्कळ, वाचतात फार कमी. आमच्या या परंपरेस धरून डंकेल विषयाचे वादंग उफाळले.

प्रा. मधु दंडवते म्हणाले, "३० लाख टन गव्हाची आयात डंकेलमुळेच करावी लागली."

"शेतकऱ्यांना आपली पिके राखता येणार नाहीत." दुसरे शहाणे म्हणाले. असल्या भाकडकंथावर रणधुमाळी माजली. खरे काहीच नाही; पण तपासून पाहणार कोण?

प्राध्यापकांची ही स्थिती! मग बलराम जाखडांसारख्यांचे काय विचारावे? "शासन शेतकऱ्यांचे नुकसान कदापि होऊ देणार नाही," अशी गर्जना करून ते मोकळे झाले. अहवालातील कोणत्या वाक्याने संकट येणार आहे ते सांगण्याची जबाबदारी कोणाचीच नाही.

डंकेल प्रस्तावाने उठलेल्या खळबळीचे खरे कारण काहीही असो, त्याचा डंकेलच्या वाचनाशी काही संबंध नाही. म्हणजे या वादंगामुळे लेखी शब्दाचा अजून काही प्रभाव असू शकतो, त्यांच्या जीवात अजून धुगधुगी आहे असा अर्थ निघत नाही. उलट लेखी शब्द साफ मेला आहे असे दाखवतो.

'हेचि फल काय...?'

माझ्या नात्यागोत्यातील कुटुबांत माझ्या कामासंबंधी कौतुक तर सोडाच, पण जिज्ञासाही नाही. माझ्या उपसिथतीत शेती शेतकरी आणि तत्संबंधी विषय कटाक्षाने टाळण्याचा शिष्टाचार सगळेजण पाळतात. कुटुंबातील एक दु:खद घटना म्हणून माझ्याकडे सगळे पाहतात; पण परवा एकदम बदल झाला, महाविद्यालयात जाणारी माझी एक भाची थोडे दिवसांपूर्वी मला पाहिल्याबरोबर तिच्या शाळेत जाणाऱ्या भावाला म्हणाली, "परवा परखमध्ये पाहिले ना ते हे अंकल, त्यांचा ऑटोग्राफ घे!" लिखित शब्दाचा यापेक्षा अधिक निश्चयात्मक मृत्युलेख काय असू शकेल?

(१७ जून १९९३)

■■

माणसाचे श्रेष्ठत्व ठरविण्यासाठी वेगवेगळ्या मोजपट्ट्या

जगभरातील पुराणांत, इतिहासात, कथा कादंबऱ्यांत अगदी लहान मुलांच्या परिकथांत राजाचा सर्वोच्च गुण म्हणजे शौर्य. राज्य मिळवायचे ते तलवारीच्या जोरावर, टिकवायचे ते बाहूच्या बळावर. जसजसा काळ लोटत गेला तसतसे राजा स्वत: शूर योद्धा असला पाहिजे अशी आवश्यकता राहिली नाही. सैन्य बलाढ्य असले म्हणजे राजयक्ष्म्याने अंथरुणाला खिळलेला पेशवासुद्धा दरारा गाजवू लागला. सैन्यप्रमुख मानला जाऊ लागला. राजाची जागा लोकतांत्रिक अध्यक्षांनी आणि पंतप्रधानांनी घेतली तसे सैन्याने राजकारणात लुडबूड करू नये, जो कोणी सत्ताधीश असेल त्याच्या आज्ञा मुकाट, बिनबोभाट पाळाव्या असा संकेत पडला; पण त्या देशांची संख्या अल्पमतात आहे. "राजकीय सत्ता तोफेच्या नळीतून येते," या माओच्या वाक्याचा आजही अंमल आहे.

अगदी किरकोळ देशातील पोलिस स्वयंचलित अत्याधुनिक शस्त्रे घेऊन फिरतात; लंडनचा 'बॉबी' अजूनही हातात फक्त दंडुका घेऊन फिरतो. फरक प्रतीकांचा आहे; शासनाच्या मागे सामर्थ्य शस्त्राचे आहे. ते शस्त्र बाहेरील शत्रूविरुद्ध वापरता येते, तसेच देशात कोणी बंडावा पुंडाई केली तर त्याला शिस्तीत आणण्याकरिता वापरले जाते.

सम्राट, शस्त्रे आणि शास्त्रे

ताकदीचा वापर करून ऐतिहासिक व्यक्ती सत्तेवर आल्या; त्यांनी राज्ये स्थापली. शस्त्रांच्या ताकदीचा उपयोग राजघराण्यांनी केला; धर्मप्रसारकांनी केला, साम्राज्यवाद्यांनीही केला, समाजवाद्यांनीही केला. माणसाच्या अंगच्या पराक्रमापेक्षा त्याच्या हातातील हत्यार महत्त्वाचे असते हे स्पष्ट झाल्यावर अंगच्या शौर्यापेक्षा शस्त्रे आणि अस्त्रे तयार करण्याचे तांत्रिक आणि आर्थिक सामर्थ्य महत्त्वाचे ठरते. सत्ता शस्त्रांचीच; पण शस्त्रे चालविणाऱ्या अधड सैनिकांच्या

हाती नाही. शस्त्रे तयार करणाऱ्या सगळ्या आर्थिक-सामाजिक व्यवस्थेच्या हाती गेली. युद्धांवर अर्थकारणाने वर्चस्व बसवले.

टका सेर भाजी, टका सेर खाजा

अजूनही आफ्रिका, दक्षिण अमेरिका अशा खंडांतील अनेक देशांत हे घडते. लष्करातील कोणी अधिकारी उठतो; राजधानीच्या रस्त्यातून रणगाडे फिरवतो आणि केवळ शस्त्राच्या जोरावर सत्ता हाती घेतो. शस्त्र एवढेच त्याच्या सत्तेचे समर्थन. सुसंस्कृत देशात शस्त्राने सत्ता मिळत नाही. ठरावीक कालावधीकरिता सत्ताधारी निवडले जातात. निवडणुकीत मतपेट्या पळविण्यासाठी, मतकेंद्र हातात घेण्यासाठी, एखाद्या उमेदवाराला संपविण्यासाठी इत्यादी इत्यादींसाठी शस्त्रांचा वापर होतो. निवडणुकीत लोकांची दिशाभूल करण्यासाठी, 'गरिबी हटाव'सारख्या घोषणांपासून 'अयोध्या मंदिरापर्यंत' दुष्ट प्रकार केले जातात; पण शेवटी निर्णय मतपेटीत पडलेल्या मतपत्रिकांच्या मोजणीने ठरतात. राजकीय सत्ता कोणाच्या हाती असावी हे ठरविण्यात कोणी मोठा नाही, कोणी छोटा नाही. सैन्याच्या सरसेनापतीने मनात आणले तर सगळी सत्ता तो काबीज करू शकतो; पण मतपेटीसमोर गेल्यावर त्याला मत एकच, रस्त्यावर भीक मागत फिरणाऱ्या बेकार, अशिक्षितालाही एकच मत, महाप्रकांड विद्वानालाही एकच मत, सौंदर्याला प्रतिभेच्या स्पर्शाने मूर्तरूप देणाऱ्या कलाकारालाही एकच मत.

"शंभरात एक माणूस शूर निपजतो; हजारात एक पंडित, दहा हजारात एखादा वक्ता जन्मतो. दानशूर क्वचितच जन्माला येतो." असे संस्कृत वचन आहे. मतपेटीसमोर शूर, पंडित, वक्ते, दानी सारे एकसारखे. मतपेटीसमोर येण्याआधी आपल्या अंगच्या गुणांनी इतर मतदात्यांना आपल्या इच्छेप्रमाणे मते वापरू शकतात; पण एकच धनुष्य, तलवार, तोफेची नळी या सगळ्यांची जागा मतपत्रिका घेत आहे. ज्याला जास्त मते मिळतात त्याच्या हाती सत्ता अशी ही साधी सोपी पद्धत आहे.

अर्थस्य पुरुषो दास

राजकारणावर अर्थकारणाने ताबा मिळविला आहे, केवळ शस्त्रे उत्पादन करण्याच्या शक्तीमुळे नाही. लढाया रणांगणापुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत. सैन्यातील जवानाइतकीच शत्रूच्या हल्ल्याचा धोका सामान्य नागरिकालाही आहे. सैन्याची ताकद केवळ शस्त्राच्या ताकदीवर व पल्ला यांवर न ठरता लष्कराच्या मागे उभ्या असलेल्या वाहतूक, संचार, खानपान, साधने इत्यादींवर ठरते. अर्थप्रबळ राष्ट्र हेच शस्त्रप्रबळ ठरू लागले. 'सर्वे गुणा: कांचनम आश्रयन्ते'

असे उपरोधाने का होईना लिहिणाऱ्या कवीने, "जो श्रीमंत तोच कुलीन, तो विद्वान, तोच सुंदर ठरतो," असे म्हटले; पण श्रीमंत शूर ठरतात असे नाही म्हटले. आताच्या जगात श्रीमंत हाच शूरही ठरतो. उपरोधाने नव्हे तर खऱ्याखुऱ्या अर्थाने. ज्याच्याकडे संपत्ती तोच कला, साहित्य, विज्ञान आणि साहजिकच राजनीतीवरही प्रभाव पाडतो.

संपत्तीची फूटपट्टी

अर्थकारणातील सत्ता कोणाच्या हाती? प्रचंड मोठ्या व्यक्तिगत भांडवलदारांचे दिवस संपले. कंपन्यातील भागधारक आपल्या मतांनी अर्थकारण चालवितात; पण अर्थकारणातील मतदानात सरसकट दरडोई एक मत अशी पद्धत नाही. ज्याच्या हाती जितके समभाग त्या प्रमाणात त्याची मतदानाची ताकद कंपनीच्या सर्वसाधारण सभेत सगळी सभा एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला एकटा-दुकटा भागधारक असे चित्र दिसले, तरी प्रत्यक्ष मतदानात एकटा-दुकटा भागाधारक जिंकू शकतो. राजकारणात (साहजिकच सहकारात) डोकी मोजून निर्णय होतो. अर्थकारणात निर्णयाचे बरेवाईट परिणाम ज्याला जितके भोगावे लागणार त्या प्रमाणात त्याचा निर्णयावर अधिकार ठरतो.

साहित्य, कला, विज्ञान वेशीबाहेर

विद्वान, कलाकार, शास्त्रज्ञ इत्यादी दुर्मीळ गुणवानांना त्यांच्या खास क्षेत्राबाहेर सर्वसाधारण समाजात विशेष मान नसावा हे समजण्यासारखे आहे. आपल्या तपस्येच्या, व्यासंगाच्या, स्वरांच्या, सुरांच्या आणि रंगाच्या ब्रह्मानंदी कैफात आकंठ बुडालेल्यांना राजदंडाचे किंवा अर्थसत्तेचे काय सोयसुतक असायचे? "तू भला धनवान असलास तरी मीही शास्त्रवेत्ता आहे; तू लढाईत जिंकतोस तर मी वादविवादात; तुझ्याकडे नोकरचाकर असतील तर माझीही शिष्यपरंपरा आहे. तू मला मानत नसशील तर मीही तुला तुच्छ मानून निघून जातो." अशी निःस्पृहता भर्तृहरीसारखे विद्वान दाखवीत. आता ही जात शिल्लक नाही, ही गोष्ट अलहिदा.

शापादपि शरादपि

शस्त्रे कारखान्यात तयार होतात; पण त्यामागील विज्ञान संशोधकांचे आणि वैज्ञानिकांचे असते. कारखानदारांनी राजकारणावर मात केली खरी; पण अजून वैज्ञानिकांनी कारखानदारांवर मात केलेली नाही. अणुबॉम्ब तयार करण्याची शक्यता दुसऱ्या महायुद्धाच्या काळात स्पष्ट झाली तेव्हा राजकारण्यांच्या हाती असले भयंकर अस्त्र येऊ नये असे प्रयत्न काही वैज्ञानिकांनी एकत्र येऊन केले; पण सफल झाले नाहीत. वैज्ञानिकांचा लढा आजही जास्तीत जास्त बौद्धिक

संपदेच्या हक्काकरिता आहे. समाजातील सार्वभौम सत्ता हाती घेण्याचे त्यांच्या मनाला अद्याप शिवलेलेही नसावे. जेम्स बाँडसारख्या कादंबऱ्यांत एखाद्या अफलातून शोधामुळे, जगातील सर्व सत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणारा खलनायक दाखविला जातो. उद्या कदाचित महाभयानक अस्त्र-पृथ्वीचा विनाश करण्याची ताकद असलेले अस्त्र हाती असलेला कोणीही शास्त्रज्ञ सर्व पृथ्वीचे अपहरण करू शकेल.

काठीने म्हैस आणि मान्यता

प्लेटोने तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यावर राज्यपद मिळालेल्या तत्त्वज्ञाची कल्पना मांडली होती. विद्वान आणि वैज्ञानिक यांच्या हाती सत्ता पुढेमागे येईलही; पण ती हिंसाचार करण्याच्या त्यांच्या ताकदीने येईल, व्यासंगाच्या आणि संशोधनाच्या तपस्येमुळे नाही.

राजकारणात शिरगणती; अर्थकारणात संपत्ती अशा लहानमोठेपण ठरविण्याच्या साध्या-सोप्या आणि निश्चित फूटपट्ट्या आहेत. विद्वता, विज्ञान, कला या क्षेत्रात काही फूटपट्ट्या असल्या तर त्या स्पष्ट नाहीत. विद्यापीठांचे कुलगुरू विद्वत्तेच्या आधाराने ठरतात असे स्वत: कुलगुरूही म्हणणार नाहीत. राजकीय सत्तेचा आणि धन सामर्थ्याचा उपयोग यांच्या आधारानेच विद्वान श्रेष्ठ ठरतात. लेखक-कवींचे कंपू बसतात. निवडणुकांची राजकारणे करतात. लेखक मोठा कोण? कवी मोठा कोण? हे ठरवायचे कसे? सरकारी पाहितोषकांच्या रूचीने? पारितोषके आणि खप, मागणी आणि रसिकांची गर्दी या फूटपट्ट्या राजकारण आणि अर्थकारण या क्षेत्रातील आहेत. साहित्य, संगीत, कला, मागणी आणि रसिकांची गर्दी या फूटपट्ट्या राजकारण आणि अर्थकारण या क्षेत्रांतील आहेत. साहित्य, संगीत, कला, विज्ञान क्षेत्रांतील नाहीत. या गुणवाणांना समाधान देणारी दाद दुसऱ्या गुणवंतांची; पण त्या दादीने भाकरी मिळत नाही; रेफ्रिजरेटर आणि गाडीतर नाहीच नाही! विद्यापीठात कला, विज्ञानासंबंधी संस्थांत त्यांची त्यांची स्वतंत्र्य सार्वभौम सत्ताकेंद्रे तयार करायची म्हटली तर निवड कोणत्या निकषाने व्हायची हे ठरणेच कठीण आहे.

मनुष्य अजूनही रानटी आहे. ज्याच्या हाती काठी त्याची म्हैस हाच नियम सगळीकडे लागू आहे. काठी पूर्वापारपासून शस्त्रधाऱ्यांच्या हाती राहिली, आता ती उद्योजकांच्या हाती राहिली, उद्या वैज्ञानिकांच्या हाती जाईल. श्रेष्ठत्व दाखवण्यासाठी म्हशीहाक्याची काठी हातात घेणे एवढा एकच मार्ग असेल तर ते मोठे दुर्दैव म्हणावे लागेल.

(८ जुलै १९९३)

■■

अणुबॉम्ब निर्मितीबाबत साकल्याने विचार करण्याची गरज

लालकृष्ण अडवाणी यांनी अणुबॉम्ब बनवावा असे म्हटले आहे. "बॉम्ब तयार करायचा किंवा नाही हा निर्णय करण्याचा अधिकार आम्ही राखून ठेवतो आहोत." असा खास मध्यममार्गी पवित्रा नरसिंह राव यांनी घेतला आहे. थोड्याच काळात बॉम्ब न बनवण्याचे अभिवचन भारताने जगाला द्यावे असा दबाव अमेरिका आणि इतर 'अणू आहेरे' देशांकडून येणार आहे.

डंकेल प्रस्तावावर काहीच दंगल उडाली नाही अशी अणू प्रसारबंदी करारावर उडणार आहे. पुन्हा एकदा 'स्वदेशी' सार्वभौमत्व, 'अमेरिकन साम्राज्यवादी' इत्यादी शब्दांची राणा भीमदेवी फेकाफेक होणार आहे. हे सगळे प्रकरण काय आहे हे थोडक्यात लक्षात घेतले पाहिजे.

ना बहादुरी, ना सच्चाई

पहिली गोष्ट – अणुबॉम्ब हाती असण्यात कोणतीही मोठी बहादुरी राहिलेली नाही, अणूचे विभाजन करण्यात विज्ञान आणि तंत्र दोन्ही पातळ्यांवर कठीण किंवा गूढ असे काही उरलेले नाही. पुरेसे उत्सर्जन द्रव्य मिळाले तर पदार्थ विज्ञानशास्त्राचा किंवा अभियांत्रिकीचा कोणीही सामान्य विद्यार्थी घरातील गॅरेजमध्येसुद्धा अणुबॉम्ब बनवू शकतो. विज्ञानाच्या विकासाकरिता अणुविभाजन करण्याची काही आवश्यकता राहिलेली नाही. उत्सर्जन द्रव्य बऱ्या प्रतीचे, पुरेशा प्रमाणात असले, की अणुबॉम्ब बनविण्यात कठीण असे काही नाही.

दुसरी गोष्ट – भारतीय अणुबॉम्ब आज बनला तरी तो चोराचोरीतून आणि अप्रामाणिकपणातून जन्मलेला असेल. अणुविभाजनाच्या शांततामय उपयोगासाठी आणि संशोधनासाठी अणुराष्ट्रांच्या मदतीने भारतात अणुवीज केंद्रे उभी राहिली. या केंद्रांत तयार होणाऱ्या उत्सर्जन द्रव्यांची विल्हेवाट कराराप्रमाणे न लावता ती साठवून ठेवल्यामुळे भारताला बॉम्ब बनवणे शक्य झाले आहे. भारताने

बॉम्ब बनवणे म्हणजे सिंहाची शिकार नाही, खोकडाचे शवखादन आहे.

शस्त्र नसलेले अस्त्र

मुद्दा तीन – अणुबॉम्ब संपादन केल्यामुळे भारताच्या संरक्षण सामर्थ्यात काहीही मोठा फरक पडणार नाही. अणुयुद्धात विजेता कुणीच असू शकत नाही. शीतयुद्धाच्या काळात रशिया आणि अमेरिका या महासत्तांनासुद्धा अन्नवस्त्रांचा उपयोग फक्त धाक दाखवण्यापुरता झाला. रशियन साम्राज्य कोसळत असतानादेखील आपल्याबरोबर जगाचा विनाश करण्याचा विचार झाला नाही. अणुबॉम्बने सामर्थ्य मिळते त्यापेक्षा जबाबदारी जास्त वाढते. हिंदुस्थानसारख्या गरीब राष्ट्रांना त्याचा आर्थिक बोजाही न सोसणारा आहे.

हिंदुस्थानी बॉम्ब वापरणार कोणाविरुद्ध? श्रीलंकेविरुद्ध नाही, चीनविरुद्ध नाहीच नाही, राहता राहिला पाकिस्तान; त्यावर एक डझनभर बॉम्ब टाकता येतील. पाकिस्तानही तितकेच बॉम्ब टाकू शकेल. आंतरराष्ट्रीय व्यवस्था अशा परिस्थितीत इतकी कडाडून कोसळेल, की विजयाला काहीच अर्थ उरणार नाही. कोणतीही समस्या अणुबॉम्बचा वापर करून सोडवण्याच्या लायकीची नाही. युद्धाच्या दृष्टीने अणुबॉम्ब निव्वळ निरुपयोगी गोष्ट आहे. तेवढ्याच खर्चात संरक्षणाची कितीतरी अधिक प्रभावी यंत्रणा तयार करता येईल.

मुद्दा चार – अणुबॉम्बची चैन हिंदुस्थानसारख्या, गारीब देशात परवडणारी नाही, त्याकरिता लागणारी साधनसामग्री शास्त्र आणि विज्ञान किंवा विकासाच्या इतर कोणत्याही कामाकरिता वापरली तर त्यातून अणुबॉम्बच्या बेगडी ऐटीऐवजी खराखुरा महान भारत राहू शकेल.

'आहे रे'च्या चिंता

हे चार मुद्दे स्पष्ट झाले म्हणजे शेवटचा आणि सर्वांत महत्त्वाचा विषय स्पष्ट होईल. अमेरिका आदी 'आणु आहे रे' हे देश विनाकारण दादागिरी करून हिंदुस्थानसारख्या देशावर निर्णय लादतात, आमचा अपमान करणे, आमच्या सार्वभौमत्वाला धक्का लावणे, एवढाच त्यांचा दुष्ट हेतू आहे असे अनेकांना वाटते.

'आहे रे' राष्ट्रांना वाटणारी चिंता समजावून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अणुबॉम्ब संपादन केलेल्या सर्व राष्ट्रांना ज्याच्या त्याच्या हाती अणुबॉम्ब गेला तर काय परिस्थिती उद्‌भवेल याबद्दल चिंता वाटणे साहजिक आहे. देशात जसे शस्त्रनियंत्रण तसे जगात अणुनियंत्रण पाहिजे असे त्यांना वाटते. अणुवीज केंद्रातील उत्सर्जन द्रव्यांची विल्हेवाट व्यवस्थित लागते किंवा

नाही यावर आंतरराष्ट्रीय देखरेख असावी, असा त्यांचा आग्रह आहे. अणुबॉम्बचा प्रसार होऊ नये यासाठी एक आंतराष्ट्रीय करारही करण्यात आला. जगातील बहुतेक 'अणू नाही रे' राष्ट्रांनी त्यावर सही करून अणुबॉम्ब तयार करण्याचा आपला, इरादा नसल्याचे अभिवचन दिले आहे. त्याला एक अपवाद : हिंदुस्थान!

'आहे रे!' राष्ट्रांच्या मदतीवर जगणाऱ्या हिंदुस्थानने या करारांवर सही करण्यास नकार दिला. "आम्ही शांततापिय आहोत, आम्हाला बॉम्ब बनवण्यात काही स्वारस्य नाही. अणुस्फोटाचे प्रयोग संपूर्णत: बंद झाले पाहिजेत. 'अणु आहे रे' राष्ट्रांनीसुद्धा प्रयोग थांबवले पाहिजेत अशा जागतिक अणुबंदीत भारत सहभागी होईल. याउलट 'आहे रे' राष्ट्रांनी वाटेल तितके अणुस्फोट करावेत आणि 'नाही रे' देशांनी कायमचा अणुसंन्यास घ्यावा हे न्याय्य नाही, नैतिक नाही. यामुळे साऱ्या जगावर 'अणू आहे रे'ची सत्ता होईल." असा भारताचा थोडक्यात युक्तिवाद.

भिक्षेकऱ्यांची दंडेली

त्या काळात संयुक्त राष्ट्र संघात आपले प्रतिनिधी अनेक प्रश्नांवर अशातऱ्हेची नैतिक टुरटूर ऐकवत. बनारसच्या भिकाऱ्याने समोरच्या दात्यास मोक्षमार्गाचा उपदेश करावा असला हा प्रकार; पण मोठ्या राष्ट्रांची स्थिती बोलता येत नाही आणि सहनही करता येत नाही अशी होती. दोन महासत्तांच्या शीतसुद्धांचा तो काळ, कित्येक किरकोळ देश दोन महासत्तांच्यामध्ये लपाछपीचा खेळ करून आपली हिंमत आणि आढ्यता यांचे प्रदर्शन करीत. सारे जग डोक्यावर तलवार टांगल्याप्रमाणे धास्तीत जगत होते.

आज अणुबॉम्ब नसलेल्या तिसऱ्या जगातील देशांत अणुबॉम्बची जबाबदारी पेलणारे नेतृत्व असेल किंवा नाही याची 'आहे रे' राष्ट्रांना खात्री नाही. हा धोका घेण्यासारखा विषय नाही. इस्त्राईलकडून वारंवार धूळ खाल्लेल्या अरब लोकांत आणि राष्ट्रप्रमुखात एखादा जरी मुस्लामी बॉम्ब हाती लागला तर इस्त्राईल संपवून टाकू, मग काय प्रलय ओढवायचा असेल तो ओढवो अशी टोकाची भावना होती. कोणत्याही क्षणी लष्करातील कोणीही अधिकारी रणगाड्यांच्या ताकदीवर सत्ता बळकावू शकतो, अशा मर्कटाच्या हाती अणुबॉम्ब लागला तर काय होईल? एखाद्या दहशतवादी संस्थेच्या हाती अणुबॉम्ब लागला तर त्याचे काय भयानक परिणाम होतील याची चिंता 'आहे रे' देशांना वाटते.

शीतयुद्ध संपताच, हीच वेळ थोडी शिस्त आणण्याची आहे असे ठरवून त्यांनी काम सुरू केले. पहिला बडगा इराकला दाखवण्यात आला; पण त्याबरोबरच

इस्त्राईलसारख्या दोस्त राष्ट्राला सगळे काही विसरून तडजोड स्वीकारायला भाग पाडण्यात येत आहे. उत्तर कोरियाला शिस्त लावली, की त्यानंतर मोर्चा हिंदुस्थान आणि पाकिस्तानकडे वळणार आहे.

त्रिशूल आणि अणुबॉम्ब

या दोन्ही देशांबद्दल जगाला मोठी चिंता आहे. देशातील मूठभर पाश्चात्त्य विद्याविभूषित लोकांनी भीक, मदत, उसनवारी, खरेदी किंवा चोरीच्या मार्गाने बरेचसे तंत्रज्ञान मिळवले आहे आणि आधुनिकतेचा देखावा केला आहे. एवढा भाग सोडल्यास बाकी सारा देश मध्ययुगातच आहे. हिंदुस्थानात अजूनही मंदिर-मशीद, मंडल असल्या प्रश्नांवर सत्तांतर होऊ शकते आणि 'डॉन क्विक्झोटा'च्या हाती सत्तेच्या खुर्चीबरोबर अणुबॉम्ब जाऊ शकतो. पाकिस्तानमध्ये तर आजच जबाबदार नेतेदेखील काश्मीर प्रश्न सोडवण्यासाठी अणुबॉम्बची गरज असल्याचे खुलेआम बोलतात. काश्मीर हातचा जाण्याची वेळ आली तर एका बॉम्बमध्ये सारा प्रश्न संपवून टाकावा असे मानणारे हिंदुस्थानातही अनेक आहेत.

आधी पात्रता कमवावी

नवी जागतिक व्यवस्था अशी स्थिती स्वीकारू शकतच नाही. विकासाकरिता आणि रोजच्या रोटीकरिता तुम्ही मदतीवर अवलंबून आहात, स्वत:च्या प्रज्ञेने तुम्ही अजून १०० वर्षे तरी अणुबॉम्ब बनवण्याच्या अवस्थेस पोचला नसता; खुल्या व्यवस्थेसाठी परदेशी गुंतवणूकदारांची तुम्ही याचना करता आहात, मुकाट्याने काश्मीर प्रश्नावर समझोता करा आणि अणुबॉम्ब बनवण्याच्या वाह्यात कल्पना सोडून द्या. असा दबाव ते दोन्ही देशांवर आणणार आहेत.

भारत आणि पाकिस्तान सरकारे अडेलतट्टूपणा करणार आहेत. दोन्ही देशांच्या लोकांनी सुज्ञपणा दाखवला पाहिजे. जगातील कोणताही प्रश्न अणुबॉम्बच्या संहाराने सोडवण्याच्या योग्यतेचा नाही; तडजोड करावी लागली, असा डंख मनाला लागला तरी त्याचे दु:ख शमवण्याकरिता साऱ्या पृथ्वीगोलाचे भवितव्य धोक्यात आणणार नाही; अणुबॉम्ब बाळगण्याची पात्रता कमवू आणि मगच तो बनवू अशी स्पष्ट भूमिका लोकांनी घेणे आवश्यक आहे.

(१५ जुलै १९९३)

■■

महालनोबिस ते हर्षद मेहता

मोठा चमत्कारिक दुहेरी योगायोग आहे. प्रोफेसर प्रशांतचंद्र महालनोबिस आज जिवंत असते तर १०० वर्षांचे झाले असते. यानिमित्त कोलकत्यात त्यांनी स्थापन केलेल्या 'भारतीय संख्याशास्त्र संस्थान' येथे एक मोठा थाटामाटाचा समारंभ झाला या समारंभास खुद्द पंतप्रधान हजर होते.

'स्टॅलिन' विकासाचे सूत्रधार

डॉ. महालनोबिस नाव गाजले ते दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळापासून उद्योगधंद्यांना आणि विशेषत: भारी उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देणे यांचा त्यांनी पुरस्कार केला. महालनोबिस म्हणजे सहकारी उद्योगधंदे आणि सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व असे समीकरणच होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनांचा आराखडा महालनोबिस यांच्या हातचाच.

शताब्दी आणि मृत्युलेख

मोठा दुष्ट योगायोग असा, की महालनोबिस साहेबांची शंभरी साजरी करण्याच्या समारंभात पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांना घोषणा करावी लागली, "औद्योगिक उत्पादन हे सरकारचे क्षेत्र नाही. ते खासगी क्षेत्रातच राहील. सरकारचे काम अन्याय आणि विषमता दूर करणे हे आहे." थोडक्यात शताब्दी समारोह महालनोबिस या व्यक्तीचा झाला; पण त्याच क्षणी त्यांच्या कामगिरीचा मृत्युलेख लिहिला गेला.

विद्वानांची समीकरणे

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून महालनोबिस यांच्या नेतृत्वाखाली अर्थशास्त्री आणि संख्याशास्त्री सगळ्या देशाचे आपण भाग्यविधाते असल्याच्या डौलात मिरवू लागले ते अगदी परवा परवापर्यंत. या काळात त्यांनी जो 'पोरखेळ' केला, त्यावर नजर टाकली तर विश्वास ठेवणे आजच कठीण झाले आहे, थोड्या दिवसांत अशक्य होईल.

एक गणिती समीकरण, त्यात काही इंग्रजी अक्षरे, काही ग्रीक, त्यामुळे समीकरणात काही प्रचंड गूढ विद्वत्ता असल्याचा आभास. समीकरणाचा थोडक्यात अर्थ काय? कोणच्याही देशातील लोकांची बचत करण्याची ताकद किती? आणि त्याच देशात भांडवलाची उत्पादकता किती? या दोन प्रश्नांचे उत्तर मिळाले, की सुयोग्य आणि संतुलित विकासाची गती साध्या गुणाकाराने मिळते, असा या समीकरणाचा अर्थ. या सगळ्या जडजबाल गुंतागुंतीचा अर्थ काय? हिंदुस्थानात एकूण उत्पादनाच्या १२% बचत होते असे समजले आणि १०० रुपयाची भांडवल गुंतवणूक केली तर २५% वार्षिक उत्पादनात वाढ होते असे धरले तर २५% गुणिले १२% म्हणजे ३% दराने देशाचा विकास होणे आवश्यक आहे; पण व्यवहारात बचतक्षमता आणि उत्पादकता या गोष्टी सतत बदलणाऱ्या आहेत. किंबहुना त्या बदलणे हे कोणत्याही अर्थव्यवस्थेचे काम आहे. त्या स्थिर आहेत असे गृहीत धरले तर हे समीकरण २+२=४ इतके स्वयंसिद्ध आणि निरर्थक होते. या असल्या पोरकट खेळाने त्या काळी अर्थशास्त्री मोठे स्तिमित आणि प्रभावित झाले होते.

दोन 'कमलभक्षी'

महालनोबिस हे तसे मोठे बहुरंगी आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व होते. मुळात ते पदार्थविज्ञानशास्त्राचे विद्यार्थी; पण त्यांना संख्याशास्त्र, अर्थशास्त्र, हवामानशास्त्र, संगीत अशा अनेक विषयांत मोठी रुची होती. तागाचे पीक, वेगवेगळ्या वंशांच्या माणसांच्या शरीररचना, हवामानाचे अंदाज, अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत फिशर आणि शेवार्ट या संख्याशास्त्रज्ञाच्या पद्धती त्यांनी वापरल्या. शास्त्रज्ञ म्हणून काही मूलभूत संशोधन त्यांच्या नावाने रुजू नाही; पण हिंदुस्थानातील आकडेवारी गोळा करण्यासंबंधी केंद्रीय यंत्रणा आणि नमुना पद्धतीने पाहणी करण्याची राष्ट्रीय व्यवस्था यांच्या उभारणीत महालनोबिस यांचे मोठे श्रेय आहे. शास्त्रज्ञापेक्षा संघव्यवस्थापकापेक्षा ते शास्त्रप्रशासक अधिक होते. खेळाडूपेक्षा संघव्यवस्थापकाचा तोरा अधिक अशीच परिस्थिती; त्यांचा स्वभाव, प्रकृती आणि व्यक्तिमत्त्व 'रसिकराज' पंडित नेहरूंच्या प्रकृतीशी जुळणारे होते आणि या दोघांचे चांगलेच जुळलेही.

देशाचा विकास-कोट्यवधी लोकांच्या डोळ्यातील आसवे पुसण्याचा कार्यक्रम गंभीर आणि कठोर परिश्रमाचा; पण रसिक राजाच्या दृष्टीने गरिबी दूर करणे म्हणजे इतिहासाने त्यांच्याकडे सोपवलेली रोमहर्षक कामगिरी होती. पुढे व्ही. के. यांनी कौल नावाच्या लष्करी तरुण अधिकाऱ्यास वर चढवले आणि इशान्य

सरहद्दीवर चिनी आक्रमणाच्या वेळी भारताची नाचक्की झाली. तसाच काहीसा प्रकार नेहरू-महालनोबिस संबंधांत झाला. वास्तवापासून दूर कल्पनाविश्वात रममाण होणाऱ्या काव्यप्रकृतीच्या लोकांना इंग्रजीत 'कमलभक्षी' म्हणजे Lotus Eaters म्हटले जाते. जवाहरलाल आणि प्रशांतचंद्र महालनोबिस या दोन 'कमलभक्षी'ची जोडी जमली आणि देशाचे दुर्दैव ओढवले.

कोलकत्त्याचा हस्तीदंती मनोरा

कोलकत्त्यातील संख्याशास्त्र संस्थेला राष्ट्रीय संशोधन संस्था म्हणून मान्यता द्यावी असे बिल संसदेत मांडण्यात आले. ते खुद्द पंडितजींनी मांडले. भाषण करताना पंडितजी म्हणाले, "अशा विद्वानांच्या शास्त्रीय कामाच्या खर्चासाठी त्यांना लोकांपुढे येऊन तोंड वेंगाडण्याची गरज पडता कामा नये. कोलकत्त्याला हस्तीदंती मनोरा तयार करण्यात आला. संस्थेच्या शाखा, कामाचा पसारा वाढला. शेकडो अर्थशास्त्री, संख्याशास्त्री पोटाला लागले. या संस्थेत होणाऱ्या विशुद्ध संशोधनाच्या आधारावर देशातील कोट्यवधी उपाशीपोटी कंगालांचे भवितव्य ठरायचे होते!"

शुद्ध हातचलाखी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत भारी उद्योगधंद्यांवर भर देण्यात आला, हा निर्णय जणू काही या विद्वान पंडिताच्या सर्वसाधारण जनास अगम्ये अशा गणिती समीकरणातून अपरिहार्यपणे आला असा आभास तयार करण्यात आला. समाजवादी रशियात भारी उद्योगांवर भर दिला जातो त्या पद्धतीने हिंदुस्थानातही असेच प्राधान्य देणे हे शास्त्रीयदृष्ट्या अपरिहार्य आहे असा दबदबा पसरवण्यात आला. सत्यस्थिती ही, की गणिती समीकरणातून असा काही निष्कर्ष निघत नव्हता. समीकरण तटस्थ होते, त्यातून पाहिजे ते उत्तर काढता आले असते. या निष्कर्षात डॉक्टर साहेबांची सरळ सरळ हातचलाखी होती. एकूण गुंतवणुकीपैकी ३३% भारी उद्योगधंद्यांवर झाली पाहिजे हे गृहीत धरूनच त्यांनी बाकीची उत्तरे काढली. नेहरूंना काय पाहिजे होते याचा अचूक अंदाज घेऊन डॉक्टरांनी उत्तर काढले होते. नेहरू खुश झाले, मग कोणा अर्थशास्त्रज्ञाने फारसे फाटे फोडले नाहीत. ज्यांनी पंडितजींना विरोध केला, ते बाजूला फेकले गेले. हव्या असलेल्या व्यवस्थेचे शास्त्रीय वाटणारे समर्थन देणारा दुसरा एक 'कमलभक्षी' भेटला होता.

कल्पनारम्य विश्वातील युगुल

गालब्रेथ यांनी या जोडीचे वर्णन मोठे मार्मिक केले आहे. ते म्हणतात, "हे

दोघेही सिडने, वेब, बर्नार्ड शॉ, टॉनी, कोल, हॅरॉल्ड लास्की आणि फेबियन सोसायटीच्या काळातच वावरत होते. त्यांच्या या कल्पनारम्य जगात सौजन्य, ऋजुता आणि बौद्धिक, कुतूहल नांदत होते. त्याच्याबरोबर अर्थकारण प्रामुख्याने सामाजिक, नैतिक निष्ठांशी जोडले होते. समाजवादी व्यवस्थेत काही दुर्लंघ्य प्रशासकीय अडचणी आहेत. आर्थिक प्रेरणा आणि सामाजिक बांधणी यासंबंधी गंभीर अडचणी आहेत, याची फारशी जाणीव नव्हती."

प्रत्येक दुर्दैवी ऐतिहासिक पुरुषाच्या आसपास एक विचित्र व्यक्तिमत्त्व उभे राहते; संभाजीबरोबर कलुषा कब्जी, रशियातील झारबरोबर रासपुतीन, तसेच पंडितजीबरोबर डॉक्टर प्रशांतचंद्र महालनोबिस.

आणखी एक अर्थकारणी

महालनोबिस या ग्रहणातून देश सुटत असतानाच दुसरा एक मोठा विचित्र योगायोग घडून येतो आहे. आर्थिक विकासासंबंधी आणखी एक थिल्लर विचार मोठ्या गंभीरपणे मांडला जातो आहे. हा मांडणारा कोणी अर्थशास्त्रज्ञ नाही, परदेशांतून पदव्यांच्या साधा बी. कॉम आहे; पण तरीही बाजारपेठेत जास्तीत जास्त धुमाकूळ घातल्याचे श्रेय त्याच्या लेखी आहे. त्याचे नाव हर्षद मेहता.

लॉर्ड केन्स हा अर्थशास्त्रज्ञांचा 'मुगुटमणी' प्रचंड बुद्धिमत्ता, देदीप्यमान शैक्षणिक पार्श्वभूमी, सुंदर सोपी काव्यमय गद्यशैली, याबद्दल केन्स प्रसिद्ध आहे; पण अर्थशास्त्रज्ञांना त्यांचे विशेष कौतुक वाटते ते काही काळ शेअरबाजारात अचूक खेळी करून केन्सने भरपूर कमाई केली. तसे बहुतेक अर्थशास्त्री बोलण्यात, लिहिण्यात, तरबेज असतात; पण प्रत्यक्ष काही उलाढाल करायची त्यांची ताकद शून्यच असते. त्यामुळे बाजारपेठेतही यशस्वी झालेल्या केन्सचे मोठे नाव आहे.

या फूटपट्टीने बघायचे झाले तर हर्षद मेहतालाही अर्थशास्त्रज्ञ मानायला पाहिजे आणि काही काळ तरी त्याला अशी मान्यता मिळाली. महालनोबिसना नेहरूंनी बोलावून घेतले; हर्षदला तसे कोणी चालवले नाही आणि बोलावले असते तरी तो गेला नसता. पगार, भत्त्याच्या, तुकड्याकरिता धावणारा तो काही पोटभरू प्राध्यापक नाही; पण २९ फेब्रुवारी १९९२ रोजी दूरदर्शनने हर्षदच्या अंदाजपत्रकावरील प्रतिक्रियेला भली मोठी प्रसिद्धी दिली. ११ जानेवारी १९९२ रोजी त्याच्या कामगिरीत कोणतीही अडचण आणू नये असे वित्तमंत्रालयातील एका अधिकाऱ्यांने मुद्दाम मुंबईला येऊन शेअर बाजारातील अधिकाऱ्यांना सांगितले आणि त्यानंतर महिन्याभरात वित्त मंत्रालयाचे प्रमुख सचिव गीता कृष्णन यांच्या

चेंबरमध्ये हर्षदचे मोठे स्वागत झाले आणि कसेबसे बी. कॉम. पास झालेल्या हर्षदने अर्थ सचिवांना बचत, भांडवल गुंतवणूक आणि देशाचा आर्थिक विकास, या विषयावरील आपले सिद्धांत ऐकवले. नवे आर्थिक धोरण देशात भरभराट आणणार आहे ही ग्वाही देणारा खास साक्षीदार म्हणजे हर्षद.

हर्षद मेहताचा सिद्धांत काही महालनोबिस सिद्धांतापेक्षा जास्त पोरकट नाही. महालनोबिसांचे म्हणणे भारी उद्योगधंद्यांत पैसे टाका भरभराट होईल. हर्षदचे म्हणणे, पैसे शेअर बाजाराकडे वळवा; शेअर बाजार चढता राहिला म्हणजे नवीन उद्योगधंद्यांकरिता भांडवल उभे करणे सहज शक्य होईल आणि देशाची भरभराट होईल. त्यासाठी काही हातचलाखी करावी लागेल; पण महाविद्वान महालनोबिसनेही तेच केले होते. हर्षद मेहताकडे अर्थशास्त्रातील डॉक्टरेट असती तर त्याला नियोजन मंडळावर नक्कीच नेमले असते.

देशाचा विकास म्हणजे काही आकड्यांचा, समीकरणांचा आणि चलनांचा खेळ आहे असे मानणाऱ्यांच्या हाती भवितव्याच्या दोऱ्या जातात. निदान काही काळ तरी जातात. एवढी दुर्दैवी जाणीव या महालनोबिस शताब्दी आणि हर्षद प्रकरण या दुहेरी योगायोगातून झाली तरी पुरे.

(१६ जुलै १९९३)

■■

गुलामांच्या बेड्या तर काढा!

देशात खुली व्यवस्था जाहीर व्हायचा अवकाश, की भांडवलाचे लोटच्या लोट हिंदुस्थानात येऊ लागतील अशी काहींना आशा वाटत होती; तर काहींना भीती. ४० वर्षे बंद ठेवलेले दरवाजे आपण उघडले म्हणजे प्रवेश करण्यासाठी उत्सुक भांडवल दरवाजाबाहेर आत यायला अगदी आतुर होऊन बसलेले असेल आणि ते आनंदाने थाटामाटात प्रवेश करेल ही कल्पना खोटी ठरली.

अनिवासी भारतीय असोत की परदेशी गुंतवणूकदार असोत, बाहेरून भारतात भांडवल आणायला कोणीच फारसे उत्सुक नाही. हे असे का?

जीवाची खात्री नाही

सगळ्या कारणांपैकी एक कारण खुद्द पंतप्रधानांनीच सांगितले आहे. अयोध्या प्रकरण, नंतरच्या जातीय दंगली, मुंबईचे स्फोट यांमुळे अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. त्यामुळे परदेशी गुंतवणूक बुजली असे ते म्हणाले. पंतप्रधानांनी स्पष्ट म्हटले नाही ते हे, की सरकारच्या कायदा सुव्यवस्था राखण्याच्या सामर्थ्याबद्दलच गेल्या ६ महिन्यांत जगभर शंका तयार झाली आहे. अशा परिस्थितीत परकीय भांडवलाने थोडी धास्ती बाळगावी आणि प्रवेश करायला कां कुं करावे हे साहजिक आहे; पण यापलीकडेही महत्त्वाची अशी निदान दोन कारणे आहेत.

नोकरशाही होती तशीच

उद्योगधंदे उघडण्यासंबंधी काही निर्बंध कमी झाले; आयात-निर्यातीवरील नियंत्रणे दिली गेली; रुपया बराचसा परिवर्तनीय झाला; परकीय भांडवल देशात आणण्यासंबंधीच्या शर्ती काहींशा आकर्षक झाल्या; हे सगळे खरे; पण तरीही परदेशी भांडवल निर्धास्तपणे विश्वासाने पाऊल टाकायला तयार नाही. हे नवे धोरण खरेच टिकाऊ आहे किंवा नाही याबद्दल कोणाची खात्री नाही. नोकरशाही, तिची विक्षिप्त वागणूक यांचा चाळीस वर्षांचा अनुभव इतक्या लवकर थोडाच विसरला जाणार आहे? या सगळ्या सुधारणा म्हणजे सापळ्यात आपणास

पकडण्याठी लावलेले भक्ष्य तर नाही ना? अशी शंका परकीय गुंतवणूकदारांच्या मनात अजून आहेच. पंतप्रधानांनी, वित्तमंत्र्यांनी परदेशांतील दौऱ्यात कितीही आश्वासने दिली, आता परत नियंत्रण व्यवस्थेकडे जाण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही असे कितीही ठामपणे सांगितले तरी त्यावर विश्वास बसत नाही.

नोकरशाही शाबूत

या अविश्वासाचे कारण उघड आहे. नियंत्रणाची, लायसेंस परमीट राज्याची व्यवस्था अबाधितपणे चालवणारी नोकरशाही अजून जशीच्या तशी जागेवर आहे. नव्या नोकरदारांची भरती चालूच आहे. थोडक्यात खुल्या व्यवस्थेची घोषणा झाली, तरी नियंत्रणाची सरकारी व्यवस्था आणि चौकट अजून शिल्लक आहे. कोणा नियंत्रणाकडे परत जाण्याचाच नव्हे तर परकीय भांडवल जप्त करण्याचासुद्धा आदेश ते देतील, हे कोणी सांगावे? अलाहाबाद हायकोर्टाचा निर्णय विरुद्ध गेला म्हणून इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली आणि 'समाजवाद' हा शब्द घटनेत घुसडला हा अनुभव ताजा आहे. उद्या दुसरा एखादा पंतप्रधान आपली चामडी किंवा खुर्ची वाचवण्याकरिता 'गरिबी हटाओ' किंवा 'देश बचाओ' अशी काहीतरी घोषणा करून हिरो बनायचा प्रयत्न करीत, अब्जावधींचे परकीय भांडवल जप्त करणार नाही कशावरून? त्यांनी मनात आणले तर तसे करण्याची यंत्रणा सगळीच्या सगळी शाबूत आहे. एका रात्रीत सगळे शासन पुन्हा घूमजाव करू शकेल.

भारतासारख्या देशात धोरणांच्या लहरीपणाबद्दल नेहमीच भीती असते. गेल्या सहा महिन्यांत ती भीती कमी व्हावी असे काहीच घडलेले नाही. मंत्रिगणांच्या शाब्दिक आश्वासनाने ही धास्ती दूर होण्यासारखी नाही. नोकरशाहीचे पद्धतशीरपणे विसर्जन करायला सुरुवात झाली, तरच आर्थिक सुधारणेच्या धोरणावर देशाबाहेरील लोकांचा विश्वास बसेल. कलकत्त्याच्या एका सभेत खुद्द पंतप्रधानांनी म्हटले की कारखानदारी उत्पादन हा सरकारचा विषय नाही; मग कारखानदारीसंबंधीचा सगळा नोकरवर्ग कमी का केला जात नाही? तो जोपर्यंत जागेवर आहे तोपर्यंत बाहेरून यायचे भांडवल मनात धास्ती बाळगणारच. शासनाबद्दल किंवा पंतप्रधानाबद्दल बरे बोलण्याचे त्यांच्यावर काही बंधन नाही, त्यांच्या गुंतवणुकीसाठी अनेक देशांत हमरीतुमरी चालू असताना असला धोका त्यांनी का स्वीकारावा?

जुनी यंत्रणाही शाबूत

कोणा पंतप्रधानाने असे घूमजाव करायचे ठरवले, तर त्याला अडचण कोणाचीच नाही. सुधारणेबद्दलच्या सर्व घोषणा आणि आश्वासने जुजबी दस्तावेजातली आहेत. औद्योगिक धोरण, आयात-निर्यात धोरण, अंदाजपत्रकाचे भाषण असले

जुजबी कागदोपत्री मांडलेले धोरण एका रात्रीत उलटवता येते. भारतीय घटना अजून 'नेहरू'वादीच आहे. ती वापरून, खुल्या अर्थव्यवस्थेचा 'चक्का जाम' होऊ शकतो.

आजच्या भारतीय घटनेत नागरिकांना मालमत्तेचा हक्क नाही, म्हणजे मालमत्ता कमावणे, तिचा उपभोग घेणे व विल्हेवाट लावणे यांचे स्वातंत्र्य भारतीय नागरिकांना नाही. घटनेतील तरतुदीप्रमाणे कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वाच्या अंमलबजावणीचे नाव घेऊन, सार्वजनिक हिताची घोषणा करून, शासन कोणतीही मालमत्ता, उद्योगधंदा ताब्यात घेऊ शकते. अशा सरकारी कार्यवाहीविरुद्ध कोर्टापुढे जाणे जवळजवळ अशक्य आहे. मूलभूत हक्काचा भंग झाला हा युक्तिवाद करता येत नाही. मोबदला मिळालेला नाही किंवा मिळालेला मोबदला अपुरा आहे. अशी तक्रार ऐकून घेण्याचा अधिकार कोर्टालाच नाही. मालमत्ता ताब्यात घेतल्याने कोणतेच सार्वजनिक हित साधले नाही. हे उघड असले तरीदेखील कोर्टात काहीच करता येत नाही. भारतीय घटनेत एक अजब चीज आहे. ९ व्या परिशिष्टामध्ये मालमत्तेसंबंधीच्या २५७ कायद्यांची यादी आहे. या कायद्यांना कोणत्याही प्रकारे आव्हान देण्यासाठी कोर्टाकडे धाव घेता येतच नाही; अशी ही भयानक सुलतानी तरतूद आहे. अशा तरतुदी ज्या देशाच्या घटनेत आहेत त्या देशात बाहेरून भांडवल येईल कसे?

मालमत्तेचा हक्क नाही

खासगी मालमत्तेचा हक्क हा खुल्या व्यवस्थेचा पाया आहे. या देशात खासगी मालमत्तेचा हक्कच नाही, तिथे खुली व्यवस्था निर्धास्तपणे कशी नांदेल? शासनाची मर्जी फिरली तर अब्जावधींचे भांडवल ते केव्हाही ताब्यात घेऊ शकते. अशी टांगती तलवार डोक्यावर तळपत असता भांडवलाने विश्वास ठेवावा कसा? विशेष म्हणजे आपल्या घटनेतील मालमत्तेचा हक्क जाणीवपूर्वक काढून टाकण्यात आला आहे. १९५० मध्ये देशाने स्वीकारलेल्या घटनेत नागरिकांना मालमत्तेचा हक्क होता. कोणाही नागरिकाची मालमत्ता सार्वजनिक कामासाठी आवश्यक असेल, तर योग्य त्या कायद्याने आणि योग्य ती भरपाई देऊनच सरकारला तिचा ताबा घेता येई अशी तरतूद होती; पण घटना स्वीकारल्यानंतर वर्षभरातच मालमत्तेच्या हक्कावर हल्ले चालू झाले. जमीनदारी नष्ट करण्याबद्दल देशात फारसे दुमत नव्हते; त्यामुळे जमीनदारी नष्ट करण्याचे कारण सांगून मालमत्तेच्या हक्काचा संकोच करायला सुरुवात झाली. हळूहळू जमीनदाराविरुद्ध केलेल्या तरतुदी सगळ्या शेतकऱ्यांना लागू करण्यात आल्या. कमाल जमीनधारणेचे कायदे झाले. जमीन संपादनाचे कायदे झाले, त्या कायद्यांना

कोर्टाने बाद ठरवले. कोर्टाचे निवाडे रद्द ठरवण्याकरिता घटनेत दुरुस्त्या करण्यात आल्या. शेवटी परिणाम असा झाला, की घटनेतील मालमत्तेचा हक्क देणारे कलम १४ (१) (फ) राहिलेच नाही.

गुलामांच्या बेड्या काढा

परदेशी भांडवलाला मनात आपल्या नव्या आर्थिक सुधारणांच्या धोरणाविषयी विश्वास निर्माण करायचा असेल, तर १९५१ मध्ये मालमत्तेच्या हक्कासंबंधी घटनेत ज्या तरतुदी होत्या त्या पुन्हा प्रस्थापित कराव्या लागतील.

आर्थिक स्वातंत्र्याचे युग प्रत्यक्ष उतरवण्याचा कार्यक्रम दिल्लीत अंतःस्फूर्तीने आलेला नाही, आंतरराष्ट्रीय ऋणकोंच्या दबावामुळे तो आला आहे. भारतासारख्या शंभरावर आजारी अर्थव्यवस्थांच्या आंतरराष्ट्रीय इस्पितळात औषधोपचारांची ही योजना ठरली आहे. हे औषध, पथ्यपाणी नीट समजून उमजून घेतले पाहिजे. नेहरू व्यवस्था घातक होती; ती संपली हे देशाचे अहोभाग्य म्हटले पाहिजे. ती व्यवस्था पुन्हा येण्याची सूतराम शक्यता नाही. असा दृढ विश्वास दिल्लीच्या शासनात नाही. असा विश्वास असता तर जुजबी फिरवाफिरव करण्याऐवजी नेहरू-व्यवस्थेच्या सगळ्या यंत्रणेची साकल्याने पाहणी करून, ती निकालात काढून नव्या सुधारणांची सुरुवात झाली असती.

मध्ययुगात गुलामांना संपत्ती बाळगण्याचा अधिकार नसे. मनूने शूद्रांना घरात एक पैसासुद्धा ठेवण्याला बंदी केली होती. १९७९ मध्ये सगळे भारतीय नागरिक शूद्र गुलाम झाले आहेत आणि अशा गुलामांना घेऊन सरकार खुल्या अर्थव्यवस्थेकडे जाऊ पाहत आहे.

अन्यथा खुलेपण खोटे

नोकरशाही आणि तिचा खर्च आटोक्यात आणल्याखेरीज आणि घटनेमध्ये मालमत्तेचा हक्क किमान प्रस्थापित केल्याखेरीज परदेशी भांडवल देशात येणार नाही आणि येथील मालाची निर्यातही होऊ शकणार नाही. वर नोकरशहा आणि खाली गुलाम नागरिक असे एकूण चित्र डॉ. मनमोहन सिंग यांनी उघडलेल्या दरवाजातून दिसत आहे. पाहणाऱ्यांच्या मनात शंका आहेत.

प्रवेश करणाऱ्यांच्या पाठीत बडगा घालण्याची कोणा माथेफिरू पंतप्रधानाची इच्छा झाली, तरी त्याच्या हातात तशी ताकद असणार नाही हे स्पष्ट झाले तर खुल्या अर्थव्यवस्थेबद्दल विश्वास तयार होईल. देशाबाहेर आणि आतही!

(२२ जुलै १९९३)

■■

भारताची खरी संसद

वार्षिक परीक्षा एकदा आटोपली. शेवटचा पेपर टाकला म्हणजे मुले जशी खुश होतात तसे, दिल्लीतील सगळ्या मंत्रालयात 'सुटलो एकदाचे' असे वातावरण पसरले. दरवर्षी हे असेच घडते. जुलै महिन्याचा पहिला आठवडा जसजसा जवळ येत जातो तसतसे दिल्लीच्या सगळ्या 'भवनात' वातावरण तंग होत जाते. शाळेच्या तपासणीसाठी 'दिपोटी' येणार असला म्हणजे सगळ्या मुलांच्या वह्या, पुस्तके ठाकठीक करून घेण्यात येतात. त्याचप्रमाणे सगळी मंत्रालये आपापली कामगिरी सजवून, वाढवून सुबक रीतीने पुढे मांडायच्या धांदलीत असतात.

'दे दान' परिषद

ही सगळी घाईगर्दी कशासाठी? दरवर्षी जुलै महिन्याच्या सुरुवातीला पॅरिस शहरी एक बैठक भरते. या बैठकीत भारताला मदत करणाऱ्या सगळ्या श्रीमंत राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित राहतात. थोडक्यात ही आपली 'दे दान' परिषद.

जुलै महिना आला, की वर्षभर मारलेल्या देशाच्या प्रगतीच्या बढाया आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या वल्गना थंडावतात. हातामध्ये कटोरी घेऊन भारताचे शिष्टमंडळ या बैठकीस जाते. बैठकीचे कामकाज शुद्ध तांत्रिक स्वरूपाचे. इतर सर्व मंडळी अर्थकारणातील जाणकार दर्दी असतात. तस्मात भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व वित्तसचिव करतात, कोणी मंत्री नाही.

आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीतील तूट भरून काढण्यासाठी 'दे दान' मंडळाने चांगली भरघोस मदत करावी अशी विनवणी करण्याकरिता हे शिष्टमंडळ जाते. अर्थातच दाते याचकाची परीक्षा घेतात. त्याला प्रश्न विचारतात. देशातील अर्थव्यवस्थेबद्दल, अंदाजपत्रकी त्रुटींबद्दल, सार्वजनिक क्षेत्रांच्या कामगिरीबद्दल, अकार्यक्षमतेबद्दल इ. इ. या प्रश्नांना उत्तर म्हणून सचिव मोठ्या अजिजीने

आपली कैफियत पुढे मांडतात. देशापुढे समस्या किती गंभीर आहेत, तरीही शासन किती शिकस्तीचा प्रयत्न करीत आहे, ते प्रयत्न अपुरे पडतात, हे खरे आहे; पण यापुढे आम्ही पराकाष्ठा करू, परिस्थितीत आणखी सुधारणा घडवून आणू, याच ठशाचे उत्तर सर्व प्रश्नांना दिले जाते.

वार्षिक 'कुर्निसात'

भारताला दान किती द्यायचे याचे आकडे प्रत्येक दात्याने आधी तपशीलवार अभ्यास करून ठरवलेले असतात. पॅरिसच्या बैठकीत त्यात कधी मोठा फरक होतो असे नाही; पण तरीही पॅरिसला जाऊन 'कुर्निसात' घालून येण्याचा कार्यक्रम करावाच लागतो.

मिळणारी मदत दोन प्रकारची असते. प्रकल्पाकरिता बांधील मदत आणि खुली मदत. हिंदुस्थान सरकारचा प्रयत्न जास्तीत जास्त प्रमाणावर खुली मदत मिळवण्याचा असतो. म्हणजे जी मदत मिळण्यासाठी काहीही कार्यवाही करावी लागत नाही, अशी मदत. प्रकल्प म्हटला, की जबाबदारी येते. विहिरीचे कर्ज काम जसजसे टप्प्याटप्प्याने पुढे सरकेल तसतसे हप्त्याने बँकेने दिले तर त्याबद्दल शेतकरी फारसा खुश नसतो. एकदम रक्कम हातात टाकली, की तिचा मन मानेल तसा उपयोग करायला तो मोकळा होतो. हिंदुस्थान सरकारची इच्छा रोख दान मिळावे, अशी असते आणि दात्यांची इच्छा रोख पैसे देण्याऐवजी कायमची मिळकत तयार करायचे सामर्थ्य देण्याची असते. निदान असे ते म्हणतात.

कसून तपासणी

यंदा जागतिक बँकेने हिंदुस्थानला ७ अब्ज डॉलर द्यावेत अशी शिफारस पॅरिसला १ जुलै रोजी बैठक सुरू होण्याच्या आधीच केली होती. या दात्यांनी पूर्वी जाहीर केलेल्या प्रकल्प मदतीपैकी १८ अब्ज डॉलर सरकारने अजून वापरलेले नाहीत आणि तरीही नवीन ७ अब्ज डॉलरच्या रोख मदतीकरिता धावपळ चालू आहे. यातील इंगित 'सुज्ञांशी सांगणे न लगे.'

पॅरिसच्या तपासणीत एकेकाळी फक्त आर्थिक परिस्थितीसंबंधीच तपासणी फेरतपासणी केली जाई, हळूहळू तपासणीचा आवाका वाढत चालला आहे. उदाहरणार्थ सगळ्या देशात विशेषत: पंजाब, काश्मीरसारख्या प्रदेशात मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे आणि जनतेलाही पोलिसी छळास तोंड द्यावे लागत आहे. याबद्दल 'दाते' लोकांत मोठी नाराजी आहे. मानवी हक्कांची परिस्थिती सुधारली नाही तर सगळी मदतच काय व्यापारसुद्धा बंद करण्याची

दटावणी ते देत असतात.

देशाचा संरक्षण खर्च, लष्करावरील, पोलिसांवरील, कमांडोवरील कोणत्याही गरीब याचक देशास न परवडणारा आहे. याबद्दलही उलटतपासणी होते.

पूर्वी दिलेल्या मदतीचा वापर होत नाही, झाला तर नीट होत नाही, याबद्दलही दटावणी दिली जाते. यंदा शासनाने मोठी चलाखी केली. परकीय मदतीचा कार्यक्षमतेने वापर व्हावा याकरिता एक नवीन विशेष योजना तयार केल्याचे पॅरिस बैठकीच्या आदले दिवशी जाहीर करण्यात आले. १८ अब्ज डॉलर्सची मदत पडून राहिल्याचा कठीण प्रश्न त्यामुळे बाजूस ढकलला गेला.

नवीन चिंता

यंदाच्या बैठकीबद्दल तशी वित्तसचिवांना फारशी चिंता नव्हती. आंतरराष्ट्रीय चलनाची परिस्थिती गेल्या वर्षभरात चांगलीच सुधारली आहे. शिवाय चलनवाढीची गतीही आटोक्यात आली आहे. या दोन्ही कामगिऱ्यांबद्दल आपलीच पाठ थोपटून घेण्याच्या तयारीने वित्तसचिव निघाले होते; पण ऐनवेळी एक नवी चिंता निर्माण झाली. हर्षद मेहताने पंतप्रधानांवर आरोप केला. भारताचा पंतप्रधान कोणी निर्लेप, संत महात्मा असतो अशी दात्यांपैकी कोणाचीही कल्पना नाही आणि अपेक्षाही नाही. त्यांना चिंता एवढीच, की सध्याचे सरकार स्थिर राहिले नाही, दुसऱ्या कोणा पक्षाचे सरकार आले तर खुल्या अर्थव्यवस्थेकडील वाटचाल मंदावेल की काय?

थँक्स, हर्षद

भारताची परकीय चलनाची परिस्थिती चांगलीच सुधारली आहे. त्यामुळे यंदा त्या खात्यावरची मदत कमी केली असती तरी चालले असते; पण दात्यांनी तसे केले नाही, गेल्या वर्षी ७ अब्ज डॉलर दिले. यंदा ७.४ अब्ज डॉलर दिले. याचे श्रेय मॉन्टेकसिंग अहलुवालिया यांच्यापेक्षा हर्षद मेहताला देणे जास्त योग्य होईल.

कसे का होईना वार्षिक परीक्षा झाली, मार्क बऱ्यापैकी मिळाले. दिल्लीत आनंदी आनंद आहे.

देशासमोरील महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार वर्षातून एकदा दोन दिवसांत पॅरिसमध्ये होतो. देशाची खरी 'संसद' ती! दिल्लीची संसद कागदोपत्री सार्वभौम आहे. खरे निर्णय तर पॅरिसलाच होतात आणि हे भारतीय जनतेचे भाग्य म्हणायला पाहिजे.

(२९ जुलै १९९३)

■■

ठगांचे पुनर्वसन आणि कांगावा

३१ जुलैला मध्यरात्री १२ वाजल्यापासून देशभराच्या रस्त्यावरील मालवाहतूक बंद झाली होती. महाराष्ट्रातील काही वाहतूकदार संघांनी या संपात सामील न होण्याचे जाहीर केले; पण त्याबरोबर आपणास सर्व संरक्षण मिळावे अशी मागणीही केली. त्याअर्थी त्यांची ताकद फार नसावी. एक वर्षापूर्वी देशभरचे ट्रकवाले संपावर गेले होते, सगळा हिंदुस्थान थंडावला होता. यावेळचा हा संप गेल्यावर्षीपेक्षा कमी यशस्वी होईल असे मानण्याचे काही कारण नाही. संप यशस्वी होवो ना होवो, संपवाल्यांच्या मागणीचा गंभीरपणे विचार केला नाही तर सगळ्या अर्थव्यवस्थेवर घातक परिणाम होईल हे निश्चित.

संपावर गेलेल्या वाहतूकदारांची मागणी जकातकर (किंवा त्याच्याऐवजी काही राज्यात लादलेला पथकर) रद्द करण्याची होती. जकात कर रद्द व्हावा या प्रस्तावाला सर्व संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री मान डोलावतात; पण हे कर रद्द केल्यामुळे स्थानिक संस्थांना तूट येईल, ती भरून कशी काढावी या प्रश्नावर घोडे अडले आहे. जकात कर रद्द झाला; तर नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कारभार चालवायचा कसा? त्यांना पर्यायी उत्पन्नाचे साधन काय? याचे समाधानकारक उत्तर कोणी देऊ शकत नाही.

अभ्यास समित्या पैशाला पासरी

गेल्या वर्षी संप झाला तेव्हा सरकारने एक समिती नेमली होती. समिती नेमली गेली, संप मागे घेतला गेला आणि तेव्हापासून आजपावेतो या समितीची एक पहिली बैठकसुद्धा झालेली नाही. जून महिन्याच्या शेवटी ट्रकवाल्यांची मुख्यमंत्र्यांशी बैठक झाली. पुन्हा एकदा सर्व मुख्यमंत्र्यांनी माना डोलावल्या, "हो, हो, जकात कर रद्द व्हायलाच पाहिजे." मग दिल्लीला ८ जुलै रोजी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली बैठक भरली. पंतप्रधानांनी आपल्या खास शैलीत

तोच मुद्दा मांडला, "जकात कर नको, जकातीला पर्याय नाही." बैठकीचा निर्णय? आणखी एक समिती; पण या वेळी साधीसुधी नाही. समितीचे अध्यक्ष खुद्द ज्योती बसू, बंगालचे मुख्यमंत्री. ज्या ज्या राज्यात जकात कर आहे त्या बहुतेक सर्वांचे मुख्यमंत्री, शरद पवारांसहित, या समितीचे सदस्य आहेत. संप सुरू होण्याच्या आधी या समितीची अंतिम शिफारससुद्धा बाहेर आलेली नाही. आदल्या रात्री संबंधित मंत्र्यांनी दूरदर्शनवर ट्रकवाल्यांना संपावर न जाण्याचे आवाहन केले आणि ठीक मध्यरात्री संप सुरू झाला.

जकात प्रश्नावरील समित्यांचे गुऱ्हाळ इतके लांबले, की त्याचीच 'गिनीज बुक' मध्ये नोंद व्हावी. १९२४-२५ मध्ये पहिल्यांदा या प्रश्नाचा अभ्यास एका समितीने केला. अलीकडे १९७८ मध्ये झ समिती, १९८५ मध्ये प्रदीप समिती आणि गेल्या वर्षीची जन्ममृत समिती. समित्या उदंड जाहल्या, अभ्यासही बहुत, निष्कर्ष मात्र शून्य.

जकातीची ठगी

महत्त्वाचे मुद्दे थोडक्यात असे आहेत - जकात कराच्या रूपाने २ हजार कोटी रुपयाच्यांवर उत्पन्न स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळते. दिल्लीतील एका प्रतिष्ठाप्राप्त संशोधन संस्थेने केलेला अभ्यास सांगतो, की जकात कर गोळा करण्यासाठी दर रुपयामागे ८३ पैसे खर्च येतो आणि फक्त १७ पैसे स्थानिक संस्थांच्या तिजोरीत पडतात. दुसरा एक अंदाज असा आहे, की जकात कर वसुली करणारे नोकरदार आणि पोलिस जकातीइतकीच रक्कम खिशात घालतात. जकात देण्यासाठी जागोजाग मालवाहतूक मंद होते आणि थांबते. वाहने तासनतास अडकून राहतात. नाशवंत माल खराब होतो. यामुळे होणारे राष्ट्रीय उत्पन्नाचे नुकासान १० हजार कोटी रुपयांचे आहे. याखेरीज ट्रक वाहतूक करणाऱ्यांना जो काही जाच होतो त्याचा हिशेब वेगळा.

अडचण नगरपालिकांची नाही

ही असली भयानक व्यवस्था पुढचा-मागचा विचार काहीही न करता बंद करायला पाहिजे. ही जकात व्यवस्था कसली? १५० वर्षांपूर्वी ठग आणि वाटमारे येणाऱ्याजाणाऱ्या प्रवाशांना आणि मालाला लुटत, त्यांची जागा या अधिकृत जकात नाक्यांनी घेतली आहे एवढेच; पण तरीही जकात कर रद्द करायला स्थानिक संस्थांच्या नगरपित्यांचा आणि अर्थात, जकात अधिकाऱ्यांचा मोठा जबरदस्त विरोध आहे. जकात नोकरदारांनी निदर्शने, मोर्चे सुरू केले आहेत. त्यांनीही संपावर जाण्याची धमकी दिली आहे. पुण्याच्या जकात नाक्यावरील नवशिक्यातल्या नवशिक्या चपराशाचीसुद्धा वरकड मिळकत दर

दिवशी २०० रुपयांची आहे. तेव्हा ही असली 'कामधेनू' आपल्या हातातून जावी याचेही जकातदारांना दु:ख व्हावे हे साहजिक आहे. तसेच आपल्या स्वत:चा व आपल्या मित्रांचा माल जकात न भरता येऊ देणे हा नगरपितेपदाचा मोठा मान आहे, हक्क आहे आणि मिळकतीचे साधनही आहे. नगरपित्यांना चिंता नगरपालिकेचे उत्पन्न जाईल याची नाही. त्यांच्या हातातील एक प्रभावी राजकीय हत्यार बोथट होईल याची त्यांना धास्ती आहे.

जकातीची सर कशालाच नाही

नगरपालिकांना पर्यायी उत्पन्नाचे साधन मिळणे कठीण नाही. देशातल्या एकूण राज्यांपैकी फक्त आठ राज्यांतच जकात कर आहे; तरीही बाकीच्या राज्यातील स्थानिक संस्था, नगरपालिका, महानगरपालिका काम चालवतातच ना! १८ राज्यांत जे जमते ते जमण्यात आठ राज्यांना का अडचण असावी? जकात कराच्या ऐवजी विक्रीकर, मालमत्तेवरील कर असे वेगवेगळ्या प्रकारचे कर लादणे शक्य आहे; पण या पर्यायांत नगरपालिकांना स्वारस्य नाही आणि नगरपित्यांना त्याहूनही नाही. सारे पर्यायी कर नगरपालिकेच्या हद्दीतील कारभाराशी संबंधित आहेत. याउलट जकात कर म्हणजे कोणत्याही नगरपालिकेला सगळ्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर हात मारायचा मिळालेला परवाना! दोन मोठ्या नगरांच्या मधली टिनपट नगरपालिकाही मोठी कमाई करून जाते, निदान पक्षी तिचे जकातदार अधिकारी! असली व्यवस्था ते कसे सुखासुखी सोडतील? नगरपितेही अस्वस्थ आहत. पर्यायी करांच्या व्यवस्थेतही आपलाच हात घुसवून त्यांना कमाई करता येईल; पण जकात कराची सर बाकीच्या करांना नाही. जकातकर म्हणजे सतत वाहणारी रोख पैशांची गंगा! केव्हाही हात घालावा किंबहुना हात घतलेलाच असतो तो केव्हाही काढावा आणि यथेच्छ कमाई करावी. मालमत्तेच्या करात कधीतरी वर्षातून एकदा 'कमिशन' काढता येईल, फार तर दोनपाच टक्क्यांचे नगरपालिकेच्या बरोबरीने मिळकत करण्याची संधी जकातीखेरीज इतरत्र कोठे नाही. खरी 'ग्यानबाची मेख' इथे आहे. पर्यायी उत्पन्नाचे साधन नाही हा कांगावा आहे.

सरकारी उलटे अर्थशास्त्र

गेल्या महिन्यात दूरदर्शनवर अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांची एक प्रदीर्घ मुलाखत झाली. केंद्रीय करांचे दर कमी केल्यामुळे करांचे उत्पन्न प्रत्यक्षात वाढले याची त्यांनी फुशारकी मारली. केंद्र सरकार असो, राज्य सरकार असो, की नगरपालिका असो या सगळ्या सरकारी, निमसरकारी संस्थांचे भगीरथ प्रयत्न उत्पन्न वाढवण्याचेच असतात. जो जास्त कर वसूल करेल तो कार्यक्षम

अर्थमंत्री; मग त्याच्या कालावधीत अर्थव्यवस्था डबघाईला आली तरी चालेल. लोकांच्या पडत्या मिळकतीतून चढती करवसुली करेल तो बहाद्दर अर्थमंत्री, अर्थसचिव किंवा नगराध्यक्ष! अशी ही 'नाथाच्या घरची उलटी खूण' आहे.

सर्वसाधारण गृहिणींना हे अर्थशास्त्र ऐकून मोठे चमत्कारिक वाटेल. बिचाऱ्यांच्या हाती एक ठरावीक रक्कम घरखर्च चालवण्यासाठी येते, त्या रकमेत सगळे काही बसवावे, चालवावे लागते. जेवणखाण, कपडेलत्ते हे नियमित खर्च तर भागवलेच पाहिजेत. त्यातच सणवारही येणार, पाहुणेरावळे येणार आणि मुलाबाळांचे दुखणेपाखणेही उपटणार. कोणते देऊ आणि कोणाचे ठेवू अशी बिचाऱ्यांची त्रेधातिरपीट होऊन जाते.

सरकारी संस्थांची 'बजेट' पद्धती याच्या नेमकी उलटी असते. ते पहिल्यांदा आपला खर्च ठरवतात. नवीन नोकरभरती, पगार, भत्ते, मोटारगाड्या, देश-विदेश यात्रा, आणखी काय पाहिजे ते! आणि मग, किमान त्या मन:पूत खर्चाला पुरेल इतके उत्पन्न लोकांकडून वसूल करायच्या कामाला लागतात. सरकारची भूक वाढतच राहते. सरकारी बोंगा वाढत गेला म्हणजे कार्यक्षमता घसरत जाते, सार्वजनिक सेवा बंद होतात. सरकारी यंत्रणेचे काम, नोकरदारांचे पगार, भत्ते काढणे एवढेच राहते आणि तेवढ्याचसाठी दरवर्षी करांचा बोजा वाढवला जातो.

जकात कर रद्द करण्याआधी पर्यायी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून दिले पाहिजे ही कल्पना मुळात खोटी आहे. जकात कर म्हणजे वर्षानुवर्षे चाललेला 'घपला' आहे. त्यात वार्षिक २००० कोटींचा भ्रष्टाचार आहे. त्यात देशाचे १०,००० कोटी रुपयांचे नुकसान आहे. पुढचामागचा काहीही विचार न करता हा 'घपला' बंद झाला पाहिजे. हातभट्टीवाल्यांनी आम्हाला पर्यायी उत्पन्नाचे साधन द्या, तर आम्ही आमचा धंदा बंद करू असा युक्तिवाद केल्यास कोण ऐकेल.

फिजूलखर्ची बंद करा

नगरपालिकांना स्पष्ट समज मिळाली पाहिजे, की पर्यायी उत्पन्नांची गोष्ट काढू नका. जकाती व्यतिरिक्त जे उत्पन्न असेल ते टाकटुकीने वापरायला शिका, उधळमाधळ बंद करा. नगराध्यक्षांचे, नगरपित्यांचे खर्चीक दौरे बंदे करा, तुमचा कारभार व्यवस्थित चालवण्यात काहीही अडचण येणार नाही. जकात कराखेरीज कारभार चालवता येणार नाही, अशी ज्यांची निष्ठा आहे, त्यांनी राजीनामा देऊन बाहेर पडावे आणि आपली तत्त्वनिष्ठा सिद्ध करावी.

(१२ ऑगस्ट १९९३)

■■

कचराकुंडीत आणखी एक कायदा

लोकसभेत धर्म आणि राजकारण यांची फारकत करण्याच्या हेतूने एक बिल पावसाळी सत्राच्या पहिल्याच दिवशी मांडण्याचा सरकारचा विचार होता. प्रश्न इतका तातडीचा आहे, की किमान ४८ तास पूर्वसूचना देण्याचा नियम बाजूला ठेवून ते तातडीने विचारात घेण्यात यावे अशी गृहमंत्र्यांची सूचना होती. लोकसभेच्या अध्यक्षांनी सरकारी सूचना फेटाळून लावली; त्यामुळे हे बिल अविश्वासाच्या ठरावावरील चर्चा संपल्यानंतर संसदेपुढे आले. मसुद्याचा बारकाईने विचार करण्यासाठी ते निवड समितीकडे सोपवण्यात आले. समितीच्या तपासणीनंतर याच सत्राच्या कालावधीत ते पुन्हा एकदा सभागृहापुढे मंजुरीसाठी येईल अशी अपेक्षा आहे; पण कदाचित बराच काळ ते सभागृहापुढे न येण्याचीही शक्यता आहे.

१. तारखेची लगबग आता संपलेली दिसते. एक तारखेला प्रस्ताव सरकारने इतक्या घाईगर्दीने आणला, की हा जणू जीवनमरणाचा प्रश्न आहे आणि आता एकदम इतका सुस्तपणा आला आहे, की जणू काही धार्मिक हस्तक्षेपाचा धोका संपून गेला आहे.

आग विझवणाऱ्यांत वाद

बिलास भाजपाचा विरोध असावा हे साहजिक आहे; पण जॉर्ज फर्नांडिस आदी जनता दलाच्या नेत्यांचाही त्याला विरोध आहे. धर्मकारण करणाऱ्या राजकीय पक्षांवर बंधने आणण्याबरोबरच प्रादेशिक, जातीयवादी, भाषावादी पक्षांविरुद्धही त्यांचा रोख आहे. त्याचा जाच तेलगू देसम, दलित पँथर, झारखंड मुक्ती मोर्चा महाराष्ट्रवादी गोमंतक दल, द्रविड मुनेत्र कळघमसारख्या पक्षांनाही होईल, असा जॉर्जसाहेबांचा युक्तिवाद आहे. राजकारणातील धर्मवाद्यांची ढवळाढवळ आटोक्यात आणण्याच्या मिषाने सरकार सगळ्याच विरोधी पक्षांना कचाट्यात

पकडू पाहत आहे. सरकारच्या हाती असा अधिकार असणे योग्य नाही. डाव्या पक्षांचा मात्र किरकोळ काही तपशिलाचे मुद्दे सोडल्यास एकूण योजनेस पाठिंबा आहे.

आगीचा बंब की तेलाची टाकी?

धर्म आणि राजकारण यांचे सार्वजनिक आयुष्यात स्थान काय? धर्म आणि राजकीय पक्ष यांचे परस्परांशी संबंध काय असावेत हा मोठा गहन विषय आहे. त्याची चर्चा करण्यासाठी ग्रंथ पाहिजेत. तेथे विषय अगदी छोटा आहे. जातींत विद्वेष फैलावून सत्ता बळकावू पाहणाऱ्या राजकीय पक्षांना वेसण घालणे हा या बिलाचा हेतू आहे. तो इष्ट आहे किंवा नाही याची चर्चा न करता शंकरराव चव्हाणांच्या या प्रस्तावित कायद्याने त्यांचा हेतू सिद्ध होईल किंवा नाही एवढाच प्रश्न तपासायचा आहे. जातीय, धार्मिक शब्द पक्षांच्या नावांत असू नये, यासाठी एक नवीन कायदा करणे आवश्यक आहे काय? असा कायदा नसल्यामुळे धर्मवादी पक्ष रुजले आणि फोफावले हे खरे आहे काय? हा कायदा झाल्यामुळे राज्याराज्यातून, गावागावातून धर्मद्वेषाचे गरळ ओकत फिरणाऱ्या ठाकरे, ऋतुंभरा, आदींना आटोक्यात आणणे शक्य होणार आहे काय? हे खरे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

दंडसंहितेपेक्षा नवे काय?

भारतीय दंडसंहिता हा अत्यंत जुना कायदा. मेकॅलेने तयार केलेल्या या कायद्याच्या मूळ बांधणीत काहीसुद्धा महत्त्वाचा बदल करावा लागलेला नाही. या कायद्यातील कलम १५३ (अ) अन्वये वेगवेगळ्या समाजात धर्म, वंश, जन्मस्थळ, निवासाचे स्थान, भाषा इत्यादी प्रश्नांवर वैमनस्य फैलावणे आणि शांतता व सुव्यवस्थेस बाधा सांगितलेली आहे.

या कलमान्वये कोणीही लेखी किंवा तोंडी शब्दांनी किंवा इतर कोणत्याही प्रकारे गटागटांत विद्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला, सार्वजनिक शांततेचा भंग केला किंवा एखाद्या समुदायाविरुद्ध हिंसाचार करण्याकरिता लोकांची जमवाजम केली, त्यांना प्रशिक्षण दिले, तर तो शिक्षेस पात्र होतो.

भारतीय दंडसंहितेच्या कलम ५०५ प्रमाणे समाजात भीती किंवा धास्ती पैदा करणारी, गुन्हेगारीस चिथावणी देणारी वक्तव्ये करणे किंवा अफवा पसरवणे हाही अपराध आहे. या गुन्ह्यासाठीही तीन वर्षांपर्यंत कैद आणि दंड अशी शिक्षा होऊ शकते.

अंमलबजावणी शून्य

जर शासनाचा हेतू धर्माच्या नावाने विद्वेष पसरवून, मते मिळवण्याचा

प्रयत्न करणाऱ्या लोकांवर बंधने आणणे हा असेल तर भारतीय दंडसंहिता त्यासाठी भरपूर आहे; पण या कलमाखाली जातीयवाद्यांवर किती खटले भरले गेले; किती जाणांना सजा झाली; या कायद्याची अंमलबजावणी केली असती तरी बजरंग दल, शिवसेना यांसारख्या पुंडवादी संघटनांचे नेते कित्येक वर्षांपूर्वीच कैदेत पाठवता आले असते! मुंबईत दंगे झाले, दंग्यातील शिवसेनेची जबाबदारी आणि शिवसेनेच्या नेत्यांनी जाहीरपणे दंग्यास दिलेले उत्तेजन सिद्ध करण्यासाठी पुराव्याचीही गरज नाही; पण आजपर्यंत भारतीय दंडसंहितेखालीसुद्धा त्यांच्यावर एकही खटला दाखल झालेला नाही. त्यांच्यावर खटला दाखल व्हावा याकरिता खासगी नागरिकांना उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावायला जावे लागले. सरकारचा खटले भरण्याचा हेतू आहे किंवा नाही हे स्पष्ट करावे अशी नोटीस उच्च न्यायालयाने दिली तेव्हा कोठे सरकारने कोणत्यातरी पोलिस चौकीत एक रिपोर्ट दाखल करण्याची मर्दुमकी गाजवली. मुंबईत शिवसेनेने जाहीर करून पाकिस्तानी क्रिकेट मॅच रद्द करवली. वानखेडे स्टेडियमचे मैदान उद्ध्वस्त केले, शिवसेनेने नाही म्हटले तर एक सिनेमा, एक नाटक आपले खेळ करू शकत नाही. सरकारची पोलादी ताकद कमी पडत असेल, धर्माची मशाल हाती आलेल्या पुंडांना आटोक्यात आणता येत नसेल, तर तसे त्यांनी स्पष्टपणे म्हणावे. अंमलबजावणीत न आलेल्या कायद्याचे कचराकुंडीत ढीग लागलेले असताना आणखी एक नव्या कायद्याची भर कशाला? एवढाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. खून, दंगली, जाळपोळी, भोसकाभोसकी, बलात्कार, माणसे एकट्या एकट्याने किंवा गटागटाने करतात. असल्या कार्यक्रमांना उत्तेजन देणाऱ्या संघटना आणि पक्ष गुन्हे घडवून आणण्याकरिता केलेले कट ठरवतात. अशा कट-कारस्थानांना तोंड देण्यासाठी दंडसंहितेत भरपूर तरतुदी आहेत. राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली, की पक्षाच्या कचेरीत बसून काय वाटेल ते करावे किंवा पक्षाच्या व्यासपीठावरून काहीही बकावे! कायदा निष्प्रभ आहे अशी काही स्थिती नाही. दंडसंहितेत अशा गुन्हेगार पक्षांनाही नियम घालून देणाऱ्या भरपूर तरतुदी आहेत. त्यांचा वापर करून झाला आहे, तेवढ्याने भागत नाही म्हणून नवीन कायदा करावा लागत आहे अशीही काही परिस्थिती नाही.

दोन मुख्यमंत्र्यांच्या बढाया

महाराष्ट्राच्या दोन मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला वेसण घालण्याची ताकद सरकारकडे नाही, बाळ ठाकऱ्यांना अटक झाली तर मुंबईतील परिस्थिती आटोक्याबाहेर जाईल अशी कबुली माझ्यापुढे दिलेली आहे आणि या प्रश्नाला आपण राजकीय

तोडगा शोधून काढणार आहोत अशी शेखी मारली आहे. परवा परवापर्यंत जातीयवादी पक्षांवर बंदी घालण्यावर आपला विश्वास नाही असे लोकशाहीचे खरे कैवारी काय ते आपणच असा डौल मिरवीत शरद पवार म्हणत होते. जातीयवाद्यांना राजकीय उत्तर त्यांनी काय काढले? तर अरुण गवळीच्या विरुद्ध पक्षाच्या गुंडांच्या टोळीशी संगनमत करून त्यांच्या हस्तकांना आमदारकीच्या जागा देणे! महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नव्याने बिलास विरोध करताना कोठे काही बोलल्याचे ऐकिवात तरी नाही! स्वत: गृहमंत्री शंकरराव चव्हाण जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात शिवसेनेवर बंदी घालणार अशा जाहिराती वाटत होते. आता त्यांना नवीन बिल आणण्याची गरज वाटू लागली, हे काय रहस्य आहे?

पक्षांच्या नाकातल्या वेसणी

धर्माधर्मातील विद्वेषाला खतपाणी घालणाऱ्या पक्षांना वेसण घालणे सध्याच्या कायद्याखालीही तसे काही कठीण नव्हते. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ चे कलम १२३ वाचून पाहा. कोणाही उमेदवाराने किंवा उमेदवाराच्या वतीने धर्म, वंश, जात, समाज, भाषा इत्यादींच्या आधाराने निवडणूक प्रचार करणे, कोणत्याही धार्मिक चिन्हाचा वापर करणे हा निवडणुकीतील भ्रष्टाचार समजला जातो. निवडणुकीसाठी जातीजातींत विद्वेष पसरवणे हाही भ्रष्टाचाराचाच प्रकार मानला जातो. गेल्या काही वर्षांत हायकोर्टापुढील डझनभर निवडणूक प्रकरणे निकालात निघाली आहेत, त्यांतील प्रत्येक प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात फेरतपासणीचे अर्ज पडून आहेत. नवीन निवडणुका होईपर्यंत त्यांचा निकाल लागायची काहीही शक्यता नाही. म्हणजे कायद्यात कोठे त्रुटी आहे असे दिसत नाही. त्रुटी अंमलबजावणीत आहे. अंमलबजावणी पोलिसही करू शकत नाहीत आणि न्यायालयही असमर्थ आहे.

आणखी पुढे पाहा. लोकप्रतिनिधी कायद्यात १९८९ मध्ये बदल करून कलम २९ (अ) घालण्यात आले. या कलमाप्रमाणे पक्षांना मान्यता मिळण्यासाठी आपण निधर्मी आणि लोकशाही आहोत असे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. कायदा झाला चार वर्षांपूर्वी. शिवसेनेने आपण निधर्मी आणि लोकशाहीवादी आहोत असे प्रतिज्ञापत्र दिले. त्यानंतर ४८ तासांच्या आत उघडउघडपणे ठोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या सरसेनापतींनी आपण धादांत खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले, निवडणूक चिन्ह मिळवण्याकरिता तसे करणे आवश्यक होते, अशी सार्वजनिक बढाई मारली आणि तरीदेखील शिवसेनेची राजकीय पक्ष म्हणून मान्यता खारीज करण्याची 'भीमपराक्रमी' शेषन यांचीसुद्धा अद्याप हिंमत झालेली नाही.

खरी स्थिती अशी आहे, की जातीयतेला विरोध कोणाचाच नाही. केरळमध्ये, ईशान्येतील राज्यांमध्ये काँग्रेस उघडउघड जातीयवाद्यांशी हातमिळवणी करते. महाराष्ट्रातील काँग्रेसची सर्व उभारणीच जातीच्या आधाराने आहे आणि वसंतराव नाईकांपासून वसंतदादा पाटलांपर्यंत काँग्रेसी मुख्यमंत्र्यांनी प्रोत्साहन दिले नसते तर शिवसेना शिवाजी पार्कच्या बाहेर पसरली नसती. हातात कायद्याची शस्त्रे भरपूर आहेत, ती वापरण्याची ज्यांची हिमत झाली नाही त्यांनी नवीन कायद्याचा हव्यास धरणे याचा अर्थ एकच –

शंकरराव चव्हाणांचे बिल हा शासनाचा स्वत:च्या नाकर्तेपणावर पांघरूण घालण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे!

(२० ऑगस्ट १९९३)

■■

आता रशियन 'हिटलर?'

स्टीफन झ्वाइंगची एक प्रसिद्ध कादंबरी कथानकाचा काळ– पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यानंतरच्या पाच-दहा वर्षांतील व्हर्सायच्या तहाने जर्मनीतील सुबत्तेचे प्रांत दोस्त राष्ट्रांनी काढून घेतले होते. महायुद्धातील विध्वंसाबद्दल जर्मनीवर प्रचंड खंडणी लादलेली होती, जर्मनीतील उद्योगधंदे, शेती, व्यापार उदीम सगळेच थंडावले होते, सरकारने आपला खर्च चालवण्याकरिता नोटा छापण्याचा तडाखा लावला होता.

महागाई आपल्याही अंगवळणी पडली आहे. चलनवाढीचा नको तितका अनुभव आहे. त्यापलीकडचा टप्पा काय म्हणावे? चलन व्यतिरेक म्हणून या. चलन व्यतिरेकाच्या महापुराने जर्मनी व्यापून टाकला होता. जानेवारी १९२२ मध्ये एक मार्क टाकून जी वस्तू मिळे तिलाच जून १९२३ मध्ये १ निखर्व (म्हणजे एकावर अकरा शून्य) पडू लागले. झ्वाइंगची कादंबरी महाचलनवाढीच्या समाज आणि व्यक्तिजीवनावर होणाऱ्या परिणामांचे बारकाईने चित्रण करते.

चलन स्थिर तर नीतिमत्ता ठीक

समाजातील नीतिमत्तेचा आधार काय? ईश्वरी धाक? विश्वाचा कोणी शास्ता आहे आणि त्याच्यापुढे एक दिवस हिशेब द्यायला उभे राहावे लागणार आहे. सगळे जग बदलले तरी हे सत्य शाश्वत आहे. सर्व धर्मांनी घालून दिलेल्या या घास्तीमुळे नीतिमत्तेचा आधार असो किंवा नसो, नीतिमत्ता टिकण्याकरिता चलनाच्या विनिमयाचा दर स्थिर असणे आवश्यक आहे हे निश्चित. रुपयाची किमत स्थिर असली तर कष्ट, काटकसर, बचत, गुंतवणूक, दानधर्म, हे सगळे गुण ठरतात. चलनाची किमत घसरू लागली, की या सगळ्या सद्गुणांची राखरांगोळी क्षणार्धात होते.

मानी राष्ट्रांची फरपट

खिशात पैसे घेऊन जावे आणि पिशवीतून माल आणावा ही जुनी पद्धत.

वायमार जर्मनीत सगळेच उफराटे झाले. पिशव्या भरून नोटा घेऊन दुकानात जावे आणि खिशातून माल आणावा! आज एक पिशवीभर नोटा द्याव्या लागल्या तर उद्या निदान दोन पिशवीभर लागतील अशी धास्ती. त्यामुळे मातीमोलाच्या नोटा टाकून, काय मिळेल ती वस्तू खरिदण्याकरिता लोक धावू लागले. इवाइंगच्या कादंबरीतील एका सरदार पात्राचा वडील मुलगा कष्टाळू आणि प्रामाणिक असतो, तर त्याचा धाकटा भाऊ उनाड आणि रंगेल! धाकट्याने पिऊन मोकळ्या केलेल्या रिकाम्या बीअरच्या बाटल्यांनी पुरे एक कोठार भरलेले! चलनाचा महापूर आला, कष्टाळू सरदारपुत्राने साठवलेल्या नोटा, कर्जरोखे, शेअर वगैरे सगळे कवडीमोलाचे झाले. याउलट उधळ्या सरदारपुत्र रिकाम्या झालेल्या बीअरच्या बाटल्या थोड्या थोड्या विकून आरामात राहू शकत होता. आणखी एक कथा, दोन बहिणी, एक शिक्षिका आणि दुसरी जरा चंट. शिक्षिकेला काय घडते आहे हे समजतसुद्धा नाही. दिवसेंदिवस उपवास काढण्यापलीकडे तिला काही गत्यंतर राहत नाही, तिची बहीण रस्त्यावर जाऊन राजरोस देहविक्रय करून मजेत राहू शकते. कादंबरीत शेवटी नाइलाजाने सोज्वळ शिक्षिकाही रस्त्यावर येऊन फेऱ्या घालू लागते.

'वायमार' रशिया

स्टीफन इवाइंगच्या या कादंबरीची आठवण होण्यासारखीच परिस्थिती आजच्या रशियात आहे. एके काळची महासत्ता समाजवाद्यांच्या बेहिशेबी अर्थकारणाने पोखरून टाकलेली. सोवियत युनियनचे विसर्जन झाले आणि आज रशियातील परिस्थिती १९२० सालच्या जर्मनीसारखी झाली आहे. एके काळी दहा डॉलरला आठ रुबल असा अधिकृत विनियमाचा दर होता, आज शेवटच्या माहितीप्रमाणे एक डॉलर, मिळायला ६०० रुबलसुद्धा पुरे पडणार नाहीत. अर्थव्यवस्था पुरी ठप्प झाली आहे. नोटांचा इतका महापूर झाला, की जुन्या नोटा रद्द करून नव्या नोटा प्रचारात आणण्याचा सरकारने प्रयत्न केला, तोही फसला.

लोक मोठे हवालदिल झाले. आठ दशके त्यांची पढवून पढवून खात्री पटवण्यात आली होती, की मायबाप सरकार सगळ्या काही चिंता वाहते. या समाजवाद रूपी स्वर्गात सामान्य जनांना चिंता करण्याची काही चिंता आवश्यकताच नाही. त्यांनी नेमून दिलेले काम कसोशीने मन लावून करावे, त्याबद्दल जो काही रोज मिळेल तो आनंदाने घ्यावा. समाजवादी स्वर्गाचे गुणगान करावे म्हणजे झाले! आपल्या कारखान्यात काय तयार होते? महाग का? हा विचार करण्यासाठी कारखान्यातील कम्युनिस्ट पार्टीचा सेक्रेटरी आहे, क्रेमलिनमध्ये

कामगारांचे तारणहार बसले आहेत. ते करतात ते सगळे योग्यच असते. त्यांच्यापेक्षा चांगला निर्णय घेणे आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसांना शक्यच नाही. असली शिकवण सर्वांच्या मनात इतकी भिनलेली होती, की हरेक माणूस निव्वळ ठोंब्या-बाहुले बनलेला होता.

समाजवादी व्यवस्था असतानाही रशियन नागरिकाचे आयुष्य काही मोठे संपन्न होते असे नाही. दीड खोलीच्या खुराडेवजा घरात सगळे कुटुंब राहायचे. जेवणात वापरात येणाऱ्या सगळ्याच वस्तू कमी प्रतीच्या; पण डोक्याला निर्णय घेण्याचा ताण न देता हे सगळे मिळते आहे ना! बस आनंद आहे. "कॉम्रेड...झिंदाबाद, कामगारांचा तारणहार झिंदाबाद" आणि त्याहीपेक्षा "व्होडका झिंदाबाद!"

प्रयोगशाळेत संशोधनासाठी छोटे पांढरे उंदीर वापरले जातात. उंदीर हा मुळात मोठा चपळ, कोठूनही कोठे येऊ-जाऊ शकणारा सर्वगामी प्राणी. म्हणून तर तो विद्या देवतेचे वाहन! पण पिढ्यान्‌पिढ्या प्रयोगशाळेतील खोक्यात वीण झाल्यामुळे हे पांढरे उंदीर आता दोन इंच उंचीच्या पुठ्ठ्याच्या खोक्याच्या कडेवरूनही उडी मारू शकत नाहीत. रशियन नागरकिांची अवस्था ८० वर्षांच्या समाजवादी व्यवस्थेनंतर या पांढऱ्या उंदरासारखीच झाली होती.

फरपट चालूच

भूक सहन करणे हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशातही कठीण आहेच; पण त्यापेक्षा शतपटींनी रशियासारख्या मरणाची थंडी असलेल्या प्रदेशात रिकाम्या पोटाने राहणे दुष्कर आहे. कडाक्याच्या थंडीत एखाद्या पावासाठी, एकदोन अंड्यांसाठी, रशियन लोकांना थंडीत कुडकुडत रांगा धरून उभे राहावे लागते. दुसऱ्या महायुद्धात महापराक्रम गाजवलेल्या एका सेनापतीस दोन दिवसाची भूक भागावी म्हणून आपला भरजरी गणवेश हँगरवर लावून विकण्यासाठी फूटपाथवर यावे लागले. आज परिस्थिती इतकी बिकट आहे, की इवाइंगच्या वर्णनाचा पुरा विदारक प्रत्यय यावा.

अश्लील वाङ्मयाचे गठ्ठे मॉस्कोत येऊन पडत आहेत. या पुस्तकांची रशियन रूपांतरे करण्याकरिता भाषांतरकर्त्यांना मोठी मागणी आहे. एके काळी जग बदलण्याची आणि 'होगे कामयाब'च्या घोषणा देणारे तरुण 'व्होडका'च्या गोल्यात दु:ख आणि भूक बुडवीत आहेत. पोटाची खळगी भरण्याकरिता १०-१२ वर्षांच्या मुलींपासून मोठ्या बायांपर्यंत अनेकांना रस्त्यावर फेऱ्या घालाव्या लागत आहेत.

लोकांना शिक्षा नको

समाजवादी प्रयोगाच्या भीषण घोडचुकीची रशियन लोकांना पुरी खात्री पटली आहे. नव्या नेतृत्वालाही त्याबद्दल मनात काही शंका नाही; पण ज्या लोकांना ८० वर्षे उद्योजकता म्हणजे काय? याच्या वासापासूनसुद्धा दूर ठेवण्यात आले, त्यांनी उद्योगधंदे चालू करावे कसे? हिंदुस्थान हा तसा दरिद्री देश; पण जुन्या सोव्हियत युनियनचा प्रवासी नागरिक दिल्लीतील जनपथवरील दुकाने आणि फुटपाथ ओसंडून जाणारा माल पाहून चकित होतो आणि भारतीयांच्या उत्पादकतेची वाहवा करतो. रशियन लोकांनी दिशा बदलली आहे. चुकीची वाट सोडून त्यांना नेमके उलट्या दिशेने वाटचाल करायची आहे. ८० वर्षांच्या समाजवादी प्रयोगाची किमत त्यांना मोठ्या कठोरपणे चुकवायची आहे. समाजवादावर, कॉमेड्सवर, मार्क्स, स्टॅलिन, लेनिनवर... माणसांना बाहुली करणारे 'महाराक्षस' म्हणून कितीही राग आला, तरी तो राग रशियन नागरिकांवर काढणे महाचूक होईल.

जगातील संपन्न राष्ट्रे रशियाला पदत करण्यासाठी पुढे येत आहेत; पण काहीसे हात राखून कंजुषपणे. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीचे नाक मातीत घासण्याचा प्रयत्न झाला नाही, कारण दोस्त राष्ट्रे व्हर्सायच्या तहाच्या भयानक परिणामांचा धडा शिकलेली होती. जित राष्ट्रांना ज्येत्यांनी इतके दिलदारपणे वागवले आणि इतक्या मोकळ्या हाताने मदत केली, की त्या मदतीच्या 'मार्शल' योजनेचे वर्णन विन्स्टन चर्चिलनी "The most unsordid act in human history" या शब्दांत केले. जगाला आज पुन्हा एकदा जुन्या सोव्हियत युनियनच्या नागरिकांबद्दल असाच दिलदारपणा दाखवण्याची गरज आहे. समाजवादी साम्राज्य संपले. लोक भणंग झाले. धर्माधर्मात प्रचंड कत्तली सुरू झाल्या. "बरीं झालीं कम्युनिस्टांची खाशी जिरली!" असे म्हटले तर काय होईल?

आता रशियन हिटलर?

जर्मनीच्या भीषण अपमानातून हिटलरचा उदय झाला. प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ लनायोनेल रॉबिन्स यांनी हिटलरला 'चलनवाढीचा दत्तक पुत्र' म्हटले आहे. हुकूमशहाच्या उदयाला वायमार जर्मनीइतकीच रशियन भूमी सुपीक आहे.

महासत्ता म्हणून पाच दशके मिरवलेल्या राष्ट्राला आजची अपमानास्पद अवस्था सहन होण्यासारखी नाही. असले जिणे जगण्यापेक्षा एखाद्या नव्या हिटलरच्या मागे ते आनंदाने जातील. गुडघ्यापर्यंत पोचणाऱ्या खिळेरी टाचांचे बुटांचे आवाज पुन्हा निनादू लागतील, कॉम्रेड स्टालिनच्या क्रूरकर्माना नि

समाजवादाच्या अर्थकारणाची आणि तत्त्वज्ञानाची थोडीतरी रुपेरी कडा होती. रशियात नवा नाझी राष्ट्रवादी हिटलर उदयाला आला तर? कल्पनाच थरकाप भरवणारी आहे. नाझीवादाचा भस्मासुर रशियात उभा राहिला तर त्याच्या हाती सुरुवातीपासून जगाचा तिसरा हिस्सा प्रदेश असेल, अमाप खनिज संपत्ती असेल आणि त्याहीपेक्षा भयानक सगळ्या पृथ्वीचा ५० वेळा विनाश करण्याइतकी अणुशक्ती असेल!

(२ सप्टेंबर १९९३)

■■

भारतीय अर्थव्यवस्थेचे भरकटलेले गाडे

रोमन साम्राज्यातील एक जगप्रसिद्ध कथा आहे. ज्युलिअस सीझरचा खून झाला. हत्येच्या कटाचा प्रमुख सीझरचाच एक सरदार मित्र ब्रुटस. ज्युलिअर लोकशाही संपवून स्वत: सर्वाधिकारी बनू इच्छितो अशा संशयाने तो ज्युलिअस सीझरच्या दफनविधीच्या वेळी भाषण करायला उभा राहिला. ब्रुटसच्या विरुद्ध बोलणे कठीण काम होते; पण सीझरविषयीचे प्रेम आणि आदर अँटनीला स्वस्थ बसू देत नव्हते. अँटनीने भाषण चालू केले,

"मी सीझरच्या दफनविधीसाठी आलो आहे. त्याची स्तुती करण्याकरिता नाही." सीझरने रोमन साम्राज्याकरिता केलेल्या एकेका कामगिरीचे वर्णन करायचे त्याच्या व्यक्तिगत गुणांची, दिलदारपणाची, लोकांवरील प्रेमाची आठवण सांगायची आणि प्रत्येक आठवणीनंतर तरीही ब्रुटस म्हणतो, की "सीझर हुकूमशहा होता आणि ब्रुटस मोठी आदरणीय व्यक्ती आहे." असा प्रत्येक आठवणीचा शेवट करायचा. अँटनीच्या या भाषणामुळे रोमन नागरिकांचे डोळे उघडले आणि त्यांनी ब्रुटस आणि त्याची टोळी यांच्याविरुद्ध उठाव केला, अशी कहाणी आहे.

लिखाणाची सांकेतिक पद्धत

"तीन वेळा रोमन नागरिकांनी सीझरला राजमुगूट देऊ केला. तीन वेळा त्याने तो नाकारला, तरीही ब्रुटस म्हणतो, "सीझरला सम्राट व्हायचे होते आणि ब्रुटस मोठी आदरणीय व्यक्ती आहे." या शैलीचा काहीसा गमतीदार उपयोग आम्ही लहानपणी करत असू. पत्र लिहिताना जे काही खरे लिहायचे असेल ते दर ओळीआड लिहायचे आणि मधली ओळ अशी लिहायची, की त्यामुळे वाचणाऱ्यांचा गोंधळ व्हावा. एक ओळ सोडून एक ओळ वाचत गेले तर मजकूर स्पष्ट आहे. सगळे पत्र अखंड वाचले तर मात्र काहीच बोध होत नाही. असा हा सांकेतिक लिखाणाचा प्रकार.

भगवती श्रीनिवासन अहवाल

मार्क अँटनीच्या भाषणाची आणि आमच्या लहानपणच्या खेळाची आज आठवण होण्याला निमित्त झाला, 'भारतातील आर्थिक सुधार' या विषयावर सरकारने प्रसिद्ध केलेला एक अहवाल. अहवालाचे लेखक आहेत प्रा. जगदीश भगवती आणि प्रा. श्रीनिवासन. दोघे अर्थशास्त्रज्ञ जगभर मान्यता मिळालेले, हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाच्या प्रश्नासंबंधी सूक्ष्म अभ्यास केलेले. आंतरराष्ट्रीय नाणे निधी, GATT यांसारख्या संस्थांच्या प्रमुखांचे व्यक्तिगत सल्लागार म्हणून काम केलेले आणि अर्थशास्त्राच्या नोबेल पारितोषिकाच्या संभाव्य मानकऱ्यांच्या यादीत नावे असलेले. अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी भगवती आणि श्रीनिवासन यांना गेल्या दोन वर्षांत आर्थिक सुधाराचे राबवलेले कार्यक्रम आणि पुढील दिशा यासंबंधी शिफारशी देण्यास सांगितले. ही काही सरकारी समिती नाही. वित्तमंत्र्यांना दिलेला सल्ला पुस्तिकेच्या रूपाने प्रसिद्ध करण्यात आला हे, एवढेच.

सगळ्या देशाचे वाटोळे केले

हा अहवाल वाचताना जसाच्या तसा सगळा वाचला तर त्यात परस्परविरोधी विधाने आहेत असे वाटते. मधली काही वाक्ये किंवा परिच्छेद सोडून वाचले तर अर्थ स्पष्ट होतो.

उदाहरण पहा :

"(आर्थिक सुधार) आवश्यक आहेत हे बऱ्याच काळापासून स्पष्ट झाले होते; परंतु सुधार सुरू करण्याची आणि दमाने पुढे रेटण्याची राजकीय इच्छाशक्ती अलीकडेपर्यंत नव्हती."

"अकार्यक्षमापासून कार्यक्षम अर्थव्यवस्थेकडे जायचे असेल... परदेशी मदतीवरील अवघड परावलंबित्वातून सुटायचे असेल तर..."

"थोडक्यात आमची सर्व धोरणाची चौकट अकार्यक्षम होती, खरे सांगायचे म्हणजे भयानक अकार्यक्षम होती."

"राजकारणी आणि नोकरदार यांच्या हाती महत्त्वाचे निर्णय एकवटले होते."

"दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अनुभव दाखवतो, की सरकारे विकास प्रक्रियेला मदत करत नाहीत, तिची हानी करतात."

"सरकारे कारभार बिघडवतात आणि त्यापासून सरकारला दूर ठेवले पाहिजे."

हा सगळा बोध अलीकडचा आहे काय? नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या काळात सगळे काही ठाकठीक होते, विश्वनाथ प्रताप सिंग, चंद्रशेखर यांच्या काळात हा सगळा गोंधळ झाला आणि राव सरकारने मोठ्या बहादुरीने

विरोधी पक्षांनी केलेला गोंधळ सावरण्यासाठी आर्थिक सुधार सुरू केले, असा जो युक्तिवाद केला जातो त्याबद्दल भगवती-श्रीनिवासन म्हणतात,

"...(विदेशी मुद्रेचे) संकट आपल्यावर कोसळले नसते तर सुधारांची सुरुवात पुढे ढकलली गेली असती...वित्तसंस्थांनी लादलेल्या अटीमुळे सुधार सुरू करण्याची आमची इच्छाशक्ती मजबूत झाली हेही खरे."

"आपल्या देशाच्या धोरणात असे सुधार १९६० सालापासूनच सुचवले जात होते. आपल्याच अर्थशास्त्रज्ञांनी सुचविलेले विचार त्या काळी शासकांनी आणि अनेक अर्थशास्त्रज्ञांनीही अव्हेरले. तेच विचार आता जगन्मान्य होऊन आंतरराष्ट्रीय संस्थांमार्फत परत येत आहेत."

"... सुधारांचा अर्थ पंतप्रधान नेहरूंच्या काळापासून आपण जे जे केले ते फसले अशी समजूत होते. सुधारांचा कार्यक्रम ज्या महत्त्वाच्या क्षेत्रात आज राबवावे लागत आहेत त्या क्षेत्रात ते बहुतांशी खरे आहेत."

"निर्यात करण्याच्या शक्तीविषयी आमचा निराशावाद १९६० सालानंतर अनावश्यक होता."

"सार्वजनिक क्षेत्रावर भर देण्याचे धोरण असेच अवास्तव असल्याचे साठीच्या दशकाच्या शेवटापर्यंत स्पष्ट झाले होते."

"सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमतेमुळे सरकारी उत्पन्नात भर पडली नाही, एवढेच नव्हे तर परिणामत: सर्व अर्थव्यवस्थाच अकार्यक्षम झाली."

उदाहरणे वानगीदाखल अजून कितीएक देता येतील. स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व आर्थिक धोरणांची इतकी प्रभावी वासलात दुसऱ्या कोणी लावल्याचे माझ्या पाहण्यात नाही.

पण नेहरू मोठे आदरणीय

पण हे सगळे स्पष्टपणे लिहिताना मधूनमधून; "पण ब्रुटस मोठी आदरणीय व्यक्ती आहे." असे म्हणण्याचे कसब मार्क अँटनीइतकेच जगदीश-भगवतींनीही साधले आहे.

उदाहरणे :

"पंडित नेहरूंचे सामर्थ्यशाली व स्वतंत्र भारताचे स्वप्न आर्थिक सुधार सातत्याने आणि प्रभावीपणे राबवल्यानेच साकार होईल."

"पंतप्रधान नेहरूंच्या घोषणा... वरून स्पष्ट होते, की त्या काळाही गरिबी हटाव कार्यक्रम आर्थिक विकासाइतकाच महत्त्वाचा मानला जात होता."

"... आपण काही सर्वच आघाड्यांवर अपयशी झालो असे नाही. आपली

महत्त्वाची कामगिरी म्हणजे लोकशाही चालू ठेवण्यातील आपले यश..."

"आर्थिक क्षेत्रातही काही यशकथा आहेत. उदाहरण : शेती." हे यश, गव्हाचे उत्पादन वाढवण्यासंबंधी आहे. इतर सर्व बाबतीत केनिया, पाकिस्तान, इंडोनेशियासारखे देशही आपल्या पुढे गेले आहेत हे अहवालात तळटीप देऊन स्पष्ट केले आहे.

बाजार व्यवस्थेचा बाजार

मधूनमधून उधळलेल्या स्तुतिसुमनांमुळे टीकेची धार बोथट होते, की अधिक बोचक होते हे वाचकांनी ठरवावे.

वस्तुत: हे 'मार्क अँटनी' शैलीचे भाषण करण्याची जबाबदारी अर्थशास्त्रज्ञांची नाही, पंतप्रधानांची आहे किंवा फार तर वित्तमंत्र्यांची आहे. जगदीश भगवतींनी ही जबाबदारी स्वत:च्या शिरावर घेतली याचे अर्थ दोनच निघू शकतात. एक, मसुदा तयार करण्यात सरकारी हात असला पाहिजे किंवा दोन जगदीश-भगवती आपले नवीन वित्तमंत्री होणार आहेत.

या दुसऱ्या संशयाला पुष्टी मिळण्यासारखा आणखी एक मोठा गमतीदार प्रकार अहवालात पाहायला मिळतो. आर्थिक सुधारांना कोणाकोणाकडून विरोध होईल, विरोधकांकडून काय युक्तिवाद केले जातील आणि त्याला उत्तरे कशी द्यावीत याचे मोठे तपशीलवार विवेचन सोडून, खुल्या व्यवस्थेकडे जातो आहो काय? आपण गरिबी हटाव सोडून, आर्थिक विकासाकडे जातो आहो काय? आपण परदेशी दबावाला शरण जातो आहो काय? आपण आतापर्यंत जे जे केले ते सगळे सोडून देत आहो काय? या असल्या आक्षेपांना द्यायच्या मुत्सद्दी उत्तरांचे नमुने अहवालात देण्यात आले आहेत. त्याबरोबरच, आर्थिक सुधारांचा प्रभावी प्रचार यशासाठी महत्त्वाचा आहे. ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठी भगवती म्हणतात -

"...पंतप्रधान राजीव गांधींच्या अमदानीत आर्थिक सुधार मंदावले आणि सोडून देण्यात आले, याचे कारण प्रचाराचे अपयश, कार्यक्षमता वाढवण्याकरिता केलेल्या सुधारणा म्हणजे 'यप्पी'" फॅशन वाटू लागल्या. हिंदुस्थानातील 'यप्पी' म्हणजे ज्यांना आपण 'डून स्कूल' म्हणतो ते लोक! '१० जनपथ' ची यावर काय प्रतिक्रिया होते ते पाहणे मनोरंजक ठरेल.

शिकवणी, मुत्सद्दीपणाची

भगवती, श्रीनिवासन् यांनी अर्थशास्त्री म्हणून सत्य सांगितले, परखडपणे सांगितले. ते सांगताना मधूनमधून नेहरूंची भलावण करणे त्यांना आवश्यक

वाटले असावे. अन्यथा, आपला अहवाल फारच कढत होईल आणि त्याला कोणी हात लावणार नाही अशी त्यांना चिंता पडली असावी; पण राजकीय दृष्टिकोनातून सुधार भारतीय जनतेला कसा खपवावा याचे धडे भगवतींनी पी. व्ही. नरसिंह रावांना द्यावे हे मोठे अजब आहे. पंतप्रधानांच्या कामगिरीबद्दल पुष्कळ मतभेद आहेत; पण "म्हातारा राजकारणात मोठा बेरकी आहे, काही न बोलता भल्याभल्यांना नामोहरम करतो." अशी त्यांची ख्याती झाली आहे. मुत्सद्दीपणाच्या एका गुणावर पंतप्रधानपदी टिकलेल्या नरसिंह रावांना जगदीश भगवतींनी राजकीय सल्ला द्यावा म्हणजे 'न्यू कॅसलला कोळसा' नेण्याचाच प्रकार!

(०८ सप्टेंबर १९९३)

■■

पङ्गुम् लंघयते गिरिम्

एक अगदी वेगळ्या प्रकारचे पुस्तक नुकतेच वाचनात आले. मराठीत अशी पुस्तके दुर्मीळ आहेत. म्हटले तर ही एक कादंबरी आहे; म्हटले तर एक कथानकही आहे; वेगवेगळी पात्रेदेखील आहेत; पण या कादंबरीत कथानकांनाही महत्त्व नाही. पात्रांनाही महत्त्व नाही. जन्मत: अपंग असलेल्या एका बाळाच्या आईच्या धडपडीची ही कहाणी आहे. लेखिका आहेत प्रभा घारपुरे. पुस्तकाचे नाव आहे 'साधना.'

आपल्याला मूल व्हावे अशी सर्वच जोडप्यांची इच्छा असते; बहुतेकांची ती इच्छा पुरी होते. बहुतेक मुले अव्यंग जन्मतात. पाळण्यात पडल्यापडल्या बहुतेक मुले हातपाय हलवण्यापासून कुशीवर वळणे, रांगायला लागणे, उठून बसणे, पहिली पावलं टाकणे, चालणे अशी बाळाची पाहता पाहता झटपट प्रगती होत जाते. पडल्या पडल्या 'म मा बा बा' करणारे मूल म्हणता म्हणता चांगली वाक्ये बोलू लागते. जन्मत: एवढासा गोळा दिसणाऱ्या लहान बाळाचा हा विकास क्षणोक्षणी घडणारा चमत्कार आहे. कितीही वेळा त्याचा अनुभव घेतला तरी प्रत्येकवेळी अद्‌भुत वाटावा असा हा चमत्कार सगळीकडे सदासर्वकाळ घडत असतो.

पण काही आईबापांचे भाग्य इतके थोर नसते. बाळाची प्रगती कौतुकाने, आनंदाने जोडीने पाहण्याचे त्यांच्यानशिबी नसते. काही बाळांमध्ये जन्मत:च दोष असतात, काहींना एखादा अवयवच कमी असतो. काही मतिमंद असतात. काहींच्या बाबतीत मेंदूच्या स्नायूंवरील नियंत्रण अपुरे असते. अशा बाळांना इंग्रजीत Cerebral Palsy किंवा थोडक्यात सी. पी. म्हणतात. 'साधना' ही एका आईची आणि तिच्या सी. पी. बाळाची कथा आहे.

अपंग बाळाला कैदेची शिक्षा

मला या एका आईच्या तपस्येत मन वेधून घेणाऱ्या अनेक बाबी दिसल्या.

मूल अपंग जन्मले; त्याचे ओठ हलत नाहीत; तोंडातून सतत लाळ गळते; चेहऱ्यावर एक बावळटपणाचा भाव; हातपाय पाहायला गेले तर व्यंग असे काही नाही; पण त्याच्या हालचालीत एक काही विचित्र वेगळेपण, बाळाच्या सर्व हालचालीत त्या संतुलनाचा अभाव जन्मानंतर थोड्याच दिवसांत लक्षात येतो. आईचे सगळे प्रेमसुद्धा वर्षानुवर्षे प्राणांताने वाट पाहिली, ते आपलं बाळ अपंग आहे; हाय रे दैवा! आपल्याच नशिबी असे बाळ कां यावे? अशी वात्सल्य आणि दुरावा एकत्र असलेली आईची नजर त्या एवढ्याशा जीवाच्यासुद्धा पटकन ध्यानात येते. बापाची तर गोष्टच वेगळी. हसतेखेळते निरोगी बाळ असते तरी त्याचे न्हाऊन माखून झाले. तीट काजळ झाले, की बाळ पुन्हा दुपटे ओले तर करणार नाही ना? या चिंतेत बहुतेक बाप बाळांना जवळ घेतात. बाळ सी. पी. असेल तर मग विचारायलाच नको. अशा बाळांचे आपल्या सर्व महत्त्वाकांक्षावर तिलांजली सोडून सर्वस्व देऊन संगोपन करणारेही बाप नसतात असे नाही; पण ते अपवाद. बहुतेक पुरुषांना व्यंगाचे मूल डोळ्यासमोर देखील नकोसे वाटते. बाळाच्या आणि त्याच्या आईच्या भावनांचा विचार न करता ते त्याची उघडउघड हिडीसफिडीससुद्धा करतात. छोटे बाळ त्याच्या सगळ्या बौद्धिक कमजोरीच्या आरपारही हा दुरावा अचूक टिपते.

सी. पी. बाळांच्या आईबापांच्या मनात एक अपराधीपणाची आणि न्यूनगंडाचीही भावना असते. आपल्यातील काही शारीरिक दोषांमुळे, कमतरतेमुळे बाळात हा दोष उतरला की काय? याची चिंता दोघांनाही लागते. आपल्या काही व्यसनांचा, बाळंतपणात केलेल्या औषधोपचारांचा परिणाम म्हणून बाळाचे आयुष्य उद्ध्वस्त झाले काय? याची त्या दोघांनाही जिवघेणी रुखरुख लागलेली असते.

सी. पी. बाळाचे आईवडील त्यामुळे बाहेर गेले तर बाळाला बरोबर कधी नेत नाहीत. आपले बाळ बघितले म्हणजे लोक आपल्याकडे विचित्र नजरेने पाहतात; आपली मनात कीव करतात. आपल्याला अपराधी मानतात या अनुभवाची त्यांना मोठी धास्ती वाटते. आजूबाजूला इतर मित्रमैत्रिणींची मुले हसून खेळून धिंगाणा घालत असताना आपले बाळ मात्र वेडेविंद्रे दिसते, तेव्हा त्याला बाहेर नेणेच नको म्हणून आईबाप, निदान आईतरी स्वत:ला कोंडून घेते आणि बाळाला कोंडून ठेवते.

बाळाचा शिक्षक-जग

प्रभा घारपुरच्या 'साधना'मध्ये एक प्रयोग मोठ्या लक्षवेधीपणे मांडला आहे. अव्यंग जन्मलेले बाळसुद्धा वाढते कसे? हाडामांसाचा केवळ गोळा असलेले

बाळ एक दिवस विश्वाला गवसणी घालणाऱ्या आईन्स्टाईनसारखे आणि चंद्रावर पाऊल ठेवणाऱ्या आर्मस्ट्रॉंगसारखे कसे बनते? बाळाचा विकास काही शिकवणीने होत नाही. दुपट्यात पडलेले बाळसुद्धा या जगात मी आलो आहे, मला हे जग समजून घ्यायचे आहे, हाताळायचे आहे अशा जिद्दीने हातपाय झाडीत असते. हाताच्या हालचालीची दिशा त्याला नेमकी ठरवता येत नाही. 'तान्ह्या बाळा तीट लावू' हे गाणे म्हणून बाळाला कपाळाच्या मध्यभागी तर्जनी न्यायला आईने शिकवले म्हणजे बाळाचा हात कधी टाळूवर तर कधी डाव्या-उजव्या कानापर्यंत जातो. समोर रंगीबेरंगी खेळणे ठेवले, की बाळ ते पकडू पाहते; जमत नाही; परत प्रयत्न करते आणि हातावर, पायावर, शरीराच्या सगळ्या अवयवांवर हळूहळू ताबा मिळवते. बोबड्या बोलण्यापासून ते लांबलचक वाक्यांपर्यंत फेक टाकण्याची प्रगती ते करू शकते. बाळाचा शिक्षक निसर्ग असतो. त्याला जितके फिरवावे, जग दाखवावे जितके ध्वनी; आवाज ऐकवावे, जितके स्पर्श अनुभवू द्यावेत, जितक्या चवींची रुची द्यावी, त्याच्याभोवती अनुभवांची जितकी संपन्नता तयार करावी तितकी बाळाची वाढ झपाट्याने होते.

अपंगितांचा चालविता

अव्यंग निरोगी बाळाच्या बाबतीत हे खरे आहे. जन्मजात व्यंग घेऊन आलेल्या बाळांना थोडेफार माणसाच्या बाळाप्रमाणे वाढायचे असेल तर इतर बाळांपेक्षा हजारोपट धडपड करावी लागते. समोर रंगीबेरंगी खेळणे ठेवले तर त्याला पकडण्याची कला इतर बाळांना दोन-चार दिवसांत साध्य होत असेल, तर दुर्दैवी सी. पी. बाळाला कदाचित सहा महिने, वर्ष लागेल. म्हणजे त्या बाळाला जग अधिक दाखवण्याची, वेगवेगळ्या गोष्टींची अधिक अनुभव, चव, गंध, स्पर्श याचा अनुभव देण्याची गरज असते. वेगवेगळे लोक पाहणे, बरोबरीच्या बाळाशी संबंध ठेवणे हे सी. पी. बाळाला इतर बाळांपेक्षाही आवश्यक असते आणि बाळाचे आईबाप त्यांच्या मनातील न्यूनगंडामुळे नेमकी ही अनुभवांची संपन्नताच त्याला नाकारतात. घरात पडून राहणारे, आईखेरीज दुसरा चेहरा दृष्टीला न पडणारे बाळ त्याच्या या कैदेमुळे अधिकाधिक अपंग बनत जाते. लेखिकेचा निष्कर्ष; आईबापांना सी. पी. बाळाला बाहेर नेण्याची कितीही लाज वाटत असो, आपल्या दुर्दैवी बाळाची मोठ्या माणसांनी, बरोबरच्या सवंगड्यांनी कुचेष्टा करू नये, बाळाचे त्या कुचेष्टेपासून संरक्षण करावे अशी त्यांची प्रेमापोटी इच्छा असते. जगाशी संपर्क तोडल्याने आईबाप बाळाचे नुकसान करतात.

एक आई आणि तिचे बाळ. ते निरोगी असो, की व्यंगाचे असो, महत्त्वाचा

धडा हा; बाळाला जग पाहू द्या, अनुभवू द्या. त्याला इजा होईल की काय? याची थोडीफार चिंता ठीक आहे; पण त्या चिंतेपोटी निरोगी बाळाला दुर्बळ बनवू नका आणि अपंग बाळाला आणखी अपंग बनवू नका.

अर्थशास्त्र्यांना आईचा धडा

आपला देश एक निरोगी बाळ आहे का? की सी. पी. बाळ आहे. या प्रश्नावर पुष्कळ वादंग घालता येईल. देश निसर्गतः संपन्न आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनी; वेगवेगळे हवामान; मनुष्यबळ, एक दीर्घकालीन इतिहास... सगळे लाभलेला हा देश अपंग नाही, असेही म्हणता येईल. जाती, धर्म, भाषा, यांच्या भेदाभेदाने पिडलेला, शतकानुशतके वेगवेगळ्या आक्रमणांनी निर्बल झालेला; दारिद्र्यामुळे, निरक्षरतेमुळे, छिन्नभिन्न झालेला असा आमचा देश एखाद्या सी. पी. बाळाप्रमाणे आहे असे कुणी म्हटले तर तेही फार चूक आहे असे म्हणता येणार नाही.

आमचे बाळ अव्यंग आहे किंवा नाही हा महत्त्वाचा मुद्दाच नाही. बाळ कसेही असो, निसर्गाने त्याला दिलेले गुण आणि दोष लक्षात घेता त्याचा जास्तीत जास्त परिपोष करण्याचा मार्ग त्याचा सगळ्या बाकीच्या जगाशी संबंध येऊ देणे हा आहे. जगाशी देवघेव थांबवून, व्यापार थांबवून, उद्योगधंद्यांना संशोधकांना संरक्षण देण्याचे निमित्त करून तुम्ही या बाळाला बंद खोलीत ठेवले, जगाच्या मोकळ्या वाऱ्यापासून आणि अनुभवाच्या विविधतेतून, नवनव्या तंत्रज्ञानापासून, विचारापासून, संशोधनापासून बाळाला वेगळे ठेवले तर ते निरोगी असले तरी अपंग होते. स्वातंत्र्यांनंतरच्या ५० वर्षांचा अनुभव हाच आहे. आईची बुद्धी दुष्ट होती असे कसे म्हणावे? आईची इच्छा बाळाच्या भल्याचीच होती; पण प्रेमापोटी तिने बाळाला अपंग बनवले, अशी उदाहरणे वास्तवातही आपण अनेक पाहतो. एक सुज्ञ आई बाळाच्या भल्याकरिता जे करते त्याचे सूत्र आमच्या पुढाऱ्यांना आणि शासनकर्त्यांना समजले असते तर आजची अवस्था आली नसती. प्रभा घारपुरेंच्या 'साधना'तील एक आईच्या धडपडीच्या या साध्या गोष्टीत एवढा मोठा आशय दडलेला आहे.

(२४ सप्टेंबर १९९३)

■■

आधुनिक पृथ्वीचा तोल सांभाळणारेच संपावर

ट्रक मालकांचे अभिनंदन! शतशः अभिनंदन! महिन्यापूर्वी वाहतूक बंद करून त्यांनी पथकर रद्द करून घेतला याबद्दल हे अभिनंदन नाही. जकातकराचा ठरीव कालावधीत फेरविचार करण्याची कबुली त्यांनी सरकारकडून वदवून घेतली याबद्दलही ही बधाई नाही. पथकर रद्द करण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला आणि त्याऐवजी वाहनाच्या परवान्याची फी भरमसाट वाढवली, १५०० रुपयांपासून एकदम ५००० रुपयांपर्यंत चढवली, त्याला विरोध करण्यासाठी वाहनमालक पुन्हा एकदा दंड थोपटून उभे राहिले याबद्दल हे अगदी मनापासूनचे कौतुक आहे.

मी शेतकरी आहे. वाहनांच्या संपामुळे भाजीपाला, फळे इ. नाशवंत माल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, होणार आहे आणि तरीही मी वाहनचालकांची प्रशंसा करतो आहे.

बहुतेक आंदोलने मोठ्या तडाख्यात सरू होतात. आदोलकांचा प्रक्षोभ इतका तीव्र असतो, की लढाईच्या पहिल्या फेरीत उत्साह टिकवून धरणे फारसे कठीण नसते. लढा शिस्तीत चालेल, शांततेने चालेल, आदोलनाविरुद्धचा खोटा प्रचार यशस्वी होणार नाही याची खबरदारी घेणे एवढी पथ्ये सांभाळली, की झाले. बिलामत सुरू होते ती वाटाघाटी सुरू झाल्यानंतर. वाटाघाटी थोड्याफार यशस्वी झाल्या. म्हणजे रोषांची कोंडलेली वाफ निघून जाते. आंदोलक रणभूमीवर जिंकतात आणि वाटाघाटीत हरतात.

वाटाघाटीत तयार झालेल्या करारनाम्यांच्या अटींच्या शब्दांबद्दल, अगदी स्वल्पविरामांबद्दलसुद्धा खळखळ सुरू होते आणि सरकार मोठ्या युक्तीने आंदोलकांच्या तोंडाला पाने पुसते. नर्मदा बचाव आंदोलनाची दिल्लीतील वाटाघाटीनंतर झालेली दुरवस्था याचे चांगले उदाहरण आहे. लढ्याच्या

पहिल्या फेरीचा शिणवटा उतरलेला नसतो; आंदोलनाची दुसरी फेरी सुरू करायला कोणीही फारसे उत्सुक नसते. सरकारच्या डावपेचांचा मुंहतोड जवाब द्यायला लागणारे चैतन्य शिल्लक नसते. बहुतेक आंदोलने या पायरीला संपून जातात. काहीशी निराशा येते आणि मग पुन्हा एकदा रोषाची वाफ कोंडून विस्फोटक बनेपर्यंत सारे काही शांत होऊन जाते. वाहनचालकांचे आंदोलनाचे चाक पंक्चरले नाही, महिन्याभरात पुन्हा एकदा तडाखा देण्याची जी ताकद आणि कर्तबगारी आंदोलकांनी दाखवली त्याच्याबद्दल हे अभिनंदन आहे.

ऐतखाऊंचे संप

सगळे नोकरमाने संप करतात. ज्यांची खरोखरच हलाखीची परिस्थिती आहे असे असंघटित कामगार गावोगावी विखुरलेले आहेत. त्यांचे काही संप होत नाहीत. त्यांची बिचाऱ्यांची ताकदच नसते. संघटित कामगार वारंवार संप करतात. पायलट महिना ६५००० रु. रोख आणि इतर अनेक फायदे मिळवणारे बँक, विमा, कर्मचारी, भाग्यवान प्रध्यापक, शिक्षक हर मुहूर्ताला सोने खरेदी करणारे. संप करायचा तो पगारदारांनी. मग त्यांची पगारभत्त्यांची किती का लयलूट असेना! संपाच्या हत्याराची मक्तेदारी नोकरदारांची अशी कल्पना समाजवादी अमदानीत रूढ झाली होती. म्हणजे विमानचालक कामगार, प्राध्यापक, कामगार यांनी लाल झेंडा हाती घेऊन शोषणाच्या विरुद्ध आरोळ्या ठोकल्या, सगळे जनजीवन विस्कळीत करून टाकले तर चालेल; पण स्वयंरोजगार, पानाचा ठेलेवाला, वेल्डिंग किंवा मोटार दुरुस्तीचा धंदा चालवणारा, एखादी टेम्पो घेऊन महिना हजार दोन हजार रुपये कसेबसे कमवणारा यांना संप करण्याचा अधिकार नाही. कारण ते नोकर नाहीत, गरीब असले तरी मालक लोक आहेत.

मालकांचेही संप

शेतकऱ्यांनाही आपले दु:ख पुढे मांडण्याचा काही रस्ता नाही. कारखानदारांची स्थिती तीच. यंत्रे आणि साधनसामग्री समाजवादी व्यवस्थेत भरमसाट किमत देऊन घेतलेली; जुन्यापान्या तंत्रज्ञानावर आधारलेली; जिकडे तिकडे लायसेंस-परमीट राज्य आणि इन्स्पेक्टरांची मनमानी. कामगारांची कुशलता काम टाळण्यात आणि चुकवण्यातच! धंदा डबघाईला आला, लक्षावधी, कोट्यवधी रुपयांचे नुकसान दरवर्षी होऊ लागले तरी कारखानदार पूर्ण हतबल, यंत्रसामग्री बदलावी म्हणावे तरी सरकारी परवानगी नाही;

परकीय चलन नाही. कामगार कमी करावे तर सरकारचा आणि युनियनचा विरोध. कुलूप लावून कारखाना बंद ठेवावा म्हटले तरी ते शक्य नाही. तोट्यातला कारखानासुद्धा चालू ठेवला पाहिजे असा सरकारी कायदा; पण हा सगळा जुलूम सगळी स्वयंरोजगारातली आणि इतरांना रोजगार देणारी उद्योजक मंडळी सहन करत राहिली. नाही म्हणण्याचा अधिकार फक्त उद्योजकांना नाही.

उद्योजक आंदोलन करू शकतात हे १० वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी दाखवले. गेल्यावर्षी सेल्स टॅक्ससंबंधी आंदोलन उभे करण्याचा प्रयत्न व्यापारी मंडळींनीही केला; पण जमले नाही. ट्रकमालक मात्र झुंजारपणे लढाई देतात. उद्योजकांच्या लढ्याचे नेतृत्व हा लहानसा गट करू शकेल अशी आशा वाटू लागली आहे.

मार्क्स फसला

ज्यांच्या हाती काही मालमत्ता असते असे 'आहे रे' लढण्याची हिंमत दाखवून त्यासाठी लागणारी मोर्चेबंदी करू शकत नाहीत अशी मार्क्सवाद्यांची समनातन निष्ठा आहे. म्हणूनच मार्क्सने शेतकरी समाजाला बटाट्याच्या पोत्याची उपमा दिली. उद्योजकांना रस्त्यावर यावे लागेल अशी कल्पना चुकूनही मार्क्सच्या मनाला शिवली नसती. सरकार उद्योजकांचे असते, उद्योजक म्हणजे भांडवलदार, ते फायदे मिळवतच असतात हे समाजवादाचे मूलतत्त्व आहे. त्यामुळे लढाऊ उद्योजक ही कल्पना मौनी वक्ता, ब्रह्मचारी पिता, वंध्या माता याप्रमाणे वदतोव्याघाताची धरली जाई.

पण काळ केवढा बदलला! सरकारची सूत्रे नोकरमान्यांच्या हाती आली. उत्पादन करणारे उद्योजक दुष्ट ठरले. त्यांनी संशोधन करावे, धोका घ्यावा, धडाडी दाखवावी, व्यवस्थापन करावे; पण ही सगळी यातायात फायद्याची अपेक्षा न ठेवता करावी. फुकट्यांनी मिळवलेला पगार पवित्र आहे. उलट कष्टाने आणि हिमतीने मिळवलेला फायदा म्हणजे पापाचे धन असे तत्त्वज्ञान काँग्रेसगवताबरोबर माजले. 'आहे रे' आणि 'नाही रे' असा वाद उभा झाला. हा वाद घालणाऱ्या मांजरांमध्ये मध्यस्थी करायला आले सरकारी माकड आणि फावले पुढाऱ्यांचे व नोकरदारांचे.

खोटे रॉबिनहूड

आपण गरिबांच्या, कमकुवत वर्गाच्या हिताकरिता सधनांकडून साधने गोळा करतो असा 'रॉबिनहुडी' आव आणून सगळ्यांनाच नागवणारे सरकार

मजबूत झाले. पाच दहा मोठे उद्योजक हाताशी धरले आणि त्यांना लायसेंस, पटमीटचा मलिदा घातला, जनकल्याणाच्या घोषणा दिल्या, गरीबांचे भले करण्याचा आव आणला म्हणजे सगळे काही ठाकठीक चालते अशी पुढाऱ्यांची समजूत झाली. गरिबांचा कैवार आणि उद्योजकांची लूट अशी कामगिरी पुढाऱ्यांनी हाती घेतली.

आमचा त्राता कोण?

उद्योजक करणार काय? त्यांनी दुकान बंद केले तर त्यांना देशघातकी, साठेबाज इत्यादी शिव्या मिळणार; गुन्हेगार म्हणून अटक होणार, जाळपोळ करून ते उद्योजकाला आयुष्यातून उठवणार अशा भीतीने उद्योजक कधी दंड थोपटून उभे राहिले नाहीत. आपले जिणे हे असेच असायचे; सरकारी भ्रष्टाचार आपण निमूटपणे स्वीकारला पाहिजे; इन्स्पेक्टरांना लाच दिली पाहिजे; पुढाऱ्यांना बॅगा पोचवल्या पाहिजेत; हा सगळा आपला भोग आहे कारण आपण स्वतंत्र राहू इच्छितो, कुणाच्या नोकरीचे जू आपल्या खांद्यावर घेणे आपल्या स्वभावाला जमत नाही. स्वातंत्र्याची किंमत म्हणून हे सारे सहन केले पाहिजे अशी उद्योजकांची मानसिकता झाली. शतकानुशतकीचे दलित माणूस बनले, नवे उद्योजक नवे दलित बनले. पूर्वी दलितांना पोलिसांचा आणि कायद्याचा जाच असे. काही निमित्त असो नसो भटक्या टोळ्यांच्या मुक्कामी आणि गुन्हेगार मानलेल्या जमातीच्या तळावर पोलिसांची धाड कधीही पडे. त्याचप्रमाणे आता उद्योजकांच्या तळावर टॅक्सवाले, पुढारी, इन्स्पेक्टर पाहिजे तेव्हा धाड घालतात. हात मारून घेतात. ट्रकवाल्यांना तर कोणीही शिपुरड्याने थांबवावे आणि दक्षिणा गोळा करावी. या नव्या दलितांना कोणी त्राता नाही.

शेषाचा रोष

ॲन रँड या अमेरिकन लेखिकेने उद्योजकांच्या संपाची कल्पना पहिल्यांदा पुढे मांडली. संशाधक, उद्योजक, उत्पादक हे खरे शेषाप्रमाणे पृथ्वी सांभाळून धरतात. याउलट फुकटे, भुरटे, पुढारी, राजकारणी, 'समाजहिता'च्या, 'गरिबांच्या सेवे'च्या घोषणा देत, पृथ्वीचा भार सहन करणाऱ्या या शेषालाच असह्य पराण्या मारत राहतात. लेखिकेच्या एका कादंबरीत एक उद्योजक उद्योजकांचे एक वेगळे भूमिगत राज्य तयार करतो. अमेरिकेतल्या साऱ्या कल्पक आणि कर्तबगार लोकांना तो हळूहळू आपल्या या राज्यात घेऊन जातो. परिणामतः शेषाने अंग काढून घेतल्यावर पृथ्वी डगमगू लागते.

अमेरिकी अर्थव्यवस्था कोसळते. समाजहिताचा बकवास बंद पडतो अशी त्या कादंबरीची कथा आहे.

भारतातही या शेषाला जाग येते आहे. समाजहित, गरिबांचे दु:खहरण, राष्ट्रभक्ती, स्वदेशी असल्या घोषणांखाली आपला भार वाहणाऱ्यांनाच सतावण्याची पद्धत मोडकळीला आली आहे. हा शेष आता पृथ्वीगोल हलवणार आहे, शेषाच्या या क्रोधाची पहिली जाणीव करून दिली, नेटाने करून दिली याबद्दल ट्रकमालकांचे पुन्हा एकदा अभिनंदन. सरकारने आश्वासन पाळले नाही तर पुन्हा एकदा संपावर जाण्याची तयारी ट्रकमालकांनी ठेवली आहे. हेही लक्षात घेण्याजोगे आहे.

(०६ ऑक्टोबर १९९३)

■■

श्वानासाठी साडेपाच हजार : माणसासाठी किती?

वेठबिगारांच्या संघटनेचे नेते स्वामी अग्निवेश मोठे प्रभावी वक्ते आहेत. समाजातील विषमता श्रोत्यांच्या मनावर ठसविण्याकरिता आपल्या भाषणातून ते नेहमी एक उदाहरण देतात. आगगाडीच्या डब्यातून एक साहेबीण तिच्या कुत्र्यासह आरामाने प्रवास करीत असते. तिचे कुत्र्याचे लाड करणे, मुके घेणे चालू असते. नाश्त्याची वेळ झाल्यावर, थर्मासचा मोठा डबा उघडून उकडलेली अंडी, मटन, दूध वगैरे कुत्र्यासमोर ठेवले जाते आणि शेवटी कॅल्शियम व व्हिटॅमिनच्या गोळ्याही कुत्र्याला देण्यात येतात. कुत्र्याच्या या ऐश्वर्याचे रसभरित वर्णन करून स्वामीजी म्हणतात, "देवा, या देशात माणसाच्या जन्माला घालण्यापेक्षा कुत्र्याच्या जन्माला घातले असते तर किती चांगले झाले असते?"

खुद्द कुत्र्यांनाच इतर कुत्र्यांचा राग असतो. स्वजातीय एकमेकांवर दात काढू लागले, की त्याचे वर्णन 'श्वानवत् गुर्गुरायते' असे करतात.

साहेबिणींच्या कुत्र्यांबद्दलचा मत्सर स्वामीजींच्या नाही, तर अनेकांच्या मनात डचमळत असतो. लार्सन आणि टुब्रो या कंपनीच्या चंद्रपूर जिल्ह्यातील एका कारखान्यात सुरक्षेसाठी अकरा 'डॉबरमन' जातीचे कुत्रे सेवेत ठेवले आहेत. प्रत्येक कुत्र्याला दरमहा पंचावन्नशे रुपये पगार, शिवाय दररोज दोन अंडी, दोन लिटर दूध, चार किलो मटन असा खुराक आहे. या कुत्र्यांना दिवसातून तीन वेळा आंघोळ आणि दर रविवारी वैद्यकीय तपासणी अशा भरभक्कम 'पर्क्स' ही आहेत.

कुत्रे, मुले आणि पैलवान

हे वर्णन वाचून भल्याभल्यांच्या पोटात दुखू लागले आहे. देशात माणासासारखी माणसे उपशी आहेत. अमरावती जिल्ह्यात कुपोषणाने शेकडो मुलांचे बळी गेले आणि तेथून थोड्याच अंतरावर कुत्र्यांची अशी भरपेट चंगळ चालते याबद्दल

अनेकांना मोठे दु:ख वाटले.

कुत्र्यांवर खर्च करण्याऐवजी भरभक्कम दांडगे पहिलवान नोकरीवर ठेवले असते तर त्यांच्या खुराकाची चांगली सोय झाली असती. एकट्या महाराष्ट्रातच कितीतरी होतकरू पहिलवान खेळाडू योग्य खुराक नसल्यामुळे कसरत सोडून देतात. लार्सन टुब्रो कंपनीच्या कुत्र्यांच्या जागी या खेळाडूंची सोय झाली असती तर भारताचे नाव क्रीडाक्षेत्रात रोशन व्हायला मदत झाली असती, अशी अनेकांना हळहळ वाटते.

देशात बेकारी किती माजली आहे! लक्षावधी नाही, कोट्यवधी तरुण बेकार आहेत. त्यात सुशिक्षितांचा, पदवीधरांचा भरणा हा मोठा आहे. बेकारी अशी माजलेली असताना माणसांनी करण्याजोग्या कामांसाठी कुत्र्यांची नेमणूक व्हावी याबद्दल भल्याभल्यांनी सात्त्विक संताप जाहीर केला आहे. 'कुत्र्याचे जिणे' माणसांना मिळावे म्हणून जोरदार मागणी केली आहे.

कुत्र्यांमुळे रोजगारी घटेल?

यंत्रे वापरून बेकारी वाढवू नका हा खूप जुना आर्थिक विचार आहे. यांत्रिकीकरण झाले, की माणसे बेकार होतात, संगणक वापरले, की माणसे बेकार होतात असा धोशा वेगवेगळ्या विचाराच्या नेत्यांनी आणि कामगार पुढाऱ्यांनी अखंडितपणे लावला आहे. महात्माजींचा यंत्राला विरोध नैतिक कारणांसाठी होता हे खरे; पण त्याबरोबर माणसांच्या हातांना काम मिळाले पाहिजे हीही भावना त्यामागे होती. सगळ्या विरोधाला तोंड देऊन यंत्रे येत राहिली, संगणक जागोजाग दिसू लागले; पण त्यामुळे नोकरदारांना रजा देऊन काढण्यात आले असे कुठे फारसे ऐकिवात नाही. नोकरदार मंडळी एकदा नेमली गेली, की जळवांप्रमाणे चिकटून राहतात. काम असो नसो, ते आपल्या पदांवर पक्के.

यांत्रिकीकरण थांबवा, बेकारी हटवा ही घोषणा निरर्थक ठरली. आता कुत्र्यांना हटवा आणि माणसांना त्यांच्या जागी नेमा अशी मागणी सुरू झाली आहे; पण समजा, विद्वानांचा सल्ला ऐकून खरोखरच असे केले, कुत्र्यांच्या जागी माणसांना नेमले तर काय होईल?

कुत्र्यांच्या जागी माणसे

सुरक्षेसाठी नेमलेले पहिलवान कुत्र्यांइतकाच खुराक तर खातील; पण त्यानंतर कुत्र्यांप्रमाणे चोवीस तास जागृत राहून, कोठून हल्ला झाला तर प्राणपणाने कर्तव्य बजावण्यासाठी तुटून पडणार नाहीत. कारखान्यात कोणत्या तरी कोपऱ्यात,

झाडीत, गर्द सावलीत निवांतपणे तणावून दिलेले सापडतील. कोणी चोरचिलटे घुसले तर त्याचा थांगपत्तासुद्धा पहिलवान पहारेकऱ्यांना लागणार नाही. सशस्त्र टोळीने उघडउघड हल्ला केला तर त्यांचा प्रतिकार करण्यासाठी सामोरे जाण्याऐवजी मानवी पहारेकरी पळता पाय काढतील आणि स्वत:चा जीव वाचवतील. एवढ्यावरच भागले तरी पुरे; हल्लेखोर मानवी सुरक्षा अधिकाऱ्यांना फितवून त्यांच्या संगनमतानेच कारखान्यावर हल्ला करण्याची शक्यता नगण्य नाही,

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी संरक्षणासाठी 'काळी मांजरे' ठेवण्याऐवजी डॉबरमन कुत्रे ठेवले असते तर त्यांच्यापैकी कुणी 'बेअंतसिंग' झाला नसता आणि इंदिराजी आजही आपल्या असत्या. राजीव गांधींवर हल्ला झाला तेव्हा सुरक्षा पोलिसांची एकच धावपळ झाली. राजीवजींच्या सुरक्षेसाठी नाही, मारेकऱ्यांच्या साथीदारांना पकडण्यासाठीही नाही तर स्वत:चा जीव वाचविण्यासाठी. सुरक्षा पोलिसांऐवजी कुत्रे असते तर असे कदापिही घडले नसते.

महाराष्ट्रात पोलिसांच्या आणि कस्टम अधिकाऱ्यांच्या जागी कुत्रे नेमले गेले असते, तर अरब देशातील स्फोटके बिनबोभाट उतरली नसती. कोणाही कुत्र्याने बेकायदेशीर स्फोटकांची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या ताफ्याला आपल्या देखरेखीखाली 'एस्कॉर्ट' देऊन आणले नसते, हे तर नक्कीच. असला नीचपणा कुत्र्याच्या जातीत संभवत नाही.

सरकारी नोकरांचे शुनीकरण

लार्सन टुब्रो कंपनीचे अभिनंदन करायला पाहिजे. त्यांनी देशाला एक नवीन दिशा दिली आहे. कंपनीचे उदाहरण डोळ्यासमोर ठेवून केवळ सुरक्षा खात्यातच नव्हे तर सगळ्याच खात्यात नोकरांचे 'शुनीकरण' करणे देशाच्या मोठे हिताचे होणार आहे. कुत्री बिचारी त्यांना काय नाश्ता, जेवण असेल ते घेतील;प ण त्यानंतर आणखी वरकमाई व्हावी यासाठी पंजा पुढे करणार नाहीत. म्हणजे, भ्रष्टाचाराला आपोआपच विराम मिळेल. एखादाच खोटा कुत्रा समोर टाकलेले किलो दोन किलो मटन स्वीकारण्याच्या मोहात पडेल; पण सुटकेस भरून कितीही नोटा आणल्या तर त्यात कोणाही कुत्र्याला स्वारस्य वाटणार नाही.

शिक्षण संस्थात कितीतरी बेशिस्त माजली आहे. शिक्षक, प्राध्यापक, पर्यवेक्षक यांच्या जागी कुत्र्यांची नेमणूक केली – या जागी 'डॉबरमन'पेक्षा 'पामेरियन' कुत्र्यांची नेमणूक करावी लागेल – तर आठवड्याभरात रॅगिंग थांबेल, मुलींची

छेडछाड थांबेल, कॉपी करण्याचे प्रकार थांबतील आणि एवढे करून शिक्षणाचा दर्जा काही फार खालावेल असे नाही.

बेकारी नाही, कामपालट

कुत्र्याची नेमणूक केल्यामुळे माणसे बेकार होतील ही भीतीही फारशी खरी नाही. कुत्र्यांना पंचावन्नशे रुपये पगार मिळतो हे खरे; पण त्याबरोबर कुत्र्याच्या तैनातीकरिता ठेवलेल्या माणसांना तेराशे रुपये तरी मिळतातच. शिवाय, वरकमाई आहेच. कुत्र्यांना मिळणाऱ्या पगारातून अंडी, मटन खरीदण्याचे आणि कुत्र्यांना खाऊ घालण्याचे काम शेवटी दोन पायांचे नोकरदारच करणार. पैसे खर्चून घेतलेला शिधा सगळाच्या सगळा कुत्र्यांपुढे जाईल तर ते मनुष्यस्वभावाला धरून होणार नाही. कुत्र्यांना माणसापेक्षा जास्त पगार आहे हे खरे; पण त्यांची गुणवत्ता, सचोटी आणि कार्यक्षमता पाहता, ते अयोग्य आहे असे कोण म्हणेल?

संगणक आले, नोकऱ्यांवरून कोणीच दूर झाले नाही. उलट, संगणक तयार करणे, दुरुस्त करणे, चालवणे या कामात अनेकांना रोजगार आणि व्यवसाय मिळाला. नोकरीवर कुत्र्यांना ठेवल्यामुळे नोकरीवरून कोणालाच काढावे लागणार नाही. उलट, चांगल्या कुत्र्यांच्या जातींची पैदास करणे, त्यांना प्रशिक्षण देणे या कामांत कोट्यवधी लोकांना रोजगार मिळून जाईल. पाश्चिमात्य देशांत गावोगावी कुत्र्यांना प्रशिक्षण देण्याच्या शाळा आहेत. कुत्र्यांच्या शाळा या एकाच व्यवसायात अनेकांना रोजगार आणि व्यवसाय मिळेल, थोडक्यात, सार्वजनिक सेवांचे राष्ट्रीयीकरण ही कल्पना मागे पडली असली तरी त्यातील नोकरदारांच्या शुनीकरणाचा विचार गांभीर्याने व्हायला पाहिजे. ज्या सरकारी महामंडळाचे खासगीकरण होईल त्यातील नोकरवर्गाच्या जागी नवीन खासगी व्यवस्थापने कुत्र्यांची नेमणूक व्यापक प्रमाणावर करतील. त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात स्पर्धेमध्ये टिकून राहायचे असेल तर त्यांना तसे करणे आवश्यक आहे.

आपल्याकडे सरदारजींच्या निर्बुद्धपणावर अनेक विनोदी किस्से सांगितले जातात. स्वित्झर्लंड देशात राजधानीच्या बर्न प्रदेशातील लोकांच्या जडबुद्धीबद्दल असेच अने विनोद आहेत. त्यातील एक विनोद असा – स्वित्झर्लंडचे पहिले अवकाशयान चंद्रावर जाण्यासाठी निघाले. यानात प्रवासी दोन. एक माकड आणि एक बर्नचा माणूस, 'बर्नवा.' अवकाश यानात दोन पाकिटे ठेवलेली होती, एका पाकिटात माकडासाठी सूचना, दुसऱ्या पाकिटात बर्नवासाठी सूचना. अवकाशयानाने उड्डाण केले.

माकडाने पटकन पाकीट उघडले. सूचना वाचल्या. निळी, काळी, तांबडी,

तांबडी, पिवळी वेगवेगळी बटने दाबून माकडाने अवकाशयान योग्य मार्गावर आणले, तोपर्यंत बर्नवाचे पाकीट उघडूनसुद्धा झाले नव्हते. संथपणे पाकीट उघडून झाले, त्यातील कागद काढला गेला. कागदाची घडी उलगडून कागद सरळ झाला. बर्नवासाठी एकच वाक्याची सूचना होती – "माकडास वेळोवेळी खाऊ घालणे." देशातील सार्वजनिक सेवांचे अवकाशयान नीट चालायचे असेल तर कुत्रे, माकडे यांचा मोठा उपयोग होईल. त्यांना खाऊ घालण्याचे काम माणसांना राहीलच, ते त्यांनी नीट पार पाडावे म्हणजे मिळविली!

(१४ ऑक्टोबर १९९३)

■■

श्रीकृष्णाविना वस्त्रहरण

"भर दरबारात द्रौपदीचे वस्त्रहरण होत असताना पांडव स्तब्ध राहिले, तशीच आमची स्थिती अयोध्येत मस्जिद पाडण्यात आली त्या वेळी झाली. पांडवांप्रमाणे मर्यादेने आम्ही बांधले गेलो कारण आम्हाला घटनेचे रक्षण करायचे होते." इति प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंह राव लखनौ येथील निवडणूक प्रचाराच्या सभेत भाषण करताना!

उत्तर भारतात भाषण करायचे म्हणजे रामायणाचा उल्लेख करत करत, तुलसी रामायणातील वचने उद्धृत करत करत करावे लागते, तरच ते लोकांना समजते. रामायण, महाभारताचा संदर्भ दिल्याखेरीज वक्ता खरे बोलतो आहे असे लोकांना वाटतच नाही. न. वि. गाडगीळ यांनी ४० वर्षांपूर्वी हा अनुभव घेतला. उत्तर भारतातील सभांचा अनुभव असलेल्यांना हे चांगले ठाऊक आहे. तेथे भाषणाला जायचे म्हणजे कट्टर डावेसुद्धा रामायण, महाभारतातील काही कथांशी, बादरायणी का होईना संबंध जोडतात; मग नरसिंह रावांनी महाभारताचा संदर्भ द्यावा यात आश्चर्य ते काय?

महापंडित वदले

लखनोच्या काँग्रेसच्या सभेचे वातावरणही उत्साहाने धुंद झाले होते. मुलायमसिंगांच्या मेळाव्यापेक्षा काँग्रेसचा मेळावा अधिक मोठा भरल्यामुळे काहीसा कैफ चढलेलाच होता. प्रधानमंत्री येणार म्हटल्यावर त्यांची भरमसाट स्तुती करण्याची काँगेसजनांची परंपरा आहे. ती स्तुती ऐकून घेण्याची, त्यामुळे खुष होण्याची आणि खुषमस्कऱ्यांना यथाकाल, यथोचित बक्षिसी देण्याची पंतप्रधानांची परंपरा आहे. 'राव'साहेबांचे स्वागत 'महापंडित' इत्यादी स्तुतिसुमनांनी झाले. त्यामुळे आपले पांडित्य दाखवण्याची जबाबदारी 'राव' साहेबांवर पडली; म्हणून कदाचित त्यांनी द्रौपदी वस्त्रहरणाचा उल्लेख केला असावा. कदाचित,

रामायण, महाभारतावर केवळ भाजपाचा हक्क आहे असे नाही. आपणही त्यासंबंधी बोलू शकतो हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक वस्त्रहरणाचे रूपक वापरले असावे.

"इतिहासाची पुनरावृत्ती होते, पहिल्या वेळी शोकांतिका म्हणून आणि दुसऱ्या वेळी प्रहसन म्हणून" असे मार्क्सचे वचन आहे. इतिहासातील कोणताही प्रसंग जसाच्या तसा पुन्हा घडत नाही. द्रौपदी वस्त्रहरण एका शोकांतिकेची नांदी होती. ६ डिसेंबरचा प्रसंग कदाचित शोकांतिका ठरेल; पण 'राव'साहेबांचे विधान मात्र विदुषकी प्रहसनासारखे आहे.

असली रूपके फार ताणायची नसतात. ती सर्वतोपरी शंभर टक्के लागू पडतील अशी अपेक्षाही नसते; पण दिलेल्या उदाहरणात आणि प्रत्यक्ष प्रसंगात काही निदान साम्य असायला पाहिजे.

ते महाभारत आणि हे महाभारत

महाभारतात द्रौपदीला भर दरबारात विवस्त्र करण्यासाठी दुर्योधन, दुःशासन उठले. धृतराष्ट्र, गांधारी, द्रोण, भीष्म आदी गुरुजन आतंक पाहत राहिले. द्रौपदीने युक्तिवाद केला, "माझे पती दास झाले हाते, दासांना आपली पत्नी द्यूतात पणाला लावण्याचा अधिकारच नव्हता." तिच्या शास्त्रार्थाकडे कोणी लक्ष दिले नाही. दुर्योधनाने तिच्या वस्त्राला हात घातला, तिचे केस मोकळे केले; पण द्रौपदीचा धावा ऐकून श्रीकृष्णाने असा चमत्कार केला, की वस्त्र फिटता फिटेना... अशी महाभारतातील थोडक्यात कहाणी आहे. श्रीकृष्णाच्या हस्तक्षेपाचा भाग तत्कालीन सेन्सॉरने बळेच घुसवला असावा. श्रीकृष्ण खरोखरच मदतीला धावून आला असता तर कौरवांची तिथेच फजिती झाली असती आणि मग पुढचे सूडाचे महाभारत घडण्याचे काही कारणच नव्हते.

श्रीकृष्ण गैरहजर

अयोध्येतील द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी कोणी श्रीकृष्ण धावून आला नाही. एवढेच नव्हे तर भर दरबारात पुरा बलात्कार झाला. खऱ्या महाभारतात श्रीकृष्ण मदतीला धावून आले नसते तर पांडव स्तब्ध बसून राहिले असते काय? या प्रश्नाचे उत्तर मोठे कठीण आहे. 'राव'साहेबांच्या रूपकात एवढा तरी फरक मान्य केला पाहिजे. काँग्रेसी पांडवांच्या पाठीशी कोणी कृष्ण उभा नव्हता.

द्रौपदी वस्त्रहरणाचा दोष पांडवांकडे येतोच धर्मराजा जुगारी. केवळ जुगाराच्या कैफात सगळे हरून द्रौपदीला पणाला लावून तीही हरण्याइतकी धर्मराजाची बुद्धी झालेली. रावसाहेबांच्या रूपकातला हा एवढाच भाग खरा आहे. अयोध्येची

द्रौपदी काही एकदम भर दरबारात खेचली गेली नाही. पाच वर्षे एक एक क्षणाने तिच्या वस्त्रहरणाचे नाटक पुढे सरकत होते आणि तरीही आधुनिक पांडव उघड्या डोळ्यांनी सगळे काही पाहत राहिले.

धर्मराज रावसाहेब

काँग्रेस सरकार पांडव म्हणजे भाजपा, शिवसेना, बजरंगदल, विश्व हिंदू परिषद, हे सगळे कौरव असे रूपक ओघानेच आले. या कौरवानी ६ डिसेंबर १९९२ रोजी एक नाही दोन द्रौपद्यांचे वस्त्रहरण केले. मस्जिद पाडलीच; पण त्याबरोबर भारतीय संघराज्याच्या घटनेचेही वस्त्रहरण केले.

रावसाहेब म्हणतात, "काँग्रेसी पांडव स्वस्थ राहिले कारण त्यांनी घटनेची मर्यादा होती. सरकार पांडव म्हणजे 'राव'साहेब धर्मराज हे उघडच आहे. आपण मोठे सत्यप्रिय, निष्कलंक चारित्र्याचे, सदा सत्यवचनी असा जो टेंभा मिरवायचा; पण प्रत्यक्षत कसोटीच्या प्रसंगी ज्याचे हीन चारित्र्य उघडे पडायचे तो धर्मराज. जुगारी, द्रौपदीच्या लालसेने कुंतीच्या अनवधानाने उच्चारलेल्या 'सगळ्यांनी वाटून घ्या' या आदेशाचा गैरफायदा घेणारा आणि प्रसंगी 'अश्वत्थामा मेला' असे मोठ्या आवाजात बोलून हळूच 'हत्ती' असे कुजबुजणारा धर्मराजा. 'राव'साहेब म्हणजे धर्मराज ही उपमा काही वाईट नाही. किंबहुना 'अश्वत्थामा मेला' यापेक्षा असत्य वचनात आपण अधिक प्रवीण आहोत हे रावसाहेबांनी सिद्ध केले आहे."

घटनेची कोणती मर्यादा, कोणते कलम मशिदीचे रक्षण करण्यापासून त्यांना थांबवत होते? उलट मशिदीचे रक्षण करणे हे त्यांचे घटनात्मक कर्तव्य होते. काय पडेल ती किमत देऊन त्यांनी आपले कर्तव्य पार पाडायला पाहिजे होते. ते पाडले नाही. उलट घटनेच्या मर्यादांमुळे आम्हाला काही करता आले नाही असा त्यांचा कांगावा चालू आहे. 'राव' साहेब धर्मराज शोभतात खरे!

अर्जुन सिंग

कौरव कोण ते ठरले. धर्मराज कोण हेही समजले. अर्जुनाची भूमिका अर्जुनसिंगांकडे जावी. केवळ नाव सारखे असल्यामुळे नाही. अर्जुनाचे द्रौपदीवरचे प्रेम यथायथाच होते, द्रौपदीच्या अपमानाने तो फारसा कधी क्षुब्ध झाला नाही. द्रौपदीच्या वस्त्रहरणाचा राजकीय उपयोग करून घेण्याचा अर्जुनसिंगाचा प्रयत्न आणि त्यात अर्जुनासारखे नव्हे तर बृहन्नडेसारखे त्यांनी दखवलेले शौर्य पाहता, अर्जुनसिंग अर्जुन ही उपमेय उपमानाची जोडी फारशी वाईट नाही. 'राव'साहेबांच्या धर्मराजला अर्जुनसिंगापेक्षा पराक्रमी अर्जुन कोठून मिळायचा?

कनिष्ठांची दुक्कल

नकुल-सहदेव ही दुक्कल साऱ्या महाभारतात फारसे काहीच करीत नाही; पण पाच पांडवात त्यांची मोजणी मात्र होते. शंकरराव चव्हाण अयोध्येतील वस्त्रहरणाच्या वेळी दिल्लीत बसून होते आणि शरद पवार वस्त्रहरण होणार अशी निश्चित बातमी कळल्यामुळे वस्त्रहरणाच्या चित्रीकरणाच्या खटाटोपास लागले हाते. तेव्हा शंकरराव, शरदराव ही जोडी नकुल सहदेवाच्या जागी फिट बसावी.

बलभीम कोण? दाऊद इब्राहिम?

कमतरता पडते ती फक्त बलभीमाची. या सगळ्या पांडवांत बलभीम कोणीच दिसत नाही. वस्त्रहरणाच्या वेळी संतापाने डोळे रक्तासारखे लाल झालेला, मुठी करकचून आवळणारा, दातओठ करकचून चावणारा बलभीम ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत काणीच नव्हता. वस्त्रहरणाच्या प्रसंगानंतर आपल्या मनातील धगधगती सूडाची इच्छा द्रौपदीने फक्त एक पांडवांना सांगितली, धर्मराजाला नाही, अर्जुनाला नाही, फक्त भीमाला. वस्त्रहरणाच्या आठवणीने जळत राहिला ती फक्त बलभीम. दु:शासनाने द्रौपदीला दाखवलेली मांडी फोडून तथील रक्त घटाघटा पिण्याची आणि द्रौपदीचे मोकळे झालेले कसे त्या रक्ताने माखवून मग तिची वेणी घालण्याची घनघोर प्रतिज्ञा करणारा आणि ती निर्धाराने पार पाडणारा भीम. 'राव'साहेबांच्या पांडवात भीम कोण? दाऊद इब्राहिम?

शरदरावांचा तिहेरी रोल

शरद पवार यांची मुख्य भूमिका सहदेवाची; पण त्यांच्यात थोडा अर्जुनही आहे. कुरुक्षेत्रावर उभे राहिल्यानंतर अर्जुनाला दोन्हींकडे आप्तबांधव दिसू लागले. शरदरावांचे स्नेहीजन पांडवांपेक्षा कौरवांतच जास्त बसलेले. या महाभारताच्या नौटंकीत शरदरावांकडे एक तिसरी भूमिकाही येण्याची शक्यता आहे. द्रौपदीच्या अपमानाने संतापून काही प्रतिशोध बलभीमाच्या हिरीरीने घेतला तो दाऊद इब्राहिम आणि पप्पू कलानी, ठाकूर संबंधांतून शरदरावांचा या आधुनिक भीमाशी स्नेहसंबंध स्पष्ट आहे. एकाच वेळी सहदेव, विषादातील अर्जुन आणि भीमाचा साथीदार अशी तिहेरी भूमिका शरदरावांकडे दिसते.

एका उज्ज्वल शोकांतिकेचे रूपक एखाद्या आधुनिक लज्जास्पद घटनेवर केले, की अशा गमतीशीर तुलना घडू लागतात.

'राव'साहेब प्रमुख पांडवांच्या बरोबर कृष्ण नाही. आहेत ते भीम, पांडव उघडपणे आपला म्हणायला तयार नाहीत आणि शेवटी 'राव'साहेबांच्या रुपकातील

कुंती कोण? याचे उत्तर मोठे कठीण आहे. जी चार पाच उत्तरं संभवतात त्यांचा विचार केला म्हणजे 'राव'साहेबांची तुलना अगदीच गचाळ आहे असे वाटते.

पुत्र नव्हे मलमूत्र

महाभारतातील कुंती धर्मराजाचे ढोंग, धूर्तपणा, निष्क्रियता, वाचाळता या अवगुणांमुळे संतापून जाते. असा पुत्र असून काय उपयोग? त्यापेक्षा नसलेला बरा. अशी ती त्याची निर्भर्त्सना करते तरी, धर्मराजाची शांती ढळत नाही. तेव्हा कुंती त्याला संतापाच्या अतिरेकात म्हणते, "तू माझ्या पोटातून आलास म्हणून तुला पुत्र म्हणायचे; पण पोटातून पुत्रच येतो असे नव्हे, धर्मराज! तू पुत्र नव्हे, मलमूत्र आहेस."

आधुनिक घटनेतील कुंती कोणीही असो, धर्मराजाच्या या आधुनिक आवताराला उद्देशून ती हेच बोलली असती. द्रौपदी वस्त्रहरण उपमा देताना 'राव'साहेबांना महाभारतातील या कुंतीच्या उद्‌गारांचीही माहिती असणारच, कारण ते 'महापंडित' आहेत!

(२९ ऑक्टोबर १९९३)

■■

कनिष्ठांची दुक्कल

नकुल-सहदेव ही दुक्कल साऱ्या महाभारतात फारसे काहीच करीत नाही; पण पाच पांडवात त्यांची मोजणी मात्र होते. शंकरराव चव्हाण अयोध्येतील वस्त्रहरणाच्या वेळी दिल्लीत बसून होते आणि शरद पवार वस्त्रहरण होणार अशी निश्चित बातमी कळल्यामुळे वस्त्रहरणाच्या चित्रीकरणाच्या खटाटोपास लागले हाते. तेव्हा शंकरराव, शरदराव ही जोडी नकुल सहदेवाच्या जागी फिट बसावी.

बलभीम कोण? दाऊद इब्राहिम?

कमतरता पडते ती फक्त बलभीमाची. या सगळ्या पांडवांत बलभीम कोणीच दिसत नाही. वस्त्रहरणाच्या वेळी संतापाने डोळे रक्तासारखे लाल झालेला, मुठी करकचून आवळणारा, दातओठ करकचून चावणारा बलभीम ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत काणीच नव्हता. वस्त्रहरणाच्या प्रसंगानंतर आपल्या मनातील धगधगती सूडाची इच्छा द्रौपदीने फक्त एक पांडवांना सांगितली, धर्मराजाला नाही, अर्जुनाला नाही, फक्त भीमाला. वस्त्रहरणाच्या आठवणीने जळत राहिला ती फक्त बलभीम. दु:शासनाने द्रौपदीला दाखवलेली मांडी फोडून तथील रक्त घटाघटा पिण्याची आणि द्रौपदीचे मोकळे झालेले कसे त्या रक्ताने माखवून मग तिची वेणी घालण्याची घनघोर प्रतिज्ञा करणारा आणि ती निर्धाराने पार पाडणारा भीम. 'राव'साहेबांच्या पांडवात भीम कोण? दाऊद इब्राहिम?

शरदरावांचा तिहेरी रोल

शरद पवार यांची मुख्य भूमिका सहदेवाची; पण त्यांच्यात थोडा अर्जुनही आहे. कुरुक्षेत्रावर उभे राहिल्यानंतर अर्जुनाला दोन्हींकडे आप्तबांधव दिसू लागले. शरदरावांचे स्नेहीजन पांडवांपेक्षा कौरवांतच जास्त बसलेले. या महाभारताच्या नौटंकीत शरदरावांकडे एक तिसरी भूमिकाही येण्याची शक्यता आहे. द्रौपदीच्या अपमानाने संतापून काही प्रतिशोध बलभीमाच्या हिरीरीने घेतला तो दाऊद इब्राहिम आणि पप्पू कलानी, ठाकूर संबंधांतून शरदरावांचा या आधुनिक भीमाशी स्नेहसंबंध स्पष्ट आहे. एकाच वेळी सहदेव, विषादातील अर्जुन आणि भीमाचा साथीदार अशी तिहेरी भूमिका शरदरावांकडे दिसते.

एका उज्ज्वल शोकांतिकेचे रूपक एखाद्या आधुनिक लज्जास्पद घटनेवर केले, की अशा गमतीशीर तुलना घडू लागतात.

'राव'साहेब प्रमुख पांडवांच्या बरोबर कृष्ण नाही. आहेत ते भीम, पांडव उघडपणे आपला म्हणायला तयार नाहीत आणि शेवटी 'राव'साहेबांच्या रुपकातील

कुंती कोण? याचे उत्तर मोठे कठीण आहे. जी चार पाच उत्तरं संभवतात त्यांचा विचार केला म्हणजे 'राव'साहेबांची तुलना अगदीच गचाळ आहे असे वाटते.

पुत्र नव्हे मलमूत्र

महाभारतातील कुंती धर्मराजाचे ढोंग, धूर्तपणा, निष्क्रियता, वाचाळता या अवगुणांमुळे संतापून जाते. असा पुत्र असून काय उपयोग? त्यापेक्षा नसलेला बरा. अशी ती त्याची निर्भर्त्सना करते तरी, धर्मराजाची शांती ढळत नाही. तेव्हा कुंती त्याला संतापाच्या अतिरेकात म्हणते, "तू माझ्या पोटातून आलास म्हणून तुला पुत्र म्हणायचे; पण पोटातून पुत्रच येतो असे नव्हे, धर्मराज! तू पुत्र नव्हे, मलमूत्र आहेस."

आधुनिक घटनेतील कुंती कोणीही असो, धर्मराजाच्या या आधुनिक आवताराला उद्देशून ती हेच बोलली असती. द्रौपदी वस्त्रहरण उपमा देताना 'राव'साहेबांना महाभारतातील या कुंतीच्या उद्‌गारांचीही माहिती असणारच, कारण ते 'महापंडित' आहेत!

(२९ ऑक्टोबर १९९३)

■■

उनाड पोर, चाबरा मास्तर, आंधळी नानी

नोव्हेंबर महिना उगवला म्हणजे दिल्लीला वित्तमंत्रालयात जोरदार हालचाली सुरू होतात. दिवाळी झाली. पीकपाण्याचा थोडाफार अंदाज आला, चालू वर्षाच्या जमाखर्चाचे हालहवाल कळले, की पुढील वर्षांच्या अंदाजपत्रकाच्या तयारीला जोर येऊ लागतो. वित्तमंत्रालयातील वातावरण गंभीर बनत जाते; लोकसभेच्या घास्तीने नाही, आयएमएफच्या धाकाने. मुले परीक्षेला घाबरत नाही; बापापुढे प्रगतिपुस्तक सहीकरित घेऊन जायला घाबरतात.

अंदाजपत्रक तयार करण्यात तसे फारसे काही कठीण नसते. प्रशासकीय खर्चाचे आकडे वेगवेगळ्या खात्याकडून तयारच मिळतात; त्यात काही कमीजास्त किंवा फेरफार करायला वाव नसतो. विकास योजना म्हणजे गाजराच्या पुंग्या असतात; वाजल्या तर आनंद आहे, नाही वाजल्या तर खाऊन टाका. प्रत्येक अंदाजपत्रकाच्या वेळी विकासाचा खर्च भरभक्कम मांडायचा म्हणजे खासदार खुष होतात. प्रत्यक्षात त्यातील किती पैसा खर्च होतो याची फारशी चिंता नंतर कोणी करीत नाही. विकासावर खर्च दाखवलेला पैसा खरोखर खर्च झाला की नाही, योग्य तऱ्हेने वापरला गेला की नाही याची तमा कोणालाच नसते. तस्मात्, खर्चाचे अंदाजपत्रक ही काही फारशी गंभीरपणे घ्यायची बाब नाही.

गृहिणी–ना सचिव, ना मंत्री

एखादी गृहिणी आपल्या घरखर्चाचे अंदाजपत्रक बांधते तेव्हा जमेची रक्कम पक्की ठरलेली असते. यजमानांचा पगार किंवा मिळकत आणि कुटुंबाची मिळकतीची इतर साधने यावर जमेची रक्कम ठरते. गृहिणीला कसरत करावी लागते ती घरचा खर्च मिळकतीच्या रकमेत भागवण्याची. लग्नसराईच्या महिन्यात आहेरांचा नवाच खर्च उद्‌भवला, तरी मिळकतीचा आकडा काही वाढत नाही. मग बिचाऱ्या गृहिणीला दुधावरचा, भाजीपाल्यावरचा, एखाद्या सिनेमा– नाटकावरचा

खर्च कमी करून आपले अंदाजपत्रक ठाकठीक करावे लागते.

सरकारी अंदाजपत्रकाची स्थिती गृहिणीसारखी नसते; सरकारी खर्च पहिल्यांदा ठरतो आणि खर्च लक्षात घेऊन उत्पन्न वाढवण्याची कोशीस सुरू होते. सरकारी अंदाजपत्रकाचे तंत्र असे उफराटे आहे. बायको बऱ्याच दिवसांकरिता माहेरी गेली असली म्हणजे नवरोबा जशी व्यवस्था चालवतो तसे हे तंत्र. खर्चाची मनमानी आणि पैशाची जुळवाजुळव, शिल्लक संपवणे, उधारी, उसनवारी इत्यादी कर बसवून मिळकत वाढवता आली नाही तर वित्तमंत्रीही लोकांकडून कर्जे घेणे, परदेशांतून मदत घेणे व सगळे मार्ग सरले, तर नोटा छापणे इत्यादी प्रकार अवलंबतात. बिचाऱ्या गृहिणीला असल्या शक्यता कधीच उपलब्ध नसतात.

काटकसर हा गृहिणीचा सर्वांत मोठा गुण समजला जातो, तर बेहिशेबी उधळलेपणा हा वित्तमंत्र्यांचा गुण. एखाद्या महिन्यात घरचे बजेट बिघडले आणि यजमानांकडून थोडे जास्त मागून प्यायची वेळ आली तर काय ऐकावे लागते आणि काय युक्त्या योजाव्या लागतात! वित्तमंत्र्यांना फारशी चिंता नसते. सरकारी खर्च वाढल्याने त्यांची लोकप्रियता वाढते आणि खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरिता पुरेसे उत्पन्न मिळाले नाही, नवे कर लादले नाहीत तर दाट पडायच्या ऐवजी त्यांची वाहवाच होते.

गृहिणीला तुटीचे अंदाजपत्रक करता येत नाही; केले तरी ते फारकाळ चालत नाही, त्यामुळे घर बर्बाद होते. देशाच्या बाबतीतही हे खरे आहे. अंदाजपत्रके लागोपाठ तुटीची असली आणि नोटा छापून खर्चाची मिळवणी झाली, की देश डबघाईला आलाच म्हणून समजा.

उनाड पोरगा, चाबरा मास्तर

पण खुर्चीवरला वित्तमंत्री इतका दूरवरचा विचार करणारा क्वचित असतो. राजकारणाची निकड अशी असते, की आला दिवस भागवून नेण्याकरिता त्याला खर्चही वाढवावा लागतो आणि वसुलीही कमी ठेवावी लागते. असला दुहेरी उधळेपणा हिंदुस्थानात वर्षानुवर्षे अनेक वित्तमंत्री चालवत आहेत. अंदाजपत्रकातील तुटीची रक्कम दरवर्षी भूमितीश्रेणीने वाढते आहे. त्यातून अर्थातच चलनवाढ, महागाई हे ब्रह्मराक्षस उभे राहतात; तर किमतीच्या वाढीमुळे देशातील उद्योजकांची परदेशांत माल खपण्याची शक्ती कमी होते, रुपयाची किमत घसरते आणि सगळ्या देशावरच आर्थिक अरिष्ट येते. हिंदुस्थानची स्थिती नेमकी हीच झाली आहे. उनाड मुलगा होस्टेलवर ठेवला आणि गुरुजी व्यंकटेश माडगुळकरांच्या कथेतल्यासारखे चाबरट असले म्हणजे पास काय, नापास काय सगळा आनंदच.

प्रगतिपुस्तक दाखवायला बापच नसल्याप्रमाणे वित्तमंत्री वर्षानुवर्ष वागले; पण आता एक नानी बाप म्हणून उभी राहिली आहे. सज्जड तंबी दिली आहे. तुमची परकीय चलनाची निकड आम्ही भागवू; पण तुम्हाला घरात काही शिस्त आणावी लागेल. नव्या शिस्तीच्या ज्या अटी नाणेनिधाने घातल्या आहेत त्यात एक महत्त्वाची अट अशी, की अंदाजपत्रकातील तूट कमी कमीत करत संपवून टाकली पाहिजे.

प्रगतिपुस्तकात खाडांखोड

यंदा वित्तमंत्रालयात नव्या अंदाजपत्रकाची तयारी सुरू करताना मोठे भीतीचे वातावरण आहे. अंदाजपत्रकी तुटीची टक्केवारी घटवायला तर पाहिजे, नाहीतर 'नानी' डोळे वटारते आणि प्रत्यक्षात तुटीची टक्केवारी कमी होण्यापेक्षा गेल्या वर्षीच्या तुलनेने ती वाढली आहे. आता करावे कसे? तुटीचा आकडा वाढू नये म्हणून सरकारने काही थोडे प्रयत्न केले आहेत, नाही असे नाही. खर्च काहीसा कमी केला; पण कात्री लागली ती नोकरदारांचा पगार, भत्ते इत्यादी अनुत्पादक खर्चांना नाही तर विकासयोजनांसारख्या उत्पादक बाबींना!

करव्यवस्थेच्या उदारीकरणानंतर महसूल जमा वाढेल अशी अपेक्षा होती, ती वास्तव्यात खोटी पडली. अंदाजपत्रकी तुटीबद्दलचे आपले प्रगतिपुस्तक महाखाष्ट नानीला नेऊन दाखवावे तरी कसे? या चिंतेत वित्तमंत्री पडले आहेत.

आंधळी नानी

नानीची स्थिती ही कोणत्याही बापासारखी. पोरगं नापास झालं, मग बोलून काय उपयोग आणि मारून काय उपयोग? "बाबा! पुढच्या वर्षी चांगला अभ्यास चांगला कर, पास हो. पुढच्या वर्षी पुन्हा नापास झाला तर मग बघ!" अशीच भूमिका नानीलाही घ्यावी लागते. ९२-९३ सालच्या परीक्षेत मिळालेले गुण चांगले नाहीत हे डॉक्टर मनमोहन सिंग यांना माहीत आहे. नानीपुढे प्रगतीपुस्तक घेऊन जाण्याआधी त्यातील आकडे आणि शेरे यांच्यात थोडीफार खाडाखोड करून नानीचा राग कमी करण्याची चलाखी वित्तमंत्री करतच आहेत; पण तेवढ्याने भागायचे नाही. पुढच्या वर्षी तूट कमी करण्याच्या भरकस प्रयत्नास आपण आधीच लागलेले आहोत, असे नाटक करणे त्यांना आवश्यक आहे.

परीक्षेत पास होणे बापाला फसवण्याइतके सोपे नाही! तुटीचा आकडा कमी करावा कसा? सरकारी खर्च तर कमी करता येत नाही; नोकरांचे पगार वाढते ठेवावेच लागतात; मंत्र्यांची चैनबाजी आणि परदेश दौरे अव्याहत चालूच आहेत. संरक्षण आणि सुरक्षा यांवरील ख़र्च वाढतोच आहे. तूट घटवायची म्हणजे

सरकारी उत्पन्न वाढण्याखेरीज गत्यंतर नाही. अशा आडाख्याने वित्तमंत्रालयात सुरे पाजळण्याचे काम चालू झाले आहे. नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यातील पाच राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांचे निकाल, सत्तारूढ पक्षाला फार प्रतिकूल लागले नाहीत तर २८ फेब्रुवारी १९९४ या दिवशी सरकारी करात भरगच्च वाढ होणार ही गोष्ट निश्चित!

तूट कमी, तर देश बुडणार

कर कोणते वाढवावेत? किती वाढवावेत? याचे आराखडे आणि हिशेब पक्के झाले आहेत. चेलय्या समितीच्या अहवालाच्या आधाराने नव्या करयोजनेची रूपरेषा जवळजवळ निश्चित झाली आहे. येत्या २-३ महिन्यांत जनतेच्या गळ्यात टाकायच्या करांच्या फासाचा दोर भरकस आवळला जाईल.

नवे कर बसवून सरकारी उत्पन्न वाढवायचे आणि तुटीचा आकडा घटलेला दाखवायचा ही शुद्ध बनवेगिरी आहे. उत्पादकावर नवे कर बसवले तर त्यामुळे महागाई वाढेल, निर्यात घटेल म्हणजे आर्थिक परिस्थिती आणखी खालावेल. म्हणजे नानीचा शब्द तर पाळला; पण उंडगेपणा चालूच राहिला असे होईल. या उलट तूट कमी करण्यासाठी सरकारी खर्च कमी केला आणि तुटीच्या अंदाजपत्रकाऐवजी शिलकीचे अंदाजपत्रक अंमलात आले तर महागाई कमी होईल निर्यात वाढेल आणि अर्थव्यवस्था सुधारेल. सरकारी अवाढव्य खर्च कमी करायला खूप वाव आहे. अंदाजपत्रकापैकी ७०-७५% रक्कम प्रशासकीय मामल्यावर खर्च निम्याने कमी करणे सहज शक्य आहे. नोकरदारांची पगारवाढ रोखली, महागाई भत्ते गोठवले, नोकरभरती थांबवली, रजा कमी केल्या, तर प्रशासकीय खर्च होते, तो झपाट्याने घटवता येईल. अशा तऱ्हेने शिलकीचे अंदाजपत्रक तयार झाले तर शिलकीचा उपयोग सरकारी कर्जे फेडण्याकरितादेखील करता येईल किंवा करांचा बोजा हलका करून उद्योजकांना प्रोत्साहन मिळेल असे वातावरण तयार करता येईल.

...पण सरकार असले काही करणार नाही. वारेमाप उधळपट्टी चालूच ठेवेल आणि त्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याकरिता नवे-नवे कर लादेल म्हणजे उत्पादकांवर बोजा आणि नोकरदारांच्या मौजा! असले अंदाजपत्रक सरकार सादर करेल आणि अर्थव्यवस्थेची घसरगुंडी चालूच राहील.

उद्योजकांचा आवाज उठेल!

नाणेनिधी सरकारवर अटी लादू शकते; सरकारी नोकर पगाराच्या, बोनसच्या, भत्त्याच्या मागण्या रेटू शकतात तर देशातील उद्योजकांना - शेतकऱ्यांना आपला

आवाज का उठवता येऊ नये? सद्य:स्थितीत नवे कर बसवणे सर्वथा अयोग्य आहे; पण नवे कर बसवले तर ते राष्ट्रीय कर्ज फेडण्याकरिता वापरले गेले पाहिजेत. पुढाऱ्यांच्या आणि नोकरदारांच्या चैनबाजीकरिता नाही, हे करदाते स्पष्ट करू शकणार नाहीत काय? आम्ही उत्पादन वाढवू, ज्यादा करही सरकारला देऊ; पण त्यांचा उपयोग सरकारी उघळपट्टीकरिता होता कामा नये असे करदात्याने शासनाला निक्षून सांगणे आवश्यक आहे.

पोरगे उनाड, मास्तर चाबरा, पालक आंधळा! वित्तमंत्री लोकसभेला खुष ठेवतात, नानीला बनवतात, मग पोराला धाक बसावा कसा? घरातल्या एखाद्या कोणाला तरी धारिष्ट्य करावे लागेल.

(४ नोव्हेंबर १९९३)

■■

रोगापेक्षा औषध भयानक

स्टिफन इवाइंगची 'करुणेपासून सावधान' ही मोठी गाजलेली कादंबरी आहे. अपंग नायिकेची शुश्रुषा करणारा नायक तिच्यात इतका गुंतून जातो, की आपण तिच्या प्रेमात पडलो आहोत अशी त्याची भावना होते आणि नायकाच्या सेवाशुश्रूषेमुळे नायिकेचीच नायकावर संपूर्णत: अवलंबून राहण्याची मानसिकता बनते. दोघेही लग्न करतात; पण करुणेवर आधारलेले हे नाते थोड्याच काळात दोघांच्या मनात एकमेकांविषयी भयानक विद्वेष तयार करते, असे या कादंबरीचे कथानक आहे.

पुण्यक्षेत्रात पाप

उत्तर काशीत दोन वर्षांपूर्वी भूकंपाचा धक्का बसला, ३० हजार घरं कोसळली आणि हजारावर लोक मृत्युमुखी पडले. भूकंपाच्या आपत्तीतून वाचलेली माणसे खंबीरपणे उभी राहिली. बाहेरून आलेल्या मदतीबद्दल कृतज्ञता बाळगूनही आयुष्यात स्वत:च्या पायावर पुन्हा एकदा उभे राहण्याच्या खटाटोपास सारी माणसे लागली. हळूहळू उत्तर काशीकडे जाणारा रस्ता मोकळा झाला आणि मोठमोठे ट्रक भरून देशीविदेशी मदत येऊ लागली. वेगवेगळ्या देशीविदेशी संस्थांनी घरे पुन्हा बांधून देण्याचे काम अंगावर घेतले आणि सगळेच चित्र पालटून गेले.

आज स्वीडनमधील गोरी माणसे तळपत्या उन्हात घामाने निथळत घरबांधणीचे काम करीत आहेत. ज्यांच्याकरिता घरे बांधली जायची ती मंडळी कोणीच हजर नाहीत. एखाद दुसरा हजर असल्यास शांत निर्विकारपणे विडी ओढत करुणेपोटी मेहनत करणाऱ्या लोकांकडे कुतूहलाने पाहत असतो. बांधकामासाठी किरकोळ मजूर लागले तर १०० रुपये रोजावर भरती करावे लागतात.

बांधकामाचे काम फार मंद वेगाने चालू असल्याची तक्रार भूकंपग्रस्त करतात. घर बांधणी करणाऱ्यांशी ते त्यासाठी हमरीतुमरीवर येतात. उत्तर काशीत टाटांनी

घरे बांधली. विश्व हिंदू परिषदेने ३०, रामकृष्ण मिशनने नेताला गावासाठी ६० घरे बांधली. "त्यांनी अजून निदान १०० घरे बांधायला पाहिजे होती," अशी नेतालाच्या सरपंचाची तक्रार आहे.

शासनाने प्रत्येक भूकंपग्रस्ताला १०,००० रु. रोख आणि १०,००० रु. चे घरबांधणीचे सामान पुरवले होते. ज्या भूकंपग्रस्तांना मदतगार संघटनांचा आसरा मिळाला त्यांनी पैसे खिशात टाकले आणि बांधकामाचे सामान विकून टाकले. संकटामुळे तयार झालेली एकी, स्वाभिमान संपला आणि त्याऐवजी मदतीसाठी आलेल्यांशीच मोठी कडवट हुज्जत चालू आहे. भूकंपग्रस्त भागात ४७,००० घरे होती; पण ५६,००० कुटुंबे घरे बांधून मागत आहेत. गावोगावाचे सरपंच भूकंपात घरे पडल्याची खोटी प्रमाणपत्रे देऊन पैसे मिळवत आहेत. डॉक्टर मंडळी जखमी झाल्याची खोटी प्रमाणपत्रे देत आहेत. साहाय्यासाठी करायच्या अर्जाच्या प्रतीच ५० रुपयाला विकल्या जात आहेत. वर्षापूर्वी भूकंपग्रस्तांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना घेराव करून त्यांच्यावर दगडफेक केली. एक सरपंच म्हणाला, "कोणालाच पैसे दिले नसते तर आमची काही तक्रार नव्हती; पण बाकीचे सगळे गबर होऊन गेले; मग आम्हीच गप्प का बसावे?" भीक हक्क बनली आहे, करुणेचे दूध फाटले आहे आणि भूकंपापेक्षा मदत हेच मोठे संकट झाले आहे.

मग लातूरची काय कथा?

उत्तर काशी खंडातील भूकंपग्रस्तांना मदत करण्यासाठी, त्यांची घरे पुन्हा बांधून देण्यासाठी पुढे आलेल्या सर्व संस्था स्वयंसेवी आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांच्या मनात माणुसकी आणि करुणेखेरीज दुसरी कोणतीच भावना नाही; तरीही इतके विपरीत चित्र उभे राहिले. महाराष्ट्रातील भूकंपपिडीत लातूर, उस्मानाबाद भागातील पुनर्वसनाचे आणि घरबांधणीचे काम खुद्द सरकार हाती घेत आहे, येथे काय होईल? येथे परदेशांतून आलेल्या मदतीतील गरम कोट तहसीलदारसाहेब लुंगावतात आणि ऐटीत घालून मिरवतात, त्यांचे सहकारी 'साहेबांनी कोट घेतला, आम्ही शर्ट घेतला तर काय होते' अशा मनोवृत्तीचे! राज्यकर्त्या पक्षातील मोठ्या नेत्यांच्या वादावादीमुळे प्रत्येक गावात दुही झालेली. पडलेल्या घरांच्या ढिगाऱ्याखाली सापडलेली माणसे निघाली नव्हती. तेव्हासुद्धा आजूबाजूच्या लमाणी टोळ्यांनी मृतदेहांच्या अंगावरचे दागिनेदेखील ओरबाडून घेण्याचे प्रकार घडले. ६७ पोलिस शिपायांना लुटालूट केल्याबद्दल बडतर्फ केल्याची बातमी होती, नंतर ती नाकारण्यात आली ही गोष्ट वेगळी. मदतीच्या

गाड्या येत आहेत, कपडे वाटले जातात, भांडीकुंडी मिळतात, फळे, बिस्किटे भेटतात, गरम जेवणाचीही व्यवस्था आहे. हे ऐकून दूरवरच्या प्रदेशातील भटके आणि गरीबगुरीब भूकंपानंतर ४८ तासांत महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी पाले ठोकून बसले होते. मदत बाहेरची, मदत देणारे बाहेरचे आणि मदत घेऊन जाणारेही बाहेरचे अशी मोठी विचित्र स्थिती, भूकंपानंतर बळी पडलेल्या लोकांच्या किंकाळ्या हवेत विरून जाण्याआधीच तयार झाली होती.

मदतीचा महापूर

किल्लारी, सास्तूर परिसरात मदतीचा महापूर लोटला. साऱ्या महाराष्ट्रात शेकडो संस्था निधी गोळा करायच्या कामाला लागल्या. गावोगावचे गुंडपुंड पुढारी धमक्या, दटावण्या देऊन मदत उकळू लागले. प्रकार इतक्या कडेलोटाला गेला, की पुण्याच्या कमिश्नरांना हुकूम काढून निधी गोळा करण्यावर बंदी आणावी लागली. मुख्यमंत्रिनिधी, पंतप्रधानांचा निधी जवळजवळ प्रत्येक वर्तमानपत्राने जमा केलेला निधी आणि सर्वांत शेवटी जागतिक बँकेने उपलब्ध करून दिलेली ९०० कोटी रुपयाची रक्कम, एवढा माल येऊन पडल्यावर पुढाऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटले नसते तरच नवल! शेतकरी जमेल ती जुळवाजुळव करून पेरणी करीत होते, फुकट पोट भरण्याची व्यवस्था झाल्यामुळे पेरणीच्या कामाला एकही माणूस रोजावर काम करायला तयार नव्हता आणि भूकंपग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी आलेले नोकरदार आणि पुढारी या सगळ्या गोंधळात काय गवसते याचा तपास घेत होते.

सगळेच अस्ताव्यस्त

घरांच्या पुनर्बांधणीच्या कामाला मोठ्या लगबगीने सुरुवात करायचे ठरले. एकूण घरे बांधायची किती याबद्दलच पहिला वादविवाद झाला. परिसरातील कित्येक कुटुंबे वर्षानुवर्षे लातूर, मुंबईला जाऊन स्थायिक झाली आहेत. त्यांनीसुद्धा लगबगीने येऊन नुकसानभरपाईची आणि पुनर्वसनाची मागणी केली. पहिल्यांदा सगळ्यांना घरे दिली जाणार नाहीत, असेही जाहीर झाले. कोणते घर जुजबी नुकसानीचे आणि कोणते घर पुरे ढासळलेले हे ठरवण्याचा अधिकार पुढाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या हाती आला आणि त्यांचा दिल बहलून गेला.

दसऱ्याच्या दिवशी शुभमुहूर्तावर कामाचा नारळ फुटला; पण काम सुरू झाले नाही. गावागावात वाद माजले. नव्या गावठाणाची जागा कोठे असावी याबद्दल पहिला विवाद. नवीन गावठाण काळ्या मातीच्या जागेत आहे. नव्याने भूकंप झाल्यास तिथे पहिल्यापेक्षा जास्त धोका आहे. अशी कळकळीने तक्रार

करणारे भूकंपग्रस्त त्यांत होते. तसेच गावठाण हलवल्यामुळे जमिनींच्या आणि भूखंडांच्या किमतीवर होणारा परिणाम लक्षात घेऊन, हमरीतुमरीवर येणारे अनेक होते.

सरकारने तीन आकाराची घरे बांधायचे ठरवले. २५० चौ. फूट, ४५० चौ. फूट, ६५० चौ. फूट. भूकंपात ढासळलेली घरे वेगवेगळ्या आकारांची, वेगवेगळ्या धाटणीची. लहान घर सरकारी खर्चाने मिळायचे, मोठे घर घ्यायचे असल्यास ज्यादा रक्कम भूकंपग्रस्तांनी भरायची. म्हणजे वादावादीला आणखी एक भरभक्कम विषय.

भूकंपातही सुरक्षित राहावी अशी बांधणी नेमकी कशी असावी याचा अद्याप निर्णय झालेला नाही; पण नवीन घरांचे नकाशे पाहता नवीन घरे अधिक धोक्याची आहेत असे अनेकांचे म्हणणे आहे. दुर्दैवाने पुन्हा कधी याच भागात भूकंप झाला आणि सरकारने बांधलेल्या घरांचे विशेष नुकसान झाले तर काय कल्लोळ होईल याची नुसती कल्पनाच करावी!

टाळूवरचे लोणी

एवढे नक्की, की जमिनीचा खर्च सोडता बांधल्या जाणाऱ्या घराचा खर्च १५० रु. चौ. फुटापेक्षा जास्त असण्याचे काही कारण नाही. सरकारी खर्चाचा अंदाज प्रति चौ. फूट २९७ रुपये सांगितला आहे. घर तयार होईपर्यंत ४०० रु. चौ. फुटांत सगळे आटोपले तरी नशीब समजावे! या रकमेचे वाटप कसे होईल हे 'सुज्ञासा सांगणे न लगे!'

एवढे प्रचंड बांधकाम होणार. त्यात हजारो स्थानिक मजुरांना आणि गवंड्यांना काम मिळू शकले असते; पण घरांचे बांधकाम कारखान्यात तयार झालेल्या पूर्वरचित सिमेंट ठोकळ्यांनी होणार आहे. भूकंपग्रस्त भागातील उन्हाळ्याचा ज्यांना अनुभव आहे त्यांनी ही घरे भर उन्हाळ्यात निव्वळ भट्टीसारखी होतील याची चांगली जाणीव आहे; पण सरकारला काय त्याचे? गवंडी नाराज, ज्यांना घरात राहायचे ते नाराज; पण सिमेंटचे ठोकळे तयार करणारे कारखानदार मुख्यमंत्र्यांना दर चौरस फुटामागे २५ रु. निधी देतात, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असे उघडपणे बोलले जाते.

पुनर्बांधणीच्या कामात लिंबाळा गावचे पुरे पुनर्वसन उक्ते शिवसेनेवर सोपवून सारे गाव तिला दत्तक देण्याचा एक प्रस्ताव आला आणि मुख्यमंत्र्यांनी त्याला लगेच मान्यता दिली. कोणत्याही एका राजकीय पक्षाच्या हाती सबंध एक गाव देणे, विशेषत: एका जात्यंध पक्षाच्या हाती ते देणे ही कल्पनाच भयानक आहे.

उद्या सारे महाराष्ट्र राज्यच आम्ही दत्तक घेतो आणि सगळे काही नमुनेदार पद्धतीने चालवून दाखवतो असा कोणी प्रस्ताव आणला तर तो मान्य होईल काय? याच वेळी उत्तर प्रदेशात शिवसेनेने उमेदवार उभे करायचे ठरवले. त्यांचे उत्तर हिंदुस्थानात काम शून्य; पण कार्यालये, जाहिराती, वाहतूक इत्यादींसाठी पैसा आणि साधनसामग्री काँग्रेस पक्षाकडूनच पुरवली जात आहे. त्याबद्दल सज्जड पुरावा आहे. लिंबाळा गावासंबंधीचा निर्णय हा एका 'पॅकेज डील'चा भाग असावा!

सावधान! सावधान!!

सरकारचा हा सारा खटाटोप कशासाठी चालू आहे? भूकंपग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाईदाखल काही रक्कम दिली असती आणि त्यांना पाहिजे तिथे पाहिजे तसे घर बांधण्याची मुभा दिली असती तर बहुतेक शेतकऱ्यांनी नवे गावठाण वसवण्याऐवजी आपापल्या शेतीवाडीवर नवी घरे वसवली असती. शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी ते चांगले झाले असते; पण एवढ्या मोठ्या उलाढालीत आपला काहीच हिस्सा नसावा हे नेत्यांना कसे पटेल?

उत्तर काशीखंड मूळ पवित्र तीर्थस्थानांचा प्रदेश. सद्भावनेने आलेल्या करुणेनही तेथे एवढा कल्लोळ माजवला. लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यांत तर सर्व पुनर्वसन भामट्यांच्याच हाती! या प्रदेशातील सर्व शेतकऱ्यांचे दुर्भाग्य नजीकच्या काळात संपण्याची काही लक्षणे नाहीत.

(१२ नोव्हेंबर १९९३)

■■

वेदान्ताचे अर्थशास्त्र

काही वर्षांपूर्वी 'हिंदू विकासाची गती' हा शब्दप्रयोग लोकप्रिय झाला होता. अगदी गलथान परिस्थितीतही ती वाढ होते – ३.५% च्या आसपास ती हिंदू विकासाची गती! या गतीचा आणि हिंदुस्थानचा तसा काही संबंध नाही.

आजकाल हिंदू अर्थशास्त्राबद्दल ऐकू येते. देवळापलीकडे आपल्याला काही समजते हे दाखवण्यासाठी भाजप नेते काही अडगळीत पडलेल्या अर्थशास्त्रज्ञांकडून 'हिंदू अर्थशास्त्र' या विषयावर चोपडी लिहवून घेत आहेत. जन्माने हिंदुत्व आणि केवळ मास्तरकीच्या अधिकाराने अर्थशास्त्र एवढ्या भांडवलावर अर्धा डझन विद्वान 'हिंदू अर्थशास्त्रज्ञ' बनले आहेत. दक्षिणा देईल त्याचा जयजयकार करण्याच्या ब्राह्मणी परंपरेत हे ठीक बसते.

हिंदू अर्थशास्त्रातील चोपड्यात वेदांतील अवतरणे, चार्वाकाच्या अर्थशास्त्रातील संदर्भ यांच्या भरताडाखेरीज काही सिद्धांत औषधालाही सापडत नाही. हिंदू अर्थशास्त्राचा सैद्धांतिक आधार वेद का उपनिषेद? या प्रश्नाचा निर्णय प्रथम व्हायला पाहिजे.

कूपमंडुक वेद

वेदांना मानणाऱ्या लोकांना कोणी 'मूढ' म्हटले किंवा वेदांची तुलना छोट्याशा आडाशी केली तर असे बोलणारा कोणी तरी हिंदुद्वेष्टा नीच मनुष्य असेल असा समज हिंदुत्वावाद्यांचा होईल आणि ते अशा लेखकाचा 'सलमान रश्दी' किंवा 'नसरीन' करता येईल की काय अशा प्रयत्नास लागतील.

पण ही वचने कोणा धर्मद्वेष्ट्याची नाहीत; कोणा म्लेंच्छाची नाहीत, कोणा यवनाची नाहीत, ही अवतरणे सर्व हिंदू धर्मीयांना परमपूज्य असलेल्या श्रीमद् भगवद गीतेतील आहेत. विनाकारण वाद नको म्हणून गीतेतील संबंधित श्लोकांची लोकमान्य टिळकांनी केलेली भाषांतरे खाली देत आहे.

हे पार्थ! (कर्मकांडात्मक) वेदांतील (फलश्रुतीच्या) वाक्यांना भुललेले व त्याखेरीज दुसरे काही नाही असे म्हणणारे मूढ (जे) लोक फुलवून असे भाषण करतात, की – २.४२ हे अर्जुना! (कर्मकांडात्मक) वेद (अशा रीतीने) त्रैगुण्याच्या गोष्टींनी भरलेले असल्यामुळे तू निस्त्रैगुण्य म्हणजे त्रिगुणातील, नित्य, सत्त्वस्थ, सुखदुःखादी द्वंद्वापासूनच अलिप्त आणि योगक्षेमादि स्वार्थात न गढता आत्मनिष्ठ हो – २.४२ चोहोकडे पाण्याचा पूरच झाला असता विहिरीला जितका अर्थ किंवा प्रयोजन राहते (अर्थात काहीच काम राहत नाही) तितकेच ज्ञान प्राप्त झालेल्या ब्राह्मणला सर्व (कर्मकांडात्मक) वेदांचे प्रयोजन असते (म्हणजे नुसत्या काम्यकम्यकर्मरूपी वैदिक कर्मकांडाची त्याला अपेक्षा राहत नाही.)

– (नाना प्रकारच्या) वेदवाक्यांनी गांगरून गेलेली तुझी बुद्धी जेव्हा समाधिवृत्तीत स्थिर व निश्चिंत होईल, तेव्हा (हा साम्यबुद्धिरूप) योग तुला प्राप्त होईल २.५३.

श्रीमद् भगवद गीता ब्रह्मविद्येच्या योगशास्त्रातील कृष्णार्जुन संवादाच्या रूपाने सांगितलेले उपनिषद आहे. उपनिषदात वेदांचा धिक्कार असेलच कसा? असा वाद राजकारणी हिंदुत्ववादी घालतील. धर्मशास्त्रातील जाणकारांना त्याबद्दल आश्चर्य वाटणार नाही.

रानावनात फिरणाऱ्या पशुपालन आणि शेतीवर जगणाऱ्या आर्य टोळ्यांचे वेद हे ग्रंथ आहेत. जीवन सुलभ करणाऱ्या निसर्गातील वेगवेगळ्या देवतांना प्रमुख विषय आहे. वेगवेगळ्या देवतांना प्रसन्न करण्यासाठी त्यात कर्मकांड सांगितले आहे. संघ, गण, राष्ट्र अशा समुदायांच्या श्रेष्टत्वाचे गुणगान वेदविचारात आहे.

पिंडी तेच ब्रह्मांडी

याउलट उपनिषदांची उत्पत्ती आर्यांची वस्ती हिंदुस्थानात स्थिरावल्यानंतर झाली आणि उपनिषदांच्या विचारांवर एतद्देशीय 'लोकायत' तत्त्वज्ञानाचा प्रभाव वेदांपेक्षा अधिक आहे. उपनिषदांत सांगितलेल्या तत्त्वज्ञानाला वेदांत म्हणजे वेदांचा अंत करणारे किंवा वेद जेथे संपतात तेथे ज्याची सुरुवात होते ते, असे नाव आहे.

अनंत विश्व ज्याने व्यापले आहे, ते अविनाशी आहे, ते सतत रूप बदलते; पण नष्ट होत नाही, हे वेदान्तातील तत्त्व आधुनिक विज्ञानाशी सुसंगत आहे. 'अहं ब्रह्मोऽस्मि' म्हणजे कोणताही प्राणिमात्र आणि विश्व यांच्यातील अभिन्नता मानणारा हा विचार वेदान्ताचा पाया आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी हिंदू शब्दाची व्याख्या करताना 'हिंदू वेदांना मानणारा असावा' ही महत्त्वाची अट घातली. उपनिषदांना मानणारांना किंवा वेदोपनिषदांना मानणारांना असे म्हटले नाही. वेद आणि वेदान्त यातील स्पष्ट विरोध आचार्यांना मान्य होता हे उघड आहे. 'वेदोपनिषद' असा समास सर्रास वापरला जातो; पण हा समास 'रामलक्ष्मण' या जातीचा नाही, 'रामरावण' या प्रकारचा आहे. वेदातील विचार आणि वेदान्त तत्त्वज्ञान यांतील फरक आणि विरोध याबद्दल चिडीचूप मौन बाळगण्याचे एक व्यापक कारस्थान शतकानुशतके चालत आले आहे.

वेदान्ताची वाढती मान्यता

वेदान्त तत्त्वज्ञानाची मान्यता वाढत आहे. आधुनिक विज्ञान, विशेषत: क्वांटम (Quantum) सिद्धांत आणि त्यानंतरचे संशोधन वेदान्ताची पुष्टी करणारे आहे. सकल विश्वाच्या स्वरूपाचे आकलन सांगणारे तत्त्वज्ञान म्हणून उपनिषदांची मान्यता आहे. याउलट वेदांचे स्थान आर्य समाजाच्या एका विशिष्ट अवस्थेत संपत्ती, आरोग्य, संतती इत्यादी फले प्राप्त करून घेण्यासंबंधीचा विचार एवढे मर्यादित मानले पाहिजे.

वेदान्त विचाराची पुष्टी वेगवेगळ्या क्षेत्रांत अनपेक्षितपणे होत आहे. सर्वसामान्य माणसांना दूरवरचे दिसत नाही, त्यांना आपले हित कळत नाही, त्यामुळे अवघे जन मोठ्या संकटात आणि दु:खात सापडलेले असतात असा टाहो बहुतेक सर्व समाजसुधरीणांनी फोडला. संसार – दु:खातून लोकांची मुक्तता करावी, त्यांना मोक्षाचा मार्ग दाखवावा म्हणून धर्मक्षेत्रात अनेक अवतार, प्रेषित, बाबा आणि महाराज झाले. सर्व विश्वाचा निर्माता आणि पालक जो परमेश्वर त्याच्यात आणि सामान्य माणसात संबंध जुळवून देणाऱ्या 'अडत्यांच्या वखारी' त्यांनी घातल्या. या वखारी आता राजकारणापुरत्या उपयोगाच्या राहिल्या आहेत. विश्वाची उत्पत्ती आणि चलनवलन यांचे गूढ उलगडण्यासाठी धर्मवाद्यांकडे कोणी जात नाही. ती जबाबदारी आता विज्ञानाने घेतली आहे. धर्म विज्ञानाचे साधन राहिलेला नाही; तसेच नैतिकतेचेही नाही. धर्मशास्त्राने रूढ केलेली नीतिमत्ता निरर्थक झाली आहे. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाशी मान राखणे ही नैतिकतेची नवी व्यक्तिनिष्ठ व्याख्या सर्वमान्य होते आहे.

धर्मकारणात 'अडत्यांचा' पराभव झाला तसाच अर्थकारणातही झाला आहे. सामान्यजनांना आपले हित समजत नाही. स्वर्थासाठी ते धडपडतात; त्यांची धडपड परस्पर विरोधी असते. त्यामुळे एकूण समाजाचे नुकसान होते, ते

टाळायचे असेल तर अर्थव्यवस्थेचे नियोजन झाले पाहिजे असा विचार अनेकांनी मांडला. समाजवादी, कल्याणवादी, नेहरूवादी वेगवेगळ्या पंथांनी सम्यक् आणि सूक्ष्म यात मूलभूत विरोध, एवढेच नव्हे तर संघर्ष आहे असे मांडून नियोजनाचा पसारा मांडला तो आता सारा ढासळून गेला आहे.

पर्यावरणवादी सोडल्यास सम्यक् आणि सुक्ष्म यात मतभेद असल्याचे आता कोणी मांडत नाही. हा वेदान्त तत्वज्ञानाचा मोठा विजय आहे.

व्यक्तीची संघावर मात

संघशक्ती मागे पडत आहे. व्यक्तीचा उदय होत आहे. 'कलौ संघे शक्ति:' हे वचन मानले. तर कलयुग संपले आहे, असे समजावे लागेल. आर्याचा वेदांमध्ये सांगितलेला धर्म हा संघाचा धर्म आहे. ज्यु, ख्रिस्ती, मुसलमान हेही संघधर्म आहेत. या सर्व संघधर्मांचा पराभव होतो आहे. उद्योजकांच्या नव्या युगात व्यक्तीनिष्ठ वेदान्त तत्वज्ञानाचा म्हणजे साम्यक् आणि सूक्ष्म यास अभिन्नत्व उदय होतो आहे.

भारतीय जनता पार्टीच्या प्रात्सोहानाने अर्थशास्त्र लेखन कामाठीस भिडलेल्या विद्वानांना वेद मान्य आहे, असे दिसते; पण उपनिषिदे मान्य आहेत किंवा नाहीत याबद्दल स्पष्ट संख्येत मिळत नाहीत. उपनिषदांचे अर्थशास्त्र अजून कोणी मानलेले नाही. 'पिंडी तेच ब्रह्मांडी' असल्यामुळे मध्यस्थ नियोजकांची आवश्यकता नाही. प्रत्येक व्यक्तीने आपले व्यक्तिमत्व प्रमाण मानून धडपडत राहवे. कोट्यवधी प्रणिमात्रांच्या अशा धडपडीतून त्यांनी केलेल्या चूकांमधून, सुधारनातून सर्व समाजाचे एवढे नव्हे तर, सर्व विश्वाचा हेतू साध्य होतो, थोडक्यात स्वतंत्र्य, अर्थव्यवस्था हे उपनिषदांचे अर्थशास्त्र आहे आणि गंमत अशी, की हिंदुत्वाचा झेंडा मिरविणारे त्याचा विरोध करत आहेत. संघर्ष उघड उघड एका बाजूला वेध आणि दुसऱ्या बाजूला वेदान्ताचा शेवट करणारी उपनिषदे असा आहे.

(१९ नोव्हेंबर १९९३)

■■

देवळांच्या विढ्याचा तिढा

अमृतसरचे सुवर्ण मंदिर, अयोध्येचे मस्जिद-मंदिर आणि आता श्रीनगरचा हजरतबाल दर्गा, तीन देवळे, तीन धर्मांची; पण अलीकडच्या राजकारणाच्या रंगभूमीवर प्रकाशझोतात तळपणारी. सुवर्ण मंदिर प्रकरणामुळे एका पंतप्रधानांची हत्या झाली. अयोध्या प्रकरणामुळे निदान एक सरकार पडले आणि हजरतबालमुळे नरसिंह राव शासनाचे भवितव्य एका केसाच्या आधाराने टांगून राहिले.

राजनीती देवळांभोवती प्रदक्षिणा घालते आहे. देऊळ पाहिले, की सत्ताधारी विस्तव पाहिल्यावर विंचवाने नांगी टाकावी तसे निष्प्रभ होतात. देवळांचा आश्रय घेणारे गुंड असोत, अतिरेकी असोत, देशद्रोही असोत, देवळात जाऊन त्यांचा पिच्छा करण्याची हिमत सत्ताधाऱ्यांची होत नाही. लहान मुले छापापाणी खेळतात, डाव असलेल्या गड्याने बाकीच्या गड्यांना ते उभे असताना पकडायचे असा खेळ असतो. शिवणारा जवळ आला, की खेळाडू गपकन खाली बसून घेतो. मग शिवणाऱ्याची काही मात्रा चालत नाही. भोज्याला जाऊन शिवले की डाव अंगावर येत नाही तशी देवळे अतिरेक्यांची भोज्ये बनले आहेत. काहीही उद्रेक करावा, माणसांचे मुडदे पाडावे, लुटालूट करावी आणि खुशाल एक चांगलेसे ऐतिहासिक देऊळ गाठून त्याचा आसरा घ्यावा. म्हणजे पाठलाग करणारे पोलिस किंवा लष्कर निष्प्रभ होऊन बावळटासारखे तोंड वासून चिडीचूप बसून जातात. पाठलाग करणाऱ्यांची स्थिती विस्तव पाहिलेल्या विंचवाची, तर अतिरेक्यांची स्थिती तर अक्षरशः शंकराच्या पिंडीवर चढून बसलेल्या विंचवासारखी.

कवि वचनच आहेः

सांबाच्या पिंडीते बसशी
अधिष्ठून वृश्चिका! आज!
परि तो आश्रय सुटता
खेटर उतरवील रे तुझा माज!!

म्हणजे डोळ्यासमोर मोठा विंचू बसला आहे, विंचू पाहिला, की पायातली वहाण काढायची आणि त्याला हाणायचे; पण विंचू शंकराच्या पिंडीवर बसलेला, त्याला मारायला जावे तर पिंडीला चप्पल लागते! तस्मात विंचू आपणहून पिंडीवरून उतरून खाली येण्याची वाट पाहण्याखेरीज गत्यंतर नाही. ती एकदा उतरला, की मग पायातली वहाण त्याचा माज उतरवेल. तोपर्यंत विंचू पिंडीवर निर्धास्त सुरक्षित राहणार एवढेच नव्हे तर पिंडीबरोबर विंचवाचीही षोडशोपचारे पूजा होत राहणार.

आधुनिक विंचू

अलीकडेच विंचू खूपच हुशार झाले आहेत. शंकराची पिंड सोडून खाली उतरण्याचा विचारही त्यांच्या मनात येत नाही. उलट पिंडीवरतीच आपली वस्ती कायम पक्की करण्याचा त्यांचा खटाटोप आहे. एरवी दगडाच्या तळाशी राहणारा हा प्राणी दगडाच्याच लिंगाच्या माथ्यावर बसला, की मोठा माज दाखवू लागतो.

अमृतसरच्या सुवर्ण मंदिराचा भिद्रानवालेंनी ताबा घेतला. सर्रास अन्नधान्य, इतर रसद, बंदुका, स्वयंचलित रायफली, रॉकेट्स अगदी आधुनिकातील आधुनिक शस्त्रे अतिरेक्यांना बिनधास्त पोचू लागली. दिवसाढवळ्या एका पोलिस उच्चाधिकाऱ्याचा त्यांनी खून केला. अमानुष छळामुळे विद्रूप झालेली प्रेते सुवर्ण मंदिराच्या बाहेर पडत असलेली हरहमशा दिसत होती; पण सरकार चालढकल करत राहिले आणि शेवटी एकदा, प्रार्थनास्थळाचे पावित्र्य भंगू नये अशा तऱ्हेने म्हणजे पायातील वहाणेने नव्हे तर चांगल्या जाडजूड दंडुक्याने विचवाला हाणावे लागलेच. पिंड वहाणेने विटाळली नाही, दंडुक्याने भंगली.

अयोध्या प्रकरणी तर चालढकलीची कमाल झाली. तिथल्या प्रस्तावित देवळात खुद्द पंतप्रधान आणि गृहमंत्री यांचा जीव अडकलेला. त्यामुळे मशीद पडणार हे स्पष्ट दिसत असताना शासन निष्क्रिय राहिले. अयोध्येचा विंचू इतका माजोरी, की त्याने पिंडच फोडून टाकली. उंटावरील शहाण्याच्या कहाणीप्रमाणे दोन्ही प्रकरणात उंटही गेला, वेसही गेली आणि मडकेही गेले.

केसाने गळा कापला

गुरुद्वारा झाले, मंदिर झाले आता पाळी मशीदाची! काश्मीरचा हजतबालचा दर्गा मोठा इतिहासप्रसिद्ध. काश्मीरच्या राजकारणाच्या पटातील एक महत्त्वाचे घर. १९६३ मध्ये दर्ग्यातला हजरत पैगंबरांचा केस चोरीला गेल्याची बातमी पसरली. प्रत्यक्षात तो केस बराच काळ आधी नाहीसा झाला होता; पण चोरीचा मामला, शेख अब्दुल्लांनी राजकारणाच्या सोयीसाठी तारीख शोधून काढली

असे त्या वेळी बोलले जात होते. राजकीय प्रश्न मिटला आणि पैगंबरांचा केस जितक्या अद्‌भुतपणे अदृश्य झाला तितक्याच चमत्काराने परत साकार झाला. एवढेच नव्हे तर जाणकार मुल्ला मौलवींनी, "हाच तो प्रेषित महंमदाचा केस" अशी विश्वासपूर्वक ओळख पटवून घेऊन, निर्वाळा दिला. ३० वर्षांनी पुन्हा एकदा हजरतबाल दर्ग्याचेच प्रकरण पेटले. आजूबाजूच्या विद्यापीठात लपलेल्या अतिरेक्यांचा लष्कराने पिच्छा केला. त्या वेळी अतिरेकी दर्ग्यात घुसतील असा धोका आहे. त्यांना दर्ग्यात आसरा घेता येऊ नये अशी काळजी घेणे आवश्यक होते; पण लष्कराने तरी काय काय गोष्टीची चिंता करावी? त्यांना काय थोडी कामे आहेत? एकाच वेळी लष्करी कारवाई आणि लोकांची दिलजमाई असा चमत्कार घडवून पंतप्रधानपदावर आरूढ झाल्याची स्वप्ने पाहणारे, आपण जणू मोशे दायान आणि महात्मा गांधी यांचा संयुक्त अवतारच अशा थाटात वावरणारे राजेश पायलट! त्यांची दर दोन दिवसांआड काश्मीर भेट ठरलेली. आल्यासारखे त्यांची निदान एकतरी सभा व्हायला पाहिजे. सभा म्हटली, की माणसे जमवायला पाहिजेत. दूरदर्शनवचे कॅमेरे पाहिजेत. सगळी व्यवस्था करायची ती लष्कराने.

गृहमंत्री शंकरराव चव्हाण विमानाने श्रीनगरला आले; पण राजधानीपर्यंत ६ कि. मी. अंतरावर मोटारगाडीने जाण्याची त्यांची हिमत झाली नाही. त्यांनी हेलिकॉप्टरचा आग्रह धरला, "या अतिरेक्यांचा काय भरवसा सांगावा? ते लांबून रॉकेटचा मारा करून गाडी उडवून देतील." ही त्यांची भीती!

असल्या कामाच्या व्यापात लष्कराकडून अनवधान झाले. लष्कर उंदराला पकडायला निघाले. दरवाजे खिडक्या बंद केल्या. फक्त उंदराचे बीळ बंद करायचे राहिले आणि उंदीर सटकला. विंचवाचेच रूपक चालू ठेवायचे म्हणजे, विंचू अशी काही शहाजोग चलाखी करेल अशी कल्पना लष्कराला आली नाही आणि विंचू निर्धास्तपणे पिंडीवर चढून बसला.

विंचवांना दाणागोटा पुरवा

सुवर्ण मंदिरातल्या अकाल तख्तात रसद आणि शस्त्रे बिनधास्त येत राहिली. त्यामुळे भिंद्रानवाल्यांच्या साथीदारांना तख्त सोडून बाहेर पडण्याची काही गरजच नव्हती. दररोज देशोदेशीचे बामीदार टेलिव्हिजनवाले आत येत होते. भिंद्रानवालेंच्या मग्रूर अरेरावीला जगभर प्रसिद्धी देत होते. सुवर्ण मंदिराचा वेढा अजागळपणे वर्षानुवर्षे चालला तो थेट, 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'पर्यंत.

अयोध्येत आणि आसपास तर सारे राज्य विंचवांचेच! त्यांना कसल्याच पुराव्याची कसलीच चिंता करण्याचे काही कारणच नव्हते.

दर्ग्यात अडकलेले अतिरेकी आठवड्याभरात सहज घायकुतीला आले असते. दाणागोटा संपला, पाणी संपले, औषध संपले म्हणजे पांढरे निशाण फडकवण्याखेरीज काही गत्यंतर राहत नाही; पण खुद्द जम्मू आणि काश्मीर न्यायालयानेच अतिरेक्यांना दाणागोटा पुरवणे ही लष्कराची जबाबदारी असल्याचा निर्णय दिला आणि भारतातील धर्मयुद्धाची परंपरा महाभारत काळानंतर पहिल्यांदा उच्च पराकोटीवर नेऊन ठेवली. वेढा घालून बसलेल्या जवानांना भाकरी मिळाली नाही तरी चालेल; पण वेढ्यात अडकलेल्या अतिरेक्यांना मात्र जेवण पोचलेच पाहिजे. अयोध्या प्रकरणापासून राजकीय निर्णय कोर्टावर ढकलण्याचा पंतप्रधानांचा डाव इथे त्यांच्या अंगलट आला. बाहेरून अन्नपाणी, औषधोपचार, वैद्यकीय सेवा इ. चा पुरवठा नियमितपणे चालू राहिला. मग विंचवाला पिंडीवरून उतरण्याचे कामच काय? त्यांच्या काही तक्रारी आहेत, "जेवण योग्य तसे काश्मिरी पद्धतीचे नसते, कालची बिर्याणी जरा सपक झाली होती आणि रुमाली रोटी पंजाबी पद्धतीची जाडीभरडी होती. काश्मिरी पद्धतीची मऊसूत मुलायम नव्हती." अशा तक्रारी राहणारच. कुटुंबापासून, मित्रमैत्रिणीपासून दूर राहावे लागणे हेही एक अतिरेक्यांचे दु:ख आहेच. कोर्टामार्फत निर्णय आणून अतिरेकी असले प्रश्न सोडवून घेतील. नेहरूंनी मान्य केलेली काश्मीरमधील युद्धबंदी रेषाच पक्की झाली. त्याचप्रमाणे काही वर्षांत नरसिंह राव शैलीचा वेढा काश्मीरमधील एक प्रेक्षणीय स्थळ होऊन जाईल आणि कदाचित हा वेढा पाहण्याकरिताच आंतरराष्ट्रीय प्रवाशांची गर्दी उसळेल! काय सांगावे कदाचित त्यामुळे सगळ्या देशाचा परकीय चलनाचा चणचणीचा प्रश्न सुटून जाईल!

किल्ल्यांच्या वेळांचे राजकारण

कोणत्याही देवळाच्या भिंती बांधकामात तकलादू असल्या तरी दुर्गांच्या आणि किल्ल्यांच्या तटबुरुजापेक्षा जास्त मजबूत ठरतात, कारण त्यांना हात लावण्याची कोणाची शहामत नाही. किल्ल्यांना वेढा घालणारे तटबंदीवर तोफांचा भडीमार करीत, सुरुंग लावीत आणि काही जमले नाही तर शेवटी किल्ल्यात फंदफितुरी माजवीत. कोणी 'सूर्याजी पिसाळ' हाताशी धरायचा. त्याच्याकडून दरवाजे उघडून घ्यायचे किंवा देविगिरीच्या वेढ्यातल्याप्रमाणे, फितुरांकडून अन्नधान्याऐवजी कोठारात मिठाची पोती भरवायची अशा काही युक्त्या प्रयुक्त्या, धाडस करून किल्ला जिंकला जात असे. सगळ्या इतिहासकाळात किल्ल्यांचा वेढा हे मोठे खेळीमेळीने चालायचे प्रकरण असायचे. शिबंदीतील रसद संपायची चिन्हे दिसू लागली, की वेढ्याच्या कामाने कंटाळलेल्या शत्रूशी बोलणी सुरू व्हायची आणि किल्ल्यावरील लोकांना जिवंत जाऊ द्यावे किंवा येसूबाईप्रमाणे

शत्रूच्या स्वाधीन व्हावे अशा अटींवर किल्ला खाली करून दिला जाई. किल्ल्याच्या वेढ्याचा असा खेळ सतत चाले. रायगडाला झुल्फिकारखानाचा वेढा १० महिने पडला होता. सिद्दीच्या जंजीऱ्याला जिंकण्याकरिता खुद्द शिवाजीराजांनी तीन प्रयत्न केले. तिसऱ्या वेळचा वेढा तर किती दीर्घकाळ चालला, की त्याची मोठी विनोदी आख्यायिका सांगतात. वेढ्याच्या सुरुवातीच्या काळात मराठी लष्कराने चोखून फेकून दिलेल्या आंब्याच्या कोयी रुजून त्यांचे वृक्ष झाले, मोहोर आला, रसदार आंबे आले आणि ते आंबे चोखून खात खात मराठ्यांनी वेढा पुढे चालवला!

हजरतबाल दर्ग्याला वेढा घालून बसलेल्या लष्कराला इतर अडचणी कितीही असोत, १०-१५ वर्षांनंतर त्यांना सफरचंदाच्या पुरवठ्याची चिंता पडू नये. त्यांच्या सध्याच्या रेशनमधल्या सफरचंदाच्या बियातून उत्पन्न झालेल्या बागांची फळे तोपर्यंत त्यांना मिळू लागतीलच!

१९६७ मध्ये सुरू झालेल्या जंजिऱ्याच्या तिसऱ्या वेढ्याचे पुढे काय झाले? वेढा वर्षानुवर्षे चालला. शेवटी एका होळीच्या रात्री मराठी सैन्यात गाफीलपणा आला आहे, हे पाहून फत्तेखान सिद्दीने मराठ्यांच्या तळावर निकराचा हल्ला केला आणि दारूगोळ्याला आग लावून दिली. त्याचा स्फोट इतका गगनभेदी होता, की तो आवाज रायगडावर शिवाजी महाराजांना झोपेतही ऐकू गेला असे म्हणतात. हजारो मराठी लष्कर मेले, वेढा उठवावा लागला. सिद्दीविरुद्धच्या शिवरायांच्या तिसऱ्या मोहिमेचा असा निकाल लागला. सुवर्ण मंदिर, अयोध्या आणि त्यानंतरच्या या तिसऱ्या हजरतबाल दर्ग्यांच्या लढाईत पंतप्रधानांची झोपमोड अशीच होण्याची शक्यता कोण नाकारेल?

आता नवा गझनीचा महंमूद

तात्पर्य काय? देवळे त्यांच्या मूळच्या ऐतिहासिक कामगिरीकडे हजारो वर्षांच्या कालावधीनंतर परत आली आहेत. चोरचिलटे, दरोडेखोर, लुटारू, हल्लेखोर यांच्यापासून सुरक्षित ठेवायचे धन जडजवाहीर देवळात ठेवायचे म्हणजे देवाच्या धाकाने ते सुरक्षित राही एवढाच काय तो फरक!

देवळाच्या वेढ्याचा हा तिढा सुटायला आता नवा गझनीचा महंमूद पुन्हा अवतार घेण्याची वाट पाहावी लागणार!

(२५ नोव्हेंबर १९९३

फळबाग बोफोर्स!

फळबाग योजनेला जोजवारा वाजला, म्हणजे बोजवारा ही दगडावरची रेघ आहे हे सगळ्या जाणकारांना माहीत होते. फळबाग योजनेचे शिल्पकार मुख्यमंत्री शरद पवार यांना अनेकांनी धोक्याची सूचना दिली होती; पण तज्ज्ञांच्या सूचनांना न जुमानता, १०० कोटी रुपयांच्या वार्षिक खर्चाची योजना मुख्यमंत्र्यांनी पुढे रेटली आणि आता फळबागांचे 'बोफोर्स' समोर उभे राहिले आहे. फळबाग योजनेचे 'पानिपत' कशामुळे झाले?

शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेली रोपे निकृष्ट प्रतीची होती, ती जगलीच नाहीत त्यामुळे फळबाग योजना धोक्यात आली असा आरडाओरडा होत आहे. दरवर्षी १ लाख २० हजार हेक्टरवर फळबाग लागवड करयची धडसी योजना शासनाने आखली. शासकीय रोपवाटिकांमधून एवढी रोपे मिळणे शक्य नव्हते. खासगी परवाना असलेल्या रोपवाटिकांकडून रोपे खरेदी करूनही त्यांचा पुरेसा पुरवठा होईना, तेव्हा राज्याबाहेरूनही मोठ्या प्रमाणात रोपांची खरेदी करण्यात आली. तीन वर्षे ही खरेदी चालू होती. रोपांची खरेदी करताना जी काही किमान काळजी घ्यायला पाहिजे होती ती घेतली गेली नाही. निविदा मागवल्या गेल्या नाहीत, हितसंबंधितांकडून वाढीव दराने रोपे मागवली गेली. वरपासून खालपर्यंत भ्रष्टाचाराची रक्कम ८० कोटी रुपयांच्या घरात जाईल अशा प्रकारच्या बातम्या सगळीकडे झळकल्याने फळबाग 'बोफोर्स'चा गाजावाजा झाला.

तीन वर्षे फळबाग योजना राबवली गेली. प्रत्यक्ष हाती काय पडले? मुळात लावलेल्या रोपापैकी २०% सुद्धा रोपे जगली नाहीत. एकाच प्रकारची असतील याबद्दल शंका असून बहुतेक फळे निकृष्ट जातीची आणि वेगवेगळ्या प्रकारची असल्याने प्रक्रियेच्या कारखान्याकरिता ती सर्व निरुपयोगी ठरणार हे सांगायला कोणी अंतर्ज्ञानी आणि दूरदर्शी नको. फळबागा योजना आता निकालात निघाली

आहे. प्रश्न एवढाच उरला आहे : फळबाग योजनेच्या पानिपताची जबाबदारी कोणाची? भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची? की मुख्यमंत्र्यांची?

भ्रष्टाचारामुळे नाही!

८०% रोपे मेली याचे कारण अधिकाऱ्यांची अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचार असा कांगावा केला जात आहे. कलम खरेदीचा भरपूर तपशील पत्रकारांना सहजरीत्या मिळतो आहे. कारण महाराष्ट्र शासनच सर्वकाही वित्तंबातमी पुरवीत आहे. फळबाग योजना संपली आहे. फक्त तिच्या मृत्यूची जबाबदारी मुख्यमंत्र्यावर नाही भ्रष्ट अधिकाऱ्यावर आहे; योजना नीट राबवली गेली असती तर मुख्यमंत्र्यांचे महत्त्वाकांक्षी आणि देदीप्यमान स्वप्न साकार झाले असते अशी बतावणी करण्यासाठी शासनच आपणहून उत्साहाने कलम खरेदीतील भ्रष्टाचाराचे कारण पुढे करत आहे. भ्रष्टाचारात सापडलेले अधिकारी काही 'मेल्या आईचे दूध' प्यालेले नाहीत. थोड्याच दिवसांत तेही आपण खाल्लेल्या रकमांपैकी वरपर्यंत किती रकमा पोचवल्या याचा हिशेब सादर करतील. परस्पर चिखलफेक होईल; पण सरकारी फळबाग योजना काही पुन्हा जिवंत होण्याची शक्यता नाही.

फळबागांचा झेंडा थेम्सपार

महाराष्ट्रामध्ये फळे आणि दूध यांची शेती सर्वांत जास्त किफायतशीर होईल, त्यामुळे 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेच्या काळात नांगराखाली आणल्या गेलेल्या जमिनीपैकी बराचसा भाग पुन्हा एकदा वनशेतीखाली किंवा कुरणाखाली न्यावा लागेल. आजच्या शेतजमिनीपैकी तिसरा भाग अशातऱ्हेने झाडांच्या आणि गवतांच्या जोपासनेकरिता वापरावा लागेल, याबद्दल सर्वसाधारणपणे एकमत आहे. महाराष्ट्र शेतकरी फळबाग वाढवण्याच्या कामाला कोणी न सांगताच गेल्या दहा वर्षांपासून मोठ्या उत्साहाने, मेहनतीने आणि जाणकारीने लागले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्तबगारीची फळे डोळ्यासमोर आली आहेत. तालुक्याच्या गावी कडुनिंबाच्या एखाद्या झाडाखाली डझन दोन डझन केविलवाणी केळी आणि मरगळलेल्या बोरांचे दोनचार वाटे असले म्हणजे झाले फळांचे दुकान अशी काही वर्षांपूर्वी स्थिती होती. तेथे आता लालभडक डाळिंबे, तजेलदार सीताफळे, छोट्या सफरचंदाच्या आकाराची बोरे, संत्री, केळी यांचे हारेच्या हारे लागले आहेत. द्राक्ष शेतकऱ्यांनी तर आपला झेंडा थेम्स नदीच्या पार नेला. उत्तर प्रदेशातल्या अगदी दूरवरच्या गावातही महाराष्ट्रातील द्राक्षे गाड्यागाड्यांनी पोचत आहेत. दूध शेतकऱ्यांनी अशा दुधाच्या गंगा वाहवल्या, की सरकार आज दूध विकत घेऊ शकत नाही. ७ लाख लिटर दूध दररोज ओतून देण्याची वेळ आली आहे.

फळबागा आणि दूध या दोघांच्याही विकासाची आताशी कोठे सुरुवात आहे; पण बाजारात ग्राहक कमी पडतो आहे आणि उत्साहाने फळबागा लावलेल्या शेतकऱ्यांची केविलवाणी अवस्था आजच होऊ लागली आहे. फळे, दूध वाढवल्याखेरीज गत्यंतर नाही; पण त्यांच्या वाढीव उत्पादनास आजच गिऱ्हाईक नाही. अशा या कोंडीतून सुटका कशी व्हायची? नव्या बाजारपेठा शोधण्याच्या खटाटोपाला शेतकरी लागले होते.

सरकारला स्वस्थ बसवेना

देशभर महाराष्ट्रातील फळांचे नाव झाले. ऊस आणि साखर यांपेक्षा मराठी फळे गाजू लागली, मग पुढाऱ्यांना गप्प कसे राहवेल. या कामगिरीत आपला हात आहे असे भासवणे त्यांना आवश्यक होते. मग सरकारने काय करावे? शरद पवार यांना ते मागच्यावेळी मुख्यमंत्री होते तेव्हा मी सूचना केली होती, सरकारने काहीच करू नये. फळांना भाव मिळणार नाही अशी धोरणे आणि नियम रद्द करावे. उदाहरणार्थ, फळांच्या प्रक्रियेवरील सर्व निर्बंध काढून घ्यावे, विशेषत: फळांपासून 'वाइन' तयार करण्यावरील बंधने लगेच हटवावी. चौथ्या पाचव्या दर्जाच्या फळांचा प्रक्रियेकरिता उपयोग झाला तर फळबागा आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरतील. जगभर भारतीय वाइन्स बाजारपेठा काबीज करू शकतात हे 'शँपेन'वाल्यांनी देखील मान्य केले आहे. ही सूचना मुख्यमंत्र्यांना मान्य झाली नाही. कशी होईल? ती स्वीकारली तर साखर आणि मद्यार्क कारखाने यांच्या सगळ्याच राजकारणाला धक्का बसला असता. पुन्हा सरकारने स्वस्थ बसायचे तर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतात हा विचार हाडाचा राजकारणी मान्य कसा करेल? सरकारने (मुख्यमंत्र्यांनी) काही तरी केले असे दिसले पाहिजे. अर्थात स्वस्थ बसून शेतकऱ्यांचे कल्याण होऊ देण्यापेक्षा प्रत्यक्ष जाऊन काही करण्याची मुख्यमंत्र्यांची इच्छा होती; मग त्यात शेतकऱ्यांचे आणि देशाचे नुकसान झाले तरी बेहतर, प्रकल्प पाहिजे.

माझी सूचना अशी, की मग शासनाने फळांच्या प्रक्रियेचे काही कारखाने उभे करावेत म्हणजे फळांना भाव मिळेल. पाठोपाठ फळांचे उत्पादन वाढेल. शेतकरी अधिकाधिक फळबागा लावतील; पण हाही मुद्दा मुख्यमंत्र्यांना पटला नाही. त्यांनी प्रत्यक्ष फळबागा लावण्यात आणि जोपासण्यात हात घालण्याचे ठरवले. रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांच्या शेतावर १००% अनुदानावर फळबागा लागवडीचा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. सरकारने शेतकऱ्यांना फळबाग जोपासना कशी करावी याचे धडे शिकवण्याच्या भानगडीत पडू नये.

कोणच्या शेतावर कोणची बाग लावावी? कलमे कोठून आणावीत? याची सर्व जबाबदारी शेतकऱ्यांवर सोडावी. फक्त माल तयार झाल्यावर उकिरड्यावर फेकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणार नाही याची तेवढी काळजी घ्यावी. हा सल्ला मुख्यमंत्र्यांना पटला नाही. फळबाग विकास योजनेच्या दुंदुभी सगळीकडे निनादू लागल्या. कर्तबगार मुख्यमंत्र्यांच्या अभिनव योजनेची तोंडभरून स्तुती होऊ लागली. वाढणाऱ्या झाडांना जमीन कमी पडेल अशा चिंतेने पवारसाहेबांनी जमीनधारणा कायदा गुंडाळण्याचीही घोषणा केली. गेल्या दहा वर्षांत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी फळबागांच्या प्रगतीचे सारे श्रेय मुख्यमंत्र्यांच्या योजनेला देण्यासाठी चमच्यांत अहमहमिका लागली.

भ्रष्टाचाराविना सरकार कैचे?

सरकारी नोकरांच्या भ्रष्टाचारामुळे योजनेचा बोजवारा वाजला अशी हाकाटी करण्यात काय मतलब? सरकारी योजना म्हटली, की त्यात भ्रष्टाचार हा असणारच! उधळमाधळ असायचीच! हे सर्व लक्षात घेऊनच योजनांचा आराखडा ठरवला गेला पाहिजे. भ्रष्टाचारी यंत्रणेकडे जबाबदारी सोपवली आणि भ्रष्टाचारात ती योजना बुडून गेली, तर दोष योजकाचा आहे. ही जबाबदारी मुख्यमंत्र्यांना टाळता येणार नाही.

मुंगी व्याली, शेळी झाली

फळझाडाच्या कलमांची खरेदी बेजबाबदारपणे झाली आणि म्हणून मोठ्या प्रमाणात झाडे मेली हा कांगावाही खोटा आहे. फळबाग योजनेमध्ये ९०% झाडे जगतील असे गृहीत धरण्यात आले होते. माझ्या अध्यक्षतेखालील स्थायी कृषी सल्लागार समितीने पुणे येथे एक विशेष बैठक घेऊन ४ मार्च १९९१ ला महाराष्ट्र शासनाच्या फळबाग तज्ज्ञांशी चर्चा केली होती. ९०% झाडे जगण्याच्या अंदाजाबद्दल मी शंका व्यक्त केली; पण सर्व अधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले, "९०% झाडे जगण्यात काही अडचण दिसत नाही." डॉ. देसले हे मोठे जुनेजाणते फलोद्यान तज्ज्ञ तिथे हजर होते. त्यांनी मात्र मोठ्या धाडसाने साक्ष दिली. खरे सांगणे माझे कर्तव्य आहे, महाराष्ट्रात फळबागांत रोपे जगण्याचे प्रमाण ४०% वर कधीच नव्हते. ४०% पेक्षा जास्त असण्याची शक्यता नजीकच्या भविष्यकाळात नाही. निव्वळ सरकारी रोपवाटिकातील कलमेच उपयोगात आणली गेली, तर जगणाऱ्या कलमांचे प्रमाण याहीपेक्षा कमी असते. खासगी परवानाप्राप्त रोपवाटिकांचा रोपे जगण्याचा अनुभव तुलनेने जास्त चांगला आहे; पण कोणत्याही परिस्थितीत ९०% रोपे जगण्याची अपेक्षा बिलकूल अशास्त्रीय होती, तिला

आधार काही नाही. फक्त कागदोपत्री फळबाग योजना निरोगी दिसावी याकरिता केलेला हा आकडेवारीचा खेळ होता.

सारे कागदी खेळ

फळबाग योजनेचे अर्थशास्त्र या विषयावर फलटणचे श्री. निमकर यांच्याशी मी चर्चा केलेली आहे. त्यांच्या चर्चेतून जे निघाले ते थोडक्यात असे; ९०% कलमे जगतील असा हिशेब धरूनसुद्धा, फळांच्या पहिल्या हंगामापर्यंत होणारा भांडवली खर्च आणि त्यानंतरचा चालू खर्च भरून येण्याची काहीही शक्यता कागदावर उमटेना. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेवरून व्याजाचा दर ६%, अगदी ३% इतका कमी धरूनसुद्धा फळबाग योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही हे स्पष्ट होत होते आणि तरीही मुख्यमंत्र्यांनीही हा प्रश्न प्रतिष्ठेचा करून फळबाग योजना पुढे रेटली.

या भूकंपाचे पाप?

महत्त्वाची तीन वर्षे गेली. या तीन वर्षांत फळबाग वाढीसाठी कितीतरी चांगली कामे करता आली असती. तीन वर्षांत झाला फक्त भ्रष्टाचार. लक्षावधी शेतकरी फळबाग योजनेच्या बोजवाऱ्यामुळे संकटात सापडणार आहेत. त्यांची जमीन अडकून राहिली, कलमे न जगल्यामुळे त्यांच्यामागे सरकारी वसुलीचा तगादा लागेल. फळबाग योजनेचा बोजवारा आणि फळबागेतील 'बोफोर्स' हा सर्व महाराष्ट्राला बसलेला भूकंपाचा आणखी एक धक्का आहे आणि त्याची थोडीशीही जबाबदारी भूमातेकडे किंवा परमेश्वराकडे ढकलता येणार नाही. योजनेचे डिंडिम वाजवून स्वत:कडे खोटे श्रेय ओढून घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे हे वैयक्तिक पाप आहे, त्याचा त्यांनी झाडा दिला पाहिजे.

(०९ डिसेंबर १९९३)

हिरव्याची हकालपट्टी

मुंबईतील उपनगरी गाड्यांची स्थानके शोभिवंत करण्याचा कार्यक्रम धडाक्याने चालू आहे. अगदी पहिल्यांदा वांद्रा स्टेशन सुशोभित करण्यात आले. हिंदुस्थानातील रेल्वे स्टेशन म्हणजे घाणीचे आगर. स्टेशनच्या परिसरात गेले, की शौच, मूत्र आणि सडलेले अन्न यांच्या वासाचा भपकारा येतो. स्टेशनावरील स्वच्छतागृहांचा वापर फक्त ज्ञानेंद्रियावर संपूर्ण ताबा मिळवलेल्या योग्यांनाच जमणारी साधना आहे. टपाल कचेऱ्या, पोलिस ठाणी जशी गबाळीच असायची तशी रेल्वे स्टेशने घाणेरडी असायचीच ही भारताची 'प्राचीन' परंपरा आहे. पश्चिम रेल्वेतील कोण्या तल्लख बुद्धिमंत अधिकाऱ्याने ही परिस्थिती बदलवायचे ठरवले; पण त्याकरिता लागणारा पैसा आणायचा कोठून? रेल्वे खाते स्वच्छतेसाठी पैसा खर्च करायला तयार होईल हे शक्यच नाही.

आजकाल खासगीकरणाचा मोठा जोर आहे. स्टेशन सुधारून ते साफ ठेवण्याचे काम खासगी कंत्राटदारांना द्यायचे आणि त्याबदली त्यांनी स्टेशनात उपलब्ध असलेल्या जाहिरातीच्या सर्व जागा वापरायच्या अशी योजना ठरली. वांद्रे स्टेशन सुधारले म्हणे! अशी सुधारणा माझ्यातरी नजरेत भरली नाही. एखाद्या म्हातारीने साजशृंगार करण्यासाठी सिगारेटच्या पाकिटातील चांदी गोळा करून तिचे नक्षीकाम प्रसाधन म्हणून अंगावर चिकटून घ्यावे असे काहीसे विचित्र स्वरूप स्टेशनच्या जुन्या इमारतीचे दिसले; पण कसे का होईना, पहिल्यापेक्षा स्टेशनाचे रुपडे बरे दिसत होते हे खरे!

नव्याचे नऊ

वर्तमानपत्रांनी नव्या उपक्रमाचे कौतुक केले. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनीही या स्टेशनच्या नव्या रूपाचा कौतुकपर उल्लेख केला. रेल्वे खात्याचा हर भरून आला, उत्साहे वाढला आणि असाच कार्यक्रम इतर स्टेशनांवर

राबवायला सुरुवात झाली. आणखी दोनचार स्टेशने सुधारली; पण त्याकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही.

चंद्रावर पहिल्या उतरणाऱ्या अवकाशयानाचे आणि अवकाशवीरांचे कौतुक झाले. चंद्रावर आर्मस्ट्रॉंग पहिले पाऊल टाकत असता, ज्यांना ज्यांना शक्य आहे ती यच्चयावत माणसे डोळ्यात प्राण आणून टेलिव्हिजनच्या संचासमोर चिकटून बसली होती. नंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या वेळी लोकांचा उत्साह पार संपून गेला आणि त्या कार्यक्रमाकडे कोणी बघेना. स्टेशन सुधारणा ही हिंदुस्थानच्या हिशेबी चंद्रावर उतरण्यासारखीच नवलाईची गोष्ट! पहिल्या कार्यक्रमाच्या वेळी कौतुक झाले. दुसरे-तिसरे स्टेशन सुशोभित झाले त्याकडे कोणाचे लक्षही गेले नाही.

खांबाचा 'हिरवेपणा'

आणि मग एकदम चमत्कार झाला, अंधेरी स्टेशन सुधारले. प्रत्येक फलाटावरील खांब रंगवण्यात आले आणि इथेच कल्लोळ माजला.

निर्णय कुणाचा होता कुणास ठाऊक? रेल्वे हे खाते केंद्र शासनाच्या अधिकारातील आहे. तेव्हा निर्णय कदाचित केंद्र शासनाचा असेल, पश्चिम रेल्वेच्या मुख्य अधिकाऱ्यांचा असेल, स्टेशनमास्तरांचा असेल किंवा ज्या खासगी कंपनीकडे शोभनाचे काम देण्यात आले, तिचा असेल. तेव्हा रेल्वेचे मंत्री जाफर शरीफ होते. बाकीची माणसे कोणच्या धर्माची आहेत हे ठाऊक नाही. निर्णय का, कसा? घेण्यात आला ते माहीत नाही; पण निर्णय घेतला गेला हे खरे!

अंधेरी स्टेशनच्या नव्या खांबांना हिरवा रंग दिला गेला आणि इथेच सगळे बिघडले. हिरवा रंग म्हणजे मुसलमानांचा अशी समजूत असलेली शिवसेनेची काही टाळकी एकत्र आली, त्यांनी या रंगकामाला विरोध केला. रंगकाम नवीन असेल तरी ते बदलून दुसरा रंग वापरला गेला पाहिजे असा आग्रह धरला. सध्या मुंबईत पोलिसांपेक्षा शिवसेनेचेच राज्य चालू आहे. त्यामुळे रेल्वे अधिकाऱ्यांना काही पर्याय उरला नाही. निम्म्याअधिक खांबांचे रंग बदलण्यात आले, प्रत्येक खांबाचा निम्मा भाग वेगळ्या रंगाने रंगवण्यात आला आणि वाद मिटला.

म्हणजे, अंधेरी स्टेशनापुरता मिटला. ही कदाचित देशभर पसरायच्या एका नव्या आंदोलनाची सुरुवात असू शकेल!

आता 'हिरवा' बाद

पॅरिसमध्ये फॅशनचे मोठे कौतुक असते. दरवर्षी हंगामात कपड्यांचे आकार, घाटणी, रंग बदलत राहतात. स्त्रियांचे कपडे कधी पायघोळ होऊन रस्ते झाडू

लागतात, तर कधी डोळे मिटण्याची किंवा बुबुळे बाहेर पडण्याची वेळ येईपर्यंत आखूड होतात. नव्या फॅशनच्या घोषणा झाल्या, की तर्वमानपत्रात मथळे झळकतात, 'यंदाचा रंग पिवळा!' किंवा 'यंदा राज्य सुती कापडाचे', 'नायलॉनची सद्दी संपली' इ. इ.

हिंदुस्थानातही आता द्वाही फिरली, 'हिरवा रंग चलेजाव.' जेथे जेथे म्हणून हिरवा रंग दिसेल तेथे तो रंग बदलून, नवा रंग शक्यतो भगवा – देण्याकरिता शिवसैनिक आणि इतर हिंदुधर्माभिमानी आणि हिंदुत्वनिष्ठ दंगली करू लागतील; पण या हिरवे हटाव कार्यक्रमामुळे मोठी गडबड होणार आहे.

हिरवा सिग्नल थांबा!

रेल्वे स्टेशनच्या खांबाला हिरवा रंग चालणार नाही म्हटले तर चालून जाईल. किंबहूना स्टेशनच्या खांबाला रंग नसण्याचीच सवय आहे; पण रेल्वेच्या सिग्नलमध्ये हिरवा रंग चालणार नाही असे हिंदुत्वनिष्ठांनी ठरवले तर कसे करायचे? मुसलमानांचा हिरवा रंग दिसल्यावर पुढे जायचे आणि आमचा लाल रंग दिसला, की थांबायचे हे रेल्वेचे धोरण मुळातच मुस्लिमधार्जिणे आहे. हिंदू आईबापांच्या पोटी जन्माला आलेला कोणीही गाडीचालक हिरव्या रंगाचा आदेश मानणार नाही, असे ठरवले तर? २८ नोव्हेंबर रोजी दिवा स्टेशनजवळ लांब पल्ल्याच्या गाडीच्या चालकाने हिरवा कंदील मिळाला तरी गाडी उभीच ठेवली, त्यामुळे अनेक स्थानिक गाड्यांचा खोळंबा झाला, लोकांना पायी परतावे लागले. गाडीच्या ब्रेकमध्ये नादुरुस्ती असल्यामुळे आपण गाडी चालवण्याचा धोका घेतला नाही अशी त्या चालकाने बतावणी केली; पण गाडीत काहीच दोष नव्हता असे रेल्वे अधिकाऱ्यांना आढळून आले. हिरव्या रंगाला मान न देणारा हा चालक कुणी हिंदुत्वगर्वी असला पाहिजे. हिरव्या सिग्नलला न जुमानण्याच्या या जाज्वल्य उदाहरणाने अनेक हिंदुत्वनिष्ठांचे रक्त सळसळेल. हिरवे सिग्नलही दुर्लक्षून मुसलमानांनी इतिहासकाली केलेल्या अत्याचारांचा प्रतिशोध घेण्यासाठी ते बद्धपरिकर होतील. मग भले प्राणांची आहुती द्यावी लागली तरी बेहतर!

देवांना हिरवी पत्री, दुर्वा, बेल, बंद. हिरवा चुडा चालणार नाही. हिंदू गर्भारशी महिला डोहाळेजेवणाच्या वेळी माहेरी जाताना, सासरहून परत येताना हिरवी साडी शुभकुनाची म्हणून हौसेने नेसतात, हातात हिरवे चुडे भरतात. शिवसेनेच्या आदेशानंतर या सगळ्या स्त्रियांनी काय करावे? आणि बाळंतपणासाठी जातानाच भगवी वस्त्रे परिधान करून संन्याशिनीसारखे त्यांना रूप घ्यावे लागेल. अंगावर गोंदवून घेऊन हिरवे तिलक लावून घेतलेल्या सगळ्या स्त्रिया म्हणजे

बाटलेल्याच मानल्या पाहिजेत. नाहीतर शिवसैनिकांशी गाठ आहे.

सगळी मैदाने लाल

हिरव्या खेळपट्ट्या उद्ध्वस्त करणे हा तर हिंदुत्वनिष्ठांचा आवडता छंद. खेळाची सगळी मेदाने हिरवी करणे हादेखील भारत सरकारच्या मुस्लिम अनुनयाच्या धोरणाचाच सज्जड पुरावा आहे. परंपरागत भारतीय धाटणीच्या आखाड्यात मल्लांच्या कुस्तीसाठी लालमातीच ठेवलेली असे. हुतूतू, खो खो, आट्यापाट्या, असल्या खेळांची मैदाने आखाड्यातील मातीप्रमाणे मुद्दाम लाल केलेली नसली तरी जेथल्या तेथल्या धरणीच्या रंगाची असायची. हिरवी कधी नाही. हिरवी मैदाने भारतीय परंपरेत बसतच नाहीत. खेळांची मैदाने हिरवी करण्याचे हे फॅड अलीकडचे. परदेशांत क्रिकेट, फुटबॉल यांची विस्तीर्ण मैदाने कुठे पिवळी, कुठे काळी अशीच ठेवली जात. यातून मुसलमानी हिरव्याचे प्रभुत्व न जुमानण्याचा शूर हिंदू वीरांचा निर्धार दिसून यायचा; पण आता मैदानावर कृत्रिम हिरवळी पसरण्याची टूम निघाली. हाडाचा सच्चा हिंदुत्वनिष्ठ, इस्लामी हिरव्याच्या या नव्या आक्रमणाला सडेतोड उत्तर दिल्याखेरीज राहणार नाही. ज्या शूर वीरांनी गरवारे स्टेडियमचे हारळी मैदान जाळले त्यांना कापडी मैदान उद्ध्वस्त करण्यात अडचण ती काय येणार?

सगळ्या जगभर पर्यावरणवादी निसर्गाचे प्रतीक म्हणून हिरव्या रंगाचा पुरस्कार करीत आहेत. हिरवे झेंडे चळवळीचे नाव बदलून टाकले पाहिजे, नाहीतर गाठ हिंदुत्ववाद्यांशी आहे हे त्यांनी विसरू नये!

बालकवी ठोंबऱ्यांची सगळी पुस्तके जाळून टाकली जातील. 'हिरवे हिरवे गार गालिचे' कसे खुशाल मुसलमानांच्या रंगाचे कौतुक करता? असला हिरवटपणा चालणार नाही. 'सृष्टीमातेने जणू हिरवा शालूच परिधान केला होता' असे लिहिणे हिंदू सृष्टीमातेवर टाकलेला मुसलमानी हात आहे. असे हात कलम केले जातील. 'अफाटची हिरवट वन भोवती' लिहिणारे 'बी' कवी बाद. 'तिलक गोजिरे गोंदवणांचे हिरव्या रंगाचे' असे खरडणारे गोविंदाग्रज! गो! गो! तांब्यांनी हिरव्या रंगाचे कौतुक काही थोडे केलेले नाही; पण त्यांना सर्व गुन्हे माफ; कारण त्यांच्या म्हाताऱ्या नवरदेवाच्या तक्रारीत ते म्हणतात, "उपवर मुलींनो कित्ता गिरवा! त्यजूनी फाकडा धटिंग हिरवा फटिंग जोगी पिकला भगवा! वरा..."

हिरवी शेती नको

शेतकऱ्यांनीही आता हिरव्या रंगाची पिके घेण्याचे सोडून दिले पाहिजे.

हिंदुत्वनिष्ठ शेतकरी सेना भगव्या रंगाचे डबे घेऊन देशभरच्या शेतातील उभ्या पिकांना आणि झाडांना रंगाचे नवे हात देण्याचे अभियान चालू करतील आणि सूर्यानेसुद्धा याद राखून ठेवावी. ढगांनाही सक्त ताकीद आहे. इंद्रधनुष्यातला हिरवा रंग यापुढे खपवून घेतला जाणार नाही!

हे असे हिरव्या रंगाचे उच्चाटन सुरू झाले, की दुसरा कोणी शहाणा उठून त्याला न आवडणाऱ्या आणखी कोणा रंगाचे उच्चाटन करण्याचा कार्यक्रम आखेल आणि पृथ्वीची स्थिती दोन बायकांच्या दादल्यासारखी होईल. तरण्या बायकोने पांढरे केस उपटून काढावे आणि पहिलीने काळे. हिरव्या रंगाच्या उच्चाटनाचा हा कार्यक्रम पुढे काय काय रंग आणणार आहे आणि ठेवणार आहे ते आपण शांत बसून पाहावे, यापलीकडे आपल्या हाती तरी काय आहे?

(१६ डिसेंबर १९९३)

आधुनिक तंत्रज्ञान नाकारून कुणाचे भले होणार?

"गावातली लक्ष्मी शहरात जात आहे, गावातले उद्योगधंदे बंद पडत आहेत. गावे ओस पडत आहेत." ही आणि असली वाक्ये ग्रामीण समस्येविषयी बोलताना हरहमेश वापरली जातात. गावातील हुन्नरीची लूट म्हणजे गावची लूट, गावची लूट म्हणजे देशाची लूट; विलायती माल देशात आला, विलायती तोंडवळ्याचे कारखाने देशात उभे राहिले, त्यामुळे गावातील उद्योगधंदे मोडकळीस आले, बलुतेदार निर्वासित झाले, देश बुडाला इ. इ. शब्दांचे महापूर वाहिले आहेत.

आधुनिक कारखानदारीसमोर ग्रामोद्योग हटले. त्यामुळे ग्रामोद्योगांचे, बलुतेदारांचे नुकसान झाले हे खरे; पण त्यामुळे देशाचे नुकसान झाले असे म्हणणे कठीण आहे. जो उद्योगधंदा अधिक कार्यक्षमतेने चालतो तोच शेवटी समाजाच्या हिताचा असतो.

१९८४ मध्ये मी आणि माझ्या काही सहकाऱ्यांनी सर्व सेवा संघाच्या सहकार्याने एक अभ्यास केला. गावकरी मंडळींनी शहरातला माल म्हणून घ्यायचा नाही, गांधीजींच्या आदर्शाप्रमाणे स्वयंभू, स्वयंपूर्ण गाव तयार करायचं असा निश्चय केला तर गाव पुन्हा संपन्न होईल काय? शहराविरुद्ध आर्थिक बहिष्काराचा कार्यक्रम चालवणे कितपत शक्य आहे? तो यशस्वी होईल काय? हे सारे तपासून पाहणे हा प्रयोगाचा हेतू होता.

सुरुवात साबणाने

सर्वसेवा संघ आणि ग्रामोद्योगाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था स्नानाचा साबण गावात तयार करून कित्येक वर्षे बाजारात ठेवत आहेत; पण बाजारात त्याला गिऱ्हाईक नाही. काही तत्त्वनिष्ठ मंडळी निष्ठा म्हणून कुटीराद्योगांच्या साबणाच्या वड्या विकत घेतात आणि वापरतात. या साबणाच्या वड्यांची

किंमतही कारखानदारी साबणाच्या वडीच्या तुलनेने काही फारशी कमी नसते. वडिलांच्या निष्ठेपोटी कुटीरोद्योगाचा साबण वापरावा लागतो. यामुळे घरातली माणसे, विशेषत: तरुण मंडळी मोठी नाराज असतात. या साबणाने अंग स्वच्छ व्हायच्याऐवजी अंगावर किटण चढल्यासारखे वाटते अशी त्यांची तक्रार.

जनआंदोलन म्हणून कारखानदारी साबणावर बहिष्कार घातला आणि गावात तयार होणाऱ्या साबणाला प्रोत्साहन दिले, तर या एका मोठ्या ग्रामोद्योगाला दिवस बरे येतील, त्याची भरभराट होईल. तेव्हा शहरी मालावर बहिष्कार टाकण्याचा कार्यक्रम साबणापासूनच सुरू करावा, असा सर्वच मंडळींचा आग्रह पडला.

तोट्याचा धंदा

शहरातला साबण म्हणून घ्यायचा नाही असे ठरले तरे गावातील स्नानाच्या आणि कपडे धुण्याच्या साबणाच्या सर्व गरजा ग्रामोद्योग पुरवू शकेल काय? हा पुढचा प्रश्न. त्या क्षेत्रातील अनुभवी मंडळी म्हणाली, की सध्याचे उत्पादन पुरे पडणार नाही; पण अजून पुष्कळ गावी हा साबणाच्या उत्पादनाचा धंदा चालू करता येईल; पण त्यासाठी भांडवल लागेल. हे भांडवल बँकांकडून मिळणे कठीण आहे. कारण साबणाला मिळणाऱ्या किमतीत उत्पादनाचा खर्च काही भरून येत नाही. त्यामुळे सध्यादेखील सरकारी अनुदानाने आणि मदतीनेच हा धंदा चालला आहे. धंद्यात फायदा नाही म्हटल्यावर बँकेकडून कर्ज मिळणार नाही आणि सध्याची उत्पादनक्षमता अगदी १० पटींनी वाढवायची म्हटली तर एवढी सरकारी मदत मिळायची काही शक्यता नाही.

शहरी साबणावर बहिष्कार घालण्याच्या कार्यक्रमात पहिली अडचण, गावाला लागणाऱ्या साबणाची गरज कुटीरोद्योग पुरवू शकणार नाहीत. उत्पादनात तातडीने वाढ करणे शक्य नाही. कारण त्यासाठी लागणारे भांडवल मिळणार नाही. भांडवल मिळणार नाही, कारण धंदा तोट्यात आहे. आता या दुष्टचक्रातून सुटायचे कसे?

कारखानदारी उधळपट्टी

मग आणखी एक नवा प्रश्न निघाला. परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आणि देशी कारखानदार लक्स, हमामसारखे साबण तयार करतात. त्यांचा माल वेष्टनापासून रंगापर्यंत आणि सुगंधापासून फेसापर्यंत लोकांना जास्त आवडणारा, भावणारा असतो. गावागावातल्या छोट्या दुकानांतही त्यांच्या साबणाचा पुरवठा होत राहील अशी व्यापारी व्यवस्था बिनबोभाट, अव्याहतपणे चालू आहे. वर्तमानपत्रांत

त्यांच्या मालाच्या प्रचंड आकाराच्या आकर्षक जाहिराती सारख्या झळकत असतात. चित्रपटातील अत्यंत लोकप्रिय "चित्रातारकांच्या सौंदर्याचा साबण, त्यांच्या मृदू मुलायम त्वचेचे रहस्य....साबण" अशा जाहिराती वर्तमानपत्रांत गुळगुळीत कागदांच्या मासिकात, रेडिओवर, दूरदर्शनवर पाहाल तिकडे सतत झळकत असतात. एवढा खर्च करून हे कारखानदार वर भरमसाट फायदाही मिळवत असतात. हे काय गौडबंगाल आहे? कुटीरोद्योगांना त्यांच्या गचाळ साबणाचा धंदा सगळी सरकारी मदत घेऊनही फायद्याने करता येत नाही आणि सगळी वारेमाप उधळपट्टी करणारे कारखानदार फॅन्सी माल देतात आणि वर फायदाही कमवून जातात, हे त्यांना कसे काय जमते?

चित्रतारकांच्या जाहिरातीचे रहस्य

या रहस्यांचे उत्तर तंत्रज्ञानात आहे अशी माहिती एका तज्ञाने पुरवली. सोडा आणि तेल यांच्या मिश्रणाने साबण बनतो. कच्चा मालाच्या गुणवत्तेवर साबणाची गुणवत्ता अवलंबून असते; पण कारखानदारी प्रक्रियेत साबणाला रंग, सुगंध, आकार आणि गुळगुळीत कोरडेपणा देता येतो, त्यामुळे माल आकर्षक बनतो. एवढेच नव्हे तर तेल आणि सोडा यांच्या रासायनिक प्रक्रियेतून साबणाखेरीज जोड-उत्पादन म्हणून ग्लिसरिन काढता येते. कारखानदारांच्या साबणाची खर्चीक जाहिरात आणि त्यांचा फायदा याचे रहस्य ग्लिसरिनच्या जोड उत्पादनात आहे.

वाळूचे तेल वर वाळूही

साबणाचे आधुनिक कारखानदार तेलाच्या उत्पादनातही भाग घेतात. शेंगदाण्यातील बरेच तेल गावच्या तेलघाणीत फुकट जाते. तेलाच्या गिरणीतही बराच स्निग्धांश ढेपेत निघून जातो. आधुनिक तंत्रज्ञानात नायट्रोजन शेंगदाण्यात पुन्हा भरून बिनतेलाचा शेंगदाणा जसाच्या तसा पहिल्यासारखाच दिसणारा खारवण्यासाठी किंवा इतर चटपटीत पदार्थ तयार करण्यासाठी हाती येतो. हे तंत्रज्ञान वापरले नाही तर त्यात फायदा कुणाचा नाही? तेलघाणीवाल्यांचा नाही, गिरणीवाल्यांचा नाही आणि देशाचाही नाही.

राष्ट्रीय नुकसान

कारखान्यात ग्लिसरिन काढून घेतात, मग ग्रामोद्योगाच्या साबणाची जाहिरात 'ग्लिसरिनयुक्त साबण' म्हणून केली तर? ग्रामोद्योगाच्या साबणातील ग्लिसरिनमुळे त्वचा अधिक चांगली राहते. आरोग्य चांगले राहते, असे सागता आले तर? मालाची विक्री चांगली होईल. कारखानदारी साबणातून ग्लिसरिन काढून घेतलेले

असते. आमच्या साबणात आम्ही ग्लिसरिन ठेवलेले आहे अशी जाहिरात करता येईल; पण येथेही अडचण आली!

ग्रामोद्योग साबणात ग्लिसरिन राहतच नाही. ते वाहून जाते, गटारात जाते. कारखानदार ग्लिसरिन गटारात जाऊ देत नाहीत, ते वाचवतात, गोळा करतात आणि फायदाही कमावतात. एवढेच नव्हे तर गटारात वाहून गेले असते ते ग्लिसरिन वाचवून राष्ट्रीय अपव्यय थांबवतात. राष्ट्रीय साधनसंपत्तीत भर घालतात.

अकार्यक्षम ते राष्ट्रहिताचे कसे?

म्हणजे मोठेच त्रांगडे झाले! गावचा साबण दिसायला अमंगळ, स्वच्छता नावाचीच, रंग फार आल्हाददायक नाही आणि जरा भिजला, की चिखलासारखा मेंदा होणारा. शहरी कारखानदारी साबण गुणांनी चांगला आणि वर राष्ट्रीय संपत्तीही वाचवणारा. मग देशाच्या भल्याकरिता कुटीरोद्योगाचा साबण वापरा असे म्हणायचे कोणत्या आधाराने? गावच्या साबणाला संरक्षण दिले किंवा आंदोलन म्हणून शहरी साबणावर बहिष्कार घातला तर त्यामुळे सगळ्या राष्ट्राचे नुकसान आहे, हे नक्की. ग्लिसरिनच्या रूपाने इतकी संपत्ती गटारात वाहून जाणार!

साबणाचा ग्रामोद्योग बुडाला तर त्यामुळे गावच्या उद्योजकांचे नुकसान होईल हे खरे; पण त्यामुळे देशाचा तोटा न होता फायदाच होणार आहे. अशा परिस्थितीत ग्रामोद्यागाचे हित वेगळे आणि राष्ट्राचे हित वेगळे असे कबूल करावे लागेल. कारखानदारी साबणामुळे गावची लक्ष्मी शहरात गेली असे म्हणणे चुकीचे. कारखान्याने नवी लक्ष्मी तयार केली. त्या लक्ष्मीचा वाटा गावकऱ्यांना मिळाला नाही, ही गोष्ट वेगळी.

जे कार्यक्षम नाही ते कृत्रिमरीत्या टिकवले, वाढवले तर त्यात फायदा कोणाचाच नाही. संरक्षण देऊन ग्रामोद्योग टिकवले तर त्यात गावाचाही फायदा नाही, देशाचाही नाही. परदेशांतील आधुनिक तंत्रज्ञान नाकारून शहरातील जुन्या कारखानदारीला संरक्षण देणे यातही कोणाचाच फायदा नाही, हे ओघाने आलेच.

(२३ डिसेंबर १९९३)

खुलेपणाच्या विरोधात 'बॉम्बे क्लब'ची क्लृप्ती

देशातील कारखानदारीने आपला एक नवा मंच तयार केला आहे. कारखानदारीचा सगळ्यांत मोठा गड्डा मुंबईत असल्यामुळे या मंचाचे 'बॉम्बे क्लब' असे नामाभिधान करण्यात आले आहे.

कारखानदारांच्या अधिकृत संस्था, संघ, चेंबर्स आणि त्यांचे महासंघ यांनी आजपर्यंत आर्थिक सुधारणांच्या दिशेने शासनाने एक एक पाऊल टाकले म्हणून मुंबईपासून कोलकत्त्यापर्यंत सगळे कारखानदार 'वाहवा, वाहवा' म्हणत होते. "सरकारी बंधने संपली, आता बघाच आम्ही काय चमत्कार करून दाखवतो!" अशा थाटात ते गर्जना करीत होते; पण ही सगळी फुशारकी मोरोपंतांच्या शब्दांत...

'स्वपर बळाबळ नेणून
बालिश बहु बायकांत बडबडला!'

अशी आहे.

परदेशी भांडवल प्रत्यक्ष हिंदुस्थानात प्रवेश करण्याआधीच मोठी कारखानदार मंडळी शरणागतीचे पांढरे झेंडे फडकावू लागली आहे. पहिली शरणागती भारतीय बहुराष्ट्रीय थंड शीतपेयांची कंपनी 'पार्ले' हिने दिली. लागोपाठ 'गोदरेज' कंपनीच्या साबण विभागानेही शरणागतीचा झेंडा फडकावला. परदेशी स्पर्धेशी टक्कर घेण्यापेक्षा त्यांच्याशी हातमिळवणी करण्यात शहाणपणा आहे असे खासगीत बहुसंख्य कारखानदार कबूलही करतात.

सोयीपुरते स्वातंत्र्य

भारतीय कारखानदार आपण मोठे उद्योजक असल्याचा आव आणत असले तरी प्रत्यक्षात 'नेहरू व्यवस्थे'तील कारखान्यांचे ते केवळ व्यवस्थापक आहेत. स्वतंत्र उद्योजक नाहीत, हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. कारखानदारांना

स्वातंत्र्य पाहिजे; पण संपूर्ण खुले धोरण नको आहे. स्वातंत्र्य निविष्टांचे पाहिजे, बाजारपेठेचे नको. परदेशातील यंत्रसामग्री तंत्रज्ञान घेण्याचे आणि शक्य असल्यास चोरण्याचे स्वातंत्र्य त्यांना हवे आहे; पण त्यांच्या मालाच्या देशी बाजारपेठेत खुलेपणा त्यांना सोसणारा नाही. हिंदुस्थान देशातील भलीमोठी बाजारपेठ हातपाय बांधून, मुसक्या घालून त्यांच्या ताब्यात असली पाहिजे, तेथे दुसरा कोणी स्पर्धक नको, अशी त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. थोडक्यात, परदेशी तंत्रज्ञानाचे देशी अडते बंदिस्त बाजारपेठेतल्या ग्राहकांना मन:पूत लुटण्याचे सर्वाधिकार असल्याखेरीज ते जगूच शकत नाहीत. त्यांनी खुल्या बाजारपेठेची मागणी दिमाखात केली. अशा कल्पनेने, की परदेशांतील तंत्रज्ञान आणि सामग्रीची मदत, उधारी, खरेदी, कोणत्याही पद्धतीने का होईना उपलब्ध झाली पाहिजे, निदान त्यावर खुलेआम डल्ला मारायचा अधिकार असावा; पण खुलेपणामुळे बाहेरचे स्पर्धक देशी बाजारपेठेत उतरू शकतील याचे त्यांना भान नव्हते. कदाचित, शासनावरील आपले वजन वापरून, स्वातंत्र्य एकतर्फी राहील, दुतर्फी होणार नाही, अशी अवस्था आपण करू शकू, असा त्यांना पूर्वानुभवामुळे फाजील विश्वास वाटला असावा.

पण खुलीकरण कसे असावे? एकतर्फी? दुतर्फी? की सर्वदूर? खुलीकरणाची गती काय असावी? याचा निर्णय फारसा काही दिल्लीच्या हाती राहिलेला नाही. सारे जग खुलीकरणाकंडे पावले टाकत चालले आहे. दिल्लीचे सरकार 'अगं अगं म्हशी' म्हणत फरपटत चालले आहे आणि 'जोवरी न देखीले पंचानना' आपल्या कर्तबगारीच्या वल्गना करणाऱ्या कारखानदारांचा जीव कासावीस होत आहे.

पण बोलावे कोणत्या तोंडाने? बोलवत नाही आणि सोसवत नाही! अशी त्यांची अवघड स्थिती झाली नाही.

खुलेपण; पण बेताने

अमेरिकेतील एक हिप्पी तरुणी आपल्या बापाला सांगते, "आमची नवी पिढी स्वातंत्र्याच्या शोधात आहे, आम्हाला आईबापांच्या गुलमागिरीत राहायचे नाही, आईवडिलांच्या वर्चस्वामुळे माझा जीव घुसमटून चालला आहे, मला स्वतंत्रपणे राहायचे आहे म्हणून मी उद्यापासून वेगळी जागा घेऊन एकटी स्वतंत्रपणे राहणार आहे." बाप म्हणतो, "वा, मोठी नामी कल्पना आहे. अभिमानाने स्वतंत्रपणे जगायचे म्हणजे अर्थातच तू माझ्याकडून अगदी पैसुद्धा घेणार नाहीस हे उघड आहे!" यावर त्याची तरुण मुलगी म्हणते, "नाही बाबा; तसे नाही. मला स्वातंत्र्य हवे आहे; पण इतके नको."

या अमेरिकन हिप्पी मुलीसारखीच भारतीय कारखानदारांची अवस्था. घरातल्या घरात बापासमोर 'इतके स्वातंत्र्य नको' म्हणण्यात फारसे शरमण्याची गरज नाही; पण साऱ्या जगापुढे उघड उघड कारखानदारांनी आपली अडचण मांडावी कशी? त्यांच्या सर्व प्रवक्त्या संघांनी, महासंघांनी खुलेपणाचे जाहीर स्वागत केले आहे. त्यांनी आपले शब्द गिळावे कसे? कोणत्या तोंडाने सांगावे, की "आपण खुल्या व्यवस्थेत टिकून राहण्याच्या पात्रतेचे कारखानदार नाही! नेहरू धाटणीच्या लायसेंस परमीट राज्यात, सरकारी मायेच्या उबेत खेळणारी आम्ही मांजरीची प्रत्यक्षात वाघाच्या सामोरी जाण्याचे आमचे सामर्थ्य नाही," असे शब्द तोंडातून फुटावे कसे? हे कबूल करावे कसे? आणि कोणत्या तोंडाने?

बॉम्बे क्लब आणि प्लॅन

यासाठी 'बॉम्बे क्लब'ची स्थापना झाली. नामाभिधानाची निवड मोठी हुशारीची आहे. 'बॉम्बे क्लब' म्हटले, की साहजिकच आठवण होते ती 'बॉम्बे प्लॅन'ची. १९४४ सालच्या जानेवारी महिन्यात, स्वातंत्र्य मिळवण्याआधी ४४ महिने, मुंबईतील आठ मोठ्या कारखानदारांनी एकत्र येऊन भारताच्या आर्थिक विकासाची योजना सादर केली होती. १५ वर्षांत केवळ १०,००० कोटी रुपये खर्चून दरडोई राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्याची, शेतीचे उत्पन्न १३० टक्क्यांनी वाढवण्याची, कारखानदारी उत्पादन ५ पट करण्याची, ही मोठी महत्त्वाकांक्षी योजना होती. त्यानंतर 'बॉम्बे प्लॅन'मध्ये गृहीत धरलेल्या एकूण खर्चाच्या शेकडो पट खर्च झाला तरी योजनेत ठरवलेली उद्दिष्टे अजून पुरी साध्य झालेली नाहीत. नियोजन कालखंड सुरू होण्याआधी कारखानदारांची भूमिका मांडण्याचे काम 'बॉम्बे क्लब' करणार आहे.

'बॉम्बे क्लब' की 'राय क्लब'

'बॉम्बे क्लब'ची मांडणी मोठी धूर्तपणाची आहे. त्या मांडणीवरून आठवण होते, ती 'बॉम्बे प्लॅन'पेक्षा एका कादंबरीची. सुप्रसिद्ध मराठी कादंबरीकार नाथमाधव यांची 'राय क्लब अर्थात सोनेरी टोळी' नावाची मोठी गाजलेली कादंबरी आहे. तिच्यात चार तरुण वेगवेगळ्या युक्त्या, क्लृप्त्या करून भल्याभल्यांना हातोहात बनवतात. 'बॉम्बे क्लब', 'राय क्लब' प्रमाणेच हिकमती लढवत आहे. राय क्लब अथवा सोनेरी टोळीतील मंडळी फक्त लोभी दुष्ट खलजनांना लुटीत. 'बॉम्बे क्लब' गरीब कष्टकरी जनतेला लुटायला निघाला आहे, एवढाच काय तो फरक!

अंगण सरळ पाहिजे

'बॉम्बे क्लब'चा युक्तिवाद थोडक्यात असा, आम्ही स्पर्धेला घाबरत नाही, स्पर्धेचे स्वागत आहे! पण स्पर्धा खिलाडूपणाची पाहिजे. आम्ही मैदानात उतरण्यास तयार आहोत; पण मैदान सपाट पाहिजे. लेव्हल फील्ड पाहिजे. अशी 'बॉम्बे क्लब'ची मोठी संभावित वाटणारी मागणी आहे.

रणांगण सपाट मागणारे हे वीर 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी तक्रार करणारी नाची पोरेच. सपाट मैदानाची आवश्यकता भारतीय कारखानदारांना केव्हापासून पटू लागली?

तेव्हा कोठे राधासुता!

महाभारत युद्धात कर्णाने, 'रथाखाली उतरलेल्या रथींवर शरसंधान करणे धर्म नव्हे' असे म्हटले. त्याप्रमाणे कारखानदार आता 'धर्मयुद्धा'ची भाषा करीत आहेत; पण 'कालपुरुष' श्रीकृष्ण त्यांना 'तेव्हा कुठे गेला होता तुमचा धर्म?' असे विचारल्याशिवाय कसा राहील?

रणांगणावर उतरायचे ते मैदान आपल्या सोयीचे घेऊन, शस्त्रास्त्रे सगळी आपल्या हाती, प्रतिपक्षी निर्बलच ठेवायचे अशी भारतीय कारखानदारांची परंपरा. भर दरबारात नि:सहाय द्रौपदीच्या वस्त्राला हात घालण्यात काय ते त्यांचे शौर्य. त्यांना आता एकदम सपाट मैदानाची महत्ता पटू लागली आहे.

लाडके कारखानदार

लोकसभेच्या इस्टिमेट कमिटीच्या १२व्या अहवालात, आर्थिक मामल्यांच्या सचिवांची साक्ष आहे, "भारतीय कारखानदारी ही जगातील इतर विकसित कारखानदारी देशांच्या तुलनेने सर्वांत अधिक संरक्षित व्यवस्था राहिली आहे." आपल्या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अनेक पुरावे दिले आहेत. सरकारी संरक्षणाच्या मस्तीत कारखानदारांनी आजपर्यंत गडगंज नफे कमावले. याउलट, नेहरू व्यवस्थेत शेतीची काय दुर्दशा केली? डंकेल प्रस्तावासंबंधी केंद्रशासनाने काही कागदपत्रे सादर केले आहेत. भारतीय शेतकऱ्यांची सबसिडी १० टक्क्यांपेक्षा कमी आहे अशी मोठी शहाजोग भाषा मंत्री, पुढारी वापरत आहेत, "खरे म्हटले तर शेतकऱ्यांना मिळणारी सबसिडी ही ऋणात्मक किंवा उणे आहे," असेही ते कबूल करतात; पण शेतकऱ्यांना मिळणारी 'उलटी पट्टी' किती भयानक होती याचा आकडा मात्र स्पष्ट करण्याचे सगळे साळसूदपणे टाळत आहेत.

दोडके शेतकरी

पण GATT समोर बोलता येत नाही. तेथे खरे आकडे मांडावेच लागतात,

म्हणून सत्य बाहेर आले. भारतीय शेतकऱ्यांना सरकारी धोरणामुळे खुल्या बाजारपेठेपेक्षा ४७% कमी किमत मिळाली. भारतीय शेतकऱ्यांची सबसिडी ४७% आहे. वरखते, भ्रष्टाचार इत्यादी मार्गांनी शासनाने लादलेला बोजा लक्षात घेतला तर हिंदुस्थानातील शेतकऱ्यांची उणे सबसिडी जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा वरचढ आहे. नेहरू व्यवस्थेचे भांडे फुटले आहे. जगात सर्वांत अधिक संरक्षण कारखानदारांना आणि सर्वांत अधिक मरण शेतकऱ्यांना हा जिवघेणा खेळ शासन खेळले. त्यात कारखानदार रंगले आणि आता 'बॉम्बे क्लब' लेव्हल फील्डची मागणी करीत आहे. 'बॉम्बे क्लब'ची वंशावळी 'बॉम्बे प्लॅन'पेक्षा 'राय क्लब' अर्थात सोनेरी टोळीशी जुळलेली आहे हे अगदी उघड आहे.

सिंड्रेलाची जुनी परीकथा नव्या आवृत्तीत आली आहे. नेहरू काळात हाल सोसलेले शेतकरी खुल्या बाजारपेठेत उतरत आहेत आणि लाडावलेले कारखानदार मात्र लेव्हल फील्डची केविलवाणी भाषा करीत आहेत. खुलेपणाची भाषा करताना महासंघाच्या नावाचा आणि संरक्षण मागताना 'बॉम्बे क्लब'चा आडोसा, असा हा 'इंडियन' कारखानदारांचा कावा आहे.

(३० डिसेंबर १९९३)

रशियात आता फॅसिझम लोकप्रिय

रशियात नव्या हिटलरचा उदय होणार अशी भीती वाटतच होती. जवळजवळ अर्धे शतक महासत्ता म्हणून मिरवलेले एक राष्ट्र सहजासहजी तिसऱ्या जगातील गरीब राष्ट्रांच्या पंगतीला जाऊन उभे राहील हे कसे शक्य आहे? प्रचंड चलनवाढीमुळे सगळी जीवनमूल्यं निकालात निघाली आणि भल्या घरच्या मुलामुलींनाही अनैतिकतेचा आधार घेतल्याखेरीज जगता येत नाही, अशी परिस्थिती तयार झाली, की त्यातून एखाद्या हिटलरच्या उदय होतोच. १९३०च्या आसपास जर्मनीत हेच घडले आणि आज रशियात पुन्हा तेच घडत आहे.

राष्ट्राध्यक्षाच्या हाती सर्व सत्ता एकवटणारी घटना रशियन जनतेने मान्य केली आहे; पण निवडणुकांत मात्र सर्वांत मोठा पक्ष म्हणून येल्तसिन यांचा पक्ष पुढे आला नाही, बहुमत मिळाले नाही तरी सर्वांत मोठा पक्ष म्हणून निवडून आला तो झिरिनॉव्सकी यांचा 'फॅसिस्ट' तोंडवळ्याचा पक्ष. राष्ट्राध्यक्षांच्या हाती नव्या घटनेने सोपवलेले सर्वाधिकार येल्तसि पेक्षां झिरिनॉव्सकी यांच्या उपयोगाचे होतील अशी लक्षणे आहेत.

पूर्वदिव्य ज्यांचे त्यांना...

रशियाचा एकूण इतिहासच असा आहे, की लोकशाही व्यवस्था तिथे टिकणे कठीण.

तिथल्या जमिनीत लोकशाहीचे बियाणे रुजत नाही आणि अंकुरतही नाही. समाजवादी म्हणवणारी पहिली क्रांती लोकशाही परंपरा नसलेल्या रशियात झाली म्हणून साम्यवादाला विक्राळ 'स्टॅलिनी' स्वरूप आले. शतकानुशतके झार सम्राटांच्या गुलामगिरीची परंपरा असलेल्या देशात 'नाही रेची हुकूमशाही' या कल्पनेची विटंबना झाली. 'हुकूमशाही' तेवढी राहिली. 'नाही रे' बिचारे पुन्हा गुलामच राहिले, मार्क्सच्या अनुमानाप्रमाणे पहिली समाजवादी क्रांती

इंग्लंड किंवा जर्मनी या औद्यागिकदृष्ट्या प्रगत भांडवलशाहीची देशांत व्हायला पाहिजे होती. प्रत्यक्षात ती उपटली रशियासारख्या भांडवलशाही ओळखही न झालेल्या सरंजामशाही देशांत. साहजिकच नांवापुरता समाजवादी झेंडा फडकला; पण अंमल आला क्रूरकर्मा हुकूमशंहाचा. पहिली क्रांती १९१७ साली रशियात व्हायच्या ऐवजी जर्मनीत झाली असती तरी फारसा फरक पडला नसता. जर्मन राष्ट्राचा इतिहास लष्करी एकाधिकारशाहीचा आहे. हिटलर 'जर्मन स्टॅलिन' म्हणून सर्वसत्ताधीश बनला असता एवढाच काय तो फरक इंग्लंमध्ये क्रांती ही असंभव घटना आहे. तेथे ती घडलीच असती तर साम्यवादाचे स्वरूप सौम्य लोकतांत्रिक झाले असते किंवा नाही याबद्दल विद्वानांत मोठे वादविवाद आहेत; पण इंग्लंडमध्ये 'स्टॅलिनावतार असंभव आहे.

विदूषक ठोकशहा

हिलटरचा उदय झाला तेव्हा भल्या- भल्या जाणकारांची प्रतिक्रिया हिटलर एक विनोदी प्रहसनातील पात्र आहे अशी होती. एवढीशी मूर्ती कपाळावर लोंबणारे केस, नाकाखाली दोन बोटी मिशा एवं गुंणविशिष्ट हुकूमशहा चार्ली चॅप्लिनच्या चित्रपटाचा योग्य विषय होता; पण असल्या विनोदी पात्रातून भस्मासुर कधी उद्‌भवेल ते सांगता येत नाही. हुकूमशहा कोणी मोठा सामर्थ्यशाली, कर्तबगार, बुद्धिमान, दूरदर्शी अशा गुणांनी युक्त नसतो. त्याला थोर नेता किवा हृदयसम्राट मानणारे लोक मिळतात याचा संबंध हुकमशहाच्या गुणांशी कणमात्र नाही. चांभारकाम, सुतारकाम, चित्रकार असल्या किरकोळ व्यवसायांतील सामान्य माणसे प्रसंग आला म्हणजे हुकूमशहाच्या रूपात प्रकट होतात. हुकूमशहांची मान्यता त्यांच्या गुणावंर अवलबूंन नसते. लोकांच्या खऱ्या आणि मानसिक गरजांतून ती तयार होते. तरुण- तरुणी प्रेमात पडतात आणि प्रिय व्यक्ती कोणी स्वर्गातून उतरलेली सर्व गुणांची खाण आहे असे त्यांना वाटते. प्रत्येक प्रिय व्यक्ती अशी स्वर्गीय गुणांची थोडीच बनलेली असते? प्रेमात पडण्याची गरज तयार झाली, की गर्दभीसुद्धा अप्सरा वाटू लागते. तसेच आपला काही मानभंग झाला आहे अशी समज झालेला समाज कोणाही पागलाच्या मागे जाण्यास सहज तयार होतो. दुखावलेल्या अस्मितेला फुंकर घालून, "आपले राष्ट्र थोर, आपला वंश थोर, आपला धर्म थोर आणि त्याबरोबरच दुसरी एखादी जमात दुष्ट, नीच, आपल्या सगळ्या दुर्दशेला जबाबदार ती जमात," असा बेभान आरोळी ठोकणारा कोणीही पागल काही काळ का होईना हुकूमशहा बनू शकतो. कोणी आर्यवंशाच्या श्रेष्ठतेची द्वाही फिरवतो, कोणी हिंदुत्वाची, रशियात

झिरिनॉव्सकीरशिन राष्ट्राच्या अस्मितेची आणि सन्मानाची गर्जना करीत आहे.

शिवाजी पार्की गर्जना

"माझ्या हाती सत्ता आली तर कोणताही प्रश्न वर्षभरात सोडवून दाखवतो" ही या सर्व मर्कटपात्रांची खास शैली. झिरिनॉव्सकी यांची कांही आश्वासने याच मासल्याची आहेत.

"मी केवळ ७२ तासांत रशियाची अन्नधान्य समस्या सोडवीन. पूर्व जर्मनीमध्ये १५ लाख रशियन घुसवावेत, जरूर तर अण्वस्त्रांचा वापर करून तेथील उभी पिके कापूस आणण्याची मी त्यांना मोकळीक देईन , आंतरराष्ट्रीय संकेत आणि कायदा यांची मी पत्रास बाळगत नाही."

"अन्य देशांबरोबर सरळ अण्वस्त्रांची लढाई करावी लागली तरी काय हरकत आहे? दोन्ही बाजूंची धूळधाण झाली तरी मला पर्वा नाही."

"मला रशियाचे म्हणजे 'स्लाव'वंशीयांचे साम्राज्य उभे करायचे आहे."

स्वत:ची ही असली निरर्गल वक्तव्ये, आपली स्वत:ची ठोकशाही प्रस्थापित करण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पात्राप्रमाणे झिरिनॉव्सकी करत असतो.

"संपकऱ्याला खडी फोडायला पाठविणे," "रशियातून फुटू पाहणाऱ्या प्रदेशांना भुके मारीन," "मी जगन्नियंता आहे," "क्रूर हुकूमशहा आहे, हिटलटरच्या पावलावर पाऊल ठेवून जुन्या रशियाच्या हद्दींना भिडणारे साम्राज्य मला तयार करायचे आहे..." इ. ही असली बडबड आणि हा सर्व प्रकार आज विनोदी वाटेल; पण जगाने पूर्वी कधी ना पाहिला, ना ऐकला अशा महाभयानक हिटलर'चा उदय रशियात होतो आहे, ज्याच्यापुढे स्टॅलिन हा 'गोंडस वाटावा असा नवा हुकूमशाहा.

सुपर-हिटलचा उदय

जर्मनीचा पहिल्या महायुद्धात पराभव झाला. व्हर्सायच्या तहात त्याच्यावर अत्यंत कठोर अटी लादण्यात आल्या, आर्थिक व्यवस्था मोडून गेली. प्रचंड चलनवाढ झाली, त्यातून हिटलर निघाला. जर्मनीसारख्या कष्टाळू उद्योगप्रिय, संशोधक शिस्तप्रिय लोकांच्या देशातही हिटलर तयार झाला. उद्योजकता ही रशियास अनोखी असलेली चीज आहे. वरून कोणीतरी हुकूम सोडावा, आपण त्याची इमानेइतबारे अमलबजावणी करावी, या मोबदल्यात मालकाने आपल्या पोटापाण्याची आणि निवाऱ्याची सोय करावी ही सामान्य रशियन माणसाची अपेक्षा, मग मालक झार असो की कमिसार.

स्वातंत्र्याची गोडी निर्माण होण्याइतकी त्याची चव रशियन लोकांना कधी

चाखायला मिळालेलीच नाही. आपण होऊन काही उत्पादन करावे ही कल्पनाच रशियन व्यवस्थेत दुरापास्त वाटते. हिंदुस्थानसारख्या गरीब देशातही शहरातील दुकाने मालाने भरून वाहत असतात, याचे येथे येणाऱ्या रशियन प्रवाशांना मोठे आश्चर्य वाटते. व्यवस्था ढासळलेली आणि नवीन व्यवस्थेकरिता लागणारे जर्मन, गुण अभावानेच तळपणारे... अशा परिस्थितीत हुकूमशहा येणे आणि तो हिटलरपेक्षाही भयानक असणे अपरिहार्य आहे. हातात अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रे, असलेला रशियन सुपर हिटलर म्हणजे पृथ्वीचा नाश करणारा कल्की होऊ शकतो.

रशियातील निवडणुकांतील फॅसिस्टांची सरशी झाली त्यापेक्षाही विशेष गोष्ट म्हणजे साम्यवादी पक्षांची डाळ फारशी शिजली नाही. हुकूमशाही चालेल; पण अर्थवादी हुकूमशाही उपयोगाची नाही. एवढे रशियन नागरिकांना ८० वर्षांच्या अनुभवाने पुरेपूर उमजले आहे. कदाचित राष्ट्रवादी किवा वंशवादी हुकूमशही आली तर आपले भाग्य फळफळेल अशी निदान कल्पना करण्यात त्यांना आनंद वाटतो. लोकशाही व्यवस्थेत, बाजारपेठेच्या आधाराने, उत्पादन आणि उद्योजक यांच्या कर्तबगारीने खुली व्यवस्था उभी करण्यासाठी एक संयम लागतो. एक चरित्र लागते. मनाची एक शिस्त लागते, दीर्घकाळ कणाकणाने आणि क्षणाक्षणाने प्रयत्न करण्याची जिद्द, चिकाटी लागते. अशा गुणसमुच्चयातून थोर राष्ट्रे बनतात. इतर लोकांना भेटतात 'हिटलर', स्टॅलिन यांच्यासारखे हृदयसम्राट.

साम्यवाद्याचे प्रचारतंत्र अबाधित

इतिहासाची पुनरावृती होताना काही विनोदी प्रकार जवळजवळ जसेच्या तसे पुन्हा घडतात. हिटलरचा उदय होत असताना जर्मनीतील समाजवादी कॉम्रेड समाजवादी व्यवस्थेचे तुणतुणे वाजवत राहिले. शेवटी हिटलरने त्यांचा समूळ नि:पात केला. आजच्या रशियातील साम्यवादी पुन्हा तोच कित्ता गिरवीत आहेत. अजूनही सजाजवादी अर्थव्यवस्थेचे तुटकेमोडके समर्थन येणकेण प्रकारे करण्यात ते गर्क आहेत. रशियन लालभाईंचा युक्तिवाद चालूच आहे. रशियन साम्यवादाचा पाडाव झाला खरा; पण तो आर्थिक कमजोरीने आणि अपयशाने नाही . रशियन अर्थव्यवस्था चांगली चालली होती. राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीची रशियन गती अमेरिकन गतीपेक्षा सातत्याने वरचढ राहिली. दुसऱ्या महायुद्धापासून ते थेट १९८१ पर्यत रशियन अर्थव्यवस्था भरभराटीत होती. अमेरिकन व्यवस्थपेक्षा सरस होती, असे जे जगाला आणि स्वत:लाही पटवू पाहत आहेत, जडजंबाल आकडेवारीने सिद्ध करू झाल्यापासून उत्पादन घटते

आहे. रशियात पाडाव झाला तो समाजवादाचा नाही. समाजवादी व्यवस्थेची पुन्हां एकदा प्रतिष्ठापना करायला पाहिजे, असा त्यांनी धोशा चालवला आहे.

आकडेवारीचा धादांत असत्ये मांडण्यासाठी उपयोग करणे या कलेचा उ... हिटलटरशाही 'गोबेल्स्'ने केला, स्टॅलिन काळात या कलेचा 'सुवर्णकाळ आला... मन:पूर आकडे मांडावेत, सोयीस्कर तेवढेच आकडे द्यावेत, शक्यतो टक्केवारीत... बोलावे, मूळ आकडे सांगूच नयेत. हे सर्व साम्यवाद्यांचे खास कसब ! त्यां... कसबाने जग कधी फसले नाही, फसले ते फक्त साम्यवादीच. कोंबडे झाकून... ठेवले म्हणजे सूर्य उगवायचा राहत नाही. रशियातील सत्यस्थिती किती विदारक... होती हे लपवण्याचा प्रयत्न निष्फळ झाला आणि सर्व व्यवस्थाच ढासळली; तरीही रशियन साम्यवाद्यांना ना उमज पडली, ना समज!

केवळ प्रार्थनाच

साम्यवादी हुकूमशाही परत आणू पाहणारे एका बाजूला, 'फॅसिस्ट' हुकूमशाहीचा... झिरिनॉव्सकी भस्मासुर दुसऱ्या बाजूला. आधुनिक सुसंस्कृत लोकशाहीवादी... रशियाच्या उदयाचा काळ वाटतो तितका जवळ नाही. रशियन जनतेने अनेक... दु:खं भोगली, वर्षानुवर्षे सोसली. झारशाही पाहिली असीम क्रूर जमीनदारी... पाहिली , स्टॅलिनच्या सामुदायिक कत्तली सहन केल्या, जर्मन आक्रमणाला... तोंड दिले. अजून त्यांना काय काय सोसावे लागणार आहे, कोणास ठाऊक ? त्या सर्व रशियन भावाबहिणींकरिता प्रार्थना करण्यापलीकडे आपल्या हाती... काहीच नाही.

(१४ जानेवारी १९९४)

विलायती औषधी महाग होणे गरिबांसाठी चांगले

गेल्या पंधरवड्यात योगायोगाने तीन घटना घडल्या, त्यांतल्या दोन अतिविशिष्ट (VIP) व्यक्तींशी संबंधित असल्यामुळे वर्तमानपत्रांत झळकल्या; तिसरी घटना अगदी सामान्य शेतमजुराच्या पाच वर्षांच्या पोराची, माझ्या शेताबाहेर कुणाला माहीतसुद्धा नसलेली. तिन्ही घटनांचा नेमका अन्वयार्थ काय लावायचा? ते मलाही स्पष्ट समजत नाही.

आयुर्वेदी पंतप्रधान

२५डिसेबर १९९३-नाताळच्या दिवशी पंतप्रधान नागपूरला आले. दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमात त्यांनी ५४ व्या अखिल भारतीय आयुर्वेद संमेलनाचे उद्घाटन केले.

"आयुर्वेदाला आधुनिक वैद्यकातील इतर प्रणालीच्या बरोबरीने स्थान मिळावे त्यासाठी अनुभवी आयुर्वेदशास्त्र्यांनी प्रयत्न करावेत; सरकार आयुर्वेदासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापण्यास तयार आहे, असे संमेलनात बोलताना पंतप्रधानांनी जाहीर केले.

"आयुर्वेद केवळ एक उपचारांची पद्धती नाही, तो आरोग्याचा सर्वंकष विचार आहे; त्याला किरकोळ स्वरूपाच्या आजारांकरिता वापरायची उपचार पद्धती असे स्वरूप येता कामा नये; औषधी वनस्पती झपाट्याने नष्ट होत आहेत, स्थानिक लोक, आदिवासी यांच्याकडून त्यांच्याविषयी मौल्यवान माहिती मिळवली पाहिजेत; औषधी वनस्पतींची पद्धतशीर लागवड झाली पाहिजे. उत्तरेत हिमालय आणि दक्षिणेत नील, मलय या पर्वतांवरील विपूल औषधी वनस्पतींची ख्याती पुरातनकाळपासून आहे, त्यांची ओळख पटवून, त्यावर आधुनिक संशोधन होणे आवश्यक आहे; आदिवासी विभागातील अनेक आजार आणि साथीचे रोग आधुनिक उपचारांना दाद देत नाहीत; पण स्थानिक जडीबुटीने त्याचा उपचार

होऊ शकतो; हिदुस्थानात उपलब्ध सर्व औषधी वनस्पती अभ्यासण्याची, त्यांची पद्धतशीर जंत्री करण्याची आणि त्यांच्याबद्दल आधुनिक संशोधन करण्याची निकडीची गरज आहे." असे पंतप्रधानांनी आग्रहाने सांगितले.

'इंडिया' पॅथीच्या डॉक्टर शिवा

दुसरा प्रसंग २९ डिसेंबरच्या डॉ. वंदना शिवा पर्यावरण तज्ज्ञ म्हणून ओळखल्या जातात. पर्यावरण तज्ज्ञांची जगात आज मोठी चहा आहे. काही महिन्यांपूर्वी श्रीमती मेधा पाटकर यांना नोबल पारितोषिका समान समजले जाणारे एक पारितोषिक मिळाले. नोबल पारितोषिकाच्या बरोबरीची समजली जाणारी अशी पारितोषिके किती आहेत कुणास ठाऊ? डॉक्टर वंदना शिवा यांनाही तसेच एक पर्यायी नोबल पारितोषिक मिळाले आहे. त्याखेरीज पर्यावरणवादी स्त्रीमुक्ती चळवळीच्या त्या 'शिल्पकार' समजल्या जातात. डॉक्टरबाईंचे पुण्याला भाषण झाले. डंकेल प्रस्तावांत संशोधकांच्या बौद्धिक संपदेच्या हक्काला मान्यता मिळाल्यामुळे औषधांच्या किमती वाढणार आहेत. उद्योगात बहुराष्ट्रीय कंपन्या प्रवेश करत असल्यामुळे हे उद्योग जास्त नफेखारीकडे लक्ष देतील. त्यामुळेच जीवनावश्यक ओषधे उत्पादित करण्याचे प्रमाण कमी होईल आणि गोरगरीब रुग्णांवरील उपचार महागडे बनतील."

बहुराष्ट्रीय कंपन्यांची आधुनिक ओषधे बाजारात विनाहरकत येऊ लागली आणि भारतीय कंपन्यांना त्या औषधाची नक्कल करण्यासाठी मानधन देणे भाग पडले तर त्यामुळे जीवनावश्यक औषधांचे उत्पादन का घटावे ; हे समजणे कठीण आहे; पण बाईंच्या मतांप्रमाणे भारतातील जनतेच्या सर्वसामान्य औषधोपचारासाठी परदेशात तयार होणाऱ्या अत्याधुनिक औषधांची फार मोठी गरज आहे त्यांची कल्पना स्पष्ट होते. हिदुस्थानातील कंपन्यांना विलायती औषधांचा चोरबाजार चालवण्याची मुभा असली तरच गोरगरिबांना ही औषधे स्वस्त मिळतील, अन्यथा देशात मोठा हाहाकार उडेल, अशी त्यांची मांडणी. दोन अतिविशिष्ट व्यक्ती विद्वान म्हणून जगभर गाजलेल्या वैद्यकीय उपचार-पद्धतीविषयी त्यांची मते उलट टोकाची विरुद्ध म्हणून तिसऱ्या घटनेचे महत्व.

भाजलेल्या पोराचे लोकवैद्यक

प्रसंग घडला तो माझ्या शेतावर. दिवसभराची कामे संपल्यानंतर अंधार झाल्यावर शेतावर राहणाऱ्या एक बाई त्यांच्या चारपाच वर्षांच्या मुलाला घेऊन आल्या. पोराने अंगावर आमटीचे कढण सांडून घेतल्यामुळे मनगटापासून कोपरापर्यंतचा निम्मा भाग सगळा भाजून, सोलून निघाला होता. शेतावर

'बर्नाल' किंवा काहीच औषध नव्हते. भाजण्याच्या जखमेवर अजिबात पाणी लागू देऊ नये असे माझ्या लहानणपणी डॉक्टर मोठ्या आग्रहाने सांगत असत, आता डॉक्टर नेमके उलटे सांगतात भाजल्याबरोबर जखम झालेला भाग जितका होईल तितका वेळ साध्या स्वच्छ गार पाण्याच्या धारेखाली धरावा अशी आता शिफारस आहे. वर्षादीड वर्षांपूर्वी भजण्याच्या एका प्रकरणाचा जवळून संबंध आल्यामुळे एवढी माहिती मलाही होती. पोराचा हात पाण्याखाली धरायला सांगून त्याची गाडीतून पाठवणी केली. डॉक्टरांनी एक इंजेक्शन दिले आणि काही मलम लावून पोराला परत पाठवले, घरी लावण्यासाठी औषध लिहूनही दिले. दोन दिवसांनी त्या मुलाला पुन्हा एकदा डॉक्टरांकडे नेले, त्याचा बाप पैसे मागण्यासाठी आला; पण सगळा डॉक्टरी खर्च माझ्याकडे आहे, डॉक्टरांनी माझ्या खात्यावर टाकला आहे, हे मी त्याला सांगितले, त्याला त्यातल्या त्यात बरे वाटले असावे. नंतर काही दिवस पोराला डॉक्टरांकडे नेल्याचे माझ्या काही नजरेस आले नाही. चौकशी करता कळले, की पोराला डॉक्टराकडे नेण्याचे बंद झाले आहे आणि काही गावठी उपाय त्यावर चालू आहेत. पहिल्यांदा कोरफडींचा गर जखमेवर लावण्यात आला; मग खेड्यांचे मांस जखमेवर लावण्यात आले. पोरगा नेहमीप्रमाणे खेळतो आहे याचे मला आश्चर्य वाटले. भाजण्याच्या जखमा भरून यायला किती कठीण असतात आणि त्याकरिता दिवसेंदिवस वेगवेगळ्या प्रकारची इंजेक्शने कशी घ्यावी लागतात; ड्रेसिंग किती वेदनाकारक असते हे थोड्याच दिवसांपूर्वी मी डोळ्यांनी पाहिले होते. मग या पोराच्या भाजण्याच्या जखमा एवढ्या लवकर भरून कशा आल्या ? सध्या मुलाचा हात बरा दिसतो आहे; तो डॉक्टरांच्या औषधामुळे की खेकड्याच्या मांसामुळे हे सांगणे कठीण आहे!

अडाण्यांची विचक्षण

पण मूळ मुद्दा कोणती उपचारपद्धती जास्त परिणामकारक हा नाही. वेगवेगळ्या वैद्यकप्रणालीबद्दल सर्वसाधारण भारतीयांच्या मनातली धारणा या प्रसंगाने स्पष्ट झाली. ती धारणा मोठी विलक्षण आहे. भाजलेल्या पोराचें आईबाप आणि शेजारीपाजारी माणसे काही ठार अडाणी नाहीत. विंचू वगैरे चावला तर मांत्रिकाकडे जाण्याऐवजी डॉक्टरांकडे जाणे श्रेयस्कर हे त्यांना अनुभवाने पटलेले आहे. डॉक्टरांच्या आधुनिक उपाययोजनेचा खर्च परवडत नसल्यामुळे ती थांबवली असेही संभावत नाही, कारण सगळ्या उपचाराचा खर्च मी करणार होतो. डॉक्टरकडे जाण्यायेण्यातही काही मोठा त्रास आहे असे नाही. उलट निदान

आईला हक्काची सुटी मिळते. मग डॉक्टरी उपचार थांबवून लोकवैद्यकांकडे ते का वळले?

गावठी उपाययोजनेचा उपहास करून त्याला मी विरोध करेन अशी त्यांना भीती वाटली असावी; म्हणून मला कोणी काही सांगितलेच नसावे, माझ्या आधुनिकतेच्या दबावाखाली डॉक्टरचा उपचार चालू ठेवावा लागेल आणि त्यामुळे पोराचा त्रास विनाकारण वाढेल अशी त्यांना धास्ती पडली असेल! मला आठवण झाली म्हणून चौकशी केली तेव्हा कळले. लख्खकन प्रकाश पडावा तसे माझ्या ध्यानात आले. निदान भाजण्याच्या प्रकरणात तरी या लोकांच्या डॉक्टरांच्या उपचारावर तितकासा विश्वास नसावा. पोराचा हात वाचवायचा, निदान त्याचे दु:ख कमी करायचे असेल तर अगदी साहेबांचासूद्धा आग्रह बाजूला ठेऊन डॉक्टरी उपाययोजना केली पाहिजे आणि खरी चांगली उपाययोजना केली पाहिजे असा त्याचा निश्चय दिसल. मी कांहीच बोललो नाही.

सुशिक्षितांची अंधश्रद्धा

खेड्यातली माणसे, आदिवासी कोणी आजारी पडले म्हणजे अंधश्रद्धेने मांत्रिकतांत्रिकाकडे जातात, वैदूची जडीबुटी घेतात, असा समज वर्षानुर्षे चालत आला आहे; पण सत्यस्थिती कदाचित नेमकी याच्या उलटी तर नाही ना? कोणी आजारी पडले म्हणजे शहरातील शाळाकॉलेजात शिकलेले सुशिक्षित म्हणवणारे लोक काही विचार न करता अंधश्रद्धेने डॉक्टरकडे जातात, इस्पितळात जातात. हजारो रुपये खर्च केले म्हणजे आपले कर्तव्य आपण बजावले! रोगी बरा होणे न होणे कोणाच्या हाती थोडेच आहे? असे मनाचे समाधान करून घेतात. अंधश्रद्धा, अडाणी कोण? शहरी लोक भले, की ग्रामीण आदिवासी? कांही समजेनासे झाले आहे.

लोकवैद्यक कसे वाचले

एक गोष्ट पक्की, विलायती औषधे स्वस्त झाली म्हणजे गोरगरिबांचे कल्याण होईल ही कल्पना खोटी. उलट ती जितकी महाग होतील तितके देशाचे भले होण्याची शक्यता अधिक आहे. देशी प्रभावी औषधोपचाराच्या पद्धतींचा वापर व्हायचा असेल, यांच्याबद्दल संशोधन व्हायचे असेल, तर विलायती औषधे महागच असणे श्रेयस्कर. निदान ती कृत्रिमरीत्या स्वस्त करणे तरी घातक होईल. संकट बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या औषधांच्या महागड्या किमतीचे नाही, संकट देशातील लोकवैद्यक पृथ्वीतलावरून कायमचे नष्ट होण्याचे आहे. हा धोका परदेशी संशोधनाची चोरी करून टळणार नाही; देशी पद्धतींच्या वापराने

आणि संशोधनाने टळेल.

डंकेलची धास्ती, पेटंट हक्काची भीति कोणाला वाटते? आधुनिक वैद्यकाची नवी 'शीतलादेवी बनवून, स्वत:ची तुंबडी भरणाऱ्या भगतांना विलायती औषधे महागली तर उपचार महाग होतील याची चिंता नाही. लोक कायमचे पर्यायी, अधिक परिणामकारक आणि कमी खर्चिक वेद्यकाकडे जातील; बहुराष्ट्रीय पॅथीच्या नकलेची 'इंडिया'पॅथी धोक्यात येईल आणि भारतवैद्यक पुढे येईल ही त्यांची खरी चिंता आहे. असे घडले तर पाश्चिमात्य विद्येची अडत कशी चालेल? जिभेवर शब्द बहुराष्ट्रीय कंपन्याच्या विरोधाचे; पण कृती त्या कंपन्यांना पर्याय देण्याची; नाही त्यांचीच भ्रष्ट नक्कल करून आपले दुकान चालवण्याची!

पटकन आठवले-चंपारण्याच्या जंगलप्रदेशात जाताना औषध म्हणून मोहनदास करमचंद गांधी यांनी ('महात्मा' ही उपाधी त्यांना चंपारण्यात मिळाली.) फक्त चार वस्तू नेल्या. आयोडिन, गंधक-मलम क्विनिव आणि एरंडेल. भारतीय जनतेच्या ९० टक्के रोगांचे आणि आजारांचे उपचार करण्यासाठी या चार गोष्टी पुरेशा असतात असा त्यांचा आग्रह होता. १९९३ सालच्या तीन घटना; पण त्यांचा 'अन्वयार्थ' लावण्यासाठी संदर्भ लागतो तो १९१७ सालच्या एका साध्या घटनेने.

(२१ जानेवारी १९९४)

■■

नोकरदार आख्यान-'आणिला, मागुती नेला...!'

सरकारी काम म्हटले की ते गैदी, कागद आणि लाल फिती यांचा गुंता, प्रचंड खर्च, त्या मानाने काम अगदीच कमी. सरकारी कामाच्या या खास धबडग्यात सर्वसामान्य लोकांच्या डोळ्याला पाणी येते; पण या सगळ्या विक्राळ प्रकारात नकळत का होईना, हास्याची लकेर उठावी असे प्रसंग येतातच.

सेवकांचिया लीळा

सरकारी कामांमध्ये गोंधळ असायचाच ही परंपरा भारतातही मोठी प्राचीन आहे. रामावतारापूर्वी नोकरदारांचा उल्लेख सापडतो, तो घरगुती सेवकांचा, म्हणजे खासगी तैनातीतील नोकरांचा. ते राजमहालात काय गोंधळ घालत असतील ते असो, त्याचा उल्लेख लेखी सापडत नाही. राजमहालातले कोठावळे चोऱ्या करीतच असणार; दासदासी नासधूस करीतच असणार यात काही शंका नाही; पण सरकारी सेवकांच्या कार्यशैलीचा पहिला उल्लेख रामायणात सापडतो. हनुमान हा पहिला सरकारी नोकर. मनापेक्षा अधिक गतीने उड्डाणे करणारा, प्रचंड ताकदीचा आणि बुद्धिमंतांतील सर्वश्रेष्ठ असा हा रामसेवक. त्याला सीतेच्या शोधार्थ रामाने पाठवले. सीतेचा शोध त्याने काढला खरा; पण त्याबरोबर सगळी लंका जाळून आला. लंकेबरोबर अशोकवन आणि अशोकवनाबरोबर सीता जळाली नाही हे नशीब!

विनोदाचार्य चिं.वि.जोशी यांनी हनुमानाच्या कार्यपद्धतीवर टिप्पणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातील इंजिनीअर पूल बांधत नाहीत, बांधलेला पूल पावसाळ्यात वाहून गेला असे दाखवतात आणि एकाच पुलाच्या बांधकामाचे अनेकदा पैसे घेतात. तसेच रामाच्या काळीसुद्धा

हनुमान गेला नसावा, आला नसावा, द्रोणगिरी आणला नसावा, परत नेला नसावा. फक्त जायचा यायचा, दोन्ही वेळचा प्रवासखर्च आणि वर डोंगरासारख्या सरकारी मालाच्या वाहतुकीचा खर्च 'क्लेम' केला असावा.

वरच्या लत्ता झेलीत माथा

राजाची मर्जी देखून सोयीसोयीने बोलणे हाही सरकारी नोकरांचा आणखी एक जातीधर्म. भर दरबारात उपस्थित असलेले, वयाने, तपाने, ज्ञानाने, अनुभवाने श्रेष्ठ असलेले गुरुवर्य काही थोडे नव्हते. त्यांच्या डोळ्यासमोर दुर्योधनाने द्रौपदीच्या वस्त्राला हात घातला; पण कोणी एकाने राजाच्या या भयानक विनाशकारी कृत्याबद्दल चकार काढला नाही. आणीबाणीच्या काळात सगळे सरकारी नोकर जसे वागले तसेच भीष्म द्रोणाचार्यादी सर्व गुरुवर्य वागले.

सवे झाडिती खाली लाथा

सरकारी नोकर कोणत्याही कामात पैसे खाऊ शकतो, अशी बिरबलाने बादशहाशी पैज मारली. बादशहाने नदीकाठच्या वाळवंटात एक काठी खोचून तिचे रक्षण करण्याची कामगिरी बिरबलाकडे दिली आणि बिरबलाने त्यातूनही मोठी वरकमाई करून दाखवली ही गोष्ट प्रसिद्धच आहे.

आदर्श सरकारी कार्यालयांची कल्पना अशी; कार्यालयाची इमारत मोठी सुंदर असावी, सर्वांना ऐसपैस जागा, शक्यतो स्वतंत्र स्वतंत्र खोल्या असाव्यात, एअर कंडिशनर नाही तर निदान पंखे डोक्यावर गरगरत असावे, कँटिन चांगले असावे आणि स्वस्त असावे आणि सर्व नोकरदारांनी चहा, कुटाळक्या, स्वेटर विणणे यातून उरलेल्या काळात एकमेकांचे पगार, भत्ते, बदल्या, बढत्या, याबद्दलच्या तक्रारी एवढीच काय ती कामे करावी. केवळ एकमेकांचीच कामे करणारी कार्यालये हा सरकारी आदर्श! लोकांशी संपर्क म्हणून असू नये. लोकांनी यावे ते ठक्त वेगवेगळ्या नोकरदारांना त्यांच्या इतमामाप्रमाणे, चिरीमिरीपासून सुटकेसातील देणग्यांपर्यंत, देण्याकरिता यावे हा सरकारी कार्यपद्धतीचा आदर्श.

नसलेल्या कामाचे ओझे

'यस् मिनिस्टर!' या गाजलेल्या पुस्तकात सरकारी पद्धतीची अनेक उदाहरणे आहेत. ९०० खाटांचे सुसज्ज इस्पितळ, पण डॉक्टर नसल्यामुळे एकही रोगी दाखल करून घेतला जात नाही आणि तरीही बाकीचा नेमलेला सगळा नोकरवर्ग आपल्याला कामाचे ओझे ठार असल्याची तक्रार करतो

हे इंग्लंडमधील विनोदी दृश्य. त्याच्या उलट, आमच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील स्थिती. डॉक्टर आणि नोकरवर्गाच्या पगारभत्त्यावर खर्च ... लाख रुपये; पण वर्षभरात रोग्यांना देण्याच्या औषधपाण्याच्या खर्चाची तरतूद ठक्त ३० हजार रुपये!

ब्रुसेल्स्चे स्वप्नमंदिर

युरोपातील राष्ट्रसमुदायाचे मुख्य कार्यालय बेल्जियमची राजधानी बुसेल्स येथे आहे. आंतरराष्ट्रीय नोकरवर्गाचा स्वर्ग म्हणजे या कार्यालयातील नोकरी. पगार, भत्ते भरभक्कम; इतर सोयीसवलती मुबलक आणि कामामध्येदेखील कॉकटेल पार्ट्या–मेजवान्या यांची रेलचेल. ब्रुसेल्सच्या कार्यालयात काम करणाऱ्या नोकरदारांचा युरोपियन कारखानदारांनादेखील हेवा वाटतो.

या कार्यालयातील सगळ्यात महत्त्वाचे काम म्हणजे शेतकऱ्यांना भरपूर भाव मिळेल अशी व्यवस्था चालवणे. एका मजल्यावर शेतकऱ्यांच्या उत्पादनावर त्यांनी केलेल्या निर्यातीवर सबसिडी देणारे खाते आहे. शेतीमालाचे उत्पादन वाढावे आणि शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे हा या खात्याचा आणि सबसिडी देण्याचा हेतू. उत्पादन खर्चावर ६० ते ६५ टक्के सबसिडी युरोपमधील सरकारे देतात. परिणाम असा, की युरोपात अक्षरशः दुधाचे तलाव, लोण्याच्या टेकड्या आणि धान्याचे डोंगर उभे राहिले.

धनधान्याच्या या मुबलक संपन्नतेचे करायचे काय? हा सगळा शेतीमाल साठवायचा कुठे? कसा? आणि किती काळ? हा प्रश्न सोडवण्यासाठी त्याच कार्यालयामध्ये एक वेगळा विभाग आहे. आपल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी युरोपीय देश शेती मालाच्या किंमती चढत्या ठेवतात, तर हिंदुस्थानासारखी नतद्रष्ट सरकारे त्यांच्याकडून दूध, लोणी, धान्य वगैरेंची भीक मिळवायला उत्सुकतेने रांग लावून उभे असतात. आपापल्या देशात हा वरकड माल नेऊन तेथील किंमती पाडून शेतकऱ्यांना बुडवण्यावर देशहिताची आणि शेतकरी हिताची शेखी मिरवणारे डॉ. कुरियन यांचे अवतार प्रत्येक गरीब देशात मुबलक आहेत.

विजेसाठी दाही दिशा

एक मोठे ढळढळीत उदाहरण: गुजराथ राज्यात डोंगरदऱ्या नाहीत, त्यामुळे पाण्याच्या प्रवाहापासून वीज निर्मिती करण्याची तेथे शक्यता नाही. अणुशक्ती केंद्र जवळ उभे आहे; पण त्याचा मुख्य उपयोग परदेशी

पाहुण्यांच्या दौऱ्यातील महत्त्वाचे प्रेक्षणीय स्थळ, एवढाच आहे. काठेवाड आणि सौराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर सतत वाहणाऱ्या वाऱ्याचा उपयोग करून वीजनिर्मिती करण्याचे किरकोळ प्रयोग चालू आहेत; पण गुजराथ राज्य शेती आणि कारखानदारी या दोन्ही क्षेतात पुढे आहे. विजेची गरज मोठी आहे आणि तेथील उद्योगधंदे, शेती औष्णिक विजेवर अवलंबून आहे.

कोळसा आणा, गॅस पाठवा

आता उष्णता कोठून आणायची? त्याकरिता बिहार राज्यातून दूरवरून कोळसा आणला जातो. कोळशाच्या मूळ कितीच्या अडीच पट वाहतुकीचा खर्च आहे आणि बिहारपासून गुजराथपर्यंत येऊन पोचेपर्यंत १०% कोळसा हरवतो. चोरीला जाते; वेगवेगळ्या प्रकारांनी नाहीसा होतो. कोळसा महाग, त्यामुळे वीज महाग, गुजराथ वीज महामंडळ इतरांच्या तुलनेने काही विशेष उधळमाधळ करणारे आहे असे नाही; तरी विजेचे उत्पादन महाग होते आणि सरकार दरवर्षी विजेचे दर वाढवत असते.

गंमत अशी, की याच गुजराथमध्ये नैसर्गिक वायू मोठ्या प्रमाणावर सापडतो. सुरतजवळच्या हजारीपासून उत्तर प्रदेशच्या पूर्व भागातील जगदीशपूरपर्यंत अब्जावधी रुपये खर्चून एक पाइपलाइन टाकण्यात आली आहे. त्यातून जाणारा गॅस एका माजी पंतप्रधानांच्या राजकीय सोयीच्या मतदारसंघात खतांचा कारखाना उभा करण्यासाठी वापरला जातो. गॅसची किंमत आकारण्याची पद्धत अगदी वेगळी. एकाच सरकारने ठरवलेल्या दोन्ही पद्धती; पण टोकाच्या विभिन्न. कोळशाची किंमत खाणीच्या तोंडाशी ठरते, तेथून कोळसा वाहून नेण्याचा खर्च गिऱ्हाइकाला करावा लागतो. याउलट, गॅसची किंमत सगळ्या देशात एकसारखीच. वाहतुकीचा सरासरी खर्च मूळ किमतीत धरण्यात आल्यामुळे गुजराथ राज्याला स्वत:चाच गॅस स्वत:लाच वापरणे परवडणार नाही.

गाढवांच्या येरझाऱ्या

बिहारमधून मालगाड्या भरून भरून गुजराथकडे कोळसा वाहून आणण्यापेक्षा त्यापासून बिहारमध्येच वीज तयार केली असती आणि वीज गुजराथमध्ये आणली असती तर खर्च कितीतरी कमी झाला असता. नासधूस वाचली असती, रेल्वेवरचा ताण कमी झाला असता; पण द्रोणागिरी पर्वताची दोन्ही दिशांनी वाहतूक करणाऱ्या रामसेवकांच्या वारसदारांना ते

कसे सुचावे? किंवा बिहारच्या कोळशाऐवजी घरचा गॅस वापरून गुजराथेत स्वस्त वीज तयार करावी हे त्यांना कसे रुचावे? बिहारचा कोळसा गुजराथमध्ये येतो आहे, गुजराथचा गॅस उत्तर प्रदेशात जातो आहे, चौफेर नासधूस होते आहे, त्याचा बोजा लोकांना सोसावा लागतो आहे.

स्वयमेव सेवामहे

सरकारी नोकरांची महत्त्वाकांक्षा याहून मोठी आहे. त्यांचे दु:ख हे आहे, की सध्याच्या सगळ्या व्यवस्थेत कोठेतरी महागडी का होईना वीज तयार होते आहे आणि वरखते तयार होत आहेत! हे त्यांना लांछनास्पद वाटते. कोळसा, वायू यांची वाहतूक तर झाली पाहिजे; पण प्रत्यक्षात उत्पादन मात्र काहीही होता नये. स्वत:चीच सेवा करणारी कार्यालये उभी राहावीत हेच ध्येय.

(१० फेब्रुवारी १९९४)

■■

अमेरिकन प्रशासनाची अनेक राष्ट्रांकडे वक्रदृष्टी

अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या बालपणाची एक कथा. शालेय पाठ्यपुस्तकापर्यंत पोचली असल्यामुळे मोठी मशहूर आहे. बाळ जॉर्जच्या हाती एक कुऱ्हाड लागली. कुऱ्हाडीच्या घावाने झाडे फटाफट तुटतात. खाली येतात याचे त्याला कौतुक वाटले. दिसेल ते झाड तोडून टाकण्याचा सपाटा त्याने लावला. त्यात त्याच्या वडिलांच्या लाडक्या झाडाचाही बळी गेला... वगैरे वगैरे.

अमेरिकेचे सध्याचे अध्यक्ष वयाने अत्यंत तरुण आहेत. पहिल्या अध्यक्षांच्या बालपणातील उपद्व्याप त्यांचे आजचे बालीश वारस चालवत आहेत की काय अशी शंका यावी अशा अलीकडच्या घटना आहेत.

पृथ्वीच्या गोलाची पूर्वेकडून पाहणी सुरू करू.

उगवत्या सूर्यावर झेप

जपान जगातील सगळ्यांत वेगाने प्रगती करणारा देश. जपानी मालाच्या आक्रमणाने अमेरिकन कारखानदार भयग्रस्त झाले. बहुतेक सगळ्या देशांना महासामर्थ्यशाली वाटणारा डॉलर झुकतो तो ठक्त जपानी येनपुढे. जपानने आपली आयात वाढवावी आणि निर्यात कमी करावी यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी प्रचंड दबाव आणला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर देशाची पुनर्बांधणी करण्यासाठी जपानने उद्योजकांना अनेक सोयीसवलती दिल्या होत्या. त्या बऱ्याच अंशी आजतागायत चालूच आहेत. आर्थिक शिखरावर पोचल्यानंतर जुन्या व्यवस्था चालू ठेवणे जगाला मान्य होणार नाही हे उघड आहे. सुधारणा करण्यासाठी जपानी पंतप्रधान होसोकावा यांची धडपड चालू आहे; पण जपानी संसदेत सुधारणांना भरभक्कम विरोध होतो आहे. अमेरिकन दबावामुळे तेथील सरकार कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. व्यापाराच्या अटीसंबंधीची कुऱ्हाड

जपानवर चालविली जाते तशीच हिंदुस्थानसारख्या व्यापारीदृष्ट्या फालतू देशावरही तयार कपडे इत्यादी माल भारताने अधिक आयात करावा असा दबाव हिंदुस्थानवर आणला जात आहे. इतर अनेक देशांवरही राष्ट्राध्यक्ष क्लिंटन असाच दबाव आणत आहेत.

उत्तर कोरियाचा अणुबॉम्ब

जपानच्या शेजारच्या उत्तर कोरियावर कुऱ्हाड चालली ती अणुबॉम्ब तयार करण्याच्या प्रश्नासंबंधी. उत्तर कोरिया १९५१ सालापासून संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामर्थ्याशी लढला, आजही पश्चिमी देशांशी वादावादी चालूच आहे. स्वरक्षणार्थ आल्या हाती दीड–दोन तरी अण्वस्त्रे असावी असा उत्तर कोरियाचा प्रयत्न चालू आहे. तेथील अण्विक कार्यक्रमाची आंतरराष्ट्रीय तपासणी करता यावी यासाठी इराकप्रमाणेच उत्तर कोरियावरही संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा चालून जाण्याची शक्यता नगण्य नाही. इराकविरुद्ध कारवाई याचसाठी झाली, आता उत्तर कोरियावर होत आहे, उत्तर कोरियानंतर, अण्वस्त्र प्रकरणी नाठाळपणा करणाऱ्या हिंदुस्थानकडेही अमेरिकेची वक्र नजर फिरणार आहे.

चिन्यांचे मानवी हक्क

आणखी पश्चिमेकडे सरकले, की लागतो चीन. निक्सनच्या काळापासून चिनी–अमेरिकी दोस्तीचे नगारे वाजत आहेत; पण चीनमध्ये मानवी हक्कांचे संरक्षण होत नाही; राजकीय विरोधकांना क्रूरपणे वागवण्यात येते; प्रसंगी ठार करण्यात येते; चीनमधील कायदेकानून बदलून, मानवी हक्कांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय कराराशी सुसंगत अशी व्यवस्था तेथे आली नाही तर चीनबरोबरचा आपला व्यापार बंद करण्याची धमकी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी दिली आहे.

कुऱ्हाडीचा आणखी एक तडाखा

मानवी हक्कांसंबंधी उल्लंघन करणारा देश म्हणून भारताकडेही अमेरिकेची वक्र नजर आहे. विशेषत: पंजाब आणि काश्मीर राज्यात अनेक अमानुष कृत्ये पोलिस करत असल्याचा उघड आरोप खुद्द क्लिंटन साहेबांनी केला आहे. रेंगाळत पडलेला काश्मीरचा प्रश्न भारत आणि पाकिस्तान दोघांनी मिळून एकत्र बसून सोडवला पाहिजे असा प्रचंड दबाव क्लिंटन दोन्ही शेजारी राष्ट्रांवर आणत आहेत. पंजाबचा प्रश्न जवळजवळ निकालात निघाला असला तरी शीख–हक्कांच्या संरक्षणाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करून अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी मोठा कल्लोळ उडवून दिला आहे.

मध्य-पूर्वेत धुमाकूळ

इराणमध्ये मुस्लिम कठमुल्लांचे राज्य चालू आहे. दोनच दिवसांपूर्वी इराणच्या अध्यक्षांच्या खुनाचा प्रयत्न झाला. खुनाच्या कटामागे अमेरिकेचा हात असल्याबद्दल इराणमध्ये प्रचंड निदर्शने झाली. इराकच्या सद्दाम हुसेन सरकारविरुद्ध अमेरिकेच्या आग्रहाने संयुक्त राष्ट्रसंघाने अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी आक्रमण केले होतेच. पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती होईल अशी शक्यता वाटते.

मध्य–पूर्वेतील इस्त्रायल हे तर अमेरिकेचे खास बंधुराष्ट्र. आजपर्यंत शेजारच्या प्रबळ अरब राष्ट्रांना तोंड देऊन इस्त्रायल उभे राहिले ते अमेरिकेच्या मदतीमुळे; पण क्लिंटनच्या कुऱ्हाडीचा फटका इस्त्रायललाही बसला आहे. इस्त्रायली पंतप्रधान शेरॉन यांना पॅलेस्टिनी मुक्ती संघटनेचे यासर अराफत यांच्याशी बोलणी करणे भाग पडले, इतकेच नव्हे तर पॅलेस्टिनी राष्ट्रास मान्यता द्यावी लागली. त्यापलीकडे जाऊन पॅलेस्टिनी निर्वासितांचे नवे राष्ट्र भरभराटीस जावे याकरिता भरकस मदत करण्याचेही मान्य करावे लागले.

युरोपातील राष्ट्रसमुदायाशी अमेरिकेचा संघर्ष तसा जुना आहे. फ्रान्स देशाबद्दल अमेरिकी सर्वसामान्य नागरिकांच्याही मनात एक अढी आहे. आर्थिक प्रश्नाबद्दल, संरक्षण व्यवहाराबद्दल, युरोपीय देशांशी अमेरिकेचा तंटाबखेडा असावा आणि क्लिंटनच्या कुऱ्हाडीचा तडाखा त्यांनाही बसावा हे समजण्यासारखे आहे; पण रशिया आणि इतर पूर्वाश्रमीच्या समाजवादी देशांशी स्नेहाचेच नव्हे तर गोडीगुलाबीचे संबंध प्रस्थापित होणे अमेरिकेच्या आणि सर्वच जगाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अध्यक्ष येलत्सिन यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा चालवला आहे. रशियातील चलनवृद्धी आटोक्यात ठेवण्यासाठी परदेशी मदतीची गरज आहे. चार–पाच वर्षांपूर्वी डॉलरच्या बरोबर असलेला रुबल घसरत घसरत २००० रुबल्स = १डॉलर इतका कोसळला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपिय राष्ट्रांना ज्या प्रकारची आणि ज्या प्रमाणावर मदत 'मार्शल प्लॅन'खाली झाली तशीच १९९१ मध्ये जुन्या समाजवादी देशांना मिळाली असती तर खुली अर्थव्यवस्था आणण्याचे काम सोपे झाले असते; पण यावेळी नेमकी अमेरिका कंजूष झाली. पहिल्या महायुद्धानंतर वुड्रो विल्सनने केलेली चूकच क्लिंटन करीत आहेत. मदत दिली; पण आवश्यकतेपेक्षा खूपच कमी. परिणाम असा झाला, की खुली अर्थव्यवस्था रशियात मागे हटत आहे. जुन्या पुराण्या समाजवादी व्यवस्थेचे पुरस्कर्ते अधिकारपदावर पुन्हा हक्क बसवीत आहेत आणि झिरिनॉव्सकी

सारखा 'भस्मासुर' डोके वर काढत आहे. अशा परिस्थितीत क्लिंटन बाळाने काय करावे? रशियास भेट देऊन खुली व्यवस्था अधिक वेगाने आणणे किती महत्त्वाचे आहे याबद्दल त्यांनी जोरदार भाषण दिले. अमेरिकेचे उपरराष्ट्रमंत्री स्ट्रोब यांनी काढलेले उद्‌गार फ्रेंच महाराणी ॲंत्वानेतच्या "लोकांना भाकरी मिळत नसेल तर मिठाई खाऊ द्या" या कुख्यात उक्तीची बरोबरी करणारे आहेत. समाजवादातून खुल्या व्यवस्थेकडे येण्यासाठी 'धक्क्याचा उपचार' आवश्यक होता हे सर्वमान्य; पण आर्थिक अराजकाने हवालदिल झालेल्या रशियन नागरिकांना स्ट्रोब साहेबांच्या मते "आतापर्यंत ठक्त धक्काच मिळाला आहे, उपचार काहीच नाही." या एका वाक्यामुळे झिरिनॉव्सकीला प्रचंड बळ सापडले बिल क्लिंटन बाळाच्या कुऱ्हाडीने आणखीन एका झाडाचा जीव कासावीस केला.

इंग्लंडही सुटले नाही

इंग्लंड म्हणजे तर अमेरिकेचे सर्वांत प्रेमाचे राष्ट्र. दोन्ही राष्ट्रांतील नागरिकांना एकमेकांमध्ये फरक असा वाटतच नाही. दोन महायुद्धे आणि एक प्रदीर्घ शीतयुद्ध यांना दोघांनी मिळून तोंड दिले. चर्चिलच्या शब्दांत अमेरिका आणि इंग्लंड यांचे 'खास नाते' आहे. क्लिंटन बाळाची कुऱ्हाड खुद्द इंग्लंडवरही चालते आहे. आयर्लंडमधील अल्सटर हा उत्तरेकडील परगणा. आयरिश स्वातंत्र्यानंतरही इंग्लंडच्या आधिपत्याखाली राहिलेला तो भाग स्वतंत्र व्हावा याकरिता वर्षानुवर्षे आंदोलन चालू आहे. आयरिश अतिरेक्यांनी घातपात, खून, बॉम्बस्फोट करून इंग्लंडमधील सर्व शांतता नासवून टाकली आहे. अतिरेकी चळवळीतील 'सिनफेन' संघटनेचा नेता जेरी ॲडाम्स अनेक घातपातांच्या कृत्यांकरिता जबाबदार मानला जातो. त्याचे नाव काढताच इंग्रजांचा कपाळ-शूळ उठतो.

बिल क्लिंटन सरकारने ॲडाम्सला अमेरिकेत बोलावले, एवढेच नव्हे तर सिनेटमध्ये येऊन निवेदन करण्याचे आमंत्रण दिले. जेरी ॲडाम्स अमेरिकेत गेला; त्याच्या भेटीने आणि निवेदनाने सगळी प्रसिद्धी माध्यमे भरून गेली, वातावरण इतके बदलले, की आयर्लंड प्रकरणी इंग्लंडला माघार घ्यावी लागेल, की काय, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तसे घडल्यास जॉन मेजर यांचे सरकार टिकणे कठीण आहे.

आठवावे लिंकनचे रूप

पूर्वेला जपानपासून पश्चिमेकडे इंग्लंडपर्यंत अमेरिकन राष्ट्राध्यक्ष सगळ्या देशांना चेपीत आहेत. त्यांत मित्र आहेत, अतिप्रेमाचे मित्र आहेत आणि काही

शत्रुत्वाचीही नाती असलेली आहेत, क्लिंटन यांचा आग्रह काही चुकीचा आहे असे म्हणणे कठीण आहे. जगभर खुली व्यवस्था असावी, अण्वस्त्रांवर निर्बंध असावेत, मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे आणि सर्व देशांनी आपल्या शेजारच्या राष्ट्रांशी असलेली प्रादेशिक भांडणे एकदा मिटवून टाकून जगभर शांतता निर्माण करावी, या हेतूंबद्दल फारसा मतभेद नाही. क्लिंटन ज्या तऱ्हेने सरसकट जगभर सगळ्या राष्ट्रांना नाराज करत आहेत त्याने त्यांचा हेतू साध्य होईल की त्यांच्या उद्दिष्टांचा पराभव होईल? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सोवियत युनियन बुडाले अमेरिकेशी तुल्यबळ महासत्ता कोणी नाही म्हणून काय झाले? भारताचे पंतप्रधान राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना वागवतात तसे राष्ट्रप्रमुखांना वागवणे अमेरिकन अध्यक्षांना झेपणारे नाही.

गुलामांच्या प्रश्नावरती अब्राहम लिंकन यांनी अमेरिकन यादवी युद्धाचा धोका स्वीकारला; पण दक्षिणेतील राज्यांचा पराभव झाल्यानंतर उदारता आणि दिलदारपणा असा दाखवला, की सगळे अमेरिकन राष्ट्र पुन्हा एकसंध बनले. रशियाच्या पाडावानंतर क्लिंटन यांच्यावर येऊन पडलेली जबाबदारी लिंकन यांच्याप्रमाणेच ऐतिहासिक आहे. दुर्दैव असे, की आजचे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टनच्या बालपणातल्या कथेचा आदर्श समोर ठेवत आहेत. प्रौढ अब्राहम लिंकनचा नाही, त्यांनी आदर्श जॉर्ज वॉशिंग्टनचा बालपणाचा न ठेवता 'जेटीसबर्गच्या' लिंकनचा ठेवला पाहिजे.

(१८ फेब्रुवारी १९९४)

■■

मतिमंद मुलीवरील शस्त्रक्रियासंबंधी वाद नको होता

इस्पितळातील एक शल्यचिकित्सागृह. गंभीर अवस्थेत असलेला रोगी टेबलावर शल्य शस्त्रक्रियेसाठी ठेवण्यात आला आहे. प्रमुख डॉक्टर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा संच निर्जंतुक हिरवे झगे घालून हातात मोजे चढवून सज्ज झाला आहे. दरवाजाबाहेर चिंताग्रस्त नातेवाईक एकमेकांना धीर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांतली एक तरुण मुलगी सर्व संकोच सोडून डोळ्यातील पाण्याला वाट करून देत आहे.

शल्यचिकित्सा सुरू करण्यासाठी डॉक्टरांनी पहिली सुरी उचलली आणि ते पहिला छेद घेणार एवढ्यात इस्पितळाचे रजिस्ट्रार घाईघाईने थिएटरचा दरवाजा उघडून धापा टाकीत आत आले, "थांबा, हे ऑपरेशन करू नका." शल्यविशारदांना मोठा धक्काच बसला. एरवी गांभीर्य आणि शांततेचा मूर्तिमंत पुतळा म्हणून विख्यात असलेले प्रमुख डॉक्टर; पण त्यांच्या तोंडातून दोन अभद्र अपशब्द निसटले. " ******! तुला म्हणायचे काय?" "आता दिल्लीहून फोन आला आहे, या ऑपरेशनला मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली आहे." रजिस्ट्रारांनी वाक्य कसेबसे पुरे केले. मुख्यमंत्र्यांचे नाव ऐकताच प्रमुख शल्यविशारदांच्या हातातली सुरी गळून पडली. 'बरे झाले,' ते म्हणाले, "ऑपरेशन सुरू होण्याआधी स्थगिती आदेश आला; छेद घेतल्यानंतर हुकूम आला असता तर मोठी पंचाईत." त्यांच्या एका सहकाऱ्याने विचारले, "सर, आता पेशंटचे काय करायचे?" "आता या केससंबंधी पुढच्या सूचना मुख्यमंत्र्यांकडूनच घ्याव्यात," डॉक्टर म्हणाले आणि लांब लांब पावले टाकीत दरवाजा उघडून बाहेर गेले.

मी हरकत घेतो

खिश्चन लग्न सोहळ्यात "या विवाहाला कोणाची हरकत आहे काय?" असा प्रश्न विचारला जातो आणि तत्त्वत: कोणीही हरकत नोंदवू शकतो. फाशीच्या

वेळी शेवटच्या क्षणी माफीचा आदेश आल्याने कैदी वाचतो, असे काही वेळा घडते; पण शस्त्रक्रिया तिऱ्हाइताच्या आदेशाने थांबणे असा विचित्र प्रसंग, आजपर्यंत न घडलेला, असंभव वाटणारा; पण असले प्रसंग यापुढे वारंवार घडू शकतील. मुख्यमंत्री, शासन, सचिव, जिल्हाधिकारी शस्त्रक्रियांना स्थगिती देऊ शकतील. एखाद्या अध्यादेशाने हा अधिकार कोणाही सरकारी अधिकाऱ्याच्या हाती सोपवला जाऊ शकेल. कदाचित कोणत्याही शस्त्रक्रियेला शासनाची परवानगी लागेल; निदान शासनाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' लागेल असे दिसते. पुण्यातील सरकारी इस्पितळात २१ शस्त्रक्रिया काल (म्हणजे ५ ठेब्रु. ९४) पार पाडायच्या ठरलेल्या होत्या. सकाळपासून त्यातील ११ पार पडल्या होत्या. या शस्त्रक्रिया करण्यासाठी मुंबईहून त्यासाठी विशेष तज्ज्ञ डॉक्टर खास बोलावण्यात आले होते. त्यांचे काम चालू होते. एवढ्यात इस्पितळाच्या प्रमुखांच्या घरी दिल्लीहून मुख्यमंत्र्यांचा फोन आला. तो त्यांच्या मुलीने घेतला. प्रमुखांना मुख्यमंत्र्यांचा निरोप पोहोचवण्यात आला, 'शस्त्रक्रिया स्थगित करा.' प्रमुखांनी तो निरोप ऑपरेशन थिएटरपर्यंत पोहोचवला आणि शस्त्रक्रिया स्थगित झाल्या.

स्टॅलिनवर वरताण

शल्यक्रिया करण्याआधी ज्या काही अटी पुऱ्या करायच्या असतात त्या सगळ्या काही पुऱ्या झालेल्या होत्या. डॉक्टरांच्या मते, ऑपरेशन आवश्यक होते. रोगी सज्ञान नसल्यामुळे त्यांच्या पालकांची संमती घेण्यात आली होती. कायद्याप्रमाणे यापलीकडे कुणाचीही संमती घेण्याची आवश्यकता नाही. मुख्यमंत्र्यांची किंवा कोणा सरकारी अधिकाऱ्याची शस्त्रक्रिया करण्याआधी परवानगी घेतली पाहिजे असे आजपर्यंत कुणाला स्वप्नातदेखील वाटले नव्हते. समाजवादाच्या ऐन बहराच्या काळात सोवियत युनियनमध्ये शासनाच्या आदेशावरून राजकीय कैद्यांना मानसिकरीत्या दुर्बल बनवणारी शस्त्रक्रिया केली जात असे, असे ऐकिवात आहे; पण तेथेसुद्धा अगदी स्टॅलिनच्या आदेशानुसार करायची ठरलेली शस्त्रक्रिया स्थगित झाली असे कधी ऐकण्यातदेखील आले नव्हते.

डॉक्टरांच्या मते शस्त्रक्रिया आवश्यक होती, पालकांच्या मते शस्त्रक्रिया आवश्यक होती; पण काही सामाजिक संघटनांचा या शस्त्रक्रियांना विरोध होता. लोकविज्ञान संस्था, महिला आंदोलन संपर्क समिती, मेडिको फ्रेंड सर्कल, सर्व मजदूर संघ, जनवादी संघटना इत्यादी संघटनांनी शस्त्रक्रियांना विरोध केला; एवढेच नव्हे तर निदर्शने करून, चालू असलेल्या शस्त्रक्रियांत वारंवार व्यत्ययही

आणला होता.

विख्यात कम्युनिस्ट कार्यकर्त्या अहिल्या रांगणेकर यांनी दिल्लीला फोन करून मुख्यमंत्र्यांकडून स्थगितीचा आदेश मिळविला.

अपंग पोरींची कहाणी

थोडक्यात या शस्त्रक्रियांचा इतिहास असा– शिरूर (पुणे) येथे मतिमंद मुलींची एक शाळा आहे. स्वत:चे जेवणखाणे तर सोडाच; पण विसर्जन विधीचीही जाण नसलेले हे दुर्दैवी जीव, वयात आल्यानंतर त्यांना आपल्या आरोग्याची आणि स्वच्छतेची काळजी व्यवस्थित घेता येत नाही. शरीर वयात आलेले; पण बुद्धी दोन वर्षांच्या बालकाची... अशी त्यांची स्थिती. त्यामुळे स्वत:च्या शरीराचेदेखील भान नसलेल्या या दुर्दैवी मुलींचे गर्भाशय शस्त्रक्रिया करून काढून टाकण्यात येते. वैद्यकीयदृष्ट्या आणि वैद्यकीय नीतिशास्त्रानुसार या शस्त्रक्रिया योग्य आहेत. सर्व जगभरात याच पद्धतीने शस्त्रक्रिया केल्या जातात, असे डॉक्टरांचे म्हणणे. मतिमंद मुलींच्या अवस्थेचा फायदा नीच प्रवृत्तीच्या लोकांनी घेतल्यास गर्भधारणेचा धोका टाळणे हा या शस्त्रक्रियेचा हेतू नाही या मुलींची स्वच्छतेची काळजी घेणे कठीण आणि त्रासदायक होते, या मुलींवर जनावरचे जिणे जगण्याची वेळ येऊ नये याकरिता हा निर्णय घेण्यात आला. इस्पितळातील अधिकारी आणि महिला बालकल्याण व अपंग विकास संचालनालयाच्या प्रमुख श्रीमती खुल्लर यांची भूमिका त्यांनी स्पष्ट करून सांगितली.

बलुत्याला पशाचं

याउलट सामाजिक संघटनांची भूमिका अशी, की या मुलींच्या दररोजच्या स्वच्छता विधीच्या वेळी काळजी घेता येते, तर महिन्यातून एकदा तीन–चार दिवस आणखी थोडी काळजी घ्यायला काय हरकत आहे? गर्भाशय काढून टाकल्यामुळे या मुलींवर बलात्कार होण्याची शक्यता वाढेल, त्यांना वेगवेगळे रोग होण्याची शक्यता वाढेल इत्यादी. इस्पितळातील सर्व मजदूर संघाने काम कारणे दिली ठाऊक नाही; एखादे ऑपरेशन करणे योग्य आहे किंवा नाही याबद्दल इस्पितळातील सफाई कर्मचाऱ्यांनी शल्यविशारदांना सल्ला दिल्याची इतिहासातील ही पहिली घटना असावी! मुख्यमंत्र्यांनी कोणत्या अधिकाराने स्थगिती दिली? अशा स्थगितीने जे वैद्यकीय दुष्परिणाम होतील त्याची जबाबदारी मुख्यमंत्री स्वीकारणार काय? ते वैद्यकीयदृष्ट्या आणि वैद्यकीय नीतिमत्तेला धरून आहे काय? मेडिकल कौन्सिल शस्त्रक्रिया थांबवल्याबद्दल संबंधित डॉक्टरावर कारवाई करील काय? अनेक प्रश्न उद्‌भवतात.

राजमान्यांची व्यथा

पण या दुर्दैवी घटनेने मतिमंद मुलांच्या प्रश्नाकडे थोडे लक्ष वेधले गेले हे काही कमी नाही. मतिमंद मुलींना आश्रमशाळेत सोडल्यानंतर त्यांची विचारपूस करायला पुष्कळदा त्यांचे जन्मदाते आई–बापदेखील येत नाहीत. आई–बाप आले तर ही पोरे बहुधा त्यांना ओळखूदेखील शकत नाहीत. शस्त्रक्रियेला विरोध करणाऱ्या सामाजिक संस्थांनी या मतिमंद मुलींची विचारपूस कधी पूर्वी केली होती असे नाही आणि त्यांची जबाबदारी घेतो, शस्त्रक्रिया करण्याची काही गरज नाही असेही त्यांनी म्हटले नाही.

योगायोगाची गोष्ट अशी, की पहिल्या पानावर हे प्रकरण गाजत असताना वर्तमानपत्रांच्या आतल्या पानावर एक छोटीशी बातमी आहे. सोलापूरच्या 'जिव्हाळा' या मतिमंद मुलांच्या शाळेचे प्राचार्य अण्णाराव राजमाने यांना त्यांच्या अपंग सेवेबद्दल १९९३ सालचा एक पुरस्कार मिळाला. त्याप्रसंगी राजमाने म्हणाले, 'वर्षानुवर्षे घसाफोड करूनही शासनाने अपंगांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांकडे दुर्लक्ष केले आहे. या मुलांच्या जेवणा–खाण्याचा खर्च शासनाकडून मिळत नाही. शिक्षकांचा पगार मिळत नाही, मतिमंद मुलांचे पालनपोषण ही अतिशय कठीण, जोखमीची कामगिरी. काम करणारे अक्षरश: बेजार होतात. प्रौढ झाल्यानंतर या मुलांचे काय होणार याची मोठी चिंता वाटते."

क्रूरकर्मा ईश्वर

सुप्रसिद्ध पत्रकार अरुण शौरी यांचा मुलगा जन्मजात अपंग आहे. त्यांनी अलीकडे लिहिले, की 'या अपंग मुलांकडे पाहिल्यानंतर विश्वात कोणी सर्वज्ञाता, सर्वशक्तिमान आणि दयाळू परमेश्वर असेल ही कल्पनाच अशक्य वाटते. अशा अजाण अर्भकावर एवढा दुष्ट घाव घालून त्या जगन्नियंत्याला काय आनंद मिळत असेल? त्याचे समर्थन कशानेच होणार नाही." शौरींसारखे अनेक आई–बाप, अपंगांच्या संस्थांना निरलसपणे काम करणाऱ्या सिंधूताई जोशींसारख्या अनेक कार्यकर्त्यां दैवानेच घात केलेल्या या कोवळ्या जिवांचे आयुष्य थोडेतरी सुसह्य करण्यासाठी जिवाचा आकांत करीत असतात. ही मुले कधीकाळी मोठी होतील आणि परिपूर्ण जीवन जगू शकतील याची आशा जवळजवळ शून्य, त्यांना स्वत:ची काळजी स्वत: घेता आली तरी खूप झाले अशी त्यांची काळजी घेणाऱ्याची प्रार्थना असते. मतिमंद जन्मलेल्या मुलींचे तर काय दुर्दैव सांगावे! 'अपंग' आणि 'मुलगी' असे दोन असह्य प्रहार झेलून लुळे पांगळे झालेले हे जीव, कधीकाळी मातृत्वाची जबाबदारी स्वीकारू शकतील ही अपेक्षादेखील

नाही. प्रत्येक प्राणिमात्राच्या आयुष्यात शरीर मोहरून टाकणारी तारुण्याची चाहूल या अभागी जिवांच्या आयुष्यात मोठे बीभत्स रूप घेऊन येते. बुद्ध्यांक ३० टक्केसुद्धा नसलेल्या या मुलींच्या आयुष्यात गर्भाशय काढून टाकल्याने त्यांची निसर्गदत्त कमतरता अधिक वाढणार आहे असे नाही.

खासगीत ढवळाढवळ नको

तरीही हा वादाचा विषय का बनला? कोणत्याही रोग्याच्या बाबतीत उपचारासाठी शस्त्रक्रिया करणे हे केवळ रोगी, पालक आणि डॉक्टर यांनी ठरवायचे असते. वर्तमानपत्रातील प्रसिद्धीसाठी कोणत्याही प्रकरणी विनाकारण नाक खुपसणाऱ्या तथाकथित सामाजिक संस्थांना आणि त्यांच्या म्होरक्यांना या निर्णयात नाक खुपसून ढवळाढवळ करण्याचे काहीच कारण नाही.

'करिअर' महत्त्वाची

या उचापत्यांचा गोंगाट ऐकून मुख्यमंत्र्यांनी शस्त्रक्रियांना स्थगिती द्यावी यात काही आश्चर्य नाही. लोकप्रिय नेते बनण्याचा हा मार्ग आहे अशी त्यांची धारणा आहे. ती चूक आहे असे कोण म्हणेल? आजपर्यंत त्यांना उदंड यश मिळाले आहे. लोकप्रियतेपोटी किंवा उपद्व्यापांचा कल्लोळ थांबवण्यासाठी आपण जे करू त्याचा उद्या काय परिणाम होईल याची चिंता करणारे राजकारणात येत नाहीत आणि राजकारणात उतरलेल्यांना असल्या चिंता स्पर्शच करीत नाही.

या राजकारणी खेळांच्या चक्रात सापडलेल्या अपंग मुली; त्या काही तक्रार करीत नाहीत; यांना काय घडते आहे त्याची काहीच जाण नाही. दैवाने मुलीचा जन्म दिला, वर अपंगत्व दिले आणि आता पुढाऱ्यांच्या खेळात सापडल्या. आश्रमशाळेत अपुऱ्या अस्वच्छ जागेत काळजी घेणारे थोडे अन्नपाण्याचीही चणचण आणि दुष्काळात तेरावा महिना, वयाबरोबर जाण नसले शरीर बंड करून उठू लागले म्हणजे त्यांचे जगणे आणखीनच वेडेबागडे आणि ओंगळवाणे होणार. अकरापैकी दोन मुलींच्या आई–बापांनी या शस्त्रक्रिया झाल्या पाहिजेत असा आग्रह धरला आहे; पण स्वयंप्रतिष्ठित संस्था आणि स्वयंमं मुख्यमंत्री यांच्यापुढे त्यांचे काय चालणार आहे? त्या दुर्दैवी मुलींचे काय होवो, हा प्रश्न नेत्यांच्या 'करिअर'चा आहे.

(२५ फेब्रुवारी १९

अर्थमंत्र्यांनी शेतकरीवर्गाला देशाच्या वेशीबाहेर ठेवले

गावचा मोठा उत्सव असावा, सगळे गाव पताका–तोरणांनी सजलेले असावे, पंगती झडत असाव्यात, अशावेळी आपल्याला शेवटच्या पंगतीचे का होईना बोलवणे येईल अशा आशेने राजवाड्यातल्या माणसाने ताटकळत बसावे तशी स्थिती. अंदाजपत्रकाच्या दिवशी मला या राजवाड्यातील गरीब दलितांप्रमाणेच वाटत होते. दूरदर्शनवरून अंदाजपत्रकाचा सोहळा थाटामाटात दाखवण्याची केवढी प्रचंड जय्यत तयारी करण्यात आली होती. भारतातील सगळे प्रमुख कारखानदार दिल्लीमध्ये CII च्या कचेरीत एकत्र जमले होते. अंदाजपत्रकावरची त्यांची भाष्ये आणि प्रतिक्रिया नोंदण्यासाठी टेलिव्हिजनचा कॅमेरा तेथे सज्ज होऊन बसला होता. मुंबईच्या शेअर बाजारात आणि बंगळूरच्या एका सुपर मार्केटमध्येही अशीच व्यवस्था करण्यात आली होती. परदेशातदेखील हाँगकाँग, लंडन आणि न्यूयॉर्क येथे मान्यवर निष्णातांना खास आमंत्रण देऊन एकत्र केले होते. पाहुण्यांना दूरदर्शनवर वित्तमंत्र्यांना सरळसरळ प्रश्न विचारता यावेत अशी व्यवस्था होती.

७०% जनसंख्या ज्या व्यवसायात आहे त्या शेतीवर पोट भरणाऱ्यांपैकी कोणाला अंदाजपत्रकात काही स्वारस्य असेल, वित्तमंत्र्यांना काही प्रश्न विचारण्याची त्यांनाही इच्छा असेल असे कुणाला वाटले नाही. शेतकरी, अंदाजपत्रकामुळे आनंदी झाला आहे की दुःखी झाला आहे हे विचारण्याची आवश्यकता आहे, असे दूरदर्शनला वाटले नाही.

सारा खेळ 'इंडिया'चा

अंदाजपत्रक म्हणजे थोरामोठ्यांचा खेळ. कारखानदारांना, निर्यातदारांना, आयात करणाऱ्यांना त्यात स्वारस्य. धोतऱ्या शेतकऱ्यांचा त्याच्याशी काय संबंध, असा प्रणव रॉय आणि इतर संयोजकांचा समज असावा.

शेतकऱ्यांकडे दूरदर्शनने दुर्लक्ष केले, त्यात त्याला दोष कसा द्यावा? खुद्द अंदाजपत्रकाच्या भाषणातच वित्तमंत्र्यांनी शेतीला बगल देऊनच आपले सगळे भाषण केले. शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसायची झाली, की त्यांच्यावर स्तुतिपर काव्यांचा वर्षाव करावा म्हणजे तो बिचारा भुलतो आणि फसतो अशी जुनी समजूत आहे. शेतकरी किती थोर, देशाला त्याचे किती महत्त्व, शेतकरी मेला तर जगेल कोण? अशा अर्थाचे इंग्रजी पाठ्यपुस्तकातील कवितेतील दोन तुकडे वित्तमंत्र्यांनी फेकले. यापलीकडे आता शेतीविषयी बोलण्याचे काही राहिले नाही अशा थाटात! अंदाजपत्रकाचे भाषण इंग्रजीत; पण वित्तमंत्र्यांनी अर्ध्या डझनावर उर्दू शेर सुनावले. शेतकऱ्यांविषयी मात्र त्यांना देशी शेर आठवला नाही, इंग्रजी कविता आठवली ही गोष्टही पुष्कळ काही सांगून जाते.

गेल्यावर्षी अर्थमंत्र्यांनी शेतीसंबंधी काही घोषणा केल्या होत्या. निर्यातीच्या शक्यतांचा फायदा घेता यावा यासाठी शेतजमिनीची, निदान व्यवस्थापनासाठी तुकडेबंदी करता यावी असे त्यांनी सुचविले होते. शिवाय, शेतीमालावर प्रक्रिया करण्यात सामान्य शेतकऱ्यांना सहभाग मिळावा यासाठी एक महामंडळ स्थापन करण्याचे त्यांनी जाहीर केले होते. यंदा नवीन काही नाही तर निदान गेल्या वर्षीच्या घोषणांच्या अंमलबजावणीची प्रगती काय झाली याचा तरी आढावा घ्यावा! अर्थमंत्र्यांनी हा सगळा विषय टाळून दिला. समोर बसलेले लोक खुश होतील, निदान त्या दिवसापुरते खुश होतील अशा घोषणा करायच्या, अंमलबजावणी शून्य झाली तरी चालेल हा शरद पवारांचा गुण वित्तमंत्र्यांनीही उचललेला दिसतो. म्हणूनच दिल्लीच्या जागतिक मराठी परिषदेत डॉ. सिंग यांनी पी. व्ही. नरसिंह राव यांच्या बरोबरीने पवारही आपले नेते असल्याचे जाहीर केले होते.

२०० कोटी गटारात

शेतीची सगळ्यांत मोठी गरज कोणती? शेतीला कर्जपुरवठा व्यवस्थित होणे ही वित्तमंत्र्यांच्या मते, सर्वांत महत्त्वाची बाब आहे. त्यासाठी त्यांनी नाबार्ड, ग्रामीण बँका आणि सहकारी बँका यांना सगळ्यांना मिळून १०० कोटी रुपये भांडवल पुरविण्याची तरतूद केली. दुसरे १०० कोटी रुपये रिझर्व्ह बँकेकडून मिळतील असे आश्वासन दिले आणि आपली जबाबदारी संपली असे मानले. २०० कोटी रुपयांची रक्कम ग्रामीण कर्जपुरवठ्याच्या समस्येची व्याप्ती पाहिली तर निव्वळ झाडपाला आहे. शेती म्हणजे तळ नसलेले भांडे आहे. वित्तमंत्र्यांनी त्यात टाकलेले १०० कोटी रुपये केव्हाच नाहीसे होऊन जातील. शेतकऱ्यांना उणे सबसिडी आहे, सरकारी धोरणामुळे शेतकऱ्यांवर एकूण उत्पन्नाच्या ५०

टक्के अप्रत्यक्ष कर बसतो, हे सगळे डंकेल प्रस्तावावरील चर्चेत पुढे आले आहे, सिद्ध झाले आहे. शेती तोट्यात आहे आणि त्याचे कारण सरकारी धोरण आहे हे सर्वमान्य झाल्यानंतर, ही समस्या शेतीतील पतपुरवठा वाढवून सुटेल आणि तोही केवळ दोन-तीनशे कोटींच्या पुरवठ्याने, असे कोणीही जबाबदार माणूस तरी मानणार नाही. खुल्या व्यवस्थेवर विश्वास असलेला कुणीही म्हणेल "शेतीचा प्रश्न सोडविण्यासाठी शेती फायद्याची करूया किंवा निदान शेती तोट्याची व्हावी म्हणून आजपर्यंत जी धोरणे राबवण्यात आली, ती बंद करूया. शेती फायद्याची झाली म्हणजे धनको आपणहून धावत शेतकऱ्यांकडे कर्जाचा पुरवठा घेऊन जातील. त्याकरिता त्यांना धाक दाखवण्याची किंवा सक्ती करण्याची काहीच गरज पडू नये." असे कितीतरी २०० कोटी नेहरू काळात शेतीच्या खाईत गडप झाले आहेत. नव्या जमान्यात अर्थमंत्र्यांनी खुल्या व्यवस्थेस काही अनुरूप उपाययोजना सुचवायला पाहिजे होती. उणे ५० टक्के सबसिडीच्या धोरणापासून गॅट करारात अनुमती असलेल्या अधिक १० टक्के सबसिडीपर्यंत जाण्याचा काही मार्ग दाखविणे आवश्यक होते.

काही रोकडे बोला

वित्तमंत्र्यांना या प्रश्नाची चांगली जाणीव आहे. अंदाजपत्रकानंतर दूरदर्शनवर झालेल्या चर्चेत वाढत्या महागाईसंबंधी त्यांना एक प्रश्न विचारण्यात आला. उत्तरादाखल ते म्हणाले, "महागाई प्रामुख्याने शेतीमालाच्या प्रशासित किमती वाढवल्याने झाली आहे. आजपर्यंत शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेच्या तुलनेने अपुऱ्या किमती मिळाल्या, हा अन्याय दूर करायचा असेल तर शेतीमालाच्या किमती वाढणे अपरिहार्य आहे. या कारणाने महागाई वाढली तरी त्याबद्दल तक्रार असू नये."

मग वित्तमंत्र्यांनी याविषयी ठोस तरतूद का केली नाही? गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकात खतावरील सबसिडीची जी ४००० कोटी रुपयांची तरतूद होती ती कायम ठेवण्यात आली आहे. म्हणजे काही शेतकऱ्यांना लभ्यांश नाही. खतावरील सबसिडीचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही, देशी कारखानदारांना होतो. देशी खत विकत घेण्यापेक्षा परदेशातून खताची आयात केली तर शेतकऱ्यांना टनामागे ३००० रुपये फायदा होईल. खतावर म्हटली जाणारी सबसिडी प्रत्यक्षात खत कारखानदारांना मिळते हेही डंकेल प्रस्तावाच्या संबंधात व्यापार मंत्रालयाने मान्य केले आहे. म्हणजे खतावरील सबसिडी हा काही शेतीतील घाटा दूर करण्याचा मार्ग नाही.

हातापायातील बेड्या काढा

भाषणात वित्तमंत्र्यांनी शेतीमालाच्या देशांतर्गत वाहतुकीवरील बंधने उठवली पाहिजेत, एवढेच नव्हे तर शेतीमालाच्या निर्यातीवरील बंधनेही हटली पाहिजेत अशी आशा व्यक्त केली; पण काही ठोस प्रस्ताव मांडले नाहीत. गेल्या काही महिन्यांत केंद्र शासनाने कापसाच्या निर्यातीवर बंदी घातली. झालेले सौदेसुद्धा रद्द करणे भाग पाडले. दुधाच्या प्रक्रियेवरील आणि उसाच्या मळीच्या व्यापारावरील उठवलेली बंधने पुन्हा लादली. महाराष्ट्रातील शेतकरी कापसाची विक्री शेजारच्या राज्यात करून दोन पैसे जास्त मिळावेत म्हणून प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यावर सरकारी पोलिस लाठी आणि बंदुकीच्या गोळ्या चालवत आहेत. कमी भाव देणाऱ्या गबाळ्या व्यवस्थापनाच्या कारखान्याला ऊस देण्याऐवजी चांगल्या भावाच्या शेजारच्या कारखान्याला ऊस देण्याचा प्रयत्न शेतकरी करतात, त्यांनाही पोलिसांचा असाच जुलूम सहन करावा लागतो. शेतकऱ्यांना आजही त्यांच्या उसाचा गूळ गाळता येत नाही, कापसाची रुई करण्यासाठी गिरणी घालता येत नाही. खुल्या वाहतुकीवरील व निर्यातीवरील बंधने दूर करण्याचा सरकारचा विचार असेल असेही काही दिसत नाही.

थोडे यांच्याकडून शिका

केंद्र शासनाच्या शेतीमाल प्रक्रिया मंत्रालयाने अलीकडेच काही प्रस्ताव मांडले आहेत. शेतीमालाची वाहतूक, उत्पादन आणि व्यापार यावरील सर्व निर्बंध दूर करून, सर्व देशात एकात्म बाजार तयार व्हावा ही या मंत्रालयाची पहिली सूचना आहे. देशातील वेगवेगळ्या शेतीमाल महामंडळांच्या कामकाजामुळे शेतकऱ्यांचेच नुकसान होत आहे, तेव्हा ही महामंडळे रद्द करावीत. आयात निर्यातीतील कॅनलायझेन, कोटा इत्यादी बंधने दूर करावीत. अन्नधान्य महामंडळाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेकरिता खरेदी खुल्या बाजारात करावी. साखर आणि तांदूळ यांवरील सक्तीची वसुली रद्द करावी. खते, औषधे यांवरील निर्बंध दूर करावेत, अशा अनेक सूचना प्रक्रिया मंत्रालयाने केल्या आहेत. अशा तऱ्हेचा कार्यक्रम वित्तमंत्र्यांनी जाहीर का केला नाही? वित्तमंत्र्यांच्या अंदाजपत्रकावरून एक गोष्ट स्पष्ट झाली. खुली व्यवस्था, खुली व्यवस्था म्हणतात ती शेती क्षेत्राला लागू करण्याची सरकारची अजिबात इच्छा नाही. सरकारची खुली व्यवस्था बिगरशेती क्षेत्रालाच लागू आहे. स्वातंत्र्याचे मोकळे वारे शेतकऱ्यांना सोसायचे नाही, अशी शासनाला चिंता असावी. नोकरदारांची मिराशी कमी होऊ नये, कल्याणकारी योजनांच्या वाहत्या गंगेत हात धुऊन

घेण्याची संधी पुढाऱ्यांना मिळालीच पाहिजे, या अटी सांभाळून खुलेपण आणायचे झालेच तर ते शेतीखेरीज बाकीच्या क्षेत्रात; शेतीमात्र नेहरू जमान्यातल्याप्रमाणेच पन्नासवर टक्के तोटा घेऊन चालू राहिली पाहिजे असा सरकारी हेतू आहे, याबद्दल आता शंका घेण्याचे काही कारण नाही.

२८ फेब्रुवारी रोजी दूरदर्शवर अंदाजपत्रकी भाषण करताना दिसले ते व्यासंगी, अनुभवी, अर्थशास्त्री डॉ. मनमोहन सिंग नाहीत; पंतप्रधानांची हुजरेगिरी करणारे, सर्व सिद्धांत बाजूला ठेवून पुढारी थाटाची भाषणे करणारे आणि त्यात रंग आणण्यासाठी शेरोशायरीचा वापर करणारे मनमोहनसिंग, हे मनमोहनसिंग बुटासिंगांपेक्षा काही वेगळे वाटले नाहीत.

(११ मार्च १९९४)

■■

शिवसेनेचे समांतर सरकार!

१९ फेब्रुवारी १९९४ रोजी स्वत:ला हिंदूंच्या हृदयाचे सम्राट म्हणवणाऱ्या बाळ ठाकरे यांनी औरंगाबाद येथे पत्रकारांना बेदम मारझोड करवली. त्यामुळे बरीचशी खळबळ उडाली. स्थानिक पत्रकारांनी निषेध केला, मोर्चे काढले, शिवसेनेच्या कार्यक्रमांवर बहिष्कार जाहीर केले. मागे 'महानगर' सायंदैनिकावरील हल्ल्याच्यावेळी दिल्लीची वरिष्ठ पत्रकार मंडळी सेनाभवनासमोर धरणे धरण्यासाठी येऊन बसली होती. या वेळी तशी कोणी आली नाहीत. राज्यसभेत ठाकऱ्यांच्या अटकेची मागणी झाली. सी.बी.आय. सर्व प्रकरणी चौकशी करणार असल्याचेही जाहीर झाले. एका व्यंगचित्रकाराने 'अय्या! कम्माल म्हणजे कम्माल आहे सी.बी.आय.च्या धाडसाची!' असे कौतुकही जाहीर केले.

पवार कुलरीती

मुख्यमंत्र्यांनी ठाकऱ्यांना चार दिवसांत अटक होईल अशी घोषणा केली, तेव्हा अटकबिटक काही होणार नाही, हे सर्व जनतेस स्पष्ट झाले. 'प्राण जाँही पर वचन न राखी' ही 'पवार कुलरीती' चालत आली आहे आणि चालत राहणार आहे हे सर्वश्रुत आहे. बाळासाहेब ठाकऱ्यांना चार दिवसांत अटक झाली नाही. 'आठ दिवसात नक्की होईल' असे मुख्यमंत्री म्हणाले. आजमितीस दोन आठवडे उलटले. या वेळी पोलिसांनी ठाकऱ्यांविरुद्ध निदान तक्रार अर्ज दाखल केला म्हणजे मोठी बहादुरी झाली.

ठाकऱ्यांना अटक करता आली नाही म्हणून मुख्यमंत्र्यांनी दु:ख करण्याचे काही कारण नाही! जी गोष्ट केवळ अशक्य कोटीतील आहे ती घडवता न आल्याबद्दल दु:ख करणे निरर्थक आहे? 'शस्त्रेण रक्ष्यं यद अशक्य रक्ष्यं! न तद् यश: शस्त्रभृताम् हिनोति!! हा सल्ला दिलीप राजाच्या गायीचे भक्ष्य करू इच्छिणाऱ्या सिंहाने दिलेलाच आहे.

बेनझीर भुत्तोंना अटक करता?

पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी हिंदुस्थानविरुद्ध अलीकडे कितीतरी दुष्ट विधाने केली. त्यांचा निषेध झाला; पण बेनझीरबाईंना अटक करण्याची भाषा झाली नाही, कारण हिंदुस्थानातील कायदे कानून त्यांना लागू नाहीत. दुसऱ्या एका सार्वभौम समांतर सत्तेच्या त्या अधिपती आहेत, त्यांना अटक करण्याची मागणी करण्यात काय अर्थ आहे? पाकिस्तानविरुद्ध युद्ध करून, त्याचे सार्वभौमत्व नष्ट केले तर बेनझीर बाईंवर कारवाई करता येईल, अन्यथा नाही. तसे ठाकरे एका समांतर सत्तेचे अधिपती आहेत. त्यांना अटक करण्याची कल्पनाच सेनेचे समांतर सार्वभौमत्व शिल्लक असेपर्यंत, मुळात खुळचट आहे.

ठाकरे समांतर शासनाचे प्रमुख आहेत

समांतर शासनाविषयी फारसे बोलले जात नाही, समांतर अर्थव्यवस्थेची चर्चा अनेकवेळा होते. राष्ट्रीय उत्पन्न आणि समांतर अर्थव्यवस्थेतील उलाढाली यात वरचढ कोण? याचीही चर्चा चालते. समांतर अर्थव्यवस्था म्हणजे दिवाभिताप्रमाणे जगणाऱ्या लोकांचे लपूनछपून होणारे व्यवहार ही कल्पना खरी नाही. समांतर अर्थव्यवस्थेचे स्वत:चे एक राष्ट्र आहे, शासन आहे, व्यवस्था आहे, न्यायव्यवस्था आहे. तेथील माणसे मोठ्या थाटात फिरतात, वावरतात. समांतर शासनव्यवस्था अधिकृत सरकारी व्यवस्थेपेक्षा कमी कोठेच नाही, वरचढ अनेक बाबतींत आहे. ठाकरे अशा एका समांतर शासनाचे प्रमुख आहेत. बेनझीर भुत्तोंना जशी अटक करता येत नाही तसाच ठाकऱ्यांनाही हात लावता येणार नाही.

सर्वंकष सेनाशासन

समांतर शासनाच्या सामर्थ्याची आणि सत्तेची झलक मोठ्या अचानकपणे पाहायला मिळाली. मुंबईमधील एका छापखान्यात काही किरकोळ छपाईचे काम करून घेतले. छपाई झाली आहे असा निरोप मिळाल्यावर गठ्ठे ताब्यात घेण्याकरिता मी स्वत: गेलो, सगळे मिळून सहा छोटे गठ्ठे मी आणि माझ्या दोन सहकाऱ्यांनी एकाच फेरीत उचलून गाडीत ठेवले आणि छपाईचे बिल चुकविण्याकरिता मॅनेजर साहेबांच्या खोलीत परत आलो. खोलीतील वातावरण अगदी गरम. मॅनेजरसाहेबांसमोर पहिलवानी बांधाचा, भरघोस मिशावाला, कपाळावर शेंदूर किंवा केशरउटी लावलेला, गळ्यात भगव्या रंगाचा पटका असा एक बलदंड असामी मॅनेजर साहेबांकडे बोट रोखून तावातावाने बोलत होता,

"या साहेबांना गठ्ठे उचलून घेऊन जाताना आम्ही स्वत: पाहिले आहे, मग

आमच्या लोकांची पोटे भरायची कशी? आयटेम मागे ८ रुपये म्हणजे ४८ रुपये मजदूर सेनेच्या लोकांचे बुडाले का नाही? कशी पोटे भरावी गरिबांनी?"

आमच्यावरून काही झगडा चालू आहे हे लक्षात आले; पण झगड्याचा विषय काही समजला नाही. मॅनेजरसाहेबांनी अजिजीने म्हटले, "बाळासाहेब जाऊ द्या, चूक झाली म्हणतो ना, तुमच्या माणसांनी गठ्ठे उचलले नाहीत, तरीही त्यांना कंपनी ४८ रुपये देऊन टाकेल. मग तर झाले ना!"

"मॅनेजरसाहेब कुणाच्या तोंडावर ४८ रुपये फेकता आहात? प्रश्न पैशाचा नाही, प्रतिष्ठेचा आहे. छापखान्यात महिन्यापूर्वी कागद कापायचे नवीन यंत्र मालकांनी बसवले, झटक्यात तीन माणसांचा रोजगार गेला. प्रश्न रोजगाराचा नाही हो. आमच्या सेनेची परवानगी न घेता तुम्ही यंत्र आणलेच कसे? त्या यंत्रावर आमच्या सेनेची वर्गणीसुद्धा चुकवलेली नाही."

"पण कोणा कामगाराला आम्ही कमी केलेले नाही." मॅनेजरसाहेब अगदीच काकळतीला आलेले.

"तरीपण तीन माणसांची नवीन भरती झाली असती, ती राहिली की नाही? बरं. भरती नाही केली तर नाही केली; पण प्रत्येक भरतीपोटी सेनेचा नजराणा चुकवला नाही, त्याचे काय? हे ४८ रुपये मजुरांना आणि कटिंग मशीनची वर्गणी ३००० रुपये सेनेला द्यावे लागतील. मॅनेजर साहेब, या भागात छापखाना चालवायचा असेल तर सरळ वाटेने चालायला लागेल, नाहीतर सगळा छापखाना कुठे जाईल समजायचंदेखील नाही." सेनेचे स्थानिक प्रमुख दरवाजा धाडकन आपटून बाहेर गेले. मॅनेजरसाहेब काहीच बोलले नाहीत. मी म्हटले, "माफ करा, मला माहिती असती तर आम्ही गठ्ठे उचलले नसते."

"तुमचा काही संबंध नाही हो! सेनाप्रमुखांची ही नियतकालिक भेट आहे. आज त्यांच्या भेटीच्या वेळी तुम्ही येथे होता हा अपघात म्हणायचा. नाहीतर, नोकरदार किती ठेवायचे? त्यांचे पगार काय द्यायचे? विशेषत: हमालीचा दर काय? हे सगळं बाळासाहेबच सांगतात. ते सांगतील ते ऐकण्यापलीकडे काही गत्यंतरच नाही. बाळासाहेबांच्या विरुद्ध तक्रार करायला कोणती पोलिस चौकी नाही आणि त्यांना पकडण्याची हिंमत करील अशी कुणाची माय व्यालेली नाही!"

राज्य करणारे शासन ते एवढेच

कोणाही व्यापाऱ्याकडे, कारखानदारांकडे इन्स्पेक्टर किंवा दुसरे अधिकारी येतात. बांधलेले हप्ते घेऊन जातात. हप्ते चुकवले गेले नाहीतर तर मालकाला

कचाट्यात पकडून 'त्राही भगवान' करून टाकतात. 'इन्स्पेक्टर राज' नावाने ही व्यवस्था गाजली आहे; पण एक बिनसरकारी 'समांतर इन्स्पेक्टर राज' भरभक्कम प्रस्थापित झाले आहे, याची आज कल्पना आली. सेनेच्या संमतीशिवाय इकडची काडी तिकडे हलत नाही. दुकान चालवायचे असेल, सेनेला खुश ठेवायला पाहिजे. कारखाना चालवायचा असेल, सेनेकडे जा. भाडेकरू वर्षानुवर्षे जागा खाली करून देत नाही, सेनेस शरण जा. सिनेमा चालवायचा आहे, सेनेला खुश करा. कामधंदा पाहिजे असेल, सेनेकडे जा. अमेरिकेतल्या 'माफिया'चा हा देशी अवतार आहे! तेथल्याप्रमाणेच येथे खरे राज्य चालते हे 'गॉडफादर'चे, मुख्यमंत्री कोणीही असो.

हिंदू गॉडफादरचा माफिया

गॉडफादरने ठरवले तर कोट्यवधी रुपये खर्चून काढलेल्या सिनेमाची रिळे खोक्यातच पडून राहतात. कोणा कलाकारावर गॉडफादरची खप्पा मर्जी झाली तर यच्चयावत कलाकृती बासनात बांधून ठेवून उपाशीपोटी फिरण्याची त्याच्यावर पाळी येते. गॉडफादरचे फर्मान निघाले तर आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने रद्द करावे लागतात. गॉडफादरने थोडासा इशारा देण्याचा अवकाश की स्टेडियम ध्वस्त होते, पत्रकारांची पिटाई होते. गॉडफादर काय वाट्टेल ते जाहीररीत्या बोलू शकतात, मायबहिणींची, पत्रकारांची बेअब्रू करू शकतात, वर्तमानपत्रांच्या होळ्या करू शकतात, मुंबईसारखे शहर दंगे–घातपात– अत्याचार यांनी जेरीस आणू शकतात.

जोवरी न देखील वाघमुखा

मुख्यमंत्री काय करतात बिचारे! औरंगाबादला पत्रकारांची खुलेआम पिटाई झाली. असले प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत अशी रणगर्जना मुख्यमंत्र्यांनी पहिल्या दिवशी केली. गॉडफादरना चार दिवसांत अटक करू अशी ललकारी दिली. गॉडफादर त्यामुळे घाबरले नाहीत. त्यांनी उलट बेगुमानपणे लोकसत्ता, टाइम्ससारख्या मातब्बर वर्तमानपत्रांच्या होळ्या करण्याचे फर्मान काढले. मुख्यमंत्र्यांच्या पोलिसांची हिंमत फक्त गॉडफादरवर खटला दाखल करण्याची झाली. तो खटला सुनावणीस यायचा कधी? त्याचा निकाल लागायचा कधी? हे गॉडफादरच जाणे!

नागव्याला पाहणाऱ्याने लाजावे

बाळासाहेब ठाकऱ्यांनी काहीही केले तरी त्यांना पकडण्याची किंवा त्यांच्यावर कारवाई करण्याची सरकारची हिंमत होत नाही. कारण काय? 'नंगे को खुदा

डरे' अशी एक समजूत आहे. कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळून कोणी फिरू लागला तर पाहणाऱ्याने लाजावे असा शिष्टाचार मुख्यमंत्री पाळत आहेत, अशी आणखी एक कल्पना आहे. नामांतर प्रश्नावर सगळ्या मराठवाड्याला लष्करी छावणीचे रूप देणाऱ्या मुख्यमंत्र्यांना, बाळासाहेबांच्या अटकेनंतर दंगे झाले तर ते आटोक्यात आणता येणार नाहीत हे काही खरे नाही. लष्कराला भिंद्रानवालेंचा बंदोबस्त करता आला, मग कलानगर हे काही अकाल तख्तापेक्षा कठीण रणक्षेत्र नाही. आणखीन एक जनापवाद आहे. बाळासाहेबांविरुद्ध हात उचलण्याची मुख्यमंत्र्यांची हिंमत होत नाही. बाळासाहेबांनी नुसते तोंड उघडले तर दिल्लीच्या सिंहासनाकडे पाहून तोंडाला पाणी सुटलेल्या मुख्यमंत्र्यांना साधे जगणे मुश्कील होईल.

ठाकऱ्यांची मुख्यमंत्र्यांना धास्ती वाटते

१९७९ मध्ये निवडणूक प्रचारात मुख्यमंत्र्यांनी म्हटले होते, 'विरोधकां'ना तात्पुरते तुरुंगातून सोडले आहे, कारण तुरुंगाची डागडुजी चालू आहे. बाळासाहेबांनी मौन सोडले तर डागडुजी करून सज्ज झालेला येरवड्याचा तुरुंग आपली दारे उघडील. बाळासाहेबांना अटक आणि शिक्षा काही महिना, दोन महिन्यांची होईल, मुख्यमंत्री किती काळ आत बसतील ते सांगता येत नाही, अशा धास्तीने मुख्यमंत्री ठाकऱ्यांविरुद्ध कारवाई करत नसावेत असा पुष्कळांचा तर्क आहे.

शिवसेना परराष्ट्र खात्याच्या अखत्यारीत

ठाकरेंना अटक करण्याची मुख्यमंत्र्यांना हिंमत होत नाही याचे खरे कारण वेगळे आहे. रक्त, घाम सिंचून पिकवलेल्या कापसाला दोन पैसे जास्त मिळावे म्हणून शेतकरी राज्याची सरहद्द ओलांडायला निघाला तर हजारो शिपायांची फौज अमरावती, अकोल्याला उतरवणारे मुख्यमंत्री, बाळासाहेबांसमोर हातपाय गाळून बसतात. याचे कारण मुंबईच्या छापखान्यातील घटनेत स्पष्ट झाले, शिवसेना हा पक्ष नाही, शिवसेना ही माफिया सरकार आहे. त्यांचे समांतर सरकार घट्ट, मजबूत, सर्वदूर प्रस्थापित झालेले आहे. बाळासाहेबांना अटक करायची म्हणजे दोन समांतर सरकारांतील युद्धप्रसंग आहे आणि असले युद्ध उभे करणे मुख्यमंत्र्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला परवडणारे नाही.

(१७ मार्च १९९४)

उद्योगी टोळ आणि आळशी मुंगी

काट्यांनो, सकाळपासून संध्याकाळपर्यंत नुसते हुंदडत असता, काही अभ्यास वगैरे कराल की नाही? पुढे काय भिका मागायच्या आहेत काय? खेळून काय पोट भरणार आहे?"

माझ्या पिढीतल्या अनेकांच्या बालपणातील सगळ्या आठवणी आईबापांच्या असल्या वाक्‌ताडनाने झाकळलेल्या आहेत.

"चांगली मुले अभ्यास करतात, परीक्षेत पास होतात, नाव कमावतात, पैसा कमावतात, घराण्याचे नाव उज्ज्वल करतात; उंडगी मुले हुंदडण्यात वेळ घालवतात, परीक्षेत नापास होतात, आयुष्याची धुळधाण करून घेतात."

अशा बोधवाक्यांबरोबर 'मुंगी आणि टोळ' ही जगातील सगळ्या देशांत सगळ्या भाषांत सांगितली गेलेली 'उद्योगप्रशंसा' आणि 'उताडनिंदा' करणारी कथा वारंवार ऐकावी लागे. मुंगीने वर्षभर कष्ट करून धान्याची बेगमी केली, टोळ मात्र वर्षभर टोळभैरवी करत राहिला; पावसाळा आल्यावर त्याला मुंगीकडे मदत मागण्यासाठी जावे लागले आणि मुंगीने त्याची याचना झिडकारून त्याला हाकून लावले, टोळ भुकेने, थंडीने मरून गेला, अशी ही थोडक्यात कथा.

वडीलधाऱ्यांच्या या सतत बोलण्याने चार धूर्तांशी गाठ पडलेल्या ब्राह्मणासारखी मुलांची स्थिती व्हायची. खांद्यावरील कोकरू कुत्रेच असले पाहिजे असे चौघांच्या सतत सांगण्यावरून पटलेला ब्राह्मण कोकरू टाकून देतो, त्याप्रमाणे आम्ही खेळ टाकून अभ्यासाच्या मागे लागलो.

स्वादु हितंच दुर्लभम्

खेळताना आनंद वाटतो; अभ्यास करताना कष्टदायी वाटते, नको नकोसे वाटते. त्याअर्थी खेळ हा विनाशकारी असला पाहिजे अणि अभ्यास अंततोगत्वा हितकारी असला पाहिजे असा वडीलधाऱ्या मंडळींचा निष्कर्ष असे. औषध

कधी गोड असत नाही; जे कठोर क्लेशदायक तेच अंती फायद्याचे अशी आत्मक्लेशवादी नीतिमत्ता घरी आईबाप, शाळेत गुरुजन आणि पुस्तकात सानेगुरुजींपासून सर्व थोरथोर मंडळी निक्षून सांगत असत.

मुंगीच्या उद्योगप्रियतेचा मला मनापासून तिटकारा येई. या एका मुंगीमुळे खेळण्याबागडण्याचा सगळा आनंदच कोमेजून जातो. ही मुंगीसुद्धा जर टोळाप्रमाणे गंमत करत फिरली असती तर तिचे उदाहरण देऊन वडीलधाऱ्या मंडळींना आपल्याला बोलताच आले नसते, असे वाटे.

आत्मक्लेशाचे तत्त्वज्ञान

खेळण्याऐवजी घरात येऊन वाचायला बसले तरी 'आत्मपीडा म्हणजेच कल्याण' या बोधतत्त्वाचा ससेमिरा चुकत नसे. काय वाचतो आहे याकडे मोठ्या मंडळींचे बारकाईने लक्ष असे. गणित, पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, भूगोल असले काही नीरस पुस्तक समोर घेऊन बसलेला मुलगा गुणी, शहाणा आणि आदर्श. इतिहासाचे पुस्तक काढले याचा अर्थ त्यातले त्यात 'कथा रम्या' वाचून करमणूक करण्याचा प्रयत्न चालला आहे असा गंभीर आरोप येई. मराठीचे धडे वाचणे म्हणजे तर अभ्यासाच्या नावाने निव्वळ फसवणूक. 'किती माझा कोंबडा हो शहाणा' अशी कविता म्हटली म्हणजे तो उनाडपणा. त्याबरोबर 'कोंबडा म्हणजे पक्षिविशेष' असे निरर्थक आणि न समजणारे पाठांतर केले म्हणजे 'पोरगे अगदीच काही कामातून गेलेले नाही', अशी थोड्याफार संतोषाची छटा आईबापांच्या चेहऱ्यावर उठे. इंग्रजीच्या अभ्यासाला मोठा मान होता. इंग्रजी वाचतो म्हणजे 'पोरगा नाव काढणार' अशी प्रशस्ती होई. त्यामुळे गोड गोष्टी वाचणारा मुलगा उनाड अशी निर्भर्त्सना आणि इंग्रजीतील परीकथा वाचणारा मुलगा अभ्यासू अशी वाखाणणी होत असे.

आमच्या काळी चिंतामणी द्वारकानाथ देशमुख (आय.सी.एस.) रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर (निवृत्तीनंतर भारताचे अर्थमंत्री) यांचे मोठे कौतुक होते. मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांनी ९०% मार्क मिळवून उच्चांक स्थापला होता. तो आमच्या काळापर्यंत तरी कोणी मोडला नव्हता. मॅट्रिकच्या परीक्षेतील त्यांच्या देदीप्यमान यशावर खुद्द गोविंदाग्रजांनी एक लांबलचक कविता लिहिली होती. सी. डी. देशमुख म्हणजे कुलभूषण; 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा तिन्ही लोकी झेंडा' मुंगीप्रमाणेच देशमुखांच्या उदाहरणाने आमचे लहानपण खूपच खराब केले. या बाळाने कधीकाळी म्हटले म्हणे, "आवडणारी गोष्ट कोणीही करेल न आवडणारी गोष्ट करून दाखवण्यातच मोठेपणा आहे."

आजकाल मुलाची आवडनिवड काय आहे, त्याचा कल कोणीकडे आहे ते पाहून त्याने कोणता अभ्यासक्रम घ्यावा ते ठरवावे, त्यासाठी त्याच्या सुप्त आवडीनिवडी शोधून काढून सल्ला देण्यासाठी तज्ज्ञ मंडळी असतात. आमच्या काळी व्यावसायिक मार्गदर्शकाची भूमिका आईबापेच करीत; पण आवडीनिवडी पाहण्याऐवजी ते पोराला सगळ्यांत न आवडणारा विषय कोणता आहे हे बरोबर शोधून काढीत. या अभ्यासक्रमात पोराला सर्वांत अधिक क्लेश होतील असे चोख आडाखे बांधून पोराला तिकडे ढकलीत. मनाचा सहज कल वाईट गोष्टींकडे असतो, मन मारणे यासारखा पुरुषार्थ नाही हा आमच्या बालपणीचा सगळ्यांत मोठा कित्ता होता.

मार्क ट्वेनकृत मुंगीचे मूर्तिभंजन

हाती सहज लागलेले मार्क ट्वेनच्या गोष्टींचे पुस्तक एकदा वाचले. इंग्रजी असल्यामुळे वाचण्यास मनाई नव्हती. मार्क ट्वेनचाही मुंग्यांवर मोठा राग. तो म्हणतो, मुंग्या मुळात कष्टाळु आणि उद्योगप्रिय असतात हीच एक प्रचंड थाप आहे. मुंग्याही उनाड असतात. उद्योगी असल्याची बतावणी करण्यात त्या मोठ्या हुशार असतात, एवढेच. विशेषत: आपल्या हालचाली कोणीतरी बारकाईने पाहतो आहे. पाहणारा तोंडावरून कवी वगैरे असण्याची शक्यता आहे असे लक्षात आले, की त्या आपण मोठे कामात असल्याचे नाटक करतात. गवताची एखादी काडी, नाकतोड्याचा तुटून पडलेला पाय अशी एखादी निरुपयोगी वस्तू उचलून घराकडे नेण्याच्या धडपडीत आहोत असे ढोंग करतात. मुंग्यांच्या आकारमानाच्या तुलनेने पाहिले तर माणसाने खांद्यावरून हत्ती नेण्याचा प्रयत्न करावा अशातला हा प्रकार. थोडावेळ कष्टाचे नाटक केल्यावर मुंगी मदतीकरिता मैत्रीण शोधून आणते. दोघी मिळून काही वेळा विरुद्ध बाजूंना ओढण्याचा खटाटोप करतात. निरीक्षक कवीला काही कंटाळा येत नाही असे लक्षात आल्यावर काही वेळाने नाकतोड्याची तंगडी मुळात जिथे पडली होती त्याच्या आसपासच सोडून दोघी चालत्या होतात...

मार्क ट्वेनने केलेले हे मुंगीचे मूर्तिभंजन वाचताच खांद्यावरचे मणामणाचे ओझे दूर झाल्याचा आनंद झाला; पण कोणा वडीलधाऱ्यांना मुंगीच्या ढोंगीपणाची कहाणी सांगण्याचा प्रयत्न करणेही धोक्याचे झाले असते. मुलगा अगदीच वाया गेला अशी टीका टिप्पणी ऐकावी लागली असती.

टोळांची भरभराट

आता परिस्थिती अगदीच उलटी झाली आहे. क्रिकेट, टेनिस अशा खेळांमध्ये

जागतिक प्रावीण्य मिळवणारे खेळाडू एका एका स्पर्धेत कोटी कोटी रुपये मिळवतात असे ऐकले किंवा वाचले, की मीही हबकून जातो. खेळण्याबद्दल आपली पोटापुरती भाजीभाकरी मिळावी इतपत ठीक आहे; पण वर्षानुवर्षे कष्ट करून विद्याभ्यास करणाऱ्या हुशार कष्टाळू विद्यार्थ्यांपेक्षा खेळाडूंना शेकडोपट उत्पन्न मिळावे, त्यांचे नाव व्हावे आणि सन्मानही व्हावा हे अद्‌भुत वाटते.

आधुनिक घरात आमच्या लहानपणच्या घरच्यापेक्षा अगदी वेगळ्या प्रकारचे नाटक घडत असले पाहिजे. मुलगा खोलीत वाचत बसला आहे, बाप घरी येतो आणि मुलाला म्हणतो, "अरे, तू घरात वाचत काय बसला आहेस? बाहेर जा टेनिस खेळ. अरे, त्या सांप्रासचे काही आदर्श समोर ठेव, निदान विजय अमृतराजचा. तो बघ कांबळी, काय नाव कमावतो आहे! तुला लेका आम्ही सर्व काही संधी आणि पाहिजे ती साधने द्यायला तयार आहोत, तू खेळत का नाहीस. अभ्यास करून तुला काय मिळणार आहे." आणि मुलगा म्हणतो "बाबा भूमितीचे एवढे प्रमेय सोडवतो आणि मग पाहिजे तर खेळायला जातो."

नव्या युगातील टोळ

तुमच्या वर्षभराच्या, कसेबसे उभे राहू लागलेल्या, मुलाने नाव रोशन करावे असे वाटत असेल तर आतापासून त्याच्या हाती क्रिकेटची बॅट द्या, टेनिसची रॅकेट द्या. तो जलतरणपटू व्हावे असे वाटत असेल तर त्याला बिनधास्त पाण्यात सोडून द्या.

खेळ ही करिअर! आनंदही आणि पैसाही! त्यावर आणखी प्रसिद्धीचा झोत आणि कीर्तीचा लखलखाट! आमचे उंडगणे आणि आजच्या शिखरावरील खेळाडूंची खेळात कशलता साधण्याकरिता केलेली तपस्या यात जमीन-अस्मानचा फरक आहे, हे चांगले समजते आणि उमजते. पंचपंच उष:काली उठून थंड पाण्याने स्नान करून योगाभ्यासाला लागणाऱ्या महामुनीपेक्षा शरीरसौष्ठव आणि बांधेसूदपणा टिकविण्यासाठी चित्रपटातील आधुनिक चटकचांदणीचे प्रयास अधिक खडतर आहेत हे समजूनही जुन्या नैतिकतेत घडलेल्या मनाला काहीतरी चुकते आहे असे वाटते.

जागतिक पातळीवर पटुता मिळवण्याकरिता लागणारे कष्ट कितीही कठोर असोत, शेवटी खेळ तो खेळ आणि अभ्यास तो अभ्यास असे वाटत राहते.

जया अंगी टोळपण

मग एकदम एक घटना घडली. स्टेफी ग्राफ सर्वोच्च मानांकित टेनिस खेळाडू या पदावर चढावी यासाठी तिच्या एका भक्ताने अग्रणी खेळाडू मोनिका

सेलेस हिच्यावर भर क्रीडांगणावर टेलिव्हिजनच्या कॅमेऱ्यासमोर चाकूहल्ला केला. मोनिका अजूनही हल्ल्याच्या जखमेतून सावरलेली नाही, स्टेफी ग्राफ सर्वोच्च खेळाडू बनली आहे. मोनिकाचे नाव जवळजवळ ऐकू येत नाही.

लिलहॅमर येथे बर्फावरील खेळांच्या आलिंपिक स्पर्धा चालू आहेत. अमेरिकन संघाच्या निवडीच्या वेळी बर्फावरील नृत्यातील अमेरिकन निष्णात नर्तिका नॅन्सी करीगन हिच्यावर हल्ला झाला. अमेरिकेतील तिची स्पर्धक नर्तिका टोनिया हार्डिंग आणि तिच्या मित्रांनी अमेरिकेच्या ऑलिंपिक संघात स्थान मिळावे म्हणून हा हल्ला ठरवून केला असा कबुलीजबाब टोनियाच्या घटस्फोटीत नवऱ्याने दिला.

तया यातना कठीण

खेळ म्हणजे नुसती गंमत नाही. खेळ म्हणजे प्रचंड प्रयास, कष्ट, व्यायाम. खेळातील खेळपण नष्ट व्हावे इतका देहदंड. स्पर्धेत बक्षिसापोटी सोन्याच्या राशी असतील; पण स्पर्धा इतकी जिवघेणी की शिखरावर वर्ष-सहा महिनेदेखील टिकून राहणे कठीण. व्यावसायिक आंतरराष्ट्रीय खेळ आणि आमचे लहानपणचे उंडगणे यातला फरक या दोन हल्ल्याच्या घटनांनी चटकन मनावर बिंबला आणि पटले, की खेळाडूंना मिळणारी प्रसिद्धी आणि धनराशी यातील कण अन् कण घाम, रक्त आणि अश्रू यांच्या थेंबाथेंबांनी कमावलेला आहे.

मुंग्यांचे उदरभरण सुलभ झाले आहे, टोळांचे बागडणे असे थाटाचे झाले आहे की त्यासाठी त्यांना मोठे सायास करावे लागतात.

(१८ मार्च १९९४)

■■

'बॉम्बे क्लब'चे सपाट मैदान आणि वाकडे अंगण

लहानपणच्या शालेय पाठ्यपुस्तकातून राघू–मैनेची एक गोष्ट होती. मराठी दुसरी–तिसरीच्या वयात, 'पुरुष जात तेवढी निमकहराम' असा निष्कर्ष काढणारा धडा देण्यात संपादकांचा आणि शाळा खात्याचा काय हेतू असेल तो आजदेखील उमजत नाही. त्यावेळीदेखील हा धडा काही इतर वेच्यांपेक्षा वेगळा आहे, विचित्र आहे याची कुठेतरी अंधुकशी जाणीव भासत होती.

राघू–मैनेच्या गोष्टीचा थोडक्यात सारांश असा: संध्याकाळी राघू घरट्यात परत येतो आणि त्याला मिळालेले खाद्य लपवून ठेवून, मैनेला विचारतो, 'आतले पाहिजे की बाहेरच?' मैना बिचारी भोळी, ती मागते आतले. राघू दडवलेली खारीक काढतो, वरचा गोड गर खाऊन टाकतो आणि मैनेच्या अंगावर आतले बी फेकून देतो. मैना बिचारी उपाशीपोटी त्या खारकेच्या बीशी झेलझेल खेळत राहते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी राघू पुन्हा तोच प्रश्न विचारतो, 'आतले की बाहेरचे?' आदल्या दिवसाच्या अनुभवाने शहाणी झालेली मैना या वेळी बाहेरचे मागते. राघू हसत–हसत बदाम काढतो, तो फोडून बाहेरचे कवच मैनेकडे देतो आणि आतले बदाम बी खाऊन टाकतो. तिसऱ्या दिवशीही हीच कथा. आतले मागितले तरी आपण फसतो, बाहेरचे मागितले तरी तीच स्थिती, या अनुभवाने शहाणी झालेली मैना उत्तर देते, 'आतले नको आणि बाहेरचे नको; मला मधले द्या.' राघू दडवलेला जरदाळू काढतो वरचा गर काढून स्वत:कडे ठेवतो, मधले बी फोडून कवच तेवढे मैनेकडे फेकतो आणि गर्भातला गर पुन्हा स्वत:च मटकावतो.

स्त्री–मुक्तीवाल्यांचा संदेश पोचविण्यासाठी या गोष्टीचा खरे म्हटले तर फारसा उपयोग नाही. शहरी मध्यमवर्गीय महिलांप्रमाणे पक्षिणी नवऱ्याने आणलेल्या मिळकतीवर जगत नाहीत. तेव्हा मैनेची स्थिती राघूने फसवले म्हणून उपाशीपोटी

राहण्याची होत नाही. गोष्टीतील राघूही मोठा विचित्र. त्याच्या मनात सगळी कमाई स्वत:च मटकावण्याचे होते, तर दररोज 'आतले की बाहेरचे?' अशी पसंती विचारण्याची त्याला काही आवश्यकता नव्हती. सगळे मिळालेले खाद्य फस्त करून तो घरी आला नसता तरी मैने धुंडून आणलेल्या खाद्याचा थोडा तरी वाटा त्याला हडप करता आलाच असता. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा. तीनही दिवसांच्या खेळात मैना हरली असा योगायोग अपघाताने ठारसा संभवत नाही. खारीक, बदाम, जरदाळू असा तीनही प्रकारचा सुका मेवा राघूजवळ असला पाहिजे आणि मैनेच्या उत्तराच्या अनुरोधाने स्वत:ला सोयीस्कर अशी चीज तो बाहेर काढत असला पाहिजे.

'बॉम्बे क्लब'चा राघू

स्त्रियांच्या अवस्थेचे रूपक म्हणून ही कथा निरर्थक आहे. मग या गोष्टीचा अर्थ तरी काय? फारसे स्पष्ट होत नव्हते; पण महिन्यापूर्वी डोक्यात लखकन प्रकाश पडला आणि राघू–मैनेच्या कथेचा काहीसा खोल आणि व्यापक अर्थ लागू लागला.

मुंबई 'बॉम्बे क्लब' हे नाव अलीकडे गाजत आहे. क्लब म्हटले, की त्याचा संबंध खेळाशी आला. मग तो खेळ कोणताही असो, साध्या पत्त्यांचा ब्रिज, रमी इत्यादी पैसे लावून होणारा जुगारी पत्त्यांचा खेळ, बुद्धिबळ इत्यादी बैठ्या खेळांपासून पोहणे, क्रिकेट, मुष्टियुद्ध अशा अनेक खेळांच्या सोयीसुविधा क्लब नावाच्या संस्था आपल्या सदस्यांना उपलब्ध करून देतात. खरे म्हटले तर 'बॉम्बे क्लब' हा काही अशा खेळांशी संबंधित असलेल्या क्लबपैकी नाही, या क्लबचे सदस्य देशभरातील प्रख्यात विख्यात कारखानदार, व्यापारी आदी मंडळी आहेत. कधीकाळी त्यांचा खेळांशी संबंध आला असेल तर त्याची लक्षणे बहुतेकांच्या शरीरावर आज तरी दिसत नाहीत. तरीही या मंडळीचा 'बॉम्बे क्लब' म्हणजे खेळाची जागा आहे, असा एक सार्वत्रिक गैरसमज पसरला. त्याचे कारण असे, की क्लबच्या स्थापनेच्या दिवशीच सदस्यांनी एकमताने 'सपाट मैदानाची' मागणी केली. 'आम्ही स्पर्धात्मक खेळांसाठी 'तैयार' आहेत. जगातील कोणाही खेळाडूपेक्षा आम्ही कमी नाही; पण मैदान सपाट मिळाले पाहिजे," अशी त्यांनी मागणी केली.

मैदान दाखवा, खेळ नंतर ठरवू

'बॉम्बे क्लब'ला कोणत्या खेळाच्या स्पर्धेत उतरायचे आहे ते काही स्पष्ट झाले नाही. हॉकी, फुटबॉल यांना चांगले सपाट मैदान लागते. भारतीय खेळातील

हुतूतू, खो–खो, आट्यापाट्या इत्यादींनाही सपाट मैदान लागते; पण, बहुतेक खेळात मैदानातील अंगण पाळीपाळीने बदलून घेण्याची व्यवस्था असल्याने मैदान सपाट नसल्याबद्दलची ठारशी तक्रार कधी ऐकू येत नाही. मैदानातील एक भाग सरस असला आणि ते अंगण नाणेफेकीच्या निर्णयामुळे एका संघास मिळाले तर त्यांचे नशीब भले असे मानण्याचा खिलाडूपणा बहुतेक संघ दाखवितात.

धावण्याच्या छोट्या अंतराच्या शर्यतीत मैदान सपाट असते; पण मॅरेथॉनसारख्या लांब अंतराच्या स्पर्धेत शर्यतीचा मार्ग थोडाफार वरखाली असला तरी त्यामुळे विजेत्यांना शर्यत पुरी करण्यास लागणाऱ्या वेळात फरक पडतो. स्पर्धेतील विजेता ठरण्यास त्यामुळे काही फारसा ठरक पडत नाही.

काही खेळ सपाट मैदानावर खेळले जाऊच शकत नाहीत. सायकलच्या शर्यतींचा आधुनिक मार्ग कलताच असतो आणि हिवाळ्याच्या दिवसांत थंड प्रदेशातील बर्फावरून घसरत जायच्या अनेकविध स्पर्धांसाठी उतार लागतो. एवढेच नव्हे तर जितका उतार जास्त तितके उच्चांक वरचढ होतात.

हिंदुस्थानातील कारखानदारांच्या 'बॉम्बे क्लब'ला सपाट मैदान हवे आहे; पण ते नेमके कोणत्या खेळासाठी? याचे स्पष्ट उत्तर मिळाले नाही तर मैनेसारखी फसगत होईल. ''बरं, चला तुम्हाला सपाट मैदान दिले,'' असे आपण कबूल केले, अशा कल्पनेने, की 'बॉम्बे क्लब'ला बहुतेक हॉकी, फुटबॉलसारखा खेळ खेळायचा असेल, तर एक धोका आहे. सपाट मैदान मिळाल्यावर 'बॉम्बे क्लब'च्या खेळाडूंनी स्कीइंग करण्याचा आग्रह धरला आणि बर्फावरून तुफान वेगाने कड्यांवरून शरीर फेकीत जाण्याची जिवघेणी स्पर्धा सपाट मैदानावर खेळण्याचा आग्रह धरला तर कोणी खेळाडू त्यांना खेळात काय म्हणून सामील करून घेईल?

कारखानदारांच्या क्रीडा

कारखानदारांच्या या क्लबला नेमका कोणता खेळ खेळायचे आहे? स्वातंत्र्यानंतरच्या काळात कारखानदारांना काही वेगळेच खेळ खेळण्याच्या सवयी लागल्या आहेत. समोरच्या खेळाडूंनी एक पाय बांधून, एक हात पाठीशी ठेवून किंवा डोळ्यांवर काळी पट्टी बांधून घेऊन मैदानात उतरावे, म्हणजे हे बहाद्दर मैदानात उभे तरी राहतील अशा अटी घालून खेळायची त्यांना सवय सर्व जगात सर्वांत जास्त संरक्षण असलेले कारखानदार म्हणजे हिंदुस्थानचे 'सपाट मैदाना'च्या भाषेत बोलायचे झाले तर 'बॉम्बे क्लब'च्या फुटबॉल संघाचा

सगळ्यात महत्त्वाची अट अशी, की मैदान तिरपेच असावे. 'बॉम्बे क्लब'चा संघ अंगण न बदलता कायम तिरप्या मैदानाच्या चढत्या भागातच खेळावा. 'बॉम्बे क्लब'च्या अंगणात येण्याची विरोधी खेळाडूंना मुभाच असणार नाही. याउलट क्लबच्या खेळाडूंना विरोधी पक्षाच्या गोलसमोर उभे राहून 'फ्री किक' मारण्याची परवानगी दर पाच दहा मिनिटांनी मिळाली पाहिजे. आता 'बॉम्बे क्लब'बरोबर असला खेळ खेळण्यास कोणी तयार नाही. उलट, साध्या सोप्या मैदानावर खेळण्याची 'बॉम्बे क्लब'ची तयारी नाही. ते मागतात 'सपाट मैदान;' पण त्यांना हवे आहे त्यांच्या खेळाडूंना मदत करणारे 'तिरपे मैदान...'

''नाचता येईना...''

एवढ्याकरिता त्यांचा आकांत चालू आहे. भांडवली फायद्यावरील कराचे प्रमाण परदेशी आणि देशी गुंतवणुकीवर सारखेच असावे. समभागांची प्रमाणपत्रे गहाण ठेवून भांडवल उभारण्याची व्यवस्था अधिक सोयीस्कर पाहिजे, कंपन्यांवरील कर समान असावा. या त्यांच्या मागण्यांत पुष्कळ तथ्य आहे. देशात विजेचा पुरवठा अपुरा आणि अनियोजित आहे. कच्च्या मालाची गुणवत्ता कमी आहे. सरकारी 'इन्स्पेक्टर राज' आणि 'भ्रष्टाचार' उत्पादकतेत बाधा आणतात. नोकरदारांच्या राजकीय ताकदीमुळे त्यांच्या मागण्या अवास्तव होत आहेत, या त्यांच्या तक्रारीत पुष्कळ अर्थ आहे; पण या सगळ्या अडचणी परदेशी भांडवलदारांना 'बॉम्बे क्लब'च्या सदस्यांपेक्षा अधिक जाचक आणि त्रासदायक होणार आहेत, कारण असल्या अजागळ व्यवस्थेत काम करण्याची परदेशी गुंतवणूकदारांना अजिबात सवय नाही. परदेशी गुंतवणूकदारांपेक्षा 'बॉम्बे क्लब'च्या खेळाडूंना अधिक अडचणींना तोंड द्यावे लागते आहे हे काही खरे नाही.

'राघू मैने'च्या कथेतील राघूप्रमाणे 'बॉम्बे क्लब'च्या सदस्यांचा खेळ लबाडीचा आहे आणि आपल्या लबाडीच्या खेळाला सपाट मैदान हवे असा ते कांगावा करीत आहेत; पण त्यांच्या मनात कोणता खेळ खेळायचा आहे ते सांगत नाहीत. नाचता येत नसले, की 'अंगण वाकडे' म्हणावयाचे, अशी जुनी म्हण आहे, 'बॉम्बे क्लब'ची सपाट मैदानाची मागणी आणि 'अंगण वाकडे' असल्याची तक्रार या दोघांची जातकुळी एकच.

(४ मार्च १९९४)

■■

बडा हिंदूराव आणि बादशहा

दिल्लीला गेलेले महाराष्ट्राचे नेते तेथे फिके पडतात, असा मोठा लांब इतिहास आहे. सगळी दख्खन हलवून सोडणारा महादजी शिंदे, पहिल्या बाजीरावावर ढेकूळ फेकून मारणारा आणि त्याला अर्वाच्य शिव्या घालणारा; पण दिल्लीला गेल्यावर मनसदीची वस्त्रे घेऊन फक्त बडा हिंदूराव बनला. अलीकडच्या इतिहासात लोकमान्य टिळक, यशवंतराव चव्हाण इत्यादी महाराष्ट्रातील नरपुंगवांचा अनुभव काही फारसा वेगळा नाही, श्री. शरद पवार दिल्लीला धडकून परत आले. त्यांनी यापुढे काही वेगळा इतिहास घडवला नाही तर मराठ्यांना दिल्लीचे हवापाणी रुचत नाही आणि पचत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध होईल.

पराभवाचे खापर

हे असे का होते? कारणे अनेक असतील; पण नुकत्याच घडलेल्या एका प्रसंगातून त्यातील एक किरकोळ का होईना, कारण लक्षात आले. १९९३च्या अखेरीस उत्तरेतील सहा राज्यांत निवडणुका झाल्या. त्यांपैकी उत्तर प्रदेशातील निवडणुकीत काँग्रेसचा पार धुव्वा उडाला. हा पराभव का, कसा झाला, या पराभवाला जबाबदार कोण याचे सत्यशोधन आणि विश्लेषण करण्यासाठी काँग्रेस पक्षाने एक समिती नेमली. या समितीच्या अध्यक्षपदी केरळचे मुख्यमंत्री के. करुणाकरन तर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅ. अब्दुल रहमान अंतुले, महाराष्ट्र प्रदेशच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई पाटील आणि जगन्नाथ मिश्रा इत्यादी सदस्य होते. समितीच्या अहवालात उत्तर प्रदेशाच्या काँग्रेस आयच्या पराभवाला कारण झालेल्या अनेक घटकांची मीमांसा करण्यात आली आहे. विशेषतः पक्षाच्या दोन वरिष्ठ नेत्यांनी निवडणूक प्रचाराच्या काळात केलेल्या विधानांमुळे काँग्रेसला जबरदस्त धक्का बसला, अशी नोंद समितीने केली आहे. हे नेते म्हणजे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार आणि केंद्रीय कल्याणमंत्री श्री.

सीताराम केसरी. हा अहवाल अतिगोपनीय समजला जातो; पण या दोन नेत्यांच्या संदर्भातील माहिती फुटली, तिचा बोभाटा झाला. 'हिंदू' या वर्तमान पत्रात यासंबंधीच्या बातम्या झळकल्या, ही माहिती काँग्रेसच्या उच्चपदस्थ गोटांतून जाणीवपूर्वक फोडण्यात आली असावी.

कुत्र्याला बदनाम करा

श्री. शरद पवारांवरचा आरोप थोडक्यात असा : उत्तर प्रदेशाबाहेरील श्री. शरद पवार आदींनी केलेल्या विधानांमुळे काँग्रेसने लढाईपूर्वीच रणभूमीवरून पळ काढला असा गैरसमज लोकांमध्ये निर्माण झाला. श्री. शरद पवार यांनी निवडणुकांपूर्वी, 'उत्तर प्रदेशांत काँग्रेस आय ने निवडणूक लढवू नये,' असे म्हटल्याचे प्रसिद्ध झाले होते, श्री. शरद पवार यांनी, 'आपण तसे म्हटले नसल्याचे' व उत्तर प्रदेशांत काँग्रेस आय पक्षाने धर्मनिरपेक्ष शक्ती मजबूत करण्याच्या दृष्टीने भूमिका घ्यावी,' असे म्हटले असल्याचा खुलासा केला होता. उत्तर प्रदेशातील हजारो काँग्रेस कार्यकर्त्यांचे म्हणणे असे, की या वक्तव्यांमुळे आम जनतेत असा समज पसरला, की खुद्द काँग्रेस नेत्यांनाच जिंकून येण्याची काही आशा नाही. भाजपला कोणत्याही परिस्थितीत सत्तेवर येऊ न देण्याचा निर्धार बहुसंख्य मुसलमान आणि मागासवर्गीयांनी केला होता, भाजपविरोधी सर्वांत सशक्त पक्षाला मते देण्याचा त्यांचा विचार ठरला होता. पवार आदी नेत्यांच्या वक्तव्यांमुळे सर्वांत प्रबल विरोधी मुलायम– कांशीराम युतीच ठरेल असे वातावरण तयार झाले आणि त्याचा फायदा युतीस मिळाला, काँग्रेसचे पानिपत झाले.

दिल्ली दरबारातील कूट कारस्थाने

उत्तर प्रदेशातील काँग्रेसच्या पराभवाची मीमांसा करणे हा प्रस्तुतचा विषय नाही. दिल्लीतील आधुनिक 'बडा हिंदूराव' निष्प्रभ कसा होईल, यासाठी दिल्लीश्वरांनी वापरलेली तंत्रे अधिक कुतूहलाचा विषय आहे. पराभवाची मीमांसा करण्यासाठी समिती नेमली. समितीचे सदस्य कोण? अध्यक्ष करुणाकरन– पंतप्रधानांचे खास जानी दोस्त; केंद्रातील काँग्रेस सरकार डुगडुगत होते तेव्हा करुणाकरन माहिनो न् महिने दिल्लीत डेरा ठोकून होते. बॅ. अंतुले आणि प्रतिभाताई पाटील यांचे नाते शरद पवारांशी साप–मुंगूस आणि विळा–भोपळा यांच्यातील दोस्तीप्रमाणेच. महाराष्ट्रातील नेमकी हीच मंडळी समितीवर नेमली जावी हा निव्वळ अपघात असेल तर तो मोठा चमत्कार म्हणावा लागेल. समितीच्या सदस्यांची यादी पाहिल्यावर निष्कर्ष श्री. शरद पवारांच्या विरुद्ध निघाला यात

आश्चर्य ते कोणते? उत्तर प्रदेशातील पंतप्रधानांच्या सभांना पाच–पन्नास माणसेही जमत नव्हती, त्यांची सगळी वक्तव्ये कार्यकर्त्यांचा असलेला उत्साह गोठवणारी होती, याचा उल्लेख करुणाकरन समिती थोडीच करणार होती? दिल्लीश्वरांना सोयीस्कर समिती नेमली गेली, तिने दिल्लीश्वरांना सोयीस्कर निष्कर्ष काढले, दिल्लीश्वरांच्या निकटवर्ती गोटांनी याची बित्तम् बातमी वृत्तपत्रांना पुरवली. पवारांच्या अपराधाची चर्चा येत्या पंधरा दिवसांत काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत होणार आहे. त्यांच्याविरुद्ध कोणतीही कडक उपाययोजना केली जाणार नाही. महाराष्ट्रातील संभाजीचा संताप अनावर झाला तर काहीही हौतात्म्य स्वीकारतात, याची दिल्लीश्वरांना खबर आहे. शरद पवार काही संभाजीच्या प्रकृतीचे नाहीत; त्यांची जास्तीत–जास्त जयसिंगाबरोबर तुलना होईल, हे पुरा दिल्ली दरबार जाणतो. पवारांना संपविले तर सलतनीची हालत दखखनमध्ये मुश्कील होईल हे दिल्लीश्वर चांगले जाणतात; पण पवारांना वाढू दिले तर उद्या आपलाही 'वसंतदादा पाटील' झाल्याखेरीज राहणार नाही. यांची त्यांनाही धास्ती आहे. दिल्लीशैलीची खास चाल अशी, की माणसे पदरी बाळगावी व त्यांचा तेजोभंग करून, काटछाट करून बाळगावी. हातात भूखंड प्रकरणातील सज्जड पुरावे मुंबईच्या मलबार हिलवरील 'अंगारिका' सोसायटीप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निकाल, बाळासाहेब विखे पाटील प्रकरणी उच्च न्यायालयाने झाडलेले ताशेरे, लखनौहून सरकारी विमानातून खुनी गुंडांना बरोबर प्रवासात आणल्याचे प्रकरण, इस्त्रालयमधील शस्त्र खरेदीचे प्रकरण, दाऊद इब्राहिम व इतर ख्यातनाम गुंडांबरोबरचे घनिष्ठ संबंध, पप्पू कलानी आणि हितेंद्र ठाकूर अशा बदनामांना पक्षाची तिकीटे दिल्याचे प्रकरण, अशा अनेक बेड्यांनी महाराष्ट्राचा आधुनिक संभाजी आधीच जेरबंद झाला आहे. मनोमिलनाच्या आधी विरोधकांत राहिल्यामुळे इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी आदींविरुद्ध केलेल्या अफाट वक्तव्यांमुळे पवारांची स्वामिनिष्ठा आधीच संशयास्पद होती, चंद्रशेखरांबरोबर मुलायम–कांशीराम युतीस समजता न समजता फायदेशीर ठरतील अशी वक्तव्ये पवारांनी केली, हे प्रकरण त्यांना आणखी कडीबेडीत घालणारे आहे. त्यांना कोणी संपविणार नाही, अधिकाधिक जखडून टाकतील. दिल्लीश्वरांचे हे असले राजकारण मराठ्यांना जमत नाही, म्हणून मराठा गडी दिल्लीत तरी अपयशाचा धनी ठरतो.

मराठ्यांना हे का जमू नये?

दिल्लीश्वरांची ही तंत्रे शरद पवारांनी वापरायला काय हरकत होती? भूखंड प्रकरणाचा शोध घेण्यासाठी एक चांगली समिती नेमायची; त्यावर नेमायचे

निष्ठावान बिल्डर किंवा जिल्ह्या–जिल्ह्यांत, भूखंड विषयाचा भरपूर अनुभव असलेले, 'निवास' स्पेशॅलिस्ट, त्यांच्याकडून निर्णय आणायचा, की सर्व भूखंड प्रकरणात शरदरावांचा काहीच दोष नाही. यापलीकडे जाऊन भूखंड प्रकरणातील खरे दोषी आपले विरोधकच आहेत, असे कागदोपत्री दाखविण्याचे कौशल्य पवारांकडे नसावे. त्यांनी ही तरकीब वापरली नाही असे नाही. मृणाल गोरेंना छोटासा फटका देण्याकरिता वापरली; पण निष्ठावान समितीच्या शिफारसींच्या आधाराने अंतुले, प्रतिभाताई पाटील यांनासुद्धा जेरबंद करण्याचे प्रयत्न ऐकिवात नाहीत. भूखंडाचा फायदा मिळवलेल्यांची नावे आपण जाहीर करतो असे या मराठेश्रेष्ठांनी म्हटले तर देशांतील आणि दिल्लीतील अनेकांच्या अंगाला कापरे सुटल्याखेरीज राहणार नाही.

लखनौहून मुंबईला त्यांनी दोन गुंडांबरोबर प्रवास केला. मुंबईत आल्यानंतर जे.जे हॉस्पिटलमधील हत्याकांडात रक्तपात घडविला. या प्रकरणी शरद पवारांनी एक समिती नेमली असती, त्यात हितेंद्र ठाकूर, पप्पू कलानी असे निवडक तज्ज्ञ घेतले असते, तर त्या विमानात आपण त्या गुंडांना शंकरराव चव्हाणांच्या शिफारसीवरून घेतले असा निष्कर्ष सहज काढता आला असता.

मदनलाल बाफना यांच्या मंत्रालयातील फोनवरून दुबईत सतत संपर्क साधला जात होता. पवार आणि दाऊद इब्राहिम यांचे घनिष्ठ संबंध आहेत. याची सर्वदूर खात्री आहे; पण हे प्रकरण आपल्या अंगावर शेकू नये यासाठी पवारांना सोयीस्कर समिती नेमता आली असती आणि बॅ. गाडगीळ यांच्यामार्फत पंतप्रधानांनी पाठविलेल्या निरोपामुळे असे झाले असे सांगता आले असते. मुंबईच्या स्फोटातील चौकशीत मुरली देवरांपासून ते देशांतील सर्वोच्च पदाधिकाऱ्यांपर्यंत अनेकांचे हात गुंतले आहेत, असे आपल्या पुठ्ठ्यातील एखाद्या समितीकडून वदवून घेता आले असते. गेला बाजार हर्षद मेहताने मुंबईत ती प्रख्यात सुटकेस खरेदी केली याचा प्रत्यक्ष साक्षीदार पुढे करता आला असता.

...पण मराठ्यांना हे जमत नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात साध्य साधनांचा विधिनिषेध नसलेले दिग्गज दिल्लीत पोहोचले, की डावपेचांच्या खेळांत कमी पडतात आणि मराठ्यांना दिल्ली कायमची दूर राहते.

(२५ मार्च १९९४)

■■

स्वामी, जॉर्ज, मेधा, क्लिंटन आणि डंकेल

या आठवड्यात डंकेल विरोधकांच्या मोर्चांनी, निदर्शनांनी देश नाहीतरी वर्तमानपत्रे चांगली गाजवली. ४ एप्रिलच्या मुंबईतील निदर्शनांस व्यासपीठावर जॉर्ज फर्नांडिस, विश्वनाथ प्रताप सिंग, लालूप्रसाद यादव अशा थोरामोठ्यांची हजेरी होती. मोर्चेकरी चारपाच हजारही नव्हते, तरी प्रत्येक पेपरात पहिल्या पानावर फोटोसकट बातमी झळकली.

५ एप्रिलला दिल्लीत डाव्यांचा मोर्चा झाला. जमलेली संख्या सन्माननीय होती. काहीतरी धुडगूस घातल्याखेरीज 'बातमी' बनत नाही हे लालभाईंना पक्के ठाऊक असल्याने त्यांनी संसदेकडे जाण्याचा आग्रह धरला. बंदीविरुद्ध सत्याग्रह करून अटक करून घेणे असा कार्यक्रम मुळातच नव्हता. साहजिकच पोलिसांशी लढत झाली. लाठी चालली, अश्रूधुराची नळकांडी फुटली, पोलादाची पाती लावलेले बाण निदर्शकांनी पोलिसांवर सोडले, मोर्चा, 'सफल संपूर्ण' झाला. अगदी बी.बी.सी.वरसुद्धा चित्रणासहित बातमी आली.

अटलजींची चपळाई

६ एप्रिल म्हणजे दुसऱ्याच दिवशी भाजपाची सभा रामलीला मैदानावर झाली. मंदिरवाद सोडून अर्थवादाकडे आपण वळतो आहोत, हे जगाला दाखवण्याचा भाजपाचा प्रयत्न; पण समोर बसलेल्या केशरी फौजेचा श्रीरामाचा जयजयकार इतका मोठा होता, की त्याची दखल घेऊन राम मंदिराविषयी बोलणे अटलजींनासुद्धा भाग पडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'स्वदेशी' वादामुळे भाजपा चांगलाच अडचणीत आला आहे. मध्यावधी निवडणुकांचे निकाल फारसे समाधानकारक नसले तरी केंद्रात सत्तेवर येण्याचे त्यांचे मनसुबे अजून जिवंत आहेत. खुर्चीवर आलो तर गॅट करारात सामील होण्याखेरीज गत्यंतर नाही हे त्यांना पक्के उमजले आहे; तरीही डंकेल करारामुळे शेतकरी

भणंग होईल, देश गुलाम होईल, सरकारचे सार्वभौमत्व जाईल अशी वारेमाप भाषा सगळ्या पुढाऱ्यांनी वापरली. अटलजींच्या भाषणात पक्षाच्या भावी धोरणाचा संकेत मिळाला. गॅट कराराच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत देशाचे नुकसान होते आहे असे दिसून आले तर आम्ही गॅट कराराच्या बाहेर पडू. असे आश्वासन सरकारने जाहीररीत्या द्यावे अशी त्यांची मागणी होती. उघड आहे, उद्या सकाळी भाजप दिल्ली सत्तेवर आला तर तेही 'वाजपेयी लाइन' चालवतील आणि पुढे प्रत्यक्षात काहीही घडले तरी "आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेतून बाहेर बाहेर पडण्याइतका हा मामला गंभीर नाही." असे जाहीर करून, एकदोन स्वदेशीच्या आणि राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाच्या गर्जना करून वेळ निभावून नेता येईल, असा भाजपाचा होरा दिसतो.

डंकेल मक्खी अमेरिकेस उमगली

डावे, उजवे, मधले-डंकेल विरोधकांत सर्वत्र खळबळ माजली आहे ती अमेरिकादी श्रीमंत देशांच्या एका वेगळ्याच चालीने. गॅट कराराच्या वाटाघाटीच्या सुरुवातीस खुला व्यापार हा मामला युरोप-जपान-अमेरिका आणि ५-१० इतर देश यांच्यातला आहे. अशा समजुतीने श्रीमंत देशांनी चर्चेला सुरुवात केली. चर्चा संपली, १५ डिसेंबर रोजी मसुद्यावर सह्या झाल्या आणि मग त्यांच्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला. व्यापाराच्या मर्यादित गॅटप्रणीत खुलीकरणाने श्रीमंत देशांतील व्यापारात वाढते संतुलन येईल; पण त्यामुळे गरीब देशातून होणाऱ्या निर्यातीसाठी श्रीमंत देशांचे दरवाजे सताड उघडे पडतील. ही गोष्ट 'भारत'वाद्यांना स्पष्ट होती. याच कारणाने, डंकेलवरची चर्चा घोळवत बसू नका. आहे तसा करार मान्य करून टाका असा त्यांचा आग्रह चालला होता. याउलट 'इंडिया'वाद्यांना निर्यातीत काहीच स्वारस्य नाही. जगातील सारे दरवाजे सताड उघडे झाले तरी निर्यात करण्याची क्षमता नसल्याने ते अमेरिकेला शिव्याशाप देत गॅट कराराला विरोध करीत राहिले. आता, डंकेलला विरोध करणाऱ्यांची, त्यांच्या मोर्चात अमेरिकाही सामील झालेली पाहून मोठी त्रेधा उडाली आहे.

मजुरी वाढवा, बोनस वाढवा

अनवधानाने गरीब देशांकरिता मोकळे राहिलेले दरवाजे बंद कसे करावे याची चिंता श्रीमंत देशांना पडली आहे. जमले तर दरवाजे अजून बंद करून घ्यावे, निदान थोडेफार तरी ढकलून घ्यावेत यासाठी जी धडपड सुरू झाली आहे, तिच्यामुळे हिंदुस्थानातील डंकेलविरोधकांत एकच गडबड उडून गेली आहे.

गरीब देश भांडवलात कमी, तंत्रज्ञानात मागासलेले; पण लोकसंख्येत उदंड, अगदी थोड्या पैशावर मजुरी करायला इथली माणसे, एवढेच नव्हे तर स्त्रिया आणि लहानसहान मुलेसुद्धा तयार. स्वस्त श्रमशक्तीच्या ताकदीवर गरीब देश श्रीमंतांशी स्पर्धा करू शकतात. आपली गरिबी हेच हत्यार बनवू शकतात. याला तोड म्हणून अगदी शेवटच्या क्षणी गॅट करारात अगदी नवे प्रस्ताव आणण्याची धडपड अमेरिका करीत आहे, परिणाम खूपच विनोदी.

गरीब देशातील मजुरांची मजुरांची मजुरी वाढली पाहिजे ही अमेरिकेची मागणी नंबर एक - ज्या देशात मजुरी अपुरी आहे तेथील निर्यातीपासून श्रीमंत देशातील उद्योगधंद्याला संरक्षण मिळणे आवश्यक आहे. त्याकरिता त्यांना आयात कर बसवता यावा, असा प्रस्ताव अमेरिकेने सुचवला आहे. सुदैवाने हिंदुस्थानात असल्या बातम्या कोणी वाचत नाही. अन्यथा डंकेल विरोधकाग्रणी जॉर्ज फर्नांडिस, दत्ता सामंत किंवा ज्याती बसू यांना कोणी विचारले असते, "भांडवलशाही अमेरिका भारतातील मजुरांचा कैवार कशी घेते? कामगारांची तरफदारी करणाऱ्या अमेरिकेला आपण शिव्याशाप का देत आहोत?"

पर्यावरणाचे रक्षण

मेधा पाटकर आदी डंकेल प्रस्ताव जाळणाऱ्यांचाही मोठा कोंडमारा झाला आहे. गरीब देशातील विकास तेथील निसर्ग आणि पर्यावरण यांचा विनाश करून होतो. आतापर्यंत फारशी वापरली न गेलेली निर्गसंपत्ती गरीब देशांचे मोठे फायद्याचे कलम आहे. गरीब देशांना या कारणाने मिळणाऱ्या फायद्याची भरपाई करण्यासाठी श्रीमंत देशांना आयातकर लादता यावे, अशी सूचना अमेरिकेने केली आहे. मेधा पाटकर आणि बिल क्लिंटन जोडीजोडीने चालू लागल्यानंतर मेधाताईंना थोडातरी संकोच वाटला असेल.

बाल-कामगारांचा बचाव

अशीच त्रेधा स्वामी अग्निवेशांची झाली आहे. लहान मुलांना कामावर लावू नये यासाठी त्यांनी कित्येक वर्षे आंदोलन चालवले आहे. गालिच्यांच्या उत्पादनकरिता हिंदुस्थानची शतकानुशतके ख्याती आहे; पण विलायतेत आता यंत्राने घट्ट विणीचे गालीचे स्वस्तात तयार होतात. साध्या मागावर गालिचे विणणाऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अशक्य आहे. लहान मुलांना गालिचे विणण्याच्या कामावर लावले म्हणजे त्यांच्या सडपातळ नाजूक बोटांच्या हालचालीने सुबक गालिचे तयार होतात. असल्या गालिचावर देशात आणि परदेशांत बंदी असावी याकरिता स्वामीजी युरोप-अमेरिकेत भरपूर प्रयत्न करतात. आता

त्यांच्या साथीला खुद्द अमेरिकाच उतरली आहे. लहान मुले, तुरुंगातील कैदी इत्यादींनी तयार केलेल्या उत्पादनांचा वापर करणे मानवी हक्कांचा भंग आहे. ज्या देशात मानवी हक्कांचा भंग करून उत्पादनखर्च कमी ठेवला जातो त्यांच्या मालावर आयातशुल्क आकारण्याचाही अमेरिकेचा प्रस्ताव आहे. कार्ला हिल्स आणि स्वामी अग्निवेश यांची युती पोटात गोळा उठवणारी आहे.

डंकेल प्रस्तावातील या शेवटच्या घडामोडीमुळे एक गोष्ट स्पष्ट झाली: थोरामोठ्यांच्या टकरीत 'भारता'सारख्या गरीब देशांचा फायदा होत होता. त्याला 'इंडिया'वाद्यांनी विरोध केला. अमेरिकेवर बोटे मोडून शिव्याशापांचा वर्षाव केला. तीच अमेरिका, तेच साम्राज्यवादी 'मजुरी वाढवा', 'पर्यावरण वाचवा,' अशा घोषणा देत डंकेल विरोधकांच्या पंगतीला येऊन बसले आहेत.

काँग्रेसचाही एक प्रशिक्षण वर्ग

पण सगळ्यांत महाविनोदी दृश्य काँग्रेस पक्षात दिसते आहे. नेहरू, इंदिरा गांधींचा जयजयकार करणे, दिल्लीहून जी घोषणा येईल तिचा 'उदोउदो' करणे यापलीकडे बुद्धी म्हणून वापरायची नाही, हे व्रत काँग्रेस संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दिल्लीहून आदेश निघाला म्हणून बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द असल्या धोरणांचे समर्थन करणे थोडेफार जमून जाते; पण डंकेल म्हणजे मोठे भानगडीचे प्रकरण. विरोधक त्याला कडाडून विरोध करीत आहेत, तेव्हा आपण त्याला पाठिंबा देणे चुकीचे असणार नाही, एवढे काँग्रेसवाल्यांना बरोबर समजले; पण परवा परवापर्यंत "डंकेलमधील घातक प्रस्तावांचा शेतकऱ्यांवर आणि देशावर विपरीत परिणाम होऊ देणार नाही." अशी घोषण करणारे मुखर्जी, जाखड आज एकदम डंकेल प्रस्तावात सगळे काही 'आलबेल' आहे असे म्हणू लागल्याने काँग्रेसजनांच्या गोंधळात भर पडली. शरद पवार म्हणजे उद्याचे राष्ट्रीय नेतृत्व! साहेबांना सगळे काही समजते, असा त्यांच्या आसपासच्या कार्यकर्त्यांत बोलबाला आहे. साहेब इतक्या दिवस मूग गिळून बसले होते. परवा या विषयावर बोलले, "उत्पादनखर्चावर आधारित रास्त भाव पाहिजे असेल तर डंकेलला विरोध करून चालणार नाही." असे बेफाम विनोदी मराठी फार्सातील विदूषकाच्या तोंडी शोभणारे वाक्य बोलून गेले.

पापांचा कबुलीजबाब द्या

अद्‌भुत घडले. डंकेल विषयावर काँग्रेस कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाकरिता जागोजाग कार्यशाळा भरवण्यात येत आहेत. एका कार्यशाळेचे कागदपत्र पाहण्यात आले. प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक पातळीवर कोणीच नाही, वरून थेट प्रणव

मुखर्जींनाच बोलावण्याखेरीज गत्यंतर नाही. प्रशिक्षणाच्या कागदपत्रात विरोधकांच्या आरोपांची यादी दिली आहे आणि एक एक क्रमाने ते आरोप चुकीचे आहेत, भ्रममूलक आहेत, निराधार आहेत असे म्हटले आहे. झाले प्रशिक्षण! काँग्रेसची खरी गोची अशी आहे, की डंकेल प्रस्तावाचा पुरस्कार करताना नेहरूंपासून सर्व काँग्रेसी पंतप्रधानांनी देशाचे वाटोळे केले याचा कबुलीजबाब दिल्ल्याखेरीज डंकेलचे खरे समर्थन करताच येत नाही. आपल्या खानदानातील 'कृष्णकृत्ये' प्रकाशात यावीत अशी तर काँग्रेसवाल्यांची इच्छा नाही.

७० टक्के उणे सबसिडी

"शेतकऱ्यांची सबसिडी डंकेलमुळे कमी होणार नाही. कारण हिंदुस्थानातील सबसिडी १०% पेक्षा कमीच आहे, पुष्कळशा बाबतीत तर ती नकारात्मक म्हणजे 'उणे' आहे." अशी गोलमोल संपादणी काँग्रेसवाल्यांना करावी लागते. भारतीय शेतकऱ्यावरील उणे सबसिडी ७०% आसपास आहे, म्हणजे शेतकऱ्यांवर ७०% एवढा करांचा भार आहे, याचा कबुलीजबाब त्यांच्या तोंडून निघत नाही. कारण एवढ्या एकाच कबुलीजबाबावर काँग्रेसचे 'पानिपत' होऊ शकते.

एक खोटे बोलणाऱ्याला दरवेळी खोटे बोलावे लागते आणि आपल्याच खोट्यात तो अधिकाधिक गुंतत जातो. डंकेल विरोधकांचा पाया अधिकाधिक खोलात जातो आहे. कारण एक खोटे लपवण्याच्या प्रयत्नात ते शंभर खोट्यांच्या गुंत्यात सापडले आहेत.

(२२ एप्रिल १९९४)

■■

इलेक्ट्रॉनिक्स पत्रकारितेमुळे मोकळे जाहले श्वास

दूरदर्शन, स्टार टीव्ही, सी.एन.एन., जैन आणि डझनभर इतर शहरवासीयांच्या दिवाणखान्यात आधुनिक तंत्रज्ञानाने दोन डझनावर चॅनेल आणून सोडले आहेत. हातातील दूरनियंत्रकाच्या एका खटक्याने क्षणार्धात जगाच्या पाठीवर कोठेही चाललेले खेळ, संगीत, बातम्या यांचे कार्यक्रम नजरेसमोर आणता येतात. प्रसारसाधनांवरील सरकारी नियंत्रणे आधुनिक तंत्रज्ञानाने उधळून लावली आहेत. कोणी हुकूमशहा हवचारांच्या देवाणघेवाणीत आता अडथळे आणू शकणार नाही. माहितीवरची मक्तेदारी संपुष्टात आली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रचंड झेपेने आता बातम्या लपवता येणार नाही, खोटा प्रचार करणे कठीण होईल. वाचा खोटे बोलेल, लेखणी खोटे लिहील; पण कॅमेरा खोटे बोलू शकत नाही आणि यापुढे प्रसार डोळ्यांच्या दृष्टीने आणि कानाच्या श्रवणाने होणार आहे. लेखी शब्दाने नाही. माणसा माणसातील विचारांच्या आणि अनुभूतीच्या देवाणघेवाणीकरिता शब्दांची सद्दी संपली. दृक्‌श्राव्य माध्यमांचे राज्य आले. कॅमेरा टिपेल आणि सांगेल; कोणी खोटेपणा करू धजला तर स्पर्धेच्या आणि चढाओढीच्या या जगात त्याचे खोटे उघडे पडल्याखेरीज राहणार नाही. रवीन्द्रनाथ टागोरांच्या स्वप्नातील भिंतीविरहितचे जग तयार होईल अशी आशा वाटत होती.

प्रत्यक्षात काही वेगळेच घडते आहे. आगीने म्हटले तर स्वयंपाक करता येतो, म्हटले तर आग लावता येते. बंदूक माणसे मारत नाही, माणसे माणसांना मारतात. बंदूक हे फक्त साधन असते. आधुनिक तंत्रज्ञानाने विचार, माहिती यांच्या अनिर्बंध प्रसाराची साधने उपलब्ध करून दिली; पण म्हणजे प्रसारमाध्यमे स्वच्छ झाली, खोटेपणा संपला असे नाही.

लोकमान्य केसरी ते...

प्रत्येक तंत्रज्ञानाच्या युगात एका वेगळ्या पत्रकारितेचा जन्म होतो. हातछपाई यंत्राने टिळकांच्या पत्रकारितेला जन्म दिला. मुद्रण सुलभ झाले. दैनिके, नियतकालिके हजारोंनी निघू लागली. वर्तमानाचे वास्तव दाखवण्याऐवजी आपापल्या पक्षाच्या किंवा मालकाच्या हितसंबंधांच्या चष्म्यातून समाचार, संपादणे ही पत्रकारांची सर्वसाधारण भूमिका झाली. छापलेले ते ते खरे नसते हे उमजायला लोकांना थोडासा वेळ लागला; पण हा नवा खेळही त्यांनी आत्मसात केला आणि अनुभवाने नवे आडाखे बांधले. गोविंद तळवळकर अग्रलेखात असे लिहितात; मग सत्यस्थिती अशी असली पाहिजे, माधव गडकरींच्या लिखाणात हे एक झुकते माप असायचेच ते सुधरून घेतले पाहिजे, मधुकर भावे असे म्हणतात काय? तोंडात थोडी मिठाची गुळणी धरूनच त्यातले तथ्य तेवढे घेतले पाहिजे. इ. इ.

नवी पत्रकारिता

इलेक्ट्रानिक प्रसारमाध्यमांच्या युगात एका नव्या पत्रकाराचा जन्म होतो आहे. 'चक्षुर्वै सत्यम्' सांगणारा कॅमेरा खोटे बोलत नाही; पण कॅमेऱ्याने टिपलेल्या गोष्टींचे संपादन करून मांडणी करणारा आजही खोटी बतावणी करू शकतो. प्रसार माध्यमांच्या नव्या युगात हे कसब दाखवणाऱ्या नव्या पत्रकाराचा आणि पत्रकारितेचा उदय झाला आहे.

जुन्या काळातील काही पत्रकार आपल्या पत्रकारितेला भलेभले घाबरतात या गुर्मीत चालत. पुरातनकाळातील राजदरबारातील एका कवीने राजाला बजावले, "राजा कवींना नाखुष करू नकोस, लंकाधीश बदनाम झाला आणि दशरथाचा पोर दिगंत कीर्ती पावला, हा सारा आदिकवीचा प्रभाव हे विसरू नकोस." आपण कोणाही नेत्यास मोठे करू शकतो किंवा संपवू शकतो असे मानणाऱ्या पूर्वाश्रमीच्या पत्रकाराचा नवा इलेक्ट्रॉनिक अवतार पुढे येत आहे. कॅमेऱ्याची मग्रुरी लेखणीच्या शतपट मोठी आहे.

एक उदाहरण पाहा. गेल्या वर्षी सहा महिन्यांत डंकेल विषय सगळीकडे गाजतो आहे. वर्तमानपत्रांत तसाच टेलिव्हिजनवरही. या विषयावरील अनेक कार्यक्रम जवळजवळ दररोज कोणत्या ना कोणत्या टीव्हीच्या केंद्रावर दाखवले जातात.

संपादणी आणि बतावणी

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कोणी एक वार्ताहर सादरकर्ता म्हणून

प्रास्ताविकादाखल काही बोलतो, या सूत्रधाराचे भाषण देवतांच्या नाटकातल्याप्रमाणेच असते. मुलाखती घेणाऱ्या पत्रकारांपैकी एकानेही डंकेल प्रस्ताव मुळात डोळ्याने पाहिलेलाही असल्याचे लक्षण दिसत नाही. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आजच्या समस्या काय? त्यात आजच्या शेतीमालाच्या व्यापाराची परिस्थिती काय? कोणत्या देशात शेतकऱ्यांना किती सबसिडी दिली जाते? इत्यादी प्रश्नांचा एकालाही गंधमात्र बोध नाही.

कॅमेऱ्याचा दबदबा

थातुर मातुर वर्तमानपत्रातील बातम्या फक्त वाचून हे 'पत्रपंडित' टेलिव्हिजन कॅमेऱ्याचा संच घेऊन ' कोपनीय: कवय: क्षीतिद्रै:' अशा गुर्मीत फिरताना त्यांचा थाट काय वर्णावा? एवढ्या कॅमेऱ्याच्या आधाराने कोणीही नेता, विचारवंत, कार्यकर्ता कलाकारला यांच्यासमोर ठाकावे, वही-पेन्सिल घेऊन बसलेल्या कसेबसे बसतात. जमेल ती उत्तरे देतात. प्रत्येकाचा निदान अर्ध्या तासाचा मुलाखतीचा कार्यक्रम नोंदला जातो. चहापाणी, फराळ होतो. कॅमेऱ्याचा सगळा पसारा गुंडाळून पत्रकार दुसऱ्या शिकारीकडे निघतात.

सत्य; पण पुरे नाही, सगळे नाही

दोनचार दिवसांत कार्यक्रम टीव्ही संचावर दिसतो, प्रास्ताविक झडते. डंकेलमुळे देशाच्या सार्वभौमत्वाला धक्का बसेल काय? असा एक प्रश्न सूत्रधार पुढे टाकतो आणि मग लागोपाठ पाचदहा माणसांची उत्तरे दृश्यांबरोबरच दाखवली जातात. तास दीडतासाच्या एकूण मुलाखतीपैकी मिनिट दीडमिनिटाचे तुकडे दाखवले म्हणजे कळस झाला. दाखविलेले तुकडे संदर्भापासून ओरबाडून काढलेले, निरर्थक. हिंदुस्थानातील पत्रकार बहुतेक स्वत:ला डावे मानणारे आहेत. त्यामुळे डंकेलचे एक अक्षरही न वाचता त्याविषयी त्यांच्या मनात अढी आहे. डंकेलविरोधी मते तपशीलवार दाखवली, ऐकवली जातात. विरोधी मतांच्या पुरस्कर्त्यांनी नाही म्हणून हलवलेली मान पुरी दाखवली तरी नशीब! समर्थकांचा मुखडा सुबक दिसेल असे चित्रण वापरायचे. विरोधकांनी तोंड उघडले तर त्यांचे वेडेवाकडे दात लोकांच्या नजरेत विशेष भरावे इतकी चलाखी या कार्यक्रमात सरसहा केली जाते. राजीव गांधी दाखवायचे तर एखाद्या सिनेमा नटाप्रमाणे व्यवस्थित मेकअप केलेले पी. व्ही., सिंगांचे चित्रण करायचे तर जांभई देताना, तोंड वेडेवाकडे उघडले गेले असताना, अशी ही इलेक्ट्रॉनिक युगातील युक्ती आहे. दाखवलेले असत्य आहे असेही नाही. सत्य आहे; पण संपूर्ण सत्य नाही. सत्याशिवाय खूपच काही आहे.

अनभ्यस्त, अप्रस्तुत, संदर्भरहित

शेतकऱ्यांना बी महाग मिळेल काय? औषधे महाग होतील काय? असले अप्रस्तुत प्रश्न एकामागोमाग एक घेतले जातात आणि प्रत्येक प्रश्नावरील चर्चेच्या वेळी मुलाखती घेतलेल्या सर्वांची धावती परेड दाखवली जाते. कोणालाही पुरे बोलू दिले जात नाही. तास दीड तास मुलाखत दिलेल्यांच्या लक्षात येते, की मुलाखतीतील फार तर १५-२० सेकंदांचाच तुकडा वापरला गेलेला आहे आणि तुकडाही असा, की ज्याचा मुलाखतीच्या आत्म्याशी दुरान्वयेही संबंध नाही.

'इंडिया टुडे' या पाक्षिकाचे एक टीव्ही मासिक 'न्यूज ट्रॅक' म्हणून निघत असे. हिंदुस्थानात इतर कोणत्याही टीव्ही मासिकापेक्षा त्याचा खप जास्त होता. एकूण चार वेळा माझ्या पूर्ण मुलाखती न्यूज ट्रॅकच्या पत्रकारांनी घेतल्या आणि काही ना काही कारणांनी त्या कपाटातच ठेवल्या. मला कारण कळवण्याचा शिष्टाचार संपादकांनी पाळला नव्हता. मीही माझ्या काळ्या यादीत 'न्यूज ट्रॅक'चे नाव घेतले आणि स्वस्थ राहिलो. १५ एप्रिल, 'मॅराकेरा' येथे गॅट करारावर सही करण्याचा ठरलेला मुहूर्त. तेव्हा सगळीकडे डंकेल विषयावर कार्यक्रम करण्याविषयी धावपळ चालू झाली. 'न्यूज ट्रॅक'ची मंडळी पुन्हा एकदा दूरदर्शनच्या झेंड्याखाली आंबेठाणला आली. त्यांना मुलाखत न देण्याचा माझा निर्णय सांगितल्यावर त्यांनी दिल्लीहून फोन करून, मुख्य संपादकाशी बोलणे करून दिले, मुख्य संपादकांनी माफी मागितली. 'न्यूज ट्रॅक'चे नाव काळ्या यादीतून तात्पुरते का होईना मी दूर केले.

माझेही काही हक्क आणि अधिकार

आता प्रश्न आला मुलाखतीच्या स्वरूपाचा. मुलाखतीला बसण्याआधी मी आग्रह धरला तुमच्या कार्यक्रमाचा आराखडा काय? नेमके कोणते मुद्दे तुम्ही चर्चेला घेणार आहात, त्यांतील प्रस्तुत किती, अप्रस्तुत किती? महत्त्वाचे मुद्दे कोणते? यासंबंधी आराखड्यात बदल सुचवण्याचा माझा अधिकार आहे. कोणत्याही वावदूक प्रश्नांना उत्तरे देत बसण्यात मला स्वारस्य नाही.

एवढेच नाही, माझ्या मुलाखतीपैकी कोणता भाग वापरला जाणार आहे? हे मला स्पष्ट झाले पाहिजे. सगळीच सगळी मुलाखत वापरता येणार नाही हे मी समजू शकतो; पण कोणते तुकडे कसे वापरले जात आहेत आणि ते तुकडे माझ्या विचाराचे प्रातिनिधिक आहेत किंवा नाहीत हे तपासण्याचा अधिकार मला असला पाहिजे. 'न्यूज ट्रॅक' व्यवसाय आहे, लोकांकडून विनामोबदला तास दोन तासाचे चित्रण घ्यायचे आणि त्याची मनमानी वासलात लावायची हे

कोणी कसे कबूल करेल?

याला एक पर्याय आहे, माझी मुलाखत तुम्हाला घ्यायची असेल तर तासाला माझा अमुक अमुक दर आहे, तितके पैसे टाका आणि मग तुम्हाला पाहिजे तो भाग वापरा किंवा सगळी मुलाखत कचऱ्याच्या पेटीत टाकून द्या. माझी फी आणि एक प्रत मिळाल्यानंतर टीव्हीवर प्रत्यक्षात तुम्ही काय दाखवता यात लुडबूड करण्याचे मला काही कारण नाही. माझी बौद्धिक संपदा ठरावीक फी देऊन मी तुम्हाला देतो, त्यानंतर तुम्ही पाहिजे त्या मर्कटचेष्टा करू शकता!

डंकेल प्रस्तावावर कार्यक्रम करणाऱ्या या पत्रकारांना बौद्धिक संपदेचा हक्क ही कल्पना मुळात मान्य नाही. कॅमेऱ्याच्या नावीन्याच्या ताकदीवर मोठ्यामोठ्यांशी बैठकी जमवाव्यात आणि कोणताही अभ्यास न करता वेगवेगळ्या मुलाखतींच्या गोधड्या शिवाव्यात अशी इलेक्ट्रॉनिक पत्रकारिता उदयाला येत आहे.

इलेक्ट्रॉनिक्सने प्रसाराच्या रस्त्यातील भिंती दूर केल्या, वास्तवाच्या व्यभिचाऱ्यांना रोखण्याची ताकद 'इलेक्ट्रॉनिक्स'मध्ये नाही, ती लोकांमधूनच यावी लागेल.

(२९ एप्रिल १९९४)

■■

भारताचा रशिया करू पाहाणाऱ्यांना रोखा

एखाद्या बड्या घरचे दिवाळे निघाले म्हणजे रोजचा पोटापाण्याचा खर्च चालविण्यासाठीसुद्धा, वैभवाच्या काळात पूर्वजांनी जमा केलेल्या मौल्यवान चिजा बाजारात नेऊन विकाव्या लागतात. जडजवाहीर, जमीनजुमला, भार गालिचे, चित्रे, एवढेच नव्हे तर पुरातनत्वामुळे केवळ अमोल असणारे सामान एकएक करत काढले जाते. मोठ्या घरच्या वस्तू असल्यामुळे उघडउघड बाजारात त्या ठेवता येत नाहीत, मग घरच्या दिवाणजीमार्फत पदराआड लपवून त्या बाहेर पाठविल्या जातात. पुष्कळदा दिवाणजी आणि नोकरदार स्वत:च्या खात्यावर मालकांच्या मौल्यवान वस्तू बाजारात खपवतात.

सा रम्या नगरी

पूर्वाश्रमीच्या सोविएत संघाची स्थिती आज अशीच आहे. जुने सारे वैभव रसातळाला गेले. ती रम्य नगरे; ज्यांचे नाव ऐकताच थरकाप उडे असे हुकूमशहा; ती मांडलिक राष्ट्रांची प्रभावळ, आता सारे संपले आहे. डॉलरच्या बरोबरीने मिरवणारा रुबल १५ दिवसांपूर्वी ५ पैशाच्या बरोबरीचासुद्धा राहिला नव्हता. शासनाचा सूटसबसिड्यांचा कार्यक्रम चालूच आहे. त्यासाठी चलनी नोटा छापण्यावर थोडेफार तरी बंधन राहिले आहे, ते नोटा छापण्यासाठी लागणाऱ्या कागदाच्या तुटवड्यामुळे.

खाद्यपदार्थांचे दुर्भिक्ष चालूच आहे; पिण्याचे पाणी मिळू शकत नाही आंघोळीच्या घंघाळात साठवून ठेवलेले पाणी पुन्हा पुन्हा वापरून गृहिणींना गुजराण करावी लागत आहे. समाजवादी महासत्तेची आजची ही परिस्थिती अटळ होती, अपरिहार्य होती हे जाणणाऱ्यांच्या सुद्धा 'कालाय तस्मै नम:' असे मनात येऊन डोळ्यांत पाणी उभे राहते.

ॲटमबॉम्ब चोर-बाजारात

साहजिकच, बड्या घरची सारी वैभवाची चिन्हे गुजराण चालविण्यासाठी बाजारात येत आहेत. हिरव्या पाचूंच्या खाणीबद्दल रशियाची प्रसिद्धी आहे. खाणीच्या कामगारांनीच चोरून ठेवलेले अमोल पाचू पश्चिमी देशांच्या बाजारात चोरीछुपे येऊ लागले आहेत. सोविएत संघाची वैभवाच्या काळांतली आर्थिक ताकद खरोखरची किती होती, याबद्दल मतभेद असू शकतात; पण ते राष्ट्र लष्करीदृष्ट्या महासामर्थ्यवान होते यात कोणाला शंका नाही. लष्करी शस्त्रास्त्रे तयार करण्याच्या ग्रुप कारखान्यांत शास्त्रज्ञांना आज १०० डॉलरसुद्धा पगार मिळत नाही. हे सगळे शास्त्रज्ञ आणि कुशल कारागीर कारखान्यात तयार होणारी सर्व प्रकारची शस्त्रे कोणाही ग्राहकाला जागतिक किमतीच्या तुलनेने अगदी स्वस्तात विकायला तयार आहेत.

MIG-29 सारखी लढाऊ विमाने खासगीत तेथे विकली जातत. अतिरेक्यांमध्ये लोकप्रिय असलेल्या AK-47, AK-57 अशा बंदुकांची सर्रास विक्री चालू आहे. एवढेच नव्हे तर, ॲटमबॉम्ब तयार करण्याकरिता लागणारे प्लुटोनियम - रेडिअमदेखील या भंगार बाजारात सहजपणे उपलब्ध होऊ शकते.

कटू सत्याचा वक्ता दुर्मीळ

रशियन नागरिकांचा स्वाभिमान कमालीचा दुखावला गेला आहे; पण अर्थकारणात खोटेपणाला आणि लटपटपंचीला वाव नाही. काय पडतील ते कष्ट सोसून रशियन लोकांची उत्पादकता वाढविल्याखेरीज आणि रशियज मालाची गुणवत्ता सुधारण्याखेरीज आजच्या अरिष्टातून निघण्याचा दुसरा काही मार्ग नाही; पण हे अप्रिय सत्य लोकांना पटावे कसे? आणि पटवून सांगावे कुणी?

ठाकरे-जॉर्ज फर्नांडिस युती

भारतासारख्या देशातदेखील हे काम कठीण आहे. "आमचे कारखानदार चोरून आणलेल्या तंत्रज्ञानाच्या मदतीने निराधार ग्राहकाला लुटतात; हिंदुस्थानात उद्योजक कारखानदार कोणी नाहीच; ५० वर्षे संरक्षणाच्या प्रचंड भिंतींच्या आड लपून गब्बर झालेली मंडळी सपाट मैदानाची, एवढेच नव्हे तर खास सोयीसवलतीची व संरक्षणाची मागणी करीत आहेत; येथे उद्योजक कोणी नाही; येथे कोणी शस्त्रज्ञ नाही." असे म्हटले तर लोक मोठे दुखावतात आणि राष्ट्राभिमानाचा खोटा आव आणून, आवाज चढवून बोलू लागतात. हिंदुस्थानसारख्या सर्वमान्य मागासलेल्या देशात लोकांची ही स्थिती, तर रशियातील लोकांना असली भाषा

कशी पटावी? लोकांना पटणारी भाषा बोलणारे हृदयसम्राट झिरिनॉव्सकी झपाट्याने उदयाला येत आहेत.

हिंदुस्थानातही खुली व्यवस्था आणि जागतिक व्यापाराचे खुलीकरण यावर स्थानिक हृदयसम्राट बेफाट बोलू लागले आहेत. शिवसेनेचे हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचाही आता 'स्वदेशी' अभिमान उफाळून आला आहे आणि त्यांनीही आपला डंकेलला विरोध असल्याचे जाहीर केले आहे. खुलीकरणाला सर्व स्मग्लर, कारखानदार आणि त्यांचे दोस्त इत्यादींचा विरोध असावा हे साहजिकच आहे. लायसेंस-परमीटचे राज्य संपले, की चोरबाजारातील दादांना कोण विचारतो? सोन्याच्या आयातीवरील बंदी उठली, की निम्मे तस्कर बुडीत जातात, रुपया खुला झाला, की हवाला कारभाराला कुलूप लागते आणि परदेशी स्पर्धा करायची म्हटले, की येथील कारखानदारांचे हातपाय कापू लागतात. हे सगळं समजण्यासारखं आहे. या मंडळींची विवेकाची आणि अभ्यासाची परंपरा नाही. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षा ती काय ठेवायची?

समाजवादी उरले ते काय अभागी देशांत

आश्चर्य आहे ते समाजवादी-साम्यवादी मंडळींच्या कोडग्या धारिष्ट्याचे. जन्मभर ज्या व्यवस्थेचा आपण जयजयकार केला ती समाजवादी, संरक्षणवादी, कल्याणवादी, सरकारवादी व्यवस्था बिनबुडाची होती; तो खुळचट प्रयोग जिद्दीने यशस्वी करण्याच्या आग्रहापोटी कोट्यवधी लोकांची कत्तल झाली, कितीजणांची आयुष्ये उद्ध्वस्त झाली त्यांचा हिशेब नाही. रशियासारखा देश, ज्याचा पराभव ना नैपोलियन करू शकला, ना हिटलर; त्याला साम्यवादाने पार बेचिराख केले. खुद्द रशिया आणि चीनमधील साम्यवादी मंडळी सारा समाजवादी अभिनिवेश गुंडाळून ठेवून खुल्या अर्थव्यवस्थेकडे हिमतीने वाटचाल करू लागली; पण याचे भारतातील जॉर्ज फर्नांडिसना काहीच सोयरसुतक नाही; खुल्या व्यवस्थेला अतिरेकी विरोध उभा करण्याचा त्यांचा अट्टहास चालू आहे. नेहरू व्यवस्था पुरेशी समाजवादी नाही, भांडवलदारीच आहे म्हणून तिच्यावर पन्नास वर्षे तुटून पडणारे 'लालभाई' खुल्या व्यवस्थेपेक्षा नेहरू व्यवस्थाच परवडली म्हणून तिचाच उदोउदो करीत आहेत.

धनदांडग्यांचे म्होरके

जॉर्ज फर्नांडिस कामगारांचे पुढारी. कामगारांनी काम कमीत कमी करावे, शक्यतो करूच नये; लायसेंस-परमीट व्यवस्थेमध्ये कारखानदारांना मिळणाऱ्या गडगंज नफ्यातील मोठा हिस्सा संप वगैरे करून बळकावून घ्यावा. यालाच

क्रांतिकारी श्रमजीवींची चळवळ म्हणावे आणि आपण त्यांचे नेते म्हणून मिरवावे हे त्यांचे जन्मभराचे ब्रीद. गेल्या ५० वर्षांत धनदांडग्या बनलेल्या कामगारांचे हितरक्षण करण्याकरिता त्यांनी धडपडावे हेही ठीक आहे. खुल्या व्यवस्थेत सरकारी नोकऱ्या कमी करावे लागतील. त्यांचे भरमसाट रोजगार, पगार, भत्ते संपतील हे उघड आहे. हे सगळे झाल्याखेरीज देश टिकूच शकणार नाही; त्याचा रशिया होईल; पण तरीही संघटित कामगारांचा धनदांडगेपणा टिकून राहावा म्हणून या मंडळींनी प्रयत्न केले तर, समजण्यासारखे आहे.

कारखानदारांचे नेते जॉर्ज फर्नांडिस

पण घडते आहे नेमके उलट. अमेरिकेसारखे भांडवलशाही देश हिंदुस्थानातील कामगारांची मजुरी वाढली पाहिजे अशी मागणी करतात. हिंदुस्थान सरकार त्याला विरोध करते आणि कामगारांचे वेतन वाढविण्याचा अमेरिकेचा प्रस्ताव फेटाळला गेल्याबद्दल टाळ्या वाजविण्यात आणि सरकारचे अभिनंदन करण्यात डावी मंडळी अग्रेसर राहतात हे म्हटले तर अद्‌भुत, म्हटले तर महाभयानक दृश्य आहे.

देशातील यच्चयावत् कारखानदारांना विरोध करणारे कामगार नेते एकदम कारखानदारांचे पक्षपाती बनले आहेत. 'कोका कोला' आल्याने 'थम्सअप'चे काय होईल याची चिंता त्यांना जाळू लागली आहे. परदेशी साबणाच्या आक्रमणाला गोदरेज बिचारे तोंड कसे काय देतील, याची चिंता त्यांना पडली आहे. नेहरू व्यवस्थेत कारखानदार आणि संघटित कामगार यांच्यात खरे भांडण कधी नव्हतेच; दोघे मिळून देशाला लुटण्याचे काम करत होते हे स्पष्ट झाले.

आश्चर्य वाटते ते रशियातील भयाण परिस्थिती डोळ्यासमोर असताना हिंदी 'लालभाई' नियोजन व्यवस्थेचे समर्थन करू शकतात, याचे. त्यांना सभेत कुणी खडसावून प्रश्न विचारत नाही. रशियाचे तोंड फाटेपर्यंत गुणगान करणारे 'साथी' वर्षानुवर्षे खोटे का बोलत राहिले याचा जाब विचारला जात नाही. खुल्या व्यवस्थेने प्रश्न सुटेल किंवा नाही ते माहीत नाही; पण सरकारी नियोजनाने देशाचे नुकसान होईल यात काही शंका नाही, असे त्यांना परखडपणे कोणी सांगत का नाही?

खुलेकरणाला विरोध करत आहेत, बंदिस्त व्यवस्थेमध्ये गब्बर झालेले. त्यांचा विरोध तोडण्यासाठी हुकूमशाही व्यवस्था उपयोगी पडते, असा निष्कर्ष आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या एका अभ्यासात निघाला आहे. खुल्या व्यवस्थेला हुकूमशाही भावते असे आज दिसते, कारण ज्यांना खुलेकरणही हवे आणि

लोकशाहीही हवी आहे, ते हुंब बनू शकत नाहीत, त्यांची स्वाभाविक ऋजुता आणि सौजन्य लोकशाही हक्क बजावण्याच्या आड येतात. नेहरूंपासून खालपर्यंत सर्व समाजवाद्यांचे पुतळे उखडून टाकण्याची चळवळ सर्व स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी हाती घेतली असता, स्वातंत्र्याच्या विरोधकांना खडसावले असते तर लोकशाहीतही अल्पसंख्याकांच्या झुंडगिरीविरुद्ध बहुजनांचा आवाज उठू शकला असता. याउलट सामान्य माणसेही पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्याप्रमाणे, "खुलेकरण आमचे ध्येय आहे; पण सरकारची कल्याणकारी कार्यक्रमांची जबाबदारी नाकारता येणार नाही." असली भाषा बोलू लागले तर हिंदुस्थानचा रशिया होण्यास फारसा अवधी लागणार नाही.

(६ मे १९९४)

■■

खुल्या व्यवस्थेची टिंगल करणारे भोंगळ राष्ट्रवादी

डंकेल प्रस्तावाचे प्रकरण खूप गाजून गेले. करारावर सह्या झाल्या तेव्हा खरे म्हटले तर वाद संपायला पाहिजे होता; औपचारिक कार्यक्रम अजून व्हायचा आहे असे सांगून डंकेलविरोधक अजूनही आरडाओरडा करीत आहेत. असा आरडोओरडा करण्यात कुणाला आनंद वाटत असेल तर तो त्यांना उपभोगू द्यावा. त्यांच्या सुखात व्यत्यय कोणी का म्हणून आणावा? शिमगा संपला तरी कवित्व चालू राहणारच.

एखादा सिनेमा गाजला, की त्या सिनेमाच्याच नावाने चित्रपट भाग-२, काढला जातो. 'गॉडफादर' सिनेमा गाजला तेव्हा 'गॉडफादर - २' निघाला. पूर्वपुण्याईने तोही बरा चालला, मग 'गॉडफादर भाग-३' निघाला. डंकेल प्रकरण इतके गाजले, की त्याचा भाग-२ निघावा हे साहजिकच आहे. डंकेल साहेब गॅटच्या प्रमुख पदावरून निवृत्त झाले, त्यांच्या जागी सुदरलँड साहेब आले, तेही दोनचार वर्षांत निवृत्त होऊन जातील. या प्रकरणाचा दुसरा भाग कुणाच्याही लेखणीने लिहिला गेला, तरी त्याचे नाव डंकेल भाग-२ म्हणूनच गाजावे!

आता प्रश्न माणसांच्या देवघेवीचा

डंकेल प्रस्तावात चर्चा झाली ती जागतिक व्यापार, विशेषत: शेतीमालाचा व्यापार खुला करण्याची, राष्ट्राराष्ट्रातील गुंतवणूक सुलभ करण्याची, सेवासंस्था परस्परांच्या भूमीवर उभ्या करण्याची आणि बौद्धिक संपदेच्या क्षेत्रातील चोरबाजार बंद करण्याची. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रातील भिंती दूर व्हाव्यात यासाठी चर्चांच्या फेरीवर फेरी झालेल्या आठव्या फेरीच्या मंथनातून निघालेले लोणी. नववी फेरी १९९६ मध्ये चालू होईल, ती कधी संपेल हे कसे सांगावे? संपली तर वर्षा दोनवर्षांत संपेल. लागल्या तर वर्षांच्या एकदोन पंचकड्याही लागून जातील. तिची अंमलबजावणी एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात कधीतरी

सुरू व्हावी अशी अपेक्षा आहे.

डंकेल प्रस्तावाच्या अंमलबजावणीनंतरही खुला व्यापार, खुली गुंतणूक, सेवांची खुली देवघेव यांच्या मार्गातील अनेक अडथळे राहिलेले आहेत, ते क्रमाक्रमाने, सर्वसंमतीने आणखी कमी करण्याचा प्रयत्न नवव्या फेरीत चालूच राहिल. आठव्या फेरीत व्यापारापेक्षा बौद्धिक संपदेच्या हक्काचा प्रश्न गाजला. नवव्या फेरीत प्रश्न गाजणार आहे तो लोकांना एका देशातून दुसऱ्या देशात खुलेपणाने येण्याजाण्याची मुभा देण्याचा, गंमत अशी होणार आहे, की डंकेल प्रस्तावावरील चर्चेत राष्ट्रीयतेचा आणि स्वदेशीचा उद्घोष करणारे विदेश प्रवासाच्या प्रश्नावर टोप्या फिरवून चटकन आंतरराष्ट्रीयवादी बनणार आहेत.

वस्तू आणि सेवा यांचा खुला व्यापार याबरोबरच लोकांनाही खुलेपणाने पाहिजे त्या देशात जाता आले पाहिजे, काम करण्याचा परवाना, 'सफेद कार्ड,' 'हिरवे कार्ड' असले काही निर्बंध राहूच नयेत, निदान कमी व्हावेत असा एक प्रस्ताव आहे. या प्रस्तावाबद्दल मोठी गरमागरम खडाजंगी उडणार आहे.

जनप्रवाहांचा इतिहास, भूगोल

सर्वसाधारणपणे ज्या त्या देशाचे नागरिक आपापल्या देशात राहतात. युरोपीय लोक आज भारतासारख्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता भले आवर्जून सांगत असोत, पहिल्या महायुद्धाच्या काळापर्यंत तरी लोकांइतके विपुल कोणी नव्हते. त्यांची लोकसंख्या इतक्या भरमसाट वेगाने वाढत होती, की युरोप सोडून बाहरे पडण्याखेरीज त्यांना गत्यंतर राहिले नाही. अमेरिकेचे दोन खंड, ऑस्ट्रेलिया आणि आफ्रिकेचा काही भाग त्यांनी कायमचा व्यापून टाकला आहे. आशिया, आफ्रिका, मध्य-पूर्व या क्षेत्रात त्यांनी वसाहती स्थापल्या. दुसऱ्या महायुद्धानंतर या वसाहती खाली करून त्यांना परतावे लागले; पण जगातील तीन प्रचंड खंड आजतागायत त्यांनी व्यापलेले आहेत. उत्तर आणि दक्षिण ध्रुवाच्या आसपासच्या बर्फाळ प्रदेशावर त्यांनी आपले हक्क प्रस्थापित केलेले आहेत.

तांडे चालले जगण्यासाठी

वसाहतीच्या काळात शेतातील, खाणीतील अवजड कामासाठी त्यांनी आफ्रिकेतून काळे गुलाम काढून नेले आणि हिंदुस्थानसारख्या देशातून मोठ्या प्रमाणावर कंत्राटी मजूरही नेले. अमेरिकेतील गुलाम स्वतंत्र झाले, अमेरिकेतील निवासी बनले. तात्पुरत्या कामासाठी म्हणून गेलेली मजूर मंडळीही स्थानिक निवासी बनली.

अमेरिकेच्या निसर्गदत्त विपुल संपत्तीचा पुरेपूर उपयोग करून घेता यावा यासाठी माणसांची गरज होती, देशोदेशीच्या जनांना अमेरिकेत जाऊन राहण्याचे अनिर्बंध स्वातंत्र्य अनेक वर्षे होते. न्यूयॉर्क बंदरातील स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा एका हातात मशाल घेऊन सर्व जगातील 'थकल्या भागलेल्यांना' आपल्या कुशीत येण्याचे आमंत्रण देत आजही उभा आहे; पण अमेरिकेतील प्रवेश मात्र खुला राहिलेला नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर एका बाजूला अमेरिका आणि दुसऱ्या बाजूला बाकीचे जग यांज्यात इतका मोठा फरक पडला, की चोहोबाजूंनी 'थकल्या भगलेल्यांचे' लोंढेच्या लोंढे अमेरिकेत वाहू लागले. समाजवादी राष्ट्रांनी पोलादी पडदा उभारल्यानंतर लक्षावधींनी राजकीय निर्वासितही तेथे जाऊन थडकले.

युरोपीय देशांनी आफ्रिका, आशिया खंडातील आपल्या वसाहती गुंडाळल्या; पण वसाहतीच्या काळात अनेक वसाहतीतील एतद्देशीय लोक साम्राज्यकर्त्यांच्या देशात जाऊन उतरले होते. मार्शल योजनेनंतर भरभराटीची झेप घेणाऱ्या युरोपीय देशांना अवघड, अवजड आणि अस्वच्छ कामासाठी परदेशांतून स्वस्त मजूर आणण्याची आवश्यकता भासली. स्पेन, इटली, तुर्कस्तान, ग्रीस या युरोपीय मागास देशातून फार मोठ्या संख्येने मजूर उत्तरेकडे गेले, पुष्कळसे स्थायिक झाले. पेट्रोल क्रांतीनंतर मध्य-पूर्वेत भरभराट सुरू झाली आणि तेथेही गरीब देशातील कुशल कामगार मोठ्या संख्येने भरती झाले.

परदेसिंयों से ना अंखियाँ मिलाना

लोकांच्या विदेशगमनाने काही मोठे कठीण आणि नाजूक प्रश्न तयार होतात. दुसऱ्या देशात जाऊन राहिले तरी आपल्या मातृभूमीची आठवण इतकी सहज पुसली जात नाही. 'ए मेरे प्यारे वतन!' अशी आर्त हाक सगळ्याच विदेशवासीयांच्या मनात कोठेतरी उठत असतचे. 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा! प्राण तळमळला!' अशी सावरकरी आर्तता आजच्या अनिवासी भारतीयांच्या मनाला कळ लावीत नसेल; पण विदेशातील सर्व संपन्नता समोर असूनही आपले गाव, तेथील झाडे, रस्ते, डोंगर, नद्या यांची आठवण येतेच. अमेरिकेत राहून गणेशोत्सव करावा, मंगळागौरीच्या रात्री जागवाव्या, मराठी नाटके बसवावीत असे वाटत राहतेच. परिणामतः सगळे विजनवासी नव्या देशात शक्यतो आपल्या देशबांधवांच्या वस्तीत जवळपास राहतात. आपले असित्व आणि अस्मिता टिकवण्याचा प्रयत्न करीत राहतात.

यजमान देशाच्या रहिवाशांना संस्कृतीच्या जपणुकीचा हा सवतासुभा फारसा

आवडत नाही. परदेशी कामगार कमी मजुरीत अधिक काम करण्यासाठी तयार असतात, बहुधा अधिक कर्तबगारही असतात याचे यजमान देशातील अन्नसौकर्याने सुस्तावलेल्या लोकांना मोठे वैषम्य वाटते. नवीन पिढीत आपली मुले-मुली परदेशी लोकांशी संबंध जोडतात. हे तर बहुतेकांना नापसंत असते. युरोप-अमेरिकेतील सगळ्याच देशांत आता प्रवेशावर बंधने आहेत, एवढेच नव्हे तर जवळजवळ प्रत्येक देशात परदेशी लोकांना काढून लावण्याकरिता 'फॅसिस्ट' पद्धतीच्या चळवळी जोर धरीत आहेत. पाश्चिमात्य कारखानदारांना मात्र बाहेरचे स्वस्त मजूर आपल्या देशात यावेत असे वाटते.

इंडियन स्वप्न - 'हिरवे कार्ड'

हिंदुस्थानसारख्या तिसऱ्या जगातील देशात, विशेषत: तरुणतरुणींना परदेशगमनाचे मोठे आकर्षण वाटते. उच्चशिक्षित असोत का कारागीर, व्यापारी असोत की मजूर, युरोप, अमेरिकेसारख्या पुढारलेल्या सुसंस्कृत देशात जायचे असो, की ओमान, दुबईसारख्या मध्ययुगीन सरंजामशाही देशांत, लोकांना परदेशी जाण्याची मोठी उत्सुकता असते. तिसऱ्या जगातील सुशिक्षित आणि कुशल कामगार आणि पहिल्या जगातील कारखानदार या दोघांचे हितसंबंध जुळतात. दोघांनाही जगभरची विदेशगमनावरील बंधने ढिली व्हावीत असे वाटते. हिंदुस्थानात तर डॉक्टर, वकिलांपासून परिचारिका, गवंडी, मजूर इथपर्यंत सर्वांना 'विजा' आणि 'ग्रीनकार्ड' मिळणे म्हणजे 'स्वर्गद्वार अपावृतम्' असा आनंद वाटतो.

'स्वदेशी' आंतरराष्ट्रीयीकरण

डंकेल प्रकरण भाग-२ चर्चेत दोन उघड तट पडतील. आपापल्या देशाची अस्मिता राखून आपल्या विशेष शैलीने विकास साधू इच्छिणारे सर्वजण सुलभ विदेशगमनाच्या सवलतींना विरोध करतील. विदेशगमनाने गरीब राष्ट्रांच्या बुद्धिसामर्थ्यांची गळ होईल. खुली व्यवस्था करणे म्हणजे राष्ट्रांचे विसर्जन नाही, राष्ट्राराष्ट्रातील वाढते सहकार्य आहे, असे मांडतील.

याउलट विदेशगमन कोणालाही केव्हाही खुलेपणाने करता आले पाहिजे, हे स्वातंत्र्य प्रस्थापित झाले पाहिजे असा पक्ष दुसरी बाजू मांडेल.

गंमत इथेच आहे. डंकेल प्रस्तावांना विरोध कोणी केला? 'भारता'ला लुटण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या 'इंडिया'वाद्यांनी केला; पण हा देश सोडून साहेबाच्या देशातच जाऊन राहण्याची संधी मिळत असेल तर ती 'इंडिया'वाद्यांना अधिक आकर्षक वाटणार! 'राष्ट्रवाद' आणि 'स्वदेशी'च्या ललकाऱ्या देऊन स्वार्थाचे

तत्त्वज्ञान करणारे डंकेलविरोधक दोन वर्षांत 'आंतरराष्ट्रीयवादी' बनणार आहेत आणि वस्तू व सेवांच्या खुल्या देवघेवीपेक्षाही माणसांची खुली ये-जा जास्त महत्त्वाची आहे असे मांडताना दिसणार आहेत. १५ एप्रिल १९९४ पर्यंत आपल्या देशाच्या सरहद्दी मजबूत राहिल्या पाहिजेत असे म्हणणारे त्या भिंतीतून पलीकडे निसटण्याची शक्यता दिसताच आपले झेंडेही बदलणार आहेत आणि घोषणाही बदलणार आहेत. खुल्या व्यवस्थेची कुचेष्टा करणारे एका रात्रीत 'आंतरराष्ट्रीयवादी' बनणार आहेत, हे माझे भाकीत आहे.

(१२ मे १९९४)

■■

'हरिजन'वरील वाद अनाठायी

गावाच्या वेशीबाहेर शतकानुशतके ठेवल्या गेलेल्या समाजांना काय नावाने संबोधावे हा मोठा नाजूक, कठीण आणि क्लिष्ट चर्चेचा विषय अनेक वर्षे चघळला जातो आहे. कांशीराम आणि मायावती यांनी अलीकडे 'हरिजन' शब्दाचा प्रयोग करणाऱ्या महात्मा गांधींवरही ते तुटून पडत; या जातीचा उल्लेख 'दलित' म्हणूनच झाला पाहिजे असा आग्रह धरला, तेव्हापासून या प्रश्नाला पुन्हा एकदा उकळी फुटली आहे एवढेच.

फुकटची 'महारकी'

नामाभिधानाचा प्रश्न किती नाजूक आहे याचा अनुभव संघटनेच्या कामात अगदी सुरुवाती सुरुवातीलाच मला आला. "शेती परवडत असती तर निवडणुका लढवून पुढारी होण्यासाठी कोणी धडपड केली नसती; शेतीत काही भेटत नाही, पुढारी बनले म्हणजे चंगळ होते म्हणून लोक राजकारणाकडे वळतात; नाहीतर पुढारीपणाची फुकटची उठाठेव करायला कोण जाईल? या लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजेल?" ही कल्पना मांडण्याकरिता मराठीतील एका फार जुन्या वाक्प्रचाराचा मी एका सभेत उपयोग केला. "नाहीतर ही फुकटची म्हारकी कोण करेल?" असा प्रश्न टाकला. भाषणानंतर एक तरुण मला भेटायला आला आणि त्याने वाक्प्रचार म्हणूनसुद्धा 'म्हारकी' शब्द वापरला जावा याचा विरोध केला. मुद्दा काही मला पटला नाही.

मुसलमान अमलात हिंदूंचा उल्लेख तुच्छतेने 'काफीर' व्हायचा म्हणून आम्हाला हिंदू म्हणू नका असा आग्रह कोणी धरला नाही. इंग्रजी अमदानीत 'भारतीय व कुत्रे यांना प्रवेश नाही' अशा पाट्या गौरकायांच्या खास राखीव जागात असत; पण म्हणून कोणी आम्हाला भारतीय म्हणू का असे कुणी म्हटले नाही. मग सनातन समाजाने ज्यांच्यावर अमानुष अत्याचार केले, त्यांनी आपल्याला

मिळालेल्या ऐतिहासिक नावाचा राग का करावा? 'तुमच्या महाराचा मी महार' असे चोखोबांनी म्हटले; मग 'महार' म्हणून ओळखले जाण्यात अपमान तो काय आहे? मांग-चांभार ही व्यवसायांची नावे आहेत, त्या नावात वाईट काहीच नाही; त्या व्यवसायांना हीनता आली म्हणून ती नावे हीन बनली; पण, महार समाजाची कलाकार म्हणून कीर्तीही आहे. ब्रिटिश फौजेत महार बटालियनची शौर्याची कामगिरी मोठी सन्मानली जात असे. मग केवळ मराठी वाक्प्रचार वापरला गेला तर त्यात दुखावले जाण्याचे काही कारण नाही. 'फुकटची म्हारकी करायला लागणे' या वाक्प्रचारातल्या जातीचा उपमर्द नाही, उलट तिच्यावर होणाऱ्या घनघोर अन्यायाची जाणीव दाखविली आहे; अशा वाक्प्रचारांना तरी विरोध असू नये. महारांनी 'महार' अभिमानाने म्हणवून घेतले पाहिजे; सवर्णांनाच आपल्या जातीचे नाव सांगायला शरम वाटली पाहिजे. इ. इ. त्या तरुणाला पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला; पण व्यर्थ.

राजवाड्याचे रहस्य

शेतीमालाच्या भावाचा लढा हाती घेऊन निघालो असता दुसऱ्या कोणत्याही मुद्यावर लक्ष विचलित होऊ देणे मला परवडण्यासारखे नसल्याने तो विषय मी सोडून दिला. दुसऱ्या एका सभेत पूर्वानुभवाने शहाणा झाल्यामुळे 'हरिजन' हा महात्माजींनी प्रचारात आणलेला शब्द वापरला. तेथेही विरोध करण्यासाठी एक तरुण भेटायला आला. महाराष्ट्रभर गावोगावी वेशीबाहेरच्या समाजात माझ्याविषयी मोठे प्रेम आहे. बहुतेक गावांत मी गेलो म्हणजे तेथील स्त्रिया प्रथम ओवाळायला येतात. त्यामुळे नामाभिधानाचा हा प्रश्न नाममात्रच त्रास देऊन गेला. महार एके काळी राज्यकर्ते होते; त्यामुळे गावोगावच्या त्यांच्या वस्तीस 'राजवाडा' म्हणतात. याचा उपयोग करून घेऊन 'गावठाण-राजवाडा' ऐक्याच्या कार्यक्रमात वेशीबाहेरील समाजाला नाव देण्याचे कुशलतेने टाळण्यात आले.

ल्यबन्त का कभूधावि?

महाराष्ट्रात बहिष्कृत समाजाचा प्रश्न श्री. म. माटे यांनी फार चिकाटीने हाताळला. परंपरागत रूढ शब्द 'अस्पृश्य' म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य अशा अर्थाचा होता. माट्यांनी 'अस्पृष्ट' म्हणजे आजपावेतो स्पर्श न झालेला असा शब्द आग्रहाने वापरला; पण दुसऱ्या कुणीच माट्यांचा शब्द उचलला नाही. कारण 'अस्पृष्ट' शब्द यथार्थ नव्हताच. शिवाशिवीचे प्रकरण पूर्णपणे कडकपणे पाळण्याचे दिवस केव्हाचं संपलेले होते; एका सबंध समाजाला स्पर्श न झालेले असे म्हणणेही चुकीचे होते. त्यांना स्पर्श झाला नसेल तर तो

सवर्णांचा; पण म्हणजे त्यांना कधी कोणाचा स्पर्श झालाच नाही हे खरे नाही. 'अस्पृष्ट' शब्द बाद ठरला.

खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही हा नामाभिधानाचा प्रश्न खूप सतावून गेला. त्यांच्या लिखाणात त्यांनी अस्पृश्य आणि महार, मांग असे जातिवाचक शब्द सरसकट वापरले. इंग्रजी भाषेचा आधार घेऊन Depressed Classes असा शब्द त्यांनी वापरला. नंतर संबंधित जमातींची जंत्री १९३५ च्या कायद्यात परिशिष्टात देण्यात आली तेव्हा त्यांनी या समाजांचा उल्लेख 'शेड्यूल कास्ट्स (अनुसूचित जाती)' म्हणून केला. शेवटी बौद्ध धर्म स्वीकारून 'नवबौद्ध' शब्द तयार केला.

गांधीजींच्या बाबतीत तर हा प्रश्न आणखीच बिकट होता. गांधीजी स्वत:ला सनातनी हिंदू मानत असत. हिंदू धर्माचे स्वरूप वर्णाश्रम धर्माचे आहे. त्यामुळे चातुर्वर्ण्यालाही त्यांची मान्यता होती. विशुद्ध अवस्थेतील चातुर्वर्ण्य कोणाही जातिवर्णावर अन्याय करणारे नव्हते. चातुर्वर्ण्य कोणालाही हीन मानत नाही; आपण सगळी ईश्वराची लेकरे आहोत; त्यात चौथ्या वर्णाचेही लोक आले. 'ही परमेश्वराची लेकरे' आहेत या अर्थाने गांधीजींनी 'हरिजन' शब्द वापरण्यास सुरुवात केली. गांधीजी संपादित असलेल्या साप्ताहिकाचे नावही 'हरिजन' होते.

हरिजन आणि सैतानपुत्र

गांधीजींच्या या प्रस्तावाने अडचण दूर झाली नाही. परंपरागत नावे वापरणे विनाकारण निषिद्ध मानले आणि त्याऐवजी दुसरे काही नाव वापरायला सुरुवात केली तर साहजिकच विचित्र प्रश्न उभे सहतात. मायावतीबाईंनी असा एक प्रश्न उपस्थित केला आहे. 'दलित', 'हरिजन' आहेत, 'परमेश्वराची लेकरे' आहेत; मग बाकीचे लोक काय 'सैतानाची लेकरे' आहेत? हा त्यांचा तर्कशुद्ध प्रश्न आहे. (हिंदू व्यवस्थेत ३३ कोटी देव आहेत; पण सैतान नाही ही विसंगती सोडल्यास) पण सर्वांनाच 'हरिजन' म्हटले तर 'बहिष्कृत समाजा'चा उल्लेख वेगळा करायचा झाल्यास शब्द कोणता वापरावा? हा प्रश्न कायमच राहतो.

नोकरीलक्ष्यी दलित चळवळ

आंबेडकरी परंपरेतील कार्यकर्त्यांना 'दलित' हा शब्द पसंत आहे; पण हा शब्दही योग्य नाही. 'दलित' काही केवळ काही ठरावीक जातीतच जन्मतात असे नाही; सर्व जातीत अन्यायाचे बळी आहेत. शिवाय, या जातींतील सगळे

आज दलित आहेत असेही नाही. प्रकाश आंबेडकर, रामविलास पास्वान यांना कोणीही दलित कसे म्हणू शकेल?

हा वाद खरा केवळ नावापुरता मर्यादित नाही. चौथ्या वर्णातील समाजांना भविष्यात काय स्थान राहणार आहे याबद्दल विचार भिन्न असल्यामुळे नावाविषयी वाद तयार होतो.

चौथ्या वर्णातील माणसे जास्त करून बलुतेदारी करतात. इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांचे उद्योगधंदे बुडाले. आर्थिक, सामाजिक विक्राळ अन्यायाला तोंड देण्याकरिता आंबेडकरांनी त्यांच्या अनुयायांना शहराकडे जाण्याचा सल्ला दिला. तेथे जाऊन त्यांनी काय करायचे? बलुतेदारीऐवजी आलेल्या उद्योगांचे लागणारे भांडवल त्यांच्याकडे नव्हते आणि तंत्रज्ञानही नव्हते. त्यांच्या परंपरागत कौशल्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन बाजारपेठेत त्यांना उद्योजक म्हणून उभे करणारी व्यवस्था मांडण्याऐवजी त्यांनी शहरात जाऊन नोकऱ्या मिळवाव्यात म्हणजे परंपरागत सामाजिक अन्यायातून त्यांची मुक्तता होईल, अशा विचाराची नोकरीलक्ष्यी दलित चळवळ उभी राहिली.

बन्सीधरा! आता तू कोठे जाशील?

याउलट, गांधीजींचा सल्ला 'गावाकडे चला' असा होता. स्वयंभू गावेच त्यांचे आदर्श जग होते. एक सारा बहुसंख्य समाज नोकऱ्या करून वर येईल अशा अजागळ कल्पनेवर त्यांचा विश्वास नव्हता.

आता गांधीजींच्या स्वावलंबी गावांच्या स्वप्नाचा पाडाव झाला आहे आणि मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या उपलब्ध करून देणाऱ्या समाजवादी व्यवस्थेचाही पाडाव झाला आहे. स्वत:च्या पायावर उभे राहून स्पर्धेला टक्कर देऊ शकणाऱ्या उद्योजकांचे नवे युग येते आहे. या खुल्या व्यवस्थेच्या समाजाचे नेतृत्व भारतीय उद्योजकांचे नवे युग येते आहे. या खुल्या व्यवस्थेच्या समाजाचे नेतृत्व भारतीय उद्योजकांकडे म्हणजे बलुतेदार समाजाकडे असावयास पाहिजे होते; पण त्यांचे व्यवसाय केव्हाच मोडून पडले आहेत आणि उद्योजकतेकडे जाण्याऐवजी नोकऱ्यांकडे धाव घेण्यास, सांगितले. काही काम न करता, उत्पादन न करता भरपेट पगार भत्ते मिळवून देणाऱ्या नोकऱ्यांचा जमानाही संपत आला आहे. माट्यांच्या कथेतील 'बन्सीधरा'प्रमाणे दलित समाज गावचा राहिला नाही आणि शहरातला बनला नाही. सगळ्या समाजाची आर्थिक कोंडी झाल्याने उदारमनस्कता संपली. परिणामत: पिढ्यान्‌पिढ्यांचे अन्याय दूर करायचे म्हटले तरी खळखळ सुरू होते.

हरिजन शरद जोशी

आजच्या दलित चळवळीला अर्थशास्त्राचे वावडे आहे. त्यांच्या म्होरक्यांना परंपरागत खालच्या समजल्या जाणाऱ्या जातीत अपघाताने जन्म मिळाल्याचा लाभ उठवायचा आहे. जातीचे नामाभिधान त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे; विद्यापीठाचे नामांतर महत्त्वाचे आहे; त्यांच्या समाजाचे काय व्हायचे असेल ते होवो.

मी माझ्यापुरता एक उपाय शोधून काढला आहे. मी परमेश्वर मानत नाही; तेव्हा स्वत:ला परमेश्वराचे लेकरू 'हरिजन' म्हणवून घेण्याचा मला काही अधिकार नाही; पण शब्दार्थाने पाहायचे झाले तर माझ्या नावापुढे श्रीमान किंवा श्री. असे उपपद लावून घेण्याचाही मला अधिकार नाही. कोणतेही उपपद लावले तर ते चुकीचेच होणार, मग 'हरिजन' हे उपपद का वापरू नये? माझ्याशी पत्रव्यवहार करणाऱ्या आणि एरवी माझा उल्लेख करणाऱ्या सर्वांना माझी विनंती आहे; सगळ्या जगापुढे मी जाहीर करतो; यापुढे मला श्री. शरद जोशी असे न संबोधता 'हरिजन शरद जोशी' किंवा नुसते 'ह. शरद जोशी' म्हणून संबोधण्यात यावे. श्री. हे उपपद माझ्या नावापूर्वी वापरल्यास माझ्या भावना दुखावतील.

(१३ मे १९९४)

■■

फटक्यांच्या शिक्षेतील माणुसकी

सिंगापूर एक स्वतंत्र श्रीमंत राष्ट्र मानले जाते. याचा आकार मुबई शहराएवढासुद्धा नाही. मलेशिया स्वतंत्र झाला, त्यानंतर सिंगापूर मलेशियातून वेगळे झाले, कोणताही भांडणतंटा न करता सामोपचाराने वेगळे झाले.

काही अजागळ सिद्धांत अनुसरण्याऐवजी हा चिमुकला देश सरळ कामाला लागला. स्वस्त मजुरीचा फायदा घेऊन श्रीमंत राष्ट्रांना लागणाऱ्या वस्तू आणि सुटे भाग स्वस्तात पुरवण्याची कारखानदारी सुरू झाली. आज इलेक्ट्रॉनिक आणि इतर काही क्षेत्रांत सिंगापूरमध्ये तयार झालेल्या मालावर अमेरिकन कारखानदारीसुद्धा अवलंबून राहते.

दोन महिन्यांपूर्वी या चिमुरड्या सिंगापूरचे पंतप्रधान आपल्या देशात भेट देण्यासाठी आले तेव्हा सारे पुढारी, कारखानदार इत्यादी मंडळी त्यांच्या अवतीभोवती नुसती आदाब घालत होती. सिंगापूरच्या पंतप्रधानांनी चांगल्या परखड शब्दांत त्यांना काही हिताच्या गोष्टी सांगितल्या आणि ते मोठे कडक आहेत. मादके बाळगणे हा मृत्यूदंडपात्र गुन्हा आहे. रस्त्यावरती थुंकले तरी प्रचंड दंड होतो. इकडे तिकडे घाण करणे याकरिता फटक्यांच्या शिक्षेचीही तरतूद आहे.

कायदा पुस्तकी दाखल होऊन बराच काळ झाला. वर्षाला पाचएकशे माणसांना फटक्यांची शिक्षा होते. सिंगापूरच्या रहिवाशांपैकी कोणाला फटक्यांची शिक्षा देण्याची फारशी वेळ येत नाही. मायकेल फे हा विशीतील अमेरिकन तरुण. सिंगापूर भेटीसाठी गेला आणि पुरे १० दिवस त्याने रस्त्यावर मोठा धुमाकूळ घातला. रंगाचे फव्वारे डबे घेऊन बाजूस उभ्या असलेल्या मोटारगाड्या वेड्यावाकड्या रंगवून टाकल्या. पोलिसांनी फेला पकडले. कोर्टापुढे उभे केले. त्याला चार महिने कैद, ७० हजार रुपये दंड आणि वर सहा फटक्यांची शिक्षा

सुनावली गेली आणि येथे एका मेठ्या नाट्यमय कथानकाला सुरुवात झाली.

सिंगापूरमध्ये फक्याची शिक्षा अरब राष्ट्रांप्रमाणे जाहीररीत्या दिली जात नाही. कैद्याच्या अंगावरून चड्डीखेरीज सगळे कपडे उतरवले जातात. किडनींना अपाय होऊ नये म्हणून खास पॅडस लावले जातात. निर्जंतुकात बुडवलेल्या १.२७ सेंमी जाडी आणि १.२० मीटर लांबीच्या दंडुक्याने फटके देण्यात येतात.

अमेरिकेची मग्रुरी आणि तत्त्वज्ञान

अमेरिकन तरुणाला फटक्यांची शिक्षा होणार असे कळताच अमेरिकेत मोठी खळबळ माजली. खुद्द राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी फेवर दया दाखवण्यात यावी अशी विनंती केली. फटक्यांची शिक्षा योग्य-अयोग्य याबद्दल मोठा वादविवाद चालू आहे. अशा कडक शिक्षांमुळे सिंगापूरने जी प्रगती साधली तिची सगळेजण शिफारस करतात. इंग्लिश शाळांचा अनुभव असलेले शिक्षकांच्या हातून खाल्लेल्या छड्यांच्या फटक्यांमुळे आपले आयुष्याचे कल्याण झाले असे आग्रहाने सांगतात. 'छडी वाजे छम् छम् विद्या येई घमघम्' या अर्थाच्या म्हणी प्रत्येक भाषेत आहेतच.

याउलट शारीरिक दंड देण्याची कल्पना बहुतेक भद्र लोकांना अमानुष वाटते. अशा शिक्षांना मान्यता मिळाली तर कैद्यांचा छळ करण्यासाठी त्याचा उपयोग होईल अशी त्यांना थोडीफार रास्त भीती पण वाटते. शरीरिक दंड झालेल्या माणसाला होतात त्यापेक्षाही जास्त वेदना त्याच्या जवळच्या नातेवाईक मित्रमंडळींना होतात. आपल्या कोणा प्रिय माणसास जाणीवपूर्वक ठरवून ठरावीक वेळी शरीरयातना दिल्या जाणार आहेत या कल्पनेनेच जवळच्या नातेवाइकांना आजारीपण ओढवते. इत्यादी युक्तिवाद अमेरिकेत केले जात आहेत. गमतीची गोष्ट म्हणजे फटक्यांची शिक्षा रानटी वाटणाऱ्या अमेरिकेत आजही मृत्युदंड रद्द झालेला नाही. विजेची खुर्ची, गॅस चेंबर अशा आधुनिक मर्गांनी मृत्युदंड दिला जातो; पण फटक्यांची शिक्षा मात्र त्यांना अमानुष वाटते.

या तक्रारीमागे एक महासत्तेचा दंभ आहेच. अमेरिकेच्या नागरिकाला एवढ्याशा चिमुरड्या देशात फटक्यांची शिक्षा होणे हा राष्ट्रीय अपमान आहे ही मनातली रुखरुख, तत्त्वज्ञान मात्र वेगळे, फटक्यांची शिक्षा जंगली आहे, सुसंस्कृत समाजात कोणत्याही गुन्ह्याकरिता दंड आणि कैद एवढ्याच शिक्षा असाव्यात, बाकीच्या सगळ्या शिक्षा मानवतेविरुद्ध आहेत. अमानवता कशात आहे आणि कशात नाही हे ठरवण्याचा स्वयंसिद्ध अधिकार अमेरिकींना आहे. इतर देशांनी आपला रानवटपणा आपल्या नागरिकांवर चालवावा. इ. इ. पण अमेरिकी नागरिकांवर

जगभर अमेरिकी कायद्यांचाच अंमल झाला पाहिजे ही मग्रुरी या बडबडीमागे लपलेली आहे.

अमेरिकन तुरुंगापेक्षा फटके परवडले

अमेरिकन तुरुंगामध्ये ज्यांनी काही काळ कंठला आहे अशांनी लिहिलेली वर्णने आणि आत्मचरित्रे उपलब्ध आहेत. अमेरिकन तुरुंगांची रचना बहुमजली पिंजऱ्यांसारखी असते, कोठड्या छान स्वच्छ असतात. अंथरूण, पांघरूनण, कपडे साफ स्वच्छ असतात. कैद्यांना मिळणाऱ्या जेवणाचा मेनू पाहून आमच्यापैकी भल्या मध्यमवर्गीयांच्या तोंडाला पाणी सुटले, वैद्यकीय सेवा उत्तम, अमेरिकन कैदेत काही काळ राहिलेल्या माणसाची दातांची निगा इतकी चांगली राखली जाते, की तुरुंगात राहिलेला माणूस त्याच्या दातावरून ओळखू येतो; पण संध्याकाळी एकदा कोठडीत परतले, की भयानक गुंडगिरीचे साम्राज्य न मानल्यास तुरुंगातही खून पाडले जातात. अमेरिकन कैदेत राहिला आणि समलिंगी संभोगाला बळी पडला नाही असा कैदी स्त्री किंवा पुरुष असणे जवळजवळ अशक्य आहे. मध्यंतरी हिंदुस्थानातील एक पुढारी, नेहरू घराण्याचा दोस्त श्री. युनुस यांच्या मुलाने अमेरिकेत काही पराक्रम गाजवले. त्याला दीर्घ मुदतीची कैदेची सजा झाली. अमेरिकन कैद म्हणजे काय भयानक अनुभव आहे याची शब्दचित्रे त्यावेळी आपल्याकडील वर्तमानपत्रात आली होती. पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावून युनुसपुत्राची सोडवणूक केली. अमेरिकन कैदेतील अत्याचारांना सामोरे जाण्यापेक्षा पाचपन्नास फटक्यांची शिक्षा पुष्कळ कैदी आनंदाने कबूल करतील.

अमेरिकी तुरुगपद्धतीबद्दल अनेक तक्रारी आहेत. तुरुंगात गुन्हेगारी बळावते, एका कैद्यावर ३०,००० डॉलरच्या आसपास वार्षिक खर्च होतो, कैदी आरामात राहतात आणि त्यांच्या गुन्ह्यांना बळी पडलेले आणि त्यांचे कुटुंबीय दारिद्र्यात आणि हालअपेष्टात दिवस काढतात हाही मोठा अन्याय आहे.

फटक्यांचा प्रथमपुरुषी अनुभव

थोडक्यात फटके म्हणजे अमानुषता आणि कैद म्हणजे सुसंस्कृतपणा हा समज काही खरा नाही; तरीही अमेरिकेतील वर्तमानपत्रे फटक्यांच्या शिक्षेविरुद्ध लिखाणांनी भरून गेली आहेत. फटक्यांच्या शिक्षेचा अनुभव घेतलेली माणसे त्या अनुभवाबद्दल तपशीलवार लिहीत आहेत.. ४० वर्षांचा एक माणूस २३ वर्षांपूर्वी म्हणजे तो केवळ १० वर्षांचा असताना त्याने सोसलेल्या फटक्यांच्या शिक्षेचा अनुभव लिहतो.

"त्या दिवशी दुपारी फटक्याची शिक्षा देणारे आम्ही पाचजण होतो. प्रत्येकाला मनात आशा वाटत होती, की आपली पाळी शेवटी यावी, कदाचित फटके मारणाऱ्याचे हात तोपर्यंत थोडेफार तरी थकून जातील. माझे दुर्दैव, मला पहिल्यांदाच नेण्यात आले."

दोन वॉर्डर्सनी मला धरून फटके मारण्याच्या खोलीकडे नेले, नंतर त्यांच्या आधाराखेरीज मला परत येता आलेच नसते. फटका मारणारा छडी दोन्ही हाताने वाकवून बघत होता, माझे पाय कापू लागले.

फटके मारणारा मोठा धिप्पाड आणि कमावलेल्या शेरीराचा होता. तो माझ्याकडे पाहत होता; पण मी त्याला दिसत नव्हतो. दुसऱ्या वॉर्डरने माझे कपडे उतरवले. एका लाकडी चौकटीला हातपाय बांधण्यात आले. माझ्या सगळ्या अंगास कापरे भरले होते आणि भीतीने घाम फुटला होता.

मग छडीचा आवाज मी ऐकला. एखादी सपाट फळी भिंतीवर आपटावी तसा. अर्ध्याएक सेकंदानंतर छडी माझा पृष्ठभाग फाडून घुसली आहे याची मला जाणीव झाली. मी किंचाळलो. एखाद्या पिसाळलेल्या प्राण्याप्रमाणे धडपडलो. काहीही करून येथून सुटून पळून जावे एवढी एकच इच्छा राहिली. मला बांधून ठेवले नसते तर पहिल्याच छडीच्या झटक्याने मी मैलभर तरी पळत गेलो असतो.

मी किंचाळ्या देतच राहिलो आणि फटके चालूच राहिले. एक फटका एक मिनिट काही फटके पूर्वीच्या फटक्यांच्या जागीच पडत आधीच फाटलेले कातडे आणखी फाटत जाई.

शिक्षा पार पडल्यानंतर एक डॉक्टरने काही निर्जंतुकं लावली. माझा पृष्ठभाग सुजून मूळ आकाराच्या दुप्पट झाला होता. मांड्या निळ्याकाळ्या पडल्या होत्या. दोन आठवडे मला बसता येत नव्हते, पाठीवर झोपता येत नव्हते, अंघोळ करता येत नव्हती, की साधी चड्डीसुद्धा घालता येत नव्हती.

राक्षसांचे योग्य पारिपत्य

आर्थर रोड, तिहार, नाशिक येथील तुरुंगात अट्टल खुनी, गुंड, कैदी तुरुंगात स्वत:करिता आलिशान कमरे बांधून घेतात. भरगच्च जेवण, मद्ये, मादके त्यांना उपलब्ध असतात. टेलिव्हिजन, टेलिफोन, वातानुकूलक, काहीच कमी नाही आणि त्याचवेळी या गुंडांच्या अत्याचाराला बळी पडलेले भाकरीला मोताद होऊन वणवण फिरत असतात आणि त्यांनी बलात्कार केलेल्या तरुणी आकांत फाटल्याप्रमाणे धाय मोकलून रडत असतात. ही चित्रे पाहिली म्हणजे आमच्या

कैदेपेक्षा सिंगापूरची फटक्यांची सजा मानवतेचा अधिक सन्मान करणारी आहे असे वाटते. निदान अजाण मुली आणि स्त्रिया यावर केवळ पाशवी ताकदीने बलात्कार करणारे आणि सरकारी सत्तेच्या माजात देशावर बलात्कार करणाऱ्यांसाठी फटक्यांची शिक्षा आणली पाहिजे, काही काळ तरी ठेवली पाहिजे. मानवतेचे हक्क गुन्हेगारांनाच आहेत आणि सामान्य जनांना नसतात असे थोडेच आहे!

(२० मे १९९४)

■■

तोट्यात चालणारे कारखाने आणि कारखानदार

घरोघर डास-ढेकूण मारण्याकरिता औषधाची फवारणी एका साध्या टीनच्या हातपंपाने होते. दोन पिढ्या तरी हा पंप, उत्पादक कंपनीच्या पॉयशा या नावाने ओळखला जातो.

हिंदुस्थानातील 'पॉयशा' कंपनीचे प्रमुख अजय कपाडिया यांनी ८ मे रोजी चर्चगेटजवळील त्यांच्या सहाव्या मजल्यावरील राहत्या घराच्या खिडकीतून उडी मारून आत्महत्या केली.

अजयचे वय फक्त ३९ वर्षे. घरी बायको आणि एक मुलगी. पैसा, सत्ता, तारुण्य कशाची ददात म्हणून नसलेल्या अजयने आत्महत्या का केली? 'पॉयशा' कंपनीची आर्थिक स्थिती नव्या जमान्यात मोठी कठीण झाली आहे. एकेकाळी घरगुती वापरासाठी हातपंपाला पर्यायय नव्हता. आता त्याच कामासाठी उदबत्त्या इलेक्ट्रिक तबकड्या, फवारे डबे, अनेक साधने बाजारात आली आहेत. त्यामुळे पॉयशा पंपाची मागणी घसरली, फायदा संपला. धंदा तोट्यात आला. यंत्रसामुग्री बदलून काही नवा माल बाजारात आणणे आणि अनावश्यक कामगारांवरील खर्च कमी करणे एवढ्या एका मार्गानेच 'पॉयशा' कंपनीचे आजारीपण दूर करता आले असते.

अशा अवघड काळी डॉ. दत्ता सामंत यांच्या युनियनने ठाण्याच्या 'पॉयशा' कारखान्यात संप चालू केला. हे एका अर्थाने कंपनीच्या पथ्यावर पडले. मंदीत संप होणे म्हणजे बुडत्या कारखानदारांना काडीचा आधारच; पण कामगारांच्या संपाचा दुसरा एक मोठा अनिष्ट परिणाम झाला.

टाटांचा प्रस्ताव फेटाळला

'पॉयशा' कंपनीतील कपाडियांच्या हातातील २९% भाग-भांडवल विकत घेण्याची तयारी टाटांच्या टीप्लेट कंपनीने दाखवली होती. देवाणघेवाणीच्या

वाटाघाटी चालू होत्या. मालकी आणि व्यवस्थापन बदलले तरी कामगारांचा प्रश्न सुटत नसेल तर कंपनीचा व्यवहार येणे अशक्य आहे हे उघड होते. वाटाघाटी रेंगाळत राहिल्या.

कामगारांचा संप सुरू झाला. कारखान्याचा तोटा १५ कोटींच्या वर गेला. तो पुढे चालवणे अशक्य झाले; पण कारखाना तोट्यात चालतो म्हणून तो बंद करण्याचे स्वातंत्र्य हिंदुस्थानातील उद्योजकांना नाही. त्यांना आपले प्रकरण औद्यागिक आणि वित्तीय पुनर्बांधणी मंडळा (BIFR)कडे न्यावे लागले.

अगदी अलीकडे मंडळाने 'पॉयशाचा' कारभार टाटांकडे देण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला. टाटा करीत असलेली गुंतवणूक त्यांना मिळणाऱ्या फायद्याच्या तुलनेने कमी आहे. या कारणास्तव प्रस्ताव फेटाळला गेला.

कामगारांच्या बोजापेक्षा मरण पत्करले

पुण्या-मुंबईसारख्या मोठ्या शहरात जमिनी आणि इमारती अक्षरश: सोन्याच्या किमतीने विकल्या जातात; पण एखाद्या इमारतीत जुने भाडेकरू राहात असले तर मोकळा ताबा मिळणे अशक्य होते आणि मालमत्ता मातीमोलानेसुद्धा विकत घ्यायला कोणी तयार होत नाही. तशीच स्थिती 'पॉयशा' कंपनीची झाली आहे. कामगारांना कमी करता येत नाही तोपर्यंत फायद्याची शक्यता नाही. अर्थात कंपनीची खरेदी किमत कागदोपत्री असावी त्यापेक्षा कमीच मिळणार.

मंडळाचा निर्णय आला आणि टाटा कंपनीने गुंतवणूक वाढवण्याची आपली तयारी नाही; 'पॉयशा कंपनी' विकत घेण्यात आपल्याला काहीही स्वारस्य नाही, असे जाहीर करून टाकले. एका बाजूला कामगार दुसऱ्या बाजूला सरकार, तिसऱ्या बाजूला बुडती बाजारपेठ आणि चौथ्या बाजूला टाटा कंपनीची व्यावहारिक निष्ठुरता. चारी बाजूंनी वेढल्या गेलेल्या ३९ वर्षांच्या अजय कपाडियाला दुसरा काही मार्ग दिसेना. घरी जाऊन ६ व्या मजल्याच्या खिडकीवर चढून त्याने स्वत:ला झोकून दिले आणि स्वत:पुरता तरी सगळ्या चिंतांचा अंत केला.

अजय साधासुधा माणूस असावा. कंपनी संकटातून सोडण्यासाठी त्याला दुसरे मार्ग हाताळता आले असते.

खटावांचे वेगळे खटले

सुनीत खटाव आणखी एक सुप्रसिद्ध उद्योगपती. घरोघर सुपरिचित असलेल्या खटाव वायल्सच्या गिरणीचा मालक. मुंबईतील सर्वच कापडगिरण्या आजारी होऊन अर्धशतक उलटले. जुनी यंत्रसामुग्री, पुराणे तंत्रज्ञान, यंत्रमागांची स्पर्धा, कृत्रिम धाग्यांचे आक्रमण आणि कामगारांची मंजुरी, बोनस इत्यादीचा वाढता

खर्च यांना गिरण्या तोंड देत आहेत. बाजारपेठ संरक्षित नसती तर त्या सगळ्या बंदच पडल्या असत्या. महाराष्ट्र शासनाने कापूस एकाधिकार योजना चालू करून बुडत्या गिरणीमालकांना मोठा हात दिला; म्हणून ते कसेबसे तग धरून आहेत.

खटाव गिरणीची अवस्था अशीच बुडीत झाली. आजारी गिरणी सावरण्यासाठी किरकोळ जुजबी उपाय काही उपयोगाचे नाहीत. जुनी गिरणी मोडीत काढून नवीन आधुनिक गिरणी उभारणे हा एकमेव तोडगा. भायखळा येथील खटाव मिल्सचे स्थलांतर बोरिवली येथे करावे अशी योजना आखली गेली. या कामासाठी भांडवल कोठून यावे? खटाव गिरणी तोट्यात आली तरी मूळच्या गिरणीची १३/१३ एकर जागा म्हणजे सोन्याचा तुकडा. गिरणीच्या स्थलांतरला ७०/८० कोटी रुपये भांडवलाची गरज होती, तर मोकळ्या गिरणीच्या जमिनीवर अलिशान निवासी आणि व्यापारी संकुल उभारून किमान ४०० कोटी रुपये हाती येतात.

दिल्लीच्या D.C.M. गिरणीची परिस्थिती अशीच होती. ३५ एकर जमीन निवासी कामासाठी वापरण्याची परवानगी मिळेना. गिरणीच्या कर्जाच्या बोजा मालकांच्या डोक्यावर; पण गिरणीच्या जमिनीचा फायदा मात्र त्यांना नाही असा 'समाजवादी' युक्तिवाद राजकीय आणि कामगार पुढारी करीत. शेवटी सर्वोच्च राजकीय नेतृत्वाला १०० कोटी रुपये पोचवून D.C.M. ने आपला मार्ग काढला.

शासन कागदी येथेही कमी पडले नाहीत. महाराष्ट्र शासनात योग्य किमत देण्याची तयारी असल्यास सर्व काही विकावू आहे. एवढ्या मोठ्या प्रकरणी १००/१५० कोटी म्हणजे केवळ नाचीज; पण अडचणी संपल्या नाहीत. पैसे घेऊन का होईना परवाना देणाऱ्या सरकारकडे अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य नाही. गिरणीच्या स्थलांतराला कामगारांचा आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघ या अधिकृत कामगार संघटनेपासून डॉ. दत्ता सामंत यांच्या संघटनेपर्यंत साऱ्याचा विरोध आहे. हा विरोध संपवणे, मिटवणे ही जबाबदारी खटावांच्या शिरावरच आली. संमती मिळाल्याखेरीज स्थलांतर करता येत नाही. अशा कोंडीत सुनीत खटाव अडकला. अजय कपाडियाप्रमाणे त्याने आत्महत्या केली नाही; उटक मोठा जबरदस्त घाट घातला. खटाव मिलच्या शेजारी दगडी चाळ आणि त्या चाळीत अरुण गवळी टोळीचा मुक्काम. गवळी टोळीतील दोन एकशे माणसे त्यांनी गिरणीत कामगार म्हणून भरती करून घेतली. टोळीच्या पद्धतीने इतर कामगारांच्या स्थलांतराला संमती देणाऱ्या 'राजीखुशी नाम्यावर' सह्या घेण्यात आल्या.

रा.मि. मं. संघावरचा कब्जा

खटाव एवढ्यावरच थांबले नाहीत. राष्ट्रीय मिल मजदूर संघटनेची निवडणूकच त्यांनी गवळी स्नेहसंबंध वापरून ताब्यात घेतली. शंकरराव जाधव यांना पुढे करून आहेर बंधूमार्फत सारी संघटनाच कब्जात घेतली. खटाव गिरणीच्या जमिनीच्या खजिन्यासाठी चाललेल्या या धडपडी सर्व जाणकारांना माहीत होत्या. फार आरडाओरड झाली नाही तर या सगळ्या भानगडींकडे काणाडोळा करून धकवून न्यायचे असा सगळा सिद्धसाधकांचा डाव.

पण शंकरराव जाधवांच्या निवडणुकीचा गवगवा भलताच झाला. त्यात मुख्यमंत्र्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांची नावे गोवली गेली. पप्पू कलानी, हितेंद्र ठाकूर आणि जे जे हॉस्पिटलमधील मारेकरी इ. इ. प्रकरणातून पुरेसे न सावरलेल्या मुख्यमंत्र्यांनी अंग झटकण्याचा प्रयत्न केला. पवारसाहेब बोलले, "शंकरराव जाधव यांना राजीनामा द्यावाच लागेल. खटाव गिरणीचे मालक लबाड आहे; त्यांना शासन म्हणजे काय असते याचा अनुभव येईल."

मुख्यमंत्र्यांची धमकी-नाईक गँगची

मुख्यमंत्र्यांनी ही धमकी दिली आणि महालक्ष्मी रेल्वे स्टेशनच्या जवळ, मोटरसायकलवरून आलेल्या मारेकऱ्यांनी खटाव यांच्या गाडीच्या 'बुलेट प्रूफ' काचा हातोड्याने फोडून त्यांच्यावर बंदुकीच्या गोळ्यांचा वर्षाव केला. शरीरात घुसलेल्या २२ गोळ्यांनी खटाव त्यांच्या शरीराची चाळणी झाली. मारेकरी सहीसलामत निसटून गेले.

ही हत्या कुणी केली असावी याबद्दल दुसराही एक तर्क आहे. जमिनीचा व्यवहार होणार, कमिशन म्हणून गवळी टोळीस २० कोटी रु. तरी मिळणार या शक्यतेने चिंतीत झालेल्या नाईक टोळीने हे काम सुपारी देऊन करवून घेतले, असेही बोलले जाते.

हत्या दाऊद टोळीने केली की नाईक टोळीने याला फारसे महत्त्व नाही; महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे!

'निर्गम' नीती तातडीने ठरवा

तोट्यात चाललेले कारखाने चालू ठेवता येत नाहीत आणि सरकारी नियमांमुळे बंद करता येत नाहीत. अशा परिस्थितीत पापभीरू अजय कपाडियास जीव देण्याखेरीज गत्यंतर राहत नाही. भाडेकरू संरक्षण कायद्याच्या अंमलामुळे जागा खाली करून देणाऱ्या टोळ्या आणि सेना लोकप्रिय झाल्या. उद्योजकांना न परवडणारे कारखाने बंद करण्याचे स्वातंत्र्य नसल्याने अधिक भयानक गुंड

टोळ्या देशभर थैमान घालत आहेत. कारखाने उघडण्यासाठी परवाना व्यवस्था असणे गैर, तसेच कारखाने बंद करण्यासाठीदेखील परवाना व्यवस्था चुकीचीच. जे जे म्हणून खुल्या व्यवस्थेच्या विरुद्ध आहे., अनैसर्गिक आहे ते केवळ कायद्याच्या आणि सरकारी बड़ग्याच्या जोरावर घडवण्याचा प्रयत्न केला म्हणजे निष्पती होत काळ्या बाजाराची; तस्करांची; समांतर अर्थव्यवस्थेची आणि गुंडाच्या टोळीची. अजयची आत्महत्या आणि खटावांची हत्या याचा खरा निष्कर्ष असा, की उद्योजकांना निर्गम स्वातंत्र्य देणे आता अत्यंत तातडीचे झाले आहे; पण महाराष्ट्र शासन करील नेमके उलटे. निर्बंध कमी करण्याऐवजी गिरणीमालकांना जमिनी विकण्याची बंदीच करील. कारणे दुधखुळ्या पोरांनाही आता समजू लागले आहे.

(२७ मे १९९४)

■■

भ्रष्टाचाराचा समुद्र प्राशन करण्या पद्मभूषण अगस्ती आला

राळेगण शिंदीचे अण्णासाहेब हजारे हे देशभरातील मान्यवर व्यक्तिमत्व आहे. लष्करातील एक साधा जवान. सेवानिवृत्तीनंतर आपल्या गावी परततो, काही कामाला लागतो. थोड्याच वर्षात त्याचा इतका बोलबाला होतो, की देशविदेशातील पत्रकार आणि टेलिव्हिजनचे कॅमेरावाले राळेगण शिंदीला रांगा लावतात. फारसे उच्चशिक्षित नसलेले अण्णासाहेब अनेक सरकारी, निमसरकारी समित्यांवर सन्मानाने नियुक्त झालेले आहेत. देशी-परदेशी दानशूर संस्थांची राळेगण शिंदीबरोबर आपलेही नाव जोडले जावे म्हणून धडपड चालते. त्याखेरीज विकासाच्या यच्चयावत योजनांचा फायदा अण्णसाहेबांच्या दबदब्याने राळेगण शिंदीस मिळाला, एवढेच नव्हे तर प्रयत्न न करता मिळाला. महाराष्ट्रातील बहुतेक गावांना भगीरथ प्रयत्न करून एकअर्धा प्रकल्पही मिळत नाही. सरकारी अधिकारी आपणहून राळेगण शिंदीत येऊन योजना राबवून देतात. विनोबा भाव्यांप्रमाणेच अण्णासाहेबांची गणना सरकारी संता मध्ये कित्येक वर्षे होत आहे. प्रथम पद्मश्री मग पद्मभूषण अशा राष्ट्रीय सन्मानांनी अण्णासाहेब भूषविले गेले.

१०-१२ वर्षांपूर्वी मीही कुतूहलापोटी राळेगण शिंदीस गेलो होते. 'योद्धा शेतकरी'चे लेखक विजय परूळकर अण्णासाहेब जगाला फारसे परिचित नव्हते तेव्हापासूनचे त्यांचे चाहते. ते मला आग्रहाने घेऊन गेले. त्यावेळी अण्णासाहेबांच्या कामाची सुरुवातच होती; पण सगळे गाव अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाने भारलेले दिसले. गांधीवादी अगदी चिल्लर संत देशभर जागी जागी आश्रमाच्या रूपाने जायदाद जमवून विधायक काम दाखवीत आहेत. त्यांच्या आश्रमात आणि गावात जसा एक आध्यात्मिक दबदबा जाणवतो तसाच या साध्यासुध्या माणसाने तयार करावा याचे थोडे अद्‌भुतही वाटले.

हिरवी शेती, देणग्यांचा पूर

अण्णासाहेबांनी राळेगण शिंदीस काय दिलेय निव्वळ कोरडवाहू गाव. पाऊसमानही बेताचेच; पण जो काही पाऊस पडतो तो वेगवेगळ्या पद्धतीने साठवून आणि जमिनीत जिरवून शेतीला पाण्याचा आधार देण्याचा सामूहिक कार्यक्रम अण्णासाहेबांनी राबवला. ओसाड जागी पिके दिसू लागली. शेती हिरवीगार दिसली, की संपन्नता आली असा शहरवासीयांचा समज होतो. साहजिकच राळेगण शिंदी गावात स्वर्ग अवतरला असा गवगवा झाली. गाव दिसतेही बऱ्यापैकी सुखवस्तू. अण्णासाहेबांच्या तेजोवलयामुळे गावात ओतला जाणारा विविध निधींचा प्रवाह नसता तर काय झाले असते, सांगणे कठीण आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावर सरकार उणे ७० टक्के सबसिडी लादते हे 'डंकेल प्रस्तावा'च्या संबंधात जगजाहीर झाल्यानंतर एक एक गावाची सुधारणा आणि उद्धार करण्याची कल्पना किनकालात निघाली आहे.

रुपया-पैशाचा हिशेब बाजूला ठेवला तरी राळेगण शिंदी हिरवे करण्याचा चमत्कार बाकी राहतोच. अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव नसला तर हा प्रयोग किती दिवस टिकेल? ७२ सालासारखा दुष्काळ पुन्हा आला तर इतर गावांच्या तुलनेने राळेगण शिंदी दोन तीन महिने तरी अधिक टिकाव धरील काय? राळेगण शिंदीसारखाच प्रयोग करण्यासाठी भौगोलिक परिस्थिती असलेली गावे किती? त्यात राळेगण शिंदीच्या नमुन्याबरहुकूम काम उभे राहू शकेल काय? हे सारे प्रश्न अनुत्तरित आहेत; पण महात्म्यांच्या अवतार कार्यात असल्या प्रश्नांना महत्त्व नसते. एका गावातील का होईना लोकांमध्ये त्यांनी चैतन्य उभे केले आणि जगभरच्या ग्रामोद्धार करू पाहणाऱ्या लोकांची मथुरा-काशी नगर जिल्ह्यातील छोट्याशा दुष्काळी गावात अवतरली हे कोणाला नाकारता येणार नाही.

अण्णांचा सात्त्विक क्रोध

अण्णासाहेबांच्या कामाचा एक सामाजिक भागही होता. गावात त्यांनी दारूबंदी जाहीर केली. दारू पिणाऱ्या माणसाला खांबाला बांधून थोबाडून काढण्यास हा महात्मा कचरत नसे. लोकांच्या नैतिकतेची अण्णासाहेबांना इतकी चिंता, की गावातील दूरदर्शनवर छायागीत पाहण्याचीसुद्धा बंदी अण्णासाहेबांनी घातली होती. बंदी उघडपणे मोडलेली तरी कोठे दिसत नसे.

अण्णा लष्करी जवान; पण वेशभूषा साने गुरुजींच्या पद्धतीची. चेहऱ्यावरील मुद्रा अगदी शालीन सौजन्याची. त्यात ग्रामोद्धाराच्या कामाची जोड. साहजिकच

यथावकाश अण्णासाहेबांचा गांधीवादी म्हणून वर्तमानपत्रात उल्लेख होऊ लागला. माझी त्यांची भेट झाली तेव्हा आंदोलनाची आवश्यकता आपल्याला वाटत नाही असे त्यांनी सांगितले. आपल्या आपल्या रस्त्याने चालणारा हा मनस्वी कार्यार्थी आहे. सुखदुःखे न गणता काम करतो आहे. अनुभवाने राळेगण शिंदींच्या प्रयोगाच्या मर्यादा उमजून घेईल आणि ग्रामीणांच्या आंदोलनात उतरेल अशी मनात आशा ठेवून होतो. राळेगण शिंदीच्या बाहेर पडून ३०० गावात पाण्याचा प्रयोग सरकारी मदतीने राबवण्याचा त्यांचा अलीकडला निर्धार ऐकून खूप आनंद झाला. या प्रयोगातील मर्यादा आता स्पष्ट होऊन जातील याची मला निश्चिती वाटत होती. ग्रामोद्धाराचा विस्तार, व्याप वाढला, की त्यातली निरर्थकता आपोआपच स्पष्ट होणार आहे.

भ्रष्टाचारावर मोर्चा वळवला

पण हा धोका अण्णांच्या लक्षात आला असावा. एका गावावर २० वर्षे ओतणाऱ्या अण्णासाहेबांनी ३०० गावांचा प्रयोग अर्धवट सोडून दिला आणि ते भ्रष्टाचाराच्या प्रश्नाकडे वळले. भ्रष्टाचार हा खरोखरच मोठा जळता प्रश्न आहे. १० वर्षांवर अनेक सरकारी योजना राबवताना अण्णासाहेबांना याचा दाहक प्रत्यय वेळोवळी आला असणारच. राळेगण शिंदीच्या कल्याणाच्या इच्छेपोटी शासनात वरपासून खालपर्यंत सुटलेली भ्रष्टाचाराची भयंकर दुर्गंधी अण्णासाहेबांनी मोठ्या कष्टाने सहन केली असावी. गेली काही वर्षे ते भ्रष्टाचाराबद्दल. निषेधापोटी त्यांना मिळालेल्या सन्मानांपैकी पद्मश्री परत करण्याचा निश्चय त्यांनी अनेक वेळा जाहीर केला आणि मागे घेतला. पद्मभूषण मिळालेल्या माणसाने पद्मश्री परत करणे म्हणजे एम. ए. झालेल्याने ती पदवी ठेवून बी. ए. ची पदवी परत करण्यासारखा प्रकार; पण अण्णासाहेबांच्या सरळ सोज्वळ मनाला हे बारकावे समजले नसावेत.

गांधींपेक्षा वेगळा महात्मा

१७ अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी असा त्यांनी आग्रह धरला. साहजिकच मुख्यमंत्री कात्रीत सापडले. सरकारी संत अण्णांना नाराज करून चालणार नाही हे खरे; पण आखाडसासू नोकरशाहीला तोंड देणे त्याहीपेक्षा कठीण. तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. बाकीच्या अधिकाऱ्याबद्दल चौकशी करण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले; पण अण्णांचे समाधान झाले नाही. ते उपोषणासारख्या आंदोलनाच्या कठीण साधनाकडे वळले. राष्ट्रपतींकडे पद्मश्री परत पाठवली. १ मे पासून आळंदीला ज्ञानेश्वराच्या समाधीसमोर

आमरण उपोषणाची सुरुवात झाली. आमरण उपोषणाचे अण्णांचे तंत्रही गांधींच्या तंत्रापेक्षा अगदी वेगळे. उपोषण सत्याग्रहाचा मार्ग आहे. लोकांचे न्याय्य हक्क मिळविण्यासाठी आत्मक्लेशाने जनमानसावर आणि सत्ताधीशांवर प्रभाव पाडण्याचा हा मार्ग आहे.

शेंडी तुटो वा पारंबी

सरकार मोठे अडचणीत सापडले. वनखात्याचे अधिकारी भले पूर्णतः दोषी असले तरी त्यांच्यावर कार्यवाही करण्यापूर्वी सरकारी नियमांप्रमाणे काही तजवीज आणि तपशील पुरे करावे लागतात. कोणी सत्याग्रह केला म्हणून अधिकाऱ्यांवर तडकाफडकी कार्यवाही झाली तर दंडाधिकाऱ्यांनी उपोषणाच्या दबावाखाली निर्णय घेतला असा युक्तिवाद करून झालेली कार्यवाही झटक्यात रद्दबातल करता येईल.

गांधीजी उपोषणाला बसत. त्यांच्यावर आत्मक्लेशाचा प्रयत्न केल्याचा आरोप इंग्रज शासनानेही कधी केला नाही. अण्णासाहेबांच्या उपोषणाच्या काही दिवसच आधी सर्वोच्च न्यायालयाने ३०९ कलम बरखास्त करून टाकल्यामुळे सरकारी हस्तक्षेपाने अण्णांचे उपोषण थांबविता येईल ही शक्यता राहिली नव्हती. आता अण्णा उपोषण तडीसच नेणार, भ्रष्टाचाराचा राक्षस आता गाडलाच जाणार अशा आशेने भक्तगण आणखी एका चमत्काराची वाट पाहू लागले.

उपोषण सुरू झाले, अण्णांच्या आजपर्यंतच्या कामाची पावती मिळाली. महाराष्ट्रातील यच्चयावत मान्यवर नेतेगण आळंदीला जाऊन अण्णांबरोबर आपले नाव आणि जमल्यास फोटो वर्तमानपत्रात छापून यावेत या प्रयत्नात लागले. अण्णांच्या अवतीभवती १०-२० तरुण मंडळी उपोषणात पडून होती. भोवतालची व्हीआयपी गर्दी इतकी दाट झाली, की ही तरुण मंडळी पायदळी तुडवली जाऊ लागली.

देवांची आळंदीच्या आकाशात गर्दी

६ मे मोठा दिवस. या दिवशी अण्णा पद्मविभूषणही परत करणार असा गाजावाजा झाला. पद्मभूषण मुळात घ्यायचेच नाकारलेले इतके लोक माझ्या परिचयाचे आहेत, की पद्मविभूषण स्वीकारल्याने ते परत करण्यात काय मोठा त्याग आहे हे समजले नाही; पण खळबळ झाली हे खरे.

६ तारीख उजाडली. दुपारपासून अण्णांचे मन वळवण्यासाठी सतत प्रयत्न चालू होते. आसपासच्या कार्यकर्त्यांनी ते हाणून पाडले होते. उपोषणाच्या जागची सर्व व्यवस्था व अण्णांची देखभाल 'भारतीय विचार मंच आणि ज्ञान

प्रबोधिनी' या दोन संघटन परिवारातील संस्थाचे कार्यकर्ते पाहात होते. काँग्रेसचे कार्यकर्ते काहीसे हतबल झाले.

गुप्त खलबते आणि ओमफस

त्यानंतर मात्र रात्री सार्वजनिक शुचितेचे निव्वळ पुतळे असे बाळासाहेब भारदे, मोहन धारिया, उल्हास पवार, नानाभाऊ एंबडवार अशी बडी मंडळी गाड्यातून महाद्वारासमोर आली. उपोषणाला बसलेली व्यक्ती सहसा जागवरून हलत नाही. एकांतात जर जात नाहीच नाही; पण ही मंडळी अण्णांना घेऊन एका खास खोलीत 'बंदिस्त' गेली. बैठक २ तास २० मिनिटे चालली. अण्णांनी उपोषण मागे घेण्यास संमती दिली. अण्णा मंडपात आले; इतर मंडळी गाडीतून पुण्याला रवाना झाली. जाण्यापूर्वी मुख्य सचिव आणि मुख्यमंत्री यांना आपल्या कामगिरीची खुशखबर कळविण्यास विसरली नाहीत. सारे कार्यकर्ते निराश झाले.

पद्मभूषणाची पगडी सलामत

अण्णासाहेब हजारे यांनी उपोषणास सुरुवात करण्यापूर्वी पुण्यातील सर्वोदय कार्यकर्त्यांशी सविस्तर चर्चा केली होती. त्या चर्चेत आमरण उपोषण ७-८ दिवसांनी मागे घ्यायचे असे ठरले होते; पण 'पद्मभूषण' कोणत्याही परिस्थितीत परत करायचीच अशी रणनीती ठरली होती. अण्णांनी पद्मभूषण हाती ठेवली. याचा भोवतालच्या कार्यकर्त्यांना मोठा राग आला; पण अण्णांचा हिशेब अचूक होता. पद्मभूषण शिल्लक आहे. तोपर्यंत आंदोलन केव्हाही करता येईल. राळेगण शिंदीतील पाण्याच्या प्रयोगाची झाकली मूठ जगापुढे उघडी होण्याआधी दुसरा विषय मिळाला. शिर सलामत राहिले, पगडीही राहिली. अण्णासाहेब हजारे पाण्याचा प्रश्न सोडवून भ्रष्टाचाराकडे वळले आहेत. भ्रष्टाचाऱ्यांचे आता काही खरे नाही.

(३ जून १९९४)

■■

पंतप्रधान नरसिंह राव अमेरिकेचे 'स्टेट गेस्ट'

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांची अमेरिका भेट पार पडली. गरीब देशांच्या नेत्यांच्या आयुष्यात अमेरिकेचा दौरा म्हणजे यशाचे शिखर. अमेरिकन राष्ट्रपतींबरोबर त्यांची झालेली आमने सामने शिखर बोलणी हा पंतप्रधानांच्या अमेरिका दौऱ्याला सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम. भेटीत प्रत्यक्षात काय घडले असेल हे सामान्य लोकांना समजण्याचा काही मार्ग नाही. बोलणी सुरू होण्याच्या आधी, नंतर दोघा नेत्यांचे हास्यमुख चेहरे स्थिर आणि चलत कॅमेऱ्यांनी टिपले; जगभर प्रसिद्ध झाले. भेटीनंतर दोघांनीही पत्रकारांसमोर निवेदने दिली; पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. हे सगळे लोकांना पाहायला आणि ऐकायला मिळाले; पण अमेरिकन राष्ट्रपती भवनात आत गेल्यानंतर काय घडले हे पाहायला आणि ऐकायला कोणी कॅमेरा उपस्थित नव्हता. दरवाजा बंद झाल्यानंतर आत काय घडले याबद्दलचे कुतूहल कितीही प्रबळ असले तरीही ते दाबून ठेवण्याखेरीज काही गत्यंतर नाही; पण ही शिखर परिषद म्हणजे एवरेस्ट आणि खैरोबाचा डोंगर यांच्या भेटीसारखीच.

नरसिंह राव कोणत्या पंक्तीत?

पंतप्रधानांच्या अमेरिका भेटीचा क्रमांक दोनचा महत्त्वाचा प्रसंग म्हणजे पंतप्रधानांचे अमेरिकन प्रतिनिधी सभेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेले अभिभाषण. साऱ्या जगाचे, जवळजवळ सर्वच क्षेत्रात अमेरिका नेतृत्व करते. त्यामुळे परदेशी अति अति महत्वाच्या व्यक्तींची तेथे रीघ लागलेली असते. निदान दर दिवसाआड कोणी ना कोणी पंतप्रधान, राष्ट्रपती भेटीसाठी तेथे जातोच. इंग्लंड, जर्मनी, जपान अशा बड्या देशांचे नेते वॉशिंग्टनला जातात ते कामकाजासाठी. त्यात उभय पक्षांना स्वारस्य असल्यामुळे भेटीचे कार्यक्रम शिस्तशीर आखले जातात. अलबत्या गलबत्या देशांचे प्रमुख अमेरिकन

भेटीत जातात ते मायदेशी आपली प्रतिमा उंचावावी याकरिता. अमेरिकन राष्ट्रध्यक्षांनी हस्तांदोलन करतानाचे चित्रण देशातील वर्तमानपत्रात आणि टेलिव्हिजनवर झळकले म्हणजे आपली लोकप्रियता वाढेल आणि निवडणुकात दोन मत जास्त मिळतील अशा आशेने टिनपाट राष्ट्रांचे नेते अमेरिकेत मिरवायला धडपडत असतात.

मराठीतील प्रख्यात विनोदी लेखक चि. वि. जोशी यांनी चंदनवाड संस्थानातील त्यांच्या भेटीचे मोठे बहारदार वर्णय 'चिमणराव स्टेट गेस्ट' या कथेत केले आहे. संस्थानिकांच्या पंक्तीला बसायचा मान अनेकांना मिळे. पंगतीत वर्गवारी असे. खाशांच्या पंक्तीला दोन दोन पक्वान्ने, साजूक तूप, ते वाढायला स्वत: राणीसाहेब, दुसऱ्या पंक्तीला पुरणपोळी, वाढप आचाऱ्यांकडे. तिसऱ्या वर्गाला पुरी आणि चौथ्या वर्गाला चपाती अशा पंक्तीप्रपंचाचे मोठे गंमतीदार वर्णन त्यात आहे.

सुलतानांच्या कतारी

भेट देणाऱ्या पाहुण्याची स्थिती चंदनवाड संस्थानाच्या शाही पाहुण्यांसारखीच असते. आलेल्या पाहुण्याला त्याच्या त्याच्या वर्गाप्रमाणे वागणूक मिळते. आपापल्या देशात सम्राटाप्रमाणे येथे रांगा लावून उभे राहतात. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष विमानतळावर स्वागत करण्यासाठी कधीच जात नाहीत. राष्ट्रपतीभवन श्वेत-निकेतनजवळ असलेल्या हेलिकॉप्टरच्या धावपट्टीवर राष्ट्रपती पाहुण्यांच्या स्वागतासाठी आले, की त्यांचा मोठा मान झाला समजायचे. राष्ट्रपतींशी चर्चा किती वेळ चालली हे दुसरे पाहुण्यांच्या स्वागतासाठी आले, की त्यांचा मोठा मान झाला समजायचे. राष्ट्रपतींशी चर्चा किती वेळ चालली हे दुसरे पाहुण्यांच्या प्रतिष्ठेच गमक. राष्ट्रपती भावनात पाहुण्यांकरिता खास मेजवानी झाली काय? ती किती जंगी होती? ही पाहुण्यांच्या वर्गवारांची आणखी एक फूटपट्टी. अमेरिकन प्रतिनिधी सभागृहासमोर भाषण करायला मिळणे हा विशेष मान समजला जातो. काही खास प्रसंगाने किंवा उभयराष्ट्रांत काही महत्त्वाच्या समस्या उभ्या असतील तरच असे अभिभाषण ठरवले जाते.

हम भी कुछ कम नही

पंतप्रधानांचा अमेरिका दौरा ठरला, त्याबरोबर अमेरिकन प्रतिनिधी सभेच्या बैठकीसमोर अभिभाषण करण्याकरिता त्यांना निमंत्रण यावे यासाठी विदेश मंत्रालयाची धडपड सुरू झाली. कारण समजण्यासारखे आहे. आपणास निमंत्रण मिळावे अशी कोणत्याही नेत्याची, अगदी टिनपाट देशाचा का असेना, तहान

असणारच. राव साहेबांच्या दृष्टीने तर अभिभाषणाचे निमंत्रण येणे हा जीवनमरणाचा प्रश्न होता. राजीव गांधी अमेरिकेत गेले तेव्हा त्यांना अमेरिकन संसदेच्या सभापतींनी आपणहून निमंत्रण दिले होते. तरुण रुबाबदार व्यक्तिमत्त्व, ऋजुहास्य आणि घासून पुसून तयार केलेले भाषण यामुळे राजीवजींनी मोठी जबरदस्त छाप पाडली होती. त्यांचे भाषण दूरदर्शनवर ज्यांनी ज्यांनी पाहिले त्यांना आपण भारतीय असल्याचा अभिमान वाटला होता.

'सोनिया'चा दिवस

राव साहेबांना अभिभाषणाचे निमंत्रणदेखील न येणे हे त्यांच्या इथल्या प्रतिमेस बाधा आणणारे झाले असते. राव साहेब पंतप्रधानाच्या खुर्चीवर भले विराजमान झालेले असोत, त्यांची बरोबरी काही जगाच्या नजरेत राजीव गांधींशी नाही असा अर्थ निघतो. विदेश मंत्रालयाने धडपड करून अभिभाषणाचे निमंत्रण तर मिळविले, "सोनियाचा दिवस आजि अमृते पाहिला." राव साहेबांना धन्य धन्य झाले. १० जनपथच्या सोनियाने विरोध केला नसावा.

अलीकडे अमेरिकन संसदेच्या संयुक्त बैठकीसमोर झालेले आणि गाजलेले भाषण पॅलेस्टिनी मुक्ती शासनाचे यासर अराफत आणि आयरिश मुक्ती चळवळीचे जेरी ॲडम्स यांचे. दोघांच्याही भाषणाच्या वेळी सभागृह तुडुंब भरलेले; किरकोळ अपवाद सोडल्यास सर्व सिनेटर आणि प्रतिनिधी पाहुण्यांच्या प्रेक्षाकक्षेत तुडुंब गर्दी; असा मोठा जबरदस्त कार्यक्रम झाला.

तीन मिनिटांच्या टाळ्या

ज्या दिवशी पंतप्रधान नरसिंह राव यांचे अमेरिकन प्रतिनिधी सभागृहात भाषण झाले त्यावेळी मी प्रवासात होतो. भाषण ऐकण्याची, पाहण्याची संधी काही मिळाली नाही. नागपूरला पोचलो तेव्हा ॲडव्होकेट शरद बोबडे आनंदात आणि खुष दिसले. सौ. कामिनी बोबडे पंतप्रधानांबरोबर पत्रकार म्हणून गेलेल्या आहेत; त्यांचा फोनवरून निरोप आला होता, "पंतप्रधानांच्या भाषणानंतर सर्व सभागृहाने तीन मिनिटे उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. पंतप्रधानांच्या भाषणातही अनेक वेळा टाळ्यांचा कडकडाट झाला." राजीव गांधीपेक्षा राव साहेब काही कमी नाहीत त्यांनीही मैदान तितकेच भरले, असे मस्त वातावरण होते. तीन मिनिटांच्या टाळ्या म्हणजे अमेरिकेत विशेष नाही. अमेरिकन रिपब्लिकन किंवा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या अधिवेशनात अध्यक्षीय उमेदवाराची निवड जाहीर होते तेव्हा नवा उमेदवार बोलायला उभा राहतो तेव्हा किंवा त्यांचे भाषण संपल्यावर सारे लोक उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करतात. शेकडो युवतींचे

खास ताफे उत्साहवर्धक नृत्ये करतात. संगीत बेडबाजा यांचा एकच गदारोळ होतो. आपल्या उमेदवारांसाठी इतर कोणाहीपेक्षा जास्त वेळ टाळ्यांचा कडकडाट चालेल असे नियोजन करण्याची अमेरिकेतील राजकीय दलालांची पद्धत आहे. दंतमंजनाच्या ट्यूबवर तीनच प्रकारचे आकार दाखवले जातात. लार्ज, सुपर, आणि जायन्ट. लहान किंवा छोटी ट्यूब नसतेच. तसे अमेरिकेतील औषचारिक टाळ्यांचा कडकडाट तीन मिनिटांच्या खाली नसतोच. मी ही टिप्पणी केली आणि आसपासचे लोक थोडे नाराज झाले.

किती येती जाती!

आपल्या देशाचा पंतप्रधान अमेरिकेत गेला म्हणजे आपल्याकडली वर्तमानपत्रे आणि बाकीची सारी माध्यमे त्यांच्या दौऱ्यासंबंधीच्या बातम्यांनीच भरून जातात. आपली समजूत अशी होते की तेथे भेटीच्या काळात लोकांचा चर्चेचा, एकमेव नसला तरी मुख्य विषय भेटीचाच असला पाहिजे. प्रत्यक्षात परिस्थिती अगदी वेगळी असते. राव साहेबांच्या दौऱ्याच्या काळात बहुतेक अमेरिकन नागरिकांना दौरा चालू असल्याची माहितीही नव्हती. तिथल्या वर्तमानपत्रात अग्रभागी विदेशी बातम्या बोस्निया, रुआंडा, सोमालिया आणि येमेन येथील पत्रकारांनी उपेक्षाच केली. त्यांच्या भेटीबद्दल कमालीची उदासिनता होती.

सभेला गर्दी जमवणे

राव साहेबांच्या संयुक्त अभिभाषणाच्या वेळी प्रत्यक्षात काय घडले? सभागृह गच्च भरलेले होते. प्रत्यक्ष मोजदाद केली तेव्हा उपस्थितांत एकूण १०० पैकी फक्त १८ सिनेटर आणि ४३५ खासदारांपैकी फक्त ३० राव साहेबांच्या भाषणाला उपस्थित होते. म्हणजे बहुतेक प्रतिनिधी आठवड्याच्या सुट्टीसाठी आपापल्या मतदारसंघात निघून गेले होते. सभागृहाच्या नियमांप्रमाणे कोरमसुद्धा पुरा नव्हता. सभागृहाच्या मोकळ्या जागा पंतप्रधानांबरोबरच गेलेली एक जंबोजेटभर माणसे, इतर निमंत्रित आणि अमेरिकन काँग्रेसच्या सचिवालयातील कर्मचारी यांची भरल्या होत्या. सभागृह भरलेले असणे अमेरिकन संसदेच्या प्रतिष्ठेकरिता आवश्यक होते. गैरहजर सिनेटर आणि खासदार यांनी जाणून बुजून राव साहेबांचा अपमान केला असे नाही. राव साहेबांच्या येण्या-जाण्यात त्यांना काही स्वारस्यच नव्हते.

शालेय वक्तृत्व स्पर्धा

राव साहेबांच्या भाषणास खूप टाळ्या पडल्या 'वॉशिंग्टन पोस्ट'ची पत्रकार मेरी मोग्रोरो लिहिते, "टाळ्या वाजवणारे प्रामुख्याने जागा भरण्यासाठी घुसवलेले

कर्मचारी होते.'' त्यांची बुडे कधी नव्हे ती सभागृहातील खुर्च्यांना लागलेली, ते प्रसंग खुशीत साजरा करण्याच्या मनस्थितीत होतेच. राव साहेब मात्र पडणाऱ्या टाळ्यांवर खुष होते. त्यांना मारून मुटकून जमा केलेल्या सभांची चांगली सवय आहे. महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धेत बोलत असल्याप्रमाणे अब्राहम लिंकन, इमर्सन इत्यादींची वचने थाटात उद्धृत करीत राहिले. साखर खाण्याची सवय मोडण्यासंबंधी गांधीजींची त्यांनी सांगितलेली कथा लोकांना खूप हसवून गेली. शालेय वक्तृत्व स्पर्धेतही या कथेवर हुकमी टाळ्या पडतातच पडतात.

दोष नसे गरिबीला; दोष दरिद्री गर्वाला

आम्ही एक गरीब देश आहोत, आमचा इतिहास मोठा आहे, भविष्यातही एक ना एक दिवस भारत वैभवाच्या शिखराला पोहोचेल; पण तोपर्यंत आम्ही मोठे आहोतच, आमचे शास्त्रज्ञ थोर, आमचे राजकीय नेते तर महाथोर असल्या आत्मवचनांनी काय साधायचे आहे? इतके दिवस देशी लोक तरी फसले आता तेही कठीण आहे. देशाची प्रगती शासनाने खुंटवली आहे, इतर नाटके, सोंगेढोंगे करण्यापेक्षा आम जनतेच्या कर्तबगारीला पूर्ण वाव देऊन सरकारी हस्तक्षेप कमी केला तर भारत इतक्या झपाट्याने प्रगती करेल, की पाच-दहा वर्षात भारतीय पंतप्रधानांनी अमेरिकेला भेट द्यावी याकरिता तिकडून आवर्जून प्रयत्न होतील आणि पंतप्रधानांच्या भाषणाच्या वेळी लुंग्यासुंग्यांना सभागृहात बसवून गर्दी जमवण्याची गरज पडणार नाही. तोपर्यंत देशातील प्रतिष्ठेसाठी परदेशी अवहेलना सहन करणे सहज टाळता येईल.

(१० जून १९९४)

■■

स्त्रीमुक्ती चळवळींची पीछेहाट

कोणत्याही संस्थेची स्वत:ची वास्तू उभी राहिली, की तिचा ऱ्हास चालू होतो. जगप्रसिद्ध शोध हे अर्धपोटी राहणाऱ्या शास्त्रज्ञांनी अहोरात्र परिश्रम करून लावले, ते काही आधुनिक अलिशान प्रयोगशाळांत बसून नाही तर त्यांच्या घरच्या माळ्यावर, कोठीच्या खोलीत लावले. हिंदुस्थानातील इंग्रजी साम्राज्याने नव्या दिल्लीची राजधानी बांधून १९३० मध्ये पुरी केली त्या वेळी इंग्रजी राज्याच्या अंतिम अंकाची सुरुवात झाली होती.

चळवळींचे आणि आंदोलनांचे काहीसे असेच आहे. प्रभावशाली आंदोलनाचे नेते राष्ट्रीय संघटना बांधू लागले आणि आंतरराष्ट्रीय परिषद भरवू लागले म्हणजे आंदोलनाच्या विषयाची पीछेहाट सुरू झालीच म्हणून समजावे. १९८५ साली महिलांची जागतिक परिषद आदिस अनाबा इथे झाली. लवकरच होणाऱ्या बिजिंग येथील दुसऱ्या महिला आंतरराष्ट्रीय परिषदेचे ढोल वाजू लागले आहेत. १९८५ ते १९९४ हे दशक स्त्री चळवळीच्या जागतिक पिछेहाटीचे ठरले आहे. निदान हिंदुस्थानातील महिला चळवळीबद्दल हे निश्चित खरे आहे.

सासरी-माहेरी, गळ्यावर सुरी

नवविवाहित वधूंच्या आत्महत्यांचे - हत्यांचे प्रमाण वाढत राहिले. माहेरी आईबापांच्या सावलीत, गर्भावस्थेपासून बोहल्यावर चढेपर्यंत देखील स्थिती काही वेगळी नाही. भ्रूणहत्या, कुपोषणाचे बळी, आत्महत्या माहेरातही होतात. त्यांची नक्की आकडेवारी जाहीर होत नाही. त्यांच्या शोकांतिकेबद्दल पोलिसात जाऊन तक्रार गुदरायला सुद्धा कोणी पुढे होत नाही. 'शहाबानो' प्रकरणी राजकारण्यांच्या खेळात मुसलमान स्त्री सापडली आणि आता पुन्हा एकदा 'त्रिवार तलाक' पद्धतीबद्दल उठणाऱ्या वादळात हिंदू आणि मुसलमान दोन्ही स्त्रियांची पिछेहाट होणार आहे.

'एकच प्याला'तील सिंधूचे अवतार

राजकारणाच्या सोयीसाठी बायकांचा बळी घेणे यात धर्ममार्तंडांना काही विशेष आनंद होत असावा. स्त्रियांमध्येही हौताम्याची आणि कुर्बानीची प्रवृत्ती निसर्गत:च मोठी सामर्थ्यशाली असावी. त्याही धर्ममार्तंडांच्या कारवायांना मोठ्या आवेगाने बळी पडतात. देवराला येथे एक राजकुँवर सती गेली तर साऱ्या राजस्थानातील उच्चविद्याविभूषित महिलासुद्धा पारंपरिक राजस्थानी ओढण्या घालून मिरवू लागल्या आणि राजस्थानी सती परंपरेच्या इतिहासाचे गोडवे गाऊ लागल्या. त्यांचे यजमानही आपल्या पाळीव प्राण्यांच्या इमानदारीच्या या प्रदर्शनाने खुष होऊन कृपाकटाक्ष टाकू लागले.

उपकारकर्त्यांपासून वाचावे कसे?

'शहाबानो' प्रकरणी मुस्लिम स्त्रियांची अशीच कुचंबणा झाली. शहाबानोस कोर्टाचा आधार घ्यावा लागला त्याअर्थी परित्यक्ता मुसलमान स्त्रियांचा प्रश्न गंभर आहे हे उघड. परित्यक्ता स्त्रियांचा कसला आला आहे धर्म? खडतर जीवन कसेबसे रेटत नेणे, मरण स्वीकारणे किंवा जगाच्या बाजारात शरीर भाड्याने देण्यास उभे राहणे एवढेच काय ते पर्याय. सर्व मुसलमान स्त्रिया त्याविरुद्ध सहजच उठून उभ्या राहिल्या असल्या; पण शहाबानोची कड विश्व हिंदू परिषदेने घेतली, लालकृष्ण अडवाणींनी मुसलमान स्त्रियांचा कैवार घेतला आणि त्या बिचाऱ्यांवर आफत ओढवली. सिंघल – अडवाणी यांच्या सुरात सूर मिळवून आपले हक्क मागणे कोणत्याही मुस्लिम स्त्रीस शक्य नाही. ते परधर्मीयाशी संग ठेवण्याइतके भयंकर कृत्य मानले जाईल.

इस देश में रहना होगा

हिंदू परिवारातील नववधूंच्या दारुण अवस्थेविषयी शहाबुद्दिन किंवा इमाम बुखारी यांनी कधी आपली जबान खोललेली नाही, हे हिंदू अबलांचे भाग्यच म्हटले पाहिजे. मुल्लामौलवींनी तसे केले तर, "आमच्या पुत्रवधू लाखांनी का जळेनात या मुसमानांनी तिकडे लक्ष देण्याचे कारण नाही. सासुरवाशिणींना घराबाहेर काढणे आणि त्यांनी जीव देणे ही आमची उज्ज्वल परंपरा आहे. तिचा आम्हाला अभिमान आहे. ज्यांना हे पाहवत नसेल तर त्यांनी पाकिस्तानात निघून जावे." अशी भाषा चालू होईल. अनेक साध्वी ऋतंभरा, "जाळून मारण्यात आर्य स्त्रियांच्या सनातन संस्कृतीचा परमोच्च बिंदू कसा आहे." असे मोठ्या आवेशाने प्रतिपादू लागतील. मुसलमान नेत्यांनी शरियतचा बचाव केला. कडवेपणे केला; पण मनुस्मृतीवर ते घसरले नाहीत हे हिंदू स्त्रियांचे नशिब. याउलट

जनान्यात डोकावण्याचा मोह आर्य धर्ममार्तंडांना आवरत नाही आणि गोषातील दुखियाऱ्यांचा जीव त्यामुळे अधिकच गुदमरतो.

करारातील 'ठेवा-हकला' कलम

त्रिवार तलाक प्रकरणात असेच काही होते आहे. दरवर्षादोन वर्षांनी हा विषय फिरून फिरून चर्चेला येतो. यावेळी अलाहाबाद कोर्टातील न्यायमूर्ती तिल्हारी यांच्या एका निवाड्याने हा प्रश्न गाजत आहे.

एका बैठकीत किंवा एका भूतकाळात तीन वेळा 'तलाक' शब्द उच्चारल्याने पुरुषाला फारकत मिळण्याची पद्धत निदान हिंदुस्थानातील मुसलमान समाजात आहे. इस्लामिक देश म्हणवणाऱ्या पाकिस्तान, इराण, इराक, मोरोक्को, इजिप्त या देशातही त्रिवार तलाकाला मान्यता नाही. हिंदुस्थानातही या पद्धतीने घटस्फोट घेणाऱ्या मुसलमानांची संख्या टक्केवारीत किरकाळ आहे. तरीही या पद्धतीने परित्यक्ता झालेल्या मुस्लिम स्त्रियांचे दु:ख कष्ट काय वर्णावे! पण धर्मव्यवस्था ही पुरुषांनी, पुरुषांची, पुरुषांसाठी केलेली असते, तिथे स्त्रियांना न्याय कोठून मिळायचा?

इस्लाममध्ये विवाह हा संस्कार नाही करार आहे. इस्लामच्या उदयकाळी स्त्रियांची स्थिती निव्वळ गुलामीची होती. त्याऐवजी इस्लामने त्यांना करारी नोकरदारांचे स्थान मिळवून दिले. नको असलेला नोकर झटपट काढता येणे हे कार्यक्षम व्यवस्थेचे लक्षण आहे. खुल्या व्यवस्थेत कामगारांना व पगारदारांना ठेवण्याचे आणि हाकलण्याचे सर्वाधिकार मालकाकडे असावेत. याला आज मान्यता मिळत आहे. मुस्लिम विवाहातील 'ठेवा-हकला' पद्धतीत दोष एवढाच, की ती एकांगी आहे आणि पक्षपाती आहे. स्त्रियांना 'ठेवा-हकला'चे अधिकार नाहीत. कारण उघड आहे.

विवाह करार सारे खोटे

करारनामे दोन तुल्यबळ पक्षात होतात. निकाल लावण्याच्यावेळी काझीने बुरख्यातील दुल्हन राजी असल्याची प्रश्न विचारून कितीही खात्री करून घेतली तरी निकाह काही समबल पक्षातील करारनामा नाही. वधू पक्षाच्या कमजोरीचा फायदा घेऊन त्यांच्यावर लादलेला करार हा मुळातच बेकायदेशीर म्हटला पाहिजे. तुल्यबळपक्षात राजीखुषीने होतो तो करार. विवाहाचा करार वधू पक्षाच्या कमजोरीच्या कारणाने आपोआपच अनैतिक आणि म्हणून बेकायदेशीर जी स्थिती निकाहाची तीच रजिस्टर्ड लग्नाची. हे सगळेच 'करार' समाजातील स्त्रियांची स्थिती पुरुषांच्या बरोबरीची होत नाही तोपर्यंत रद्दबातलच मानले

पाहिजे.

मंगल संस्काराचे सोंग

हिंदू विवाहाची परंपरा व्यवहाराच्या देवघेवाची नाही 'मंगलसंस्कार', शब्द मोठे मोहक आणि उदात्त, स्त्रियांना 'देवता' म्हणायचे आणि पायदळी तुडवायचे असा हा कसला संस्कार? 'संस्कार' आणि 'करार' दोन्ही गुऱ्हाळात स्त्रियांचे चिपाडच होत आले.

संस्कार, आयुष्यभराकरिता घेतलेली 'नातिचरामि' शपथ असल्या संकल्पना कधी महत्त्वाच्या होत्या किंवा नाही याबद्दल शंका आहे. रामाने सीतेला वनवासात पाठवले. त्याला काही मिथिलेतील मंगल विवाहात घडलेल्या संस्कारांची अडचण वाटली नाही. मग 'कलियुगात' संस्कारांची काय ती मातब्बरी!

करारनामा भागीदारीचा हवा

पती-पत्नीचे नाते जमीनदार - कुळासारखे आहे. सारे एकतर्फी. मालक संतुष्ट झाला, त्याची मेहरनजर झाली तर काय वाटेल ते औदार्य दाखवले; पण कशाने नाराज झाला तर लाथ मारून हाकूनही लावेल. पत्नीला आणि कुळाला हक्क म्हणून काही नाहीत. त्यामुळे सर्व समाजातील स्त्रियांची भूमिका एकसारखीच आहे, "तुमच्या औदार्यावर आम्ही जगू इच्छित नाही. आमच्या हक्काचे काय ते बोला!"

विवाह संबंध भविष्यकाळात कराराच्या स्वरूपाचे होणार आहेत यात काही शंका नाही. संस्काराच्या सोंगाचे दिवस आता संपत आले आहेत; पण येणाऱ्या युगातील विवाह करार भागीदारीच्या स्वरूपाचेच असतील. गुलामगिरीचे किंवा नोकरदारीचे नसतील.

या वाटचालीत अडथळा येतो आहे तो सुधारणावाद्यांचा आणि दुसऱ्यांच्या धर्मव्यवस्थेत लुडबुड करणाऱ्यांचा.

लुडबुड्यांना स्त्रियांच्या वेदनांचे काय होय?

"संस्कार म्हणून मुलीचे कन्यादान केलेत ना त्याच दिवशी ती तुम्हाला मेली, आता तिच्या मरणाबद्दल पोलिसात जाऊन तक्रार कसली करता? सासरच्यांनी मुलीचे काहीही हाल केले तरी त्याबद्दल वधूकडील लोकांनी चकार शब्द काढू नये. न तद्वाच्यम वधूबंधूभि: असा कालीदासी नियम आहे. पोलिसात मुलीच्या मृत्यूबद्दल तक्रार करणारा हरेक आईबाप हिंदू परंपरेचा भंग करतो." असा आक्रोश धर्ममार्तंडानी केला तर? त्रिवार तलाक इस्लामचा अविभाज्य भाग आहे. असा आग्रह मुल्ला मौलवींनी धरला तर?

हिंदू मुसलमान दोन्ही धर्मातील स्त्रियांनी जुजबी सुधारणांची मागणी न करता सर्व धर्माची चौकटच उधळून लावली पाहिजे.

न्यायमूर्ती तिल्हारी-सिंघल-अडवाणी यांच्या लुडबुडींना वेसण घालणे महत्त्वाचे आहे. न्यायमूर्ती तिल्हारी स्वत:ला जाहीररित्या 'हिंदूराष्ट्रवादी' म्हणवतात. अयोध्येची मशीद पाडल्यानंतर त्या जागी बांधलेल्या राम मंदिरात जाऊन दर्शन घेण्याची परवानगी देणारे हेच ते न्यायमूर्ती! अलाहाबाद हायकोर्टातून त्यांची बदली झाली, तेव्हा शेवटच्या काही तासात त्रिवार तलाक घटनाबाह्य असल्याचा निर्णय त्यांनी दिला. तिल्हार साहेबांनी हा निर्णय दिला एवढ्या एकाच गोष्टीने मुसलमान स्त्रियांची अवस्था मोठी अवघड करून टाकली. या विषयावर वाद होतील, दंगे होतील, रक्ताचे पाट वाहतील. मुसलमान स्त्रिया मजबुरीने आपल्या पुरुषांच्या बाजूने उभ्या राहतीलही आणि हिंदू स्त्रियाही सर्व हालअपेष्टा आसवे पुसून हिंदू संस्कार व्यवस्था कशी? किती? आहे याची महती गाऊ लागतील.

(१७ जून १९९४)

■■

मरणात खरोखर जग जगते

कोण्याही पाकिस्तानाबद्दल हिंदुस्थानातील लोकांना आदर वाटावा असे क्वचित घडते. खेळ, कला अशी क्षेत्रे सोडली तर पाकिस्तानी नागरिकाला हिंदुस्थानात वाहवा मिळणे कठीण आहे.

याला महत्त्वाचा अपवाद डॉ. महबूब अल हक यांचा. डॉ. महबूब ऑक्सफर्ड आणि केंब्रिजचे पदवीधर, जागतिक बँकेमध्ये उच्चाधिकारावर काम केलेले. एकेकाळी पाकिस्तानी नियोजन मंडळावर आणि काही काळ अध्यक्ष, झियांचे वित्तमंत्री म्हणून काम केलेले. मोठ्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे आणि आपल्या मतांचे प्रभावी प्रतिपादन करणारे अशा या विरळा पाकिस्तान्यास आंतरराष्ट्रीय समाजात मोठी मान्यता आहे.

मानव विकास निर्देशांक

डॉक्टर साहेबांचा एक मोठा ध्यास आहे. राष्ट्रीय उत्पादनाच्या आकड्यांवर देशाचा विकास अजमावण्याऐवजी एक नवा हिशेब बसवण्यात यावा, मानवाचा खराखुरा विकास दाखवेल असा निर्देशांक तयार करावा, त्यात मनुष्याच्या प्रगतीला पोषक नसलेले उत्पादन मुळात धरूच नये, असा डॉक्टरसाहेबांचा आग्रह आहे. छोटी दरिद्री राष्ट्रे सैन्यावर आणि शस्त्रास्त्रांवर अफाट खर्च करतात, जनतेला धड खायला नाही, शिक्षणाची सोय नाही, पाणी नाही, वीज नाही; पण सुविधांकरिता पैसे खर्च करण्याऐवजी त्यांची सरकारे अब्जावधी रुपये तोफा, रणगाडे, विमाने शस्त्रास्त्रे खरीदण्यावर उधळतात याला डॉक्टरसाहेबांचा मोठा विरोध आहे.

हिंदुस्थान आणि पाकिस्तान या दोन देशांच्या शस्त्रास्त्रांच्या खर्चावर डॉक्टरसाहेबांचा विशेष रोष आहे. भारत या प्रदेशातील सर्वात मोठे राष्ट्र असल्याने त्याने एकतर्फी शस्त्रकपात सुरू करावी, इतर देशांनी विशेषत: पाकिस्तानने

प्रतिसाद दिला नाही तर फेरविचार करावा; पण शस्त्रकपातीला सुरुवात झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे.

शांतिदूतांचे घोषपाठ

सम्राट अशोकांच्या काळापासून युद्धातील प्राणहानीने रक्तपाताने आणि जखमींच्या आर्त किंकाळ्यांनी अनेकांची मने द्रवली आहेत. गौतम बुद्धापासून महात्मा गांधींपर्यंत अनेक शांतीच्या प्रेषितांनी हिंसाचाराचा निषेध केला आहे. युद्ध रणांगणापुरते आणि लष्करापुरते मर्यादित राहिले नाही, ते सर्वकष बनले, अधिक भयानक झाले. साहजिकच युद्ध नको असे सर्वांना वाटते, अनेकजण त्यासाठी धडपडतात; पण युद्धे थांबली नाहीत आणि हिंसाचारही थांबलेला नाही. आज या क्षणी बोस्निया, टोमेन, रुआंडा आणि इतर देशात लक्षावधींची सरसकट कत्तल होते आहे. दुसऱ्या महायुद्धात मेली नसतील इतकी माणसे गेल्या वर्षभरातील कत्तलीत मेली असतील. शांतिपाठकांचा उद्घोष या बळींच्या किंकाळ्यांच्या आवाजात धड ऐकूदेखील येत नाही; पण घोष उच्चरवाने चालू आहे.

भाकरीपेक्षा बंदूक बरी?

शस्त्रखरेदीवर पैसा ओतला नाही आणि तो पैसा शिक्षण, आरोग्य इत्यादी विधायक कामांसाठी वापरला तर केवढे बरे होईल! याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही; पण मनुष्य विकास निर्देशांकाच्या डॉ. महबूब अल हक यांच्या कल्पनेने काही विशेष प्रश्न उभे राहतात.

माणसाची प्रगती मोजायची ती कोणाच्या नजरेने? कोणत्या फुटपट्टीने? तंबाखू, मद्य, मादके सगळी शरीराला अपायकारक, स्वैराचार तर आता मृत्युदंडच देतो आणि तरी या सगळ्या अभद्र गोष्टीमागे लोक आग्रहाआग्रहाने लागतात. युद्धाने, दु:ख वाढते; पण लष्कराकडील शस्त्रास्त्रं जागतिक उच्चतम दर्जाची असली पाहिजेत, असा आग्रह अंगावर फाटके धोतर नेसलेला सामान्य माणूससुद्धा करतो. लष्कराकरिता झालेल्या खर्चाबद्दल कधी तक्रार होत नाही, ना रस्त्यात ना संसदेत. या परिस्थितीबद्दल डॉक्टरसाहेबांना खेद आहे; पण ही परिस्थिती खरी आहे. लोकांना आजच्या अवस्थेत काही प्रसंगात भाकरीपेक्षा शस्त्रे महत्त्वाची वाटतात, हे नाकारता येणार नाही.

नवे कठमुल्ला खोमेनी?

लोक अजाण आहेत. त्यामुळे आपल्याच पायावर धोंडा पाडून घेण्यासाठी ते धावतात. धावतात तर धावोत, असले धावणे आम्ही मनुष्यजातीच्या प्रगतीच्या हिशेबात मुळी मोजणारच नाही. अशी डॉक्टरसाहेबांची दटावणी आहे. तंबाखु,

मद्य, मादके, युद्ध या गोष्टी घातक आहेत, याबद्दल फारसा वाद नाही. त्यामुळे हक साहेबांचे म्हणणे आज मानणे कदाचित शक्य होईल, तसा हिशेब मांडणे जमेलही. मधुमेहाच्या रोग्यांनी खाल्लेली साखर आणि मेदग्रस्ताने खाल्लेली साय कोणत्या सदरात घालायची हा प्रश्न राहीलच; पण उद्या सर्जन जनरल साखर, दूध, तेल इत्यादी पदार्थही बहुतेकजणांच्या आरोग्यास घातक आहेत म्हणून सांगू लागले. तर हक साहेबांच्या निर्देशांकातून या उत्पादनाची उचलबांगडी होणार काय? निर्देशांकात कोणती उत्पादने धरायची आणि कोणती वगळायची हे ठरवणार कोण?

यासाठी एक नवे नियोजन मंडळ आमच्या डोक्यावर पुन्हा येऊन बसणार का? धर्ममार्तंड आणि समाजवादी नियोजनापेक्षा सामान्य माणसांच्या कष्टांनी आणि इच्छांनी ठरणाऱ्या बाजारपेठेत सर्वोत्तम निर्णय होतात, ते निर्णय चांगले नसतील; पण त्यापेक्षा चांगले निर्णय करण्याची व्यवस्था मनुष्यजातीने अद्याप तरी शोधून काढलेली नाही, हे मान्य होत असताना काही मंडळी विरोधी सूर काढत आहेत. बाजारापेक्षा अधिक चांगले निर्णय करण्याची एक खास शक्ती आपल्याला असल्याचा ते दावा करीत आहेत.

पर्यावरणाच्या संरक्षणाच्या मिषाने पर्यावरणवादी सरकारी हस्तक्षेप जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. अकल्याणकारी उत्पादन अजिबात हिशेबात न घेण्याचा डॉक्टरांचा मनसुबा अशाच तऱ्हेचा आहे. एखाद्या खोमेनीला ते शोभेल, मान्यवर अर्थतज्ज्ञाला नाही.

आकडेमोड काहीही करा

अर्थात ज्याला त्याला आपापल्या कल्पनांप्रमाणे, इच्छांप्रमाणे आकडेमोड करण्यास, निर्देशांक तयार करण्यास त्याआधारे पदव्या मिळवण्यात आडकाठी नाही. त्यासाठी परवानगी लागत नाही आणि लागत असली तर ती कोणी नाकारलेली नाही; पण मनुष्यजातीचा एकूण बऱ्यावाईट उपद्व्याप सरसकट मोजण्याऐवजी हे किंवा ते अंग वगळणारा निर्देशांक मर्यादित कामापुरताच उपयोगी पडेल एरवी नाही. युद्धासंबंधी आकडेमोड महबूब साहेबांच्या निर्देशांकात धरली गेली नाही तर काय होईल? एखाद्या देशास साहेबांचे 'शांतिदूत' म्हणून प्रशस्तिपत्रक मिळेल किंवा मिळणार नाही. त्यामुळे युद्धे होण्याचे थांबणार थोडेच आहे!

युद्धे विनाशकही आणि कल्याणकारीही

शिक्षणाचा, आरोग्याचा विकास झाला पाहिजे याबद्दल काही वाद नाही; पण

ही कल्याणकारी कामे शांततेकालीन सरकारी प्रयत्नांमुळे आणि गुंतवणुकीमुळेच होतात आणि शास्त्रास्त्रांवर खर्च केल्याने मरगळतात हे काही खरे नाही. धोंडो केशव कर्व्यांपासून कितीकजण स्त्रीशिक्षणासाठी तळमळले, झिजले? पण स्त्रीशिक्षणाचा खरा प्रसार झाला तो युद्धकाळात मॅट्रिक पास झालेल्या मुलींना रेशनिंग खात्यात झटपट नोकऱ्या लागतात आणि ५० रुपयांचा पगार भडकल्या महागाईच्या दिवसांत घरी चालून येतो या आकर्षणाने.

युद्धे झालीच नसती तर डॉक्टर मंडळी आजही मलमे, काढे लावत बसली असती. शस्त्रक्रिया आणि प्रतिजैविकी या क्षेत्रातील अनेक सारे शोध युद्धकाळातील गरजातून किंवा अवकाश संशोधनाच्या 'अव्यापारेषु व्यापारा'तून लागले. युद्धे सर्वस्व पणाला लागून लढली जातात. माणसाच्या सर्व सुप्तासुप्त ऊर्जांचा वापर प्राणपणाने होतो तो युद्धकाळात. मनुष्यविकासाच्या मान्यवर दिशातसुद्धा शांतीकालापेक्षा युद्धकालात प्रगती अधिक झपाट्याने झालेली दिसते. डॉक्टरसाहेबांनी रोगाचे निदान बरोबर केले; पण त्यांची औषधाची उपाययोजना चुकली असे वाटते. युद्धे वाईट असतात असा हजारो नीतितज्ज्ञांनी आक्रोश केला तरी लोकांना युद्धे करावीशी वाटतात त्याअर्थी त्यात काही तथ्य असले पाहिजे. शस्त्रास्त्रांच्या खरेदीवरचा खर्च अवाढव्य आहे. हा डॉक्टरसाहेबांचा मुद्दा बरोबर आहे; पण त्यामुळे माणसाचा खरा विकास थांबतो हे खरे नाही आणि त्यावर उपाय शस्त्रनियंत्रण नाही, उलट शस्त्रांचा खुला व्यापार झाल्यास डॉक्टरसाहेबांचे ईप्सित साध्य होण्याची शक्यता अधिक आहे.

शस्त्रास्त्रांचे उत्पादन मोठे उपयोगी

शीतयुद्धाच्या काळात जिवघेण्या स्पर्धेमुळे शस्त्रास्त्रांचे उत्पादन वाढत होते. अर्थव्यवस्थेचे चक्र चालू राहावे, बाजारपेठेत मागणी भरपूर राहावी, रोजगार पुरेसा मिळावा याकरिता शस्त्रास्त्रांचे उत्पादन मोठे उपयोगी पडते. आज उत्पादन केले, उद्या उडवून दिले. वापरली गेली नाहीत तर शस्त्रे लगेच निरुपयोगी होतात; कारण शत्रूकडील हत्यारे अधिक आधुनिक आणि अधिक विनाशक बनतात. शीतयुद्धाच्या काळात महासत्तांच्या साठ्यातील जुनी झालेली शस्त्रे गरीब राष्ट्रांना पुष्कळशी फुकट दिली जात, रशियाच्या पाडावानंतर आता ती विकत घ्यावी लागतात; पण आजही शस्त्रांचा खुला बाजार झालेला नाही. कोणती शस्त्रे कोणत्या देशाला पुरवायची हे महासत्ताच ठरवतात. गरीब राष्ट्रांतील सत्ताधारी सुलतान ती विकत घेतात. त्यांचा उपयोग देशांच्या संरक्षणासाठी होणार नाही हे त्यांना पक्के ठाऊक असते. खरीखुरी लढाई झडली तर हा

दारूगोळा २-३ आठवडेसुद्धा पुरणार नाही, हे पक्के ठाऊक असतानाही ते शस्त्रे खरीदतात. बाहेरच्या हल्याला तोंड देण्यासाठी नाही, देशातील असंतोष चिरडण्यासाठी.

शस्त्रास्त्रांचाही खुला बाजार होऊ द्या

माणसांच्या काही दुर्दैवी आणि घातक प्रवृत्ती असतील, आहेत; पण त्या संपवण्यासाठी पुन्हा एकदा कोणी द्रुचार्य नियंत्रणासाठी बसवणे अधिक घातक आहे. खुल्या बाजारपेठेतील मागणी पुरवठ्याच्या ताकदीला मुक्त वाव दिल्यानेच ते कम अधिक चांगले होईल. शस्त्रांचा पुरवठा अमक्या राष्ट्राला करू, अमक्या राष्ट्राला करणार नाही. असा सरकारी हस्तक्षेप शस्त्रांच्या बाजारपेठेत असल्याने गरीब राष्ट्रे विनाकारण शस्त्रास्त्रांवर पैसे उधळतात. डंकेलप्रमाणे दुसरा कोणी शस्त्र बाजारातील सरकारी हस्तक्षेप आटोक्यात आणेल तर डॉ. महबूब अल हक यांनी निदान केलेल्या रोगावर खरीखुरी उपयायोजना होईल.

(२४ जून १९९४)

टोळीवादाला प्रतिष्ठा मिळायला नको

दुसऱ्या महायुद्धातील जिवघेण्या यातायातींनी थकलेल्या इंग्लंड, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, पोर्तुगाल या साम्राज्यवादी देशांच्या वसाहतींचे विसर्जन झाले. अल्जेरिया, इंडोनेशियासारख्या देशात घनघोर स्वातंत्र्ययुद्धे झाली. भारतासारख्या अनेक देशांना स्वातंत्र्य देण्यात आले.

मजूर पक्षाच्या ॲटली सरकारने भारत सोडण्याचा निर्णय घेतला; विन्स्टन चर्चिल यांचा साम्राज्याच्या विजर्सनाला विरोध होता. वसाहतीतील लोक राष्ट्रे नाहीत; त्यांना मोकळीक दिल्यास ते एकमेकांच्या उरावर बसतील. दांडग्यांच्या लठ्ठालठ्ठीत सर्वसामान्यांचे हालहाल होतील. साम्राज्याच्या छत्राखाली वसाहतीतील लोकांना माणसे बनू द्या, स्वराज्य चालविण्याची पात्रता मिळवू द्या; मग त्यांचे भविष्य ठरविता येईल. महात्मा ज्योतिबा फुले आणि विन्स्टन चर्चिल या दोघांचा दृष्टिकोन या विषयावर समान होता. शूद्रांना विद्या मिळण्याआधी इंग्रज निघून गेले तर येणारे स्वराज्य शूद्रांना मागे केरसूणी आणि गळयात मडके बांधण्याची सक्ती करणारे असेल. नियम मोडणाऱ्या शूद्रांची मुंडकी गुलटेकडीच्या मैदानावर चेंडूप्रमाणे उडविली जातील, हे ज्योतिबांचेही भाकीत होते.

चर्चिल आणि ज्योतिबा या दोघांचे भाकीत त्यांनाही कल्पना आली नसेल इतक्या भयानक रीतीने जगभर खरे ठरते आहे. चाळीस-पन्नास वर्षे वसाहतींची राष्ट्रे टिकली हेच आश्चर्य आहे. साऱ्या जगाची विभागणी दोन महासंघांच्या प्रभावक्षेत्रात झाली; शीतयुद्धाच्या मेहरबानीने शस्त्रास्त्रांचा मुबलक पुरवठा होत राहिला आणि समाजवाद्यांच्या नावाखाली बेसुमार सत्ता शासनांच्या मुठीत उजळ माथ्याने एकवटण्याची शक्यता मिळाली म्हणून बहुतेक वसाहती राष्ट्रे टिकली. समाजवादी साम्राज्य कोसळले;

त्यापाठोपाठ या टिनपाट समाजवादी जहागिऱ्या आणि वतनदाऱ्याही कोसळू लागल्या आहेत.

हवालदिल हैती

संयुक्त राष्ट्रसंघाच्या विनंतीला मान देऊन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी हैतीमध्ये फौजा पाठविण्याचा निर्णय आज सकाळीच जाहीर केला. काही पर्याय राहिलेलाच नव्हता. पपा डुर्वालेयेच्या काळापासून पिसाट विदुषकी हुकूमशहांच्या राजवटीखाली हा छोटासा देश भरडला गेला. शेवटी एकदाच्या तेथे निवडणुका झाल्या; पण सनदशीर मार्गाने निवडून आलेले सरकार उलथवून टाकून काही स्थानिक दांडग्यांनी देश हाती घेतला आणि लोकांना असे काही 'दे माय धरणी ठाय' करून सोडले. दररोज हजारोंच्या संख्येने हैती नागरिक होडगी, मचवे, तराफे, बोटी जे काही साधन मिळेल ते घेऊन देशाचा किनारा सोडून अमेरिकेचा आश्रय घेत आहेत. समुद्रात बुडण्याचा धोका परवडला; पण मायदेशी राहणे नको अशा 'त्राही, भगवान!' अवस्थेतील नागरिकांना आसरा देण्यासाठी दुसरा कोणी देश तयारही नाही. अशा परिस्थितीत हैतीवर सरळ चाल करून जाऊन तेथील शासन ताब्यात घेण्याचा निर्णय संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने घेतला.

रुआंडातील भीषण रक्तपात

आठच दिवसांपूर्वी रुआंडामध्येही अमेरिकेन सैनिक उतरले. लढाईकरिता नाही तर लक्षावधींच्या संख्येने निर्वासित झालेल्या आणि कॉलऱ्यासारख्या साथीच्या रोगाने पटापट प्राण सोडणाऱ्या नागरिकांच्या मदतीसाठी. रुआंडा एवढासा छोटा देश. त्यात दोन प्रमुख ~~जमाती किंवा~~ टोळ्या; 'हुतू' आणि 'तुत्सी' शतकानुशतकांच्या दोन टोळ्यांतील विद्वेषावर रुआंडाचे अध्यक्ष हुब्यारिमान यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची ठिणगी पडली आणि हुतूंच्या प्रभावाखालील शासनाच्या अधिकृत सैन्याने तुत्सींची देशभर कत्तल सुरू केली. कत्तलीत ठार झालेल्यांची संख्या २ ते ३ लाख असावी. तुत्सी जमातीने प्रतिहल्ला सुरू केला. पाडाव होऊ लागला तसे हुतूंचे नेते देशाबाहेरील फ्रान्सच्या मदतीने तयार केलेल्या सुरक्षित तटबंदीत आश्रय घेऊन राहिले आणि तेथून त्यांनी आपल्या जमातीच्या लोकांतच घबराट पसरवून देण्याला सुरुवात केली. "तुत्सू आता सूड घेतल्याखेरीज राहणार नाहीत. रुआंडा देश आता आपल्या जमातीला सुरक्षित राहिला नाही.

शेजारच्या देशात निघून चला. जे हुतू रुआंडात राहतील ते जमातीचे शत्रू मानले जातील आणि त्यांचा आम्ही सूड उगविल्याशिवाय राहणार नाही!" असा प्रचाराचा धोशा सुरू झाला.

लक्षावधींच्या संख्येने हुतू झाईर देशातील गोमा शहराकडे धावले. मधला सारा प्रदेश ज्वालामुखींच्या डोंगरांचा. पायवाटातून कुंभमेळ्याला लोक जमावे इतके निर्वासित जमले. पिण्याच्या पाण्याचीदेखील सोय नाही, स्वच्छतेचे नावच नको. एका दिवशी सकाळी कॉलऱ्याची पहिली लागण आढळली; त्यानंतरच्या २४ तासांत ८ हजार माणसे कॉलऱ्याने दगावली, गोमाच्या आसपास रोगराईने, भूकमारीने, जखमांनी मेलेल्यांची संख्या १० लाखांपर्यंत सहज गेली असेल. आंतराष्ट्रीय संस्था आणि राष्ट्रसंघ यांच्याही ताकदीबाहेरची ही समस्या आहे. लोकांनी परत आपापल्या गावी जावे याखेरीज काही पर्याय नाही; पण या निर्वासितांत सुरुवातीला तुत्सींची अमानुष कत्तल केलेले हुतू सैनिकही आहेत. परत जाऊ इच्छिणाऱ्या हुतू निर्वासितांना त्यांची धाकदटावणी चालू आहे. गोमातून फारतर १० टक्के निर्वासित परत घरी जातील; बाकी सगळे गोमांतच मरून जातील. एका जागी प्रचंड संख्येने माणसे मरून पडण्याचा जागतिक उच्चांक गोमात होणार आहे. एवढ्याने रुआंडीय दुर्भाग्य संपलेले नाही. चारशे वर्षांचा ऐतिहासिक सूड उगविण्याची भाषा करत हुतू नेते पुन्हा एकदा रुआंडावर चालून जाऊन तुत्सींचे शिरकाण करण्याची तयारी करीत आहेत.

गेल्या वर्षी सोमालियात कराल दुष्काळ पडला. सरकारी धोरणानुसार पडला; एवढेच नव्हे तर बाहेरच्या देशांतून अन्नधान्य मोठ्या प्रमाणावर येऊ लागले तसे सोमालियातील राज्यकर्त्यांनी शस्त्रास्त्रांचा वापर करून ती मदत रोखली. मदत देण्याबरोबर मदतीचे वाटप करण्याची जबाबदारीदेखील संयुक्त राष्ट्रसंघास घ्यावी लागली. इतक्या निकराचा हल्ला स्थानिक सरकारने केला, की अमेरिकेने आपल्या फौजा काढून घेतल्या.

नव्या पेशव्यांचा अस्त

संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा आज वेगवेगळ्या सतरा देशांत उपस्थित आहेत. त्यांचा खर्च दरवर्षी १२०० कोटी रुपयांचा आहे. आजपर्यंत या शांती फौजांवर हल्ले होत नव्हते, आता शांतिसैनिकांचे मृत्यू ही रोजची गोष्ट झाली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या नव्हे जगाच्या इतिहासात काही

नवीन घडते आहे. देशातील अंतर्गत यादवी किंवा शेजारी देशातील याचा अनुभव काही नवा नाही; पण आता अराजकाचा एक नवाच प्रकार समोर येत आहे. हैतीत सरकारच नाही; रुआंडातही तीच स्थिती; सोमालियातही तीच अवस्था. दुसऱ्या महायुद्धानंतर जन्माला आलेल्या अनेक टिनपाट राष्ट्रात लष्करी सामर्थ्याच्या आधाराने सरकारे उभी होती. देशातील नागरिकांत एकमयता जवळजवळ नाही. कुठे टोळक्यांचे विद्वेष, कोठे धर्मांतील भांडणे, कोठे जातिसंघर्ष. साम्राज्यवाद्यांनी आपल्या प्रशासनाच्या सोयीसाठी भूगोलाच्या नकाशावर अपघाताने सरहद्दीच्या रेघा ओढल्या म्हणून त्यांना देशाचे रूप आले. साम्राज्यांचे अंत होताना हे प्रशासन विभाग वेगवेगळी राष्ट्रे बनली; आपापला झेंडा फडकवू लागली, राष्ट्रगीत गाऊ लागली. राजकीय सत्ता ज्या टोळीच्या, जातींच्या, धर्माच्या, समाजाच्या हाती लागली त्यांनी ती सत्ता अधिकाधिक व्यापक आणि बलदंड करून टाकली आणि आपल्या टोळीचे वर्चस्व भरकस बसवले. समाजवादाचा पाडाव झाला आणि बाजारपेठेच्या व्यवस्थेकडे मार्गक्रमणा करणे आवश्यक झाले तसे या टिनपाट सत्तांची सद्दी संपली. देशाच्या प्रत्येक क्षेत्रात; प्रत्येक अंगावर निरंकुश सत्ता असले तरच ही सरकारे टिकू शकत होती. आता ती कोसळू लागली आहेत. एकामागोमाग एका देशात निर्नायकी अराजक तयार होत आहे. त्यातून लक्षावधींचे बळी जात आहेत.

नासलेल्या दुधावरच्या साया

हैती, रुआंडा, सोमालिया येथील भयानक बातम्या आणि दृश्ये पाहताना हे काही वेगळेच जग आहे. हे निग्रो म्हणजे निव्वळ रानटी! हिंदुस्थानात अशी गोष्ट कालत्रयी शक्य नाही, असा दिलासा आपण स्वत:लाच देतो. प्रत्यक्षात रुआंडा आणि हिंदुस्थान यात अंतर फक्त कालाचे आहे, गुणवत्तेचे नाही. इंग्रजांनी सत्ता हाती दिली, ती एका टोळीने आपल्या मलिद्याकरिता वापरली. येथेही वेगवेगळ्या टोळ्या थैमान घालीत आहेत. मंडलवादी, कमंडलवादी, मशीदवादी. कोणी ६०० वर्षांच्या इतिहासाच्या सूडाची भाषा बोलतो, कोणी ६००० वर्षांची.

स्वातंत्र्यानंतर एका टोळीने सारी सत्ता हाती घेऊन इतर टोळ्यांना लुटले, त्याला प्रत्युत्तर म्हणून आता मंडल, कमंडल झेंड्याखाली नवीन टोळीवादाच्या ललकाऱ्या दिल्या जात आहेत. टोळीवादाला देशात मान्यता मिळत आहे, प्रतिष्ठा मिळत आहे. टोळीटोळीतील विद्वेषाची आग

भडकाविणाऱ्या नेत्यांना 'हृदय सम्राट' आणि 'मसिहा' मानले जाते. जातीयवाद संपून अर्थवादाकडे वहण्याऐवजी इतिहासाचा सूड प्रत्युत्तरादाखल घेणारा जातीयवाद समर्थनीय आहे असे भलेभले मांडू लागले आहेत. नोकऱ्या, शैक्षणिक संस्था, विद्यापीठांची नावे असे वेगवेगळे मोर्चे टोळीवाले धडाधड उघडत आहेत. 'सामाजिक न्याया'ची गोंडस भाषा जिभेवर खेळवत आहेत.

कुणाला समजो किंवा ना समजो हिंदुस्थान आणि रुआंडा यात फारसे अंतर नाही. रक्तपात करण्यात आम्ही आफ्रिकी टोळ्यांपेक्षा जराही मागे नाही याची साक्ष गेल्या ५० वर्षांचा इतिहासच देतो. हिंदुस्थानात रुआंडाची पुनरावृत्ती कोणत्याही क्षणी होऊ शकते.

(१० ऑगस्ट १९९४)

■■

नैतिकता जपण्याची जबाबदारी समाजाची

दिल्लीला माझे वडीलभाऊ राहतात. काही दिवसांपूर्वी त्यांच्याकडे गेलो. घरात मुलगा, सून आणि अठरा महिन्यांची मुलगी. दोन्ही नातवंडे मोठी गोड आणि खेळकर. आम्ही मोठी माणसे बाहेर हिरवळीवर खुर्च्या टाकून गप्पा मारत बसलो होतो आणि बाजूला शेजारपाजारच्या दोन-चार मुलामुलींसकट ही नातवंडे खेळत होती. वहिनी चहा-फराळाचे आणण्याकरिता म्हणून उठल्या; आमचे बोलणे थोडावेळ थांबले आणि मुलांचे आवाज ऐकू येऊ लागले. मोठा भाऊ 'ये लडकी है क्या' हे हिंदी सिनेमातील गाजलेले गाणे मोठ्या ठेक्यात म्हणत होता आणि दीड वर्षाची चिमुरडी नात 'बाब्बा' असे म्हणून त्याला साथ देत होती. खेळाबरोबर सहजच त्यांचे हे गायन चाललेले होते.

वहिनी परत आल्या. त्यांच्याही कानावर त्यांच्या नातवंडांचे जुगलगीत-गायन आले. त्या अगदी शरमून गेल्या आणि अवघडल्या शब्दांत म्हणाल्या, "आता काय करावे हेच समजत नाही, ही छोटी छोटी मुलंसुद्धा 'सरकाय लो खटियॉ,' 'चोली के पीछे' असली गाणी म्हणत असतात. आम्ही घरात त्यांच्या कानावरसुद्धा छायागीत पडू देत नाही; पण बाहेर सगळीकडे त्यांच्या कानावर हीच गाणी पडतात." मी बोललो, "काहीच नाही; पण आमच्या याच भावाचे नुकतेच लग्न झाले होते, त्या काळची आठवण झाली. भगवानचा 'अलबेला', 'झमेला' असले चित्रपट आणि त्यांतील 'नखरे बडे मोटे', 'शाम ढले खिडकी तले' ही गाणी सगळीकडे वाजत असत. माझ्यासारख्या सनातन्यांची असल्या गाण्याबद्दल नाराजी असे, आम्ही त्यावेळीही जुन्या झालेल्या सैगल आणि पंकज मलिक यांचे भक्त. 'या नवीन गाण्यांत वाईट काही नाही; हे संगीत खास आहे.' असा आग्रह आमचे वडीलबंधू त्यावेळी धरत आणि मानले पाहिजे, इतिहासाने त्यांचे म्हणणे खरे ठरवले आहे. तीस वर्षांपूर्वी अभद्र वाटणारी ती गाणी आज

मोठ्या आवडीने अभिजात संगीत असल्यासारखी दिवाणखान्यात ऐकली जातात."

नातवंडांचे गायन चालूच होते, अगदी निरागसपणे. त्यांना गाण्यातील शब्दांच्या अर्थाची जाण असण्याचा काही प्रश्नच नव्हता. दोन पिढ्यांपूर्वी आम्ही 'रामरक्षा' पाठ करताना ती जितक्या निर्विकारपणे म्हणत असू तितक्याच निर्विकारपणे ही मुले 'बाब्बा' म्हणत होती.

ढोंग संपले एवढेच

घरात वडील माणसांसमोर, आपल्याला माहीत असली नाटकातली किंवा सिनेमातली गाणी म्हणण्यात काही चुकीचे आणि वाईट आहे, अशी लहानपणी आमची मनोमन कोठेतरी समजूत झाली होती. त्यामुळे आसपास कोणी वडील मंडळी नाहीत असे पाहिल्यावर म्हणायचे पाठांतर आणि वडीलधाऱ्यांच्या समोर म्हणायचे पाठांतर ही दोन वेगवेगळी खाती होती. आता नवीन पिढीला असला दुहेरी आणि दुटप्पीपणा करण्याची आवश्यकता वाटत नाही. आई-वडील, विशेषत: ही घाबरायची गोष्ट आहे ही कल्पनाच आमच्या पिढीबरोबर संपली.

'चोली' आणि 'खटिया' गाणी घरात आल्याने चांगले घडले का वाईट हा प्रश्न अलाहिदा; पण नवीन काही घडते आहे असे नाही. ढोंग संपले आहे, एरवी जुन्याच नाटकाचा नवा प्रयोग चालू आहे.

प्रत्येक पिढीत वडीलधारी मंडळी नवीन पिढीच्या अगोचर वागण्याने धक्का खातात. शतकाच्या सुरुवातीला खानदानी बैठकीच्या गाण्याऐवजी 'अँखिया मिला के' गाण्याने असाच धक्का दिला. त्यापुढच्या पिढीला 'गोरे, गोरे, ओ बाँके छोरे'चा फटका बसला. त्यानंतरच्या पिढीला 'चावी खो जाये'ने हैराण केले आणि आता 'सरकाय लो खट्टिया' तोच सनातन, प्रत्येक पिढीत उभा राहणारा प्रश्न पुन्हा एकदा नव्याने उभा करीत आहे.

चांगले की वाईट?

आठ-दहा वर्षांपर्यंत मुलांची पाठांतरक्षमता प्रचंड असते. पाठ केलेले परवचे, स्तोत्रे, कविता इत्यादी इतकी पक्की मनात ठसतात, की ती प्रक्षिप्तक्रियेचा भाग होऊन जातात. आम्ही बाळबोध घरातली मराठी शाळेत शिकलेली मुले बावन्न गुणिले सत्तावीस असली आकडेमोड सहज करतो. मॉंटेसरी आणि कॉन्व्हेंटमध्ये युनिफार्म आणि सफेद बूट घालून गेलेल्या मुलांना 'नऊ साते'सुद्धा सांगण्याकरिता बोटे मोडावी लागतात, याची आम्ही चेष्टा करतो. पाठांतराच्या वयात पाठांतर होणारच. कारण या अवस्थेत बुद्धीला शब्दांची आसुसलेली तहान असते. ही तहान शब्दसंपत्ती आणि अंककुशलता वाढविण्याकरिता वापरता येईल किंवा

'चीज बडी है मस्त मस्त' असल्या पाठांतरलाही वापरता येईल. आता घरात 'परवचे', 'शुभंकरोती' नियमाने क्वचितच होतात. पाठांतराची तहान आपली लहान मुले दुसऱ्या साधनांनी भागवतात. पुढे या मुलांची आकडेमोडी अडचण होईल काय? विविध प्रकारच्या शब्दांचे उच्चार करताना कसरतीअभावी त्यांची जीभ जड होऊन अडखळेल काय? स्त्रोतांचे पठण करताना नकळत होणारी नैतिकतेची अनामिक जाणीव या पिढीला होणारच नाही काय? आणि अभिजात कवितांच्या पाठांतरात वाटणारे नादमाधुर्य, कल्पनाविलास यांच्या अनुभवाने स्मिमित होण्याच्या अनुभवाला ही पिढी कायमची वंचितच राहणार काय?

माझी नात सात वर्षांची होण्याआधी गणकयंत्राशी खेळते. येत्या वर्षा-दोन वर्षांत खिशात मावणारे गणकयंत्र घेऊन वाटेत, ती आकडेमोड आणि महाप्रचंड शब्दभांडारातून निवड ती केवळ दोन-चार कळी बोटाने दाबून मिळवू शकेल. परवचे आणि पाठांतर यांची तिला आवश्यकता वाटणार नाही. गणकयंत्र पिढीतील मुलांचे पाठांतर वेगळे असावे हे साहजिक आहे. थोडक्यात, 'अधोऽधो गंगेयम्' म्हणण्याऐवजी 'सेक्सी, सेक्सी' म्हटल्याने जो काही फरक पडतो, तो बरावाईट कसा आहे, याचा विचार इतिहासावर सोडावा हे बरे!

जशी मागणी तसा पुरवठा

जमाना बिघडला आहे, लोकांच्या चवी बिघडल्या आहेत. त्यामुळे चटकदार ठेक्याखेरीज काहीच नसलेली ही गाणी लोकप्रिय होतात, हा युक्तिवादही काही फारसा खरा नाही. जुन्या सिनेमातील वेचक गाण्यांचा कार्यक्रम असला म्हणजे अगदी तरुण मुले-मुलीही आग्रहाने समोर बसतात आणि 'मस्त मस्त चीज'पेक्षा 'एक लडकी को देखा' आजही जास्त लोकप्रिय होते. तेव्हा नवीन पिढीची रुची बिघडली आहे असे म्हणणे निरर्थक आहे. बाजारात मागणी ज्या मालाची आहे तो माल तयार होतो. घरात दूरदर्शन आल्यानंतरही सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी गर्दी करणाऱ्यांत शहरात नोकरीच्या निमित्ताने आलेली, पारंपरिक कुटुंबाच्या वातावरणाला आचवलेली, शहरातील नोकरीमुळे दोन पैसे हाती खेळू लागले, की मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा नव्याने अनुभव घेणारी ही तरुण मंडळी सगळ्यांत अधिक. त्यांच्या मागणीप्रमाणे हा माल तयार होतो. देशाची आर्थिक विकासाची मार्गक्रमणा अधिक नैसर्गिक आणि शास्त्रशुद्ध असती तर गुंड, तस्कर, भ्रष्टाचारी नेते तयार झाले नसते, बकाल शहर वस्त्याही झाल्या नसत्या आणि 'खटिया' गीतेही सगळीकडे वाजली नसती. हा सगळा अर्थशास्त्राचा दूरवरचा विचार आज करण्याचे कारण नाही. नवीन अर्थव्यवस्था कधी येईल, ती येवो; पण

तोपर्यंत ही 'खटिया गीते' सुसंस्कृततेचे सारे अवशेष संपविणार काय? यावर काही तातडीची उपाययोजना नाही?

तीन पिढ्यांपूर्वी आज्यापणज्या नवीन थेरांविषयी नापसंती व्यक्त करीत होत्या. घरातल्या मुलांच्या तोंडी अभद्र गाण्याची ओळ ऐकली तर त्याला उपाशी ठेवत होत्या. आजच्या पिढीतली अगदी मुक्त मुक्त झाल्या म्हणणाऱ्या स्त्रियाही त्यांच्या आज्यापणज्यांसारख्याच वागत आहेत. घरात मुले-नातवंडे मान तुकविण्याची शक्यता नाही. तेव्हा त्या समाजावर आणि सरकारवर तुटून पडतात. 'सेन्सॉर बोर्ड' काय झोपले आहे काय? ही असली अश्लील गाणी पास होतातच कशी? अशी आरडाओरड करत आहेत.

सरकारच्या हाती नवे कोलीत!

सरकारने असल्या गाण्यावर बंदी घालावी, सेन्सॉर बोर्डाने अधिक कसोशीने काम करावे, अशी मागणी सगळीकडून होत आहे आणि नैतिकतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारच्या हाती सोपवायला भलेभले तयार होऊन बसले आहेत. सरकार जितके नादान अशी मान्यता मिळत असणाऱ्या काळात नीतिमत्ता मात्र सरकार चांगल्या तऱ्हेने सांभाळू शकेल अशी भाबडी निराधार आशा लोक बाळगतात.

गलीच्छ गाण्यांवर नियंत्रण यावे यासाठीदेखील सरकारच्या हाती सत्ता सोपवण्याला मी तयार नाही. नैतिकतेचे रक्षण करणे हे काम सरकारचे नाही. प्राणांचे, मालमत्तेचे रक्षण करणे एवढे सरकारचे काम आहे. अर्थव्यवस्थेत लुडबूड करणे हे सरकारचे काम नव्हे, तसेच नैतिकतेचे रक्षण ही जबाबदारी सरकारची नाही. बाजारपेठेने अर्थकारण ठरवावे आणि नैतिकतेचे रक्षण कुटुंब व्यवस्थेने आणि धार्मिक संस्थांनी केले पाहिजे. नीतिकत्ता हे धर्मांचे क्षेत्र आहे. राजकारणाचे नाही.

नीतिमत्ता-क्षेत्र कुटुंबाचे

घराबाहेर पडले, की मुलांवर बाहेरच्या संगतीचे आणि समाजाचे वाईट परिणाम होणारच. सर्व समाज शुद्ध, स्वच्छ, सुसंस्कृत असेल अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे होईल. एका नासक्या आंब्यानेही सारी अढी सडू शकते. कुसंगतीचे परिणाम टाळण्यासाठी प्रतिकारशक्ती मुळात तयार करणे हे काम कुटुंब-व्यवस्था करत असे. आता कुटुंब-व्यवस्थेने फक्त मुलांची पोषण, लालनपालन करण्याची जबाबदारी तेवढी मानली आहे. कुटुंब हे संस्कार केंद्र राहिलेले नाही. ख्रिस्ती धर्माच्या देशात कुटुंबाबरोबरच चर्च आणी पाद्री संस्कारावर देखरेख ठेवण्याचे

काम करीत. आपल्याकडे गाव पंचायत, जातिपंचायत यांच्याकडे ही जबाबदारी होती; पण त्याही संस्था मोडून गेल्या आणि सारी काहीच सत्ता सरकारच्या तेवढी हाती आली.

'खटिया गाणी' सांस्कृतिक नैतिक अध:पाताचे लक्षण आहेत किंवा नाहीत याबद्दल वेगवेगळी मते असू शकतील; पण काही उपायोजना करायची असेल तर ती कुटुंबात झाली पाहिजे. सामाजिक संस्थांमार्फत झाली पाहिजे. या कारणानेदेखील बुडत्या सरकारला अवसान सापडता कामा नये. म्हातारीच्या मरणाच्या दु:खापेक्षा काळ सोकावण्याचा धोका जास्त मोठा आहे.

(१९ ऑगस्ट १९९४)

■■

कर्तबगारांना अपंग बनविणारा समाजवाद

एका वेगळ्या प्रकारच्या उपचार केंद्राला भेट देण्याची नुकतीच संधी मिळाली. जन्मत: विकलांग किंवा अपंग असलेल्या मुलांना थोडेफार चालतेबोलते करण्यासाठी करायच्या उपचारांचा एक विभाग, दुसऱ्या विभागात अपघाताने जायबंदी झालेल्या माणसांना पुन्हा एकदा चालतेबोलते करून शक्य तितके स्वत:चे पोट भरण्यासाठी केंद्रावर नव्याने येतात. तेव्हा मनावर अपघाताने झालेला आघात आणि भविष्याविषयीची निराशा त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसते. आता आपण जन्मभर अपंगच राहणार, मरेपर्यंत असेच रुटुखटू जमेल तसे जगण्याखेरीज गत्यंतर नाही. जगाच्या दयेवर दिवस कंठायचे आहेत या जाणिवेने पूरी उद्ध्वस्त झालेली माणसे उपचार केंद्रात दाखल होतात. हळूहळू एक एक हाताचा, एकेक पायाचा वापर क्षणाक्षणाने शिकत ती चालू लागतात. पहिली पावले स्वतंत्रपणे चालताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून जात असतो. पुन्हा एकदा आपण आपल्या पायावर उभे आहोत. काम करत आहोत याचा त्यांना प्रचंड अभिमान वाटत असतो.

जन्मत:च विकलांग असलेल्या बाळांची स्थिती विशेष कठीण. चालण्याबोलण्याचा, हात वापरण्याचा त्यांना अनुभव नाही. एवढेच नव्हेतर आपण स्वत:च्या पायावर उभे राहावे अशी आकांक्षाही त्यांच्या मनात मुळी उपजलेलीच नसते. जन्मत:च दृष्टी नसलेल्याला सप्तरंगाची किमया समजून सांगण्यासारखा हा कठीण प्रकार. पक्षाघातासारख्या आजाराने हातपाय हलेनासे झालेल्या रोग्यांची परिस्थिती थोडी वेगळी. अपघातात जायबंदी झालेल्यांना अवयव नसतात; पण इच्छाशक्ती काम करत असते. पक्षाघाताच्या आजाऱ्यांच्या बाबतीत बुद्धी आणि अवयव यांच्यातील संपर्क तुटलेला असतो. विकलांग मुलांच्या बाबतीत बुद्धी आणि अवयव यांच्यातील संपर्क तुटलेला असतो.

विकलांग मुलांच्या बाबतीत बुद्धी-अवयव कशातच पुरेसा ताळमेळ नसतो.

माणसारखी माणसे; पण माणूस म्हणून करायच्या सहजसिद्ध क्रियासुद्धा करण्यास असमर्थ बनलेली पाहून कीव येते आणि अंगावर काटा उभा राहतो.

धट्टेकट्टे अपंग

गेल्या उन्हाळ्यात दिल्लीच्या भेटीत असाच वेगळा अनुभव आला. संध्याकाळच्या वेळी गजबजलेल्या जनपथावरून जात असताना एका दुकानात काही गौरकाय माणसे आलेली लक्षात आले. त्यांना जे काही पाहिजे होते ते भाषेच्या अडचणीने त्यांना सांगता येत नव्हते. पूर्व युरोपातील परवा परवापर्यंत समाजवादी अमलाखालील एका देशतील ही प्रवासी मंडळी, त्यांची मातृभाषा किंवा रशियन दुकानदाराला समजत नव्हते. दुकानदाराचे हिंदी, इंग्रजी त्यांना कळत नव्हते. त्यांच्यापैकी एकाला थोडे फ्रेंच येत होते. त्यामुळे थोडे दुभाषाचे काम करून, मी त्यांची अडचण सोडवली. माझे आभार मानताना त्यांतील एक वयस्क पुरुष म्हणाला, "हिंदुस्थानातील उद्यमशीलतेने आम्ही मोठे चकीत झालो आहोत. इथल्या प्रत्येक दुकानात सामानाची नुसती लयलूट आहे. साध्या या खेळण्यांच्या दुकानात पाहा. दुकानातील कपाटेच नाही तर छतसुद्धा टांगून ठेवलेल्या मालाने झाकून गेले आहे. कितीतरी माल, दरवाज्याच्या बाहेर ओसंडत आहे. या एवढ्या वस्तू तयार करतो तरी कोण? याचे कारखाने कोठे आहेत? खेळणी तयार करण्याचे काम कोणत्या मंत्रालयात होते?"

भारतीयांच्या उद्यमशीलतेची प्रशंसा?

त्यांच्या प्रश्नांची भडिमार ऐकून मी चकित झालो, चक्रावलो आणि थोडा सुखावलोही. माझ्या देशवासीयांच्या उद्यमशीलतेचा उल्लेख मी प्रथमच ऐकला. येथील लोक तेवढे सारे आळशी, गदळ असे ऐकण्याची कानांना सवय. प्रत्यक्षातला अनुभवही बहुतांशी त्याचीच पुष्टी करणारा. परदेशी प्रवाशाच्या या बोलण्याने माझ्याच देशाचे एक फारसा बोलबाला नसलेले अंग डोळ्यासमोर आले.

मोठमोठ्या कारखान्यांत ते सरकारी असोत की खासगी, काम कसे आरामाने, थाटात चाललेले असते. बाहेर प्रशस्त हिरवळी आणि फुलांच्या ताटव्यांनी बहरलेल्या बागा, प्रशस्त हवेशीर उजेडाच्या इमारती, त्यांत मंदगतीने चालणारा कर्मचारी वर्ग. हे दृश्य खास हिंदुस्थानी खरे; पण त्याबरोबर दुसरेही एक दृश्य तितकेच एतद्देशीय आहे.

लहानमोठ्या शहरांच्या गल्लीबोळात आणि झोपडपट्ट्यात पत्र्यांच्या छपराखाली चेंडू बाहुल्यापासून प्लॅस्टिकच्या विविध वस्तू, मोठमोठ्या कारखान्यांना लागणारे

किरकोळ सामान तयार करणाऱ्या कौटुंबिक कारखान्याचे चित्रही तितकेच भारतीय आहे. परदेशी प्रवाशांना दिपवून गेलेली भारतीयांची उद्यमशीलता ही मोठ्या कारखान्यांची नाही, या छोट्या छोट्या उद्योजकांची आहे. मोठे कारखाने स्थापन झाले सरकारमुळे, घाट्यात गेले सरकारी थाटामुळे आणि चालू राहिले ते परदेशी स्पर्धेपासून मिळालेल्या सरकारी संरक्षणामुळे. कोणतेच सरंक्षण कोणतीही मदत नसताना अगदी आकर्षक माल लहान लहान झोपड्यात आणि शेडमध्ये तयार करणाऱ्या या बहाद्दर कारखानदारांनी देश समाजवादी अमलाच्या काळातही जिवंत ठेवला.

परदेशी प्रवासी पुढे सांगत होता, "आम्हाला हे सारे अद्‌भुत वाटते. कोणतीही वस्तू तयार व्हायची तर त्यासाठी सरकारी योजना पाहिजे. कारखाना उभा राहिला पाहिजे. सामान्य नागरिकांचे काम म्हणजे दिलेल्या वेळात तेथे जाऊन ठरवून दिलेले काम यांत्रिकपणे पार पाडणे. त्यातल्या त्यात चांगला हुशार कामगार अधिक उत्पादन करायचा प्रयत्न सुरुवाती सुरुवातीला करतो आणि काही काळाने आजूबाजूचे उदाहरण आणि वातावरण पाहून, तो नाद सोडून देतो. काय उत्पादन करावे? बाजारपेठेची मागणी काय आहे? लोकांची आवडनिवड काय आहे? ती वस्तू तयार करण्याचे तंत्रज्ञान काय. आपल्याला कोणते तंत्रज्ञान फायदेशीर ठरेल. कच्चा माल कोठे मिळेल? कुशल कारागीर कोठे मिळतील? थोडीफार पतपुरवठ्याची सोय कशी होईल? सगळी यातायात करून बाजारात माल खपेल काय? उत्पादनखर्च भागेल काय? आज स्पर्धेत टिकून राहिलो; पण उद्यादेखील टिकून राहण्यासाठी आजच काय तयारी करायला पाहिजे? हे असले प्रश्न, असल्या चिंता, अनिश्चितता यांच्या कल्पनेनेही आम्ही भांबावून जातो. असले प्रश्न हाताळण्याचीच काय, विचार करण्याचीसुद्धा आमची सवय पार संपून गेली आहे."

माणसांचे उंदीर करणारी व्यवस्था

पूर्वी कधीकाळी प्रयोगशाळेत पाहिलेल्या साध्या पुठ्ठ्याच्या खोक्यात ठेवलेल्या पांढऱ्या उंदरांची आठवण झाली. उंदीर जात मुळात सर्वगामी; म्हणून बुद्धिदेवतेचे वाहन ठरली. कोठेही सरसर चढून जावे, कोणत्याही लहान भोकातूनही पलीकडे जावे. लीलया कोणताही अडथळा पार करावा. हा ज्यांचा स्वभावधर्म त्या उंदरांचे वंशज तीन इंच उंचीची खोक्याची कड उल्लंघून पार होऊ शकत नाहीत. कारण पिढ्यान्‌पिढ्या प्रयोगशाळेत वाढवल्याने त्यांची सर्व चपळता संपून गेली.

उपचार केंद्रातील रोगी, प्रयोगशाळेतील उंदीर आणि पूर्व युरोपातील नागरिक यांच्यातील समानता स्पष्ट झाली. मी त्या प्रवाशाला म्हटले, "बाबा, तू म्हणतो आहेस ते खरेही आणि आणि खोटेही. भारतात झोपडपट्ट्यात, शेतात अजून काही उद्योजक शिल्लक आहेत; पण ज्या समाजवादाने तुम्हाला अपंग बनवले, त्याने या देशातही काही थोडा धुमाकूळ घातला नाही. सरकारी संरक्षण नसेल तर आम्ही जगावे कसे, अशी तक्रार येथील बडेबडे उद्योजक करतात. आमचे उत्पादन कितीही कमी असो, आम्हाला पगार आणि बोनसवाढ मिळालीच पाहिजे अशी येथील कामगार घोषणा देतात. पाळण्यापासून ते चितेपर्यंत जागोजागी सरकारने मदत करावी अशा अपेक्षेने लोक स्वस्थ बसून राहतात. तुमच्या रोगाची लागण आमच्याकडेही झाली आहे. समाजवाद हा माणसांना पंगू करण्याचा कारखाना आहे. उत्पादन आणि उपभोग यांच्यातील संबंध तुटला म्हणजे ऐतखाऊंच्या फौजा तयार होतात. आमच्याकडेही या फौजांनी थैमान घातले आहे. समाजवादाचे विष मोठ्या जहाल प्रमाणात तुम्हाला प्यावे लागले, अनेक वर्षे प्यावे लागले. म्हणून तुमच्या देशातील कर्तबगार उद्योजक अपंग बाहुली बनले. आमचे भाग्य एवढेच, की समाजवादाचे जहर आमच्याकडे भेसळ रुपात आले."

त्याचा अंमल दोनतीन दशकेच चालला. सरकारी क्षेत्राचा स्पर्श जेथे जेथे झाला, ज्यांना ज्यांना झाला ते अपंग झाले. सुदैवाने सरकाचा संपर्क सर्वांगांना झाला नाही किंवा चुटपुटताच झाला म्हणून आमचे अवयव थोडेफार शाबूत आहेत. माणूस चैतन्यमय आहे, धडपड्या आहे, त्याची अपंग नोकरदार बाहुली बनवणारी समाजवादी व्यवस्था मानवतेविरुद्धचा अपराध आहे. त्यातून तुम्ही सुटलात, आम्ही सुटलो; पण हातपाय पुन्हा वापरता यावेत यासाठी मोठ्या उपचारांची गरज आहे आणि निश्चयाचीही.

(२६ ऑगस्ट १९९४)

■■

छुपे युद्ध अधिक त्रासदायक

रामदास नायक यांचा मुंबईत राहत्या घराजवळ भरदिवसा खून झाला आणि दंगली, कत्तली, जाळपोळ, बॉम्बस्फोट, पुढाऱ्यांचे भ्रष्टाचार या सगळ्या प्रकारांना निर्ढावलेली मुंबईची जनतासुद्धा हादरून गेली. फार वर्षांनी लोकांनी स्वयंस्फूर्तीने संपूर्ण बंद पाळला. चालत्या वाहनांवर दगडफेक झाली; पण ती सरकारी रेट्याखाली कामकाज चालू ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आगाऊ वाहनाविरुद्ध अडीचशे लोकांचे प्राण एका क्षणात घेणाऱ्या बॉम्बस्फोटाइतकीच एकट्या राम नायकाची हत्या गंभीर आहे याची सगळ्यांनाच जाणीव झाली.

तीन व्यावसायिक मारेकऱ्यांनी अत्याधुनिक स्वयंचलित बंदुकांतून गोळ्यांचा वर्षाव करून नायकांची हत्या केली आणि ते झपाट्याने नाहीसेही झाले. पोलिसांचा पूर्वेतिहास पाहता मारेकरी सापडतील ही शक्यता जवळजवळ नगण्य. मालकिणीचा गळा कापून दागिने घेऊन पसार होणाऱ्या नोकरांना त्यांच्या गावी जाऊन अटक करणे इथपर्यंत पोलिसांच्या गुन्ह्याच्या शोधातील चतुराईची कमाल मर्यादा आहे. गेल्या काही वर्षांत डझनभर लोकप्रतिनिधींचे मुंबईत खून पडले. अजून एकाचाही निकाल पोलिस-फायलीतून बाहेर आलेला नाही.

थोर तुझे उपकार, पाकिस्ताना!

पाकिस्तान ही, हिंदुस्थानी राजकारण्यांच्या विलक्षण सोयीची गोष्ट आहे. पाकिस्तान तयार झाले नसते तर पाकिस्तान शोधून काढून तयार करावे लागले असते. देशात जे जे काही वाईट घडत असेल, त्याची जबाबदारी पाकिस्तानवर टाकली म्हणजे पंतप्रधानांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत, राज्यगृहमंत्र्यांपासून ते गल्लीतील पुढाऱ्यांपर्यंत सगळ्यांना हात झाडून मोकळे होता येते. पंजाबमध्ये फुटीरवाद माजला? 'पाकिस्तानची कारवाई' काश्मीरमध्ये आतंकवाद्यांचेच राज्य तयार झाले? त्यामागे 'पाकिस्तानचा हात,' मुंबईत दंगे झाले, स्फोट झाले, नायकांचा

खून झाला? त्यामागे 'पाकिस्तानचा डाव!' 'नवऱ्याने मारले आणि पावसाने झोडपले तक्रार कुणाकडे करायची'. अशी बायकांची म्हण आहे. तसेच 'आले पाकिस्तानी मना! तेथे कोणाचे चालेना!!' असे म्हणून स्वस्थ बसावे, परकीय आक्रमणाच्या धास्तीने लोकांची मते आपल्यालाच पडणार या खात्रीत खुश राहावे. अशी एकूण पुढाऱ्यांची 'पॉलिसी.'

काहीतरी करा

शेजारी पाकिस्तानसारखे शत्रुराष्ट्र आहे. दोघांतील प्रखर विद्वेष ऐतिहासिक आहे. दोघांमध्ये गेल्या पन्नास वर्षांत तीन उघड युद्धे झाली आणि छुप्या लढाया सतत चालूच आहेत. तेव्हा 'पाकिस्तानचा हात' युक्तिवाद निव्वळ हास्यास्पद आहे. शेजारील शत्रुराष्ट्र जेथे शक्य आहे तेथे विरोधी कारवाया करणारच. बांगलादेश प्रकरणी भारताने हस्तक्षेप केला. तसा हस्तक्षेप करण्याची शक्यता नसली तरी इच्छा पाकिस्तानी नागरिकांत असावी हे व्यावहारिक राजकारणात गृहीत धरले पाहिजे. असल्या पाकिस्तानी हस्तक्षेपावर उपाय दोनच संभवतात :

पहिला संरक्षक पद्धतीचा. देशातील गुप्त पोलिस यंत्रणा आणि सरहद्दीवरील पहारा इतका मजबूत ठेवायचा, की शत्रुराष्ट्राला हात सरकवण्यास वावच राहू नये. दुसरा मार्ग म्हणजे इस्त्रायल पद्धतीचा, काश्मीर, पंजाब, मुंबई जेथे कोठे पाकिस्तानचा हात दिसेल त्याला प्रत्युत्तर म्हणून आवश्यक तर पाकिस्तानी प्रदेशात जाऊन मुंहतोड अगदी 'नानी याद आयेगी' असा जबाब प्रत्येक वेळी न चुकता द्यायचा. या दोन्ही पद्धती भारत सरकारच्या आवाक्याबाहेरच्या आहेत. पुरावा मिळत नाही, सबब प्रकरण खारीज करण्यात आले आहे. असे म्हणून बहुतेक गुन्ह्यांची प्रकरणे पोलिस चौकीत निकालात निघतात. तद्वतच पाकिस्तानचा हात आहे, असा शेरा मारून घातपाताची प्रकरणे निकालात काढण्याचा सरकारी खाक्या आहे. शेअर घोटाळा प्रकरणात या जबाबदार म्हणून कोणी पाकिस्तानमध्ये नाव घेतले नाही हेच आश्चर्य! खरे म्हटले तर ते प्रकरण पाकिस्तानने घडवून आणले असल्याची शक्यता सर्वांत अधिक आहे.

स्वस्त आणि भयानक छुपे युद्ध

काश्मीर प्रकरणी पंतप्रधान नरसिंह राव यांनी एक शब्दयोजना केली. पाकिस्तानने आतंकवाद्यांमार्फत हिंदुस्थानशी अपरोक्ष युद्ध छेडले आहे. पंतप्रधानांनी हे शब्द वापरले. त्यांच्या लष्करी सेनानींनी त्यांना 'अपरोक्ष युद्ध' याची युद्धशास्त्रात व्याख्या काय आहे ती समजावून सांगितली असावी आणि तो शब्दप्रयोग त्यांनी

जाणीवपूर्वक तोलूनमापून केला असावा. स्वत:चे सैन्य न पाठवता शत्रू राष्ट्रातील पंचम स्तंभीयामार्फत घातपाताच्या विविध कारवाया घडवून आणून शत्रुराष्ट्रांची संरक्षण व्यवस्था, आर्थिक कारभार आणि मनोधैर्य खचवणे हे अपरोक्ष युद्धाचे तंत्र म्हणजे कमी खर्चातील लढाई आहे. एकदा युद्ध पेटले म्हणजे अब्जावधी रुपयांचा हरदिन चुराडा होऊन जातो. अपरोक्ष युद्धात काही कोटी रुपयांची काम भागून जाते. पाकिस्तानचे आकारमान पाहता हिंदुस्थानविरुद्ध बांगलादेश सदृश कारवाई करण्याचा अयूबखानी-याह्याखानी मूर्खपणा पुन्हा करणे असंभव आहे. अपरोक्ष स्वस्तातील युद्ध हा एकमेव मार्ग पाकिस्तानी युद्धखोरांना खुला आहे आणि ते यापुढेही वापरणार आहेत.

मुंबईवरील हल्ल्याचा मुंहतोड जबाब पाहिजे

मुंबईतील दंग्यांमागे आणि बॉम्बस्फोटापासून नायकाच्या हत्येपर्यंत सगळ्या विद्रोहो घटनामागे पाकिस्तानी हात आहे, असे मुख्यमंत्री तर म्हणत आहेतच, गृहमंत्र्यांनीही असेच विधान निक्षून केले आहे. पाकिस्तानच्या भारताविरुद्धच्या छुप्या युद्धाची पंजाब आणि काश्मीर यांबरोबरच मुंबई ही तिसरी आघाडी झाली आहे. पंजाब आणि काश्मीरमधील घातपातांच्या प्रकारांइतकेच प्रकार मुंबईत होत आहेत. तिथल्याइतकीच येथील पोलिस व्यवस्था कोसळली आहे. एवढेच नव्हे तर त्यातील एक मोठा भाग धातुपात्यांना सामील झाला आहे. मुंबई हे देशातील अर्थव्यवहाराचे केंद्रस्थान आहे. मुंबई विस्कळीत झाली तर सगळा देश पक्षाघात झाल्याप्रमाणे निपचित पडेल. मुंबईत जातीय तेढ वाढली तर सारे राष्ट्र जातीयवाद्यांच्या प्रभावाखाली जाईल. काश्मीर आणि पंजाबमधील घातपात देशाच्या महत्त्वाच्या अवयवावर आघात करणारे म्हटले तर पाकिस्तानची भारताविरुद्धची मुंबई आघाडीवरील लढाई ही मर्मघात करणारी आहे. 'पाकिस्तानचा हात' ही सबब केवळ सोयीस्कर सबब म्हणून वापरली जात नसेल, तर काही किमान गांभीर्याने मुंबईचा प्रश्न सरकारने हाताळला पाहिजे.

मुंबईतील सरकार बरखास्त करून त्या जागी केंद्राचे प्रशासन आणावे ही मागणी जबाबदार विरोधी पक्षांनी केली आहे. शत्रुराष्ट्राने एवढ्या प्रचंड प्रमाणावर कारवाई सुरू केल्यानंतर मध्यवर्ती शासनाने कारभार आपल्या हाती घ्यावा यासाठी घटनेत तरतूद आहे, एवढेच नव्हे तर केंद्र शासनाची ती जबाबदारी आहे. मुंबईत केंद्रशासन आणि लष्करी व्यवस्था तातडीने अमलात आणण्यात आली नाही तर त्याचे दोनच अर्थ निघू शकतात. एक म्हणजे 'पाकिस्तानी हात' हे निव्वळ कुभांड आहे. मुंबईतील सारे घातपात स्थानिक गुंड, तस्कर, दादाच

घडवीत आहेत. त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारभारात त्यांचे अनेक देशांशी संबंध असतात. त्याबरोबर पाकिस्तानशीही असणार हे उघड आहे. तेवढाच धागा पकडून त्यांच्या कारवायांमागे 'पाकिस्तानी हात' आहे असा गिल्ला करून भागायचे नाही. मोकळे होण्यासाठी पाकिस्तानी हाताचा उपयोग देशाच्या संरक्षणासाठी घातक ठरेल.

सरकारच्या निष्क्रियतेचा दुसरा भयानक अर्थ असा लागू शकतो, की पंजाबमध्ये शीख आहेत. काश्मीरमध्ये मुसलमान आहेत. म्हणून सरकारने लष्करी कारवाई केली, हिंदू मुंबईत सरकारचे तर्कशास्त्र काही वेगळेच आहे.

संशयाच्या सावटाखालील मुख्यमंत्री

'पाकिस्तानी हाता'चा सरकारी आरोप गंभीरपणे केला जात नाही. याविषयी आणखी एक निर्णायक भरभक्कम पुरावा आहे, युद्ध आघाडीवरील प्रदेशातील कारभार, शत्रूशी सहमत असल्याच्या संशयाचा किंचित वास असलेल्या माणसाच्या हाती कधी ठेवला जात नाही. मुंबईत शरद पवार यांना मुख्यमंत्रिपदी राहू दिले जाते तोपर्यंत मुंबईतील घातपातात पाकिस्तानी हात असल्याचा दावा निव्वळ कांगावा मानावा लागेल.

खैरनारांनी दाऊद इब्राहिम आदींच्या टोळ्यांशी शरद पवारांचे संबंध असल्याचा आरोप उघडपणे केला आहे. उल्हास जोशी या पोलिस अधिकाऱ्याने अशाच अर्थाचे प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर केले आहे. सगळे आरोप आपण कोर्टात खोडून काढू असे मुख्यमंत्री विश्वासपूर्वक म्हणत आहेत त्यात कदाचित तथ्य असेलही. शरद पवार न्यायालयासमोर दोषी साबीत होतील किंवा नाही हा मुद्दा महत्त्वाचा नाही, ते दोषी सिद्ध होण्याइतका साक्षीपुरावा पुढे आला किंवा नाही हाही प्रश्न महत्त्वाचा नाही. फार मोठ्या प्रमाणात सर्वसाधारण जनतेत शरद पवारांबद्दल संशय निर्माण झाला आहे, हे न नाकारण्यासारखे सत्य आहे. पाकिस्तान ज्या पंचमस्तभीयांचा वापर उत्पात घडवण्याकरिता करीत आहे. त्यांतील म्होरके ठाकूर-कलानी यांचा संबंध मुख्यमंत्र्यांशी होता. ते पकडले गेल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी काय केले हे महत्त्वाचे नाही; पण वर्षानुवर्षे ठाकूर-कलानी हे काँग्रेस आमदार गुंडांना सामील आहेत याचा सुगावा मुख्यमंत्र्यांना लागला नाही हाच मामला भरपूर गंभीर आहे. टोळीयुद्धातील दोन मारेकरी संरक्षणमंत्र्यांच्या विमानातून लखनौ-मुंबई प्रवास करतात, एवढी एकच गोष्ट संशयाचे सावट दाट करण्यास पुरेशी आहे. ठाकूर-कलानी आणि हे मारेकरी ही प्रकरणे शरद पवार अकार्यक्षम तरी आहेत किंवा सरळ गुंडांना सामील

आहेत. असा संशय निर्माण करण्यास बस आहेत. मुंबईत पाकिस्तानविरुद्ध लढाई सुरू झाली असेल तर असा मनुष्य मुख्यमंत्रिपदी राहणे देशाच्या दृष्टीने धोक्याचे आहे.

शरद पवार नजरबंदीत पाहिजेत

युद्धकाळात शत्रूशी हातमिळवणी केल्याचा संशय ही मोठी गंभीर बाब मानली जाते. काश्मीर प्रकरणात शेख अब्दुल्लांना बडतर्फ करण्यात आले. एवढेच नव्हे तर सतरा वर्षे अटकेत ठेवण्यात आले. त्यांच्याविरुद्धचा साक्षीपुरावा शरद पवारांच्या विरुद्धच्या तुलनेने अगदीच किरकोळ होता. राम नायकांच्या खुनानंतर शेख अब्दुल्लांप्रमाणेच शरद पवारांवर बडतर्फी आणि नजरबंदी अशी कारवाई झाली नाही तर निष्कर्ष एवढाच निघेल : 'पाकिस्तानी हात' हा सारा बकवास तरी आहे किंवा केंद्र सरकारची मुसलमान आणि शीख बहुसंख्य राज्यातील नीती वेगळी आणि हिंदू राज्यातील नीती वेगळी आहे.

(१५ सप्टेंबर १९९४)

■■

जन्मदात्याच्या मुळावर आलेली घटनेतील नववी अनुसूची

राखीव जागांचा प्रश्न पुन्हा एकदा भडकून विक्राळ रूप धारण करील, असे लक्षण दिसते आहे. प्रश्न आधीच मोठा ज्वालाग्राही; हजारो वर्षांच्या पिढ्यान्‌पिढ्यांची जातिव्यवस्था आणि जाती-जातीतील विद्वेष; ती दूर करण्यासाठी समग्र देशात आर्थिक भरभराटीचे वातावरण हवे. देशातील आर्थिक कुचंबणेमुळे जातिव्यवस्थेतील अन्याय मान्य असणारे सुबुद्धदेखील मागासजातीयांना खास सवलती देण्यास कचकच करतात. आपण कुचंबलो आहोत यापेक्षा मागचे आपल्याला ओलांडून पुढे चालले आहेत याचे दु:ख आणि राग मोठा असतो. सर्व समाज एकत्र भरभराटीकडे जाईल याची शक्यता मावळली, की एकएकट्या माणसाला किंवा कुटुंबाला प्रगती करण्याची तीनच साधने राहतात. पुढारी व्हायचे आणि सत्ताच काबीज करायची, हा एक मार्ग. पुढाऱ्यांच्या आधाराने लायसेन्स परमीट राज्याचा फायदा घेऊन सुरक्षित उद्योजक बनणे आणि बंदिस्त बाजारपेठेवर हात मारून गडगंज संपत्ती मिळविणे, हा दुसरा मार्ग. सर्वसामान्यांच्या आवाक्यातला या दोनपैकी एकही मार्ग म्हणजे सत्ताधारी सरकारच्या नोकरशाहीत प्रवेश करणे. परंपरेने कनिष्ठ मानली जाणारी नोकरी नेहरूकाळात श्रेष्ठ बनली. शेती, व्यापार कनिष्ठ ठरले. समाजवादी व्यवस्थेत पुढारी आणि उद्योजक यांच्या मेजवानीतील उच्छिष्टावर गुजारा करणारी नोकरशाही हळूहळू मोठी ताकदवान बनली आणि तिने आपले पगार-भत्तेतर मजबूत करून घेतलेच; पण हळूहळू राजकीय सत्तेलासुद्धा हात घातला.

नोकरी म्हणजे स्वर्ग झाली. नोकरीत असलेले भाग्यवान, ज्यांना नोकरी नाही ते भणंग बुभुक्षित; अशी परिस्थिती झाल्यानंतर नोकरी मिळण्याच्या शक्यतेवर आघात करणारा कोणताही निर्णय मोठा स्फोटक बनला. एरवी कशानेही ढिम न हलणारी दिल्लीची पोरं या प्रश्नावर अक्षरश: प्राण टाकण्यास तयार झाली. जनता दलाचे एक सबंध सरकार त्यामुळे कोसळले. पी. व्ही. नरसिंह राव

आणि सीताराम केसरी यांनी आपल्या 'मध्यम मार्गा'ने वातावरण शांत केले होते. एकूण ५० टक्क्यांपर्यंत जागा राखीव असाव्यात याला नाइलाजाने का होईना आम मान्यता मिळू लागली होती. हा प्रश्न मिटत नाही असे वाटत असतानाच उत्तराखंडात राखीव जागांविरुद्ध आंदोलनाचा पुन्हा एकदा उद्रेक झाला आहे. जमावाने डेहराडूनच्या पोलिस अधीक्षकाची भरदिवसा हत्या केली, आजपर्यंत डझनावर लोक मेले, शेकड्यांनी जखमी झाले, पुढे आणि काय वाढून ठेवले आहे कोण जाणे?

राखीव जागांचा ऊस मुळासकट

राखीव जागांवरील दंगलीच्या या दुसऱ्या लाटेस दलित चळवळीचा नवा आक्रस्ताळी अवतार जबाबदार आहे आणि त्याबरोबरच केंद्र शासनाचा अजागळपणाही जबाबदार आहे. मंडलाच्या वेदीवर राखीव जागांच्या राजकीय फायद्याचे प्रेषित आणि द्रष्टे विश्वनाथ प्रताप सिंग यांचा बळी गेला; पण त्याच राजकारणावर मतांचे गठ्ठे ताब्यात घेऊ इच्छिणारे अनेक जण पुढे सरसावले आहेत. उत्तरेत मुलायमसिंह, लालूप्रसाद आणि दक्षिणेत अण्णा काँग्रेसचे कर्नाटकातील मुख्यमंत्री हे बिनीचे स्वार. राखीव जागांची मर्यादा सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांवर ठरवली, त्याची पूर्ती मंडल आयोगाने झाली. त्यामुळे हा वाद संपला असे झाले होते; पण हा वाद असा संपवणे जातीयवादी पुढाऱ्यांना परवडणारे नव्हते. तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये कायदे करून ही टक्केवारी सत्तर-बहात्तरपर्यंत वाढविण्यात आली. सर्वोच्च न्यायालयात त्या कायद्यांना आव्हान देणाऱ्या याचिका दाखल होऊ लागल्या. ते कायदे रद्दबातल ठरतील हे उघड दिसू लागले. अशा परिस्थितीत केंद्र शासनाला काही भूमिका घेणे अपरिहार्य होते.

मध्यममार्गी अतिरेकी बनले

१९९१ मध्ये नरसिंह रावांनी जशी, "मध्यममार्गी करामत दाखवली आणि न्यायालयाकडेच राखीव जागांचा प्रश्न सल्ल्यासाठी सोपवला, तसाच मार्ग याहीवेळी अवलंबला असता तर प्रकरण चिघळले नसते. १९९१ चा सूज्ञपणा राव साहेबांना सोडून गेला आणि त्यांनी विश्वनाथ प्रताप सिंगांची १९९० सालची घोडचूक केली. ७० टक्क्यांचा वरदेखील जागा राखीव करण्यास केंद्राने मंजुरी दिली, एवढेच नव्हे तर केंद्र शासनाची व पक्षाची सारी प्रतिष्ठा त्यामागे उभी केली. राम-अयोध्येच्या प्रश्नावर भाजपच्या नेत्यांनी जसा दबाव तयार केला त्यापेक्षाही अधिक दलित चळवळीने राखीव जागांच्या प्रश्नांवर करण्यात यश

मिळविले आहे. पुढील निवडणुकीत टिकून राहायचे असेल तर राखीव जागांच्या कोणत्याही मागणीस विरोध म्हणून करता नये ही सर्व पक्षांची आणि पुढाऱ्यांची भूमिका झाली आहे."

दलित चळवळीचा धाक

सरकारने जी भूमिका स्वीकारली आणि त्यासाठी घटनेत दुरुस्ती केली त्याला एकूणएक पक्षांनी आणि लोकसभा, राज्यसभा या दोन्ही सदनांतील एकूणएक खासदारांनी बिनविरोध एकगठ्ठा पाठिंबा दिला आणि घटनेत दुरुस्ती करण्याचे कलम बिनबोभाट ४८ तासांत मंजूरही होऊन गेले. सगळ्यांची मनापासून मान्यता होती असेही नाही; पण नाराजी उघडपणे बोलण्याची कोणाचीही हिंमत झाली नाही. न्यायसत्तेला धुडकावून लावणाऱ्या नवव्या अनुसूचीला नेहमी विरोध करणाऱ्यांनीदेखील चकार शब्द काढला नाही.

न्यायसत्तेला धुत्कारले

राखीव जागांसंबंधी घटनेच्या नवव्या अनुसूचीत घालणाऱ्यार दुरुस्तीवर शिक्कामोर्तब झाले. याचा परिणाम असा, की राखीव जागांच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यासाठी कोणालाही न्यायालयात जाता येणार नाही आणि कोणत्याही न्यायालयाला राखीव जागांना आव्हान देणारी याचिका विचारातही घेता येणार नाही. कोणत्याही राज्याने उठून शंभर टक्के जागा राखीव केल्या किंवा त्यापलीकडे जाऊन सरकारी नोकरीत मागास जमातींना पुरेशा नोकऱ्या मिळाव्यात यासाठी दरवर्षी दहा-वीस टक्के नव्या जागा तयार करण्यात याव्यात असा कायदा केला, तरी आता त्याला न्यायालयात कोणी आव्हान देऊ शकणार नाही.

खुलेकरण राहिले बाजूला

आर्थिक सुधार, खुलेकरण, खासगीकरण यांच्या घोषणा एका बाजूस चालू असताना दुसऱ्या बाजूला नोकरशाहीला कात्री लावण्याऐवजी तिला पोसण्याची आणि सरकारी खर्च वाढवण्याची कारवाई चालू आहे. नव्या घटना दुरुस्तीने त्याला आव्हानही देता येणार नाही. नोकरशाहीच्या या वाढत्या व्यापाने देशातील शेतकऱ्यांचे, उद्योजकांचे, व्यावसायिकांचे वाटोळे झाले; करांच्या बोजामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उभे राहणे अशक्य झाले, तरी त्यांना पर्वा नाही; पण तरी आमच्या लोकांना सरकारी नोकऱ्या मिळायलाच पाहिजेत असा घोशा चालू आहे. हजारो वर्षांच्या जाती अन्यायाच्या प्रतिशोधाच्या घोषणा तोंडावर आहेत. मनात अभिलाषा सरकारी नोकऱ्यांची आहे. नरसिंह राव सरकार फसले

आणि हा प्रश्न न्यायालयाकडे पाठवण्याऐवजी वाढीव राखीव जागांच्या कायद्यांना घटनेचे संरक्षण देऊन बसले.

आधीच प्रश्न ज्वालाग्राही. वाफ निघून जाण्याची शक्यता संपली तेव्हा उद्रेकांचा धोका आलाच; त्याला तोंड या वेळी फुटले ते भद्रलोकांच्या महानगरीत नाही, जाटचौधरींच्या, राजधानीलगतच्या प्रदेशात.

नवव्या अनुसूचीचा भयानक इतिहास

मीरत, कानपूर, डेहराडून येथील शेतकरी जाट वर्गाची घटनेतील नव्या अनुसूचीशी ही दुसरी गाठभेट आहे. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या मूळ घटनेत नववी अनुसूची नव्हती. १५५१ मध्ये एक घटनादुरुस्ती करून हे कलम घटनेत घालण्यात आले. तो काळ नव्या उगवत्या समाजवादाचा होता. आम रयतेचे शत्रू म्हणजे जमीनदार आणि सावकार यांचा उच्छेद करण्याचे काम मोठ्या जोमाने आणि उत्साहाने नेहरू सरकारने हाती घेतले. शेतकऱ्यांच्या जमिनी हिसकावून घेऊन त्यांचे वाटप करण्याचा कार्यक्रम मोठा लोकप्रिय होता. जमीन मालकांना सहानुभूती दाखविणारे कोणीच नव्हते, तरीही जमीनविषयक कायदे करणे कठीण झाले, घटनेतील, मालमत्तेचा मूळ हक्क डावलल्याखेरीज जमीनदारीचे उच्चाटन करणे शक्य नव्हते. मंजूर झालेले कायदे कोर्टात अवैध ठरू लागले म्हणून १९५१ मध्ये घटनेत एक राक्षसी दुरुस्ती करून नववी अनुसूची घालण्यात आली. जमीन सुधारांसंबंधी रत्याकाही अस्तित्वात असलेल्या कायद्यांना कोर्टाच्या अधिकारातून मुक्त करून संरक्षण द्यावे एवढाच त्या वेळी मर्यादित उद्देश होता. मुळात कल्पनाच भयाण. नेहरू घराण्याकडे वंशपरंपरेने राजसत्ता द्यावी अशी घटनेत तरतूद बहुमताच्या जोरावर केली आणि त्याची भरती नवव्या अनुसूचीत केली, की क्षणात राजेशाही स्थापन होईल आणि त्यात कोणी काही अवाहनही देऊ शकणार नाही. सुरुवातीस या अनुसूचीत जमिनदारी विषयक २७ कायद्याची यादी होती. आज मितीस, गेला बाजार नवव्या अनुसूचीचे संरक्षण मिळालेल्या कायद्यांची संख्या तीनशेच्या आसपास आहे. काही किरकोळ अपवाद सोडले तर, सर्व कायदे शेती, शेतीमाल, शेतजमीन यांसंबंधीच आहे.

घटनेतील ननव्या अनुसूचीच्या शीर्षभागी घटनेतील कलम ३१ (ब)चा स्पष्ट उल्लेख आहे. याचा अर्थ न्यायालयाच्या विचक्षणेपासून कोणत्याही विषयांवरील कायद्यांना संरक्षण देणे हा अनुसूचीचा हेतू मुळात नव्हता; कलम ३१(अ)मधील विषयावरील कायद्यापुरती खास करून शेतजमीनसंबंधीच्या कायद्यापुरतीच ही तरतुद मर्यादीत होती. नंतरच्या काळात आणिबाणी आणि

मनमानी चालवण्याकरिता या तरतुदीचा उपयोग झाला आणि आज ३१व्या कलमाशी कोणत्याही तऱ्हेने संबंध नसलेल्या प्रकरणी म्हणजे सरकारी नोकरीतील जागा राखीव ठेवण्याच्या संबंधात या जुलमी तरतुदीचा उपयोग केला जात आहे.

रावांच्या घरची उलटीच चाल

आर्थिक सुधार खुलीकरण यांचे नवे युग प्रत्येक्षात आणताना नरसिंह राव आणि मनमोहनसिंग यांनी खासगी मालमत्तेचा हक्क पुन्हा प्रस्थापित करण्यास प्राधान्य देणे आवश्यक होते. खासगी मालमत्ता नसली तरी खुला बाजार कसला आणि खुली अर्थव्यवस्था कसली! त्यासाठी नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी मालमत्तेच्या मुलभूत हक्कांवर आघात करणाऱ्या ज्या ज्या दुरुस्त्या केल्या त्या सर्व रद्दबातल करावयास हव्या होत्या. घटनेतील ३१(अ) आणि (ब) ही कलमे आणि त्याबरोबर नववी अनुसूची समूळ नष्ठ करावयास पाहिजे होती.

प्रत्येक्षात उलटेच घडते आहे. नववी अनुसूची अधिक मजबूत करण्यात येत आहे. या विक्राळ चिलखताचे संरक्षण मंडल कार्यक्रमाच्या नव्या अतिरेकी अवतारास दिले जात आहे. नववी अनुसूची शेतकऱ्यांना खाऊन गेली, मालमत्तेच्या हक्काला खाऊन गेली, प्रामाणिक उद्योजकांना खाऊन गेली. आता तिने जबडा अधिक पसरला आहे. त्या कोणाकोणाचे बळी जातात ते उघड्या डोळ्यांनी पाहायचे फक्त राहिले आहे.

(१६ सप्टेंबर १९९४)

महाराष्ट्रातील शाहीर भाट-विदूषक झाले

महाराष्ट्राच्या साऱ्या इतिहासात तलवारीच्या खणखणाटीबरोबर तुतारीची भेरी आणि शाहिराच्या हाताची डफावरील थाप यांचीही मोठी महत्त्वाची कामगिरी आहे. स्वराज्य संस्थापनेच्या काळात 'शूर मर्दाचा पोवाडा शूर मर्दांनी ऐकावा' व छातीचे बंद तटतटा तुटावे, अशा ओजस्वी कवनांचे तुळशीदासाच्या परंपरेतील शाहीर झाले. थोरल्या बाजीरावांच्या अमदानीपासून दर विजयादशमीला उत्तरेकडे कूच करून भीमथडीच्या तट्टांना गंगाथडीचे पाणी पाजून अटकेपार झेंडे नेण्याच्या काळात मऱ्हाटी लष्कराच्या छावणीत आणि पुण्यातील पेठापेठांच्या चौकात शाहिरी पोवाड्यांचे अड्डे जमत.

ही परंपरा इंग्रजी अमलातही चालू राहिली. ज्योतिबा फुल्यांना छत्रपती शिवाजीवर पोवाडा लिहिण्याची स्फूर्ती झाली आणि इंग्रजांच्या साम्राज्याचा डोलारा कोसळत असताना शिरीषकुमारपासून हेमू कलानीपर्यंत आणि वासुदेव बळवंत फडक्यांपासून भगतसिंगापर्यंत प्रत्येक हुतात्म्याच्या रक्ताच्या थेंबागणिक स्फूर्तिदायी काव्याची कारंजी जनसामान्यांनाही प्रेरणा देत होती.

शाहिरांचे डफच हत्यारे बनली

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ म्हणजे तर मराठी शाहिरांच्या पराक्रमाचा आणि वैभवाचा सुवर्णकाळ. शिपायांनी तलवार गाजवावी आणि शाहिरांनी त्यांचे गुणगान करावे या परंपरेत किंचितसा फरक पडला. लोकतंत्राच्या नव्या जमान्यात शाहिरांचे डफ, एवढेच काय, झिलकऱ्यांचे तुणतुणेसुद्धा हत्यारे बनली. शाहीर हेच योद्धे झाले. असे योद्धे, की ज्यांच्या सामर्थ्यापुढे मुंबईच्या काय, दिल्लीच्याही महासत्तेचे पाय चळाचळा कापावेत आणि घरभेदे सूर्याजी पिसाळ मनातील भेकडपणा शौर्याच्या बातांखाली लपवणाऱ्यांना 'दे माय धरणी ठाय' होऊन जावे.

शंकरराव देव यांच्याकडे आंदोलनाचे नेतृत्व चालून आले. त्याबरोबरच आपण कोणी दुसरे महात्मा गांधीच बनलो आहोत, असा आव आणून त्यांनी उपोषणबाजी मांडली. लोकांच्या मनात संताप संताप झाला. शाहिरांच्या कवनांनी भोंदूपणाचा पंचा क्षणार्धात फेडून टाकला. काकासाहेब गाडगीळ हा दुसरा नमुना. सत्तेचा मोह तर सुटत नाही आणि महाराष्ट्रात तर शौर्याच्या, मुर्दुमकीच्या, त्यागाच्या बाता मारण्याची हौस फिटत नाही. यशवंतराव चव्हाणांपासून मामा देवगिरीकरांपर्यंत यच्चयावत पुढाऱ्यांची एका शाहिरी गोंधळाने भंबेरी उडवून टाकली.

'संयुक्त महाराष्ट्र सूर्य उगवतोय सरकारा!
खुशाल कोंबडं झाकून धरा'

या एका ललकारीने दिल्लीच्या नेहरूंपासून फलटणच्या राजवाड्यात कारस्थाने करणाऱ्या यशवंतराव चव्हाण, मालोजीराव निंबाळकर यांना पळता भुई थोडी करून टाकली. देवीच्या गोंधळाला निमंत्रण घालताना शाहिरांनी नुसते एक एक नाव घ्यावे.

यश चव्हाणा! गोंधळा ये!!
काका गाडगीळा! ये गोंधळा ये!!

एक एक नावाच्या उद्धारानिशी मोठमोठी धेंडे धुळीस मिळावीत आणि लाखालाखांनी फुलून गेलेल्या गावोगावच्या मैदानात विजयाच्या खात्रीची लाट विजेच्या लहरीसारखी सर्वांना भेटून जावी. दिल्लीला महाराष्ट्राचे आंदोलन जाऊन भिडले आणि तेथील राजरस्त्यावर

'जागा मराठा आम जमाना बदलेगा,
उठा जो तुठान तो आखिर बंबई लेकर थम लेगा!'

या अमर शेखांच्या पहाडी ललकारीने साऱ्या दिल्लीकरांची संयुक्त महाराष्ट्राच्या विजयाची खात्री पटवली होती.

सारे शाहीर गेले कोठे?

द्वैभाषिकाची घोषणा नेहरूंनी केली आणि मुंबई स्वतंत्र ठेवली. त्यावेळचे संकट काहीच नाही अशा दुर्धर अवस्थेत सारा महाराष्ट्र आज सापडला आहे. महाराष्ट्राच्या नेत्यांचे जाहिरातीच्या दराने वर्तमानपत्रांनी गुणगान होत आहे. "असा नेता झाला नाही. आमच्या नेत्याविरुद्ध कोणी शब्द काढाल तर खबरदार!" अशा डरकाळ्या ऐकू येत आहेत. गुंडांच्या एका सम्राटाने महाराष्ट्राचे नाक मुंबई आपल्या टाचेखाली आणले आणि दिवसाढवळ्या भल्याभल्यांची बंदुकांच्या

गोळ्यांनी चाळण होऊ लागली, तरी मारेकऱ्यांच्या शोधाचा पत्ता म्हणून नाही.

विमानातील हवाई सुंदरीशी चाळे करणारे उपमुख्यमंत्री बनले, गावगन्ना पुढारी सत्ता आणि संपत्ती यांच्या ढिगावर बसले. त्यांची पोरे आणि तरणीबांड नातवंडे बापजाद्यांच्या हरामाच्या कमाईवर शेकड्यांनी आसपासच्या मायबहिणींची अब्रू लुटू लागले. मोगलाईच्या काळापेक्षाही महाराष्ट्राची अवस्था कठीण झाली; पण कोठेही आशेला अंकुर फोडणारी डफावरची थाप ऐकू येत नाही. एक अमर शेख असता, एक अण्णाभाऊ साठे असते तर सत्ताधीशांच्या साऱ्या ढोंगाचा बुरखा त्यांनी टराटरा फाडून टाकला असता. शाहिरांच्या आवाजाची धार अशी, की "तुम्ही म्हणता त्याला पुरावा काय ते सांगा.' अशी कोल्हेकुई करण्याची हिंमत नेत्यांच्या चमच्यांना होऊच शकली नसती. एकएका नेत्यांच्या वाढत्या इस्टेटींचे हिशेब शाहिरांनी मांडले असते. पप्पू आणि ठाकूर यांच्याशी सलगी करून, ती नाकारण्याच्या विश्वामित्री पवित्र्याची त्यांनी हुर्रेवाडी केली असती. मनोमीलन आणि संस्कृतीच्या नावाखाली दिल्ली दरबारात कुर्निसात घालणाऱ्यांची भंबेरी उडवली असती.

हे 'मऱ्हाटे' शाहीर गेले कुठे? महाराष्ट्रावर संकट आलेले आणि सगळे शाहीर झोपलेले कसे? माय मराठीची कूस इतकी वांझ निघाली, की या पिढीत कोणी काही शाहीर जन्मलाच नाही काय? तसे म्हणावे तर प्रत्येक मराठी सिनेमात दर अर्ध्या तासाने उत्तान लावण्यांच्या चौकटीत आकडेबाज मिशा आणि भरदार छातीचे उंचेपुरे शाहीर उभे ठाकलेले दिसतात. सर्व शाहिरांची मिळून एक मोठी अखिल महाराष्ट्र संस्था आहे असे कधीतरी वर्तमानपत्रात वाचले आणि दूरदर्शनवर पाहिले. रंगांच्या पंचम्या खेळणारे नवे पेशवे त्या संस्थेत जाऊन कोणा शाहिराला 'महाराष्ट्र भूषण', कोणाला शाहीर-शिरोमणी असे शिरपेच चढवताना पाहिले. म्हणजे शाहिरांची जात काही संपली असे नाही, महाराष्ट्रभूमी अजूनही शाहिरांना जन्म देते आहे!

कवनांचे कारखाने

पण हे सगळे शाहीर महाराष्ट्राच्या संकटासंबंधी कवने रचण्यास मोकळे नाहीत. सगळे कामात गर्क आहेत. कवनांच्या मागण्यांचेच त्यांच्यापुढे ढीग पडले आहेत. सिनेमासाठी पोवाडे पुरवायचे आहेत, दूरदर्शनसाठी दलितोद्धाराचा अखंडा कार्यक्रम द्यायचा आहे, साक्षरता प्रसाराचे महत्त्व सांगणारी कवने मागणीनुसार पाडण्यात ते गर्क आहेत, कुटुंब नियोजनाच्या कवनात थोडा पांचटपणा दाखवला, की गावोगावचे आंबटशौकी लट्टू होऊन जात आहेत.

संकरित वाणांचे बियाणे, सहकाराचे महत्त्व आणि युरिया-फॉस्फेटच्या वापराचे फायदे, सामाजिक वनीकरणाने समाजाचे फायदे, यासंबंधीच्या काव्याची मागणी तर इतकी भरमसाट, की त्याकडे लक्ष द्यायला स्वत: शाहिरांना फुरसतही नाही. ती पाडण्याचे काम असिस्टंट सब ज्युनिअर शाहिरांकडे सोडून द्यावे लागत आहे. पैशाच्या हिशेबात बोलायचे तर महाराष्ट्रात शाहिरांची आज जितकी चंगळ आहे तितकी साऱ्या इतिहासात कधी नव्हती.

सगळे शाहीर सरकारी तबेल्यात

एक तरुण शाहीर भेटले, चांगले शास्त्र विषयाचे पदवीधर झालेले. वाचन बऱ्यापैकी असलेले. शब्दांची लय, ताल, ठेका त्यांच्या गद्य बोलण्यातही जाणवावा इतका स्पष्ट. त्यांच्यापुढे आजच्या महाराष्ट्र शाहिरांच्या वांझपणाबद्दलची व्यथा मी मांडली. ते म्हणाले, "शाहिरी संपली आहे असे मानू नका. आमच्या काव्याला अजूनही धार आहे. माझ्या हातातली कामे संपली, की स्वत:च महाराष्ट्रातील भ्रष्टाचार या विषयावर एक पुरा कार्यक्रम बसवणार आहे. अडचण अशी, की आम्ही पहिला डफ वाजवला, थोडे नाव झाले आणि एकदम नेत्यांचेच मोठे पत्र आले. प्रतिभेची, काव्यशक्तीची भरपूर स्तुती, ही शक्ती देशाच्या विकासाच्या कामाला लागो अशी अपेक्षा व्यक्त केलेली. रेडिओ, दूरदर्शन आणि सरकारी माध्यमे यांच्याकडून प्रकाशाच्या झोतात उभे राहण्याची संधी आणि वर संध्याकाळच्या भाकरी-चटणीची भ्रांत असताना मोठ्या नोटांचा करकरीत आवाज. धन्य धन्य वाटले. सार्थक झाले असे वाटले. नेत्यांच्या चालचलणुकीची सारी कीर्ती कानात होती, सगळी प्रतिभा त्यांना उलथवण्याकरिता कामी लावली पाहिजे अशी ऊर्मीही होती; पण आम्ही तुकाराम थोडेच आहोत, की शिवाजी महाराजांनी पाठवलेला नजराणा नाकारून परत पाठवावा! आम्ही तर पातशहांच्या नजराण्यांच्या मोहातून न सुटणारे. मनाशी समजूत घातली... लोक एवढ्या मतांनी यांना निवडून देतात, जयजयकार करतात. देशाचे आशास्थान म्हणतात. मणामणाचे हारतुरे चढवतात. सारे खुळेच काय? मग त्यांची सेवा करायला काय हरकत आहे! अशी टोचणाऱ्या मनाची शांतता सहज करता आली, भाकरीची सोय झाली आणि खोटं कशाला बोलू? कोंबडीची आणि बाटलीचीही सवय पडली. आता नेत्यांविरुद्ध आणि त्यांच्या चेल्यांविरुद्ध हात वळत नाही आणि जीभही उठत नाही बघा! उलट ज्या मिळेल त्या निमित्ताने त्यांची तोंड ठाटेपर्यंत अफाट स्तुती करतो बघा. भाट बनलो हो भाट! भाट तरी बरे! पुरे खुषमस्करे विदूषक बनलो बघा!" शाहीर कळवळून म्हणाले.

न शापात् न शरात्

महाराष्ट्रात जो कोणी लेखक म्हणून, कवी म्हणून कलाकार म्हणून, अगदी शास्त्रज्ञ म्हणूनसुद्धा पुढे येईल त्याला सरकारी तबेल्यात आणून बांधण्याची आणि चंदीवर खुश ठेवण्याची मोठी हुशार योजना आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळात डफाच्या थापेची धास्ती घेतलेल्या सुलतानांनी साऱ्या शाहिरांना भाट बनवून टाकले. आता भीमथडीची तट्टे नाहीत, मराठी तलवारीचे पाणी नाही आणि नुसत्या ठाणठाण आवाजाने रक्त सळसळणारी डफावरची थापही नाही. सुलतानांना आता कशाची चिंता म्हणून राहिलेली नाही.

(२९ सप्टेंबर १९९४)

■■

लोकसंख्या वाढविषयक परिषदेत नोकरशाहीचा विजय

'इजिप्तची राजधानी कैरो' जगभर फिरणाऱ्या प्रवाशांच्या तांड्यांचे लोकप्रिय आकर्षण नाईल नदीच्या काठच्या अतिप्राचीन संस्कृतीच्या पिरॅमिड्स आणि स्फिन्क्सासारख्या आजही विस्मय वाटावा अशा प्रचंड अवशेषांचा प्रदेश. त्याशिवाय कैरोची प्रसिद्धी तेथील गालिच्यांच्या बाजाराबद्दल आहे. आपसासच्या प्रदेशात तयार होणारे नाहीत; पण प्रचंड संख्येने प्रवासी तेथे जमत असल्याने गालिच्यांचा बाजार वर्षभर जोरात चालू असतो; पण कैरो बाजारपेठेची प्रसिद्धी गालिच्यांपेक्षा किमतीवर घातल्या जाणाऱ्या हुज्जतीसंबंधी आहे. दुकानदाराने ग्राहकाला आवडलेल्या गालिच्याची किमत सुरुवातीसच दहा हजार डॉलर सांगितली, की ग्राहक तोच गालिचा पाचशे हजार डॉलरना मागतो. मग दोन्ही बाजू हुज्जत घालत घालत अखेरची किमत ठरवतात. गिऱ्हाईक वस्ताद असेल तर दीड-दोन हजारात चांगला गालिचा पदरात पाडून घेतो. गिऱ्हाईक नवखे, संकोची असेल तर त्याच गालिच्याला आठ-नऊ हजार डॉलर देते, वर दुकानदाराचे "साहेब, आपण तर गालिच्याचे मोठे जाणकार निघाले; माझ्याकडचा सगळ्यांत चांगला गालिचा आपण बरोबर टिपला. किमत इतकी कमी ठरविली, की की तर ठार बुडालो." असली वक्तव्ये ऐकून हलक्या खिशामुळे मनावर आलेला बोझ सावरत जातो. गिऱ्हाईक पक्के असले काय आणि कच्चे असले काय, मिळालेल्या गालिच्याची खरीखुरी किमत कदाचित पाचशे डॉलरही नसण्याची शक्यता नाकारता येत नाही. गालिच्याच्या गुणवत्तेचे जाणकार फार थोडे आणि जमणारे प्रवासी पैसेवाले. एकतरी गालिचा कैरो भेटीची निशाणी म्हणून परत घेऊन जाण्याच्या निश्चयाने आलेले असे व्यापारी, असे ग्राहक. त्यामुळे कैरोच्या बाजारातील

हुज्जत जगभर विनोदाचा विषय झाली आहे.

लोकसंख्या परिषद

अशा याच कैरो नगरीत असाच एक गालिच्यांचा बाजार नुकताच भरला होता. संयुक्त राष्ट्रसंघाच्या झेंड्याखाली 'जागतिक लोकसंख्या आणि विकास परिषद' भरली होती. त्यानिमित्ताने लोकसंख्येची वाढ या विषयावर भिन्नभिन्न, अगदी उलट टोकाची मते असलेले व्यापारी आपापल्या वाणांच्या गालिच्यांचे ढीग घेऊन आले होते. दीडशेवर राष्ट्रे वाण पसंद करण्यासाठी आली होती. मोठा बाजार भरला, खूप गाजला, डोक्याला मुंग्या येईपर्यंत हुज्जत घातली; व्यापारी पांगले; ग्राहके पांगली; खरीदलेल्या गालिच्याचा वाण आणि दिलेली किंमत याबद्दल आज सर्वांना समाधान वाटते आहे. घेतलेले वाण खरोखर काय लायकीचे आहे, गालिचा आहे, की गोधडी हे समजायला कित्येक वर्षे लागतील.

लोकसंख्या वाढते आहे, प्रचंड वेगाने वाढते आहे, दरवर्षी नऊ कोटींनी वाढते आहे हा सर्वांच्या चिंतेचा विषय आहे. लोकसंख्यावाढीची गती कमी केली नाही तर गरीब राष्ट्रे सुधारणार नाहीत. धरणीवरील माणसांची संख्या अशीच वाढत राहिली तर पृथ्वी हा भार पेलू शकणार नाही. थोडक्यात पृथ्वी म्हणजे फळ आहे, असे मानले तर माणूस ही त्याला लागलेली कीड आहे. किड्यांनी आपली प्रजोत्पादनाची गती कमी केली, संख्या मर्यादित ठेवली तर या फळावर त्यांची गुजराण अधिक चांगली होईल आणि अधिक काळ चालेल अशी सर्वसाधारण मान्यता आहे; पण हा प्रश्न हाताळावा कसा यावर एकमत नाही.

मतामतांचा गलबला

कैरोला जमलेल्या गालिच्यांच्या व्यापाऱ्यांच्या गलबल्यात अनेक सूर होते. गरीब देशांचे प्रतिनिधी नेहमीप्रमाणे निधीच्या शोधात होते. "लोकसंख्येचा कार्यक्रम विकास कार्यक्रमाचे एक अंग आहे. श्रीमंत देशांनी विकासासाठीही अधिक मदत करावी आणि लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी त्यांनीच मदत करावी." अशी विनवणी करीत राजदूती भिक्षापात्रे घेऊन ते उभे आहेत.

"लोकसंख्या वाढली तर त्यात वाईट काहीच नाही. प्रत्येक तोंडाबरोबर दोन हात जन्माला येतात. संख्या वाढली, की स्पर्धा वाढते. त्यामुळे माणसांची गुणवत्ता वाढेल. पोषणाचे-प्रगतीचे नवनवे आयाम माणूस शोधून काढेल." असा आग्रह धरणारेही होते.

"लोकसंख्या, कुटुंबव्यवस्था हे विषय खासगी आहेत. सरकारने त्यात ढवळाढवळ करू नये, कोणतेही मत किंवा पद्धती लादण्याचा प्रयत्न करू

नये, लोक ते आपोआपच करतील," असे मत मांडणारेही होते.

बिजिंगची रंगीत तालीम

स्त्रीस्वातंत्र्यवाद्यांचा तर मोठा जमाव कैरोत जमला होता. पुढच्या वर्षी सप्टेंबर १९९५ मध्ये बिजिंग येथे महिला प्रश्नावर परिषद होणार आहे. कैरो येथे जणू त्याची रंगीत तालीम चालली आहे, अशा तयारीने स्त्रीमुक्तिवादी स्त्री-पुरुष जमले होते. वयात येऊ लागतातच मुला-मुलींना लैंगिक शिक्षण मिळावे, कुटुंब नियोजनाची साधने मुबलक आणि सहजपणे उपलब्ध व्हावीत, गर्भपात 'ब्युटीपार्लर'मध्ये गेल्याप्रकरणासारखा सहज शक्य व्हावा, अशा तोंडवळ्याचा त्यांचा कार्यक्रम.

त्याच्या विरोधात रोमन कॅथालिक राष्ट्र. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी दोन मुलांमधील अंतर वाढवणे अशा मार्गांना त्यांचा पाठिंबा आहे; पण गर्भनिरोध, गर्भपात, मुला-मुलींना लैंगिक शिक्षण असल्या कार्यक्रमांना त्यांचा कडवा विरोध. रोमन कॅथालिक गटास अनपेक्षितरीत्या मदत मिळाली ती मुस्लिम कठमुल्ला राष्ट्रांची. इस्लामी समाजातील स्त्रियांचे पारंपरिक स्थान आणि भूमिका बदलू पाहणाऱ्या कोणत्याही कार्यक्रमाला त्यांचा विरोध (काही मुस्लिम राष्ट्रांचा विरोध) इतका कडवा, की त्यांनी परिषदेवरच बहिष्कार घातला. बेनजीर भुत्तो यांना परिषदेवर राहणेही दुष्कर झाले होते; पण त्या हजर राहिल्या. 'एक मुलगी, एक पत्नी आणि एक माता' म्हणून आपण बोलत असल्याचे त्यांनी पहिल्या वाक्यात सांगितले; पण नंतरची मांडणी सारी कठमुल्लांची आणि कहर म्हणजे त्यांनी काश्मीर प्रश्नही उठविण्याचा प्रयत्न केला. परिषदेस हजर राहिल्याबद्दल देशात होणारा क्षोभ शमविण्याची त्यांची धडपड घडत होती.

गर्भपात हा चर्चेचा मोठा विषय झाला. व्हॅटिकन आणि मुस्लिम राष्ट्रे दोघांनीही गर्भपाताला कडवा विरोध केला; पण गेल्या दोन वर्षांत क्लिंटन सरकारचे गर्भपातविषयक धोरण बदलले आहे. गर्भपाताच्या साधनाचा उपयोग क्वचितच व्हावा; पण करण्याची वेळ आली तर तो सुरक्षित आणि कायदेशीर असला पाहिजे अशी क्लिंटन सरकारची भूमिका आहे.

विकासातून कुटुंबकल्याण?

साऱ्या जगाचा इतिहास दाखवितो, की गरीब समाजात जन्माचे प्रमाण अधिक असते. संपन्नता आली, चांगले जगण्याची चव कळली, बायका 'चूल आणि मूल' या चक्रातून बाहेर पडू लागल्या, की लोकसंख्या-वाढ मंदावते; पण हा निष्कर्ष सर्वांना मान्य असला तरी कैरोत जमलेल्या कोणालाही परवडण्यासारखा

नव्हता. लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्यासाठी अधिक विकास पाहिजे, सरकारी कुटुंब नियोजन कार्यक्रमाने आणि नसबंदीची उद्दिष्टे ठरवून काही हाती येत नाही. हे समजले तरी उमजावे कसे? अधिक विकास कसा साधावा, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व संस्थांच्या, सर्व परिषदांत, सर्व धोरणांत आता याबद्दल एकमत तयार होत आहे. सरकारी हस्तक्षेप कमी केला, की आर्थिक विकास सुलभ होतो. तात्पर्य-सरकारशाही थांबविली, की विकास होतो आणि त्याबरोबर लोकसंख्येचा विस्फोटही आटोक्यात येतो. सरकार ही संस्था अर्थकारणाच्या बाहेर राहिली म्हणजे सगळे काही व्यवस्थित होते. हे पटले तरी सरकारी मलिद्यावर पोसल्या जाणाऱ्यांनी ते मानावे कसे?

नाही! स्त्री-मुक्तीतून?

शेवटी परिषदेने एक वाण पसंद केले. कुटुंब नियोजनाची साधने, त्यांचा प्रसार, लोकसंख्यावाढ थांबविण्याकरिता नेमकी आकडेबद्ध उद्दिष्टे हा आतापर्यंत चालवलेला मार्ग सोडून द्यायचे ठरले. केवळ विकासाने लोकसंख्यावाढीची समस्या सुटू शकते हीही कल्पना त्याज्य ठरवण्यात आली. कुटुंब-नियोजनासाठी स्त्रियांचे स्थान उंचावले पाहिजे, त्यांना समान दर्जा मिळाला पाहिजे, थोडक्यात स्त्री ही नि:सह्यपणे गर्भ स्वीकारणारी पात्र राहिली नाही, की जन्माची संख्या कमी होईल असे एकमत झाले. यात मोठा विजय स्त्रीमुक्तिद्यांचा आहे; पण खरी बाजी मारली ती नोकरशहांनी. लोकसंख्या-वाढीच्या क्षेत्रात का होईना सरकारी ढवळाढवळीला एक सुरक्षित स्थान त्यांनी राखून ठेवले.

विकासाविना स्त्रीमुक्ती कैची?

कैरो परिषदेतील गालिच्याच्या वाणाची फारशी तपासणी करणे निरर्थक आहे. स्त्रियांना बरोबरीचा दर्जा आणि स्त्रियांचे शिक्षण हे दरिद्री, प्राथमिक समाजात अशक्य आहे. आर्थिक विकासाखेरीज स्त्रियांचा विकास होत नाही. किंबहुना, आर्थिक विकास होण्याऐवजी अधिक पीछेहाट होते. विकास झाला म्हणजे स्त्री मुक्त होतेच असे नाही; पण विकासाशिवाय ती मुक्त झाल्याचे एकही उदाहरण नाही. 'विकास हे कुटुंब नियोजनाचे सर्वोत्तम साधन आहे हे सर्वथा खरे नाही. 'संतुलित विकास' अशी त्यात दुरुस्ती हवी; पण कैरो परिषदेने विकास, स्त्रीमुक्ती-कुटुंब कल्याण असे व्यापक सूत्र स्वीकारण्याऐवजी स्त्रीमुक्ती कुटुंब कल्याण असे अर्धवट सूत्र स्वीकारून नोकरशहांना खुश केले आहे.

गर्भपाताऐवजी वृद्धपात का नाही?

साऱ्या कैरो परिषदेत एका प्रश्नाची चर्चा झालीच नाही. जन्माचे प्रमाण हे

एकेकाळी लोकसंख्यावाढीचे अधिक महत्त्वाचे कारण बनले आहे. त्यामुळे जनसंख्येचा आकडा वाढतो आहे. एवढेच नव्हेतर समाजाची गुणवत्ता कमी होत आहे. नवीन दमाच्या तरुण रक्ताच्या पिढीचे प्रमाण घटते आहे. पेन्शन खाऊन जगणाऱ्या म्हाताऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. या म्हाताऱ्यांना जगविण्याकरिता अब्जावधी रुपयांचा खर्च वैद्यक क्षेत्रात होत आहे. एका बाजूला जन्माची संख्या घटावी म्हणून खर्च होत आहे, तर दुसऱ्या बाजूला 'अंगम गलितम् पलितम् मुंडम्' झालेल्यांना पराकाष्ठेने जिवंत ठेवण्यासाठी तंत्र आणि साधने यांचा वारेमाप उपयोग होत आहे. लोकसंख्या नियंत्रणासाठी गर्भाचा प्राण बिनदिक्कत घेण्याचा पुरस्कार हिरीरीने करणारी मंडळी म्हाताऱ्यांची संख्या कमी करण्याचे काही उपाय सुचवत नाहीत. निदान म्हाताऱ्यांना जिवंत ठेवण्यासाठी समाजाने खटाटोपी खर्च करण्याची गरज नाही, इतकेही बोलत नाहीत. 'अर्भकांना मारा, म्हाताऱ्यांना जगवा' अशा स्वरूपाच्या कुटुंबनियोजनाने समाज म्हातारे होत चालले आहेत.

कैरोत जमलेले नोकरशहा होते. त्यांनी नोकरशाहीचे हित जोपासले. त्यातील बहुतेक पन्नाशीच्या वर असल्याने त्यांनी म्हाताऱ्यांचे हित सांभाळले. कैरो परिषदेच्या गालिचा बाजाराची एकढीच निष्पत्ती आहे.

(७ ऑक्टोबर १९९४)

■■

हुंडा बाजारातील खुल्या अर्थव्यवस्थेचे विदारक स्वरूप

डॉ. मनमोहनसिंगांची खुली अर्थव्यवस्था प्रत्यक्षात केव्हा अवतरेल कोण जाणे? पण इंग्रज गेल्यानंतर देशात प्रस्थापित झालेली नोकरशाही संपण्याची काही लक्षणे नाहीत. याउलट नोकदारांचे वर्चस्व येथे अनंतकालपर्यंत चालू राहणार आहे, अशी आम जनांची निश्चिती आहे. नियोजन व्यवस्था आणि सरकारशाही यांचे प्रतीक असलेल्या नोकरदारांना खुल्या व्यवस्थेचा नजीकच्या भविष्यकाळात तरी काहीच धोका नाही, अशी खुल्या बाजाराचीच भावना आहे.

सगळ्या बाजारपेठांत आणि सगळ्याच अर्थव्यवस्थांत सरकारी हस्तक्षेप आहेत, नियंत्रणे आहेत. ती कमीअधिक प्रमाणात पाळली जातात. एका बाजारपेठेत मात्र सरकारी नियंत्रणे कडक असूनही बाजारपेठ अगदी खुली राहिली आहे. लग्नाच्या आणि हुंड्याच्या बाजाराइतका मुक्तबाजार दुसरा कोणताही नाही.

कोणा माणसाची जाणण्याची एकमात्र फुटपट्टी बाजारातील किंमत! हुंडाविरोधी चळवळी १०० वर्षे तरी चालू आहेत. हुंडा प्रतिबंधक कायदा होऊन कित्येक वर्षे लोटली, तरीही असल्या निर्बंधांना आणि दडपणांना बगल देऊन हुंडाबाजार तेजीत चालू आहे. मागणी आणि पुरवठा यांच्या तालावर बाजारातील व्यवहार अखंड चालू आहेत.

माझा एक जवळचा सहकारी कला शाखेतील पदवीधर, शिक्षण संपल्यावर गावाकडे परत येऊन शेती बघू लागला; पण त्याला एकही मुलगी सांगून येईना. तेव्हा निरुपाय म्हणून त्याने जवळच्या शहरात शिक्षकाची नोकरी मिळविली; मग त्याच्या स्थळावर वधूपित्यांच्या उड्या पडल्या. लग्न झाल्यावर वर्षा दोनवर्षांनी नोकरी सोडून देऊन तो पुन्हा शेतकीकडे गावी परत आला. ५० वर्षांपूर्वी परिस्थिती अशी नव्हती. जमीनजुमला, खानदान पाहून मुलगी दिली जात असे. केवळ नोकरी असणाऱ्या उपवधू तरुणांना फारशी किमत नसे. आता

अगदी हलक्या चाकरमान्यासदेखील मोठ्या जमीनदार शेतकऱ्याच्या वर लग्नाच्या बाजारात प्राधान्य आहे.

सर्वांत श्रेष्ठ नोकर

लग्नाच्या बाजारात सर्वांत जास्त भाव नोकरमान्यांचा. महाराष्ट्रासारख्या सुधारलेल्या राज्यातही जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षक लाखभर रुपये लग्नात मिळण्याची अपेक्षा ठेवतो. पोलिस शिपाई, बँक कारकून यांच्या किमती दोन लाखांवर चालू बाजारात सांगितल्या जातात. सगळ्या नोकऱ्यांत भारतातील वरिष्ठ प्रशासन सेवेचा मान मोठा, प्रतिष्ठा मोठी. स्पर्धात्मक परीक्षांतून निवड होत असल्यामुळे उत्तीर्ण झालेल्या तरुण अधिकाऱ्यांच्या शिरावर मोठे देदीप्यमान तेजोवलय. साहजिकच हुंड्यांच्या बाजारात सनदी नोकर अक्षरश: हिऱ्यामाणकाच्या मोलानेच विकले जातात. नव्याने निवडले गेलेले अधिकारी मसुरीच्या राष्ट्रीय अकादमीत प्रशिक्षणासाठी दाखल होतात तेव्हा महत्त्वाकांक्षी वधूपित्यांचे काफिले नोटांनी गच्च भरलेल्या सुटकेसांसकट दाखल होतात, हे वर्षानुवर्षे दिसत होते. मसुरीमधील नागरिक त्यांची गंमत पाहण्यात स्वत:ची करमणूक करून घेत. दरवर्षी वेगवेगळ्या खात्यांतील अधिकाऱ्यांना मिळणारा हुंड्याचा दर काय आहे, याची चर्चा चौकाचौकात होत असे.

सरकारी धोरणानुसार चढउतार

स्वातंत्र्यानंतर पहिली दहा वर्षेतरी परदेशी जाण्याची संधी मिळणे मोठे आकर्षक मानले जाई. त्यामुळे परदेशी सेवेतील अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त म्हणजे दोन ते तीन लाख रुपये हुंडा मिळत असे. नंतर परिस्थिती बदलली आणि पंडित नेहरूंच्या अमदानीच्या उत्तरकाळात प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांना मिळणाऱ्या हुंड्याची रक्कम दरवर्षी वाढत होती; पण सीमाशुल्क (Customs) खात्याच्या अधिकाऱ्यांची किंमत अगदी अलीकडपर्यंत सर्वोच्च होती. १९८९-९० मध्ये बिहार, ओरिसारख्या राज्यातल्या सवर्ण सीमाशुल्क अधिकाऱ्यांना हुंडा म्हणून रुपये ऐंशी लाख मिळाल्याची नोंद आहे. अलीकडे हा आकडा दोन कोटी रुपयांवर गेल्यावर ऐकिवात आहे.

गेल्या पाच-सहा वर्षांत प्रशासकीय सेवेविषयी एकूण दृष्टिकोनच बदलला आहे. निवडल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांत फार मोठ्या प्रमाणावर डॉक्टरी, अभियांत्रिकीच्या उच्च पदव्या घेतलेल्या विद्यार्थांचे प्रमाण वाढत वाढत ६०% वर गेले. त्यांच्या तांत्रिक क्षेत्रातील कमाईच्या तुलनेने सरकारी नोकरीतील तनखे आणि इतर नजराणे उघडउघड अधिक आकर्षक असल्यामुळे आपण

प्रशासकीय सेवेकडे वळलो, हे सत्य लपविण्याचा कोणी प्रयत्नही करत नसे. सेवा, प्रतिष्ठा, ध्येयनिष्ठा असल्या कल्पना सोडून देऊन, खुलेआम आर्थिक लाभाच्या हिशेबाने नवीन तरुण प्रशासकीय सेवेकडे वळत आहेत.

खुलेकरणाची खिल्ली

डॉ. मनमोहनसिंग यांनी खुल्या व्यवस्थेकडे वाटचाल करण्याचे जाहीर केले. व्यापार आणि उत्पादन या क्षेत्रातून सरकार अंग काढून घेईल, असे जाहीर केले. प्रशासकीय खर्च कमी करण्यात येईल, असे प्रतिज्ञापूर्वक सांगितले.

व्यवस्था अधिक सुटसुटीत आणि सोपी करण्याचे प्रयत्न चालू झाले. या सगळ्या वाटचालींमुळे नोकरदारांची सत्ता कमी होईल. परिणामत: सनदी नोकरांचे लग्नबाजारातील मूल्य हटत जाईल, अशी अपेक्षा होती.

या पंधरवड्यात 'इंडिया टूडे' या इंग्रजी पाक्षिकाने सनदी नोकरांच्या हुंडा-मूल्यावर एक अभ्यास प्रसिद्ध केला आहे. या अभ्यासाच्या निष्कर्षाप्रमाणे हुंड्याचे दर घटत नसून, वाढत आहेत. नुसते वाढतच नाहीत तर भडकत आहेत. सर्वोच्च किमती दोन कोटींपर्यंत जाऊन भिडल्या आहेत असे दिसते. तात्पर्य मनमोहन सिंगांच्या आर्थिक सुधाराच्या कार्यक्रमाबद्दल आणि पंतप्रधानांच्या 'मध्यममार्गी' सुधारांची हुंडाबाजारात कोणी दखल घेतलेली नाही. नोकरदारांना मिळणारी सत्ता, प्रतिष्ठा आणि आर्थिक लाभ यांना थोडाही धक्का पोचण्याची शक्यता नसल्याचा हुंडा बाजाराचा विश्वास आहे. देशातील एकमेव खुल्या बाजाराने सरकारच्या आर्थिक सुधारणांत काही दम नसल्याचे स्पष्ट केले आहे.

हुंडा बाजाराचा विदारक आरसा

या अभ्यासातील काही निष्कर्ष मोठे चित्तवेधक आहेत. त्यांचा तर्कशुद्ध अर्थ लावणे सोपे नाही; पण बाजारव्यवस्था आरशाप्रमाणे असते, ती खोटे चित्र कधी दाखवत नाही. तेव्हा या विचित्र गोष्टींनाही काही खोल अर्थ असला पाहिजे. हुंडाबाजारात किंमत 'अधिकारी' म्हणून भरती झालेल्या पुरुषांना आहे. त्यांच्याबरोबरीने परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आणि सर्वोच्च गुण मिळविणाऱ्या गुणवान सुस्वरूप स्त्री अधिकाऱ्यांना कोणीही हुंडा देऊ करत नाही. अशा असाधरण मुली सुना म्हणून घरी न्यात, यासाठी कोण शोध घेत तेथे येत नाही. लग्नाच्या बाजारात अधिकारी मुलींना इतर सर्वसाधारण उपवर मुलींप्रमाणेच उभे राहावे लागते. त्यांच्यातील बहुतेक सनदी नोकरांपैकीच एखाद्याशी लग्न जुळवतात. वधूवर दोघेही एकाच तोलामोलाचे सनदी अधिकारी असूनही हुंड्याच्या देयकातून मुलींची संपूर्ण सुटका होत नाही.

सत्ताधारी तबेल्यात बांधावा

हुंड्याच्या प्रचंड रकमा देणारे कोण असतात. प्रदेश जितका मागासलेला तितक्या हुंड्याच्या रकमा अधिक. बिहार, ओरिसा राज्यातील अधिकाऱ्यांचा हुंड्याचा दर सगळ्यांत अधिक देणाऱ्या पालकांची कमाई राजकीय संबंधाने काळ्या पैशाची तरी असते किंवा व्यापारधंद्यांची. काळ्या पैशाने सरकारी अधिकारी जावई म्हणून खरीदला तर उरलेल्या पैशाचे रक्षण करण्याच्या कामी तो उपयोगी येईल. एवढेच नव्हे तर काळ्या पैशाचे लायसेंस-परमीट-कोटा व्यवहार चालविण्यासाठी त्याचा मोठा उपयोग आहेच.

उच्च जातीच्या अधिकाऱ्यांना सर्वांत जास्त हुंडा दिला जातो. राखीव जागांचा फायदा घेऊन सनदी सेवेत दाखल झालेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या निवडीनंतरही जातीच्या डागातून सूटका मिळत नाही, असे दिसते. सनदी नोकरीत प्रवेश केलेला दलित तरुण दलित सनदी तरुण होतो एवढाच फरक. सवर्ण अधिकारांना मिळणारा हुंड्याच्या रकमेतील ५०% रक्कम दलित अधिकाऱ्यांना कमी पडणाऱ्या हुंड्यापोटी देण्यात यावी. असा नियम कोणा 'आरक्षण महर्षी'ने आणला पाहिजे. अन्यथा, हा सामाजिक अन्याय दूर होणार नाही.

शहरे सारी बडी बांका

प्रशासकिय सेवेपेक्षाही आयकर व सिमाशुल्क सेवेतील अधिकाऱ्यांना प्राधान्य मिळते याचे कारण केवळ वर कमाईची संधी नाही. या सेवेतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका फक्त मोठ्या राजधानीच्या शहरात होतात. आपल्या मुलीला जिल्ह्याच्या ठिकाणी लहान गावंढळ शहरात जाऊन रहावे लागू नये, असे कोणत्या बापाला वाटणार नाही.

पाहणीतील निष्कर्ष केवळ आर्थिक व्यवहारासंबंधी आहेत. मुलींचे शिक्षण, रूप किंवा इतर गुण यांच्यासंबंधी माहिती साहजिकच उपलब्ध नाही. ती उपलब्ध असती तर, हुंड्याच्या रक्कमांचे आकडे रुपये ५० लाख, रुपये दोन कोटीपर्यंत का वर खाली होतात. यावर काही प्रकाश पडला असता.

हुंड्याचे सर्वक्षण पाहता मुलीच्या बापास जात याच्या प्रतिष्ठेत आणि मिळकतीत आपली मुलगी निम्म्या हक्कांने भागिदार व्हावी, यासाठी दहा वर्षांच्या पुऱ्या पगाराच्या मिळकतीची रक्कम लग्नाच्या वेळेस मोजावी लागते, असे दिसते. थोडक्यात रक्कम बँकेत व्याजाने लावल्यास पगाराच्या निम्म्या रक्कमे इतके व्याज दरमहा मिळत राहिल. अशी रक्कम मोजून मुलगी द्यावी लागते. अर्थात्, मुलीची किंमत शून्यच.

शेतकरी समाजातील लग्न समाजातल्या समाजातच लागतात. बिगर शेतकरी समाजातील मुली शेतकरी मुलांना सांगून येत नाहीत. या अनुभवाच्या अर्थकारण स्पष्ट आहे. शेतकरी उपवर मुलांना बिगर शेतकरी वधूला हुंडा देणे परवडणार नाही. मग हे संबंध व्हावेत कसे?

(२९ ऑक्टोबर १९९४)

■■

साम्यवाद्यांच्या इतिहासातील खलनायक माओ

टॉलस्टॉयच्या 'युद्ध आणि शांतता' कादंबरीचा प्रतिनायक भावुक व्यक्तिपूजक आहे. नेपोलियन जगातील सर्व बंधनांतून मानवजातीला सोडवणारा विमोचक युगपुरुष आहे असा त्याचा विश्वासच नव्हे दृढश्रद्धा असते. नेपोलियन म्हणजे सर्व जे जे काही दिव्य भव्य त्याची मूर्ती अशा भावनेने त्याची व्यक्तिपूजा करीत असतो. मातृभूमी रशियावर नेपोलियनच्या फौजा चालून आल्यानंतर आसपासच्या सर्व जनांचा रोष पत्करूनही तो आपली भावना कायम ठेवू पाहतो, हळूहळू त्याचा भ्रमनिरास होतो. थोर माणसे ही सगळी नकली बाहुल्यांसारखी असतात, इतिहासाच्या अपघाताने त्यांच्यावर थोरपण लादले जाते याची त्याला हळूहळू जाणीव होऊ लागते. तारुण्याच्या भरात कोणा विचारावर, कल्पनेवर, व्यक्तीवर सारा जीव ओवाळून टाकावा अशा ऊर्मी उसळत असताना नेपोलियनविषयीचा नायकाचा भ्रमनिरास किती कठोर अनुभव होता याचे मोठे सुंदर चित्रण टॉलस्टायने केले आहे.

साम्यवादाचे चारित्र्यदोष

हिंदुस्थानातील असंख्य माओ झेडुंगच्या भक्तांची अशीच मोठी दयनीय आणि कठीण अवस्था होणार आहे. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन यांच्या व्यक्तिगत जीवनावर आतापर्यंत अनेक प्रकाशझोत पडले तर ही सगळी माणसे काही बाबतीत अगदीच क्षुद्र काही बाबतीत भयानक राक्षसीही होती असे दिसून आले आहे. साम्यवादाचा पाडाव इतिहासात अटळ होता हे 'भाई' लोकही बोलून दाखवू लागले आहेत. रशियन साम्यवादी सत्तेतील हुकूमशहा भयानक क्रूरकर्मा होत हे खरे; पण त्याउलट चिनी साम्यवादी पक्षातील नेतृत्व खरेखुरे उज्ज्वल चारित्र्याचे, धीरोदात्त, त्यागमयी होते, विशेषत: माओ-त्से-तुंग म्हणजे तर तत्त्वज्ञान, विचार, काव्यशक्ती, त्याबरोबरच कर्मठ कृती आणि रणांगणातील

शौर्य अशा यच्चयावत सगळ्या गुणांनी भूषित झालेला आदर्श अशी सार्वत्रिक समजूत होती.

सर्वगुणसंपन्न नायक माओ

एके काळी चीनमध्ये केवळ परमेश्वराच्या बरोबरीने माओ झेडांगची पूजा होत असे, त्याच्या उक्तींचे एक छोटेसे लाल रंगाचे पुस्तक हातामध्ये फडकावीत लाखो लोक चालत असत. त्याच्या महाप्रचंड आकाराच्या चित्रांनी आणि पुतळ्यांनी चीनचा कोपरान्‌कोपरा भरून गेला होता. माओवर परमोच्च कोटीचे प्रेम करणारे लोक हिंदुस्थानातही अनेक होते आणि आहेत. 'राजकीय सत्ता बंदुकीच्या नळीतून येते,' 'शंभर फुले एकावेळी फुलू द्यात,' 'प्रगतीची छलाँग', 'अखंड क्रांती' अशा वचनांनी, अशा घोषणांनी जागतिक कीर्तीचा नेता म्हणून माओ गाजला. चीनने भारतावर आक्रमण केले त्याही काळात 'अध्यक्ष माओ, आमचा अध्यक्ष' अशा घोषणा खुलेआम देण्यात धन्यता मानणारे 'माओ' भक्त आपल्या देशातही काही थोडे नव्हते.

अमेरिकेत राहून अणुपदार्थ विज्ञानावर उच्च संशोधन केलेल्या एका भारतीय शास्त्रज्ञाशी माझी चांगली मैत्री जमली होती. गृहस्थ मोठे व्यासंगी, जिज्ञासू आणि चिकित्सक. अनेक विषयांवरील त्यांची माझी मते जुळत असल्याने परदेशातही आम्ही सतत भेटत, बोलत असू. १९७६ मध्ये माओची लोकप्रियता उच्च शिखरावर असताना हे गृहस्थ माझ्याशी भांडले ते त्यांच्या माओवरील नितांत भक्तीमुळे. कम्युनिस्ट क्रांतीच्या विजयानंतर क्रांतिकारी फौजा पेकिंगमध्ये शिरल्या. त्यानंतर माओने केलेली पाहिली कारवाई म्हणजे पेकिंगनिवासी त्यावेळी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या रूपसुंदरी नटीशी लग्न करणे. माओच्या एकूण कीर्तीला हे कृत्य शोभणारे नाही असे मी म्हटल्यावर हा तरुण शास्त्रज्ञ माझ्यावर इतका उखडला, की त्यानंतर अगदी अलीकडेपर्यंत आमचे बोलणे-चालणेसुद्धा होत नव्हते. माओचे इतके पराकोटीचे भक्त हिंदुस्थानातही अनेक होते आणि आहेत.

चीनमधील राज्यक्रांती, लाँग मार्च, नंतर कोमिंटांग सरकारविरुद्धचा उठाव येथपासून तर छोट्या छोट्या प्रसंगावरही काव्ये प्रसवणारी माओची प्रतिभा, आयुष्याच्या शेवटच्या टप्यावरदेखील नदीमध्ये तीस तीस कि. मी. पोहण्याचा चमत्कार, या साऱ्यांचा नायक अनेकांच्या विशुद्ध मूर्तिपूजेचा विषय राहिला.

पुरुषांचीही चारित्र्ये कुणी जाणावी?

टॉलस्टॉयच्या नायकाप्रमाणेच आता माओभक्तावरही मोठा मानसिक आघात

होणार आहे. माओबरोबर बावीस वर्षे सतत राहिलेले डॉ. झीस्वी यांनी खराखुरा माओ सूर्यप्रकाशात आणला आहे.

माओने केलेल्या आपल्या साथीदारांच्या निर्घृण हत्यांचा इतिहास सगळ्या जगाला माहीत आहे. 'मोठी छलाँग', 'सांस्कृतिक क्रांती' यांच्या कालखंडात दशलक्षावधींनी माणसे मारण्यात आली. साम्यवादी सत्तेला विरोध करणाऱ्या व्यक्तींना नुसतेच ठार करण्यात आले असे नाही, तर त्यांचे मांस खायला देण्यात आले. येथपर्यंतच्या आसुरी 'दैत्यकथा' आता सर्वदूर माहिती झाल्या आहेत; पण या सर्व भीषण हकिकतींचा संबंध व्यक्तिशः माओशी नव्हता, असणे शक्यच नव्हते, अशा राक्षसी प्रकारांची माओला यत्किंचितही कल्पना असती तर त्याने ते घडू दिलेच नसते, अशी सर्वसाधारण माओभक्तांनी आजपर्यंत, स्वतःची समजूत घालून दिली होती. या समजुतीचा पाया उखडून टाकणारे आणि माओच्या व्यक्तिगत आयुष्यावर प्रकाश टाकणारे हे माओचरित्र अमेरिकेत प्रसिद्ध होत आहे. १९५५ ते १९७६ ही बावीस वर्षे डॉ. झीस्वी माओच्या सतत सान्निध्यात राहिले. पहिली अकरा वर्षे त्यांनी रोजनिशी लिहिली; पण स्वसंरक्षणासाठी ती १९६६ मध्ये जाळून टाकली. माओच्या मृत्यूनंतर सुरुवात केली.

माओचे वस्त्रहरण

माओ घाणेरड्या शिव्या देई, दात कधी घासत नसे, अंघोळ क्वचितच करी येथपासून ते माओ त्याला झालेल्या गुप्तरोगावर उपचार करून घेण्यास नकार देई, अधिकाधिक स्त्रियांशी संबंध आल्यामुळे रोग बरे होतील एवढेच नव्हे तर, दीर्घायुष्य लाभेल अशी त्याची खात्री होती. येथपर्यंत बारकाईने तपशील डॉ. ली यांनी दिले आहेत. माओ मोठा संशयी आणि खुनशी स्वभावाचा होता. 'मोठ्या छलाँगी'च्या काळात शेतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे काही कोटी माणसे भुकेने मेली. त्या वेळी माओने काही काळपर्यंत मांसाशन सोडले होते; पण या सगळ्या भूकबळींची जबाबदारी त्याने स्वतः कधी स्वीकारली नाही.

क्रूरकर्मा सुलतान आपल्या पराक्रमाची पराकोटी जनानखान्यात गाठू इच्छितात. याही बाबतीत एखाद्या चेंगीजखानाचा अपवाद सोडल्यास माओच्या बरोबरीस कोणी सुलतान यायचा नाही. साम्यवादी सत्तेच्या काळात. बेजिंगमधील तालेवार स्त्रिया माओ-त्से-तुंगपासून मिळालेले गुप्तरोग अभिमानाने माओ-निष्ठेचे आणि संबंधांचे मानचिन्ह म्हणून मिरवीत असत आणि अशा संबंधांतून आपल्या दरबारी लोकांवर माओ नजर ठेवीत असे. इ. इ. गोष्टींची अनेक उहारणे डॉ. ली

यांनी दिली आहेत.

इतिहासाने मारले, दुष्टचारित्र्याने बुडवले

आज साम्यवादाचा पाडाव झाला आहे; पण तरीही गेल्या शतकाभरात जगाला समाजवादाच्या पंजाखाली आणण्यासाठी जे भीमपराक्रम घडले, त्यात माओची कर्तबगारी सर्वश्रेष्ठ आहे. नव्या इतिहासात खलनायक म्हणून त्याचे नाव उरणार आहे. राम म्हणून नव्हे, तर रावणाचा अवतार म्हणून त्याचे स्थान इतिहासात राहणार हे उघड आहे; पण दैवदुर्विलासाने पाडाव केला, तरी वैयक्तिक जीवनाच्या स्वच्छतेने ज्यांचे जीवन सर्वकाळ देदीप्यमानच राहील असे महात्मे असतात. येशू ख्रिस्त, राणा प्रताप, सुभाषचंद्र बोस अशा माणसांच्या आयुष्यात शेवटपर्यंत अपयशाचे पहाडच कोसळले; तरी ते अपयशदेखील उज्ज्वल भूषणे व्हावीत अशी यांची चरित्रे आहेत. माओच्या विचारांचा पाडाव इतिहासाने केला. व्यक्ती म्हणून नाव टिकून राहवे असे त्यांच्याकडे काही नव्हतेच. असल्या माणसाला अध्यक्ष माओ आमचा अध्यक्ष म्हणून उत्साहाने गौरवणाऱ्यां भारतीय शिष्यांवर मात्र मोठी कठिण वेळ येवून ठेपली आहे.

थोरांची मुबलकता

पराक्रमी पुरुष्यांच्या आयुष्यातील गुलाबी प्रकरणाविषयी सर्वसाधारणपणे फारशी चर्चा होत नाही झाली तर थोड्याफार कौतुकाच्या स्वरात होते. पहिल्या बाजीरावाच्या चारित्रात मत्सानी भूषणच मानली जाते. मार्क्सचे चोरटे प्रेमप्रकरण, त्याची अनौरस मुलगी, फ्रान्सचे आजचे अध्यक्ष मितेराँ यांचीही अनौरस कन्या या प्रकरणाबद्दल कोणी अनुदारता दाखवत नाही; पण कोणत्याही राजसत्ताधाऱ्यांने आपल्या सत्तेचा फायदा घेऊन कामुकतेला स्वछंद वाव द्यावा आणि त्यांच्या चारित्रातील या कमजोरीमुळे देशाचे तुकडे पडावेत, नुकसान व्हावे असे घडले तर मग अशा थोर व्यक्तिंच्या खासगी जीवानावरील अवरण टराटरा फाडून देशाच्या घात होण्यास त्यांच्या चारित्र्यातील कोणते दोष फसे कारणीभूत ठरले ते दाखवणे प्रामाणिक इतिहासकारांचे कर्तव्य ठरते.

डॉ. ली यांनी एक महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. हे पुस्तक त्यांनी चीनमधून बाहेर पडल्यानंतर लगेचच प्रसिद्ध केले असते तर, त्यांना एका खलनायकाला उघडे पाडण्याचे नव्हे तर इतिहासाची दिशा बदलण्याचे श्रेय मिळाले असते. डॉ. ली काही मोठे धीरोदत्त नायक आहेत असे नाही; पण त्यांनी दिलेल्या तपशीलाच्या माहितीबद्दल शंका बाळगण्याचे काही कारण दिसत नाही.

दुसऱ्या महायुद्ध काळातील चर्चिल, रूझवेल्ट, स्टॅलिन, माओ या चार

नेत्यांचे वस्त्रहरण झाले आहे. आपल्या देशात कोणा लेखकाची असले काही संशोधन करण्याची फारशी हिंमत होणार नाही. कोणी एखादा चकार शब्द मान्यवराविरुद्ध काढला, तरी त्या लेखकावरच गोटेमार चालू होते. भारतात थोर 'नररत्ने' अनेक निपजली, असे म्हटले जाते ते त्यामुळेच असावे!

(११ नोव्हेंबर १९९४)

■■

सुख शांतीचा राजीनामा

मुंबईतील एक जुने पत्रकार मित्र बरेच दिवसांनी भेटले. भेटल्याबरोबर त्यांनी इंग्रजीत प्रश्न विचारला, "शरदराव तुमचे हिरो कोण?" पत्रकार मी भेटल्यावर साधारणपणे शेती, शेतकरी, शेतकरी संघटना यांबाबत प्रश्न विचारतात. क्वचित राजकीय परिस्थिबद्दल माझे मत विचारतात; पण असे वैयक्तित प्रश्न क्वचितच विचारतात.

"ही काय नवीन विचारपूस चालली आहे?" मी विचारले. पत्रकार मित्र मुंबईतील एका प्रख्यात इंग्रजी दैनिकात एक नवीन सदर चालवीत आहेत. सदराचे नावच 'माझे आदर्श' किंवा माय हिरो असे आहे. जान्यामान्या लोकांना त्यांच्या आदर्श व्यक्ती कोणत्या त्याबद्दल विचारून त्या त्यांना का आदर्श वाटतात याबद्दल थोडक्यात टिप्पणी या सदरात होते. हिरो या शब्दाचा मराठीत अनुवाद निदान सिनेमा आणि नाट्यसृष्टीत नायक असा होतो; पण अमूक अमूक व्यक्तीला मी हिरो मानतो याचा व्यवहारात अर्थ असा होतो, की अशा व्यक्तीला मी केवळ निर्दोषच नव्हे तर काही प्रमाणात अलौकिक मानतो. आपापल्या हिरोषियी बोलताना लोक डोळे विस्फारून आणि भावनाविवश होऊन बोलू लागतात. माझ्याबाबतीत जिच्या चरणी लीन व्हावे, तिचे अक्षरन्‌अक्षर प्राणपणाने झेलावे आणि ब्रह्मवाक्य मानावे, जिचे सगळे चारित्र्य आदर्श मानावे अशी व्यक्ती विभूती कोणीच नाही.

मा ××××× परमपूज्य!

उलट तारुण्याच्या भरात, शक्तीच्या अमदानीत, महाविद्यालयाच्या पहिल्या काही वर्षांत ग्रंथप्रामाण्य आणि व्यक्तिपूजा यांचा पगडा मुळातून उखडून टाकण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे. त्या काळात, कोणत्याही व्यक्तीचा किंवा ग्रंथाचा आपल्या मनावर पगडा राहू नये याकरिता मी आणि माझ्या सहाध्यायी

मित्रांनी भरकस कोशीश केली आहे. शरीर कमावण्यासाठी एखाद्या पहिलवानाने मेहनत करावी, खुराक घ्यावा तशी आम्हा मेंदूच्या पहिलवानांची धडपड. त्याकाळी चाणक्य आणि आद्य शंकराचार्य या विभूती आणि भगवत्‌गीता हा ग्रंथ यांच्याबद्दल माझ्या मनात अपार श्रद्धा होती. एकदा सहज माझ्या मनात प्रश्न आला की, "हिंदू ब्राह्मण घरात जन्मलो नसतो तर या व्यक्तींना आणि या ग्रंथाला मी पूज्य मानले असते का?" प्रश्नाचे सरळ आणि प्रामाणिक उत्तर नाही असे आले. मग निष्कर्ष उघड होता. कोणत्याही मार्गाने या विभूती आणि ग्रंथाविषयी मनातील पूज्य श्रद्धाभाव दूर झाला पाहिजे. आमच्या कंपूतील पूज्य मित्राने युक्ती सुचवली. प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा या व्यक्तींची किंवा ग्रंथांची नावे आपण घेऊ तेव्हा नावाच्या आधी एक अपशब्द वापरायचा! या युक्तीचा परिणाम लवकर दिसून आला. थोडक्यात, मनात कोणाला विभूतीस्थान नसावे याकरिता खास मेहनत घेतलेला मी माणूस आहे.

आदराऐवजी असूया

माझ्या कोणी विभूती नाहीत; पण अनेक लोकांबद्दल आणि त्यांच्या कामाच्या काही अंगाबद्दल मला भरपूर आदर आहे किंबहुना अशा काही व्यक्तींविषयी माझ्या मनात मत्सराची भावना आहे. डार्विनच्या जागी आपण असतो आणि 'बिगल' बोटीवर निम्म्या जगाचा प्रवास करताना सापडलेल्या एकेक अवशेषाच्या पुराव्याची सांगड जोडता जोडता उत्क्रांतीचा सिद्धांत आपल्याला मांडायला मिळाला असता तर केवढा आनंदा झाला असता. लायोनेल रॉबिन्स किंवा लॉर्ड केन्स यांच्या प्रभुत्वाने, शैलीदार गद्यात, अर्थशास्त्रातील अगदी कूट समस्यांचे हळूवार पायरी पायरीने विश्लेषण करीत करीत प्रचलित समजुती आणि सिद्धांत पार उलथवून टाकण्याचे आपल्याला जमले असते तर, अशा कल्पनांनी माझ्या तोंडाला पाणी सुटले. आर्ट बुखवाल्ड, अमेरिकन व्यंगकार दररोज एक ३०० शब्दांचा लेख नर्म विनोदासह, खुसखुशीत भाषेत, त्या दिवशीच्या ताज्या घटनांच्या संदर्भात आणि अचूक मर्मभेद करणारा असा वर्षानुवर्षे लिहितो आहे. असे आपल्याला काही जमले पाहिजे, अशी असूया मला सतत वाटते. टाईम्स ऑफ इंडिया उघडावा आर.के. लक्ष्मणचे व्यंगचित्र पाहावे आणि त्या दिवशीच्या घडामोडीवर त्यांचे व्यंगचित्र पाहिल्यानंतर, "अरे, हे आपल्याला का नाही सुचले?" असे म्हणून ती अनेकदा स्वत:च्याच थोबाडीत मारून घ्यावी. गाण्यातील काही कळत नसूनही भीमसेनांचे गाणे ऐकताना सगळा रसिकवृंद ज्या तल्लीनतेने डोळ्यात प्राण आणून त्यांच्याकडे बघतो ते पाहिल्यावर

जनसमुदायावर अशी मोहिनी टाकण्याची एखादी विद्या आपल्याला येत असती तर असे सहज वाटून जाते. एक अपवाद थोरल्या महाराजांचा. त्यांच्या जागी आपण असल्याची कल्पना करणेदेखील अक्षम्य पाप वाटते. पु.लं.च्या 'गुळाचा गणपती' कथेतील नायक आपण कधी गायक, कधी चित्रकार, कधी निष्णात शल्यचिकित्सक असल्याच्या कल्पना करतो आणि स्वत:च्या कल्पनासृष्टीत रंगून जातो. 'याच्या जागी आपण असतो तर!' असा सुखद विचार ज्यांच्याबद्दल येतो त्या माझ्या विभूती. माझ्या लेखी याच्यावरचे पद नाही.

कोण बाबा महाराजांच्या कृपेने किंवा चमत्काराने भारून गेलेले भक्तलोक बाबांचा विषय निघाला, की थोड्या दबलेल्या आवाजात गंभीपणे बोलू लागतात, अशा तऱ्हेची विभूतीपूजा आता फक्त भक्तमंडळीतच दिसते. विज्ञानयुगात अशी विभूतीपूजा मतिमंदातच सापडायची! ज्यांची विचारशक्ती अजून शाबूत आहे त्यांच्या बाबतीत विभूतीतत्त्वाची कमाल मर्यादा म्हणजे यांच्यासारखे आपल्याला जमले असते तर! असे ज्यांच्याबद्दल वाटते त्या विभूती.

मनाचा सहज कौल, 'अल्ड्स हक्सले'

पत्रकार मित्रांना माझ्या या असल्या लांबलेल्या प्रस्तावनेत काहीच स्वारस्य नव्हते. "पण तरी तुमचे हिरो कोण?" विचार करायला फारसा वेळ नव्हता. आयुष्यात भेटलेल्या किंवा पुस्तकरूपाने परिचय झालेल्या व्यक्ती आणि इतिहासाच्या पानात ज्यांच्या यशोगाथा अजरामर झाल्या आहेत अशा अनेक नावांची यादी करावी. मग त्यात प्राथमिक छाटणी, दुय्यम छाटणी असे करीत करीत नेमके उपान्त्य फेरीपर्यंत पोचलेल्या लोकांची नावे काढावी, असे सगळे व्यवस्थितपणे करायला फुरसदच नव्हती. नावे दोन चार सेकंदात नेमकी निवडणे अशक्यच होते, तरी मी उत्तर दिले आणि जे उत्तर माझ्या तोंडून आले त्याने माझे मलाच आश्चर्य वाटते आहे.

उत्तर बारकाई विचार करून दिलेले नाही. ते असेच माझ्या तोंडून निघाले. आता विचार करायला बसलो तर मला ज्यांच्या जागी असणे आवडले असते. अशा व्यक्तींची लांबलचक यादी करता येईल. ज्योतिबा फुले, हो ची मिन्ह, मार्गारेट थॅचर, अहिल्याबाई होळकर अशी कितीतरी नावे जमा होतील; पण ऐनवेळी मी पहिले नाव दिले ते 'अल्डस हक्सले' यांचे.

मोठे उत्तर आणि मुलाखत वर्तमानपत्रात छापून आली. रंगीबेरंगी फोटो माझाही आणि 'अल्डस हक्सले'चाही आणि मला अगदी धन्य धन्य वाटले. हक्सले यांना मनातील पहिली विभूती म्हणून उत्स्फूर्तपणे मी का जाहीर केले?

याचा माझा मीच शोध घेतो आहे!

अल्डस हक्सले, गर्भश्रीमंत उमरावांच्या घराण्यात जन्मलेले; पण सगळेच खानदान मोठे विचारवंतांचे. वडील थॉमस हक्सले निसर्गशास्त्रज्ञ. माकडापासून मनुष्याची निर्मिती झाली हा सिद्धांत डार्विनने मांडल्यावर या दोन प्राण्यांमधील साधर्म्याचा मोठ्या चतुरस्त्र प्रतिभेचे. एकाच वेळी जीवशास्त्रज्ञ असून त्यांनी इंग्लंडच्या राजकारणात मोठी महत्त्वाची भूमिका बजावली. डार्विनच्या प्रमेयांची सखोल विचक्षणा करून त्यांनी जी मांडणी केली तीच आज उत्क्रांतीवादाची अधिकृत मांडणी समजली जाते.

अशा घराण्यात अल्डस हक्सले यांचा जन्म १८९४ साली झाला. बाप आणि वडीलबंधू यांची शास्त्रीय जिज्ञासू बुद्धी त्यांचेकडेही होती; पण बुजूर्गांची पद्धत शांतपणे संशोधन करण्याची. अल्डस हक्सले यांची बुद्धिमत्ता काहीशी विक्षिप्त तरुणपणी ते काहीसे मार्क्सवादी होते. नंतर त्यांनी शास्त्रविषयक चमत्कृतीजन्य लिखाणही केले आणि आयुष्याच्या शेवटी अध्यात्माचे मोठे जिज्ञासू अभ्यासक झाले. स्वत:च्या एका कादंबरीच्या प्रस्तावनेत त्यांनी तरुणपणी मार्क्सवादी, मध्यम वयात विज्ञानकथा लेखक आणि उतारवयात वेदांती बनणाऱ्या लोकांची येथेच्छ टिंगल केली आहे.

मेस्कॅलिन आणि कुंडलिनी

अल्डस हक्सले यांच्या जन्माच्या आठच वर्षे आधी जर्मनीत निवडुंगापासून काढलेल्या एका अर्काचा माणसाच्या ज्ञानेंद्रियावर आणि विचारशक्तीवर परिणाम होतो असे सिद्ध झाले; पण अशा द्रव्यांचा नेमका परिणाम काय होतो? ऐकण्यात, पाहण्यात, स्पर्शात, वासात नेमका काय फरक पडतो? माणसाच्या अनुभूतींची आणि तर्क शक्तींची धार कमी होते की जास्त? याचा नेमका अभ्यास करायचा कसा? पोटॅशिअम सायनाईड म्हणजे महाभयाक विष. जिभेवर थेंब पडताच मनुष्य मरून जातो. तरीदेखील त्याची नेमकी चव जगाला कळावी याकरिता काही शास्त्रज्ञांनी स्वत:वर प्रयोग करून घेतले आणि मरण्यापूर्वी कागदावर चवीचे वर्णन करणारे शब्द दोन शब्द लिहिण्याची धडपड केली अशी कथा (कदाचित दंतकथा) आम्ही ऐकली होती. मेस्कॅलिन या द्रव्याचा माणसाच्या ज्ञानसंस्थेवर काय परिणाम होतो? याचा प्रयोग करायला अल्डस हक्सले पुढे झाले. मनुष्य जातीचे भाग्य असे की, हा प्रयोग त्यांच्यासारख्या प्रज्ञावंत प्रतिभाशाली सिद्धहस्त गद्यशैली लेखकाने केला. त्यांचे अनुभव त्यांनी एका पुस्तकात प्रसिद्ध केले आहेत. कोणी ऐरागैरा स्वत:वर प्रयोग करून घ्यायला

तयार झाला असता तरी होणाऱ्या संवेदनातील फरक इतक्या तरलतेने आणि बारकाव्याने मांडणे त्याला जमलेच नसते.

कुंडलिनीयोगाचा अनुभव सांगणारे, पद्मासन घालून बसले आणि काही मुद्रा घेतल्यानंतर गुरुचा प्रसाद लाभला तर काय अननुभूत ब्रह्मानंदाचा अनुभव येतो त्याचे वर्णन करतात. काही संवेदना कुंडलिनीयोगात येत असतील; पण त्या अनुभूतीचा संबंध चिद्तत्त्वाशी आहे असे निश्चयपूर्वक कसे सांगता येईल? सांगणाऱ्याचा अभ्यास काय? अधिकार काय? कुंडलिनीचा अनुभव घेतल्यानंतर फल्डस हक्सले कदाचित म्हणाले असते, हा अनुभव अमुक अमुक द्रव्य अमुक अमुक प्रमाणात घेतल्यानंतर येणाऱ्या अनुभवासारखा आहे. ज्यांचा पुर्वानुभव काहीच नाही अशा ब्रह्मवाद्यांनी या विषयावर बोलणे खरे म्हणजे अनुचितच. त्यासाठी अल्डस हक्सलेचा अधिकारच हवा!

नवे शूर जग

पण अल्डस हक्सले जगभर गाजले ते त्यांच्या 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' या कादंबरीने. उद्याच्या नव्या शूर जगात काय असेल याचे वर्णन करणारी ही काही विज्ञानकथा नाही. अगदी प्रगत अशा मनुष्य समाजानेसुद्धा आज जी काही मूल्ये आणि जे काही आदर्श बाळगले आहेत त्यांचाच पाठपुरावा केला गेला तर काय विचित्र जग तयार होईल याचे मोठे विदारक चित्र या कादंबरीत आहे. माणसाला सुख पाहिजे, शांती पाहिजे आणि त्यासाठी तो उपभोगांच्या मागे लागला आहे. त्यातून काय होईल? हक्सलेच्या कथानकात एक मोठे महायुद्ध होते. जगाचा जवळजवळ विध्वंस होतो आणि विध्वंसानंतर नव्या जगाची उभारणी काही मंडळी हाती घेतात. ज्यामुळे युद्धाची आपत्ती ओढवली ते सगळे टाळून सर्व यच्चयावत प्राणीमात्र सुख, शांती, समाधानात जगतील असे जग त्यांनी उभे केले. विज्ञानाच्या आधाराने सुखी व्हायचे असेल, तर माणूसच बदलला पाहिजे, त्यासाठी प्रजोत्पादन आणि प्रशिक्षण बदलल्याखेरीज प्रजा सुखशांतीने नांदू शकणार नाही. नव्या शूर जगात संभोगाच्या अपरिमित शक्यतांना उत्तेजन देऊनही बाळांचा जन्म कारखान्यातच होतो. जगाच्या संचालकांनी केलेल्या नियोजनाप्रमाणे प्रत्येक बाळाला त्याच्या नियोजित भवितव्याप्रमाणे जन्माच्या आधीपासून शिकवण दिली जाते. एक चातुर्वर्ण्य तयार केले जाते; पण गर्भावस्थेपासून मिळवलेल्या शिकवणुकीमुळे खालच्या वर्णाचे लोकही तक्रार करीत नाहीत. अशी नव्या जगाची मांडणी आहे.

धोका टळला?

काल परवापर्यंत हक्सलेचे 'नवे शूर जग' प्रत्यक्षात घडणार अशी भयानक चिन्हे स्पष्ट दिसत होती. गेल्या दोन चार वर्षातच काही शुभचिन्हे दिसू लागली होती. नियोजनाच्या व्यवस्था कोसळून पडत आहेत. केवळ सुखशांतीच्या मागे लागणारी बाहुली नाही तर स्पर्धेच्या वेदना सोसूनही स्वत:ची स्वत:वरील निष्ठा जपण्यासाठी झुंजायला आनंदाने तयार होणारी उद्योजकांची पिढी पुढे सरसावत आहे. असे व्हावे हे अल्डस हक्सले यांचे स्वप्न होते. या कारणाने तर विभूती म्हणून त्यांचे नाव माझ्या जिभेवर सहज आले नसेल!

■■

अन्नमंत्रालयात अतिरेकी!

"पंजाबमधील अतिरेक्यांची पिछेहाट होते आहे. पंजाबमधील भीतीचे सावट नाहीसे होत आहे. मनात कोणतीही भीती न बाळगता आता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे सहज शक्य आहे," असे प्रशस्तीपत्रक सरदार खुशवंतसिंग यांनी दूरदर्शनवरील एका कार्यक्रमात दिले. इतर अनेकांनीही पंजाबमधील परिस्थितीबद्दल अशाच प्रकारे निदान केले आहे, "अतिरेक्यांना आता पंजाबात हालचाल करणे कठीण झाले आहे. त्यामुळे ते आता इतर राज्यात घुसू पाहात आहेत." गेल्या आठवड्यात दोन प्रमुख अतिरेक्यांना पोलिसांनी संपवले ते लुधियाना अमृतसरला नव्हे, तर मुंबईच्या उपनगरात, टेहरी, गढवाल, उत्तर राज्यस्थान येथे गेलेल्या अतिरेक्यांनाही जवान यथावकाश शोधून काढतील याबद्दल मनात शंका नको.

पण अतिरेकी आणखी एका फार मोक्याच्या आणि महत्त्वाच्या जागी जाऊन पोचले आहेत. तिथे ते लपून छपून वावरत नाहीत, खुलेआम मोठ्या दिमाखाने फिरतात. पत्रकारांना मुलाखती देतात. आपण जणू काही सरकारी धोरणच पुढे चालवतो आहे असे दाखवतात. पोलिसांच्या किंवा लष्कराच्या लक्षातसुद्धा येणार नाही असे षड्यंत्र अतिरेक्यांनी रचले आहे.

अस्मिता दुखवण्याचे तंत्र

अतिरेक्यांच्या अत्याचारांना खरी सुरुवात झाली ती १९८४ मध्ये. इंदिरा गांधींनी एशियाड खेळांच्या वेळी दिल्लीत शिखांना म्हणून येऊ द्यायचे नाही असे फर्मान काढले. त्यावेळी मी पंजाबमध्ये दौऱ्यावर होतो. दिल्लीकडे येणाऱ्या गाड्यातून सर्वसामान्य सज्जन शीख नागरिकांना, त्यांच्या बायकामुलांना, बसमधून आगगाड्यातून अगदी त्यांच्या खासगी वाहनातूनसुद्धा बंदुकीची नळी लावून उतरवत होते, त्यांची अगदी कसून तपासणी करीत होते. त्यावेळी प्रवाशांच्या

तोंडावर जे भाव उठत ते पाहून मी म्हटले होते, "कधीकाळी खलिस्तान तयार झाली तर त्याचे श्रेय किंवा दोष एशियाड खेळाच्या वेळी दिल्लीस शिखांना मज्जाव करण्याची कल्पना ज्याने काढली असेल त्याला द्यावा लागेल."

आपण केवळ शीख म्हणून जन्माला आलो म्हणून अशी वागणूक मिळते आहे, ही भावना शीख समाजात जितकी पसरेल तितका फुटीरवाद बळावतो. अतिरेक्यांचे काम सोपे झाले, सुवर्ण मंदिरावरील हल्ल्याने शीख समाजात आपल्यावर जुलूम होत असल्याची भावना वाढली आणि इंदिरा गांधींच्या आशीर्वादाने शिखांचे जे शिरकाण करण्यात आले त्यामुळे पंजाब प्रश्न भयानक चिघळला. एका मागोमाग एक पंतप्रधान शीख समाजात संताप वाढेल अशी पावले उचलून अतिरेक्यांना फोफावण्यासाठी सुपीक जमीन तयार करून देत होते. त्यावेळी खरा सूज्ञपणा कोणी दाखवला असेल तर तो सर्वसामान्य भारतीय नागरिकांनी.

धन्य जनसामान्यांची

गावोगाव हिंदूचे खून पाडणे, बसगाड्या थांबवून एकावेळी २०-२०, ३०-३० निरपराध लोकांना गोळ्यांच्या फैरीत संपवून टाकणे, असा कार्यक्रम आखण्यात आणि निर्घृणपणे पार पाडण्यात अतिरेक्यांचा काय डाव होता? ६०-६५ कोटीचा हिंदू समाज अशा कृत्याने संपून जाईल हे कोणा मूर्खालाही पटले नसते. अतिरेकी तर इतके भोळेभाबडे नाहीत हे निश्चित. त्यांचा हिशेब वेगळा होता. अशा अत्याचाराच्या प्रकारांनी आणि त्यासंबंधीच्या बातम्यांनी देशात इतरत्र बिगरशीख खवळून उठतील आणि इकडे तिकडे पाचपन्नास शिखांना मारून टाकतील, तर दोन समाजात वैर उभे राहील, असा त्यांचा आडाखा होता. असे झाले तर खलिस्तानवाद्यांचे काम अगदीच सोपे झाले असते. एकदा मने फाटली, की नकाशाला चीर जायला वेळ कितीसा लागणार? पण भारतातील सर्वसामान्य गरीब आणि निरक्षर माणसाचे कौतुक केले पाहिजे. अतिरेक्यांनी शेकडोंनी मुडदे पाडले; पण त्याला प्रत्युत्तर म्हणून कोठेही शिखांविरुद्ध दंगे म्हणून झाले नाहीत. पंजाबमधील ट्रकवाले मोकळेपणे देशभर फिरत राहिले. अतिरेक्यांच्या पाडावाला येथेच सुरुवात झाली. हिंदू समाज माथेफिरूपणा करीत नाही हे स्पष्ट होताच, पंजाबमधील शीख समाजाची अतिरेक्यांबद्दलची सहानुभूती मावळून जायला लागली.

आणि आता सगळी खलिस्तानची चळवळच मोडीत निघते की, काय अशी भीती निर्माण झाली. काही आतंकवादी निसटून इतर राज्यात गेले. सगळ्यांत

महत्त्वाच्या आणि सगळ्यांत क्रूर अतिरेक्यांनी आश्रय घेतला तो अन्नमंत्रालयात!

भयानक कारस्थान

एशियाडचा परिणाम विरून गेला. 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'च्या जखमा भरून आल्या, दिल्लीतील दंग्यांचासुद्धा शीख समाजाला विसर पडू लागला. नवे राज्यकर्ते जुन्यांप्रमाणे काही माथेफिरूपणा करतील आणि शीख समाजाला पुन्हा एकदा दुखावतील ही शक्यता फारशी नाही. तमाम भारतीय जनता एखाद्या खऱ्याखुऱ्या ख्रिस्तशिष्याप्रमाणे एका गालावर चपराक मारली तर दुसरा गाल पुढे करण्यास तयार झाली आहे. या परिस्थितीत अतिरेक्यांनी करावे काय? शीख समाजाच्या भावना भडकावून देऊन पुन्हा एकदा खलिस्तानची चळवळ चेतवण्याचा त्यांनी मोठा डाव मांडला.

पंजाबच्या पोटावर टाच

अन्नमंत्रालयात घुसलेल्या या अतिरेक्यांनी पंतप्रधानांनाही ताब्यात घेतले आणि अर्थमंत्री मनमोहन सिंगही त्यांच्या कह्यात आले. पंजाबमधील शिखांना भडकवण्याकरिता अस्मितेच्या नुसत्या वल्गनांनी आता काम भागायचे नाही, त्यांच्या पोटावरच टाच आणायला पाहिजे, असा हिशेब त्यांनी केला. अन्नमंत्रालयातील अतिरेक्यांनी पंजाबातील फुटीरवाद चेतवण्याकरिता अजब युक्ती काढली. एकदम ३० लाख टन गहू आयात करायचे ठरवले. एवढेच नव्हे, तर पंजाबमधील शेतकऱ्यांच्या नाकावर टिच्चून आयात करायच्या गव्हाची पंजाबी गव्हाच्या दुप्पट किंमत द्यायचे जाहीर केले. या धूर्त युक्तिचा परिणामही लगेच दिसू लागला. इतर राज्यांच्या फायद्याकरिता पंजाबला लुटण्यात येते, असा प्रचार अतिरेकी सतत करीत; पण पंजाबी शेतकऱ्यांचा विश्वास त्यावर कधी फारसा बसला नाही. ५३६ रुपये खर्चून सरकार गहू बाहेरून आणणार म्हटल्यावर, हे सरकार पंजाबी शेतकऱ्यांचे शत्रू आहे हे पटवून देण्यात काहीच अडचण राहिली नाही.

शेतकऱ्यांना अद्दल

पंजाबचा गहू कितीतरी चांगल्या खाऊ घालण्याच्या लायकीचा. पंजाबी गव्हाचा भाव ३५० रुपये असावा अशी शिफारस खुद्द कृषी मूल्य आयोगाने केलेली असताना सरकारने भाव ठरवला फक्त २५० रुपये. पंजाब सरकारने दिलेला बोनस वगैरे सगळे लक्षात घेऊनसुद्धा शेतकऱ्यांच्या पदरात पडणार फक्त २८० रुपये. यात सरकारची सद्बुद्धी ती कोणती?

बाजारात ३५० रुपये भाव चालू असताना सरकारी खरेदीत २८० रुपयांनी

गहू विकायला कोण तयार होईल? सरकारी खरेदीत तूट पडली. तूट पुरी करण्याकरिता भाव वाढवून द्यावे तर सरकारी प्रतिष्ठा जाते. या उद्दाम शेतकऱ्यांची खोड मोडायला पाहिजे नाहीतर हे पुढे महाग जाईल. पंजाबी शेतकऱ्यांवर राग काढण्याकरिता सरकार स्वत:चे नाकसुद्धा कापून घ्यायला निघाले. परकीय चलनाचा कितीही तुटवडा असला तरी पंजाबी शेतकऱ्याला अद्दल घडवण्याकरिता सरकार १५०० कोटी रुपयांचे परकीय चलन उकिरड्यावर फुंकायला तयार झाले. हे पाहिल्यावर पंजाबमधील शेतकरी खडबडून जागा होतो आहे.

जखमेवर मीठ

त्याला आणखी खवळवण्याकरिता अन्न मंत्रालयातील अतिरेकी मोठे संतापजनक युक्तिवाद मोठ्या जाहिररीत्या करताहेत.

मागे लोकसभेत अमेरिकन गव्हाला जास्त भाव का दिला जातो? असा प्रश्न विचारला गेला, तेव्हा राव बिरेंद्र सिंग यांनी उत्तर दिले होते, "अमेरिकन शेतकऱ्यांचे राहणीमान उंच आहे आणि त्याचा गहू काही दरवर्षी आणत नाही, त्यामुळे जास्त भाव देणे योग्य आहे," हे उत्तर ऐकून जाणकार शेतकऱ्यांच्या अंगाची काहिली झाली होती. अन्न खात्यात सत्ता बळकावून बसलेले अतिरेकी असाचा युक्तिवाद करून शेतकऱ्यांना उखडू पाहत आहेत.

"पंजाबमधील शेतकऱ्याला जास्त किमत दिली तर कदाचित पाहिजे तेवढा गहू सरकारी कोठारात येईलसुद्धा; पण त्यामुळे भयानक महागाई होईल." अतिरेक्यांचा हा असला युक्तिवाद ऐकून शेतकऱ्यांचा तिळपापड होतो आहे.

एके ४७ पेक्षा मारक

पूर्वी नेहरू काळात अमेरिकेतून स्वस्त धान्य आणले जात असे. या धोरणाचा परिणाम असा झाला, की देश अन्नधान्याच्या बाबतीतही परावलंबी झाला. अन्नखात्यातील अतिरेक्यांनी आयातीच्या एका घोषणेने देश बुडवण्याचे केवढे कारस्थान साधले! मूल्यवान परकीय चलन नासून टाकायचे शेतकरी समाजाला भडकावयाचे, या पलीकडे जाऊन देशातील अन्नधान्याचे उत्पादनच संपवून टाकायचे एवढी ही कराल कारस्थानाची योजना आहे. एके ४७ वापरून शेकडो अतिरेक्यांना जे आठ वर्षांत जमले नाही ते नवे अतिरेकी आठ दिवसांत करून टाकत आहेत. गंमत म्हणजे अन्नखात्यातील अतिरेक्यांबद्दल कुणाच्याही मनात संशयसुद्धा अजून जागा झालेला नाही. गव्हाच्या आयातीचे ते जोरजोराने समर्थन करताहेत. मोठ्या जडजंबाल भाषेत आपले म्हणणे मांडत आहेत.

अन्न खात्यात अतिरेकी लपले आहेत. याचा सुगावा लागण्याचे कारण

म्हणजे अतिरेक्यांचे 'सरदार' धाटणीचे इंग्रजी. पत्रकारांशी बोलताना अतिरेक्यांचा प्रतिनिधी म्हणाला, "आयात करण्याखेरीज पर्यायच नाही. पंजाबचा गहू खरीदला तर तेवढा गहू खासगी व्यापारातून सरकारी वाटप व्यवस्थेत आला असे होईल. त्यामुळे अन्नधान्याचा एकूण पुरवठा वाढणार नाही." 'Without any net additionality to total availability' या ॲडिशनॅलिटी शब्दाच्या 'सरदारी' इंग्रजीने या कारस्थानाचे बिंग फुटले; पण अतिरेक्यांना अन्नमंत्रालयातून हुडकून काढून हुसकावून लावण्याचे काम अजून बाकीच आहे!

■■

भ्रष्टाचारी आम्हा सोयरे...

माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांच्याबरोबर पाटणा आणि अलाहाबाद येथील दोन सभांना उपस्थित राहण्याचा मला अनुभव आला अन् १९८९-९० या काळात बोफोर्स प्रकरणातील भ्रष्टाचाराचा विषय सगळ्या देशात गाजत होता. हे सगळे प्रकरण व्ही. पी. सिंग यांनी प्रकाशात आणले एवढेच नव्हे, तर या प्रकरणाचा पाठपुरावा करण्याकरिता त्यांना काँग्रेस पक्ष सोडावा लागला. त्यामुळे लोकांत त्यांच्याविषयी आकर्षण होते. हजारोंनी लोक त्यांच्या सभांना जमत आणि प्रत्येक सभेत विश्वनाथ प्रतापसिंग बोफोर्स प्रकरण, त्यातील भ्रष्टाचार आणि त्यावेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांचा या प्रकरणातील हात या विषयावर तपशीलवार बोलत.

मंचावर बसलेला असल्यामुळे समोर बसलेल्या अफाट समुदायातील लोकांकडे पाहणे मला अपरिहार्यच होते. त्यांच्या चेहऱ्यावरील हावभावांचे मी बारकाईने निरीक्षण करत होतो. एक मोठी चमत्कारिक गोष्ट माझ्या लक्षात आली. राजीव गांधीवर, देशाच्या पंतप्रधानांवर खुलेआम भ्रष्टाचाराचा आरोप जाहीर सभेत केला जात होता; पण त्या सगळ्या प्रतिसादात काही तरी कमी होते. तमाशातील एखाद्या चांगल्या संवादाला प्रेक्षकांनी दाद द्यावी तसा तो प्रतिसाद होता. देशाचा नेता भ्रष्टाचारात गुंतला आहे असे म्हटल्यावर जीवाचा संताप व्हावा, पोटतिडकीने जीवाचा आकांत करून उठावे अशी काही समोर बसलेल्या समुदायाची प्रतिक्रिया नव्हती, हा काय चमत्कार आहे?

मग एकदम माझ्या लक्षात आले, की या लोकांच्या मनात भ्रष्टाचाराविषयी चीड तर नाहीच, असली तर थोडी आपुलकीच आहे.

सभा प्रामुख्याने शहरवासियांची, म्हणजे उपस्थितात नोकरदार व्यापारी, विद्यार्थी इत्यादींचा भरणा यांच्यापैकी प्रत्येकाचे जगणे कुठेतरी भ्रष्टाचाराशी

जोडलेले होते.

नोकरदार अगदी चपराशी झाला, तरी रुपया-दोन रुपयांची चिरीमिरी हा त्यांच्या दररोजच्या आयुष्यक्रमाचा भाग होता. टेलिफोनवाले, टपालवाले, वनखातेवाले, एक्साईजवाले, आयकरवाले सगळ्यांचा भ्रष्टाचार हा जीवनाधार होता.

व्यापाऱ्यांना कुठे ना कुठे 'दोन नंबर' केल्याखेरीज टिकणे संभवच नसते आणि ज्यांनी लाच घेण्याची फारशी शक्यता नाही त्यांना जागोजागी, क्षणोक्षणी लाच देण्याचा तरी सराव होताच!

पंतप्रधानांनी साठ कोटी घेतले, हे ऐकल्यावर त्यांची काय प्रतिक्रिया? अबकारी खात्याचा एखादा इन्स्पेक्टर महिन्याला लाख दोन लाख रुपयांची त्याची वरकड मिळकत सहज असते-तो विचार करतो, "मी छोटा माणूस इतपत कमाई करतो, तर देशाच्या पंतप्रधानाने साठ कोटी घ्यावे यात काय चूक आहे? उलट, पंतप्रधान हा भ्रष्ट असला तर आपल्या भ्रष्टाचाराला एकप्रकारे संरक्षण आहे, तेव्हा आहे ते ठीक आहे, फार काटेकोर स्वच्छ राज्य आले तर पंचाईत होईल." अशीच भावना बहुतेकांच्या चेहऱ्यावर दिसत होती.

पोटे सांडियेली चवी

शहरे भ्रष्टाचाराची आगरे आहेत. भ्रष्टाचाराविषयी ममत्वाची आणि आपुलकीची भावना. मग खेडेगावातली काय स्थिती? खेडेगावात भ्रष्टाचाराचा फायदा मिळणारी माणसे फार थोडी. सरकारी अधिकारी, पुढारी, सोसायट्यांचे चेअरमन आणि डायरेक्टर इ. मंडळींची संख्या टक्केवारीने तशी कमीच. उलट बहुतेक शेतकऱ्यांचा जीव हरघडी हरहमेश लाच देता देता नकोसा होतो. तलाठ्याकडून सातबाराचा उतारा घ्यायचा आहे पाच रुपये द्या, कारखान्याकडून परवाना आणायचा आहे-पैसे द्या, गावात चोरीमारी झाली, जळीत झाले पोलिसांचे तोंड बंद करा, पोराला नोकरी पाहिजे-पैसे द्या, एक ना अनेक. शेतकरी तर या भ्रष्टाचाराचा विषय निघाल्यानंतर तीव्र संतापाची प्रतिक्रिया उमटावी की नाही?

पण विचित्र गोष्ट अशी, की असे होत नाही. शेतकरी मंडळी एकूणच भ्रष्टाचाराविषयी मोठ्या दार्शनिकाच्या उदासीनतेने बोलतात. पोलिस सबइन्स्पेक्टर म्हणून पोराची भरती व्हायची असेल तर किती हजार द्यावे लागतील याचा भाव दरवर्षी फुटतो आणि त्या भावाविषयी शेतकरी अगदी तटस्थतेने बोलतात, इतके पैसे देण्याची आपली ताकद नाही म्हणून आपलं पोरगं नांगरावरच राहणार आणि दुसरी पोरं थाट गाजवणार याबद्दलचा मनातला रागसुद्धा फार

बेताबेताने व्यक्त होतो. पंचायत समिती, जिल्हापरिषदेच्या अमक्या अमक्याने अमाप पैसा केला आहे, हे ते मोठ्या उदासीनतेने एकमेकांना सांगतात. अमका आमदार निवडणुकीच्या आधी बिडीला महाग होता; पण त्याचे आता दोनचार दारूचे गुत्ते झाले, शहरातील बंगला झाला हे सांगतानासुद्धा कुठे आक्रोश किंवा क्रोध दिसत नाही. राज्य पातळीवरचा एखादा नेता आठशे हजार कोटी रुपये बाळगून आहे असा उल्लेख झाला म्हणजे त्या नेत्याबद्दल काहीशी आदराचीच भावना तयार होते.

नीचापुढे ते नाचवी

इतिहासाचार्य वि. का. राजवाडेंनी म्हटले आहे, की गेली हजारो वर्षे शेतकऱ्यांची अशी निश्चित भावना झाली आहे, की जे जे म्हणून सरकार असते ते ते शेतकऱ्यांना लुटण्याकरिताच असते, तेव्हा प्रत्येक सरकारी हुद्देदार आपल्याला लुटतो त्यात आश्चर्य ते काय? अशी त्यांची भावना असते. अमका चेअरमन अमाप पैसा कमावून आहे, भरमसाठ पितो आणि मनाला येईल त्या आयाबहिणींवर हात टाकतो असे ऐकले तरी चालायचेच की हो! राजाने असे करायचे असते, अशी शेतकऱ्यांची सर्वमान्य प्रतिक्रिया असते.

स्त्रियांच्या वेगवेगळ्या समस्यांची पाहणी करून अभ्यास करणाऱ्यांचा एक अनुभव आहे. बाया शहरातल्या असोत, खेडेगावातल्या असोत, प्रश्नावलीतून त्यांना एखादा प्रश्न विचारला, तर त्या आधी उत्तरे द्यायला तयार नसतात. त्यातली एखादी थोडी धाडसी बाई बोलायला तयार झालीच तर ती मोठ्या सावधपणे बोलते. आपण दिलेले उत्तर चारचौघांत बरे दिसेल ना? सासूबाईच्या, मालकांच्या कानावर गेले तर ते नाराज होणार नाहीत ना? आणि दिलेल्या उत्तरराकारणे उद्या आपल्या पाठीवर वळ तर उठणार नाही ना? असा हिशेब मांडीत मोठ्या हुशारीने पाहणी करणाऱ्यांच्या प्रश्नांना त्या उत्तरे देतात.

घरात परिस्थिती बायांची, तीच समाजात शेतकऱ्यांची. तलाठ्याविरुद्ध राग व्यक्त करून उद्या त्याच्याच समोर जायची वेळ येणारच आहे, मग जमेल? आमदाराने नंगा नाच घातला तर घालो, आपण त्याच्याविरुद्ध ब्र काढला आणि त्याच्या कानावर गेले तर उद्याचे काय? सगळीकडेच भ्रष्टाचार माजला आहे, त्याच्यात आपल्या जातीचा, आडनावाचा एखादा जिल्हा गाजवतो आहे, भ्रष्टाचारात का होईना 'ऑल इंडियात' पहिला आहे. याच्या खेरीज अभिमान बाळगण्यासारखे त्यांच्या आयुष्यात असतेच काय?

थोडक्यात, भ्रष्टाचाराविषयी शहरात आपुलकी आणि खेडेगावात उदासीनता

अशी परिस्थिती आहे. त्यामुळे भ्रष्टाचारी सगळीकडे खुलेआम फिरतात, डौलाने फिरतात. भ्रष्टाचार पूर्वीही होता, आताही आहे. भ्रष्टाचार करणाऱ्याला आता प्रतिष्ठा आली आहे. भल्या मोठ्या थाटांच्या सभेत या ना त्या वाममार्गाने अफाट पैसे मिळणारे लोक उजळ माथ्याने वावरतात. स्वार्थ त्यागाच्या गोष्टी बोलतात. राष्ट्रहिताच्या बाता करतात. तुकाराम, ज्ञानदेवांचे नाव घेतात आणि सारी जनता हताशपणे पाहत राहाते. काय करणार? एका एका माणसाचे कुलंगडे बाहेर काढायचे, साक्षीपुरावा गोळा करायचा, कोर्टात न्यायचा, सगळा भ्रष्टाचार सिद्ध करायचा हे कष्टाचे आहेच; पण प्रचंड खर्चाचे आहे आणि पुढाऱ्याने डूख धरला तर कदाचित जीवाशी गाठ आहे. कोण हा उपद्व्याप करणार? पोलिसच भ्रष्टाचाराचे आगार झाले. न्यायालये तशीच, एखादा दुसरा पत्रकार सोडला, तर सारी वर्तमानपत्रे भ्रष्टाचाऱ्यांच्याच मालकीची. कोण याविरुद्ध दंड थोपटून उभा राहणार?

साठ कोटी रुपयांच्या बोफोर्सने जनात उद्रेक घडला नाही. हजारो कोटी रुपयांच्या शेअर बाजार प्रकरणी तर गुन्हेगारांचा जयजयकार होतो आहे. मंडल आयोगानेमात्र देश पेटला. कारण उघड आहे, तुकामाच्या भाषेत नीचापुढे नाचायची आमची तयारी आहेच, त्याचा विरोध कोण करेल. सरकारी नोकरी म्हणजे भ्रष्टाचाराची गंगा! त्यात हात धुवून घेण्यासाठी चढाओढ आहे. मंडल आयोगाने वणवा पेटला याचे खरे कारण, "भ्रष्टाचारी आम्हा सोयरे..."

■■

मालकाला विकणारे नोकरदार

हिंदी सिनेमात नेहमी दाखवला जाणारा एक प्रसंग आहे. श्रीमंत धीरोदात्त नायक कारखानदार किंवा बडा जमीनदार असतो. त्याला कोणीतरी फसवतो. एका दिवसात त्याची सारी धनसंपदा त्याच्या हातातून निघून जाते. घरातील सगळ्या नोकरमंडळींना तो जमा करून सांगतो, "तुम्ही माझी खूप सेवा केलीत; पण यापुढे तुमचा पगार देणे मला शक्य नाही, हे थोडेफार माझ्याकडे उरलेले पैसे घ्या आणि आपल्या चरितार्थाची सोय दुसरीकडे कोठेतरी बघा." नायक असे बोलत असताना गंभीर चेहऱ्याने तोंडावरची सुरकती हलू देत नाही आणि नोकरवर्गमात्र बिचारा धायीधायी रडत असतो. ते मालकाला म्हणतात, "मालक! इतके दिवस आम्ही तुमचे अन्न/मीठ खाल्ले आता तुमच्यावर कठीण प्रसंग आला, आम्ही तुम्हाला सोडून जाणार नाही, तुम्ही आम्हाला एक पैसासुद्धा देऊ नका."

दिवाळखोर सरकारचे नोकर

हिंदी चित्रपटात वास्तविकता शोधून सापडणे कठीण; पण इतकी देशातील सत्य परिस्थितीला सोडून असलेली गोष्ट कोणती नसेल.

हिंदुस्थान सरकारचे दिवाळे वाजले आहे. कोणा दुष्टाने त्याला बुडवलेले नाही, आपल्या स्वत:च्या अकार्यक्षमतेने, गलथानपणाने आणि चैनबाजी - उधळपट्टीने त्यांचा धंदा बुडाला. एक काळ असा होता, की सगळ्या देशाची आर्थिक, सामाजिक व्यवस्था सरकारच्या हाती होती. सरकारने वाटेल तितका कर जमा करावा, मन मानेल तितकी कर्जे घ्यावी, परदेशांतून अब्जावधींची कर्जे आणि मदत घ्यावी आणि शेवटी नोटांचा छापखाना चालवावा; पण खर्च चालवावा. नोकरचाकर वाढत गेले. त्यातला क्वचित एखादा सेवाभावी, बहुतेक सारे आपली तुंबडी भरून घेणारे आणि सत्तेच्या बळावर जनतेला हैराण करणारे.

झटक्यात जमाना बदलला. सरकारकडे कोणी काही काम सोपवायला म्हणून तयार होईना. कारखानदारी, व्यापार इत्यादी क्षेत्रांतून सरकारला बाहेर निघणे भाग पडले आहे. सरकारची काही सामाजिक जबाबदारी आहे. आरोग्य, शिक्षण, ग्रामविकास या क्षेत्रांत आम्ही काम करणार आहोत, असे निमंत्रण सरकार लोचटपणे स्वत:चे स्वत:ला देते आहे. सरकारी तिजोरीत सारा खटखडाट, गेल्या वर्षीचा तोटाच मुळी ६०,००० कोटींचा. नोकरदारांच्या पगार भत्त्यावरील खर्च १४००० कोटी. प्रशासनाचा खर्च त्याच्या निदान तिप्पट. तरीही हिंदी सिनेमात दाखवल्यापेक्षा अगदी वेगळे नाट्य इथे घडते आहे.

मजा करा रे! मजा करा!

दिवाळखोर मालक नोकरांना सांगतो, "तुम्ही काही काळजी करू नका, सगळ्यांच्या नोकऱ्या पक्क्या आहेत. पाचपन्नास नोकर पाहिजे तर वाढवून घ्या. कोणाचा पगारही कमी होणार नाही." उत्तर म्हणून नोकरदार म्हणतात, "मालक आमचे पगारभत्ते वाढले पाहिजेत. तुम्ही पैसे कोठूनही, कसेही मिळवून आणा; पण आमचे सगळे पहिल्यासारखे यथास्थित चालले पाहिजे, याद राखा!"

नोकरदारांचा रेटा इतका जबरदस्त, की गेल्या एका वर्षात केंद्र शासनाने ४०,००० नवीन जागा तयार केल्या, एवढे नव्हे तर सरकारी नोकरदारांचा पगार वाढवून देण्यासाठी एक वेतन आयोगही नेमला! हा वेतन आयोग कामाला लागला आहे. इतर कोणत्याही आयोगाचे काम कितीही रेंगाळले, तरीही वेतन आयोगाचे काम झटपट आटोपते. बाकीची कामे बाजूला टाकून त्यांच्या शिफारसी झटकन मंजूर होतात. पगारवाढीला विरोध करण्याची कोणाचीच हिंमत होत नाही. केंद्र शासनातील, नोकरवर्गाचे पगार वाढले, की पहिले प्रचंड काम प्रत्येक नोकरदाराचे पूर्वलक्ष्यी नवे पगार ठरवणे. मग, पाळीपाळीने एक एक राज्यातील पगारदार, "केंद्र शासनापेक्षा आम्ही काही कमी नाही. आम्हाला तितकाच पगार मिळाला पाहिजे." अशा मागण्यांच्या फेऱ्या आणि संप, हरताळाच्या लाटा सुरू करतात. त्यांच्याही मागण्या मान्य होतात. त्यानंतर नगरपालिका, जिल्हा परिषदा इत्यादींचाही नोकरवर्ग आपली समानता सिद्ध करून घेतो. एवढ्या सगळ्यात ५-१० वर्षे निघून जातात आणि पुन्हा नवा वेतन आयोग स्थापण्याची वेळ येते.

वेतन आयोगाचा टाईमबॉम्ब

सरकारशाही भली बुडीत निघाली असो, नित्यनेमाप्रमाणे वेतन आयोग नेमला गेला आहे. कारण पूर्वीच्या वेतन आयोगाने एक मोठे तत्त्व घालून दिले आहे.

हिंदुस्थानात पावसाच्या खालोखाल महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रशासन! 'आसमानी' नंतर 'सुलतानी' प्रशासन चांगले चालायचे असेल, तर नोकरदारांना समाधान वाटेल असा पगार मिळाला पाहिजे. गेल्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे साऱ्यांचे पगार भरपेट वाढले. महागाईची भरपाई करणारा महागाई भत्ताही मिळाला. नोकरदारच भत्त्याचे हप्ते ठरवणार. साहजिकच महागाईपेक्षा भत्ता दीडदुप्पटीने अधिक वाढला; पण या साऱ्या खैरातीमुळे प्रशासन कोठे थोडे अधिक कार्यक्षम झाले. निदान कमी पीडादायक झाले, असे उदाहरण म्हणून दिसत नाही. कार्यक्षमतावाढीकरिता पगारवाढ हे सत्र चालू ठेवण्यास काहीही सबळ कारण नाही, तरीही त्याच सूत्राने पगारवाढीच्या शिफारसी होणार आहेत.

गेल्या वेतन आयोगाच्या पगारविषयक शिफारसी महिन्याभरात मंजूर झाल्या; पण प्रशासनात सुधारणा करण्यासंबंधी त्यांनी केलेल्या इतर शिफारसी सरकारने तपासल्यासुद्धा नाहीत, मग अंमल करणे दूरच राहिले. प्रत्येक खात्यात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा बुजबुजाट झाला आहे. सनदी नोकरांना विशिष्ट गतीने पदोन्नती देण्याच्या हेतून या वरिष्ठ जागा तयार झाल्या आहेत. या जागात आणि इतरही नोकरवर्गात कपात करावी, त्यांचे कामाचे तास वाढवून द्यावेत. बोनस पद्धतीचा फेरविचार व्हावा आणि सरकारी नोकरवर्गातील वाढत्या अप्रामाणिकतेवर उपाययोजना करण्यात यावी, अशा शिफारसी वेतन आयोगाने केल्या होत्या. त्यांचा विचार सुरू होण्याआधीच नवा पाचवा वेतन आयोग नेमला जातो आहे.

निदान एवढे तर करा

देशबुडव्या सरकारी नोकदारांच्या उदरभरणाच्या या कामाला कोणी थांबवू शकेल, असे काही लक्षण म्हणून नाही. खुल्या व्यवस्थेच्या युगात नेमलेल्या पहिल्या वेतन आयोगाने काही मूलग्राही सूचना करायला हव्यात. उदाहरणार्थ, नियोजन मंडळं, पंतप्रधानांचे कार्यालय, कारखानदारी परवाना खाते इत्यादी खाती बंद करून टाकणे. इंजिनिअर, डॉक्टर झालेली मंडळी प्रशासकीय सेवेत येण्यासाठी झटतात, तसेच सरकारी नोकरी मिळवण्यासाठी उमेदवार जबरदस्त लाच द्यायला तयार होतात. याचा अर्थ सरकारी नोकरांचे पगार व इतर फायदे मर्यादेपलीकडे वाढले आहे. खुल्या व्यवस्थेत या संस्थांवरील जबाबदाऱ्याही कमी होणार आहेत. तेव्हा सर्व सरकारी नोकऱ्यांच्या पगारश्रेण्यांत कपात होणे आवश्यक आहे; पण यातले काहीच होणार नाही, हे उघड आहे. तरीही प्रशासनासंबंधी काही बदल नवीन वेतन आयोगाने सरकारपुढे ठेवावेत. बदल सोपे आहेत. त्याला कोणाचाच विरोध होऊ नये.

सरकारी कार्यालयातील खास खोल्यांची पद्धत बंद करावी. विभागणी करायची झाली तर ती साध्या लाकडी विभाजकाने करावी. कार्यालयात कोण काय करतो आहे हे सर्वांना स्पष्ट दिसावे, अशी व्यवस्था सर्व खासगी संस्थात असते. सरकारनेही ती मान्य करावी.

कोणत्याही सरकारी कार्यालयात दिवसभर चालणारे कँटिन म्हणून असू नये. जेवणाच्या सुटीपुरती चालणारी कँटिन म्हणून व्यवस्था पुरेशी आहे. सकाळी एकदा आणि दुपारी एकदा प्रत्येकाच्या जागी चहा देण्याची व्यवस्था करावी. ऑफिसच्या वेळात आपल्या जागेवर सरकारी कामाच्या कारणाशिवाय हजर नसलेला कोणीही पगारदार आपोआप शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र व्हावा. आपली जागा सोडताना आपण नेमके कोठे, कोणत्या कामाकरिता जात आहोत. यांसंबंधीची सूचना त्याने आपल्या मेजावर ठळकपणे दाखवली पाहिजे.

सरकारी नोकरांनी हातात आणलेली बॅग, पिशवी वगैरे कार्यालयाच्या प्रवेशद्वारापाशीच अनामत ठेवावी. कारखान्याप्रमाणेच प्रवेश करताना आणि बाहेर निघताना झडतीची व्यवस्था असावी.

जनतेला कार्यालयात प्रवेश करण्यास मज्जाव असावा. जनतेने भेटायचे ते फक्त जनसंपर्क अधिकाऱ्याला, इतर कुणालाही नाही.

सगळ्या भारत सरकारचे पुनर्घटन होते आहे. त्यामुळे कोणत्याही नोकरदारास कोणत्याही सरकारी जागेवर बदलीसाठी जावे लागेल. नाही म्हणता येणार नाही. जादा झालेला नोकरवर्ग माशा मारीत बसण्यापेक्षा काही देशोपयोगी कामाला लावता येईल आणि शेवटी सरकारी पत्रव्यवहाराचा सारा मायनाच बदलून टाकावा. प्रत्येक पत्रात सही करणाऱ्या अधिकाऱ्याने "आपला सर्वांत आज्ञाधारक सेवक राहण्याची भीक मागतो," असे म्हणून सही करण्याचा नियम करावा.

सरकारी नोकरांचे पगार वाढण्याआधी ते नोकर राहतील, मालकाप्रमाणे अरेरावी करणार नाहीत एवढी काळजी घेतली, तरी 'सुलतानी'चे दुःख पुष्कळसे कमी होईल.

■■

नोकरदारांची मगरमिठी

'खुल्या बाजारपेठेचे अर्थशास्त्र' आजकाल खूप गाजते आहे. शब्द बोजड आहेत. अर्थशास्त्राशी संबंध नसलेल्या सर्वसामान्य माणसांना ही काय भानगड आहे समजायला कठीण जाते. पांडित्यपूर्ण जडजंबाल भाषा सोडली तर कल्पना अगदी सोपी आहे. 'खऱ्याला मरण नाही' आणि 'खोटे कधी टिकत नाही' इतकी ही साधी बाळबोध कल्पना आहे.

सावत्र आईने आपल्या जरत्कारू पोराला खूप न्हाऊ घातले, धुतलं, सजवलं तरी तो काही निसर्गतः धट्टयाकट्टया असलेल्या उघड्या-वाघड्या बाळाशी बरोबरी करू शकत नाही. स्वातंत्र्यानंतरच्या नियोजन व्यवस्थेत अनेक पांढरे हत्ती पोसले गेले आणि कित्येक लाडक्या बाळांना शेफारून ठेवलं गेलं आणि कसून मेहनत करणाऱ्या पोरांना धड जेवू दिले नाही. परिणाम एवढाच झाला, जे काय जवळ होते ते नालायक बाळांनी उधळले आणि संगळं घर, देश भिकेला लावला.

सबसिडीविरुद्ध आघाडी

देशाचे दिवाळे वाजल्यावर बाहेरचे सावकार सांगू लागले, घरातली लाडक्या पोरावरची उधळमाधळ बंद करा. सरकारी प्रयत्न टुकूटुकू चालू आहेत. खतांची सबसिडी, पेट्रोलियमवरची सबसिडी दूर करून दहा-पंधराहजार कोटी रुपयांची बचत कराण्याची पराकाष्ठा चालू आहे; पण अजून सगळ्यांत मोठी सबसिडी, म्हणजे सगळ्यात शेफारलेल्या पोरांचे लाड चालूच आहेत. काही उदाहरणे पाहा :

भाग्यवान प्राध्यापक

माझा एका छोट्या महाविद्यालयाशी संबंध आहे. दरवर्षी प्राध्यापक पदावर नेमणुकी कराव्या लागतात. त्यासाठी अर्ज मागवले जातात. एके काळी शिक्षकांचे, प्राध्यापकांचे पगार फारसे चांगले नसायचे. ही मंडळी संघटित झाली. त्यांनी

संप केले, आंदोलने केली आणि आपले वेतन, भत्ते, सोयी, सवलती वाढवून घेतल्या. निरुपद्रवी बुद्धिजीवी म्हणून सर्वसामान्य लोकांना त्यांच्याबद्दल सहानुभूती होती. शिवाय, प्राध्यापक मंडळी त्यांच्या त्यांच्या विषयातली तज्ज्ञ समजली जातात म्हणून त्यांचा काहीसा दबदबाही असतो. पुढारी मंडळी पत्रकारांना जशी नाराज करीत नाहीत तशीच प्राध्यापक मंडळींनाही नाखूष करू इच्छित नाहीत. प्राध्यापक, शिक्षक मंडळींचे पगार वाढत गेले आणि आज स्थिती अशी आहे, की प्रशासन सेवेपेक्षासुद्धा प्राध्यापकाची नोकरी जास्त आकर्षक मानली जाते. आठवडी सुटी, दिवाळीची सुटी, उन्हाळ्याची सुटी, नाताळची सुटी, गॅदरिंगची सुटी, दर दिवसाला जास्तीत जास्त तीनचार तास. शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप असे, की व्यासंग ठेवणे आवश्यक नाही. शिकवण्याची मिळकत, परीक्षांच्या काळात वरकमाई, महाविद्यालयात दरारा, समाजात आदर, जबाबदारी नाही, धोका नाही अशा पदांकरिता धावपळ चालू असते. प्राध्यापकांच्या अर्जाबरोबर चिठ्ठ्या जोडलेल्या असतात. "माझी नेमणूक झाल्यास तीन वर्षे विनापगार काम करण्याची तयारी आहे." "नेमणूक झाल्यास महाविद्यालयास पंचवीस हजार रुपये देण्याची माझी तयारी आहे." इ.इ.

स्वातंत्र्योत्तर काळात, नियोजनाच्या अर्थव्यवस्थेत, संघटनशक्तिच्या ताकदीवर प्राध्यापक मंडळींनी त्यांच्या वास्तविक मूल्यापेक्षा अवाच्या सवा फायदे पदरात पाडून घेतले. हा खोटेपणा प्राध्यापक पदांच्या काळ्या बाजारात उघडा पडतो.

शिक्षकांची चंगळ

साध्या शिक्षकाची नोकरी मिळवायलासुद्धा आता वीस वीस हजार रुपये द्यावे लागतात. एकदा शिक्षकाची नोकरी मिळाली, की दोन हजार रुपयांच्या आसपास पगार मिळू लागतो. म्हणजे आयुष्यभर ददात म्हणून नाही. नेमणुकीच्या वेळी केलेला खर्च हुंड्यात भरून निघतो आणि दुसऱ्या एखाद्या शिक्षिकेशी विवाह जमला आणि नवरा बायको दोघांचाही पगार चालू झाला म्हणजे चंगळच चंगळ!

मध्ये एक बातमी आली होती, जिल्हा परिषदेच्या शाळेतील एका बहाद्दर शिक्षकाने आपल्या जागी काम करायला पाचशे रुपयांवर दुसरा चांगला माणूस नेमला आणि तो स्वतः शाळेकडे पगाराचा दिवस सोडून, न फिरकता व्यापारउदीम करू लागला. पाचशे रुपयांवर काम करणारा शिक्षक अधिक चांगला शिकवत असल्यामुळे विद्यार्थ्यांनीही तक्रार केली नाही. थोडक्यात आजच्या परिस्थितीत पाचशे नाहीतर जास्तीत जास्त हजार रुपये हा शिक्षकांकरिता खरा पगार आहे. वरचा सगळा खोटा व्यवहार!

धनदांडगे नोकरदार

प्राध्यापक आणि शिक्षक बिचारे तसे निरागस! विद्यार्थ्यांचे पालक बिचारे परीक्षेच्या वेळी नापासाचा पास करण्याकरिता किंवा विशेष गुण देण्याकरिता देतील तेवढीच वरकमाई. विनावरकमाईच्या या पदासाठीही वीस-पंचवीस हजारांची पागडी द्यावी लागते; मग पोलिस, महसूल, जंगल, अबकारी, आयकर अशा वरकमाईची लयलूट असलेल्या खात्यांबद्दल काय विचारावे! दरवर्षी फौजदारांच्या भरतीच्या वेळी पागडीचा भाव फुटतो. नेमणूक झाल्यानंतरही, विशिष्ट पदावर विशिष्ट जागी नेमणूक व्हावी म्हणून वेळोवळी पागडी द्यावी लागते, हे सर्वज्ञात आहे. कुणी नाकारू शकत नाही. महाराष्ट्रातल्या वाहतूक नियंत्रकाच्या एका जागी नेमणूक होण्याकरिता लाखो रुपये द्यावे लागतात अशी वदंता आहे. या पदासाठी, जागांसाठी, पागडी द्यावी लागते याचा अर्थ येथे काळाबाजार आहे, खोटेपणा आहे.

मी दरवर्षी भारतीय प्रशासन सेवेच्या मसुरी येथील अकादमीत नव्याने निवड झालेल्या अधिकाऱ्यांसमोर भाषण देण्याकरिता जातो. या भेटीच्या संधीचा फायदा घेऊन नव्या तरुण अधिकाऱ्यांना भेटतो. गेली चार वर्षे निवड झालेल्या अधिकाऱ्यांबद्दल एक अद्‌भुत गोष्ट आढळली, इतकी सारी वर्षे प्रशासन सेवेत येणारे तरुण हे कला, वाणिज्य या शाखांचे असत. काही थोडेफार शास्त्र, गणित शाखांचेही असत. या चार वर्षांत प्रशासन सेवेची परीक्षा उतीर्ण होणाऱ्यांमध्ये सगळ्यांत मोठा गठ्ठा इंजिनिअर, डॉक्टर तरुणांचा आहे. म्हणजे १२ वी च्या परीक्षेत ९०%च्या आसपास मार्क मिळवलेले, अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय महाविद्यालयात महामुश्किल असा प्रवेश मिळवलेले, कठीण तांत्रिक अभ्यासक्रम यशस्वीरित्या उतीर्ण केलेले हे विद्यार्थी प्रशासनात का येऊ पाहतात? समाजाने यातील प्रत्येकाच्या शिक्षणासाठी वीस-वीस लाख रुपये खर्च केला आहे. इंजिनिअर किंवा डॉक्टर बनल्यानंतर या क्षेत्रात उच्च शिक्षणाची मिळालेली संधी, समाजाची त्यांच्यातील गुंतवणूक, सगळे सोडून हे तरुण लिखापढीच्या प्रशासकीय सेवेत येऊ पाहतात.

त्यांच्याशी याबद्दल मी चर्चा केली. त्यांनी जी हुन्नर बाणवली आहे. तिचा उपयोग करून ते स्वतंत्र व्यवसाय किंवा निदान त्यांच्या क्षेत्रातील नोकरी का करत नाही? त्यांचे उत्तर अगदी प्रामाणिक. आय.ए.एस.च्या पदांमध्ये पगार भरपूर आहे. रुबाब आहे. सत्ता आहे. वरकमाईला मर्यादा नाही, काहीही धोका नाही, आयुष्यभराची शाश्वती आहे, तेव्हा इंजिनिअर, डॉक्टरी असल्या उरस्फोडी

कोण करतो? थोडक्यात प्रशासन सेवेच्या वेतन श्रेणीत खोटेपणा आहे.

मंडलचे रहस्य

शेती म्हणजे मरण, व्यापारधंदा शेतीधंदा कष्टाचा. नोकरी म्हणजे निव्वळ स्वर्ग अशी परिस्थिती जुन्या व्यवस्थेने आणली आहे. नोकरी मिळणे म्हणजे तरुणांचे स्वप्न आहे; कारण नोकरी म्हणजे घबाड आहे. ही लॉटरी लागली, की आयुष्यभर चिंता नाही, अशी अवस्था आहे. मंडल आयोगाच्या प्रश्नावर म्हणजे नोकऱ्यांतील राखीव जागांसाठी दोन्ही बाजूंनी इतका उद्रेक झाला याचे रहस्य स्पष्ट आहे.

या सगळ्या खोट्या वेतनांचा बोजा सगळ्या देशावर आहे. पगारदारांच्या वेतनाकरिता एक लाख कोटी रुपये केंद्र आणि राज्य शासने खर्च करतात. इतर सरकारी संस्था आणि संस्थाने लक्षात घेतली, तर सार्वजनिक क्षेत्रातील पगाराची रक्कम दोन लाख कोटींच्या खाली येणार नाही. या पांढऱ्या हत्तींची समाजाच्या भल्याकरिता कामगिरी काय? डॉक्टर, इंजिनिअर, उद्योगधंद्यातील नोकरदार त्यांच्या पगाराच्या निम्म्या भागाइतकी तरी भरपाई उत्पादनाने करतात. नोकरदारांच्या एका मोठ्या वर्गाचा उत्पादनाला हातभार काही नाही, उपद्रवच जास्त. त्यांचे काम उत्पादनाच्या कामात अडथळे आणणे एवढेच आहे आणि त्यासाठी त्यांना भरगच्च पगार मिळतो. नोकरदारांवर होणारा खर्च किती आणि त्यांच्या सेवेची किंमत किती याची तुलना केली तर नोकरदार वर्गाला दरसाल साठ हजार कोटी रुपयांची सबसिडी आहे.

राष्ट्रीय परिषद ठप्प

खताच्या चारपाच हजारांच्या सबसिडीकरिता धावपळ केली जाते? ठीक आहे! पेट्रोलियमची सबसिडी चारपाच हजार कोटीने कमी करता? आनंद आहे; पण राष्ट्रीय उत्पन्नाच्या जवळपास निम्म्या रकमेची ही सबसिडी संपवायला कोणी मायेचा पूत पुढे येणार आहे काय?

२६ सप्टेंबरला राष्ट्रीय विकास परिषदेची बैठक होणार होती. सरकारी नोकरांचे पगार कमी करण्याची कोणाची हिंमत आहे? पण देशाच्या सध्याच्या बिकट परिस्थितीत त्यांना वाढवून नवे महागाई भत्ते देऊ नयेत असा प्रस्ताव या बैठकीसमोर यायचा होता ही बैठकच पुढे ढकलली गेली आहे आणि भत्त्यांचा हप्ता मंजूर झाला. या एकाच गोष्टीने नोकरदारांच्या मगरमिठीच्या ताकदीची कल्पना यावी.

(१८ ऑक्टोबर १९९२)

■■

चोर, हर्षद, कवी, शास्त्रज्ञ आणि डंकेल

शेअर बाजार घोटाळ्याचे प्रकरण सगळीकडे गाजले आहे. हजारो कोटी रुपयांचा घपला, त्यात मोठमोठ्या लोकांचे हात गुंतलेले. शेअर बाजारातील रामायणाचा नायक म्हणजे हर्षद मेहता. त्यांच्या पराक्रमाने अयोध्येचा रामसुद्धा मागे पडला. आजपर्यंत जो काही पुरावा पुढे आला आहे त्यावरून भूपेन दलाल, कृष्णमूर्ती इ. काही मंडळी या एकूण घोटाळ्यास हर्षद मेहतापेक्षा जास्त जबाबदार आहेत; पण सर्वमुखी नाव झाले आहे हर्षद मेहताचे.

चोर आणि हर्षद

दहावीस हजार रुपयांचा दरोडा घालणारा टोळीवाला पोलिसांनी पकडला म्हणजे लोक त्याला पाहायला जमतात. "काय भयानक खतरनाक माणूस!" अशा थोड्या भयाने लोक त्याला पाहायला जमतात. हर्षदने केलेला घपला तीनचार हजार कोटींचा. त्याच्या कारवायांमुळे हजारो घरे उद्ध्वस्त झाली आहेत; पण त्याच्याविषयी चर्चा, "काय भयानक माणूस आहे!" अशी नाही, "पठ्ठा बहाद्दर आहे; पण थोडा फसला, नशीब बेकार!" अशा स्वरात.

एखादं फाटकं पोर पाचपंचवीस रुपयांकरिता खिसा कापायला जाते. जर का सापडलं तर आसपासचे सगळे लोक निर्दयपणे लाथाबुक्क्यांनी त्याला तुडवून काढतात. मारणाऱ्यांच्या सगळ्यांच्या चेहऱ्यावर मोठा संताप आणि त्या फाटक्या पोराविषयी राग राग असतो.

हर्षद मेहताने सगळ्या समाजाचा खिसा कापला, थोडा थोडक्याला नाही दोन-तीन हजार कोटीला कापला; पण कोर्टाच्या आवारात त्याला पाहायला जमलेल्या लोकांमध्ये 'ठोका लेकाला' अशी भावना नसते. "आहे कर्तबगार; पण चुकला, भोगेल बिचारा, आपल्या कर्माची फळे," अशी भावना असते.

चाकू, कुऱ्हाड वापरून दरोडा घातला म्हणजे त्याच्याविषयी लोकांमध्ये

संताप आणि तिरस्कार आणि कोर्टामध्ये कडक सजा. धारेच्या पात्याने खिसा कापणाऱ्या पोराला लोकांची मारहाण, पोलिसांची मारपीट आणि वर तुरुंग; पण लेखणीच्या शाईने किंवा कॉम्प्युटरच्या आधाराने हजारो कोटी रुपयांना गंडा घालणाऱ्या हर्षदबद्दल मात्र वेगळीच भावना, मुंबईला आता 'हर्षद फॅन' क्लब निघाले आहेत. "शेअर बाजार का एकही मर्द, हर्षद हर्षद" अशा घोषणांचे फलक जागोजाग लागत आहेत.

दीड दांडीचा तराजू

नैतिक काय? अनैतिक काय? कोणते कर्म म्हणजे गुन्हा? त्याची गंभीरता काय? आणि शिक्षा काय? या विषयीच्या कल्पना, नियम आणि कायदे पैसेवाल्यांच्या आणि लेखणीवाल्यांच्या मोठ्या सोयीसोयीने बनवले आहे. सुरा, बंदूक वापरली तर फाशी, तोच गुन्हा लेखणी वापरून केला तर जास्तीतजास्त वर्षा-दोन वर्षांची सजा! जमिनीच्या वादावरून डोक्यात कुऱ्हाड घालून अडाणी शेतकऱ्याने खून केला, तर त्याची फाशी निश्चित; पण तीच मनुष्यहत्या एखाद्या सुशिक्षित माणसाने पिस्तुलाने किंवा विषप्रयोगाने केली, तर जास्तीतजास्त जन्मठेपेने सुटणार! चार हजार कोटीची भानगड करणाऱ्या हर्षद मेहताला कायद्याच्या तरतुदीनुसार जास्तीतजास्त चार-पाच वर्षांची शिक्षा होऊ शकते. तेवढीदेखील प्रत्यक्षात व्हायची नाही. भरपाईपोटी दंड आणि दोनएक वर्षांची शिक्षा म्हणजे कमाल होईल. तेदेखील तो कमी शिकलेल्या गरिबाचा मुलगा म्हणून. उच्च शिक्षित, देशातील सर्वोच्च पदांना विभूषित केलेल्या कृष्णमूर्तींना तेवढीसुद्धा शिक्षा व्हायची नाही.

अपहार अडाण्यांनी केला तर शिक्षा कठोर, शहण्यांनी केला तर शिक्षा हलकी. खिसा कापणाऱ्या पोराला जीवघेणा मार, खोटे कागदपत्र करून घपला करणाऱ्याचा प्रसंगी जयजयकार, अशी काही विचित्र व्यवस्था आहे.

अदंड्य ब्राह्मण

मुसलमानी अमलात इस्लामच्या पाक बंद्यांकरिता वेगळा कायदा आणि काफिरांकरिता वेगळा दंड अशी व्यवस्था होती. मनुस्मृतीत शुद्राला साध्या चोरीकरितासुद्धा अमानुज शिक्षा; पण ब्राह्मणमात्र अदंड्य, असे स्पष्टच सांगितले आहे. औरंगजेबाच्या आणि मनुच्या व्यवस्थांविषयी वाचताना आज मोठे चमत्कारिक वाटते; पण असाच दीड दांडीचा तराजू न्यायव्यवस्थेत आजही आहे. सुशिक्षितांनी केलेला गुन्हा गुन्हाच नाही, असे ठरवणाऱ्या नीतीमत्तेची आणखी काही गमतीची उदाहरणे देता येतील.

इंग्रजी पुस्तकातील कवींच्या कल्पना हूबहू उत्तरवून मराठीत काव्यसंपदा साधणाऱ्यांचा एक मोठा जमाना होऊन गेला. केशव कुमारांनी असल्या कावड्यांची भंबेरी उडवली. 'कवी आणि चोर' या कवितेत त्यांच्यातील साम्य दाखविले; पण कवी आणि लेखकांच्या चौर्यकर्माला कुठे सक्तमजुरीची शिक्षा झाल्याचे ऐकिवात नाही. उचलेगिरी करून कवी आणि लेखक केवळ धनच नाही, मानसन्मानही मिळवतात.

ना.सी. फडके यांचे 'प्रतिभासाधन' हे गाजलेले पुस्तक एका पाश्चिमात्य ग्रंथावरून सरळसरळ घेतल्याचे सिद्ध झाले. फडक्यांचे थोडे हसे झाले; पण त्यांना काही तुरुंगात जावे लागले नाही. आजही वाङ्मय - चौर्याचा धंदा राजरोस चालू आहे. इंग्रजी पुस्तकातून चोरणे आता फारसे सुरक्षित राहिले नाही; पण एखादी रशियन, फ्रेंच, जपानीसारखी भाषा येत असली तर त्या भाषांतून चौर्य करण्यात धास्ती काहीच नाही. केशवकुमारांचीच ओळ आहे : "परवाङ्मयाची भांडारे, आम्हासाठीच ना बरे! खुली तयाची तुजला द्वारे, चिंता न करी."

शास्त्रज्ञांच्या चोऱ्या

वाङ्मयाच्या बाबतीत जे खरे तेच संशोधनाच्या बाबतीत. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र अशा विषयांत गेल्या पन्नास वर्षांत हजारो डॉक्टरेटचे प्रबंध झाले असतील; पण त्यात काही स्वतंत्र मांडणी केलेला प्रबंध शोधायला गेले, तर सापडणे जवळजवळ अशक्य. "परीक्षा म्हणजे एका ठिकाणची चोरून केलेली कॉपी आणि प्रबंध म्हणजे पाच-पन्नास ग्रंथांतून केलेली राजरोस चोरी!" असे विश्वविद्यालयातील विद्वान मंडळी उघडपणे मानतातच. फक्त समाजशास्त्रीय विषयातच हे खरे आहे, असे नाही. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इ. भौतिकशास्त्रातही हा उचलेपणाचा धंदा करून अनेकजण स्वतंत्र प्रतिभेचे शास्त्रज्ञ म्हणून मान्यता पावले आहेत. त्यांनी केलेल्या चौर्य कर्माला शिक्षा तर सोडाच मान्यता आहे.

'एकाचा वध म्हणजे खून, हजारोंची राजरोस हत्या म्हणजे देशप्रेम,' असे सीझरचे वाक्य आहे. तो नियम सुशिक्षितांच्या चौर्यकर्मासही लागतो. त्यांनी केलेली चोरी गुन्हा तर नाही; पण त्यांचे चौर्यकर्म हे एक थोर कार्य आहे. ही एक देशसेवा आहे. असे जाहीररित्या प्रतिपादन केले जाते. परदेशातील शास्त्रज्ञांनी आणि संस्थांनी कोट्यवधी रुपये खर्चून अथक परिश्रमांनी संशोधन केलेले असो, त्यांच्याकडून उचलून घेण्याचा आम्हाला हक्कच आहे. आम्हाला ते

राजरोसपणे उचलून घेता आलेच पाहिजे. एवढेच नव्हे, तर या उचलेगिरीच्या कामाला सगळ्या सोयीसवलती, सुविधा मिळायला पाहिजे. इतक्या की, या संशोधनाच्या मालकांनी आपणहून ते संशोधन ते आमच्या हवाली केले पाहिजे. कोणत्याही तऱ्हेचा प्रतिबंध असता कामा नये, असे मोठे डौलाने म्हटले जाते. डंकेल प्रस्तावाच्या विरोधकांचे युक्तिवाद हे सुशिक्षितांच्या गुन्हेगारीला ब्रह्मकर्माचे स्थान देणारे आहेतच.

सर्व खिसेकापूंना आणि अगदी हर्षद मेहतांना देण्यासारखा सल्ला एकच, 'बाबाहो! इतके धोका असलेले चौर्यकर्म तुम्ही का करता? विद्यापीठात जा, संशोधन शाळांत जा. खुलेआम चोऱ्या करा. फायदा अफाट आहे. धोका काही नाही. विशेष माहिती आणि सल्ल्यासाठी डंकेल विरोधकांना भेटा.

धन्य ते चौर्य जाणावे ।
अब्रू जे जगी वाढवी
धिक धिक चौर्य मित्रा
जे नाव लौकि घालवी
(केशवकुमार)

(दि. २८ ऑक्टोबर १९९२)

■■

बिल क्लिंटन यांची कुऱ्हाड !

अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या बालपणाची एक कथा, शालेय पाठ्यपुस्तकापर्यंत पोचली असल्यामुळे मोठी मशहूर आहे. बाळ जॉर्जच्या हाती एक कुऱ्हाड लागली. कुऱ्हाडीच्या घावाने झाडे फटाफट तुटतात, खाली येतात याचे त्याला कौतुक वाटले, दिसेल ते झाड तोडून टाकण्याचा सपाटा त्याने लावला. त्यात त्याच्या वडिलांच्या लाडक्या झाडाचाही बळी गेला, वगैरे वगैरे.

अमेरिकेचे सध्याचे अध्यक्ष वयाने अत्यंत तरुण आहेत. पहिल्या अध्यक्षांच्या बालपणातील उपद्व्याप त्यांचे आजचे बालिश वारस चालवत आहेत, की काय अशी शंका यावी, अशा अलीकडच्या घटना आहेत.

पुथ्वीच्या गोलाची पूर्वेकडून पाहणी सुरू करू.

उगवत्या सूर्यावर झेप

जपान: जगातील सगळ्यांत वेगाने प्रगती करणारा देश. जपानी मालाच्या आक्रमणाने अमेरिकन कारखानदार भयग्रस्त झाले. बहुतेक सगळ्या देशांना महासामर्थ्यशाली वाटणारा डॉलर झुकतो तो फक्त जपानी येनपुढे. जपानने आपली आयात वाढवावी आणि निर्यात कमी करावी यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्षांनी प्रचंड दबाव आणला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर देशाची पुनर्बांधणी करण्यासाठी जपानने उद्योजकांना अनेक सोयी सवलती दिल्या होत्या. त्या बऱ्याच अंशी आजतागायत चालूच आहेत. आर्थिक शिखरावर पोचल्यानंतर जुन्या व्यवस्था चालू ठेवणे जगाला मान्य होणार नाही, हे उघड आहे. सुधारणा करण्यासाठी जपानी पंतप्रधान होसोकावा यांची धडपड चालू आहे; पण जपानी संसदेत सुधारणांना भरभक्कम विरोध होतो आहे. अमेरिकन दबावांमुळे तेथील सरकार कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. व्यापाराच्या अटीसंबंधीची कुऱ्हाड जपानवर चालवली जाते तशीच हिंदुस्थानसारख्या व्यापारीदृष्ट्या फालतू देशावरही.

तयार कपडे इत्यादी माल भारताने अधिक आयात करावा, असा दबाव हिंदुस्थानवर आणला जात आहे. इतर अनेक देशांवरही राष्ट्राध्यक्ष क्लिंटन असाच दबाव आणत आहेत.

उत्तर कोरियाचा अणुबॉम्ब

जपानच्या शेजारच्या उत्तर कोरियावर कुऱ्हाड चालली ती अणुबॉम्ब तयार करण्याच्या प्रश्नासंबंधी. उत्तर कोरिया १९५१ सालापासून संयुक्त राष्ट्रसंघाच्या सामर्थ्याशी लढला, आजही पश्चिमी देशांशी वादावादी चालूच आहे. स्वरक्षणार्थ आपल्या हाती दीडदोन तरी अण्वस्त्रे असावीत, असा उत्तर कोरियाचा प्रयत्न चालू आहे. तेथील आण्विक कार्यक्रमाची आंतरराष्ट्रीय तपासणी करता यावी यासाठी इराकप्रमाणेच उत्तर कोरियावरही संयुक्त राष्ट्रसंघाच्या फौजा चालून जाण्याची शक्यता नगण्य नाही. इराकविरुद्ध कारवाई याचसाठी झाली. आता उत्तर कोरियावर होत आहे. उत्तर कोरियानंतर, अण्वस्त्र प्रकरणी नाठाळपणा करणाऱ्या हिंदुस्थानकडेही अमेरिकेची वक्र नजर फिरणार आहे.

चिन्यांचे मानवी हक्क

आणखी पश्चिमेकडे सरकले, की लागतो चीन. निक्सनच्या काळापासून चीनी-अमेरिकी दोस्तीचे नगारे वाजत आहेत; पण चीनमध्ये मानवी हक्कांचे संरक्षण होत नाही. राजकीय विरोधकांना क्रूरपणे वागवण्यात येते. प्रसंगी ठार करण्यात येते. चीनमधील कायदेकानून बदलून मानवी हक्कांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय कराराशी सुसंगत अशी व्यवस्था तेथे आली नाही तर चीनबरोबरचा आपला व्यापार बंद करण्याची धमकी राष्ट्रध्यक्ष बिल क्लिंटन यांनी दिली आहे.

कुऱ्हाडीचा आणखी एक तडाखा

मानवी हक्कांसंबंधी उल्लंघन करणारा देश म्हणून भारताकडेही अमेरिकेची वक्र नजर आहे. विशेषत: पंजाब आणि कश्मीर राज्यात अनेक अमानुष कृत्ये पोलिस करीत असल्याचा उघड आरोप खुद्द क्लिंटन साहेबांनी केला आहे. रेंगाळत पडलेला कश्मीरचा प्रश्न भारत आणि पाकिस्तान दोघांनी मिळून एकत्र बसून सोडवला पाहिजे असा प्रचंड दबाव क्लिंटन दोन्ही शेजारी राष्ट्रांवर आणत आहेत. पंजाबचा प्रश्न जवळजवळ निकालात निघाला असला तरी शीख हक्कांच्या संरक्षणाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करून अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी मोठा कल्लोळ उडवून दिला आहे.

मध्यपूर्वेत धुमाकूळ

इराणमध्ये मुस्लिम कठमुल्लांचे राज्य चालू आहे. थोड्याच दिवसांपूर्वी

इराणच्या अध्यक्षांच्या खुनाचा प्रयत्न झाला. खुनाच्या कटामागे अमेरिकेचा हात असल्याबद्दल इराणमध्ये प्रचंड निदर्शने झाली. इराकच्या सद्दाम हुसेन सरकारविरुद्ध अमेरिकेच्या आग्रहाने संयुक्त राष्ट्रसंघाने अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी आक्रमण केले होतेच. पुन्हा एकदा त्याची पुनरावृत्ती होईल अशी शक्यता वाटते.

मध्यपूर्वेतील इस्त्रायल हे तर अमेरिकेचे खास बंधुराष्ट्र. आजपर्यंत शेजारच्या प्रबळ अरब राष्ट्रांना तोंड देऊन इस्त्रायल उभे राहिले ते अमेरिकेच्या मदतीमुळे; पण क्लिंटनच्या कुऱ्हाडीचा फटका इस्त्रायललाही बसला आहे. इस्त्रायली पंतप्रधान शेरॉन यांना पॅलेस्टिनी मुक्ती संघटनेचे यासर अराफत यांच्याशी बोलणी करणे भाग पडले, इतकेच नव्हे तर पॅलेस्टिनी राष्ट्रास मान्यता द्यावी लागली. त्यापलीकडे जाऊन पॅलेस्टिनी निर्वासितांचे नवे राष्ट्र भरभराटीस यावे याकरिता भरकस मदत करण्याचेही मान्य करावे लागले.

युरोपातील राष्ट्रसमुदायाशी अमेरिकेचा संघर्ष तसा जुना आहे. फ्रान्स देशाबद्दल अमेरिकी सर्वसामान्य नागरिकांच्याही मनात एक अढी आहे. आर्थिक प्रश्नांबद्दल संरक्षण व्यवहाराबद्दल, युरोपीय देशांशी अमेरिकेचा तंटाबखेडा असावा आणि क्लिंटनच्या कुऱ्हाडीचा तडाखा त्यांनाही बसावा हे समजण्यासारखे आहे; पण रशिया आणि इतर पूर्वाश्रमीच्या समाजवादी देशांशी स्नेहाचेच नव्हे, तर गोडीगुलाबीचे संबंध प्रस्थापित होणे अमेरिकेच्या आणि सर्वच जगाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अध्यक्ष येल्तसिन यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा पाठपुरावा चालवला आहे. रशियातील चलनवृद्धी आटोक्यात ठेवण्यासाठी परदेशी मदतीची गरज आहे. चार पाच वर्षांपूर्वी डॉलरच्या बरोबर असलेला रुबल आज घसरत घसरत २००० रुबल्स = १ डॉलर इतका कोसळला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय राष्ट्रांना ज्या प्रकारची आणि ज्या प्रमाणावर मदत 'मार्शल प्लॅन' खाली झाली तशीच १९९१ मध्ये जुन्या समाजवादी देशांना मिळाली असती तर खुली अर्थव्यवस्था आणण्याचे काम सोपे झाले असते; पण यावेळी नेमकी अमेरिका कंजुष झाली. पहिल्या महायुद्धानंतर वुड्रो विल्सनने केलेली चूकच क्लिंटन करीत आहेत. मदत दिली; पण आवश्यकतेपेक्षा खूपच कमी. परिणाम असा झाला, की खुली अर्थव्यवस्था रशियात मागे हटत आहे. जुन्या-पुराण्या समाजवादी व्यवस्थेचे पुरस्कर्ते अधिकार पदावर पुन्हा हक्क ठसवीत आहेत आणि झिरिनॉव्हस्कीसारखा 'भस्मासुर' डोके वर काढत आहे. अशा परिस्थितीत क्लिंटन बाळाने काय करावे? रशियास भेट देऊन खुली व्यवस्था अधिक

वेगाने आणणे किती महत्त्वाचे आहे. याबद्दल त्यांनी जोरदार भाषण दिले. अमेरिकेचे उपपराष्ट्रमंत्री स्ट्रोब यांनी काढलेले उद्‌गार फ्रेंच महाराणी अँत्वानेतच्या "लोकांना भाकरी मिळत नसेल तर मिठाई खाऊ द्या," या कुख्यात उक्तिची बरोबरी करणारे आहेत. समाजवादातून खुल्या व्यवस्थेकडे येण्यासाठी 'धक्काचा उपचार' आवश्यक होता हे सर्वमान्य; पण आर्थिक अराजकाने हवालदिल झालेल्या रशियन नागरिकांना स्ट्रोब साहेबांच्या मते "आतापर्यंत फक्त धक्काच मिळाला आहे, उपचार काहीच नाही." या एका वाक्यामुळे झिरिनॉव्हस्कीला प्रचंड बळ सापडले. बिल क्लिंटन बाळाच्या कुऱ्हाडीने आणखी एका झाडाचा जीव कासावीस केला.

इंग्लंडही सुटले नाही

इंग्लंड म्हणजे तर अमेरिकेचे सर्वांत प्रेमाचे राष्ट्र. दोन्ही राष्ट्रांतील नागरिकांना एकमेकांमध्ये फरक असा वाटतच नाही. दोन महायुद्धे आणि एक प्रदीर्घ शीतयुद्ध यांना दोघांनी मिळून तोंड दिले. चर्चिलच्या शब्दांत अमेरिका आणि इंग्लंड यांचे 'खास नाते' आहे. क्लिंटन बाळाची कुऱ्हाड खुद्द इंग्लंडवरही चालते आहे. आयर्लंडमधील अल्स्टर हा उत्तरेकडील परगणा. आयरिश स्वातंत्र्यानंतरही इंग्लंडच्या अधिपत्याखाली राहिलेला तो भाग स्वतंत्र व्हावा याकरिता वर्षानुवर्षे आंदोलन चालू आहे. आयरिश अतिरेक्यांनी घातपात, खून, बॉम्बस्फोट करून इंग्लंडमधील सर्व शांतता नासवून टाकली आहे. अतिरेकी चळवळीतील 'सिनफेन' संघटनेचा नेता जेरी ॲडाम्स अनेक घातपातांच्या कृत्यांकरिता जबाबदार मानला जातो. त्याचे नाव काढताच इंग्रजांचा कपाळशूळ उठतो. बिल क्लिंटन सरकारने ॲडाम्सला अमेरिकेत बोलावले, एवढेच नव्हे तर सिनेटमध्ये येऊन निवेदन करण्याचे आमंत्रण दिले. जेरी ॲडाम्स अमेरिकेत गेला, त्याच्या भेटीने आणि निवेदनाने सगळी प्रसिद्धी माध्यमे भरून गेली, वातावरण इतके बदलले, की आयर्लंडप्रकरणी इंग्लंडला माघार घ्यावी लागेल की काय, अशी चिन्हे दिसू लागली आहेत. तसे घडल्यास जॉन मेजर यांचे सरकार टिकणे कठीण आहे.

आठवावे लिंकनचे रूप

पूर्वेला जपानपासून पश्चिमेकडे इंग्लंडपर्यंत अमेरिकन राष्ट्राध्यक्ष सगळ्या देशांना चेपीत आहेत. त्यात मित्र आहेत, अतिप्रेमाचे मित्र आहेत आणि काही शत्रुत्वाचीही नाती असलेली आहेत. क्लिंटन यांचा आग्रह काही चुकीचा आहे असे म्हणणे कठीण आहे. जगभर खुली व्यवस्था असावी, अण्वस्त्रावर निर्बंध

असावेत, मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे आणि सर्व देशांनी आपल्या शेजारच्या राष्ट्रांशी असलेली प्रादेशिक भांडणे एकदा मिटवून टाकून जगभर शांतता निर्माण करावी, या हेतूंबद्दल फारसा मतभेद नाही. क्लिंटन ज्या तऱ्हेने सरसकट जगभर सगळ्या राष्ट्रांना नाराज करीत आहेत त्याने त्यांचा हेतू साध्य होईल, की त्यांच्या उद्दिष्टांचा पराभव होईल हा महत्त्वाचा प्रश्न आहे. सोविएत युनियन बुडाले, अमेरिकेशी तूल्यबळ महासत्ता कोणी उरली नाही म्हणून काय झाले? भारताचे पंतप्रधान राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना वागवतात, तसे राष्ट्रप्रमुखांना वागवणे अमेरिकन अध्यक्षांना झेपणारे नाही.

गुलामांच्या प्रश्नांवरती अब्राहम लिंकन यांनी अमेरिकन यादवी युद्धाचा धोका स्वीकारला; पण दक्षिणेतील राज्यांचा पराभव झाल्यानंतर उदारता आणि दिलदारपणा असा दाखवला, की सगळे अमेरिकन राष्ट्र पुन्हा एकसंघ बनले. रशियाच्या पाडावानंतर क्लिंटन यांच्यावर येऊन पडलेली जबाबदारी लिंकन यांच्याप्रमाणेच ऐतिहासिक आहे. दुर्दैव असे, की आजचे अमेरिकन राष्ट्रध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टनच्या बालपणातल्या कथेचा आदर्श समोर ठेवत आहेत. प्रौढ अब्राहम लिंकनचा नाही, त्यांनी आदर्श जॉर्ज वॉशिंग्टनचा बालपणाचा न ठेवता 'जेटीसबर्ग'च्या लिंकनचा ठेवला पाहिजे.

(१७ फेब्रुवारी १९९४)

■■

दैवायत्तं कुले जन्मं

रंगीबेरंगी गिधाडे

१९८८च्या शेवटास सांगली येथील शेतकऱ्यांच्या एका भव्य शेतकरी मेळाव्यात विश्वनाथ प्रताप सिंगांच्या उपस्थितीत मी धोक्याची सूचना दिली होती. नेहरू अर्थव्यवस्था कोसळते आहे. शेतकऱ्यांचा सूर्योदय होत आहे; पण सावध राहा! जातीयवादी गिधाडे उगवत्या सूर्याचा ग्रास करायला येणार आहेत. भली प्रचंड गिधाडे! हिरवी, भगवी, पिवळी, निळी, वेगवेगळ्या रंगाची, जातीवादी गिधाडे घिरट्या घालू लागली आहेत.

काही नाराज, काही खुष

या माझ्या वाक्याने अनेकांचा संताप संताप झाला. काही दिवसांपूर्वी म्हणजे माझ्या भाषणानंतर जवळजवळ तीन वर्षांनी, सांगलीला बोलताना बाळ ठाकऱ्यांनी, "आम्हाला गिधाडे म्हटले," म्हणून मोठा आरडाओरडा केला.

याउलट दुसरी काही मंडळी माझ्यावर भलतीच खुष झाली. रिपब्लिकन पक्षाचे एक नेते मला भेटायला लगोलग आंबेठाणला आले आणि मला पाहताच मोठ्या प्रसन्नपणे हसून म्हणाले, "तुमचे अभिनंदन करायला मी मुद्दाम इथपर्यंत आलो. जातीयवाद्यांना तुम्ही 'गिधाडे' म्हटलेत अगदी योग्य केले!"

"अभिनंदनाबद्दल धन्यवाद," मी म्हणालो; "पण माझ्या बोलण्याबद्दल तुम्हाला आनंद व्हायचे काय कारण? जातीयवादी गिधाडांचे वेगवेगळे रंग सांगताना भगवा, हिरवा, पिवळा यांच्याबरोब निळ्या रंगाचाही मी उल्लेख केला आहे हे विसरू नका."

दलित नेते अगदी गोंधळून गेले. आपल्याला कुणी जातीयवादी म्हणेल ही कल्पनाही कधी त्यांच्या मनाला शिवली नव्हती. 'जातीयवादी' म्हणजे त्यांनी इतरांना द्यायची खास त्यांच्या हक्काची शिवी. तो त्यांच्याकडेच उलटून आल्यावर

ते हतबुद्ध झाले, एवढेच नव्हे तर रागावले.

ब्राह्मणी जातीवाद

दुसरा एक अशाच प्रकारचा प्रसंग. माझ्या एका सभेच्या जागी काही सुशिक्षित सज्जन मंडळी मला भेटायला आली. त्यांनी माझ्यापुढे काही पत्रके ठेवली आणि हात जोडून विनम्रतेने म्हणाले, "अखिल महाराष्ट्र देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघाचे अधिवेशन आहे, आपण अवश्य यावे अशी विनंती आहे. ज्ञातीला आपल्याबद्दल व आपल्या कार्याबद्दल मोठा आदर आणि अभिमान आहे."

मी उत्तर दिले, "मी स्वत:ला ब्राह्मण मानत नाही आणि कोणत्याही जातीयवादी संस्थांबरोर संपर्क ठेवणेसुद्धा मी टाळतो."

माझे उत्तर त्यांना अपेक्षित असावे. "ब्राह्मणांना वाईट दिवस आले आहेत. त्यांच्या ज्ञातीच्या कामाला मात्र जातीयवादी म्हटले जाते." अशी तक्रारवजा पुटपुट करून मंडळी निघून गेली.

पिवळे पुरोहित

आणखी एक प्रसंग. जालना जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे अनावरण करण्याचा कार्यक्रम होता. पुतळा उभारण्याच्या कामात माझ्या सहकाऱ्यांचा पुष्कळ सहभाग असल्यामुळे सर्वांनी मिळून माझ्या हस्ते अनावरण व्हावे, असा आग्रह धरला. 'लक्ष्मीमुक्ती'च्या दोन कार्यक्रमांमध्ये अनावरणाला यायचे मी कबूल केले. कार्यक्रमाच्या जागी मला मोठा विचित्र अनुभव आला. सर्वसाधारणपणे कोणत्याही धार्मिक विधीत मी भाग घेत नाही. नारळ फोडायचे कामसुद्धा युक्तीयुक्तीने शेजारच्या सहकाऱ्याला मान देऊन त्याच्याकडे सोपवतो. इथेतर धार्मिक पूजांची आणि मंत्रघोषांची जय्यत तयारी. फरक एवढाच, की पुरोहित मळक्या धोतरातले नसून चमकदार पिवळ्या वस्त्रात होते. माझ्या भाषणात या सगळ्या प्रकाराबद्दल मी नापसंती व्यक्त केली. बौद्ध धर्माचा स्वीकार करण्यामागे बाबासाहेबांचा हेतू जातीव्यवस्था तोडण्याचा होता. एका पुरोहित समाजाच्याऐवजी दुसऱ्या पुरोहित समाजाचा बडेजाव वाढवण्याचा नव्हता.

संध्याकाळी माझ्या भाषणानंतर जपानहून आलेल्या कोणा महान बुद्ध विभूतीचे त्याच जागी प्रवचन होते.

दुसऱ्या दिवशी मला अहवाल मिळाला, की त्यांनी गावच्या सर्व बुद्ध मंडळींची कडक निर्भर्त्सना केली. "तुम्ही बुद्ध नाही, निर्बुद्ध आहात! कोणी शरद जोशी येतो, तुमच्या धर्मविधींची कुचेष्टा करतो आणि तुम्ही ऐकून घेता. तुम्ही खरेच निर्बुद्ध आहात."

'माफुआ' जातीवाद

धुळ्याला कॉम्रेड शरद पाटील नावाचे मार्क्स, फुले, आंबेडकरप्रणीत, सत्यशोधक मार्क्सवादी एक मित्र आहेत. जाती वर्ग स्त्री दास्यांतक, अशा जडजंबाल नावाच्या चळवळीचे ते पुरस्कर्ते आहेत. त्यांचे लिखाण तसेच. बाळशास्त्री हरदासानंतर इतके पंडिती लिहिणारा दुसरा कोणी झाला नाही. मराठा तर सोडाच, ब्राह्मणातसुद्धा नाही. शरद पाटलांचे बोलणे सुबोध आहे. लिहिणे त्यांचे त्यांनाच समजते की नाही, याबद्दल माझ्या मनात जबरदस्त शंका आहे. शेतकरी संघटनेचे, शेतकरी आंदोलनाचे, संघटनेच्या सामाजिक भूमिकेचे, महिला आघाडीचे कॉम्रेड शरद पाटील यांनी पुष्कळ कौतुक केले आहे; पण मी राखून राखून बोलतो, खुलेआम जाती वर्ग स्त्री दास्यांतक 'माफुआ' विश्लेषण पद्धतीच्या आधारे मार्गक्रमण करणाऱ्या जनआंदोलनांपासून अंतर राखून राहतो, अशी त्यांची तक्रार आहे आणि माझ्या या भूमिकेचे 'माफुआ' विश्लेषण ते वारंवार स्पष्ट करतात. ब्राह्मण कुळात मी जन्मल्यामुळे माझ्या विचारातला हा दोष अपरिहार्य आहे, असे त्यांचे स्पष्ट निदान आहे.

स्वजाती विरोधक आणि समर्थक

मी शहरी सुशिक्षितांत जन्मलो; पण त्यांना न आवडणारे शेतकरी आंदोलन उभे केले. हिंदू ब्राह्मण कुटुंबात जन्मलो आणि हिंदुत्वाचा गर्व बाळगणारे माझ्यावर दात ओठ खातात. मी पुरुष जन्मलो; पण जगातील सर्वांत मोठ्या महिला संघटनेचा मी कार्यकर्ता आहे. जन्माच्या अपघाताने मला जे जे काही लाभले त्यापासून मी जाणीवपूर्वक अंतर ठेवलेले आहे आणि स्वजातीच्या जुनाट अभिमानाला मार्क्सवादाची बेगड आणि संस्कृत प्रचूर पांडित्याची झूल घालणारे कॉम्रेड शरद पाटील ब्राह्मण घरात जन्मले असते, तर पेशवाईतल्या ब्राह्मणाचा नवा अवतार वर्तमानकाळात पाहायला मिळाला असता. माणसाच्या जन्माने त्याची सगळी मते वगैरे ठरतात, असे गंभीरपणे मानणाऱ्यांत कॉम्रेडसाहेब आघाडीवर आहेत.

प्रश्नावली

जातीयवादी म्हणजे कोण? शालान्त परीक्षेत वस्तुनिष्ठ प्रश्न विचारले जातात तसा प्रश्न विचारला. हो किंवा नाही म्हणा. खालील संस्था, पक्ष यांपैकी जातीयवादी कोण?

१) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ हो नाही
२) बौद्ध भिक्षु महासंघ हो नाही

३) जमाते इस्लाम	हो	नाही
४) शिवसेना	हो	नाही
५) दलित पँथर	हो	नाही
६) भा. रि. प.	हो	नाही
७) भा. ज. प.	हो	नाही
८) मा. क. प.	हो	नाही

जातीयवादी कोण हे ठरवायचे कसे? जातीयवाद ओळखावा कसा? काही फूटपट्ट्या स्पष्ट असल्या पाहिजेत.

मदायत्तम हि पौरुषम्

मनुष्याची पात्रता, श्रेष्ठत्व हे त्याच्या जन्माने ठरते, असे वर्षानुवर्षे वर्णाश्रमधर्म मांडीत आला आहे. जीवशास्त्रात याला फार थोडा आधार आहे. जन्मत: माणसामाणसांत फरक असतोच. दोन जुळे भाऊसुद्धा संपूर्ण सारखे नसतात; पण मनुष्य ही उत्क्रांतीतील सर्वोच्च अवस्था आहे. जन्मजात गुणांपेक्षा अभ्यासाने, प्रयासाने आणि तपस्येने मिळवलेल्या गोष्टीच महत्त्वाच्या असतात. हे जो मानत नाही तो जातीयवादी. थोडक्यात, जन्मजाताच्या अपघाताने माणसांना मोजू पाहतो, म्हणून तो जातीयवादी.

रोगाचे निदान वेगळे, औषध वेगळे

आपल्या देशातील आजपर्यंतचा बहुतेक इतिहास हा जातीजातीतील संघर्षाचा आणि शोषणाचा आहे, असे मी मानतो. यात वाद असण्याचे कारण नाही; पण कदाचित वेगळे मत असू शकेल. जातीव्यवस्थेचे कालमान परिस्थितीप्रमाणे ऐतिहासिक समर्थन काही विद्वान करतात. परवा परवापर्यंत सगळे मार्क्सवादी जाती विश्लेषण मान्य करीतच नव्हते. सगळा इतिहास वर्गसंघर्षाचाच आहे म्हणत होते. इतिहासाचे 'पोस्टमॉर्टेम' काहीही दाखवो, जुन्या रोगांचे निदान काहीही असो, औषध जुनेच असले पाहिजे असे नाही. जातीव्यवस्थेचे दोष दूर करण्याकरिता जातीधर्मानुसार जनांची निष्ठा ठरवणे आणि त्यानुसार मोर्चे बांधणी करणे हा जातीयवादाच. जात्यंताच्या घोषणा देणारा जातीयवाद एवढेच!

"श्रीनगरला पाकिस्तानचा झेंडा फडकला, यच्चयावत मुसलमान जन्माला आलेल्यांची कत्तल करा म्हणणारे ते जातीयवादी." "एका शिखाने इंदिराबाईंची हत्या केली मग सगळ्याच शिखांना शिक्षा झाली पाहिजे," असे म्हणतात ते जातीयवादी. आमच्या धर्माचा बोलबाला झाला पाहिजे, आमच्या धर्माचा आम्हाला गर्व आहे, असे म्हणतात ते जातीयवादी. कारण यातील सगळ्यांचा धर्म यांना

जन्माच्या अपघातामुळे मिळाला आहे.

उलटी विषमता, नवा जातीवाद

हजारो वर्षांच्या विषम व्यवस्थेनंतर अनेक समाजांची अवस्था मोठी भयानक झाली आहे. त्यांच्याकरिता काहीतरी विशेष तातडीने करणे आवश्यक आहे हे सर्वमान्य आहे. काही प्रमाणात उलट्या दिशेची विषमता समर्थनीय आहे. अशा तऱ्हेच्या योजनांना जे विरोध करतात ते जातीयवादी हे खरे; पण त्याबरोबरच अत्यंत संपन्न अवस्था असताही केवळ मागास समाजात जन्माला आलो या आधाराने विशेष हक्क बळकावू पाहतात तेही जातीयवादीच.

सगळेच जातीवादी

वर दिलेल्या वस्तूनिष्ठ प्रश्नांची उत्तरे तुम्ही काय दिली असतील कुणास ठाऊक? बरोबर उत्तर हे, की यादीत दिलेले सर्वच्या सर्व पक्ष आणि संस्था जातीयवादी आहेत. फक्त ही यादी अपुरी आहे.

दैवदुर्विलास असा, की सांगलीच्या शेतकरी मेळाव्याच्या मंचावर एक व्यक्ती हजर होती, अयोध्याछाप जातीयवादाला रोखण्यासाठी ती पंतप्रधानपद सोडून देणार होती आणि मंडलछाप जातीयवादाच्या जन्माच्या वेळी सुईण होणार होती.

(११ नोव्हेंबर १९९२)

■■

सध्याची नाम (धाऱ्यांची) परिषद

जकार्ता येथे अलिप्त राष्ट्रांची 'नाम' परिषद पार पडली. म्हणजे एक 'नेमेचि' येणारे आन्हिक उरकले. अलिप्त राष्ट्रांची पहिली परिषद इंडोनेशियातच बांडुंग येथे झाली. त्यावेळी चौ एन लाय, नेहरू, नासेर अशी दिग्गज व्यक्तिमत्त्वे हजर होती. एका नव्या युगाच्या उदयाची स्वप्ने पाहणारी होती. आताच्या जकार्ता बैठकीस हजर राष्ट्रनेते सगळी किरकोळ माणसे. एका कालखंडाच्या अकस्मात अस्ताने कुंठित झालेली.

बिन तटांचे तटस्थ

समाजवादी साम्राज्य अकस्मात पत्त्यांच्या बंगल्यासारखे कोसळले. जगातील आर्थिक आणि लष्करी सत्ता आता पश्चिमी देशात एकवटली आहे आणि तिचे केंद्र अमेरिकेत आहे. 'नाम' चळवळीच्या चढत्या काळात जागतिक सत्तेची दोन केंद्रे होती. समाजवादी देश म्हणजे दुसरे जग असे मानले जाई. पाश्चिमात्य देशांच्या खालोखाल आर्थिक सत्ता आणि त्यांच्याबरोबरीचे लष्करी सामर्थ्य समाजवादी गटाकडे आहे, असा समज होता. "समाजवादी, भांडवलशहांना नेस्तनाबूत करणार," असे क्रुश्चेव राष्ट्रसंघाच्या महासभेत हातात जोडा घेऊन गर्जत होता; पण आता झाकली मूठ उघडली गेली आहे. समाजवादी देश तिसऱ्या जगातील देशांच्या बरोबरीने हातात 'भिक्षापात्र' घेऊन उभे आहेत. दोन तटच नाहीत तर तटस्थता कसली?

जुन्या सवयी

या प्रश्नावर सगळीकडे चर्चा चालू आहे. भारतातील सर्वसामान्य जनतेस तटस्थ राष्ट्रांची परिषद 'नाम' असली काय, नसली काय फारसे सोयरसूतक नाही; पण सरकारच्या आसपासची विद्वान, प्राध्यापक मंडळी, माजी राजदूत इत्यादी इत्यादी मोठमोठे लेख लिहून परिसंवाद भरवून या प्रश्नांची चर्चा करीत आहेत.

सर्वांचे जवळजवळ एकमत. दोन तट उरले नसले तरीसुद्धा तटस्थ चळवळ चालू राहिलीच पाहिजे. 'नाम' परिषदेत भाग घेणाऱ्या सर्व राष्ट्रांचे मतही असेच निघाले, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कोणतीही संस्था स्वत:च्या विसर्जनाला आपणहून संमती देत नाही. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसलादेखील स्वत:चे विसर्जन करून टाकण्याची हिंमत झाली नाही. मरणासन्न व्यक्तीदेखील इच्छामरण क्वचितच स्वीकारतात; पण मृत्यू आल्यावर "मी अजून जिवंतच आहे," असे माणूसप्राणी म्हणू शकत नाही. मेलेल्या संस्था जिवंतपणाचे नाटक दीर्घकाळ चालवू शकतात. नाकातोंडात नळ्या खुपसलेल्या, हालचाल नाही, कार्य नाही, खर्च चालू, अशा अवस्थेत वर्षानुवर्षे संस्था जिवंत राहतात, अशी परिस्थिती आहे.

जगात दोन तट दुसऱ्या महायुद्धानंतर तयार झाले. त्यांच्यामध्ये कुठे पोलीदी पडदा, तर कुठे कमी कठोर बांबूचा पडदा उभा राहिला. दोन गटांत जीवघेणी, राजकीय आणि लष्करी स्पर्धा सुरू झाली. साहजिकच आर्थिक क्षेत्रातही चढाओढ सुरू झाली. खुल्या बाजारपेठेच्या भांडवलवादी व्यवस्थेत गोंधळ जास्त. व्यक्तिगत स्वार्थाचा त्यात हैदोस. त्यामुळे समग्र समाजाच्या हिताचे काम अशा व्यवस्थेत कार्यक्षमतेने होत नाही. याउलट, रशियातील क्रांतीनंतर समग्र मानवजातीच्या कल्याणाकरिता अद्‌भूत प्रयोग सुरू झाला आहे, अशी अनेकांची दृढ श्रद्धा होती.

दुसऱ्या महायुद्धात थकलेल्या साम्राज्यवादी देशांनी आपापल्या वसाहतींना स्वातंत्र्य देऊन टाकले आणि पाचदहा वर्षांत एकदम शंभरएक वसाहती स्वतंत्र देश म्हणून आपापले झेंडे फडकावू लागल्या. या वसाहतीतील जनता गरीब, निरक्षर, साम्राज्यवादाच्या शोषणाने अधिकच दुर्बल झालेली. स्वातंत्र्य अनपेक्षितपणे येऊन पडले आणि सत्ता देशी साहेबांच्या हाती गेली. लिखापढी करून शासन चालवण्याची औपचारिकता पार पाडण्याची कुवत एवढीच देशी साहेबांची पात्रता. साम्राज्याच्या काळात स्थानिक जनतेला लुबाडणे हा गोऱ्या साहेबांचा कार्यक्रम. त्यात जी देशी मंडळी वेगवेगळ्या मार्गांनी आडतेगिरी करीत होती, त्यांच्या हाती एकदम राजकीय सत्ता आली. थोडक्यात, प्रत्येक वसाहतीतील 'इंडिया' तेथील 'भारता'वर राज्य करू लागला.

साम्राज्यवाद्यांच्या जागा घेऊन, सर्व सूत्रे हाती घेऊन या नव्या शासकांनी गोऱ्या साहेबांचेच काम पुढे चालवले. फक्त त्याला राष्ट्रीय विकास, नियोजन इत्यादी नावे दिली आणि अशा नावांखाली जुन्या मालकांकडून कर्जे आणि

मदत मागायला सुरुवात केली. नुसती आर्थिक मदत नाही, शस्त्रास्त्रांचीदेखील.

या शंभरावर देशांत टोळ्यांची, जातींची, धर्मांची, प्रदेशांची, भाषांची इत्यादी अनेक भांडणे होती. परकीय सत्ताधाऱ्यांच्या अंमलाखाली ही भांडणे थोडी दबून होती. स्वातंत्र्यानंतर ती उफाळून आली आणि पूर्वी सुरे, चाकू, लाठ्याकाठ्या, या साधनांनी होणारे दंगे मशिनगन, टँक, विमाने आणि बॉम्ब यांच्या साहाय्याने होऊ लागले. आर्थिक मदतीपेक्षाही या वसाहतीतील नव्या सत्ताधाऱ्यांना शस्त्रास्त्रांच्या मदतीची गरज होती. शेजारच्या देशांना धाकात ठेवण्यासाठी आणि त्याहीपेक्षा देशातला बंडावा मोडून काढण्यासाठी.

नवे पंतप्रधान, अध्यक्ष आणि सुलतान यांच्या पैशाच्या आणि हत्यारांच्या मागण्या मोठ्या जबरदस्त. कितीही पुरवठा केला तरी समाधान होणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे हे महात्मे सदा असंतुष्ट. या असंतोषाचा फायदा समाजवादी देशांनी बरोबर उचलला आणि त्यांना चुचकारायला सुरुवात केली आणि लवकरच काही देश पाश्चिमात्यांचे अंकित तर काही समाजवाद्यांचे. काही या संरक्षण गटात तर काही त्या संरक्षण गटात अशी जगाची विभागणी झाली.

पण एका गटाला आपली निष्ठा अर्पण करणे फारसे सोयीचे किंवा फायद्याचे नव्हते. एक गट स्वीकारला म्हणजे तेथे जे काही तुकडे पदरात पडतील त्यावर समाधान मानून राहावे लागे. घरच्या लक्ष्मीला मिळेल त्यावर समाधान मानावे लागते. दोन्ही धनिकांकडे मागणी करण्याचे स्वातंत्र्य अबाधित राहिले म्हणजे दोघांनाही एकमेकांचा धाक दाखवून जास्त लभ्यांश पदरात पाडून घेता येतो. अशा हिशेबाने 'अलिप्ततावादाच्या' झेंड्याखाली 'नाम' चळवळीचा उगम झाला आणि जवळजवळ ३५ वर्षे या राष्ट्रांच्या शासनांनी आपापल्या जनतेस लुटण्याचे आणि दोन धनिक गटांकडून मदत उकळण्याचे कार्य व्यवस्थित पार पाडले.

धनिक राष्ट्रांनाही या परिस्थितीत काही करता येण्यासारखे नव्हते. तिसऱ्या जगातील सुलतान हे त्यांच्या लोकांचे प्रतिनिधी नाहीत. बहुतेक ठिकाणी सत्ता उपटसुंभ लष्करशहांच्या हाती आहे, जिथे लोकशाहीचा मुखवटा तरी आहे. तेथे काही घराणी स्वत:ची लयलूट करून घेत आहेत. येथे पैशाचा केवढाही मोठा ओघ सोडला, तरी या देशांचा विकास होणे सुतराम शक्य नाही. हे दोन्ही धनिक गटांना चांगले ठाऊक होते; पण राजकीय परिस्थिती अशी अडचणीची, की दोघांनाही तोंडावर हसू आणून प्रसंग साजरा करून न्यावा लागत होता.

समाजवादी देशांनी समाजवादातून विकासाची आरोळी दिली. सर्व देशांच्या आर्थिक आणि राजकीय सत्तेच्या नाड्या हाती घेण्यासाठी ही मोठी आकर्षक

घोषणा होती. पाश्चिमात्य राष्ट्रांनी गोऱ्यांची (काळ्यांच्या उद्धाराची) जबाबदारी हे गर्विष्ठ तत्त्वज्ञान गाडून टाकले आणि "धनिक राष्ट्रांचे वैभव आणि गरीब राष्ट्रांचा विकास एकमेकांशी जोडलेले आहे," हा समतावादी विली ब्रांट सिद्धांत फडकावला.

अलिप्त राष्ट्रे गरीब असली तरी त्यांची संख्या मोठी. साहजिकच आंतरराष्ट्रीय संस्था, परिषदा इत्यादींवर त्यांनी चांगला ताबा मिळवीला होता. कोणत्याही आंतरराष्ट्रीय परिषदेत सर्वांत जास्त भपकेबाज कपडे, मोटारगाड्या आणि मेजवान्या देणारे प्रतिनिधी म्हणजे गरीब राष्ट्रांचे, अशी मोठी विचित्र परिस्थिती होती. पाश्चिमात्य आणि समाजवादी, दोन्ही राष्ट्रांना या परिस्थितीचे मोठे वैषम्य वाटे; पण बोलता येत नाही आणि सहन होत नाही अशी कथा.

आणि एकाएकी चित्र बदलले. समाजवादी साम्राज्य कोसळले. आता दोन धनिकांना एकमेकांविरुद्ध खेळवण्याची काही शक्यता राहिली नाही.

पाश्चिमात्य देश, त्यांच्या मनात अनेक वर्षांपासून साचलेला राग काढून 'टीनपाट सुलतानांना' रांगेत आणण्याच्या कामास लागले आहेत. जनतेला पोटाला खायला नाही, शिक्षणाची सोय नाही; तरीही जिहादच्या, राष्ट्रीयत्वाच्या घोषणा करून इकडून तिकडून शस्त्रसामग्री, जमले तर एखाद दुसरा अणुबॉम्बही संपादन करून आपले वर्चस्व गाजवू पाहणाऱ्या उद्दामांना शिस्तीत आणण्याचे काम चालू झाले आहे.

त्याबरोबर, विली ब्रांट सिद्धांतालाही नवी कलाटणी दिली जात आहे. धनिक राष्ट्रांचे वैभव गरीब देशांच्या विकासाशी निगडीत आहे हे खरे; पण गरीब देशांचा विकास, त्यांची हुकूमशाही, भ्रष्ट, अकार्यक्षम, लायसेंस-परमिट सरकारे घडवून आणू शकणार नाहीत. हा गेल्या ४० वर्षांचा अनुभव आहे. गरीब देशातील विकास सुलतानांचे खजिने भरून नाही, तर त्या देशातील उत्पादक घटकांशी व्यापारी देवघेव केल्यानेच साधेल अशी पाश्चिमात्य देशांची भूमिका आहे.

म्हणजे, सुलतानांचे दिवस संपले आहेत. 'नाम' निरर्थक झाली आहेत. हे तिच्या म्होरक्यांनाही उमजले आहे. परदेशी मदत मिळणार नसली तर हे हुकूमशहा टिकून राहूच शकत नाहीत. जकार्ताला जमलेल्या सव्वाशेवर देशांमधील १० देशांचे प्रमुखसुद्धा लोकशाही मार्गाने निवडून आलेले नाहीत आणि जनतेच्या सुखदु:खाशी त्यांचे काही देणे-घेणे नाही. तिसऱ्या जगाचे केवळ आर्थिक प्रश्नच मांडायचे तर 'जी ७७'सारखी आर्थिक संघटना आहे. त्यात 'नाम'मधील

जवळजवळ सगळेजण आहेतच. आर्थिक कामाकरिता नाही आणि राजकीय हेतूकरिता नाही. 'नाम'चे जीवितकार्य संपले आहे. नाकातोंडात नळ्या खुपसून तिला जिवंत ठेवायचे तर ठेवा; पण ती केव्हाच मृत्त झाली आहे.

अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीचे प्रमुख नेते मार्शल टिटो आता यात नाहीत. त्यांच्या देशाचे तुकडे तुकडे होताहेत आणि युगोस्लाव्हियाच्या वेगवेगळ्या भूखंडांचे प्रतिनिधित्व कुणी करायचे हाच मुळी जकार्ता परिषदेत वादाचा विषय झाला.

दुसरे प्रमुख नेते नासेर यांच्या इजिप्तला अरब राष्ट्रांतही आज मानाचे स्थान नाही. फिडेल कॅस्ट्रोचा क्युबा पोरका झाला आहे. भारताचीही या परिषदेतील स्थिती मोठी केविलवाणी झाली आहे. अणुनियंत्रण करारावर भारत सही करू इच्छित नाही याबद्दल जकार्ता परिषदेतील सगळ्या राष्ट्रांनी नापसंती व्यक्त केली. युगोस्लाव्हियातील यादवी युद्धात मुसलमानांच्या होणाऱ्या हत्याकांडांविरुद्ध परिषदेत निषेध व्यक्त करण्यात आला त्यात भारताने भाग घेतला नाही, भीती अशी, की या वादात पडल्यामुळे अयोध्या प्रश्न अधिकच चिघळू नये. इराकमधील अमेरिकेच्या हस्तक्षेपाबद्दल परिषदेत चर्चा झाली. अमेरिकेविरुद्ध जाहीररीत्या बोलण्याची भारताची आज हिंमत नाही. त्यामुळे भारताच्या पंतप्रधानांसकट सगळे प्रतिनिधीमंडळ जकार्ता परिषदेचा समारोप होण्याच्या एक दिवस आधी जकार्ताहून पाय काढते झाले. 'नाम' परिषदेचे 'काड्याचे' घोडे नेहरू, टिटो, नासेर, कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वामुळे जिंवत वाटत असे. त्या घोड्यात आता काही प्राण नाही, हे सगळ्यांना माहीत आहे. हे नाटक हास्यास्पद झाले आहे. बीभत्स होण्याच्या आधी पडदा पडेल एवढीच आशा.

(२५ नोव्हेंबर १९९२)

■■

मा. शरद जोशी अमृत महोत्सवी वर्ष

२००९-२०१०

■ ग्रंथसुची ■

शेतकरी संघटना
विचार प्रसार अभियान

शरद जोशी

अंगारमळा १५०/-
शेतकऱ्यांचा राजा शिवाजी आणि इतर लेख १५०/-
प्रचलित अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश १५०/-
खुल्या व्यवस्थेकडे खुल्या मनाने १९०/-
स्वातंत्र्य का नासले? ०५०/-
शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती १५०/-
जग बदलणारी पुस्तके १००/-
अन्वयार्थ १ ..... ३००/-
अन्वयार्थ २ ..... २००/-

अनंत उमरीकर

आंदोलन १२०/-
वेडेपीर २००/-
बँकेनं लुटलं शेतकऱ्याला ०२०/-

विजय परूळकर

योद्धा शेतकरी १५०/-

शेषराव मोहिते

शेती व्यवसायावरील अरिष्ट ०३०/-

विनय हर्डीकर

जग बदल घालुनी घाव ०३०/-

इंद्रजित भालेराव

मळ्यातील अंगार ०५०/-

आगामी

शरद जोशी

माझ्या शेतकरी भावांनो-मायबहिणींना ■ *पोशिंद्यांची लोकशाही,*
चांदवडची शिदोरी ■ *बळिचे राज्य येणार आहे* ■ *'भारता'साठी*

श्रीकांत देशमुख

शेतकरी चळवळ

श्रीकांत उमरीकर (संपादन)

शेतकरी संघटना : आठवणी- आस्था- अपेक्षा- आक्षेप



मनुष्यजातीची प्रगती होते ती प्रामुख्याने धडाडी दाखविणाऱ्या संशोधक प्रतिभाशाली नेतृत्वामुळे होते. सर्वसाधारण जनतेला या प्रतिभाशाली धडाडीच्या नेतृत्वाबद्दल मनामध्ये एक प्रचंड मत्सर असतो. इतरांनी प्रतिभा दाखवावी, धोका पत्करून संशोधन करावे आणि त्याचे फळ आपल्याला बिनबोभाट मिळावे अशी त्यांची अपेक्षा असते. अशा तऱ्हेने, प्रतिभावान थोडे आणि प्रतिभेचा लाभ घेऊ इच्छिणारे अधिक अशी परिस्थिती असल्यामुळे लोकशाही व्यवस्थेमध्ये म्हणजे 'एक डोके, एक मत' निवडणुकीच्या आधाराने चालणाऱ्या व्यवस्थेमध्ये प्रतिभाशाली प्रज्ञावंतांचा विजय होण्याची शक्यता नाहीच. आजच्याही राजकारणात हे आपण प्रत्यक्षात पाहतोच आहोत.

जनशक्ती वाचक चळवळ
किंमत : रु. ३००/-